

महात्मा फुले यांचे आद्य चरित्रकार
समाजभूषण पंढरीनाथ सीताराम पाटील
यांचे

# चरित्र

लेखक : ना. जा. दांडगे (से. नि.)
प्राचार्य, यशवंत अध्यापक विद्यालय, बुलडाणा तथा
संस्थापक संपादक, साप्ताहिक बुलडाणा पत्रिका, बुलडाणा



## महात्मा फुले यांचे आद्य चरित्रकार
## समाजभूषण पंढरीनाथ सीताराम पाटील यांचे

# चरित्र


**लेखक : ना. जा. दांडगे** (से. नि.)
प्राचार्य, यशवंत अध्यापक विद्यालय, बुलडाणा तथा
संस्थापक संपादक, साप्ताहिक बुलडाणा पत्रिका, बुलडाणा

महात्मा फुले यांचे आद्य चरित्रकार

**समाजभूषण पंढरीनाथ सीताराम पाटील यांचे चरित्र**

+

लेखक

**नारायण जानू दांडगे** (से.नि.)

प्राचार्य, यशवंत अध्यापक विद्यालय, बुलडाणा तथा

संस्थापक संपादक, साप्ताहिक बुलडाणा पत्रिका

'पितृछाया' दांडगे ले-आऊट, बुलडाणा - ४४३ ००१

दूरध्वनी क्रमांक (०७२६२) २४२६७०, भ्रमणध्वनी - ९४२२७३४९६६

+

**प्रथमावृत्ती :** सप्टेंबर २००५

+

© **ना. जा. दांडगे,** 'पितृछाया' दांडगे ले-आऊट, बुलडाणा - ४४३ ००१

+

**मूल्य** : दोनशे रूपये फक्त

+

**विशेष सहकार्य**

ॲड. ज्योतिराव राऊत बुलडाणा, प्रा. पी. बी. ढोरे, प्राचार्य, श्री शिवाजी महाविद्यालय, चिखली जि. बुलडाणा व माजी आमदार विठ्ठल सोनाजी उर्फ बाबूराव पाटील, सावरगाव डुकरे, ॲड. प्रतापराव उर्फ बाबासाहेब भोंडे, श्री. दिगंबर शिंगणे व श्री. जे. के. हिंगे सर्व राहणार बुलडाणा

+

मुद्रक

**श्री साई ऑफसेट प्रिंटर्स,**

राजकमल हॉटेलजवळ, चिखली रोड, बुलडाणा

दूरसंवाद : (०७२६२) २४१४४८

+

प्रकाशक

**आत्माराम नामदेव गाडेकर**

पैनगंगा पब्लिकेशन्स्, बुलडाणा

द्वारा : श्री साई ऑफसेट प्रिंटर्स, हॉटेल राजकमलजवळ, बुलडाणा

दूरसंवाद : (०७२६२) २४१४४८, निवास : २४१४५१ भ्रमणध्वनी : ९४२२८८०८३२

+

कै. पंढरीनाथ सीताराम पाटील
यांच्या
खांद्याला खांदा लावून
बहुजनांच्या व राष्ट्रीय चळवळीत
सहभागी झालेल्या ज्ञात अज्ञात
त्यांच्या तत्कालीन सहकाऱ्यांना
सादर अर्पण...

## ॥ अनुक्रमणिका ॥

भाग १ / थोडी पूर्वस्थिती / १ ते २२
भाग २ / सत्यशोधक चळवळ / २३ ते ५०
भाग ३ / राजकीय जीवन / ५१ ते १३०
भाग ४ / शैक्षणिक कार्य / १३१ ते १६१
भाग ५ / ब्राह्मणेत्तर चळवळ / १६२ ते १८०
भाग ६ / शेतकरी चळवळ / १८१ ते २०१
भाग ७ / सामाजिक चळवळ / २०२ ते २२४
भाग ८ / महात्मा फुले : चरित्र पहिले / २२५ ते २४१
भाग ९ / राष्ट्रीय चळवळ / २४२ ते २४८
भाग १० / पंढरीनाथांची जीवनयात्रा संपली / २४९ ते २५१
भाग ११ / आठवणी (परिशिष्ट) / २५२ ते २६३
संदर्भ सूची / २६४ ते २६८

+

# ।। ऋणनिर्देश ।।

पंढरीनाथ पाटलांच्या सहवासात १९६५ ते १९७० या पाच वर्षांत राहण्याचा योग आला. या कालावधीत पाटील साहेबांच्या खाजगी, कौटुंबिक, सामाजिक व राजकीय जीवनात ते परिस्थितीनुसार कशी भूमिका पार पाडत हे मी प्रत्यक्ष पाहिले. त्यांच्या पत्नी सौ. सरस्वतीबाई अत्यंत कर्मठ होत्या. स्वच्छतेच्या बाबतीत दक्ष होत्या. घरासमोरील विहिरीवर बादलीच्या दोरालाही त्या कुणाचा स्पर्श होऊ देत नव्हत्या. देवपूजेत त्यांचा बराच वेळ जायचा. परंतु पाटील साहेब त्याबाबत चुकूनही कधी कुरकुरल्याचे आठवत नाही. पाटलांना अपत्य नव्हते. त्यांच्या सालीची (परूची) दोन मुले मधुकर व सुधाकर त्यांच्या आईसह पाटील साहेबांकडे राहत असत. त्या दोघी बहिणी, सरू व पारू आणि ही दोन मुले पाटील साहेबांची सर्वतोपरी काळजी घेत.

ते जातपात पाळणारे नव्हते. राजकारणात बहुजन समाजातील सर्वसामान्य माणसाला सत्तास्थानी बसविण्यास ते प्रयत्नशील असत. त्यामुळे ते पक्षाशी प्रतारणा करण्यासही धजत असत. बहुजनांच्या मुलांनी शिकावे महत्कार्य करून मोठे व्हावे अशी त्यांची इच्छा होती. आपल्या संस्थेतून शिकून मोठ्या पदावर गेलेल्या विद्यार्थ्यांना संस्थेत बोलावून त्यांचे कौतुक व मानसन्मान करीत असत. त्यांनी चिखली येथे शाळा व बुलडाणा येथे महाविद्यालय काढल्यामुळेच माझ्यासारखी मुले पदवीधर होऊन जबाबदारीची पदे यशस्वीपणे सांभाळत आहेत. पाटील साहेब स्वतःच गरीब, गांजलेल्या, शेतकरी कुटुंबातील घटक होते. श्रमाचे मोल ते जाणून होते. खासदार व जिल्ह्यातील अतिमहत्वाच्या पाच व्यक्तीत त्यांचा समावेश होता. तरीही ते स्वतः सकाळी उठल्यावर बांधकामासाठी लागणारा चुना तयार करण्याची घाणी चालवित असत. त्यावेळी बदलून आलेले जिल्हास्तरीय अधिकारी अतिमहत्वाची व्यक्ती म्हणून त्यांना भेटण्यासाठी येत. त्यांना घाणी चालविणारा माणूस पाटील साहेब आहेत यावर विश्वासच बसेना, शिवाय पाटील साहेब चुना चाचणीवर आल्याशिवाय घाणी थांबवत नसत व आलेल्या व्यक्तींशी

बोलतही नसत. त्यांच्या सोबत घाणीचे बैलामागे फिरणाराशी मात्र ते बोलत.

श्रमिकातून समाजभूषण, संसदपटू व दलितमित्र पदवी प्राप्त व शिक्षणक्षेत्रातील थोर समाजधुरंधर पाटील साहेबांबद्दल कृतज्ञ भाव जागृत झाला. त्यांच्या पासष्टी समारंभात चिखलीला श्री शिवाजी बी.टी. (बेसिक ट्रेनिंग) कॉलेजमध्ये शिक्षक, प्रशिक्षक असताना सहभागी होता आले. यशवंतराव चव्हाण गृहमंत्री, वसंतराव नाईक मुख्यमंत्री व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ज्येष्ठ सहकारी भाऊराव उर्फ दादासाहेब गायकवाड यावेळी आलेले होते. या मान्यवरांनी पाटील साहेबांचा मानसन्मान केला. त्यावेळी ह्या ठेंगण्या माणसाची उंची किती मोठी आहे हे लक्षात आले. पुढे बुलडाणा येथील यशवंत अध्यापक विद्यालयातून सेवानिवृत्त झाल्यावर पाटील साहेबांचे सामाजिक ऋण जाणून त्यांचे चरित्र लिहिण्याची अंत:प्रेरणा मला झाली. चरित्र साधने जमविण्यासाठी पंढरीनाथ पाटलांचे पुतणे ॲड. ज्योतिराव राऊत यांनी सुरूवातील कानागुना केला. परंतु माझी तळमळ त्यांच्या लक्षात येताच १६ ऑगष्ट २००२ रोजी भरपावसात त्यांनी त्यांची मोटारगाडी काढून चिखली व सावरगाव डुकरे येथील ग्रंथालयातून व संस्थातून साधने मिळवून दिली. त्यात पाटील साहेबांच्या डायऱ्या, चिखलीच्या श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. ढोरे यांनी जुन्या वृत्तपत्रांची विशाल कात्रण फाईल व सावरगाव डुकरे येथूनही माजी आमदार श्री. बाबुराव पाटील (विठ्ठल सोनाजी) यांच्या सहकार्याने वृत्तपत्र कात्रणे व निमंत्रण पत्रिका संग्रहिका उपलब्ध करून दिली. ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक सावरगावचे श्री. उत्तमरावभाऊ पाटील (टेलर) यांनी जुन्या सत्यशोधकांची नावे, गावे व कार्याची ओळख त्यांच्याशी वारंवार झालेल्या भेटीतून त्यांनी करून दिली. श्री. पी. एन. मोरे उमनगावकर यांनी सातगाव भुसारी महार परिषद वृत्तांत विस्तृत लिहून पाठविला. महाराष्ट्र पुरालेखागार कार्यालय, पुणे येथील संचालक श्री. जगन्नाथ राजाराम बुरकुले यांनी स्वत: मेहनत घेऊन १०० वर्षापूर्वीचे पंचांग उपलब्ध करून दिले. श्री. जे. एन. बोंबटकर, शाहीर रामभाऊ पवार, ॲड. शंकरराव बोंबडे, श्री. एकनाथराव वानखेडे माजी उपमुख्य कार्यकारी

अधिकारी, जि. प. बुलडाणा यांनी आठवणी पाठविल्या. श्री. नरेंद्र लांजेवार यांच्या माध्यमातून डॉ. भा. ल. भोळे यांनी सदर ग्रंथाला अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहून पाठविली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे मा. कुलगुरू श्री. का. पां. सोनवणे यांनी कुलगुरूंची नामावली पुरवून मोलाचे सहकार्य केले. नागपूरचे ज्येष्ठ काँग्रेस नेते श्री. शंकरराव गेडाम यांनी नागपूर काँग्रेसची निश्चित तारीख कळविली. श्री. विश्वासराव तायडे, से. नि. मुख्याध्यापक म.पू. मा. शाळा, कुंड खुर्द ता. मलकापूर जि. बुलडाणा यांनी चुना मळण्याच्या घाणीचे चित्र उपलब्ध करून दिले.

श्री. विनोद आराख, प्राचार्य, सुवर्णा संगणक प्रशिक्षण संस्था, बुलडाणा व पुढे जिजामाता महाविद्यालय, बुलडाणा येथे क. लिपीक यांनी अहोरात्र संगणकीकरणासाठी कष्ट केले. अॅड. ज्योतिराव राऊत यांच्या पत्नी सौ. प्रतिमा राऊत यांनी चरित्र कार्यालय व संगणक उपलब्धच करून दिले नाही तर वेळोवेळी आमची उत्तम बडदास्तही ठेवली. त्यांच्याकडे कामास असलेले कृष्णाभाऊ व कुमार रोशन यांनी जॅकी (पाळीव कुत्रा) पासून आम्हाला सुरक्षित ठेवले व वेळोवेळी आम्हाला आवश्यक ते सहकार्य केले. डॉ. एस. एम. कानडजे, मराठी विभागप्रमुख, जिजामाता महाविद्यालय, बुलडाणा यांनी सदर ग्रंथावर नजर फिरवून अनेक दुरूस्त्या सुचविल्या, संपूर्ण सूची काळानुसार तयार करण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी केले.

श्री साई ऑफसेट प्रिंटर्सचे मालक श्री. आत्माराम नामदेव गाडेकर व त्यांचा संगणक चालक श्री. मुस्तफाशाह मुसाशाह व इतर कर्मचारी वर्ग यांनी सदर ग्रंथ जास्तीत जास्त बिनचूक, सुबक व आकर्षक करण्याचा अत्यंत प्रांजळ मनाने प्रयत्न केला त्याबद्दल त्यांचे व उपरोक्त सर्वांचे मी मनापासून ऋणात राहणे पसंत करतो.

**ना. जा. दांडगे**
बुलडाणा

# एका सत्यशोधकाचे संस्मरण

**- भास्कर लक्ष्मण भोळे**

बुलडाण्याच्या यशवंत अध्यापक विद्यालयाचे माजी प्राचार्य ना. जा. दांडगे यांनी समाजभूषण पंढरीनाथ सीताराम पाटील यांचे हे चरित्र लिहून फार मोठे समाजऋण फेडले आहे असेच म्हणावे लागेल. गरीब गांजलेल्या शेतकरी कुटुंबातून पुढे येऊन खासदारपदापर्यंतची झेप घेतलेल्या आणि जिल्ह्यातील पहिल्या पाच महान व्यक्तींमध्ये ज्यांचा समावेश होतो अशा या थोर दलितमित्राचे हे पहिलेच चरित्र आहे. बहुदा सर्वच बहुजननायकांबाबत असे झालेले दिसते की त्यांच्या चरित्रांना दीर्घकाळ अज्ञातवास सहन करावा लागला आहे. खुद्द महात्मा जोतीराव फुलेही या संकटातून सुटलेले नाहीत, त्यांचे चरित्र प्रकाशित होण्यास तब्बल शंभर वर्षांचा अवधी जावा लागला होता. राजकीय कारणांनी सध्या त्यांना बरे दिवस आले असले तरी त्यामुळे फारतर त्यांचे पुतळे झाले किंवा गौरवग्रंथ निघाले, त्यांच्या अधिकृत चरित्राची व प्रत्यक्ष कार्याबाबतच्या सविस्तर माहितीची मजल मात्र सुरूवातीला लिहिल्या गेलेल्या प्राथमिक चरित्रांच्या फार पुढे आजपर्यंतही गेलेली दिसत नाही. तेव्हा फुल्यांच्या वाट्याला आलेला हा अज्ञातवास त्यांचे आद्य चरित्रकार पं. सी. पाटील यांनाही भोगावा लागला याचे काहीच आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. जे इतिहास घडवण्याच्या कामात व्यस्त असतात त्यांचे तो लिहून काढण्याकडे दुर्लक्ष झाले तर ते समजू शकते, पण किमान त्यांच्या समकालीनांनी तरी तिकडे लक्ष द्यायला हवे. बहुजननायकांच्या बाबतीत त्यांच्या आस्थेवाईक समकालीनांनीही ही जबाबदारी पुरेशी पार पाडली आहे असे म्हणण्याची सोय नाही. अगदी स्वातंत्र्योत्तरकालीन बहुजननेत्यांच्याही चरित्र व कार्याची सप्रमाण दखल घेतली गेल्याचे फारसे आढळत नाही. आत्मपर लेखन, सर्वंकष मुलाखती, सविस्तर अहवाल, लेख, अग्रलेख यांची एकूण वानवाच त्यांच्याबाबत दिसून येत असते. मौखिक इतिहास म्हणून अलीकडच्या काळात काही विद्यापीठांनी सुरू केलेल्या उपक्रमांच्याही कक्षा अद्याप तरी मध्यमवर्गीय वर्तुळाच्यापलीकडे सरकू शकलेल्या नाहीत. स्वाभाविकच पंढरीनाथ पाटील या चरित्रनायकांशी संबंधित त्रोटक

बातम्यांखेरीज रा. दांडगे यांच्याही हाताशी काहीच नव्हते, तरीही त्यांनी परिश्रमांची पराकाष्ठा करून हे चरित्र सर्वांगपरिपूर्ण करण्याचा प्रयत्न कसोशीने केला आहे. त्यांनी हे चरित्रलेखन करताना केलेल्या यातायातीची तुलना थोड्याफार प्रमाणात खुद्द पंढरीनाथांनी जोतीरावांच्या चरित्राची जुळवाजुळव करताना केलेल्या कष्टांशीच करता येईल.

लेखक म्हणून रा. दांडगे यांच्या काही जमेच्या बाजू निश्चितच होत्या. त्यांना चरित्रनायकांचा प्रत्यक्ष सहवास लाभलेला होता, त्यांच्यासोबत तिसऱ्या फुले चरित्राच्या संसाधनांची चर्चा करण्याची संधी मिळालेली होती एवढेच नव्हे तर पंढरीनाथांच्या पासष्टीच्या कार्यक्रमात ते प्रत्यक्ष सहभागी झाले होते. चरित्रनायक ज्या हलाखीतून लहानाचा मोठा झाला होता तीच हलाखी, तेच दुष्काळाचे चटके, तीच उपासमारी आणि तशीच स्थलांतरे चरित्रकर्त्यानेही आपल्या हयातीत अनुभवलेली होती. त्यामुळे अत्यंत आस्थेने ते या चरित्रलेखनाकडे वळले होते. त्यांनी उदंड पायपीट करून महाराष्ट्रभर विखुरलेल्या पंढरीनाथांच्या तमाम साथी-सहकाऱ्यांच्या भेटी घेतल्या, अनेक वृत्तपत्रांच्या संचिका पालथ्या घातल्या, सर्व संबंधित कागदपत्रे, कात्रणे, चिठ्याचपाट्या, पत्रे व नोंदी नजरेखालून घातल्या, लहानमोठ्या सगळ्या बातम्या एकत्र केल्या. त्यांनी केलेला उद्योग किती प्रचंड होता याची कल्पना त्यांनी पुस्तकाला जोडलेल्या प्रदीर्घ संदर्भसूचीवरून वाचकाला मिळू शकेल. त्या सूचीत पंढरीनाथ पाटील यांच्याविषयी लिहिल्या गेलेल्या लेखनाच्या जशा नोंदी आहेत, तसेच गौरवग्रंथ, स्मरणिका, समकालीनांची चरित्रे यांचेही हवाले दिलेले आढळतात. दीनमित्र, दीनबंधू, सत्यप्रकाश, विजयी मराठा, राष्ट्रवीर, पुढारी, शेतकरी, बहिष्कृत भारत, संदेश, नवयुग, महाराष्ट्र, मातृभूमी, शिवशक्ती, नवाकाळ, जनता, प्रजावाणी, ब्राह्मणेतर अशा राज्यातील कितीतरी ज्ञातअज्ञात, शहरी-ग्रामीण नियतकालिकांचे तारीखवार तपशील या सूचीत आहेत. चरित्रनायकाच्या जीवनातील या नियतकालिकांत विखुरलेल्या सर्व बातम्या लेखकाने वेचल्या आहेत आणि तशी कृतज्ञतापूर्वक नोंद केली आहे.

प्रस्तुत चरित्रावरून असे दिसते की खेड्यापाड्यातील निसर्गाच्या

लहरीनुसार जीवन कंठणाऱ्या कोणत्याही सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील लहान मुलांना लाभते तसे बालपण पंढरीनाथांच्या वाट्यालाही आले होते. आभाळाची कृपा झाली तर बरे दिवस, म्हणजे घरात शेतमालाच्या थप्प्या, मुबलक दूधदुभते, भाजीपाला, फळफळावळ, बाजारहाट आणि सालदार-महीनदार; आणि ती न झाली तर मात्र दोन सांज खाण्याची मारामार अशी त्यांच्या घरची एकूण परिस्थिती होती. पण सुदैवाने वडिलांना शिक्षणाचे महत्व पटलेले होते आणि त्यामुळे रडतखडत का होईना पण पंढरीनाथाचे शिक्षण सुरू राहिले. ग्रामीण जीवनातील आध्यात्मिक वातावरणाने त्यांना जे शिकवले ते तर शालेय शिक्षणापेक्षाही त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीच्या संदर्भात अधिक मौलिक महत्वाचे ठरले. गंध-टिळा लावून नामस्मरण करणारा हा बालकीर्तनकार तेव्हापासूनच समाजाच्या जणू मनात भरला होता. तो वाऱ्या करी, साभिनय भारूडे म्हणी, पोथ्यापुराणे ऐके. परिश्रमपूर्वक शालेय शिक्षणाच्या पायऱ्याही तो चढत होताच, त्यासाठी रद्दी विकणे, द्रोण-पत्रावळ्या तयार करून विकणे, किराणा भुसार मालाच्या दुकानात नोकरी करणे अशी पडतील ती कामे तो करीत असे. धार्मिक ग्रंथांच्या वाचनाने- विशेषतः कबीर पंथाच्या बीजकग्रंथातून त्याचा सामाजिक दृष्टिकोन विकसित होत होता. सामाजिक विषमतेच्या प्रश्नावर पंढरीनाथांनी पुढे हयातभर जे कार्य केले त्याची पायाभरणीच जणू या काळात झाली होती. भागवतबुवा देहूकरांना शूद्र म्हणून विठ्ठलमंदिरात कीर्तन करण्यास मनाई करणाऱ्या प्रतिगामी शक्तींनी पंढरीनाथांना धार्मिक-सामाजिक गुलामगिरीच्या विरोधात सर्व शक्तींनिशी लढण्यास प्रवृत्त केले. प्रसंगी जन्मदात्या वडिलांचीही अवज्ञा करून त्यांनी भटशाहीविरूद्धचा आपला लढा सुरू ठेवला होता. प्रस्तुत चरित्रात हे सर्व तपशील लेखकाने व्यवस्थितपणे मांडलेले आहेत.

पंढरीनाथांच्या या लढ्याला खरी धार आली ती ते १९२१ साली इंग्लंडच्या राजपुत्राच्या हस्ते शिवस्मारकाची कोनशिला बसवण्याच्या कार्यक्रमासाठी ते जेव्हा पुण्यास गेले होते तेव्हापासून. त्याप्रसंगी जेधे मँशनमध्ये त्यांना बहुजनसमाजातील अनेक धुरीण भेटले, त्यांच्याशी चर्चा व विचारविनिमय करण्याची संधी मिळाली. ब्राह्मणेतर वर्तमानपत्रांशी त्यांची तोंडओळख झाली. यातून सत्यशोधक चळवळीचा त्यांना परिचय झाला, ब्राह्मणेतर चळवळ

कोण आणि का चालवत आहेत ते त्यांना समजले. पुढे काहीकाळ शाहूछत्रपतींच्या वैदिक शाळेत पंढरीनाथांनी शिक्षण घेतले. त्यानेही ते खूप प्रभावित झाले. विदर्भात आपण असे काहीतरी केले पाहिजे याची त्यांना प्रकर्षाने जाणीव झाली, आणि त्यांनी १३ मे १९२३ रोजी विदर्भातील पहिली सत्यशोधक परिषद भरवली. तिला पाच हजाराची उपस्थिती होती ही एकच गोष्ट जरी विचारात घेतली तरी तेवढ्यावरून तिच्या मागच्या पूर्वतयारीची कल्पना येऊ शकेल. पंढरीनाथांनी त्या परिषदेपुढे केलेले स्वागतपर भाषण हे वस्तुत: तिचे बीजभाषणच होते असा रास्त अभिप्राय रा. दांडगे यांनी दिला आहे. आपली चळवळ द्वेषमूलक नसून न्यायाची आहे, राजकीय स्वातंत्र्यापेक्षाही बहुजनसमाजाच्या दृष्टीने त्याची पुरोहितशाहीच्या कचाट्यातून सुटका होणे अधिक महत्वाचे आहे असे आपण मानतो हे त्यांनी त्या प्रदीर्घ व तर्कसंगत भाषणातून स्पष्ट केले होते. या परिषदेनंतर सत्यशोधक चळवळीचा जणू झंझावातच विदर्भात पसरला, तालुकावार परिषदा भरल्या, पुरोहितवर्गवर्चस्वविरोधाबरोबरच धार्मिक स्वावलंबन, अंधश्रद्धानिर्मूलन, विद्याभिरूचीसंवर्धन अशा अनेक विषयांवर त्यात ठराव मंजूर करण्यात आले. शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांवर या परिषदांनी विशेष भर दिला होता हे लक्षणीय आहे. या परिषदांच्या संदर्भात बरीच अधिकृत माहिती प्रस्तुत चरित्रात प्रथमच आली आहे. शेकडो व्यक्तींचा नामोल्लेख आला आहे. हा सगळा तपशील या भागातील सत्यशोधक चळवळीच्या भावी अभ्यासकाला उपयुक्त ठरू शकेल.

बहुजननायकांसाठी राजकीय नेतृत्व व कार्य यांचा एक उत्तम आदर्श पंढरीनाथ पाटलांच्या या चरित्राने उभा केला आहे. त्यांनी संसदीय राजकारण केले पण त्यालाच सारसर्वस्व कधीच मानले नाही. गावपातळीवरचे गावकऱ्यांना खरी सत्ता मिळवून देणारे विधायक राजकारण त्यांनी नेहमीच अधिक महत्वाचे मानले होते, खादीप्रचाराचे काम त्यामुळेच त्यांनी अंग मोडून केले होते. शिक्षण, शेती, आरोग्य, अन्न इत्यादींबाबत ग्रामीण भागांच्या गरजांकडे विशेष लक्ष दिले पाहिजे हे त्यांच्या राजकारणाचे मध्यवर्ती सूत्र होते. ग्रामीण भागात उद्योजकता वाढावी हे तर त्यांना फारच महत्वाचे वाटत असे, त्यामुळेच पिंप्री अढावच्या मुख्याध्यापकांनी साबरमती आश्रमातून हातमाग वगैरे साहित्य मागवले तेव्हा पंढरीनाथांना जेवढा आनंद झाला तेवढा

त्यांना आयुष्यात फारच थोड्या वेळा झाला असल्याचे स्वत: त्यांनीच म्हटले आहे. जनपदांची निर्मिती व सक्रियता, ग्रामपंचायती व न्यायपंचायतींची उभारणी आणि या संस्थांच्या कामकाजात लोकांचा उत्साही सहभाग यावर पंढरीनाथांनी सतत भर दिला होता. तळपातळीवरचे हिंदु-मुस्लिम सहजीवन हाही त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय होता.

निवडणुकांचेही राजकारण पंढरीनाथांनी स्वत:ला त्यात झोकून देऊन केले, आणि विदर्भातील काँग्रेसी राजकारणातील धनिकधार्जिण्या व जातिनिष्ठ कंपूला पळता भुई थोडी पडावी अशा झपाट्याने त्यांनी ते केले. मॉंटफर्ड सुधारणांनंतरच्या जिल्हा कौन्सिलच्या निवडणुका ब्राह्मणेतर पक्षाने संपूर्ण वऱ्हाडात जिंकल्या त्याचे बरेचसे श्रेय पंढरीनाथांना द्यावे लागते. स्वत: तीनवेळा असेम्ब्लीची निवडणूक हरले पण उमेद नाही हरले. १९३७ च्या निवडणुकीत त्यांना भरघोस यश मिळाले, १९५२ च्या निवडणूकांनी पुन्हा त्यांच्या पदरात अपयश घातले. पुढे त्यांना राज्यसभेत प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. निवडणूक राजकारणातील यशापयशांच्या या चढउतारांमुळे पंढरीनाथांच्या सातत्यपूर्ण व धीरोदात्त समाजसेवेत कधीही खंड पडला नाही. बहुजनसमाजातील चारदोन व्यक्तींना आमदरकी किंवा खासदारकी मिळणे म्हणजे बहुजनसमाजाच्या हाती सत्ता येणे नव्हे अशी पंढरीनाथ पाटील यांची स्पष्ट भूमिका होती. सामान्यातिसामान्य माणसाला शिक्षण-आरोग्यादी सर्व सुविधा लाभून त्याचे सबलीकरण होणे हाच त्याला सत्ताधीश करण्याचा एकमेव मार्ग असू शकतो अशी खूणगाठ मनाशी बांधूनच त्यांनी आपले राजकीय कार्य आजन्म सुरू ठेवले. त्यांनी बुलडाणा जिल्ह्यात केलेल्या शैक्षणिक कार्याचा आवाका पाहिला म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील, भाऊसाहेब पंजाबराव देशमुख या त्या क्षेत्रातील महामेरूंशी पंढरीनाथांची तुलना करणे मुळीच अनाठायी होणार नाही. त्या दोन्ही महापुरूषांचा नुसता सहवास नव्हे तर सहकार्य व मार्गदर्शनही पंढरीनाथांना लाभले होते. प्रस्तुत ग्रंथकर्त्याने त्यावर अनेक प्रसंगांमधून प्रकाश टाकला आहे.

या चरित्रातील काही त्रुटी-उणिवांचीही नोंद घेतल्यास ती अनाठायी होणार नाही. चरित्रनायकाचे विविध क्षेत्रांतील कार्य प्रकरणवार सांगण्याची पद्धत स्वीकारली असली तरी एकंदर कालानुक्रमे घटना नोंदवल्यावर त्याचा

वाजवीपेक्षा जरा जास्तच भर राहिला आहे. हाती आलेला प्रत्येक तपशील, समजलेली प्रत्येक बातमी आणि माहिती चरित्रात अंतर्भूत केलीच पाहिजे अशा भरीला लेखक पडल्यामुळे तात्कालिक महत्वाच्या असलेल्या पण कालांतराने फारसे महत्व व संदर्भमूल्य नसलेल्या गोष्टी मात्र दुर्लक्षित राहिल्या आहेत. प्रसंगोपात्त केलेल्या बिनमुद्यांच्या भाषणांचे सविस्तर वर्णन केले आहे, तर काही ठिकाणी चरित्रनायकाने महत्वाचे मुद्दे मांडले, किंवा उपयुक्त सूचना केल्या, किंवा खुले पत्र लिहिले असे नुसतेच मोघम उल्लेख करून सोडून देण्यात आले आहेत. सर्वच घटनांना इतिहासाचे मोल नसते, पण विशिष्ट कारणांमुळे किरकोळ घटनाही ऐतिहासिक महत्वाच्या ठरतात हे खरेच आहे. तेव्हा कोणताही घटनाक्रम नोंदवत असतांना त्याचे ऐतिहासिक कार्यकारण, संदर्भ व महत्व लेखक जर अधोरेखित करू शकला तरच संबंधित नोंदी अर्थपूर्ण ठरतात. एरव्ही ती नुसतीच खोगीरभरती होते. प्रस्तुत चरित्रात अशा अनावश्यक व अप्रस्तुत प्रसंगांची रेलचेल आहे, त्यांचे ऐतिहासिक संदर्भ मात्र स्पष्ट झालेले नाहीत. चरित्रनायकाच्या विशिष्ट कृतीचे, किंवा त्याच्या आयुष्यातील विशिष्ट घटनेचे नंतर पुढे काय बरेवाईट परिणाम झाले हे लेखकाने सांगितलेले नाही. अनेक ठिकाणी गौण आणि महत्वाचे अशा प्रसंगांची सरमिसळही झाल्याचे दिसून येते. चरित्रात काही रिक्त जागाही सुटून गेल्या आहेत. उदाहरणार्थ, पंढरीनाथांनी लेजिस्टेटिव कौंसिलात आणि राज्यसभेत केलेल्या कार्याचे विवरण लेखकाने केलेले नाही; एकंदरच घटनांचा अन्वय लावणे, विश्लेषण करणे किंवा निष्कर्षात्मक मांडणी करणे याकडे चरित्रकाराचा फारसा कल दिसत नाही. अर्थात चरित्रसाधनांची वानवा पाहता केवळ तथ्यसंकलन हेही कार्य महत्वाचेच ठरते, आणि लहानसहान प्रसंगांतूनही चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्वावर प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे प्रकाश पडतोच. ह्यादृष्टीने चरित्रातील त्रुटी-उणिवांकडे दुर्लक्ष करणेच इष्ट होईल.

आजच्या परिस्थितीत प्रस्तुत चरित्राचे विशेष स्वागत यासाठी करावेसे वाटते की पंढरीनाथ पाटलांनी बुलडाणा जिल्ह्यात सुरू केलेल्या अनेक सत्यशोधकी उपक्रमांची मधल्या काळात खूपच पीछेहाट झाली आहे. अत्यंत उच्चविद्याविभूषित स्त्रीपुरूषांना अंधश्रद्धांनी आणि महंतगिरीच्या प्रस्थांनी झपाटले आहे. मानसिक शांती मिळवण्यासाठी पंढरीनाथांच्या जिल्ह्यातील कित्येक प्राध्यापक सिद्धसमाधीच्या किंवा आर्ट ऑफ लिव्हिंगसारख्या कोणत्या

ना कोणत्या खुळाच्या नादी लागले आहेत. एकूणच बहुजन समाजाच्या चळवळीतून जनसामान्यांना भेडसावणारे सामाजिक-आर्थिक प्रश्न हद्दपार झाले असून नवधर्मप्रकटन, नवी व्रतवैकल्ये आणि नवनव्या अंधश्रद्धा यांचे प्रमाण वाढत चालले आहे. नवभांडवलशाही आर्थिक धोरणांच्या विरोधात स्पष्ट भूमिका घेऊन दलितशोषितांशी इमान राखण्यात कुठेतरी आजची सत्यशोधक चळवळ कमी पडते आहे. आप्तस्वकीय असले तरी त्याच्या प्रतिगामी भूमिकांचा प्रतिवाद केलाच पाहिजे एवढाही परखडपणा जोतीरावांचे वारसदार म्हणवणाऱ्यांना आज दाखवता येत नाही हे आपण नेहमी अनुभवतच असतो. चिकित्सकपणे चळवळीबद्दल लिहिणारे तमाम ब्राह्मण किंवा ब्राह्मणाळलेले टीकाकार त्यांना जेवढे हल्ला करण्यायोग्य वाटतात तेवढे सत्यशोधकी तत्वांशी स्पेशल द्रोह करूनही समाजात प्रतिष्ठेने वावरणारे चळवळीचे तथाकथित धुरीण मात्र वाटत नाहीत. ही दुर्दैवी वस्तुस्थिती बदलण्यासाठी या चरित्राचा थोडाफार जरी हातभार लागला तरी लेखकाचे श्रम सार्थकी लागतील. तळागाळातल्यांच्या लोकांबद्दल पंढरीनाथ पाटलांच्या मनात असलेला अकृत्रिम स्नेह, सत्यशोधकी तत्वांशी असलेली त्यांची ठाम बांधीलकी आणि प्रतिगामी शक्तींच्या विरोधात जातिनिरपेक्षपणे भूमिका घेण्याची तयारी या गोष्टी बहुजन कार्यकर्त्यांनी आवर्जून आचरणात आणण्याची आज नितांत गरज आहे. संयुक्त महाराष्ट्र की स्वतंत्र विदर्भ ? या प्रश्नावरची त्याची सूचनाही विचारात घेण्याजोगी वाटते. संयुक्त महाराष्ट्र झाल्यास प्रांतिक बखेडे माजतील अशी भीती त्यांना वाटत असली तरी भाषावार प्रांतरचना ही झालीच पाहिजे असे त्यांचे ठाम मत होते. त्याचे म्हणणे फक्त एवढेच होते की एकाच मराठी भाषेची अनेक राज्ये व्हावीत, आणि त्यांचा मिळून एक संघ व्हावा. संपूर्ण मराठी प्रदेशाबाबतच्या भाषिक, सांस्कृतिक, शैक्षणिक वगैरे धोरणांचा निर्णय त्या संघाने घ्यावा, पण विकासाच्या संदर्भात मात्र त्या समभाषक राज्यांना स्वायत्तता असावी. या चरित्राची प्रत्यक्षात काय फलश्रुती होते आणि वाचक त्याचे कसे स्वागत करतात हे यथावकाश समजेलच. पण रा. दांडगे यांनी हे चरित्र लिहून फार महत्त्वाची जबाबदारी पार पाडली आहे याबद्दल दुमत संभवत नाही. मी त्यासाठी त्यांचे पुनश्च अभिनंदन करतो आणि त्यांना सुयश चिंततो.

❑

पंढरीनाथ पाटील व सौ. सरस्वतीबाई पाटील






समाज भूषण पंढरीनाथ पाटील जिल्हा कौन्सिलचे
अध्यक्ष असताना बांधलेले कौन्सिल सभागृह १९३७



जिल्हा कौन्सिलमध्ये अध्यक्ष असताना, त्यांनी बांधलेल्या (रावटॉवर)
श्री शिवाजी सभागृहाच्या प्रांगणात श्री पंढरीनाथ पाटील (टोपी व चष्माधारक) यांचेसह जिल्हा कौन्सिल सदस्य



पंढरीनाथ पाटील व त्यांच्या धर्मपत्नी सरस्वतीबाई पाटील



दलित मित्र पंढरीनाथ पाटील यांचे सोबत परममित्र खासदार लक्ष्मणराव भटकर



श्री. पंढरीनाथ पाटील हिरक महोत्सव प्रसंगी सत्कारास उत्तर देताना

श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या सोबत
श्री. पंढरीनाथ पाटील बाजूला श्री. अण्णासाहेब शिंदे





तारीख २२-११-१९५२ रोजी सावरगाव डुकरे, जि. बुलडाणा या गावाला भेट मनोरंजन केंद्राचा उद्घाटन समारंभ-
उद्घाटक - डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख अध्यक्ष - पंढरीनाथ पाटील, चिखली


हिरक महोत्सव प्रसंगी - श्री. पंढरीनाथ पाटील, मा. यशवंतरावजी चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. वसंतराव नाईक आदिसह व्यासपीठावर



श्री शिवाजी हायस्कूलच्या श्री शिवाजी सभागृहाचे उद्घाटन करताना
मा. यशवंतरावजी चव्हाण व पंढरीनाथ पाटील



मा. यशवंतरावजी चव्हाण यांचे हस्ते
६१ वी समारंभाला ३ लाखांचा सत्कार नि[illegible]ीकारी[illegible]



आधुनिक महाराष्ट्राचे चार शिल्पकार  यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील,  शरद पवार आणि पंढरीनाथ पाटील



नामदार शंकररावजी चव्हाण यांच्याशी चर्चा करताना  खासदार महाजन आणि दलित मित्र पंढरीनाथ पाटील



पंढरीनाथ पाटील हे श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या रौप्य महोत्सव समारंभात भाषण करीत असताना बाजूला समारंभाचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्णन व डॉ. पंजाबराव देशमुख



इंदिराजी गांधी यांचे समवेत
पंढरीनाथ पाटील,
खा. वाय. एस. महाजन,
खा. अर्जुनराव कस्तुरे व
ॲड. ज्योतीराव राऊत



पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी व गृहमंत्री यशवंतराव चव्हाण
यांचे सोबत श्री. पंढरीनाथ पाटील



पंढरीनाथ पाटील हे मा. यशवंतराव चव्हाण, गृहमंत्री, भा[illegible] र
यांचेशी विचार विनीमय करत[illegible]

पंढरीनाथ पाटील, यशवंतराव चव्हाण (संरक्षण मंत्री) यांच्या
वाढदिवसानिमित्त भेट घेत असताना





पंढरीनाथ पाटील व व्ही. व्ही. गिरी, उपराष्ट्रपती
आणि पंतप्रधान इंदिरा गांधी व इतर



शिपिंग कार्पोरेशन ऑफ इंडिया समितीचे सदस्य असताना कलकत्ता हुबळी बंदरास भेट दिली
त्यावेळी मध्यभागी फेटाधारक खासदार पंढरीनाथ पाटील त्यांच्या उजव्या बाजूला ॲड. ज्योतिराव राऊत (विद्यार्थी दशेत)

**पांगरी वरंडे धरण भूमिपूजन प्रसंगी –** सर्वश्री माधवराव देशमुख, ॲड. आर. डी. उर्फ भोंडेसरकार, जानराव पाटील चव्हाण, भीमराव पाटील उबरहंडे, मा. वसंतदादा पाटील, मा. पंढरीनाथ पाटील





पंढरीनाथ पाटील यांचे निवास स्थान, याच ठिकाणाहून त्यांनी शिवाजी परिसराचा विशाल पसारा अहोरात्र खपून उभा केला.




श्री शिवाजी हायस्कूल चिखलीच्या प्रांगणात
डॉ. पंजाबराव देशमुख व समाज भूषण
पंढरीनाथ पाटील यांच्या पुतळ्याचे अनावरण
प्रसंगी उजवीकडून ॲड. ज्योतीराव राऊत,
भारत बोन्द्रे, शिक्षण मंत्री राम मेघे,
मुख्यमंत्री ना. शंकरराव चव्हाण




व्यासपीठावर डावीकडून श्री. माधवराव देशमुख, सौ. इंदिराबाई कोटंबकर, मा. विनायकराव पाटील, श्री. संतोषराव उर्फ आप्पासाहेब पाटील, मा. आयाजी पाटील, श्री. गोविंद महाजन व भाषण करताना पंढरीनाथ पाटील



सौ. प्रतिभाताई पाटील म. प्र. काँग्रेस अध्यक्षा यांचे समवेत पंढरीनाथ पाटील



चिखली येथील संस्थेच्या प्रांगणात पंढरीनाथ पाटील यांच्या पुतळ्याच्या
अनावरण प्रसंगी हार घालताना मुख्यमंत्री स्व. शंकरराव चव्हाण



भारताचे राष्ट्रपती मा. श्री. व्ही. व्ही. गिरी यांचे सोबत
खासदार श्री. पंढरीनाथ पाटील

# महात्मा फुले यांचे आद्यचरित्रकार
# समाजभूषण पंढरीनाथ सीताराम पाटील यांचे चरित्र

## भाग - १

**थोडी पूर्वस्थिती :**

स्वातंत्र्य पूर्व काळ. इंग्रजी अंमल. रस्ते पांदीचे होते. बैलगाडी, घोडागाडी व घोडा ही प्रवासाची साधने होती. नाही म्हणायला जिल्ह्याची व तालुक्याची काही गावे पक्क्या रस्त्यांनी जोडलेली होती. खाजगी मोटारी अल्प प्रमाणात वाहतूक करीत. मालमोटारींची संख्या तुरळक होती.

खामगाव ही विदर्भातील मोठी व्यापारी बाजारपेठ. कापूस, रेचे, रूईगाठी कारखाने व सरकी तेलाच्या गिरण्या होत्या. थोडक्यात खामगाव ही शेतीमालाची खरेदी-विक्रीची मोठी पेठ होती. या तालुक्याच्या गावाजवळच आंबोडा, पिंप्री आढाव ही लहान लहान गावे आहेत. प्रत्येक गावात एकदोन मोठे शेतकरी व बाकी सारे शेतमजूर असत. दुष्काळ हा शेतकऱ्यांच्या पाचवीला पूजलेला असायचा. पाच दहा वर्षात एखाद्याच वर्षी चांगले पीक येई. नाहीतर अतिवृष्टी किंवा सुका दुष्काळ पडायचा ! देवी, खरूज, काजन्या, गोवर, मलेरिया, महामारी (कॉलरा), डांग्याखोकला व मुदती ताप हे रोगही आलटून पालटून येत असत. काही प्रमाणात छुपाक्षय होता. त्यामुळे खेड्यातील बहुतेक लोक कोणत्या ना कोणत्या आजाराने पछाडलेले असत. ग्रामीण वैद्य औषधोपचार करीत. क्वचितच लोक जिल्ह्याच्या सरकारी मोठ्या दवाखान्यात जात. देवाला नवस, अंगारे, धुपारे, भगत, गंडादोरा, सगुण यांचे प्रस्थ होते. सर्वत्र शिक्षणाचा अभाव होता. अज्ञानातून अंधश्रद्धा वाढलेली होती. खेळ्यात ब्राह्मण पुरोहित व कुळकर्णी थोडे शिकलेले असत. पोष्टद्वारा गावात येणारी पत्रे ते संबंधितांना वाचून सांगत व गावकऱ्यांना पत्र लिहून देत.

त्या काळात वृत्तपत्रे फार नव्हती. पुण्यामुंबईची व नागपूर बेळगावची मराठी नियतकालिके पाचदहा गावे मिळून एखाद्या गावात येत असत. त्यांचे वाचन व सामुदायिक श्रवण होत असे. रेडिओ खेड्यापर्यंत पोचला नव्हता. त्यामुळे बाहेरील जगाशी फारसा संबंध येत नव्हता. शेती पारंपरिक पद्धतीने केली जात होती. बारा बलुते

अठरा अलुते गावाच्या सर्व गरजा पुरवत सेवा उपलब्ध करून देत. गुरेढोरे, शेळ्या, मेंढ्या व कोंबड्या या शेतीव्यवसायातील प्रमुख घटक होते. दूध दुभते होते. शेणखत हेच शेतीची उपजशक्ती वाढविणारे एकमेव उर्वरक होते. त्यामुळे शेतीमाल सकस व शुद्ध स्वरूपात निर्माण होत असे. शेतीसाठी लागणारे बियाणे शेतकरी आपल्या शेतातील उत्तम वाणाच्या बियाणातून निवड पद्धतीने साठवून ठेवत असत. त्यामुळे त्यांना शुद्धबीजापोटी फळे रसाळ गोमटी याचा लाभ होत असे. अशा प्रकारे शेती करणाऱ्या शेतकरी कुटूंबात पंढरीनाथ पाटलांचा जन्म झाला. पुढे ते आपल्या कर्तृत्वाने समाजभूषण, दलितमित्र म्हणून सर्वत्र ओळखले जाऊ लागले.

**कुलवृत्तांत**

पंढरीनाथांचे मूळ गाव आंबोडा, तालुका खामगाव जिल्हा बुलडाणा येथे त्यांची वडीलोपार्जित शेती व घर आजही आहे. त्यांची आई राधाबाई व वडील सीताराम पाटील. त्यांचे आडनाव राऊत आहे. आजोबा गंभीरजी विठोबा पाटील राऊत यांचेकडे दीडशे एकर जमीन होती. परंतु सततचे दुष्काळ व नापिकी यामुळे सावकाराच्या कर्जात बरीच जमीन गेली. पंढरीनाथांच्या जन्मवेळी फारच कमी जमीन सीताराम पाटलांकडे होती.

मराठा समाजाचा प्रत्येक घटक आपला संबंध छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजपूत घराण्याशी असल्याचा अभिमानाने सांगतो. पंढरीनाथाने आपल्या मूळ पुरूषाचा शोध घेऊन अंबोड्याचे हे राऊत घराणे मूळचे राजस्थानातील असल्याचे नमूद केले आहे. त्यासाठी पंढरीनाथांनी नांदुरा (ता. मलकापूर), (आता नांदुरा तालुका आहे). येथील भाटाचे घर शोधून आपली वंशावळी तपासली. त्यात त्यांना असे आढळून आले की, राजपुतान्यातून त्यांचा मूळ पुरूष रूतेसिंग हा दक्षिणेत पैठण येथे आला. तेथील विसागड किल्ल्याचा मालक झाला.

रूतेसिंग (क्षत्रिय) राजपुतान्यापासून त्याच्या आठ पिढ्या पैठणच्या विसागडावर नांदल्या. आठव्या पिढीतील मल्हारराव पुत्र जाटाजी, इटाजी आणि मंजी उर्फ मानाजी हे तिघे भाऊ त्यांच्या इष्ट मित्रांसह अकबर बादशहाच्या फौजेत सामील होऊन वऱ्हाडात आले व येथेच गाव मिळवून राहू लागले. रूतेसिंग पासून मल्हाररावपर्यंत विसागड येथील किल्ल्यावर राहणाऱ्या या घराण्याचे आडनाव तौवर होते.

वऱ्हाडात येताना हे तिघे बंधू घोडेस्वार व नायक होते. म्हणून या तौवर बंधुंना राऊत असे आडनाव मिळाले.

हे तिघे बंधू वऱ्हाडात आले तेव्हा त्यांचे बरोबर शिवाजी, देवाजी, मानाजी, गणजी उर्फ गणाजी व भावजी हे पाच बंधू होते. या पाच बंधूचे आडनाव इंगळे होते. वऱ्हाडात आल्यावर इंगळेंना तौवर बंधुबरोबरच विजय मिळवून गावे मिळाली. म्हणून भाटाने त्यांना एक ढाल इनाम मागितली. या पाच बंधुंनी आपल्या घरातील, एक जुनी चांदीने मढविलेली ढाल होती, तिचा चांदीचा पत्रा काढून, भोंगळी ढाल भाटास दिली. ही गोष्ट भाटाच्या लक्षात येताच त्याला फार राग आला. आपणास भोंगळी ढाल दिली म्हणून भाटाने इंगळे बंधुंना भोंगळ उपनाव दिले.

मल्हारराव तौवरांची तीन मुले विसागड सोडून वऱ्हाडात आली. त्यांना राऊत हे उपनाव मिळाले.

ही इंगळे व राऊत घराणी वऱ्हाडात आली तेव्हा इकडे वऱ्हाडातील बहुसंख्य गावे ही गवळी जातीच्या मालकीची होती. इंगळे-राऊत घराणे व इतरही जी दक्षिणेतून वऱ्हाडात आली त्यांना गावे घ्यावी लागली.

जाटजी, इटजी व मानाजी हे प्रथम आकोट येथे आले. आकोट तालुक्यातील पिउंदळ गाव त्यांनी मिळविले. ते थोरला जाटजी याने सांभाळले. त्यानंतर जलंब येथे येऊन जलंबची पाटीलकी, पटवारीपण व देशमुखी मिळविली. ती दुसरा भाऊ इटजी याने सांळभाळली.

आंबोडा हे गाव मूळचे येलोजी पांडगावकर या गवळ्याच्या मालकीचे होते ते मोठ्या प्रयत्नाने मिळविले व तिसरा धाकटा भाऊ मंजी उर्फ मानाजी यास ते दिले. आंबोडा येथे मोठी गढी होती ती गवळ्याने बांधली होती.

येलोजी पांडगावकर गवळ्यास ठार मारून अल्लादिन पठाणाने हे गाव घेतले. त्याची जहागीर होती. त्याच्यापासून हे गाव राऊताने घेतले. हे गाव मिळविण्यासाठी भोंगळांची मदत झाली. संकटसमयी अशीच एकमेकांना मदत व्हावी म्हणून भोंगळ बंधुपैकी गंजी उर्फ गणाजी यास या गावात अर्धा वाटा दिला.

मंजी उर्फ मानाजी यास चार मुले होती. त्यापैकी एकाच्या वंशात पंढरीनाथांचे पणजोबा विठोबा राऊत यांचा जन्म झाला. ही वंशावळी खातखेडच्या भाटांजवळ आहे.

**नात्यांचा गोतावळा**

विठोबांची पत्नी रेशमाबाई ही उमाळी तालुका मलकापूर येथील धोरण घराण्यातील कन्या होती. विठोबा व रेशमाबाईस पाच अपत्ये होती. गंभीरजी, अंभीरजी, एकोजी आणि केशव ही चार मुले व यशोदा ही एक कन्या. ही चांदुरबिस्वा येथे जोहरींच्या घरी दिली होती. गंभीरजीची पत्नी लक्ष्मीबाई ही जांभूळधाब्याची. अंभीरजीची पत्नी ही सायखेडच्या कुयटेंची कन्या. एकोजींची पत्नी सावित्रीबाई पिंप्रीच्या आढावांची लेकबाळ. तर केशवची पहिली पत्नी भुलाबाई शेंब्याच्या जुनारेंची मुलगी व दुसरी पत्नी पिंपळगावच्या गोरखांची तनया. पण परंपरेनुसार भुलाबाई हेच नाव तिला धारण करावे लागले.

लक्ष्मीबाई व गंभीरजीला चार अपत्ये होती. सीताराम व भाऊजी ही दोन मुले आणि कौताबाई व भीमाबाई या दोन मुली. सीताराम म्हणजे आपले चरित्रनायक कै. पंढरीनाथांचे वडील यांचा जन्म सन १८८० साली झाला व लग्न १८८९ मध्ये पिंप्री आढावचे अर्जुन पाटील आढाव यांची कन्या राधाबाई यांच्याशी झाला. राधाबाईचा जन्म १८८५ चा असून वयाच्या चौथ्या वर्षी त्यांचे लग्न झाले. राधाबाई व सीताराम पाटील या दांपत्याला १९०३ साली पंढरीनाथ व १९२० साली रामभाऊ व त्यांच्यापाठी तुळसाबाई कन्या झाली. राधाबाईचे वडील अर्जुन पाटील व सीताराम पाटलांचे वडील गंभीरजी दोघेही तालेवार होते. त्यामुळे अर्जुन पाटलांनी कन्या राधाबाईचे लग्न मोठ्या थाटामाटात केले. लग्नसोहळा तीन दिवस चालला. घोडा, गाई व भांडी इत्यादी रग्गड आंधण आले. नवरी सोन्याच्या दागदागिन्यांनी जणू मढविलेली होती. एवढे दागिने उभय पक्षांनी नवरीच्या अंगावर घातले होते. आनंदाचे उधाण आले होते. अर्जुन पाटील हे गावचे कर्ते पाटील होते. त्यामुळे पाटलांकडचे लग्न म्हणजे साऱ्या गावाचेच लग्न असे वातावरण झाले होते.

सीताराम पाटलांच्या लग्नानंतर विठोबा पाटलांच्या वैभवाला उतरती कळा लागली होती. १८९० साली आंबोडा गाव सोडून ते सासुरवाडी जांभूळधाब्यास राहावयास आले. तेथे ते जनावरांचा व्यापार करू लागले. खांडवा जिल्ह्यातील शिंगाजी येथील यात्रेत जनावरांचा भरणारा बाजार प्रसिद्ध होता. गंभीरजींना या यात्रेतील जनावरांच्या व्यापारात मोठी कमाई होत असे पण त्यातून वर्षभर जेमतेम गुजराण होत असे.

जांभूळधाबा येथे गणू पाटील नावाचे सावकार होते. ते गंभीरजी पाटलांचे मित्र होते. आंबोडा येथील शेती सावकारी कर्जात जाऊ नये म्हणून आपले मित्र गणू पाटील यास सदर शेती खरेदी करून दिली व ते गणू पाटलाच्या आड लपले. परंतु पुढे १८९८ मध्ये गंभीरजींचा अंत झाला व गणू पाटील सावकारास आंबोडा येथील जमीन आयतीच मिळाली. त्यांनी ती जमीन इरीने पेरली. तेव्हा सीताराम पाटील आंबोड्यास राहण्यास गेले. शेतीचा ताबा मिळविण्यासाठी कोर्ट कचेरी केली. पण त्यात यश आले नाही. पैसा अमाप खर्च झाला. जमीनही गेली, हलाखीचे दिवस आले. पुढे पंढरीनाथांची आजी लक्ष्मीबाई निवर्तली. त्याचवेळी लहान दुष्काळ पडला. त्यावर्षी बांडी झाली. हे बांडीचे साल होते. त्यानंतर दोन वर्षांनी म्हणजे सन १९०१ मध्ये पुन्हा मोठा दुष्काळ पडला. गावाजवळ पांढरी नावाचे शेत होते. या पांढरीत रताळाचे कंदमुळे होती. त्या कंदांच्या वेलीच्या पानामध्ये ज्वारीचे थोडे पीठ घालून त्या पाल्याच्या भाकरी करीत असत. अशा पाल्याच्या भाकरी खाऊन पंढरीनाथांच्या आईवडील, काका व काकीने दुष्काळातील दिवस काढले. सरकारने दुष्काळी कामे काढली. दुष्काळात गिट्टी फोडण्याचे काम सर्वांसाठीच असते. हजारो मजूर गिट्टी फोडण्याचे काम करीत. पंढरीनाथांच्या वडिलांना थोडे शिक्षण होते. लिहिणे, वाचणे व हिशोब ठेवण्याची क्षमता त्यांच्यात होती. म्हणून त्यांना मुकादमी मिळाली. मजुरांची हजेरी, खडीचे मोजमाप इत्यादी कामे ते करीत. रोज मजुरी मिळे. कंदवेल पाला व ज्वारीच्या भाकरीवरच त्यांचे दुष्काळात कसेबसे गुजराण झाले.

## बालपण व शिक्षण

अशा दुष्काळ सुकाळाच्या लपंडावाच्या पार्श्वभूमीवर रविवार दिनांक २० सप्टेंबर १९०३ रोजी, भाद्रपद वद्य चतुर्दशी शके १८२५ दुपारी १२ वाजता आपल्या चरित्रनायकाचा जन्म झाला. पंढरीनाथ चारपाच महिन्यांचा असतांना देवीची साथ आली. घराआड घरात ती शिरली. तिने प्रथम पंढरीनाथांचे काका-भावजी व नंतर लगेच पंढरीनाथांना गाठले. त्याचवर्षी अक्षयतृतीयेनंतर पंढरीनाथांचे धाकटे मामा मोतीराम पाटील यांचे लग्न ठरले. त्या लग्नासाठी सारा राऊत परिवार आंबोड्याहून पिंप्री आढावला गेला. बालक पंढरीनाथ नुकताच देवीच्या तावडीतून कसाबसा सावरला होता. प्रिंप्रीला आल्यामुळे थोडा आराम मिळाला. या लग्नापासून पांढरीनाथांचे वडील कायम पिंप्रीला राहायला आले. पंढरीनाथांसह त्यांचे आईवडील, आजोबा-आईचे वडील अर्जुन

पाटलांकडेच एकत्र कुटुंबात राहत असतं. पुढे काही दिवसांनी सीताराम पाटील व राधाबाई बाळ पंढरीनाथासह वेगळे घर करून राहू लागले.

देवीच्या आगमनापासून पंढरीनाथांना अनेक रोगांनी विशेषत: साथीच्या रोगांनी घेरले. गोवर, कांजन्या, जीर्णज्वर, खोकला, डांग्या खोकला, सटवी, मुदती हिवताप, खरूज, नायटे इत्यादी. रोगट मुलावर सतत औषधोपचार सुरू असत. पंढरीनाथ जेमतेम अडीच वर्षाचा असेल त्यावेळी आईने वैद्याच्या सांगण्यावरून जुलाबासाठी, अजाणतेपणी आतील गाभ्यासह (गोडंबीसह) जेपाळाचे बी खायला दिले. इतर मुलांसोबत खेळत असताना आई पाणी आणण्यासाठी आडावर गेली. इकडे पंढरीनाथाला चक्कर येऊन तो जमिनीवर निपचित पडला. आई पाण्याची खेप घेऊन आली. बाळाला अशा निपचित अवस्थेत पाहून तिने हंबरडा फोडला. मोठा हल्लकल्लोळ माजला. अनेकांनी विविध उपाय केले. थोड्यावेळाने आराम पडला. बाळाचा पुनर्जन्म झाल्याचा आनंद आई राधाबाईला झाला.

### अंत्यविधीची तयारी

वर नमूद केल्याप्रमाणे सर्वप्रथम देवीच्या साथीने पंढरीनाथांना पछाडले. त्यापाठोपाठ तिसऱ्या वर्षानंतर गोवर, कांजण्या, जीर्णज्वर, सटवी, खोकला यांनी पंढरीनाथांना जर्जर केले. हाडाचा फक्त सापळा राहिला. पोट टिचीटिची निघाले. हातपाय काडीमुडी झाले. चौथ्या वर्षी एका रविवारी घरातील सर्वांनीच आशा सोडली. बिलोरा येथील वैद्याने उपचार केले. वैद्यराजाने कडक ताकीद दिली, आजची रात्र या मुलाजवळ बसून जागा आज जर हे मूल वाचले तर ते पुढेही जगेल. असे निक्षून सांगितले. शरीर क्षीण झाले. हातपाय थंड झाले. आईला व तिच्या आईला (आजीला) पौष रविवारचा उपवास होता. तिने उपवास सोडला नाही. रात्र झाली. बाळ पंढरी निपचित पडला. रात्री जर मूल दगावले तर तारांबळ नको म्हणून भोवतालच्या मंडळींनी नवेकोरे कापड, कुदळ व फावडे आणून ठेवले. रात्रभर जागरण केले. सोमवार सोन्याचा दिवस उगवला. मुलाला आराम पडू लागला. चार महिन्यात मूल खेळू लागले.

### डोळा दुखावला

वयाच्या पाचव्या वर्षीची घटना. शेजाऱ्याचे दोन बैल त्यांच्या दाराशी बांधले

होते. सकाळची वेळ. मुलं अंगणात खेळत होती. खेळता खेळता ती बैलाजवळ गेली. बाळाच्या गळ्यात चांदीची साखळी होती. बाळाला बैलाने शिंगावर घेतले. साखळी बैलाच्या शिंगात अडकली. बैलाने शिंगावरील बाळाला दूर भिरकावले. तेव्हा बैलाचे शिंग बाळाच्या उजव्या डोळ्यात घुसले. चांगलीच जखम झाली. जखम सातआठ महिने गांजली. त्या अवधीत डोळ्यात वडूस वाढले. आईवडिलांनी औषधोपचार काळजीपूर्वक केला. डोळा बरा झाला. पण बुबुळाच्या जखमेच्या जागी खूण कायम राहिली.

पंढरीनाथ सहा वर्षाचा झाला. तेव्हा आईचे वडील अर्जुन पाटील यांनी आई राधाबाईला गावाजवळील चार एकर पांढरीचे शेत तिचे नावे करून दिले. अर्जून पाटलांना दोन स्त्रिया होत्या. मोठीचे नाव लक्ष्मीबाई व धाकटीचे नाव पार्वतीबाई. त्यातील पार्वतीबाईपासून त्यांना पांडुरंग व मोतीराम ही दोन मुले झाली. लक्ष्मीबाईपासून तोताराम, राधाबाई व दयाराम ही तीन अपत्ये झाली. लक्ष्मीबाई दयाराम तान्हा असतानाच वारली. धाकट्या पार्वतीबाईने राधाबाईसह तीनही मुलांना पोटच्या पोरांसमान सांभाळले. पार्वतीबाईने लक्ष्मीबाईच्या मुलांना अंतर दिले नाही. पार्वतीबाईचे व राधाबाईचे एकमेकींवर निस्सीम प्रेम होते. लक्ष्मीबाईच्या मुलांना पार्वतीबाईने कधीही सापत्न भावाची वागणूक दिली नाही. तसेच राधाबाईनेही आपल्या सावत्र भावांना पांडुरंग व मोतीराम यांना दुजाभाव दाखवला नाही. राधाबाईने मोतीरामला अंगाखांद्यावर वागविले. त्यामुळे तिचे त्याच्यावर फारच प्रेम होते.

पंढरीनाथांची आजी पार्वतीबाई दानशूर होती. आजीला शेती मिळण्यापूर्वीपासून पंढरीनाथांचे वडील उत्तम शेती करीत. आजीला शेती मिळाल्यापासून घरात समृद्धी आली-वाढली. शेतात माल, भाजीपाला, फळफळावळ भरपूर यायची. गाय, म्हैस घरी असायची. त्यामुळे दूधदुभते भरपूर असायचे. सालदार महिनदारांचा राबता असायचा. माळवं विकायला, कापूस विकायला पंढरीनाथ गाडीवर बसून शहरात जात. तेव्हा पंढरीनाथांना वडील खाऊ म्हणून जिलेबी खाऊ घालत व मुलांसाठी पुडा बांधून घरी आणत. त्यांचे घर म्हणजे गोकूळ असायचे.

पंढरीनाथांच्या लहानपणी विटीदांडू, भोवरा, गोट्या, खोखो, चिल्लीपाट, धावणे, डाबडुबली इत्यादी खेळ खेळले जात. यापैकी पंढरीनाथांना खोखो चिल्लीपाट धावणे व डाबडुबली (झाडावर चढून खेळाचा खेळ) फार आवडत असत. डाबडुबली

खेळात तर ते अवघड उंच झाडावर सहज खारीगत चढायचे. वडील त्यांच्या अवखळपणामुळे त्यांच्यावर रागवत. परंतु पंढरीनाथांना अभ्यासात उत्तम गती असल्यामुळे सर्व खूष असत.

**बालविवाह**

सीताराम पाटील थोडे शिकलेले होते. त्यांना शिक्षणाचे महत्व कळलेले होते. आजोबा अर्जुन पाटील गावचे पाटील होते. त्यांनाही शिक्षणाचे महत्व कळलेले होते. पंढरीनाथांचे वय आता सात वर्षाचे झालेले होते. त्यांच्या वडीलांनी त्यांना पिंप्री आढाव येथील जिल्हा कौन्सिल बोर्डाच्या शाळेत इन्फन्ट वर्गात दाखल केले. १९०९ साली ते शाळेत जाऊ लागले. इयत्ता तिसरीत असतांना १९१२ साली वयाच्या नवव्या वर्षी शेंब्याच्या (तालुका मलकापूर) जुनारे पाटलांच्या सरस्वती नामक मुलीशी थाटात विवाह झाला. मार्गशीर्ष शुद्ध पंचमी सकाळी सूर्योदयी गोपाळ मुहूर्त साधला होता. तीन दिवस लग्न सोहळा चालला. उभयपक्ष सुखवस्तू होते. थाटात कार्य पार पाडले.

इयत्ता तिसरीत असताना १९१२ साली डिसेंबरमध्ये सातव्या एडवर्डचा दरबार डे सर्वच शाळांमधून धुमधडाक्यात साजरा झाला. शाळा समितीने गावातून वर्गणी गोळा करून मुलांना खाऊ वाटला व एकेक पदक वाटले.

बोर्डाची शाळा १९१३ साली बंद झाली. शिक्षणाचे महत्त्व जाणणाऱ्या वडील सीताराम पाटलांनी बाहेरगावाहून एक शिक्षक आणून त्यांची राहण्या-जेवणाची व्यवस्था आपल्या घरी केली व गावठी शाळा चालवली. पटसंख्या वाढल्यावर गावकऱ्यांच्या सहकार्याने सीताराम पाटलांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले व गावातील बोर्डाची शाळा पुन्हा सुरू झाली. तेव्हा त्या शाळेत सहादू विठोबा भगत नावाचे शिक्षक आले. त्यांच्या हाताखाली पंढरीनाथांची इयत्ता चौथीची उत्तम तयार झाली. १९१४ साली वयाच्या दहाव्या वर्षी पंढरीनाथ इयत्ता चौथीची परीक्षा उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले. भगत गुरूजींनी आपली चौथीची उत्तम तयारी करून घेतल्याची कृतज्ञतापूर्वक नोंद पंढरीनाथांनी करून ठेवली आहे. त्याकाळी चौथीच्या परीक्षेला बसणारी मुले मिशा आलेली असत. चौथी इयत्तेची परीक्षा चांदूरबिस्वा केन्द्रावर झाली तेव्हा चौथ्या इयत्तेला बसणारा सर्वात लहान मुलगा म्हणून त्यांना गमतीने इतर मुले टिल्लू टिल्लू म्हणून खिजवत व त्यांना पाहण्यासाठी जमा होत.

पंढरीनाथांना चांदूरबिस्वा शाळेत इयत्ता पाचवीत दाखल केले. त्यावेळी ते वर्गात सर्वात लहान होते. तेथेही टिल्लू मुलगा म्हणून इतर मुले त्यांची खिल्ली उडवीत. त्या शाळेत त्यांना वामन जोशी व जगदेवराव तुकाराम भालेराव हे दोन मित्र मिळाले. हे दोघेही पंढरीनाथांपेक्षा पाच सहा वर्षांनी मोठे होते. भालेराव मराठा होता. त्यामुळे त्यांचे घरी पंढरीनाथ मुक्तपणे वावरत असत. चांदूरबिस्वाला पंढरीनाथांची राहण्याची सोय न लागल्यामुळे त्यांना जाणे येणे करावे लागे. ही दगदग त्यांना जमली नाही. म्हणून अवघ्या चारच महिन्यात त्यांना शाळा सोडावी लागली. त्यानंतर ते वडिलांना शेतीच्या कामात मदत करू लागले. गुरेढोरे चारणे, त्यांचे शेण काढणे, चारापाणी करणे, तसेच वखर, नांगर हाकणे इत्यादी कामे ते मोठ्या आवडीने करीत असत. यातूनच त्यांच्या बालमनावर श्रमाचे महत्त्व कोरले गेले. श्रमाचे मोल कळले. शेतकऱ्यांचे प्रत्यक्ष जीवन अनुभवले. श्रमिक नीतीची अनुभूती मिळाली. १९१४ ते १९१७ ही तीन वर्ष ते गावीच राहिले.

शेतीची कामे फार जोखमीची असतात याचा अनुभवही त्यांना याच काळात आला. शेतात म्हणजे रानातच शेतकऱ्याला वावरावे लागते. म्हणूनच शेताला वावर म्हणतात. विंचू, साप व श्वापदांचा त्याकाळी रानात सुळसुळाट असायचा. शेतात काम करताना कोणत्या वेळी काय प्रसंग गुजरेल याचा नेम नाही. रताळाच्या शेतात काम करतांना व एकदा विहिरीत उतरले असता अशा दोन वेळा पंढरीनाथांच्या वडीलांना साप चावला. साप चावला की त्या व्यक्तीला गावच्या मारूतीच्या पारावर आणून बसवत असत. ही प्रथा आजही खेड्यात आहे. पंढरीनाथांचे वडील धाडसी होते. धीराचे होते. पहिल्या वेळी ते कसे वाचले पंढरीनाथांना आठवत नव्हते. पण दुसऱ्या वेळी खांडवीच्या पाहुण्याने जंगलातून म्हणजे शेताच्या धुऱ्यावरून एक पांढऱ्या रंगाचा कंद खोदून आणला व तो ठसाठसा ठेचून त्याचा ठेचा पाण्यात कालवून ते पाणी त्यांच्या वडिलांना पाजले त्यामुळे भडाभडा उलट्या झाल्या व 'पान' उतरले.

### बालकीर्तनकार पंढरीनाथ

१९१४ ते १९१७ या काळात दरवर्षी सतत चैत्र महिन्यात मुक्ताईची वारी पंढरीनाथांनी केली. १९१४ सालात दर एकादशीला ते चांदुरंबिस्वा ते दिघी एक मैल प्रवास करून तेथे जागरणासाठी जात. दिघीला मांगोपाटील नावाचे विठ्ठलभक्त होते. त्यांचेकडे हा जागर कार्यक्रम असायचा. पंढरीनाथांवर त्यांचे प्रेम जडले.

पंढरीनाथ विठ्ठलभक्तीच्या वातावरणात वावरत होते. ते दररोज सकाळी लवकर उठून मारोतीच्या दर्शनाला जात. शुद्ध उदकाने मारोतीला अभिषेक घालून पूजा करीत. तुळशी पूजन करीत. विठ्ठल नाम स्मरणही करीत. नाकापासून डोक्यापर्यंत उभा गंध लावत. सर्वांगावर मुद्रा उठवीत. गळ्यात तुळशीमाळ घालत. मांगोपाटलाने एका एकादशीला कीर्तन करण्याचा आदेश दिला. तेरा वर्षाच्या बालकीर्तनकाराचे कीर्तनासाठी गावकरीच नव्हते, तर आजुबाजूच्या गावातीलही लोक मोठ्या संख्येने कुतूहलापोटी जमले.

**आता तरी पुढे हाच उपदेश । नका करू नाश आयुष्याचा ॥**

हा जगतगुरू संत तुकारामांचा अभंग पंढरीनाथांनी निरूपणासाठी घेतला. अर्धा तास कीर्तन केले. त्यात पंढरीनाथांनी दोन तीन भारूडेही अंगविक्षेपासह सादर केली. ती म्हणतांना हुबेहुब सोंगही वठविले. लोकांना मोठे कौतुक वाटले. हीच सत्यशोधक जलशाची प्रेरक घटना होय.

## मलकापूर जीनात मजुरी

पंढरीनाथांचे वडील कडक शिस्तीचे होते. त्यांना उणेदुणे सहन होत नव्हते. १९१७ सालच्या जानेवारीतली गोष्ट. मळ्यात सांगितलेल्या कामात पंढरीनाथांकडून चूक झाली. वडील पंढरीनाथांवर रागावले. तिरगी मिरगीतच कापासाची गाडी भरून खामगावला गेले. पंढरीनाथ भितीपोटी व रूसून घर सोडून गावाबाहेर पडले. ते तडक चांदूर बिस्वाला गेले. कोणालाही न सांगता रेल्वेने मलकापूरला गेले. भुकेपोटी कापसाच्या जीनात मजुरी केली. ओळखीअभावी राहण्या-खाण्याचे हाल झाले. एक आठवडा फुटाणे खाऊन काढला. त्यानंतर माकनेरचा एक ओळखीचा माणूस भेटला. आईवडील त्यांना शोधून थकले. विहिरीही पाहिल्या. सर्वत्र शोध घेऊन थकले. म्हणून त्याने सांगितले. पंढरीनाथांना रडे कोसळले. एकुलता एक मुलगा घरून निघून गेल्याचे सर्वांना दु:ख झाले. सर्वच काळजीत होते. पंढरीनाथ घरी पोचताच सर्वांना खूप आनंद झाला.

## पुन्हा शिक्षणाची संधी : कमवा आणि शिका

१९१७ च्या जुलैमध्ये पंढरीनाथांना पिंपळगाव काळे येथील शाळेत इयत्ता पाचवीत दाखल केले. तेथे त्यांची राहण्याची सोय चुलत मावशी अमृताबाईकडे झाली. आईने तिथे राहण्यास परवानगी दिली. पंढरीनाथ शाळेत जुलैमध्ये दाखल झाले तरी

वर्गात मात्र ते पंधरा वीस दिवस उशिराच गेले. त्यामुळे त्यांचा अभ्यास व उपस्थिती इतर विद्यार्थ्यांपेक्षा अर्थातच कमी होती. इतर शाळांच्या तुलनेत या शाळेचा शिक्षणक्रम व अभ्यासक्रम उच्च दर्जाचा होता. शिवाय वर्गात काही जुने विद्यार्थी होते. त्यांचे मदतीने पंढरीनाथांनी मागे राहिलेला अभ्यास पूर्ण केला. शिक्षणाची आवड, अभ्यासाची जिद्द त्यामुळे त्यांनी अभ्यासामध्ये रात्रंदिन मेहनत करून एका महिन्यातच हुशार मुलांचा हात धरला.

घर सोडून दूर बाहेरगावी शिकावयास आल्यामुळे वडिलांचा व त्यांचा पत्रव्यवहार सुरू झाला. पंढरीनाथांना आता थोडे कळू लागले. पाचव्या इयत्तेत पत्रलेखन करण्याइतके भाषाज्ञान होते. घरून येताना आईने पुस्तके व फी साठी त्यांच्या मावशीजवळ काही पैसे दिलेत. पत्रव्यवहारातून 'कमवा आणि शिका' हे तत्त्व पंढरीनाथांना वडिलांनी शिकविले. कारण तीन वर्षे शेतात मदत करताना किती कष्ट करावे लागतात हे पंढरीनाथांनी अनुभवलेले होते. कष्ट चुकविण्यासाठी ते शाळेत गेले असे वाटू नये म्हणून बजावले की त्यांना शिक्षण घ्यायचेच असेल तर सुटीच्या दिवसात नोकरी अथवा मोलमजुरी करून पैसे मिळवावे व शिक्षणाचा खर्च भागवावा. शिक्षणासाठी वडिलांना पैसे मागू नये कारण वडिलांनी पैसे पुरवावे व पंढरीनाथांनी मजा करावी यासाठी वडिलांजवळ पैसे नाहीत असे त्यांनी पंढरीनाथांना स्पष्ट बजावले होते.

वडिलांची ही शिकवण लक्षात घेऊन महिना सव्वा महिन्यातच त्यांनी एका किराणा दुकानावर काम मिळविले. दर शुक्रवारी बाजारच्या दिवशी या कामाचे पंढरीनाथांना दोन आणे मिळू लागले. त्यातून दरमहा त्यांचा कागद, पेन्सिल, दऊत, शाई इत्यादींचा खर्च भागू लागला. त्यातून त्यांना समाधान लाभले. उत्साह वाढला. वडिलांना पैसा न मागता आपण शिकू असा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण झाला.

२१ जुलै १९१७ च्या पत्रात वडील पंढरीनाथांना लिहितात, 'आपण अभ्यास चांगला झटून करावा.' याच पत्राचे उत्तरात त्यांना २ ऑगष्ट १९१७ ला लिहितात, 'वडिलांचे कृपेकरून माझा हजेरीत तिसरा नंबर लागला आहे' दर महिन्यात रोजच्या अभ्यासाला वर्गशिक्षक गुण देऊन त्यांची महिना अखेरी बेरीज करतात. त्यावरून मुलांची नावे दर महिन्याच्या पहिल्या तारखेला गुणानुक्रमानुसार लिहित असत. पहिल्याच महिन्यात पंढरीनाथ रात्रंदिन अभ्यास करून तिसऱ्या क्रमांकात आले. ही लहान प्रगती नव्हती तथापि, त्यांचे एवढ्याने समाधान झाले नाही. त्यांनी खूप मेहनत केली व सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या तारखेला हजेरीपटावर पहिल्या क्रमांकावर पंढरीनाथांचे नाव झळकले.

सन १९१८ च्या जूनमध्ये सहाव्या इयत्तेत शिकत होते. त्यावेळी मराठीचे मिडल क्लास फक्त सहाच होते. सहाव्या वर्गाची वार्षिक परीक्षा अर्थात मिडलस्कूल सर्टिफिकेट परीक्षा असे.

## मावशीवर कोसळलेला दु:खाचा डोंगर

मावशीला भिकाजी, बनुबाई व वेनुबाई अशी तीन अपत्ये होती. भिकाजी हा बनुबाईपेक्षा लहान होता. तो ३० ऑगष्ट १९१७ रोजी वारला. मावशीच्या घरात एकच शोकाकांत झाला. मृत्युसमयी त्याचे वय सुमारे बावीस वर्षांचे असेल व मावशीचे वय साठीच्या आसपास असेल. वृद्धापकाळी मावशीवर पुत्राच्या मृत्युमुळे दु:खाचा डोंगर कोसळला. मावशीच्या घरी गाई, म्हशी, बैल इत्यादी जनावरे व शेती होती. एक सालदार होता. घरात पंढरीनाथाशिवाय दुसरा पुरुष नव्हता. त्यामुळे शेती व जनावरे याकडे चीत देण्याचे काम पंढरीनाथाकडे आले. शाळेच्या वेळा सोडून पंढरीनाथ सकाळ-संध्याकाळ शेतावर जात असे. सर्वच शेती गावापासून एक मैल अंतरावर होती. त्यावर्षीची सुगी करून पंढरीनाथांनी परीक्षेची उत्तम तयारी केली. चांगल्या गुणांनी परीक्षा उत्तीर्ण होऊन ते पिंप्री आढावला उन्हाळ्याची सुटी म्हणून गेले.

## सामाजिक प्रथेविरूद्ध पहिले बंड - मावस बहिणीचा पुनर्विवाह केला

मावशीची सर्वात लहान मुलगी लग्न होताच बालपणीच विधवा झाली. मावशीच्या भाऊबंदात पुनर्विवाहाची चाल नव्हती. त्यामुळे ती समाजाच्यादृष्टीने करंट्या कपाळीची म्हणून मनात कुढत वैधव्याचे दिवस कंठित होती. त्यावेळी तिचे वय सुमारे वीस वर्षाचे होते. आपल्या मृत्युनंतर या तरुण पोरीचे कसे होईल याची मावशीला मोठी चिंता वाटत होती. ही चिंता तिने सर्व आप्तजनांच्या कानावर घातली. तेव्हा सर्व आप्तजनांनी योग्य वर शोधून तिचा त्याच्याशी पुनर्विवाह लावावा असा सल्ला दिला. त्याप्रमाणे वेणूताईच्या मनाची तयारी करून घेण्यास तिला यश आले व सन १९१८ च्या मे महिन्यात सदर वेणूताईचा पुनर्विवाह घडून आला. या कामी पंढरीनाथांचा प्रयत्नांचा मोठा वाटा होता. स्वत:ला राजपूत म्हणवून घेणाऱ्या मावशीच्या भावबंदांनी पंढरीनाथांना चांगलेच पाण्यात पाहिले. सुटी संपल्यावर पंढरीनाथ पिंपळगावला परत गेल्यावर मावशीच्या पुतण्यांनी मावशीला व पंढरीनाथांना लाखोली वाहिली. विधवा मुलीचा

पुनर्विवाह केल्यामुळे मावशीवर सारेच भाऊबंद कमी अधिक प्रमाणात रागावले होते. पण हे रागावणे बाह्यात्कारी होते. त्यांच्या मनात झाले ते बरे झाले असे होते. कारण पुनर्विवाहाची चाल नसल्यामुळे त्यांच्यापैकी अनेकांच्या मुलीबाळी विधवा होऊन त्यांच्या घरी ओझे होऊन बसल्या होत्या. पण त्यांचा पुनर्विवाह लावण्याचे धैर्य त्यांच्यात नव्हते. त्यांना भाऊबंदांची भीति वाटत होती. पंढरीनाथांच्या मावशीच्या धैर्याने त्यांना मनातून कौतुकच वाटत होते. या घटनेचा एक सुपरिणाम मात्र इतका जरूर झाला की मावशीच्या भाऊबंदांपैकी दोन विधवा मुलीचे पुनर्विवाह चोरून का होईना वर्षा दोन वर्षात लावले गेले. समाज सुधारणेच्या प्रक्रियेतील हा पहिला बंडखोरीचा प्रयत्न होता. त्यात पंढरीनाथांना यश येऊन बळ प्राप्त झाले. सामाजिक सुधारणांचे बी रूजले.

जुलैच्या एक तारखेपासून पंढरीनाथ इतर मुलांसह इंग्रजी शिक्षण घेऊ लागले. तुकारामजी कुंभारे नावाचे कोष्टी जातीचे एक शिक्षक प्रथम इंग्रजी शिकवीत होते. सगळे शिक्षक पंढरीनाथांच्या घरीच राहत असत. सन १९१८ च्या ऑक्टोबरात जी मोठी एन्फ्लूएन्झाची साथ आली त्यावेळी ते शाळा बंद करून निघून गेले. साथ ओसरल्यानंतर शाळा सुरू झाली. तेव्हा पितळे नावाचे शिक्षक इंग्लीश टीचर म्हणून आले.

### द्रोण व पत्रावळी करून विकल्या

१ जुलै १९१९ ला पिंपळगावला नवीन इंग्रजी शाळा उघडली. या नव्या शाळेत इंग्रजी शिकण्यासाठी पंढरीनाथ जाऊ लागले. परंतु इंग्रजी वर्गाची फी भरण्याची त्यांची आर्थिक स्थिती नव्हती. निरूपाय म्हणून पंढरीनाथांनी फी व पुस्तकासाठी पैसे पाठवण्याबाबत वडिलांना पत्र पाठविले. त्यांचीही परिस्थिती नाजूक होती. त्यांच्याकडूनही नकाराचाच निरोप आला. इतर मित्रांसोबतच पंढरी इंग्रजी वर्गात दाखल झाले होते हे वाचून त्यांचे वडिल जुलै अखेर त्यांच्या भेटीसाठी पिंपळगावला गेले. भेटीअंती पुन्हा त्यांनी सांगितले की ते इंग्रजी शिक्षणाचा खर्च झेपू शकणार नाही. पंढरीनाथ काळजीत पडले.

या शाळेत आल्यापासून पंढरीनाथांना काही मित्र मिळाले. मोतीराम यादव पाटील (पळशी सुपो), काशीराम कडतू पाटील (धामणगांव), सदु महादु माळी (पिंपळगांव) व काशीराव रायभान पाटील (करमोळा) अशी त्यांची नावे होती. यापैकी मोतीराम हा पंढरीनाथांच्या घरांजवळ राहत असे. त्यांच्या घरी अत्यंत गरिबी होती.

त्याचा बाप कष्ट व मोलमजूरी करून ज्वारी, मीठ, मिरची घ्यायचा व मोतीरामच्या आईच्या स्वाधीन करायचा. मोतीरामची आई व तो पिंपळगाव येथे राहत असत. त्याचा बाप आणि भाऊ पळशी (सुपो) ला राहत असत. त्याच्या घरी अठराविश्वे दारिद्र्य होते यात शंकाच नव्हती. हाताने पीठ होईल इतक्या खराब, पेवातील जून्या अथवा सडलेल्या म्हणा, ज्वारीच्या भाकरी मोतीरामला खाव्या लागत असत. मोतीराम हा पंढरीनाथांचा सर्वात निकटचा मित्र होता. ते दोघे घरून शाळेत बरोबर जात येत असत. तसेच एकमेकांच्या घरी आपल्या भाकरी घेऊन जाऊन सोबत जेवत असत. पंढरीनाथांच्या या सर्व मित्रात मोतीराम हा पंढरीनाथांप्रमाणेच फी व इतर खर्चाच्या अडचणीत होता. या अडचणीवर मात करण्यासाठी दोघांनी सल्लामसलत करून पत्रावळी शिवून विकण्याचा धंदा करण्याचे ठरविले. ठरल्याप्रमाणे रविवारी अथवा सुटीच्या दिवशी दोघांनी सकाळी लवकर उठून सूर्योदय होताच पळशीहून सातपुडा पहाडाच्या पायथ्याशी असलेल्या जंगलात जाऊन पळस, मोह या झाडांची पाने झाडांवर चढून तोडावीत. ती पोत्यात भरून पोते डोक्यांवर घेऊन चार मैल पर्यंत मजल दरमजल विश्रांती घेतघेत दुपारी एक ते दोनच्या दरम्यान पिंपळगावला पोचत असत.

पत्रावळी शिवण्यासाठी लागणाऱ्या चुया (शिळका) ज्वारीच्या कडब्याचे गुरांनी खाऊन उरलेले चांगल्या संकाळाचे धांडे शोधून त्याच्या शिळका तयार कराव्या. वास्तविक असे धांडे सोलून त्यांच्या संकाळांची गाडी पाळणा करून खेळण्याचे वय परंतु त्याऐवजी ते पत्रावळी शिवू लागले. सोमवार ते शनिवार रोज शाळेत नियमित जाऊन सकाळ-संध्याकाळ शाळेच्या वेळेशिवाय पत्रावळी तयार करण्याचे काम सुरू झाले. शाळेत सांगण्यात येणारा अभ्यास रात्रीच पूर्ण करायचा असा त्या दोघांचा दिनक्रम चांगला चारसहा महिने सुरू होता. दिवसभर शाळा व पत्रावळी द्रोण तयार करून दोघेही थकून जात. एवढे कष्ट उपसून द्रोण व पत्रावळी गावात दुकानदाराकडे विकण्यासाठी न्यायचे तर ही गरजू मुले आहेत हे ओळखून दुकानदार बाजारभावापेक्षा कमी म्हणजे अगदीच कमी भावाने पैसे देत असे. दुकानदार पत्रावळी आठ आणे शेकड्याने विकत असत. परंतु या मुलांच्या हाती मात्र कधी तीन आणे तर कधी दोनच आणे तो दुकानदार देत असे. गरजवंताला अक्कल नसते म्हणतात. त्या म्हणीप्रमाणे या गरजवंत मुलांना दुकानदार देईल त्या भावाने पैसे घेतल्याशिवाय गत्यंतर नव्हते. त्यामुळेच तो देईल तेवढे पैसे ती मुले निमूटपणे घेत असत. जास्त भाव देण्याबाबत दुकानदाराला भीतभीत म्हटले तर तो उत्तर देत असे की, त्याला आता पत्रावळी नकोच आहे.

त्याच्याजवळ पूर्वीचाच माल भरपूर आहे. त्यामानाने उठाव कमी आहे. अमूक भावात द्याल तरच घेईन नाहीतर परत घेऊन जा. असे तो म्हणत असे. हा धंदा करून आता पंढरीनाथ कंटाळले होते. पण दरमहा चार सहा रूपये मिळत. त्यातून फी, पुस्तके, कागद, शाई, टाक, पेन्सिल इत्यादींचा खर्च भागवून दरमहा दोनतीन रूपये शिल्लक उरत असत.

## रद्दी खरेदी विक्रीचा व्यवसाय

१९१९ च्या दिवाळीच्या सुट्टीत पंढरीनाथ गावी आले. सुटी संपल्यावर परत शाळेला जातांना ते चांदूरबिस्वा रेल्वे स्टेशन वरून जात असतांना स्टेशन मास्तरांनी पंढरीनाथांना बोलाविले. 'रद्दी विकत घेऊन जा, मी तुला स्वस्त भावात देतो', असे म्हणाले, पंढरीनाथांनी काही रद्दी विकत घेतली. ती पिंपळगाव राजाला जाऊन दुकानदाराला विकली. त्यात त्यांना दुपटीने नफा झाला. हा धंदा कमी त्रासाचा व जास्त नफ्याचा वाटला म्हणून पंढरीनाथांनी पत्रावळीचा व्यवसाय यापुढे बंद केला. पंढरीनाथ महिन्या दोन महिन्यांनी पिंप्रीस येत व जातांना पिशव्या भरून स्टेशनमास्तरकडून रद्दी घेऊन जात. ती रद्दी पिंपळगावला जाऊन विकत त्या व्यवहारात त्यांना खर्चापूरता पैसा मिळत असे. त्यामुळे आता यापुढे दर शुक्रवारी बाजारचे दिवशी बनियाचे दुकानावर कामावर जाण्याचे सोडून दिले.

## पंढरीनाथ दुकानदार झाले

पत्रावळीच्या व रद्दीच्या व्यवसायात शिल्लक साचलेल्या पैशातून पंढरीनाथांनी दिवाळीपासून बिड्या, अंगारपेट्या, सुपारी, कात, चुना व तंबाखू इतक्या जीनसांचे चिल्लर विक्रीचे एक पाच सहा रूपये भांडवलाचे दुकान उभारले. ते तेथील आठवडी बाजारात दर शुक्रवारी दुकान मांडू लागले. नाताळाच्या सुटीत पिंप्रीला घरी आल्यावर तेथेही विक्रीसाठी काही अंगारडब्या ठेवण्याची व्यवस्था केली. या दुकानतून दरमहा दीड दोन रूपये नफा मिळू लागला. पंढरीनाथांचे दुकान मुलांच्या खेळण्यातील लुटूपुटूच्या दुकानासारखेच होते.

पत्रावळीचा व्यवसाय, रद्दीचा व्यापार व किरकोळ बिडीकाडी तंबाखूचे दुकान यातून फारसे उत्पन्न पंढरीनाथांना मिळाले नाही. पण गरीबीला न घाबरता 'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता, तेलहि गळे' या उक्तीनुसार त्यांची प्रयत्नांची पराकाष्ठा, जिद्द व उद्यमशीलता

यातून स्वकष्टार्जित धनसंचयाचे समाधान याचा प्रत्यय त्यांना आला. बालवयातील त्यांचे हे सर्व उद्योग कौतुक करण्यासारखेच आहेत.

**मावशीची मनोभावे सेवा**

हे सर्व व्याप सांभाळून पंढरीनाथांना एक मोठी जबाबदारी प्रसंगोपात अंगावर घ्यावी लागली. ती म्हणजे मावशीच्या घरी निष्ठेने वागणे. मावशी वृद्ध. त्यात पुत्रशोकाने दुःखी, कृश झालेली. हाताशी मुलगी कामाला होती. तर तिचा पुनर्विवाह होऊन ती सासरी गेलेली. अशा स्थितीत तिला आधार द्यायला, निष्ठेने, प्रेमाने सेवा करायला पंढरीनाथाशिवाय दुसरे कुणी जवळचे नव्हते. तिला रोज घरासमोरील आडातून पाणी काढून देणे, चक्कीवरून दळण आणणे, बाजारातून भाजीपाला, किराणा आणणे. म्हातारीला पुत्रशोकाचा उमाळा आला असता, कंटाळा आला असता, बरे वाटले नसता, त्या त्या दिवशी भांडी घासणे, चुलीत विस्तव पेटविणे, भाकरी करणे, म्हातारीचे लुगडे धुणे, जेवणासाठी आग्रह करणे, हट्ट धरणे, तिला आपल्या ताटात जेवायला लावणे व मग आपण जेवणे इत्यादी कामे पंढरीनाथ स्वयंस्फूर्तपणे मोठ्या निष्ठेने करीत असत.

मावशीचेही त्यांच्यावर नितांत प्रेम होते. एकदा एक बैरागी आला व म्हणाला, 'या मुलाने पोळ्याला बैल पाहू नये, याने काळ्या कपड्याला स्पर्शही करू नये. त्याने तसे केल्यास त्याचेवर अरिष्ट येईल, त्याचेवर ग्रहचक्र येईल तेव्हा आई ग्रहशांती कर' मावशीने हे ऐकताच ती गर्भगळित झाली. तिने ग्रहशांतीसाठी बैरागीबुवाची झोळी भरली व दोन रूपये दक्षिणाही दिली. अशाप्रकाराने बैराग्याने म्हातारीला क्षणात लुबाडले.

पुन्हा एकदा असेच पंढरीनाथांवर संकट येईल असे कुणीतरी सांगितले. ते निवारावे म्हणून म्हातारीने नाथास भोजन घालून त्याला दानदक्षिणा व धान्य दिले. या सर्व प्रकारावरून पंढरीनाथांवर कोणतेही संकट येऊ नये यासाठी प्रेमळ व देवभोळी अंधश्रद्ध म्हातारी मावशी पंढरीनाथांना किती जपत होती याची प्रचिती आली.

म्हातारीच्या घरी नाथपंथी साधूंचा प्रभाव होता. तिचा गुरूबंधू एक नाथपंथीय होता. भिकाजी जिवंत असताना हा गुरूबंधू तिच्या घरी पोथीपुराणादि धर्मग्रंथांचे पारायण करी त्याबद्दल त्याला भिकाजी भोजन व दक्षिणा देत असे.

## दुकानात कमावले ते जुगारात गमावले

पंढरीनाथ आपल्या मावशीची मनोभावे निष्ठेने सेवा करून आपले बिडीकाडीचे दुकानही चालवीत होते. त्यांचे दुकान एका लोखंडी पेटीत बसेल एवढेच होते. ती पेटी घेऊन ते दर शुक्रवारी बाजारात मांडत. १९१९ सालातील गोष्ट एका वृत्तपत्रातील जाहिरातीवरून पंढरीनाथाने एन. व्ही. पेडणेकर आणि कंपनी नळबाजार, तीनबत्तीनाका, मुंबई, नंबर ४ या आणि शेंडे आणि कंपनी मुंबई ४ या कंपन्याकडून त्यांच्या दुकानात विक्रीसाठी औषधे पोस्टाने बोलवू लागले. त्या औषधी मुद्दल किमतीत विकून घड्याळे नफ्यात राहत असत. कधी कधी सुटीच्या दिवशी ते आसलगाव व नांदूरा या गावातही आपली दुकान थाटत असत. सन १९२० सालच्या एप्रिल महिन्यातील ही घटना आहे. पंढरीनाथाने नांदुरा बाजारात आपले चिमुकले दुकान लावले. त्या दिवशी विक्री चांगली झाली. दहाबारा रूपये गल्ला जमला. दुसऱ्या दिवशी ते परत निघाले तेव्हा त्यांना सडकेवर एके ठिकाणी तीन पत्ते जुव्याचा खेळ चालू असल्याचा दिसला. गंमत पाहत ते थोडावेळ थांबले. पाहता पाहता मोहात पडले. त्यांनी डावावर पैसे लावले. डावावर डाव ते दहा रूपये हारले. हिरमुसले होऊन ते गावाकडे निघाले. त्यांच्या दुकानाची पुंजी जवळजवळ आटलीच होती. १९२० च्या मे मध्ये सुटीत पिंप्रीला आले व दुकान कायमचे बंद केले.

एप्रिल १९२० अखेर त्यांनी पिंपळगाव सोडले त्याच वर्षी तेथील इंग्रजीचे वर्ग तुटले. कुंभारे व पितळे नामक शिक्षकांचे पंढरीनाथांवर चांगले प्रेम होते. या उभय शिक्षकांनी शाळेतून व खाजगीतही पंढरीनाथांकडून चांगला अभ्यास करून घेतला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी इंग्रजी शिक्षण तिसरीपर्यंत घेतले. या उभय शिक्षकांबद्दलही त्यांनी कृतज्ञता नमूद करून ठेवलेली आहे. (डायरी)

## धार्मिक ग्रंथासोबतच वृत्तपत्रवाचनही करीत असत

ह.भ.प. रामजीबुवा दादुलगावकर यांच्या दिंडीत वारकरी संप्रदायाचा वारसा व रामजीबुवांची दिंडी यामुळे पंढरीनाथांवर वारकरी संप्रदायाचा प्रभाव पडत चालला त्यामुळे त्यांनी धार्मिक ग्रंथवाचनाकडे लक्ष वळविले. कथासार, नासिकेत हे ग्रंथ बालवयातच त्यांनी वाचले.

कार्तिकस्नान, माघस्नान, निर्जला एकादशी इत्यादी व्रते ते धर्मभोळेपणाने यथासांग करीत असत.

### कबीर मताचा प्रभाव

पिंपळगाव काळे इथे असताना ते नारायण इंगळे नामक गृहस्थांकडे दररोज भजनास जात असत. नारायण इंगळे हे विठ्ठलभक्त वारकरी होते. त्याठिकाणी त्यांच्याकडे येणाऱ्या वृत्तपत्रांचे वाचन व सामुदायिक श्रवण, भजन संपल्यानंतर होत असे. एकाने वाचायचे व इतरांनी ऐकायचे असा परिपाठ होता. छोटा पंढरीनाथ सातवा वर्ग शिकलेला चुणचुणीत व धीट होता. पंढरीनाथ त्यांच्याकडे भजनास जाऊ लागल्यापासून वृत्तपत्र वाचनाचे काम त्यांनी पंढरीनाथांकडे सोपविले. पंढरीनाथाने ते आनंदाने स्वीकारले. ते वाचनाचे काम करीत असतांना पंढरीनाथांना होमरूळ चळवळीची माहिती झाली. त्यातूनच राजकीय जागृतीचा स्त्रोत त्यांच्या हाती आला.

पिंपळगावला वारकरी भजनीमंडळांचा जसा वारसा होता तसाच तेथे कबीर पंथी विचारांचाही वारसा होता. त्या गावी दीपा पाटील नावाचे एक कबीरपंथीय गृहस्थ राहत असत. त्यांच्याकडे त्यावेळी कबीर पंथातील मोठमोठे साधूसंत संन्याशी येत असत. त्यांच्या मार्फत दीपा पाटलाकडे कबीराचा **बिजक ग्रंथ** पोहोचला होता. दीपा पाटलांकडे बिजक ग्रंथाचे वाचन व सामुदायिक श्रवण होत असे. पंढरीनाथांना एके दिवशी सदर बिजक ग्रंथवाचन, श्रवणाची संधी मिळाली. दीपा पाटील वारकरी संप्रदाय व ब्राह्मणी धर्मावर कडाडून टीका करीत असत. पंढरीनाथांना ते रूचत नसे. ते दीपा पाटलांना विरोध करीत असत. पंढरीनाथांची चिकित्सक वृत्ती व धाडस पाहून दीपा पाटील प्रभावित झाले. पंढरीनाथ एक वेगळाच तरूण आहे याची जाणीव त्यांना झाली. पंढरीनाथांचे वाचन, चिकित्सक वृत्ती, तर्कशुद्ध चर्चा व वादविवाद यातून त्यांचे वेगळेपण चटकन लक्षात येत असे. दीपा पाटलांनी कबीरपंथीय साधूसंतांशी पंढरीनाथांची ओळख करून दिली. एवढेच नव्हे तर, 'एक दिवस हा मुलगा आपल्या सोबत येईल.' असा विश्वासही व्यक्त केला.

पंढरीनाथ वारकरी असले तरी चिकित्सक होते. बिजक ग्रंथ श्रवण व वाचन केल्यानंतर तसेच कबीरपंथीय साधूंशी चर्चा, वादविवाद केल्यानंतर पंढरीनाथांचा कल कबीरपंथाकडे झुकू लागला. त्याच दरम्यान दयानंद सरस्वती लिखित 'सत्यार्थप्रकाश' व 'ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर' लेखक मोतीराम तुकाराम वानखेडे ही पुस्तके पंढरीनाथांच्या वाचनात आली. त्यांच्या जीवनातील एक परिवर्तनकारी घटना म्हणून नोंद झाली. ब्राह्मण व ब्राह्मणेतर हा सामाजिक भेद त्यांना समजला. ब्राह्मण अधिकारी व पुरोहित

ब्राह्मणेतरांना कसे छळतात व पिळतात हे त्यांच्या लक्षात आले. 'सत्यार्थप्रकाश'मधून सत्याचे त्यांना दर्शन घडले. त्यामुळे सामाजिक विषमतेतील दाहकता व अगतिकता अवगत झाली.

**मोहनी बुवा प्रकरण**

फुले, शाहू, आंबेडकर यांना ब्राह्मणी चटके बसले व ते पेटून उठले. तसाच प्रसंग पंढरीनाथ पाटलांच्या जीवनातही घडला. त्यामुळेच ते सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीचे अग्रदूत बनले. पुरोहित ब्राह्मणेतरांना कसे तुच्छ लेखतात याचा एक अनुभव त्यांनी स्वतःच 'आप बिती' नमूद करून ठेवला आहे. १९१९ सालातील ही घटना. उन्हाळ्याच्या सुटीत ते पिंप्री आढावला आले. त्यावेळी गावात पैठणचे मोहनीबुवा नामक एक पुरोहित आलेले होते. ते भागवत ग्रंथाचे पारायण करीत होते. तसे ते दरवर्षी उन्हाळ्यात येथे येऊन भागवताचे पारायण करीत असत. त्यातून बुवाला महिनाभर गावकऱ्यांकडून, शे पन्नास रूपये 'आरतीत' व बिदागीचे मिळत असत. हे पारायण पंढरीनाथांच्या मामाच्या घरी चाले. त्यासाठी पंढरीनाथांचे आईवडीलही येत असत. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही हे कार्य सुरू झाले. त्याचवेळी त्यांना गुरू करून घेण्यासाठी त्यांच्याकडून 'कानमंत्र' घ्यावा अशी शक्कल गावात निघाली. त्यासाठी प्रचार करणारे 'ज्याने गुरू नाही केला त्याचा जन्म वाया गेला'. असा धार्मिक धाक घालीत असत. किशोरवयात नाविन्य म्हणून व चिकित्सक म्हणूनही पंढरीनाथांनी कानमंत्र घ्यावा असे काहींनी सुचविले. इतरांच्या सोबत पंढरीनाथही नारळ व एक रूपया घेऊन मोहनी बुवांकडे गुरूमंत्र घेण्यासाठी गेले. अनेकांनी नारळ व एक रूपया देऊन मोहनीबुवांकडून कान फुंकून कानमंत्र घेऊन त्यांना गुरू करून घेतले. पंढरीनाथांची पाळी आली तेव्हा पंढरीनाथांनी नारळ व रूपया देऊन बुवांकडून कान फुंकून घेऊन खालीलप्रमाणे बुवाने कानमंत्र दिला.

'नमो भगवते वासुदेवाय नमः'

हा मंत्र सांगून मोहनीबुवा पंढरीनाथांना कानातच हळू म्हणाले, 'हा मंत्र रोज मनात एकदातरी जपावा. हा कानमंत्र दुसऱ्या कोणालाही सांगू नको. सांगशील तर देवाचा व गुरूचाही गुन्हेगार होशील.'

हे एकून पंढरीनाथ बुवाला म्हणाले, 'हा मंत्र चूक आहे.' तेव्हा बुवाने विस्मयाने विचारले की मंत्रात काय चूक आहे ? तेव्हा पंढरीनाथ म्हणाले, 'ओम् नमो भगवते

वासुदेवाय नम:' असा हा मंत्र आहे. तेव्हा बुवा म्हणाले तू कशावरून म्हणतोस ? तेव्हा पंढरीनाथ म्हणाले, 'मी पुस्तकात वाचले आहे. तेव्हा मी म्हणतो तेच बरोबर आहे.' मोहनीबुवांच्या लक्षात त्याची स्वत:ची लबाडी आली. पण आपले म्हणणेच खरे आहे व पंढरीनाथांचे म्हणणे बरोबर नाही हे पटवून देण्याचा त्यांचा अट्टाहास कायमच होता. ते थोडे हसले आणि म्हणाले, 'तू म्हणतोस ते बरोबर नाही. तो मंत्र जपण्याचा अधिकार फक्त ब्राह्मणांनाच आहे. शूद्राने एकादशाक्षरी मंत्रच जपला पाहिजे. म्हणूनच मी तुला जो मंत्र सांगितला तोच तुझ्यासाठी बरोबर आहे.

बुवांनी शूद्र म्हणताच पंढरीनाथांचा क्षत्रिय स्वाभिमान जागा झाला. ते अत्यंत संतापले. तारूण्याने मुसमुसलेला चेहरा रागाने लालबुंद झाला. डोळे आग ओकू लागले. अंगाचा तीळपापड झाला. आवेशाने ते उद्गारले, 'आम्ही शूद्र नाही तर क्षत्रिय आहोत क्षत्रिय.' 'हो.' 'नाही' सुरू होताच 'हा देवाब्राह्मणांचा अपमान आहे असे उर्मटपणे मुलाने वागू नये. तर्कट वाद करू नये.' पंढरीनाथ म्हणाले, 'मला द्वादशाक्षरी कान मंत्र द्याल तरच मी घेतो, नाहीतर नाही.' 'मी तुम्हाला शिष्य करून घेत नाही. गडबड करू नका. लोक ऐकतील. मुकाट घरी जा.' असे रागाने पण प्रेमाने मोहनीबुवा पंढरीनाथांना म्हणाले व पंढरीनाथ घरी निघून गेले.

फिरून दुसऱ्या वर्षी मे-जूनच्या उन्हाळ्याच्या सुटीत पंढरीनाथ पिंपळगावला गेले. यावेळी त्यांनी सत्यार्थप्रकाश व ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर ही पुस्तके पूर्ण वाचली. त्यावर मनन, चिंतन केले. यातून त्यांना मोहनीबुवासारख्या भटभिक्षुकांच्या ब्राह्मणी धर्माची व कपटाची कल्पना आली. तेव्हापासून ते कबीरपंथाकडे जास्त झुकले. बिजकग्रंथाचे श्रवणासाठी जास्तीत जास्त वेळ देऊ लागले. जाणीवपूर्वक चिकित्सक वृत्तीने ते या ग्रंथाचे श्रवण व मनन करू लागले. या ग्रंथ वाचनाने त्यांची विवेक शक्ती जागृत झाली.

इंगळेकडे ते भजनासाठी जात असत. भजनाच्या बैठकीनंतर तेथे जमलेले लोक पंढरीनाथांशी चर्चा करू लागले. मराठे, रजपूत हे क्षत्रिय की शूद्र ? असा वाद इंगळे व इतर भक्त गणात उपस्थित करू लागले. तेथे जमणाऱ्या भोळ्याभाबड्या भाविकांच्या तर्कशक्तीला चालना देऊ लागले.

दरसालप्रमाणे मोहनीबुवा पुन्हा पुढीलवर्षी म्हणजे १९२० साली मे महिन्यात पिंपळगावला आले. भागवत सुरू होण्यापूर्वी एक दिवस अगोदर मोहनीबुवांनी

पंढरीनाथांना बोलावून घेतले. ते पंढरीनाथांना म्हणाले 'तुझी मागील शंका फिटण्यासाठी तू यंदा पूर्ण भागवतग्रंथ ऐकावयास रोज नियमित ये' त्याप्रमाणे पंढरीनाथ मोहनीबुवा व भागवत ग्रंथ काय म्हणतो हे ऐकण्यसाठी जाऊ लागले.

परशुरामाची कथा नीट ऐकण्यास त्यांनी पंढरीनाथास सांगितले. परशुरामाने एकवीस वेळा पृथ्वी नि:क्षत्रिय केली. ही कथा ऐकून पंढरीनाथ चांगलेच संतापले. वादविवाद झाला. दोन्ही पक्ष जोरात भिडले. ऐकणारे सारे मराठे क्षत्रिय होते. पण ते पुराणिक व भागवत समर्थक होते. पंढरीनाथाने तर्कशुद्ध वाद करूनही ते एकटे पडले. नास्तिक म्हणून त्यांची संभावना करीत काहींनी तर त्यांना बाहेर जाण्यासही सुचविले. पंढरीनाथ बाहेर पडले. पण त्यांच्या मनात ब्राह्मण पुरोहित भिक्षुकांबद्दल व त्यांच्या ग्रंथाबद्दल चीड निर्माण झाली.

वरील प्रकारामुळे त्यांच्यातील क्षत्रिय जागृत होऊन स्वाभिमानाने इरेस पेटले. विवेकशक्ती विकसित झाली. त्यांचे धाडस वाढले. ते रोज कथा ऐकण्यास जाऊ लागले. वाद घालू लागले. मोहनीबुवांच्या ते चांगलेच पाठीस लागले. हळूहळू काही शिक्षक व गावातील काही शिक्षित लोक पंढरीनाथांना अनुकूल झाले. पंढरीनाथांचा विजय झाला. हे पाहून मोहनीबुवांनी पारायण आटोपते घेतले. त्यांनी हळूच गावातून काढता पाय घेतला तो कायमचाच.

### देशभक्तीची प्रेरणा व असहकार चळवळ

१९२१ साली १ जुलै रोजी पंढरीनाथांनी पुढील शिक्षणासाठी मलकापूरच्या अॅग्लो व्हर्नाक्युलर स्कूलमध्ये ८ व्या वर्गात नांव नोंदविले. वृत्तपत्र वाचनातून होमरूल चळवळीची माहिती, महात्मा गांधींच्या देशभक्ती व विचारांच्या व्याख्यानाचे वृत्तांत वाचले. या विचारांनी नवतरूण पंढरीनाथांच्या मनात काहूर माजले. असहकाराचा भाग म्हणून शाळा कॉलेज बंद करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना महातमा गांधींनी केले. त्याचा त्यांच्यावर अनुकूल परिणाम झाला. ब्राह्मण भिक्षुक असूनही आपल्याला शुद्र मानतात याची बोच त्यांच्या मनात होती. शिवाय शहरातले महागडे शिक्षण त्यांच्या आर्थिक परिस्थितीला झेपणारे नव्हते. या सर्व परिस्थितीचा परीणाम पंढरीनाथांच्या मनावर झालेला होता.

२६,२७,२८ डिसेंबर १९२० साली नागपूरला कॉंग्रेसचे अधिवेशन झाले.

त्यात घेतलेल्या निर्णयानुसार कोर्टावर बहिष्कार टाकण्यात आला. प्रत्येक गावात लवाद पंचायत सुरू करण्याचा, पुरस्कार करण्याचा वृत्तांत वृत्तपत्रात आला. त्याच दिवशी संध्याकाळी मलकापूर येथे महंमद अली व शौकत अली या दोन बंधूंची भाषणे झाली. ते दोघेही बंधू राष्ट्रीय चळवळीत कार्यरत होते. त्यांची देशभक्तीपर भाषणे ऐकण्यासाठी त्या दिवशी मलकापूर येथे प्रचंड जनसमुदाय जमला होता. यावेळी पंढरीनाथही उपस्थित होते. ते आता सतरा वर्षांचे तरूण होते. या भाषणाचा त्यांच्या तरूण मनावर चांगलाच प्रभाव पडला. अली बंधूंनी आपल्या भाषणात महत्त्वाच्या तीन गोष्टी लोकांच्या गळी उतरविल्या.

१) नागपूर काँग्रेसने मंजूर केलेल्या ठरावांचा महात्मा गांधींचा असहकारितेचा आदेश स्पष्ट शब्दात समजावून दिला.

२) ब्रिटीश सरकारच्या न्यायालयांवर व शाळा कॉलेजांवर बहिष्कार टाकणे का जरूरी आहे हे समजावून सांगितले.

३) राष्ट्रीय बाण्याचे नागरीक घडविण्यासाठी राष्ट्रीय शाळा स्थापन करण्याचा व गावपातळीवर न्यायसभा स्थापन करून आपल्या गावातील वाद गावातच मिटविण्याचा संदेश दिला.

हे भाषण ऐकून पंढरीनाथांनी दुसऱ्या दिवशी शाळेला रामराम ठोकल्याचे वर आलेच आहे.

पंढरीनाथांनी जांभूळधाब्याला सभा घेतली व न्याय पंचायतीची स्थापना केली. गावातील वाद गावातच मिटविण्याचे सुरू केले. एका चोरीचा निवाडा गावच्या न्यायपंचायतीने दिला. हे वृत्त पुण्याच्या टिळकांच्या केसरीत छापून आले. पोलीस जांभूळधाब्याला आले. त्यांनी न्यायपंचायत काम बंद करून पंढरीनाथांविरूद्ध पोलीस ठाण्यात तक्रारी नोंदविल्या. गावच्या एकीमुळे पंढरीनाथांना हात लावण्याची हिम्मत मात्र पोलिसांना झाली नाही. (१३४) समाज भूषण श्री. पंढरीनाथ सीताराम पाटील गौरव ग्रंथ ३० मे १९६८, संपादक - श्री. आ. अ. बाहेकर पृष्ठ क्र. २७ व २८

❋

# भाग - २

# सत्यशोधक चळवळ

पिंपळगाव काळे इथे असताना त्यांना कबीर पंथाची ओळख झाली. कबीरांची मते त्यांना भावली. त्या पंथाचा मूळ ग्रंथ बिजक त्यांनी वाचला होता. तेव्हापासून ते त्या पंथाकडे आकर्षित झाले. ते सुधारक मताचे बनले. सत्यशोधक मतांचा ते प्रचार करू लागले.

## सत्यशोधक विचाराचे पहिले भाषण

एप्रिल १९२१ रोजी जांभूळधाब्याच्या शाळेची परीक्षा सुरू होण्यापूर्वी थोडे दिवस अगोदर वरखेड तालुका मलकापूर येथील वजनदार गृहस्थ श्री. चंद्रभान पाटील हे पंढरीनाथांना मलकापूर मुक्कामी भेटले. त्यावेळी पंढरीनाथांनी वरखेडला येऊन सत्यशोधक विचारांना उजाळा देण्याचे भाषण करावे असा आग्रह केला. त्यानुसार पंढरीनाथ पाटील शिमग्याच्या दुसऱ्या दिवशी तेथे येण्याचे निश्चित झाले. १० वर्षापूर्वी म्हणजे १९१० साली या गावात नारोबाजी महाघट शास्त्री अनेक शास्त्रीपंडितांना वादात हरवून त्यांच्यावर मात केल्याचे लोकांना माहीत होते. नारोबा महाघट शास्त्री यांनी अनेक शास्त्री पंडितांबरोबर बरेच दिवस वादविवाद चालविला होता. त्यावेळी पंढरीनाथांचे वडील तेथे जात असत. त्याबाबत पिंप्रीचे पंढरीनाथांचे आजोबा श्री. अर्जून पाटील यांना ते सांगत असत. एके दिवशी पंढरीनाथांच्या वडिलांनी आजोबांना मोठ्या उत्साहाने सांगितले की, सत्यशोधक महाघट शास्त्रीने सभेत आज वाद घालून सर्व ब्राह्मण पंडितांना जिंकले. महाघट खरोखरच नावाप्रमाणे महा 'भट' होते. वाद संपला सभेतील पंचांनी सुद्धा लोकांसमक्ष महाघट शास्त्रींना अजिंक्यपत्र दिले. तसेच सर्वांनी सत्यशोधक मताप्रमाणे वागण्याचे कबूल केले. हे ऐकून आजोबा अर्जुन पाटलांना महाघट शास्त्रींचे मोठे कौतुक वाटले. ह्या गोष्टी पंढरीनाथांना चांगल्या आठवत होत्या. या गोष्टीला त्यावेळी १० वर्षे होऊन गेली होती. त्यामुळे लोकांना आता पुन्हा सत्यशोधक मताचे व्याख्यान ऐकण्याची उत्सुकता लागलेली होती. ही उत्सुकता पंढरीनाथांच्या व्याख्यानाने पूर्ण होणार होती. परंतु तेथील भटभिक्षुकांना व ब्राह्मण पटवाऱ्यांना पंढरीनाथांचे भाषण

तेथे व्हायला नको होते. त्यांनी गावचे कामगार पाटील श्री. चंद्रभान पाटील यांना गाठून पंढरीनाथांचे व्याख्यान होऊ नये म्हणून त्यांच्याच मार्फत पंढरीनाथांच्या वडिलांना, सीताराम पाटलांना, शिमग्याचे दिवशी वरखेडला बोलावून घेतले. सीताराम पाटील निरोपाप्रमाणे वरखेडला गेले. तेव्हा त्यांना असे सांगण्यात आले की, तुमच्या पंढरीनाथांच्या कानात माझा निरोप सांगा. 'पाटीलबा म्हणतात तू उद्या वरखेडला येऊ नकोस कारण गावातील सर्व लोक भटजींच्या पक्षाला आहेत. तो येथे व्याख्यानास आल्यास गावातील रजपूत लोक व ब्राह्मण सभेत येऊन दंगा करतील. त्यास मारहाण करतील.' पाटलांचे हे बोलणे ऐकून पंढरीनाथांचे वडील घाबरले. तसेच तेथील काही लोक भट व रजपूतांसह पंढरीनाथांचे वडिलांना पुन्हा प्रत्यक्ष भेटले. पंढरीनाथ तेथे व्याख्यानास आल्यास सभेत दंगल माजवून त्यास मारपीट होईल अशी धमकीही शेवटी दिली. पंढरीनाथांचे वडील पिंप्रीस परत आले व त्यांनी पंढरीनाथांना सर्व वृत्तांत सांगून वरखेडला व्याख्यानास न जाण्याचे निक्षून सांगितले.

भट भिक्षुकांच्या या कारवायांनी खचून न जाता धुळवडीच्या दिवशी वरखेडला जाऊन व्याख्यान ठोकण्याचा दृढ निश्चय केला. कोणतीही ऊर्जा बंद करण्याचा प्रयत्न केल्यास ती उसळी मारल्याशिवाय राहत नाही हा निसर्गनियम आहे. सत्यशोधक विचारांची ऊर्जा, तारूण्याकडे वाटचाल करणारे पुष्ट शरीरयष्टीचे व्यक्तीमत्व व मनानेही ते बलवान होते. दुसऱ्या दिवशी वडिलांना न सांगता पंढरीनाथ तडक वरखेडला गेले. तेथे नारोमहाघटांचे अनुयायी असलेले नारायण पाटील यांची भेट घेतली. आपला व्याख्यानाचा निश्चय त्यांना सांगितला. नारायण पाटलांनी पंढरीनाथांना आश्रय दिला. रात्री १५-२० खेड्यातील मिळून पाचसहाशे लोक सभेत जमले. 'ब्राह्मण जातीवर नाही' या विषयांवर त्यांनी दोन तास अभ्यासपूर्ण भाषण दिले. तर्कसंगत मुद्देसूद मांडणी व पुराव्यासह विवरण यामुळे त्यांच्या भाषणाने लोक प्रभावित झाले. कानात जीव आणून ऐकत लोक दोन तास बसलेले होते. याचवेळी विरोधकांचा भटकंपू काना कोपऱ्यात येऊन बसला होता. पंढरीनाथांच्या भाषणाचा परिणाम लोकांवर अनुकूल झाला. पंढरीनाथांना लोकांची सहानुभूती मिळाली. श्रोतृवर्गाचे उत्तम प्रबोधन होऊन त्यांच्यात जागृती व चैतन्य उत्पन्न झाले. विवेकशक्ती जागृत झाली. त्यामुळे आता दंगा केल्यास तो आपल्या अंगाशी येईल या भीतीने भटभिक्षुक गण आल्यापावली परत गेला. दोन तास त्यांनाही जनजागृतीचे कसब अनुभवता आले.

## पंढरीनाथांची पहिली सभा उधळली

१४ जानेवारी १९२१ तीळसंक्रांतीचा दिवस, तीळगूळ घेऊन गोड बोलण्याचा दिवस. सूर्य संक्रमणाचा भौगोलिकदृष्ट्या महत्वाचा दिवस. संक्रांत म्हणजे आपत्तीचा दिवस असे या दिवसाला विविध अर्थ व संदर्भ लाभलेले आहेत. पंढरीनाथांच्या दृष्टीने हा दिवस संक्रांत म्हणजे आपत्तीचा दिवस ठरला. नंतर म्हणजे संक्रमणाचा म्हणजे प्रगतीचाही ठरला. यापूर्वी १९२० च्या ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत पंढरीनाथांनी जांभूळधाबा, पिंप्री आढाव व परिसरातील पंधरा वीस गावातून सत्यशोधक मताची व्याख्याने दिली होती, ती आपल्या जवळच्या नात्यागोत्यांच्या माणसांना सोबत घेऊन. परंतु बुलडाणा जिल्ह्याच्या शेजारी जळगाव जिल्ह्याच्या बोदवड या गावी मोतीराम शामजी चौधरी यांच्या निमंत्रणावरून पंढरीनाथांना प्रथमच जिल्ह्याबाहेर भाषणास जाण्याची संधी मिळाली होती. एवढ्या मोठ्या गावात त्यांचा व्याख्यान देण्याचा पहिलाच प्रसंग होता. शिवाय त्या ठिकाणी ते एकटे गेले होते. पंढरीनाथांच्या कार्याची व व्याख्यानाची दवंडी संध्याकाळी झाली. सभेची वेळ रात्री ९ वाजता होती. सभेचा विषयही दवंडीद्वारे लोकांना कळला होता. त्यामुळे सभेला बरीच गर्दी जमली होती. त्यावेळी काँग्रेसची बहिष्कार चळवळ चांगली जोरात सुरू होती. तिला खिलाफत चळवळीची जोड होती. त्यामुळे असहकार चळवळ चांगलीच रंगात आली होती. काँग्रेसमधील तेथील भट भिक्षुकांनी खिलाफतवाल्या मुसलमान बंधुंना त्यांच्या घरी जाऊन त्यांना सभास्थानी आणले होते. पंढरीनाथांचे व्याख्यान होऊ नये असा घाट घातला होता. सदर व्याख्यान न होऊ देण्याबाबत खिराफतवाल्यांनी श्री. मोतीराम चौधरी यांना भीड घातली. विरोधी पक्षाचे चौधरीवर दडपण पडले. त्यामुळे ते लटपटले. त्यावेळी साडेआठ वाजले होते. लोक गोळा झाले होते. पण सभेचा अध्यक्ष कोणी होईना. शेवटी पंढरीनाथांनी सभेला सुरूवात केली. चौधरींनी तेथून काढता पाय घेतला. ते कोठेतरी जाऊन बसले. पंढरीनाथांच्या पाठीशी कोणीच नव्हते. पंढरीनाथांनी भाषणाला सुरूवात करताच लोकांनी गलका केला. धीर न सोडता पंढरीनाथांनी भाषण सुरू ठेवले. ते सुमारे अर्धा तास बोलले. तेवढ्यात विरोधकांनी हुल्लड केली. सभा उधळली गेली. नंतर तेथील खिलाफत चळवळीच्या कचेरीत पंढरीनाथांना नेण्यात आले. तेथे विरोधकांनी त्यांच्याशी वाद घातला. वादविवाद झाल्यावर रात्री तेथेच थांबून दुसऱ्या दिवशी जांभूळधाब्यास आले. वरखेड व बोदवड येथील दोन्ही प्रसंगी पंढरीनाथांना बोलावणारे भिक्षुक ब्राह्मणांना घाबरले असले तरी त्यांचे मत त्याप्रसंगी पंढरीनाथांच्या

बाजूने होते. त्यांच्या मनोदौर्बल्यामुळे त्यांच्या प्रेमळ मनाचा पंढरीनाथांना थोडाही उपयोग झाला नाही. तथापि त्या प्रसंगाने पंढरीनाथांना धैर्यशील बनविले. त्यामुळे त्यांचे अनंत उपकार झालेत असे पंढरीनाथांनी नमूद केले आहे.

बुद्धवासी लक्ष्मणराव श्रावण भटकर हे पंढरीनाथांचे परमस्नेही होते. १९२१ साली ते पंढरीनाथांकडे चिखलीस आले. (पुढे ते राज्यसभेचे व घटना समितीचे सदस्य झाले) ते महार जातीचे होते. त्याकाळात महारांना अस्पृश्य मानले जाई. परंतु पंढरीनाथांनी भेदाभेद पाळला नाही. लक्ष्मणराव भटकर हे गुरूवर्य विठ्ठल रामजी शिंदे यांच्या मुंबई येथील डिप्रेसड् क्लास मिशनमध्ये तयार झालेले व ब्रह्मो तसेच प्रार्थनासमाजाच्या तत्त्वाचे बाळकडू प्यालेले होते. त्यांना त्याच तत्त्वाचा, महात्मा फुलेंच्या सत्यशोधक समाजाशी इमान राखणारा व सामान्य सेवक पंढरीपाटलांच्या रूपाने मिळाला.

१९ नोव्हेंबर १९२१ रोजी शिवस्मारकाची कोनशिला युवराज प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या हस्ते पुणे येथे समारंभपूर्वक बसविली. त्याप्रसंगी पंढरीनाथ हजर होते. ते तेथे जेधे मेन्शनमध्ये थांबले होते. त्यावेळी सत्यशोधक चळवळीतील थोरमोठ्यांचा मुक्काम जेधे मेन्शन मध्येच होता. जेधे मेन्शन हे सत्यशोधक चळवळ व ब्राह्मणेतर चळवळीचे एक प्रमुख केन्द्र होते. तेथे पंढरीनाथांना या चळवळीतील नावाजलेल्या नेत्यांच्या भेटी झाल्या. कोनशिला समारंभातील भाषणे व नेत्यांच्या संपर्कामुळे ते प्रभावित झाले.

शाहू छत्रपती वेद मानणारे होते. (११४) (शाहू छत्रपती व लोकमान्य, य. दि. फडके, पृष्ठ क्र. २९६,२९७) वैदीक धर्मात जाती व भेदाभेद नाही हे त्यांना दयानंद सरस्वतींच्या ब्रह्मोसमाज व आर्यसमाज यातून कळलेले होते. वेदोक्त प्रकरणापासून ते ब्राह्मणांचा राग करू लागले. वेद व धर्मशास्त्रांचे त्यांचे प्रस्थापित अधिकारांना छेद देऊ लागले. ते सत्यशोधकांना जवळ करीत असत. त्यांना मदतही करीत असत. पण ते सत्यशोधक नव्हते. ते मुर्तीपूजक व वैदिक धर्म मानणारे होते. बहुजनांनी संस्कृत अध्ययन करून बहुजनांच्या मुलांना वेदविद्या अवगत व्हावी म्हणून त्यांनी क्षात्रजगत्‌गुरू पद निर्माण केले. वैदिक शाळा काढली. पंढरीनाथ पुण्याला सात दिवस होते. ते शाहु छत्रपतींनी काढलेल्या वैदिक शाळेतही सहा महिने विद्यार्थी म्हणून राहिले. त्या काळात त्यांना छत्रपती शाहूंना जवळून पाहता आले. त्यांच्या अवतीभोवती वावरता आले. त्यांच्या भव्य व्यक्तिमत्वाचा व मानवी मूल्यवर्धक व्यापक आणि वास्तव विचारांचा त्यांच्यावर चांगलाच प्रभाव पडला.

त्या सहा महिन्यात क्षात्रजगत्गुरू सदाशिवराव बेनाडीकर, हरीभाऊ लक्ष्मण चव्हाण, खंडेरावजी बागल (भाई माधवराव बागलांचे वडिल), बाबुराव यादव (पहाडी आवाजाचा वक्ता महान काळी तोफ) व दिनकरराव जवळकर यांच्याशी पंढरीनाथांचा परिचय झाला.

### विदर्भातील पहिली सत्यशोधक परिषद व आनंदस्वामींची भेट

पंढरीनाथ पुणे, सातारा, कोल्हापूर इत्यादी ठिकाणाहून तेथील विविध प्रसंग कार्यक्रम व थोरामोठ्यांच्या भेटी यामुळे सत्यशोधक समाजविचारांनी परिपुष्ट झालेले होते. त्यांनी १९ व्या वर्षात पदार्पण करून यौवनसुलभ सहजप्रवृत्तीनुसार ऐहिक सुखाकडे वळण्याऐवजी लोकांच्या कल्याणाचा मार्ग स्वीकारला. त्यांच्यात अदम्य उत्साह संचारला. निवडणुकीच्या निमित्ताने तयार झालेले वातावरण चळवळीस पोषक होते. म्हणून कार्यकर्त्यांचा उत्साह पाहून पंढरीनाथांनी सत्यशोधक विचारांच्या प्रचाराला सांघिक रूप देण्यासाठी बुलडाणा जिल्ह्याच्या मलकापूर तालुक्यातील वरखेड गावी १३ मे १९२३ रोजी विदर्भातील पहिली सत्यशोधक समाज परिषद घेतली. या परिषदेसाठी बुलडाणा जिल्ह्यातूनच नव्हे तर वऱ्हाडच्या दूरदूरच्या कानाकोपऱ्यातूनही काही निवडक प्रतिनिधी आलेले होते. याच परिषदेत आनंदस्वामी या तरूण तडफदार व धाडशी कार्यकर्त्यांशी पंढरीनाथांची भेट होऊन त्यांची मैत्री जमली. ती शेवटपर्यंत टिकली. ते या चळवळीत पंढरीनाथांबरोबर कार्यरत राहिले.

या परिषदेच्या अध्यक्षपदी श्रीमंत यमाजीराव आमले कोल्हापूर हे होते. व्यासपीठावर प्रमुख उपस्थितीत हरीभाऊ चव्हाण, केशवराव देशमुख, नारायणराव पाटील, तुळशीराम पाटील, गोविंदराव पाटील, चंद्रभान पाटील, तुकाराम पाटील, रावजी पाटील, राजे हेमसिंह भोसले, शामराव पाटील, गुलाबराव पाटील, नीळसिंह पाटील, श्रीपतराव पाटील, रामकृष्ण पाटील, तोताराम पाटील, दानाजी पाटील इत्यादी बडी मंडळी होती. या परिषदेसाठी पाच हजारावर लोकसमुदाय जमला होता. परिषदेचे स्वागताध्यक्ष श्री. रूपराव देशमुख यांनी स्वागताचे भाषण करण्याऐवजी तो अधिकार पंढरीनाथ सीताराम पाटील आंबोडेकर यांनी वापरला. त्यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

पंढरीनाथांनी केलेले स्वागतपर भाषण हे खरे पाहता या परिषदेतील बीज

भाषण होते. रूपरावांना स्वागताध्यक्ष करून ऐनवेळी हे भाषण करण्याची संधी पंढरीनाथांनाच मिळेल अशी तजवीज त्यांनी केली असावी असे वाटते. कारण या चळवळीबाबत स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये माहिती असली तरी धोरणात्मकदृष्टी व दिशा देण्याचे सामर्थ्य त्यांच्यात नव्हते. पंढरीनाथांमध्ये ती दृष्टी व सामर्थ्य होते. म्हणूनच त्यांनी ही व्यवस्था केली असावी असे आम्ही नमूद करण्याचे धाडस करतो. पंढरीनाथांनी आपल्या भाषणातून खालीलप्रमाणे मुद्दे मांडून सदर चळवळीची गरज व तिचे धोरण स्पष्ट केले. त्यातूनच त्यांचे द्रष्टेपण, योजकता, अभ्यासूवृत्ती, कळकळ व त्यांच्यातील वैचारीक प्रखरता दिसून येते. पंढरीनाथांनी ही परिषद रेल्वे लाईनपासून दूरच्या वरखेड्यासारख्या खेड्यात ठेवली. आपल्या जिव्हाळ्याच्या माणसांच्या गावात ठेवली कारण ही क्रांतिकारक समाजपरिवर्तन करणारी चळवळ संघटीत करतांना ब्राह्मणेतर शक्ती व वृत्ती ती कुऱ्हाडीच्या दांड्यांच्या गोताने घाव घालून चिरडून टाकण्याची शक्यता त्यांनी लक्षात घेतली असावी. हा निर्णयही त्यांची दूरदृष्टी प्रतीत करणाराच आहे. खेडेगावात बाहेरून येणाऱ्यांची गैरसोय सर्वतोपरी काळजी घेऊनही होऊ शकते. म्हणून त्यांनी आधीच माफी मागून दिलगिरी व्यक्त करून उपस्थितांची सहानुभूती व प्रेम मिळविले. कोठे, केव्हा, कसे व कोणत्या शब्दात बोलावे हे पंढरीनाथांना चांगलेच अवगत झालेले होते. ते म्हणाले, " ही भूमी आपल्या सर्वांच्या पदस्पर्शाने पावन झाली. आमच्या स्वागतात काही उणीवा आहेत याची जाण आम्हाला आहे. त्याकडे आपण सूज्ञ दुर्लक्ष करून 'विदुराच्या कण्या श्रीकृष्णाने जशा प्रेमाने खाल्ल्या' त्याप्रमाणे इथे लोकांचे प्रेम व उत्सुकता पाहून तुम्ही त्यांना पुनीत करा. अशी त्यांच्यातर्फे मी तुम्हास प्रेमपूर्वक नम्रतेची विनंती करतो." या विनम्र साखर पेरणीने सारा लोकसमूह पंढरीनाथांनी जणू आपल्या कवेत घेतला. सर्वांनी कानात सारा जीव आणून पंढरीनाथांचे भाषण ऐकू लागले.

पंढरीनाथ पुढे म्हणाले, "बंधुंनो, हे विसावे शतक क्रांतिकारक आहे. हे आजपर्यंतच्या अनुभवावरून सिद्ध होते. इतक्यातच जगावर थोडी नजर फेकून त्याचे निरीक्षण करीत बसा. म्हणजे आपणास दिसून येईल की, रशियातील झारशाही, युरोपातील महायुद्ध, इजिप्त आयर्लंडचे स्वातंत्र्य, हिंदूस्थानातील अनेक चळवळी, ब्राह्मणेतरांचा लढा या साऱ्या उलाढाली विसावे शतक क्रांतिप्रिय असल्याची जीती साक्ष देत आहे.

या अशा बदललेल्या परिस्थितीत तोंड न देता जर पाठ फिरविली असती तर पुढच्या काळात आपणास जगणे मोठ्या मुश्किलीचे झाले असते. त्यातूनही आज इतर देशाहून आपल्या देशाची परिस्थिती भिन्न स्वरूपात असल्यामुळे तिचा विचार करणे आपणास फार अगत्याचे असून त्याकरिताच आज आपण येथे जमलोही आहोत. आपले देशात पण विशेषत: महाराष्ट्रात एका विशिष्ट जातीने बहुजन समाजाच्या मानवी हक्कांची पायमल्ली करून त्यांना गुलाम बनवून सोडल्यामुळे स्वातंत्र्याभिमानी व सतुधर्मसंपन्न असा हा भाग्यशाली महाराष्ट्र आज परतंत्र व धर्मलंड बनला आहे. सुदैवाने ही हिंदभूमीची होत असलेली दैन्यावस्था अर्ध्या शतकापूर्वी महात्मा जोतीराव फुले यांच्या लक्षात आली (टाळ्या) व त्यांनी देशहितास्तव मानवी हक्क परिपालक सत्यशोधक समाजाचा झेंडा तारीख २४ सप्टेंबर १८७३ महाराष्ट्रीयांच्या पुण्याईने फडकविला. त्यामुळे महात्मा जोतीराव फुले यांचा महाराष्ट्रच नव्हे पण दुनियेतील माणुसकीस मुकलेले अखिल मानव प्राणी कायमचे ऋणी झालेले आहेत असे मला वाटते. (टाळ्या)

बंधुंनो, विद्याविहीन मनुष्यसंघ काळाचा बंदा गुलाम बनतो. नैसर्गिक नात्याने बंधु समजल्या जाणाऱ्या ब्राह्मण बंधुंनी आपणावर घाला घालून जरी आपणास पायपोस करून सोडले तरी त्या त्यांच्या पापाचा वाटा देणारा इश्वर हा बसलेला आहेच. पापाचा घडा फुटून अखेर सत्याचाच जय होणार (टाळ्या). हे आपण जाणताच. अखेर ब्राह्मणेतरांस कायद्याने बंदी असलेल्या पाजी बाजीरावाचे माजी ब्राह्मण भाई पेशवाई मृत झाल्यामुळे तिच्या मढ्याला धायमोकलून रडत होते, इतक्यात महात्मा फुले यांनी ब्राह्मणेतरांना विद्या शिकण्याचा अधिकार आहे असे बजावून ब्राह्मणेतरांना शिक्षण देणारी पहिलीच शाळा पुण्यास भर बुधवार पेठेत उघडली. त्यामुळे जागतिक वर्चस्वास सकवलेल्या ब्रह्ममार्तंडांनी आपले वर्चस्व अबाधित रहावे म्हणून सत्यशोधक समाजाचे नावाने अजूनही शिमगा चालविला आहे.

मनुष्यप्राण्याच्या ह्दयात गुप्तावस्थेत असलेली आत्मोन्नतीची आकांक्षा पूर्ण करण्याचा जरी सत्यशोधक चळवळीचा हेतू असला तरी, आमच्यातील अशिक्षितपणामुळे व परका मनुष्य काय म्हणतो व कोणत्या हेतूने म्हणतो, हे समजण्यास लागणाऱ्या दूरदृष्टीचा व चौकसबुद्धीचा आपले लोकात अभाव असल्यामुळे सत्यशोधक चळवळ म्हणजे ब्राह्मणांचा द्वेष करणारी अशी एक सभा होय. असा गैरसमज बहुजन समाज आपले गुलामगिरीतून मुक्त होऊ नये म्हणून अशी इच्छा बाळगणाऱ्या काही धूर्त

लोकांनी आपणांमध्ये पसरविला आहे. त्यामुळे सदरहू कार्यास बऱ्याच अडचणी येऊ लागल्या आहे. म्हणूनच आपले जिल्ह्यात समाजाचा प्रसार व्हावा तसा झाला नाही. सत्यशोधक समाजाची चळवळ प्रस्थापित झाल्यावर तिची पहिली झुळूक म्हणून कै. कृष्णराव भालेकर आपल्या या वऱ्हाडात आले. तद्नंतर समाजाचा उपदेश देत श्री. नारायण बाबाजी महाभट हे देऊळघाट, वरखेड, मेहकर वगैरे भागात फिरले होते. तेव्हा थोडीफार जागृती झाली होती. परंतु त्यांचे मागून कोणीच उपदेशक न मिळाल्यामुळे या चळवळीचा लोकांना चांगलाच विसर पडला होता. गेल्या ४ वर्षापासून पुन्हा या चळवळीने उचल खाऊन मलकापूर तालुक्यात थोडीबहुत गडबड उडाली. वर्षापूर्वी मुक्काम जांभूळधाबे तालुका मलकापूर येथे प्रस्थापित झालेल्या सत्यशोधक मंडळींनी ही परिषद भरविण्याचे काही गृहस्थांमागे टुमणे लावून जिल्ह्यातील गृहस्थांनी आश्रय देताच शेवटी या मंडळामार्फत तारीख २१ एप्रिल १९२३ रोजी मलकापूर मुक्कामी जिल्ह्यातील प्रमुख मंडळीस पाचारण करून सदर कार्यास चालना मिळावी म्हणून विनंती केल्यावरून त्या विनंतीच्या स्वीकारादाखल श्री. देशमुख हे या कामात पडल्यामुळे हे कार्य तडीस गेले. असो-

बंधुंनो आपल्या चळवळीचा जन्म ब्राह्मण लोकांचा द्वेष करण्याकरिता झालेला नसून प्रत्येक मनुष्याचे ईश्वरदत्त मानवी हक्कांचे संरक्षण करण्याकरिता झालेला आहे. असे असता चिपळूणकर, आगरकर, रानडे, गोखले, प्रभृती ब्राह्मण गृहस्थांपासून ती थेट कालच्या टिळकांपर्यंत ब्राह्मणांनी त्यांच्या जातीचे सुधारणेस्तव अनेक संस्था, पाठशाळा, बोर्डींगे, स्कॉलरशिपा, नोकरीत प्रत्येक खात्यात भरती करणे वगैरे कामे ब्राह्मणांनी केली असता एकही ब्राह्मणेतर त्यांचे आड आला नाही. मग ब्राह्मणेतर लोक आपली उन्नती करून घेण्याकरिता सत्यशोधक चळवळ व ब्राह्मणेतर चळवळ उभारीत असता त्याबद्दल ब्राह्मण लोकांना का वाईट वाटावे ? 'ब्राह्मणेतर हलके, शूद्र, त्यांचा दर्जा आम्हा ब्राह्मणांच्या बरोबरीचा होणे शक्य नाही' अशी ब्राह्मणांची घातक कल्पना आहे. त्यामुळे साहजिकच ब्राह्मण लोक ब्राह्मणेतरांचा अपमान व द्वेष करीत असतात. हे स्पष्ट होते. त्यामुळेच लोक चिडून ब्राह्मणांच्या स्वार्थी धोरणांवर ब्र काढतात न काढतात तोच सत्यशोधक लोक ब्राह्मणांचा द्वेष करतात अशा चोरांच्या उलट्या बोंबा भटच नव्हे तर काही भटाळलेलेही करतात.

बंधुंनो, समंजस ब्राह्मणसुद्धा ब्राह्मणेतरांच्या न्याय हक्काची कशी पायमल्ली

करतात याची कल्पना प्रा. लट्ठे यांच्या जोशी बिलासंबंधाने न्यायशास्त्री, नामदार खापर्डे वगैरे फुकट उदरभरू भटजी कसे आड आले याची कल्पना करा. म्हणजे ब्राह्मण वर्गातील लोक सुधारकांचे नावाखाली दुर्धारक पातक करतात ! व म्हणून ब्राह्मणेतरांचा भरणा कौन्सिल, लोकल बोर्ड व सरकारी नोकरीत होणे अत्यंत जरूरीचे आहे. म्हणजेच आपली उन्नती झाल्यासारखी होईल.

बंधुंनो, आतापर्यंत सांगितलेल्या भावी सुखाच्या लालसा आपणास शिक्षणापासून साध्य होणे शक्य असल्यामुळे शिक्षणाचा प्रसार शक्य त्या जास्त प्रमाणात होण्याकरिता दयाळू इंग्रज सरकारास आपण प्राथमिक मोफत सक्तीचे शिक्षण मागितले पाहिजे. त्याबरोबरच उच्च व माध्यमिक शिक्षणाचीही आपणास अत्यंत जरूरी आहे. या शिक्षणाचे बाबत तर आपला बुलडाणा जिल्हा फारच मागे आहे. याची कारणे आपले जिल्ह्यात शिक्षण संस्थांचा अभाव, आपणा लोकातील आपसातील दुरी व अविश्वास हीच असावीत असे माझे मत आहे.

याशिवाय काही अर्धशहाणे लोक मुद्दाम समाजावर शिंतोडे उडविण्याकरिता म्हणतात की, सत्यशोधक समाजात आत्म्याचे अंतिम साध्य नसल्यामुळे त्यात ती उणीव आहे. परंतु पुरा तपास करणारास कळून येईल की एकनाथाने आपल्या पित्याचे श्राद्धाचे वेळी महारांना जेऊ घातल्यामुळे जर त्यांच्या ब्राह्मणत्वाचे सत्यत्व सर्वांना पटते तर महात्मा फुल्यांनी अस्पृश्यांशी जेवण खाणच काय परंतु त्याहीपलीकडे मजल जी मनुष्यत्वास पोचविणारी विद्या शिकण्याची पहिलीच शाळा काढून त्यांना मानवी हक्काची जाणीव करून दिली, असेच सत्यशोधक समाजाचे धोरण असताना मग सदरहू समाजात अंतिम साध्य जे मोक्ष ते कसे ?

ब्राह्मणेतरांना डोकेच नाही असेही काही स्वार्थी भासवितात. परंतु आपले ब्राह्मणेतरांचेच डोक्यातून वेदप्रिय गायत्रीमंत्र, भगवद्‌गीता, श्री संत मुगुटमणी तुकारामांची गाथा ब्राह्मणेतर ऋषिस्त्रियांनी रचलेली वेदातील मंडळे, व्यास कोळ्याने केलेली पुराणे वगैरे ग्रंथ बिनडोक्यानेच तयार करण्यात आले आहेत की काय ?

पहिला विधवा विवाह, 'अस्पृश्यांची पहिली शाळा, बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना, स्त्री शिक्षणाची पहिली शाळा वगैरे स्तुत्य कामगिरी महात्मा जोतीराव फुले यांनी केली. प्राथमिक शिक्षण मोफत असावे अशी पहिल्याने चळवळ समाजसेवक

कै. भालेकरांनी १८९५ मध्ये काढली. तसेच मद्यपान बंदी वगैरे सर्व सुधारणा ब्राह्मणेतर मंडळी पूर्वीपासून करत असतानाही लोकांचा असा गैरसमज होतो याचे कारण माझ्या मते हेच असावे की, ब्राह्मणेतरांनी केलेल्या चांगुलपणाच्या गोष्टी नेहमी झाकून टाकण्यात येतात. (टाळ्या)

असो, आतापर्यंत आपले पुढे केलेले भाषणावरून आपली स्थिती नाजूक व गुंतागुंतीची झाली आहे हे तुमच्या लक्षात आलेच असेल. हो, तरी बंधुंनो धीर धरा व कंबर बांधून आपल्या उन्नतीप्रीत्यर्थ पुढे सरा."

या परिषदेत दोन दिवस भाषणे, चर्चा होऊन एकूण नऊ ठराव पारित करण्यात आले. रात्री बजाबा गायकवाड यांचा जलसा झाला. सातहजार लोकांनी त्यांचा लाभ घेतला. त्याचवेळी तिकडे विषय नियामक कमिटी निवडण्यात आली. तीत खालील व्यक्तींचा समावेश आहे.

१. रावसाहेब शहाजी पाटील २. रा. शामराव देशमुख ३. रा. पंढरी पाटील
४. रा. नारायणराव पाटील ५. रा. भिकनराव किरोचे ६. रा. गोविंदराव पाटील
७. रा. आत्माराम पाटील ८. रा. गुलाबराव पाटील ९. रा. नीळसिंह पाटील
१०. रा. श्रीपतराव पाटील ११. रा. रूपचंद पाटील १२. रा. तुळशीराम पाटील
१३. श्री. आनंदस्वामी

या परिषदेत पारित झालेले ९ ठराव असे - ठराव क्र. १. राजनिष्ठा २. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याबद्दल सरकारास विनंती. ३. जोशी बील फेटाळल्याबद्दल ना. खापर्डे यांचा निषेध. ४. कुळकर्णी वतन खालसा करून तलाठीपद्धत सुरू करणे. ५. जांभोरे येथील गुरूकुलास मदत करण्याबद्दल लोकांस विनंती करणे. ६. सरकारी कोर्टात ब्राह्मणेतरास जास्त जागा देणे. ७. राजर्षी शाहू महाराज निवर्तल्याबद्दल दुःख प्रदर्शन ८. अक्कलकोटचे महाराज निवर्तल्याबद्दल दुःख प्रदर्शन ९. हे सर्व ठराव अध्यक्षांनी ठिकठिकाणी पाठविणे. (३) (सत्यप्रकाश, तासगाव जि. सातारा - १ जुलै १९२३, पृष्ठ क्र. २ व ३)

## मेहकर तालुका सत्यशोधक परिषद - सावत्रा

बुलडाणा जिल्ह्यातील पहिली सत्यशोधक परिषद वरखेड येथे झाल्यानंतर पंढरीनाथांनी सदर चळवळीचा प्रचार प्रसार करण्यासाठी परिषदा भरविण्याचा झपाटा सुरू केला. खामगाव पाठोपाठ मेहकर सत्यशोधक परिषदेत मुक्काम सावत्रा तालुका मेहकर येथे श्री. नरसिंगराव देशमुख हिंगणेकर यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहपूर्ण

वातावरणात पार पडली. या परिषदेत वेदशास्त्रसंपन्न आनंदस्वामी, पंढरीनाथ पाटील, सखाराम निकस, सावत्रा यांची मार्गदर्शक भाषणे झाली. येथून पुढे भटांशी संबंध ठेवायचा नाही व त्यांना धार्मिक विधीसाठी बोलवायचे नाही. असे सर्वांनी कबूल केले. त्यानंतर १. आपले धर्मविधी स्वत: व स्वजातीय पुरोहितांकडून करणे. २. हिंदूधर्मपरिषदेतील ठरावांचा व पदभ्रष्ट शंकराचार्य कुर्तकोटी यांच्या निंद्यवर्तनाचा तीव्र निषेध करण्यात आला. ३. लोकल बोर्ड, कायदेकौन्सिल, म्युनिसीपालिट्या इत्यादी लोकोपयोगी संस्थांमधून आपले लोक निवडून देणे. ४. तलाठी पद्धत सुरू करणे. इत्यादी ठराव पास झाले.

**जळगाव तालुका सत्यशोधक परिषद – सावळा**

पूर्वपरिषदेनुसार पहिली बैठक बुलडाणा जिल्ह्यातील जळगाव तालुक्यातील सावळा येथे दिनांक १७ व १८ डिसेंबर १९२३ या दोन दिवशी हिंगणे कारेगावचे श्री. नरसिंगराव शिवाजी देशमुख यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. परिषद प्रतिनिधी व इतर लोक तीन हजारांवर उपस्थित होते. या परिषदेत आरंभी श्री. रामकृष्ण पाटील मारोडकर यांनी भाषण केले. त्यानंतर सभाध्यक्ष श्री. नरसिंगराव देशमुख यांचे अध्यक्षीय भाषण एक तास होऊन त्यानंतर वेदशास्त्रसंपन्न आनंदस्वामी, पंढरीनाथ सीताराम पाटील, केशवराव देशमुख, कृष्णराव पाटील, सेठ मुरलीधर मारवाडी, गोविंदराव रूपचंद पाटील वगैरे वक्त्यांची भाषणे झाली. सभेत पुढीलप्रमाणे ठराव पास झाले. १. आपले धर्मविधी स्वत: करणे. २. लोकल बोर्ड निवडणूकीत ब्राह्मणेतरासच मत देणे. ३. वऱ्हाडातील शेतसारा दर ४० टक्क्यांनी वाढला तो कमी करणे. ४. कुर्तकोटींच्या निंद्यवर्तनाचा निषेध. ५. तलाठीपद्धत सुरू करणे. ६. खामगावला कापूसगाड्या शिवाजी अडतीतच देणे. तसेच ७. सरकारने कापसाचा भाव जाहीर करणे. असे उपयुक्त ठराव झाले.

रात्री बजाबा भिकाजी गायकवाड विंचूरकर यांचा जलसा झाला. जलशास श्री. किसनराव पाटील यांनी एक सुवर्णपदक, बुलडाणा जिल्हा सत्यशोधक समाजातर्फे एक भारी किंमतीची जरीची टोपी आणि सेठ मुरलीधर मारवाडी यांचेकडून रोख रूपये २१ मिळाले. सत्यशोधक फंडासाठी ९० रूपये रोख व २५० रूपयांचे आकडे जाहीर झाले.

या परिषद बैठकीत शेतकरीहिताचे निर्णय म्हणजे सारा वाढ न करणे. कापसाचे भाव सरकारने आगाऊ जाहीर करणे आणि श्री शिवाजी अडतेत कापूसगाड्या देणे. हे नवीन निर्णय आतापर्यंतच्या परिषदेपेक्षा जास्तीचे झाले.

## शंकराचार्यांची फजिती

बुलडाणा जिल्ह्यात आनंदस्वामी व पंढरीनाथ पाटील यांनी सत्यशोधकी जलसे व भाषणे यांच्या माध्यमातून गावपातळीपर्यंत लोकजागृतीचे कार्य केले. त्यामुळे अंधश्रद्धा निर्मूलन होऊन लोक जाणीवपूर्वक डोळसपणे आपले धार्मिक विधी आपणच करू लागले. सत्य हा धर्म हे लोकांना कळले. म्हणून त्यांनी भटभिक्षुकांना धार्मिक पूजापाठ व विधीसाठी बोलावणे बंद केले. म्हणून लोकांना पुन्हा अंधश्रद्ध करण्यासाठी देवधर्माचे व बुवाबाजीचे स्तोम माजविण्यासाठी शाहू छत्रपतींनी निष्कासित केलेले शंकराचार्य डॉ. लिंगेश महाभार्गव कुर्तकोटी हे १९२३ च्या अखेरीस बुलडाणा जिल्ह्यातील ब्राह्मणांनी हिंदूधर्मपरिषदेसाठी आणले. डिसेंबर १९२३ मध्ये देऊळगाव राजा येथे धर्मपरिषद झाली. ही धर्मपरिषद पंढरीनाथांनी उधळून लावली व त्याठिकाणी सत्यशोधकी व्याख्यान देऊन लोकजागृती केली. या पाठोपाठ पंढरीनाथांनी मोळामोळी, अंढेरा, हिंगणे कारेगाव, सावत्रा, इसरूळ, मंडपगाव, ढोड्रा, किन्ही, शेंदुर्जन वगैरे अनेक गावी सभा घेऊन ब्राह्मणेतरांनी देऊळगाव राजा येथील कुर्तकोटींनी केलेल्या बालिशपणाचा निषेध केला. बुलडाणा जिल्ह्यातून कुर्तकोटी व त्यांचे बुलडाणा जिल्ह्यातील समर्थक ब्राह्मण, अकोला जिल्ह्यातील लोणी येथे गेले. देऊळगावराजाप्रमाणेच कुर्तकोटी लोणी यात्रेत नंगानाच करणार अशा आशयाच्या बातम्या केसरी व महाराष्ट्र या ब्राह्मणी वृत्तपत्रात प्रकाशित झाल्या. या बातम्या वाचून बुलडाणा जिल्ह्यातील सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीतील प्रमुख वेदशास्त्रसंपन्न आनंदस्वामी, पंढरीनाथ पाटील व लक्ष्मणराव श्रावणजी भटकर एम.एल.ए. चिखली हे शेकडो कार्यकर्ते व समर्थकासह लोणीयात्रेत दाखल झाले. तो वार बुधवार होता. प्रथम थिएटरात शिरपूरकरांचा सत्यशोधक जलसा व गुरूवारी ब्राह्मणेतरांचे अग्रगण्य पुढरी श्रीमंत राजे त्र्यंबकराव उर्फ आबासाहेब जाधव यांच्या अध्यक्षतेखाली शिरपूरकरांच्या थिएटरात ब्राह्मणतेरांची जंगी जाहीर सभा झाली. लोकसमुदाय दोन हजारावर जमला होता. सभेत आनंदस्वामी, पंढरीनाथांची भाषणे झाली व रात्री विंचूरकरांचा जलसा झाला. त्यानंतर याच ठिकाणी बुलडाणा, अकोला जिल्ह्यातील महारांची जंगी जाहीर सभा होऊन पळपुट्या कुर्तकोटींचा त्यांनी जाहीर निषेध केला.

शुक्रवारी सकाळी हिंदूधर्म सभेच्या वतीने पदभ्रष्ट कुर्तकोटींचे व्याख्यान ठरले होते. तेथे त्यांची योग्य हजेरी घेण्याकरिता सत्यवीर आनंदस्वामी, पंढरीनाथ पाटील व लक्ष्मणराव भटकर हे आपल्याबरोबर सुमारे ४-५ हजार ब्राह्मणेतर घेऊन दाखल झाले.

सभेत दोनतीनशे भिक्षुक गोळा झालेले होते. त्यांनी जेव्हा प्रचंड समुदाय अवलोकन केला तेव्हा त्यांची पाचावर धारण बसली. मोठमोठे वाचस्पती शास्त्री पण त्यांची बोबडी वळू लागली. त्यांच्यातील बापट शास्त्री हे सत्यशोधक समाजावर मनसोक्त भुंकणारे पण ते देखील आपली पगडी फिरवून 'ब्राह्मणत्व हे काही जातीवर अवलंबून नाही' असे उघड प्रतिपादन करू लागले. भटकर यांनी कुर्तकोटी अस्पृश्योद्धाराच्या कामी कशी कुचराई करतात याचे मुद्देसूद विवेचन केले. आणि हिंदूधर्म सभेचा फोलपणा उजेडात आणला. रा. पंढरीनाथ सीताराम पाटील यांच्या तोफखान्याच्या माऱ्याने कुर्तकोटींची घाबरगुंडी उडाली. त्यांनी कुर्तकोटीला असा सवाल केला की, आपण आपणास जगत्‌गुरू म्हणवून घेत आहात, तर आपण कोणत्या पीठावर (ज्वारीच्या, बाजरीच्या की गव्हाच्या) व या पीठामार्फत आपण जगाच्या कोणत्या कोपऱ्यावर संचार केला ? आपण जगाच्या कल्याणाकरिता काय केले ? काय करीत आहात ? आणि काय करणार आहात ? ते सांगा नंतर आनंदस्वामी यांनी जगत्‌गुरूची अनावश्यकता इतकी प्रभावी उत्तम प्रकारे सिद्ध करून दाखविली की, शास्त्री पुराणिकही माना डोलवू लागले. ब्राह्मणेतरांना सभेत बोलू द्यायचे नाही आणि जबरी करू लागल्यास त्यांचा समाचार घेण्यास ब्राह्मण आपल्या सोबत लाठ्याकाठ्या घेऊन आले होते. पण हा प्रतिपक्षाचा प्रचंड समुदाय पाहून आपण काही गडबड केल्यास आपली पाठ चांगली लाल होईल ही त्यांना मोठी दहशत होती. खुद्द कुर्तकोटीही इतके घाबरले की येथून आपण सुरक्षित गेलो म्हणजे मिळविली. म्हणून त्यांनी आनंदस्वामींच्या वक्तृत्वाची मुक्त कंठाने स्तुती करून आपला पाय मुकाट्याने काढून घेतला (४) ( दीनमित्र दि. ७ जानेवारी १९२४)

## खामगाव तालुका सत्यशोधक परिषद-हिंगणे कारेगाव

दिनांक १७ व १८ नोव्हेंबर १९२४ रोजी हिंगणे कारेगाव तालुका खामगाव येथे श्री. श्रीपतराव उर्फ गणपतराव पाटील मच्छिंद्रखेडकर यांचे अध्यक्षतेखाली बैठक दोन दिवस होऊन तीत खामगाव तालुका स्तरीय सत्यशोधक परिषद घेण्याचा निर्णय झाला. त्यानुसार सदर परिषद खामगाव येथे झाली. त्यासाठी पाच हजार मंडळी बसतील एवढा भव्य मंडप उभारण्यात आला होता. या परिषदेसाठी वऱ्हाड, मध्यप्रांत व खान्देश येथूनही प्रतिनिधी आले. प्रतिनिधी व श्रोते मिळून पाच हजारावर लोक समुदाय जमला होता. या परिषदेचे अध्यक्ष श्री. श्रीपतराव उर्फ गणपतराव पाटील हे होते. तर स्वागताध्यक्ष श्री. रा. नरसिंगराव देशमुख हे होते. प्रथम स्वागताध्यक्ष श्री. देशमुख यांचे स्वागतपर

भाषण झाले. तद्नंतर परिषद अध्यक्ष श्री. श्रीपतराव पाटील यांचे एक तासभर समाजसुधारक प्रेरणादायी असे मोठे जोरदार भाषण झाले. त्यानंतर वेदशास्त्रसंपन्न आनंदस्वामी, बोबडे वकील, पंढरीनाथ पाटील, गुलाबराव पाटील, गणपतराव पाटील, कृष्णराव पाटील, केशवराव, देशमुख वकील वक्त्यांची परिणामकारक भाषणे झाली. या परिषदेत सर्वांनी धर्मविधी स्वहस्ते करणे, देऊळगाव राजा येथील दंग्याच्या वेळी पळपुटे नामधारी शंकराचार्य डॉ. कुत्राटोपी (कुर्तकोटी) यांनी जे बालिश कृत्य केले त्याचा तीव्र निषेध, तलाठीपद्धत सुरू करणे इत्यादी ठराव पास झाले. रात्री बजाबा गायकवाड, विंचूरकर यांचा जलसा झाला. सहा हजारावर लोक उपस्थित होते. यावेळी रा. गायकवाड यांस श्री. नरसिंगराव देशमुख यांनी आणि ब्राह्मणेतर संघातर्फे वेदशास्त्र संपन्न आनंदस्वामी यांनी एकएक तोळ्याची दोन सुवर्णपदके देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. (६) दीनमित्र, ३१ डिसेंबर १९२४, पृष्ट क्र. ७

बुलडाणा जिल्ह्यातच नव्हे तर वऱ्हाडात सत्यशोधक मताचा सुपरिणाम पंढरीनाथांच्या झंझावाती प्रचारामुळे झाला. त्यांना विंचूरकर, पार्डीकर तसेच राजाराम पाटील यांचे जलसे व आनंदस्वामींची परखड, सुधारक, मधुरवाणी यांची साथ मिळाली. त्यामुळेच अंतुरा (उमरावती), येरळी ता. मोर्शी जिल्हा उमरावती, बेलोरा उमरावती, बिरसिंगपूर व खैरव जिल्हा बुलडाणा इत्यादी गावात पुरोहित भटाशिवाय स्वत:च धर्मविधी, अंत्यविधी, पूजापाठ लोक करू लागले.

बुलडाणा जिल्ह्यात किन्होळा, केळवद, सावत्रा ता. मेहकर येथे सभा झाल्या. आनंदस्वामी व पंढरीनाथ पाटील उत्तर-पश्चिम महाराष्ट्राचा दौरा करण्यापूर्वी त्यांनी संपूर्ण वऱ्हाडामध्ये लोकजागृती दौरा केला. उमरावती सत्यशोधक अधिवेशनासाठी वातावरणनिर्मिती करीत गावोगाव फिरले. दिनांक ४, ५ जानेवारी १९२५ रोजी श्री. श्रीपतराव मच्छिंद्रखेडकर यांचे अध्यक्षतेखाली आकोट तालुका सत्यशोधक परिषद भरली होती. सभेस तात्यासाहेब मानवदेकर, केशवराव वेल्हाळकर, वेदशास्त्रसंपन्न आनंदस्वामी वगैरेंची भाषणे झाली. त्यानंतर सभेत १. धर्मविधी स्वत: करणे. २. सक्तीचे शिक्षण ३. तलाठी पद्धत सुरू करणे. ४. सारा वाढीबद्दल ५. अस्पृश्योद्धार ६. पूर्णानदीचा पूल ७. लोकल बोर्डात ब्राह्मणेतरास मत देणे. ८. देवस्थाने उत्पन्नाबद्दल. याप्रमाणे ठराव पास झाले. या परिषदेमुळे अकोट तालुका खडबडून जागा झाला. त्याचे श्रेय शामराव किसनराव यांना देणे जरूरी आहे. (८) (सत्यप्रकाश, तासगाव, जि. सातारा ता १-२-१९२५)

या सभांमधून पुणे म्युनिसीपालिटीने महत्मा फुले यांचा पुतळा उभारण्यास विरोध केल्याबद्दल निषेध करण्यात आला तसेच बापूले या कुळनिंदकाबद्दलही खेद प्रकट करण्यात आला.

## अखिल भारतीय सत्यशोधक अधिवेशन उमरावती

१९२५ साली अॅडव्होकेट केशवराव बागडे यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधक समाजाचे अखिल भारतीय अधिवेशन उमरावती येथे भरले. देऊळगावराजा, लोणी, याठिकाणी कुर्तकोटींची झालेली फजिती व पंढरीनाथ व सहकाऱ्यांचे धाडस, त्यांच्यामार्फत होणारा सत्यशोधक मताचा प्रसार व्यापक प्रमाणात झाला. त्याला विदर्भात संघटित रूप प्राप्त होऊन हे अखिल भारतीय पातळीवरील अधिवेशन संपन्न झाले. त्यासोबतच त्याचठिकाणी पानगळचे महाराज श्री राम निमगार यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय ब्राह्मणेतर कॉंग्रेस आणि छत्रपती श्री. राजाराम महाराज यांच्या अध्यक्षतेखाली सामाजिक परिषदही पार पडली. या अधिवेशनासाठी संपूर्ण भारतातून वीस हजारावर प्रतिनिधी व दहा लाख लोकांनीतरी हा प्रचंड सोहळा पाहिला असेल. या क्रांतिकारक सोहळ्यानंतर विदर्भातील रावबहादूर के. श्रीनिवास नायडू, पंढरीनाथ पाटील, आनंदस्वामी, नायगावचे गुलाबराव सिसोदे, नानासाहेब अमृतकर, शामराव यादवराव गुंड, काशीराव बापूसाहेब देशमुख, यशवंतराव देशमुख, मोतीरामजी वानखेडे, नारायण बाळाजी पाटील इत्यादी हजारो लोकांनी तनमनधनाने स्वत:चे रक्त आटवून विदर्भाचा क्रांतिकारक इतिहास घडविला. (१३७)

(विदर्भातील सत्यशोक चळवळीचे साहित्य - डॉ. अशोक चोपडे, पान ३३४)

## इतर जलशांपेक्षा सरस जलसा

या अधिवेशनासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून अनेक सत्यशोधकी जलसे आलेले होते. अशाच जलशांपैकी पाडळी (सातारा) येथील एक जोत्याजीराव फाळकेंचा जलसा १९२७ साली चिखली येथे पंढरीनाथ पाटलांनी पाहिला तो जलसा इतर जलशांपेक्षा श्रेष्ठ दर्जाचा परिणामकारक असल्याने त्यांनी नमूद केले. (१३१)

(जगा वेगळा सत्यशोधक, गुरूवर्य केशवराव विचारे, लेखक - जयवंत गुजर प्रथमा आवृत्ती, नोव्हेंबर २००४, प्रकाशक - विचारे फार्मस् प्रा. लि. इंदगाव (बदलापूर) जिल्हा ठाणे, पृष्ठ क्र. १२८,१२९)

त्यानंतर नगर येथे गणेशोत्सवाच्या एका कार्यक्रमात कोटिलिंगार्चन यज्ञ डॉ. कुर्तकोटी यांच्या हस्ते समाप्त झाला त्याचदिवशी म्हणजे दिनांक २ सप्टेंबर १९२७ रोजी पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार आनंदस्वामी, पंढरीनाथ पाटील व लक्ष्मणराव भटकर

महाराष्ट्र दौऱ्यावर असताना योगायोगाने त्यादिवशी तेथे आले. महात्मा फुले जन्मशताब्दी वर्षानिमित्त जनजागृतीची व्याख्याने देत त्याठिकाणी आले. त्यावेळी तेथे नाशिक, वाई, पुणे इत्यादी ठिकाणचे पंडितशास्त्री पुराणिक या कोटीलिंगार्चन यज्ञ समाप्तीसाठी एकत्र जमले होते. २५ हजारावर स्त्री-पुरूष श्रद्धाळू भक्तगणांचा मेळावा तेथे जमला होता. विश्राम बाग हायस्कूलचे मैदान गजबजून गेले होते यावेळी उपस्थित असलेल्या वि. द. घाटे यांचेसोबत पंढरीनाथ पाटील मुद्दाम या यज्ञसांगताप्रसंगी तेथे गेले. तेथे त्यांची वैचारिक खडाजंगी झाली. (१२१)

(समाज भूषण पंढरीनाथ पाटील यांचे जीवन दर्शन लेखक - हि. ए. चव्हाण १० मे १९६८ पृष्ट क्र. २१ व २२)

कुर्तकोटी हिंदूंच्या एकीचे महत्त्व वर्णन करून ते म्हणाले, 'वाळूचे कण संख्येने जास्त असतात. पण कणांनी संघटित असलेले एक लहानशे दगडी चाक घाणीत घातल्यावर ते सर्व कणांचे पीठ करते. पण तेच वाळूचे कण एकवटून त्याचा एकच पत्थर बनविला तर घाणीचे चाक त्या पत्थराचा नाश करू शकत नाही. हिंदू समाजाच्या अनेक जाती वाळूच्या कणांप्रमाणे विस्कळित झाल्यामुळे मुसलमान अगर ख्रिस्ती समाजाचे संघटित दगड आमचा नाश करतात. म्हणून आपण वाळूच्या कणाच्या पत्थराप्रमाणे एक झालो तर आपल्या धर्माकडे परधर्मीय लोक वाकड्या डोळ्यांनीही पाहणार नाही वगैरे वगैरे.' याप्रमाणे त्यांचे भाषण झाल्यावर तेथे उपस्थित असलेले पंढरीनाथ सीताराम पाटील यांनी कुर्तकोटीस असा सवाल केला की आपण म्हणता त्याप्रमाणे वाळूंच्या कणांच्या एकत्रितपणाने एक पत्थर बनावयाचे म्हणजे जातीभेद मोडून एकजात व्हायचे का ? आपण धर्मगुरू म्हणविता त्याअर्थी १. हिंदूंनी जातीभेद न पाळता सर्वांना सर्वांशी रोटीबेटी व्यवहार करावा, असे तुमचे मत आहे काय ? २. मुसलमानांचे जसे एक कुराण तसा हिंदूंना एकच वेद असावा, असे तुम्हास वाटते काय ? व तुम्ही महार, मांगास वेद सांगण्यास तयार आहात काय ? ३. मुसलमानांप्रमाणे एक देव ठरवून त्याप्रमाणे त्यांची पूजा करू देण्यास आपण तयार आहात काय ? व त्याप्रमाणे अस्पृश्यांना देवळात घेऊन जाण्यास तयार आहात काय ? की देवळावर मुसलमानांनी हल्ला केला म्हणून कामापुरते मार खाण्यासाठी महारांना एक होण्याचा व धर्मरक्षणाचा उपदेश करणार? आणि देवाचे दर्शनाचे वेळी, व लाडूचा नैवेद्य खाण्याच्या वेळी मराठा, माळी, महार, मांग इत्यादी लोकांचा विटाळ मानून त्यांना दूर ठेवणार ? तर तुम्ही हिंदू संघटन कसे करणार, ते सांगा ? श्री. पाटलांचे हे प्रश्न ऐकून डॉ. कुर्तकोटी चिडले व हात पाय आपटत सभेतून चालते झाले.

ही सभा संपल्यानंतर सनातनी जातीयवृत्तींच्या लोकांनी पंढरीनाथांना गराडा घातला. तेवढ्यात पोलिसांनी पंढरीनाथ पाटलांना आपल्या ताब्यात घेतले व पोलिस स्टेशनमध्ये संरक्षण दिले. पोलिसांनी त्यांना संरक्षण दिले नसते तर त्यांच्या जिविताला धोका होता. पोलिस स्टेशनभोवती ब्राह्मणांनी गराडा घातला. 'त्या माणसाला आमच्या ताब्यात द्या' अशी मागणी ते करू लागले. मोठा बिकट प्रसंग निर्माण झाला. तेवढ्यात श्री. एकनाथराव नवले, मुंबई कौन्सिलचे डे. स्पीकर यांच्या कानावर ती बातमी गेली. ते लगेच पोलिस स्टेशनमध्ये येऊन त्यांनी विरोधकांना कडक शब्दात समज दिली व पंढरीनाथांची सुटका केली.

शंकचारार्यांच्या सभांमधून व इतरही सभांमध्ये घडलेल्या घटना सामान्य नव्हत्या. विरोधकांच्या आघाडीत घुसून त्यांचे इरादे धुळीस मिळवून त्यांच्यावरच कुरघोडी करणे, त्यातही जगत्गुरू शंकराचार्य डॉ.कुर्तकोटी वर मात करणे ही साधी गोष्ट नव्हती. पंढरीनाथांची अभ्यासूवृत्ती, सामाजिक जाण, धाडसी व आक्रमक वृत्ती याची प्रचिती या प्रसंगातून दिसून आली. साध्या वैचारिक पातळीवरील विरोधासाठी त्या काळातील सनातनी मंडळी कोणत्या टोकाला जात होती हेही दिसून आले.

दुसऱ्या दिवशी ही बातमी शहरभर पसरली ब्राह्मणेतरांत जिद्दीचा आवेश संचारला. दीनमित्रचे संपादक रा. ब. मुकुंदराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गांधी मैदानावर ब्राह्मणेतरांची जंगी सभा झाली. त्या सभेत घटनांचा परामर्श घेण्यात येणारी भाषणे झाली. त्यात पंढरीनाथ पाटलांचे अत्यंत प्रभावशाली भाषण झाले. पहिल्या दिवशी शंकराचार्यांनी हिंदू समाजातील भेद नष्ट करून ऐक्य करण्यासाठी केलेला उपदेश कसा ढोंगीपणाचा होता हेही त्यांनी स्पष्ट केले.

या संदर्भात पंढरीनाथ पाटलांनी पुण्याहून डॉ. कुर्तकोटींना लिहिलेल्या पत्रात त्यांनी विचारलेले प्रश्न असे :-
१. सर्व हिंदूंची एक जात एक देव व एक धर्मग्रंथ असावा असे आपणास वाटते किंवा नाही ? २. अस्पृश्योद्धार करावा या म्हणण्यापलिकडे तुम्ही आज कृतीने अस्पृश्यांबरोबर जलपान करावयास तयार आहात काय ? व तसे धर्मानुयायांनी करावे असे तुमचे म्हणणे आहे काय ? ३. सर्व ठिकाणच्या देवळात जाण्यास सर्व हिंदूंना सारखा अधिकार असावा असे तुम्हास वाटते काय ? व त्याप्रमाणे अस्पृश्यांना देवळात घेऊन जाण्यास आपण तयार आहात काय ?

वरील प्रश्नांपैकी आपण काय करावयास तयार आहात ? ते जाहीर करावे अशी नम्र विनंती आहे. असे जाहीर आवाहन पंढरीनाथांनी त्यावेळी केले. [१९]

(विजयी मराठा दि. ५-९-१९२७) (२०) विजयी मराठा, पुणे १२ सप्टेंबर १९२७) (२१) डॉ. आंबेडकर संपादित बहिष्कृत भारत - १६ सप्टेंबर १९२७ पृ. क्र. १०१(७)

## वऱ्हाड मध्यप्रांत स्तरीय करोडी सत्यशोधक बैठक

उमरावतीची अखिल भारतीय सत्यशोधक परिषद संपल्यानंतर दिनांक ७, ८ व ९ एप्रिल १९२८ या कालावधीत वऱ्हाड मध्यप्रांतस्तरीय सत्यशोधक समाज बैठक तिसरी होणार होती. त्यासाठी ते ६ एप्रिल रोजी महात्मा फुले चरित्राच्या दोनशे प्रती विक्रीसाठी सोबत घेऊन बैलगाडीने चांदुरबिस्वा येथे येऊन रेल्वेने अकोला येथे पोहोचले. त्यांचा मुक्काम डॉ. चव्हाणांकडे झाला. ते नेहमीच चव्हाणांकडे मुक्कामाला असत. करोडी बैठकीत तसेच उमरखेड येथे क्षात्र जगत्गुरूंना द्यावयाची मानपत्रे तयार करून अकोला येथील वतनदार छापखान्यात छपाईसाठी दिली व ते लगेच करोडीला मोटारीने तेथील व्यवस्था पाहण्यासाठी आनंद स्वामीसह गेले. त्यानंतर रात्री ३ वाजता अमृतकरांच्या मोटारीने अकोल्यास जाऊन मेलने आलेल्या जगत्गुरूंचे त्यांनी स्वागत केले. दुपारी २ वाजता क्षात्र जगत्गुरूंच्या अध्यक्षतेखाली दिनांक ७-४-२८ रोजी या बैठकीतील सर्व ठराव पंढरीनाथांनी लिहिले. रात्री जगत्गुरूंच्या अध्यक्षतेखाली ९ वाजता वऱ्हाड प्रांतिक मराठा सामाजिक परिषद भरली. त्यासाठी दहाबारा हजार लोक जमले होते. एक छोटेसे गावच जणू तेथे वसले होते.

दिनांक ८ एप्रिल २८ रोजी सकाळी ८ वाजता वऱ्हाडमध्यप्रांत (सी.पी.) सत्यशोधक समाज परिषदेची तिसरी बैठक पुण्याचे केशवराव बागडे वकील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. दुपारी ४ ते रात्री ९ वाजेपर्यंत रा. ब. के. श्रीनिवासराव नायडू (वर्धा) यांच्या अध्यक्षतेखाली ब्राह्मणेतर प्रांतिक परिषदेची चौथी बैठक झाली. या दोन्ही परिषद बैठका ठरावांवर पंढरीनाथांची भाषणे झाली.

ह्या बैठकीत पंढरीनाथांना प्रांतिक सत्यशोधक परिषदेच्या कार्यकारी मंडळाचे जनरल सेक्रेटरी पद व प्रांतिक ब्राह्मणेतर कॉंग्रेस समितीच्या सेक्रेटरी पदाची जबाबदारी सोपवण्यात आली. शेवटी जगत्गुरू व बागडे वकीलांना मध्यप्रांतातर्फे मानपत्रे देण्यात आली. त्यांचे वाचनही पंढरीनाथांनीच केले. तसेच याचवेळी महात्मा फुले सोसायटीची स्थापना करण्यात आली. ९ एप्रिल १९२८ रोजी सोमवारी १ वाजता क्षात्र जगत्गुरूंची हत्तीवरून टोलेजंग मिरवणूक करोडी गावातून काढण्यात आली.

दुपारी दोन वाजता मानकरांचे माडीवर रा. ब. के. श्रीनिवासराव नायडू यांचे अध्यक्षतेखाली अखिल भारतीय महात्मा फुले शतसांवत्सरिक उत्सव साजरा करण्यासाठी स्वागत मंडळाची निवड करण्यात आली. मे महिन्यातील कडक उन्हाचा विचार करून हा उत्सव डिसेंबर १९२८ मध्येच करावा असे ठरले.

**सत्यशोधक तत्वे**

त्यानंतर २५,२६,२७ डिसेंबर १९२९ रोजी वर्धा येथे वऱ्हाडमध्यप्रांतीक ब्राह्मणेतर परिषदेचे सहावे अधिवेशन, श्री. नामदेवराव नवले वकील एम.एल.सी. यांच्या अध्यक्षतेखाली २५ डिसेंबरला पार पडले. या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष श्री. तुकाराम जयराम केदार बी.ए.एलएल.बी., एम.एल.सी. हे होते. तसेच दिनांक २६ डिसेंबर १९२९ रोजी वऱ्हाडप्रांतिक सत्यशोधक परिषदेचे सहावे अधिवेशन श्री. बाबुराव जेधे पुणे यांचे अध्यक्षतेखाली धुमधडाक्यात पार पडले. या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष श्री. चंपतराव एंडे हे होते. या परिषदांमध्येच वऱ्हाडप्रांतिक तरुण ब्राह्मणेतर परिषद श्री. श्रीपतराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या तीनही परिषदात स्वागताध्यक्ष श्री. चंपतराव एंडे यांची भाषणे झाली. या सर्व परिषदांमध्ये खालील विषयांवर चर्चा झाली. ब्राह्मण अधिकाऱ्यांकडून होणारी छळवणूक, ब्राह्मणेतरात आढळून येणारा शिस्तीचा अभाव, अस्पृश्यता निवारण, इत्यादी तसेच गोलमेज परिषदेसाठी ब्राह्मणेतर प्रतिनिधीस संधी मिळावी अशा प्रकारची मागणी करण्यात आली. 'जवळकर व गुप्ते यांना ही संधी प्राप्त झालेली असली तरी ते ब्राह्मणेतर नाहीत त्यांच्याऐवजी ब्राह्मणेतरांतूनच प्रतिनिधी पाठविण्यात यावे' असे ठरले.

याठिकाणी सत्यशोधकाची तीन तत्वे सांगण्यात आली ती खालीलप्रमाणे १. ईश्वर हा एक असून तो सर्वव्यापी, निर्विकार, निर्गुण व सत्यस्वरूप आहे. सगळे मनुष्यप्राणी ही त्याची प्रिय लेकरे आहेत. २. ईश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येकास हक्क आहे. भक्त व भगवान यामध्ये दलालाची गरज नाही. ३. मनुष्य हा जातीने श्रेष्ठ नसून गुणांनी श्रेष्ठ आहे. (२८) ( नवयुग, मुंबई ५ जाने. १९३० )

**सत्यशोधक हिरक महोत्सव**

सत्यशोधक चळवळीतील महत्वाच्या घटना दिनविशेष व व्यक्ती यांच्या संदर्भात काळजीपूर्वक माहिती ठेवून त्या त्या वेळी त्या संदर्भातील कार्यक्रमांचे आयोजन

समाजप्रबोधनाच्या दृष्टीने नियोजनपूर्वक करीत असत. १९३३ साल हे सत्यशोधक समाजाच्या स्थापनेचे हिरक महोत्सवी वर्ष होते. यावर्षी पंढरीनाथांनी मध्यप्रांतवऱ्हाडची राजधानी असलेल्या नागपूरसारख्या महत्वाच्या ठिकाणी या महोत्सवाचे आयोजन केले. नागपूरच्या सीताबर्डीतल्या भिडे कन्या शाळेत पश्चिम महाराष्ट्रातील मान्यवर सत्यशोधक श्री. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली उत्सव साजरा झाला. या महोत्सवाचे स्वागताध्यक्ष मध्यप्रदेश सरकारचे कृषिमंत्री व्ही. बी. चौबळ होते. तर पंढरीनाथ पाटील, श्री. बाबुराव भोसले, नागपूर हे या उत्सव समितीचे चिटणीस होते.
(११९) ( समाज भूषण पंढरीनाथ सीताराम पाटील एम. पी. गौरव ग्रंथ दि. ३०-५-१९६८, पृष्ट क्र. ५)

## बहुजन समाजातील पहिले साहित्यिक : महात्मा फुले

परंपरावादी ब्राह्मणांनी मनुस्मृतीच्या आदेशानुसार ब्राह्मणेतरांना शिक्षण साहित्य व संस्कृती यांच्यापासून वंचित ठेवले. शिक्षणाशिवाय मनुष्याचा विकास होत नाही. शिक्षण हा तिसरा डोळा आहे. सर्व मानवप्राणी देवाची लेकरे आहेत असे तत्वज्ञान सांगणारे वैदिक व हिंदू शास्त्री पंडित यांनी आपल्या ब्राह्मणेतर देवाच्या लेकरांना आपले भाऊ कधीच मानले नाही व त्यामुळे त्यांना अध्यात्मिक ज्ञान, ऐहिक सुखाचा मार्ग, बौद्धिक विकासाचे साधन, सामाजिक स्तर उंचावण्याची किल्ली म्हणजे शिक्षण ही बहुजनांच्या हाती दिलीच नाही. त्यामुळे सर्व ब्राह्मणेतर अक्षरशत्रू बनले. इंग्रजी अंमलात मात्र इंग्रजी सत्तेने सर्वांसाठी शिक्षण मुक्त केले. त्यामुळेच महात्मा फुले शिक्षण घेऊ शकले. अनेक ग्रंथांचे वाचन करू शकले. त्यांच्यात वैचारिक प्रगल्भता आली. चिंतन, मनन करण्याची क्षमता प्राप्त झाली. विवेकशक्ती जागृत झाली. सत्याचे दर्शन झाले. त्यांनी बहुजनांच्या उद्धाराचे लेखन केले. त्या लेखनामुळे हे बहुजनातील पहिले साहित्यिक ठरले. अशी माहिती उमरावती येथील जोशी सभागृहात बुलडाणा जिल्ह्याचे सुपुत्र ज्येष्ठ संशोधक, साहित्यिक, विचारवंत डॉ. विष्णू भिकाजी कोलते यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २७ नोव्हेंबर १९४३ रोजी महात्मा फुले पुण्यतिथी साजरी झाली, त्यावेळी वऱ्हाडचे प्रसिद्ध देशभक्त व ज्येष्ठ सत्यशोधक पंढरीनाथ पाटील यांचे भाषण झाले त्यावेळी त्यांनी दिली. विषय होता 'महात्मा फुले यांच्या सुधारणा आणि कार्य' त्यावेळी बोलतांना पंढरीनाथ म्हणाले, 'महात्मा फुले हे महाराष्ट्रातील बहुजन समाजाचे पहिले साहित्यिक होय.'(४४)
( नवाकाळ, मुंबई ४-१२-१९४३)

## साताऱ्यात जंगी मिरवणूक

आतापर्यंत पंढरीनाथांनी फुल्यांच्या जीवनाचा अत्यंत मेहनतीने संपूर्ण देशभर फिरून जमविलेल्या साधनांच्या आधारे वेध घेण्याचा प्रयत्न केला. त्यांनी फुल्यांच्या जीवनाशी संबंधित व त्यांनी लिहिलेल्या व वाचलेल्या तसेच त्यांच्या लिखाणात आलेले संदर्भग्रंथ धुंडाळून त्यांनी फुल्यांची दोन चरित्रे आतापर्यंत प्रसिद्ध केलेली होती. याशिवाय महाराष्ट्रातील सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीतील अधिकृत प्रवक्ते म्हणून मानल्या गेले होते. त्यांचे वक्तृत्व कौशल्य व निर्भयता या गुणांमुळे त्यांचे नाव संपूर्ण महाराष्ट्रभर गाजत होते. त्यामुळेच त्यांना सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणेतर चळवळ व महात्मा फुले चरित्र या विषयांवर व्याख्यान देण्यासाठी महाराष्ट्रभरातून बोलावणे येत असे. १७ नोव्हेंबर १९४७ रोजी सातारा येथे महात्मा फुले जयंती कार्यक्रमासाठी बोलाविले होते, त्याप्रमाणे ते तेथे गेले. तेव्हा तेथील लोकांचा उत्साह अवर्णनीय होता. अलोट लोकसमुदाय जमलेला होता. महात्मा फुलेंच्या फोटोंची मिरवणूक हत्तीवरून शहरात काढण्यात आली होती व त्याचबरोबर त्यामागे पंढरीनाथांची मिरवणूक एकवीस बैलगाड्यांतून काढण्यात आलेली होती. ते मिरवणूकीने धनिनीच्या बागेत पोचले. तेथे पंढरीनाथांच्या अध्यक्षतेखाली फुले जयंती उत्सवाची प्रचंड सभा झाली. या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष प्रिन्सिपल एस. एस. घुले (बी.एस्सी.बी.टी.) हे होते. त्यांचे स्वागतपर भाषण झाल्यानंतर पंढरीनाथांनी तीन तास अध्यक्षीय भाषण केले. त्यांच्या ओघवत्या वाणीतून व आरोहअवरोतून प्रभावीपणे महात्मा फुलेंचे चरित्र लोकांच्या समोर मांडले गेले. फुलेकालीन सामाजिक स्थिती व त्या स्थितीत फुले दांपत्याने केलेले शैक्षणिक, समाजिक कार्य याबद्दलची माहिती ऐकून लोक त्यांच्या भाषणाने प्रभावित झाले.

साताऱ्याच्या मुक्कामात पंढरीनाथांनी कर्मवीर भाऊराव पायगौंडा पाटील यांनी काढलेल्या व चालविलेल्या महात्मा फुले ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन व फॉर वुइमेन, श्री शिवाजी आर्टस् कॉलेज, सयाजीराव हायस्कूल व इतर प्राथमिक शाळा व बोर्डींग हाऊसेसला भेटी दिल्या. २९ नोव्हेंबर १९४७ ला ते कोल्हापूरला भाई माधवराव बागलकडे उतरले. दुपारी महसूल खात्याचे दिवाण नामदार श्री. खांडेकर यांचेकडे जेवण झाले. दिवसभर कोल्हापुरात ते मुसलमान समाज, मेडिकल असोसिएशन, म्युनिसिपल स्कूल बोर्ड इत्यादी संस्थांतर्फे लोकनियुक्तमंत्री नामदार श्री. वंतराव बागल चीफ मिनिस्टर, श्री. खांडेकर महसूलमंत्री, श्री. सरनाईक पुरवठामंत्री, श्री. कारखानीस अर्थमंत्री यांचे व प्रजापरिषदेचे अध्यक्ष भाई माधवराव बागल यांचे स्वागत सत्कार

झाले. या सर्व प्रसंगी पंढरीनाथ पाटील यांच्या सोबत होते. फुलेजयंती निमित्त तेथील सत्यशोधक समाजातर्फे रात्री आठ वाजता पंढरीनाथ पाटलांचे भाषण झाले. त्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणाचा चांगला प्रभाव पडला.

**फुले पुण्यतिथीनिमित्त मुंबईतील भाषणे**

फुल्यांचे भाष्यकार म्हणून पंढरीनाथांचे नाव सर्वत्र झाले होते. त्यामुळे त्यांना दूरदूरच्या गावावरून व्याख्यानाचे निमंत्रण येऊ लागले. १९४८ च्या महात्मा फुले पुण्यतिथीनिमित्त त्यांना मुंबईच्या सत्यशोधक विद्यार्थी संघाने निमंत्रित केले होते. त्यानुसार ते २८ नोव्हेंबर १९४८ रोजी मुंबईला पोहोचले. तेथे डिलाइड रोडवर विद्यार्थीसंघाच्या कार्यालयात साताऱ्याच्या केशवराव विचारे गुरूजी यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा फुले पुण्यतिथीचा कार्यक्रम झाला. पंढरीनाथ पाटील व विचारे गुरूजी या ज्येष्ठ श्रेष्ठ सत्यशोधकांच्या नावांमुळे या कार्यक्रमासाठी आठ ते दहा हजार लोक जमले होते. हा जनसागर पाहून पंढरीनाथही खुलले. त्यांनी फुल्यांच्या चरित्रावर अडीच तास भाषण केले. श्रोतृवर्ग मंत्रमुग्ध झाला. त्यांचे भाषण चांगलेच प्रभावी ठरले. या भाषणाचा संघातर्फे हिंदमाता व्यायामशाळेत महात्मा फुले पुण्यतिथीचा कार्यक्रम झाला. या ठिकाणी पाचशेच्या वर लोक उपस्थित होते. त्यांच्यासमोर पंढरीनाथांचे उत्कृष्ट भाषण झाले. त्यांनी फुल्यांचे जीवन श्रोत्यांसमोर विस्ताराने कथन केले.

विविध ठिकाणचे तज्ज्ञ बोलावून आपल्या जिल्ह्यातील तरूणांना सत्यशोधक विचारांचे बाळकडू पाजले. त्यांच्या प्रशिक्षणावर पंढरीनाथांचा भर होता. १९४८ साली सावरगाव डुकरे येथे मुंबई येथील सत्यशोधक विद्यार्थी संघाचे तज्ज्ञ मार्गदर्शक बोलावून त्यांनी एक महिना शिबीर आयोजित केले व सत्यशोधक व्याख्याते तयार केले. पुन्हा दोन वर्षांनी याच संस्थेच्या तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या द्वारा दर्यापूर येथे होणाऱ्या व्याख्याता प्रशिक्षण शिबिरात खामगाव व जळगाव तालुक्यातील कार्यकर्ता मंडळी त्याच दिवशी त्या सर्वांनी उपरोक्त शिबिरात प्रशिक्षित व्याख्याते म्हणून शिक्षण घेण्यासाठी पाठविण्याचे ठरले. तसेच ते १६ व १७ जानेवारीला नागपूरला असताना तेथीलही काही कार्यकर्त्यांना भेटून त्या सर्वांना दर्यापूरला होणाऱ्या या व्याख्याता प्रशिक्षणास जाण्याचे सांगितले. चळवळीतील कार्यकर्ते अभ्यासू, विवेकी व प्रशिक्षित असावे हे पंढरीनाथांना अनुभवानेच कळालेले होते. दर शुक्रवारी मुंबईस इस्ट इंडिया कॉटन असोसिएशनच्या डायरेक्टर बोर्डाची सभा होत असे. नेहमीप्रमाणे ही सभा करून पंढरीनाथ पाटील दिनांक ४ फेब्रुवारी

सकाळी धावतच दर्यापूरला सत्यशोधक समाज मुंबईच्या वतीने आयोजित शिबिरात येऊन या दीड महिना कालावधीच्या भाषणकला प्रशिक्षण शिबिरास भेट दिली. सायंकाळी आदर्श हायस्कूलच्या मैदानावर जाहीर सभेत सत्यशोधक मताचा प्रचार करणारे व सामाजिक सुधारणेचे व्याख्यान दिले.

सत्यशोधक चळवळ व शेतकरी चळवळ यात सक्रिय असतानाच पंढरीनाथ राजकारणातही शिरले. समाजकारणातही त्यांचे लक्ष होते. सत्यशोधक मतांचा अंगीकार करून ते प्रचार व प्रसारही करीत होते. केवळ प्रचार प्रसारच करीत नव्हते तर ती मते प्रत्यक्ष आचरणातही आणण्याचा प्रयत्न करीत असत. दिनांक १९ मे १९५० रोजी चिखली तालुक्यातील ब्रह्मपुरी (किन्होळा) येथील राजाराम पाटील यांचे मुलीचे लग्न सुधारक सत्यशोधक पद्धतीने पंढरीनाथांच्या अध्यक्षतेखाली लावण्यात आले. त्याचवेळी आशीर्वादपर भाषण करताना ते सामाजिक सुधारणा या विषयांवर विस्ताराने बोलले. इतर वक्तेही यावेळी सामाजिक सुधारणाबाबत पंढरीनाथ पाटलांच्या मतांची पुष्टी करीत विस्ताराने बोलले.

पंढरीनाथांचा मित्र परिवार संपूर्ण महाराष्ट्रभर विस्तारलेला होता. त्यामध्ये क्रांतिकारक तसेच सामाजिक कार्यकर्ते व स्नेही जनांचा समावेश होता. दिनांक १० मार्च १९५२ रोजी त्यांचे एक जुने स्नेही, सहकारी व क्रांतिकारक पुण्याचे श्री. केशवरावजी जेधे एम. पी. त्यांना चिखलीला भेटण्यासाठी आले. ते त्या ठिकाणी दिवसभर थांबले. विविध विषयांवर रात्री अकरा वाजेपर्यंत त्यांची चर्चा झाली. पंढरीनाथ पाटील हे वेळप्रसंगी आपल्या मित्रांच्या भेटीसाठी जात असत. ते ज्या ज्या ठिकाणी जात त्या त्या ठिकाणी आपल्या जुन्या ओळखींना उजाळा देण्यासाठी त्या ठिकाणी असलेल्या आपल्या स्नेही व मित्रांना त्यांच्या घरी जाऊन मुद्दाम भेटत. दिनांक २४ नोव्हेंबर १९६९ रोजी कोल्हापूर येथे खा. शंकरराव माने यांची सुकन्या सुषमा व आपल्या बुलडाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्याच्या रायपूर गावचे डॉ. संपतराव सास्ते यांच्या लग्नासाठी ते गेले असता त्या ठिकाणी त्यांचे ऋणानुबंधी श्री. गणपतरावजी जाधव, संपादक, दैनिक पुढारी यांची तसेच ज्येष्ठ समाजसेवक भाई माधवरावजी बागल यांची त्यांच्या घरी जाऊन भेट घेतली. तत्पूर्वी त्यांनी श्री शिवाजी विद्यापीठ व कीर्ती कॉलेजमध्ये अभ्यासपूर्ण प्रेरक अशी व्याख्याने दिली. त्यावेळी ते म्हणाले, 'शंभर वर्षापूर्वी महात्मा फुले यांनी जे प्रश्न उपस्थित केले होते व ज्यासाठी त्यांनी सारी आपली

हयात खर्च केली ते प्रश्न आजही कायम आहेत. त्यांनी केलेले कार्य तसेच चालू ठेवण्याची आजही गरज आहे. अद्यापि आमच्या समाजाची धार्मिक गुलामगिरीतून मुक्तता झाली नाही.'

बहुजन समाजाला धार्मिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी महात्मा फुल्यांनी जे मार्ग सांगितले त्या मार्गाचाच एक भाग म्हणून पुढे पंढरीनाथांनी महात्मा फुलेंचे चरित्र लिहिले. सत्यशोधकी जलसे उभे केले. गावोगाव फिरून व्याख्याने दिली. जलसे केले. एवढेच नव्हे तर शंकराचार्यांच्या सभांमध्ये जाऊन, त्यांना प्रश्न विचारून नामोहरम केले. त्यांच्या सभा उधळल्या. प्रांतिक कायदेमंडळ व संसदेतही प्रसंगानुरूप सामाजिक सुधारणेचे विचार मांडले. कायदे करून घेतले. परंतु आजही फुल्यांच्या काळातील प्रश्न कायम आहेत. शिक्षणाचा प्रसार प्रचार झाला. तरीही फुले शाहू-आंबेडकर-सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा प्रभाव संपूर्ण भारतीय समाजावर पडलेला नाही. नाही म्हणायला आंबेडकरांच्या प्रेरणेने व प्रयत्नाने पूर्वीचा महार समाज व आताचा बौद्ध समाज मात्र फुले, शाहू, सावित्रीबाई व आंबेडकरांच्या विचाराने परिपुष्ट झाला आहे. केवळ वैचारिक परिपुष्ट झाला असे नव्हे तर त्यांनी आपल्या आचरणातही लक्षणीय बदल घडवून आणला आहे. हिंदू धर्माच्या जोखडातून सुटका झाली आहे. त्यांनी ब्राह्मणांचा आपल्या जीवनामध्ये कोठेही संबंध ठेवला नाही, ही अत्यंत कौतुकास्पद, अभिमानास्पद व अनुकरणीय बाब आहे. तसेच ते ऐतिहासिक सत्य आहे. परंतु, हिंदुतील ब्राह्मणेतर मात्र अजूनही कर्मकाण्ड, अंगारेधुपारे, पोथी पारायणे, पूजाविधी यात अडकला आहे. हे आपल्या सर्वांसाठीच क्लेशदायक, दु:खदायक व नामुष्कीचे आहे. आजच्या संगणक युगात दूरदर्शनवर धार्मिक गुलामगिरी घट्ट करणाऱ्या मालिका तसेच शेकडो महाराजांचे सत्संग व त्यातून धार्मिक व आर्थिक शोषण मोठ्या प्रमाणावर सुरूच आहे. विशेष दु:खाची बाब म्हणजे उच्चविद्याविभूषित प्रशिक्षित पदवीधर, राजकारणी स्त्री-पुरूषच या बुवाबाबांच्या नादी लागलेले आहेत. म्हणून आजही फुलेंनी केलेले कार्य चालू ठेवण्याची गरज आहे. विशेषत: तरुणांनी आपली विवेकशक्ती जागृत करून धार्मिक गुलामगिरीतून समाजाची सुटका करण्यासाठी फुले-शाहू-आंबेडकरांच्या वैचारिक वाङ्मयाचे सतत वाचन, चिंतन, मनन, प्रचार व प्रसार जिद्दीने करण्याची गरज आहे. त्यासाठी आंबेडकरी विचाराच्या चळवळीतील कार्यकर्त्यांचीही साथ संगत त्यांनी करावी, समतेचे विचार अंगीकारावे, सामाजिक न्यायाची कास धरावी, भारतीय राज्य घटनात्मक मार्गांचा अवलंब करावा तरच हे कार्य सहज सुकर होऊ शकेल.

पंढरीनाथांनी याच मार्गाचा सातत्याने अवलंब केला. म्हणूनच त्यांना महात्मा फुले स्मृतिदिनानिमित्त मोठमोठ्या शहरातूनही व्याख्यानासाठी बोलावणे येत असे. १९७० च्या महात्मा फुले स्मृती कार्यक्रमानिमित्त नागपूरच्या महात्मा फुले मंडळाच्या वतीने त्यांना पाचारण करण्यात आले होते. या कार्यक्रमानिमित्त २ डिसेंबर १९७० रोजी आपल्या भाषणाने पंढरीनाथांनी महात्मा फुल्यांना श्रद्धांजली वाहिली. त्यावेळी ते म्हणाले, 'स्त्रिया आणि शूद्र यांना विद्या शिकविली तर पृथ्वीवर पापाचा भार वाढेल. प्रलय घडून येईल, धर्म बुडेल असे वेद पुराणांच्या आधारावर ज्याकाळी सांगितल्या जात होते, त्या काळी महात्मा फुल्यांनी बंड पुकारले. समतेची ग्वाही पुकारून समाज जागृत केला. ही भारताच्या इतिहासातील महान क्रांतिकारक घटना होय. म्हणून महात्मा फुल्यांच्या कार्याचे आपण पुन्हापुन्हा स्मरण केले पाहिजे.' कारण असे वारंवार स्मरण केल्याने फुलेंचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोचतील, समतेचे महत्त्व कळेल, बंधुभाव वाढेल व त्यातून समाज धार्मिक गुलामगिरीचे जोखड झुगारून देईल, एवढी शक्ती एकीच्या बळाने वाढेल. अशी धारणा त्यांच्या या वक्तव्यात आली. अशाच प्रकारचे विचार त्यांनी यापूर्वी दिनांक २८ नोव्हेंबर १९७० रोजी नांदेड येथील यशवंत महाविद्यालयाच्या वसतिगृहातील कार्यक्रमात मांडले.

### सत्यशोधक समाज शतसांवत्सरिक सोहळा

स्वातंत्र्यपूर्व काळात १९ व्या शतकात महात्मा फुल्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये समाज सुधारणेचे कार्य जिद्दीने केले. सामाजिक सुधारणेसाठी शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे हे जाणून त्यांनी पुण्याच्या ब्राह्मणी वस्तीत शूद्राती शूद्र गनल्या गेलेल्या महारमांगांच्या मुलांमुलींसाठी ८१ शाळा काढून शिक्षण व समाज जागृतीचे कार्य केले. त्यांचे कार्य पारतंत्र्योत्तर काळात म्हणजे आजच्या स्वातंत्र्यात सत्यशोधक समाजाचा शतसांवत्सरिक उत्सव साजरा करून त्यांचे कार्याला उजाळा देण्याचे प्रयत्न मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. दिनांक २४ सप्टेंबर १९७२ रोजी मुंबई येथील सुंदराबाई हॉलमध्ये महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल श्री. अली यावर जंग यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधक समाजाचा शतसंवत्सर सोहळा मोठ्या उत्साहात साजरा झाला. या सोहळ्याचे उद्घाटन केंद्रीय संरक्षण मंत्री श्री. जगजीवनराम यांनी केले. समारंभात कोल्हापूरचे माधवराव बागल, बुलडाण्याचे खासदार श्री. पंढरीनाथ पाटील,

रिपब्लीकन पक्षाचे श्री. रामकृष्ण गवई, समाजवादी पक्षाचे श्री. नानासाहेब गोरे व लोक नेते बाळासाहेब देसाई यांची भाषणे झाली.

### आर्थिक विषमतेच्या विरोधात लढा

यावेळी लोकनेते श्री बाळासाहेब देसाई यांनी धार्मिक विषमतेबरोबरच आर्थिक विषमतेच्या विरोधात सत्यशोधक समाजाने प्रयत्नशील रहावे असे आवाहन केले. सत्यशोधक समाजाच्या व शतसांवत्सरिक उत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. ते म्हणाले, 'महात्मा जोतीबा फुले यांच्या काळी जेवढी सत्यशोधक समाजाची गरज होती त्यापेक्षा आज त्याची जास्त गरज आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी हरिजनांवर जे अत्याचार होतात ते पाहिले की शरमेने मान खाली जाते. या संबंधात शासनाला एवढेच सुचवावेसे वाटते की, अस्पृश्यता मानणाऱ्यांना कायद्यात शिक्षेची तरतूद आहे. ती अधिक व्यापक करण्यात यावी व त्यांना कठोर शासन करण्यात यावे. सरकारी सहकारी आदि क्षेत्रात जी आर्थिक विषमता वाढत आहे त्याही विरोधात सत्यशोधकांनी प्रयत्नशील असावे.

### ही लढाई जिंका

सत्यशोधक समाज हे राजकीय व्यासपीठ नाही तर सामाजिक व्यासपीठ आहे. हे श्री. जनजीवनराम यांना आवर्जून सांगताना स्वागतपर भाषणात बाळासाहेब म्हणाले, '१९७१ ची पाकिस्तान विरूद्धची लढाई आपण जिंकलीत या बद्दल आपले अभिनंदन ! आता ही लढाई आपण जिंका. ती लढाई ११ दिवसात जिंकणे शक्य झाले पण ही लढाई एवढी भयावह आहे की, आज शंभर वर्षे झाली तरी ती संपलेली नाही. या अंतर्गत लढाईतही आपण विजय मिळवून दाखवा.'

### उच्चनीचतेच्या भिंती पाडा

आपल्या उद्घाटनपर भाषणात केंद्रीय संरक्षण मंत्री ना. जगजीवनराम म्हणाले, 'केवळ आर्थिक क्रांतीने भारतात समाजावाद येणार नाही तर त्यासाठी सामाजिक क्रांती झाली पाहिजे. समाजवाद व वर्णव्यवस्था एकत्र कधीही नांदू शकत नाही. हिंदू धर्म कितीही उच्च सिद्धांत सांगत असला तरी व्यवहारात तो उच्चनीचतेचे प्रतिपादन करीत असतो. या उच्चनीचतेच्या भिंती पाडून टाकणे ही आजची महत्वाची गरज आहे.'

**सर्वांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करावा**

ज्येष्ठ सत्यशोधक सामाजिक कार्यकर्ते व क्रांतिकारक श्री माधवराव बागल म्हणाले, 'जोपर्यंत आपण हिंदूधर्माला पकडून आहोत तोपर्यंत भारताचा उद्धार होणार नाही. तसेच, भारतात एकात्मताही निर्माण होणे अशक्य आहे. अस्पृश्यावरील अत्याचार बंद करावयाचे असतील तर सर्वांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करावा असे त्यांनी आग्रहाने प्रतिपादन केले. केवळ भाषणे करून समाज क्रांती होणार नाही तर आत्मसंशोधन करा असे सांगून श्री. बागल पुढे म्हणाले, 'महात्मा जोतीबा फुले यांनी मुर्तिपूजेवर कडाडून हल्ला केला. जो मूर्तिपूजा करतो, तो सत्यशोधक असू शकत नाही. मुर्तिपूजा करणाऱ्याला सत्यशोधक समाजाचे सदस्यत्व दिले जाऊ नये. अशी त्यांनी स्पष्ट मागणीच केली. मुख्यमंत्री ना. श्री. शरद पवारांनी पंढरपूरची पूजा बंद केल्याबद्दल श्री. बागल म्हणाले, ' श्री. पवार यांची ही कृती म. फुले यांच्या कार्यापेक्षा मोठी आहे.' नानासाहेब गोरे म्हणाले, 'पुण्यात दरवर्षी गणपतींच्या संख्येत वाढ होत आहे. ही सत्यशोधकांच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे.

'केवळ कायदे करून सामाजिक विषमता दूर होणार नाही तर यासाठी लहानपणापासून शिकवण दिली पाहिजे.' असे राज्यपाल श्री. अली यावर जंग यांनी सांगितले.

यावेळी मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू प्राचार्य श्री. आर. पी. नाथ, बुलडाण्याचे खासदार श्री. पंढरीनाथ पाटील व कोल्हापूरचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. माधवराव बागल यांचा शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला.

श्री. रा. सु. गवई म्हणाले, 'महात्मा फुले केवळ सुधारक होते असे म्हणणे गैर आहे, ते क्रांतिकारक होते. ते दया व अनुकंपा दाखवून सुधारणा घडवून आणणारे नव्हते. त्यांनी सामाजिक गुलामगिरीची जाणीव करून देऊन तिच्याविरूद्ध बंड करण्याचे आवाहन केले. त्यांना स्वराज्यपेक्षा सुराज्य हवे होते. हे सुराज्य आपण निर्माण केले पाहिजे.

श्री. पंढरीनाथ पाटील आपल्या भाषणात म्हणाले, ' फुल्यांचा खरा फोटो उपलब्ध असून त्याचा मी प्रचार करणार आहे. फुल्यांचे 'स्त्रीरत्न' हे छोटेखानी नाटक या वर्षात मी छापणार आहे. जोतिबांचे प्रमाणबद्ध चरित्र, त्यांचा पत्रव्यवहार व त्यांच्या मित्रांचेही विचार छापण्यास घेणार आहे.' (जोतीबांचे चरित्र तिसरे, प्रमाणबद्ध करण्याचे

काम १९६५ सालीच हाती घेतले होते. त्या संदर्भात लेखक म्हणून पंढरीनाथांच्या सहवासात त्यांच्याशी चर्चा करण्याचे सद्‌भाग्य सदर ग्रंथकर्त्यास लाभलेले आहे. एकूण ७३ प्रकरणांची शीर्षके पंढरीनाथांनी लिहून काढलेली होती. परंतु सदरचे हस्तलिखित आज उपलब्ध नसावे याची खंत आहे. ते प्रसिद्ध झाल्याचेही निदर्शनास आलेले नाही. त्याचा शोध घेणे समाजाच्या व राष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे आहे. आजच्या काळात त्याची नितांत आवश्यकता आहे.) सदरहू समारंभात समाजकल्याण मंत्री दादासाहेब रूपवतेही उपस्थित होते. (१०७) तरूण भारत नागपूर २५-९-७२, (१०८) लोकसत्ता, मुंबई २५-९-७२, (१०९) नवशक्ती, मुंबई दि. २५-९-७२)

या सर्व वक्त्यांनी धार्मिक गुलामगिरी, अंधश्रद्धा, विषमता- आर्थिक व सामाजिक नष्ट करण्यासाठी सत्यशोधक समाजाची आज नितांत गरज असल्याचे मत व्यक्त केले आहे. सरकारने पंढरपूरची पूजा करू नये हा निर्णय मुख्यमंत्री श्री. शरद पवारांनी घेतला याची नोंद इतिहासात अत्यंत महत्वाची ठरणार आहे. कारण हे धाडस फक्त शरद पवारच करू शकले. त्यानंतरचे सर्व मुख्यमंत्री हे धाडस दाखवू शकले नाही. त्याचाच परिणाम आज सर्वत्र शिक्षण प्रचार प्रसार होऊनही सत्यनारायण, धार्मिक ग्रंथपारायण, धर्मस्थळ व तीर्थक्षेत्र यात्रा यांचे स्तोम मोठ्या प्रमाणात माजले असून दूरदर्शनवर धार्मिक प्रचार करणाऱ्या वाहिन्यांची गर्दी झालेली आहे. धर्मसत्ता व अंधश्रद्धा यांची पकड कायम ठेवण्याची धडपड ही माध्यमे करीत आहेत. त्यांचे समोर सत्यशोधक समाज निश्चितच कमी पडत आहे. हे खेदाने मान्य करावे लागत आहे. म्हणूनच महात्मा फुल्यांच्या कार्यापेक्षा शरद पवारांची ही कृती अनेक पटीने श्रेष्ठ असल्याचे माधवराव बागलांनी आवर्जून लक्षात आणून दिले.

❋

# भाग - ३

# राजकीय जीवन

## छत्रपती शिवाजी महाराज स्मारक कोनशिला समारंभ

पंढरीनाथांनी यापूर्वीच जांभूळधाबा येथे काढलेली शाळा व वाचनालय तसेच त्यासाठी लावलेली आठ दहा वृत्त पत्रे व आता असहकारीता चळवळीत उडी घेऊन पंढरीनाथांनी स्थापन केलेली न्यायपंचायत (लवाद) इत्यादी कार्यामुळे पंढरीनाथांचे नाव वृत्तपत्रात येऊ लागले. ही वृत्ते वाचून त्यांच्यातील बंडखोर कार्यकर्ता अधिकारी व पुढारी यांना दिसला. त्यांचे नाव महाराष्ट्रभर गाजले. त्याचा परिणाम म्हणून त्यांना बाहेरच्या सार्वजनिक व राजकीय स्वरूपाच्या राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रमाची निमंत्रणे येऊ लागली. अशा स्वरूपाची पहिली निमंत्रण पत्रिका पुण्याच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या कोनशिला समारंभाची होय. ही पत्रिका त्यांना पोष्टाने आली. ती पाहून त्यांना फारच आनंद झाला. या कार्यक्रमासाठी ब्रिटनचे युवराज प्रिन्स ऑफ वेल्स प्रमुख पाहुणे म्हणून येणार असून यावेळी या कार्यक्रमासाठी देशातील राजे रजवाडे व प्रतिष्ठितांचा मोठा मेळावा होणार असल्याचे त्या पत्रिकेत नमूद केलेले होते. ही पत्रिका पाहून पंढरीनाथांचा आनंद गगनात मावेनासा झाला. ते या कार्यक्रमासाठी अत्यंत उत्साहाने व आनंदाने गेले. पुण्याला ते जेधे मेन्शनमध्ये थांबले. त्यावेळी त्यांचा त्याठिकाणी तत्कालीन मान्यवर मराठा पुढाऱ्यांशी प्रथमच परिचय झाला.

स्मारकाची कोनशिला युवराज प्रिन्स ऑफ वेल्सच्या हस्ते बसविण्यात आली. वास्तविक युवराज फक्त युद्धात कामी आलेल्या सैनिकांच्या स्मारकाचे अनावरण कार्यक्रमासाठी १८ नोव्हेंबर १९२१ रोजी आलेले होते. छत्रपती शाहूंनी तत्कालीन गव्हर्नर जॉर्ज लॉइड व गव्हर्नर जनरल लॉर्ड रीडिंग यांचे मन वळवून ऐनवेळी सदर कार्यक्रम युवराजांच्या दौऱ्यात घुसवला.

१९ नोव्हेंबर १९२१ रोजी शिवस्मारकाची कोनशिला युवराजांच्या हस्ते बसविली. इंग्रज अधिकाऱ्यांचा या कार्यक्रमास विरोध होता हे शिवस्मारक सर्वजातींचे व अखिल भारतीय स्वरूपाचे असल्याचे छत्रपती शाहूंनी घोषित केले. तसेच स्मारकासाठी आवश्यक तो पैसा गोळा न झाल्यास आपण एकटे त्यासाठी लागणारा

नऊ लाख रूपये खर्च सोसू असे शिंदे सरकार ग्वाल्हेर (अलिजाबहाद्दर माधवराव शिंदे) ने जाहीर केले. तसे अभिवचन गव्हर्नर साहेबास दिले. सदर कार्यक्रमास अण्णासाहेब लठ्ठे व विठ्ठल रामजी शिंदे उपस्थित राहिले नाहीत. ज्या इंग्रज इतिहासकारांनी छत्रपती शिवाजी महाराजांना चोर, लुटारू म्हणून संबोधले होते त्याच मराठ्यांचा मानबिंदू असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाची कोनशिला इंग्रजी साम्राज्याच्या युवराजांच्या हस्ते बसविली गेली. असा हा काळाचा महिमा होता. (एक प्रकारे हा काळाने उगवलेला सूडच !) या कार्यक्रमाचे व्यवस्थापक कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज होते. तेथे जमलेल्या देशातील सर्व मराठा संस्थानिक, राजे, सरदार, दरकदार व मानकरी निश्चित स्थानावर बसलेले होते. त्या वेळी या सर्वांचा जवळून परिचय करून देण्यासाठी शाहू महाराजांनी युवराजांना संपूर्ण मानकरी मंडळीच्या समोर फिरविण्याचे सुरू केले, तेव्हा मुंबई गव्हर्नर व दिल्लीचे व्हाईसरॉय यांना शब्द दिला की, या ठिकाणी युवराजांच्या संरक्षणाची जबाबदारी आमची आहे. या ठिकाणी छत्रपतींच्या प्रतिष्ठेला कलंक लागेल असे वर्तन समारंभातील एकही मराठा करणार नाही याची हमी छत्रपतींनी दिल्लीचे व्हाईसराय व मुंबईचे गव्हर्नर जॉर्ज लाईड आणि प्रिन्स ऑफ वेल्स यांना बाणेदारपणे दिली. छत्रपतींच्या शब्दांवर सर्वांचा विश्वास बसला गव्हर्नर जॉर्ज लाइड आणि व्हाईसराय यांनी युवराजांना सर्व मानकऱ्यांना भेटण्याची परवानगी दिली. तेव्हा टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. युवराज इंग्लंडचा राजपुत्र प्रिंस ऑफ वेल्स सर्वांच्या समोरून परिचय करून घेत सभामंडपातील लाखोंच्या जनसमुदायात निर्भयपणे फिरला आणि त्याने जनसमूहाचे नमस्कार स्वीकारून स्वत: जनतेवर अभिवादनाचा वर्षाव केला. शिवप्रतिमेला युवराजांनी मानवंदना दिली आणि आपल्या भाषणातून शिवरायांचे गुणगान मुक्तकंठाने गाईले.

या समारंभासाठी मुंबई, वऱ्हाड, ग्वाल्हेर, धार, देवास, कोल्हापूर, बडोदे, तंजावर, इंदूर इत्यादी ठिकाणचे संस्थानिक व सरदार आलेले होते. हा समारंभ तत्कालीन भांबुर्डे गाव म्हणजेच आताचे शिवाजी नगर परिसरात झाला. पंढरीनाथांच्या आयुष्यातील हा एक मोलाचा क्षण होता. या समारंभाचा व मान्यवरांच्या भेटीचा पंढरीनाथांवर चांगलाच परिणाम झाला. त्यांचा अनुभवकोष विस्तारला. दिव्यदृष्टी प्राप्त झाली. याप्रसंगी जेधे मेन्शनला थांबले असताना सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीतील अनेक थोरामोठ्यांच्या भेटी झाल्या व ओळखपरिचय झाला. समारंभातील भाषणांमुळे व नेत्यांच्या संपर्कामुळे ते प्रभावीत झाले. (११४) (शाहू छत्रपती व लोकमान्य, य. दि. फडके - पृष्ठ क्र. २९६,२९७)

छत्रपती शिवाजी महाराज स्मारक कोनशिला समारंभामुळे त्यांना अनेक ज्येष्ठ सत्यशोधक व अनेक ब्राह्मणेतर चळवळीतील कार्यकर्त्यांची ओळख झाली. तसेच वृत्तपत्रांचे महत्वही कळले. म्हणूनच त्यांनी तत्कालीन सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणेतर चळवळ यांना प्रसिद्धी देणारी व त्यांची बाजू समर्थपणे मांडणारी जी वृत्तपत्रे वाचली ती आपल्या बुलडाणा जिल्ह्यातील खेड्यापाड्यात बहुजनांपर्यंत पोहोचली पाहिजे, लोकांना या चळवळींची माहिती झाली पाहिजे म्हणून त्यांनी सत्योदय, सत्यप्रकाश, दीनमित्र, विजयी मराठा ही वृत्तपत्रे केवळ आपल्या वाचनालयासाठीच लावली नाहीत तर त्यांच्यासाठी शेकडो वाचक वर्गणीदार करून दिले. सोमवार दिनांक २५ जून १९२३ रोजी त्यांनी सत्यप्रकाशची व्ही. पी. सोडविली. राष्ट्रवीरच्या १२ व्या अंकापासून ८ जुलै १९२३ रोजी वर्गणी पाठवली. ९ जुलै रोजी सत्यप्रकाश अंक, २६ दिनांक १७-६-१९२३ पासून सुरू केले. या नियतकालिकाचे दिनांक १९ जुलै १९२३ रोजी ५०० अंक बुलडाणा जिल्ह्यात आणले. दिनांक ३-९-२३ रोजी दीनमित्र नियतकालीकासाठी साडेसात रूपयाची मनिऑर्डर पाठविली आहे. विजयी मराठाचेही ते वाचक वर्गणीदार होते. १९२३ या वर्षात पंढरीनाथांनी वृत्तपत्र वाचन व त्याचा प्रचार, प्रसार मोठ्या धूमधडाक्याने केला. हे या नोंदीवरून स्पष्ट होते. त्यामुळेच या जिल्ह्यात सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळ बाळसे धरू लागल्या.

१९२३ सालीच मॉन्टेग्यु, चेम्सफर्ड सुधारणा कायद्यानुसार कायदेमंडळाची दुसरी सार्वत्रिक निवडणूक झाली. यावेळी पंढरीनाथांचे वय अवघे २० वर्षांचे होते. उपरोक्त वृत्तपत्रे व गावोगाव जाऊन त्यांनी घेतलेल्या सभा यातून ब्राह्मणेतर चळवळ, सत्यशोधक चळवळ यांची सर्वसामान्य माणसात चर्चा सुरू झाली. या काळात गावागावात ब्राह्मणांचे आदरयुक्त प्रस्थ होते. लोक अशिक्षित, अंधश्रद्ध, पापभीरू व धार्मिक वृत्तीचे होते. या सर्व कारणांमुळे त्यांनी श्रमाने मिळविलेले धनधान्य व पैसा ब्राह्मणांकडून लुबाडला जातो, याचे भानही त्यांना नव्हते. ब्राह्मणांबद्दल अनादर व्यक्त करणे त्यांच्या विरोधी वास्तव असले तरी वक्तव्य करणे लोकांना मान्य होणारे नव्हते. एवढी धार्मिक, मानसिक गुलामगिरी बहुजनांनी स्वीकारलेली होती. परंतु पंढरीनाथांचा झंझावाती दौरा, तर्क शुद्ध विचारांची विद्वतापूर्ण मांडणी ग्रामीण भाषा शैलीत करण्यात पंढरीनाथांचा हातखंडा होता.

ही निवडणूक वऱ्हाडमध्यप्रांत ब्राह्मणेतर पक्षातर्फे लढविण्याचे ठरले. विरोधात

ब्राह्मणांचा पक्ष होता. बुलडाणा जिल्ह्यात स्वराज्य पक्षातर्फे बुलडाण्याचे यादव माधव काळे व ब्राह्मणेतर पक्षातर्फे खामगावचे रा. ब. के. जा. देशमुख यांच्यात चुरशीची लढत झाली. या निवडणूकीत सत्यशोधक जलसे व कार्यकर्ते यांनी पंढरीनाथांच्या नेतृत्वात उत्साहात प्रचार कार्य केले. परंतु स्वराज्य पक्षाने बाजी मारली. तरी या निवडणूकीच्या निमित्ताने सत्यशोधक चळवळीचा विचार गावागावात पोचला. जनजागृतीची प्रचंड लाट उसळली. बहुजन समाजात पंढरीनाथांचे नेतृत्व उदयास येऊ लागले. संपूर्ण जिल्हाभर पंढरीनाथांचे नाव खेडोपाडी घराघरात पोचले.(१३६)

(या. मा. काळे अल्प परिचय लेखक - मा. प्र. काळे, पान २३), (११६) पंढरीनाथ पाटील जीवन दर्शन- प्रा. हि. ए. चव्हाण पृष्ठ क्र. १५ व १६)

## ब्राह्मणेतरांनी जिल्हा कौन्सिल निवडणूक जिंकली

शंकराचार्यांची सभा उधळून सत्यशोधक मताचा प्रचार पंढरीनाथांनी शंकराचार्यांच्याच व्यासपीठावरून केला. ब्राह्मणेतरांमध्ये राजकीय व सामाजिक जागृती निर्माण केली. त्या संदर्भातील बातम्या वृत्तपत्रातून झळकल्या, तेव्हापासून पंढरीनाथांचे नाव सर्वदूर पसरले. मुंबई राज्यात, पश्चिम महाराष्ट्रात त्यांचे नाव पोचले. तशातच नवीन सुधारणा कायद्यानुसार जिल्हा कौन्सिलच्या निवडणूका होण्याचे जाहीर झाले. १९२३ साली असेंब्लीच्या निवडणूकीत अपयश आले. पण सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळ गावागावात पोचली. अंधश्रद्धा कमी होऊन ब्राह्मणेतर जागृत झाले. बुलडाणा जिल्ह्यात ठिकठिकाणी सत्यशोधक व ब्राह्मणेतर परिषदा होऊन डॉ. कुर्तकोटी शंकराचार्यांच्या बालिशपणाचा सर्वत्र धि:कार करण्यात आला. शेतकऱ्यांचे कर्ज, शेतमालाचे भाव, अस्पृश्यता निवारण, शिक्षणाचे महत्व, ब्राह्मणेतर उमेदवारांनाच कौन्सिल निवडणूकीत मते देणे इत्यादी प्रचारामुळे यावेळी ब्राह्मणेतर पक्ष नियोजनबद्ध प्रचार करता झाला. त्यामुळेच १९२४ च्या जिल्हा कौन्सिल निवडणूका संपूर्ण वऱ्हाडात जिंकल्या. या विजयात पंढरीनाथ पाटील व आनंदस्वामी यांचा मोलाचा वाटा होता. सामाजिक परिवर्तनाच्या व शेतकरी चळवळीच्या माध्यमातून त्यांनी आता राजकीय जीवनातही अपरिहार्यपणे प्रवेश केला. सामाजिक सेवेचा फायदा त्यांना आता राजकीय बदल घडवून आणण्यासाठी होऊ लागला. राजकीय सत्तापदातून समाजाची सेवा मोठ्या प्रमाणात करता येते याचा त्यांनी यावेळी अनुभव घेतला. जिल्हा कौन्सिला खऱ्या अर्थाने लोकांच्या कल्याणासाठी उपयुक्त आहेत. मोठमोठी समाजोपयोगी कामे या कौन्सिलांच्या माध्यमातून त्यांनी पार पाडण्याचा दृढ संकल्प केला. ब्राह्मण व ब्राह्मणेतर

पक्ष असे दोन विचारप्रवाह होते. सत्यशोधक चळवळीतूनच ब्राम्हणेतर पक्षाची निर्मिती झाली. ब्राह्मणेतर पक्षात ब्राह्मणाशिवाय अठरापगड जाती होत्या. परंतु मतदानाचा हक्क शेतसाऱ्यावर अवलंबून होता. त्यामुळे व ब्राह्मणेतर पक्षाचा प्रचार घराघरात पोचूनही कुळकर्णी वतनामुळे ब्राह्मणांना विरोध करण्याचे धाडस सामान्य शेतकऱ्यांना झाले नाही. म्हणून गत कायदे कौन्सिलच्या निवडणूकीत ब्राह्मणेतर पक्षाला राजकीय यश मिळाले नाही. परंतु सामाजिक प्रबोधनामुळे लोकांचे मत बदलू लागले. याचा अंदाज पंढरीनाथांना गावोगाव फिरल्यामुळे आलेला होता. म्हणूनच त्यांनी जिल्हा कौन्सिलच्या निवडणूकीत जिद्दीने काम सुरू केले. सामाजिक जीवनातील आर्थिक व्यवहार पारदर्शी ठेवले. २४-९-२३ रोजी बुलडाणा येथे झालेल्या ब्राह्मणेतर परिषदेचे हिशेब २०-१०-२३ रोजी खामगाव येथे जाऊन यशवंतराव तुकाराम मुंडेवाले (जुनाफैल) यांना त्यांचेकडे रात्री मुक्काम करून समजावून दिला.

सामाजिक, सत्यशोधक, ब्राह्मणेतर, शेतकरी, शिक्षक, विद्यार्थी, पाटील इत्यादी परिषदांमधून होणाऱ्या समाजप्रबोधनामुळे ब्राह्मण हे आपले हितकर्ते नाहीत. हे समाज मनावर बिंबले होते. पंढरीनाथ पाटलांनी सुरू केलेली सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळ ब्राह्मणाशिवाय सर्वांच्या हिताची आहे हे लोकांच्या लक्षात येऊ लागले.

पंढरीनाथ बहुतेक प्रवास सायंकाळी पायीच करीत. क्वचित बैलगाडीने करीत. त्यांनी गावोगाव सभा, व्याख्याने, जलसे असा धडाका सुरू करीत चिखली व मेहकर तालुक्यातील एकूण एक गावाला जाऊन समाज जागृतीचे कार्य केले. त्याचबरोबर ज्या परिषदा झाल्या त्यांचे वृत्तांत मुक्कामाच्या गावी निवांतपणे लिहून वृत्तपत्रांना नियमित पाठविण्याचीही काळजी घेतली. त्यामुळे पंढरीनाथांचे कार्य उच्चपातळीवरील सामाजिक व राजकीय नेत्यापर्यंत पोचले. वृत्तपत्रीय मजकूर, सहकाऱ्यांना पत्रे लिहिणे, नेत्यांशी पत्रव्यवहार, दैनंदिनी लेखन ही कामे त्यांनी नित्य सुरू ठेवली. वेळेच्या बाबतीत ते फार काटेकोरपणे वागत.

आपल्या सभा व परिषदांचा वृत्तांत जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचावा म्हणून ते ब्राह्मणेतर वृत्तपत्रांना तपशीलवार इतिवृत्त पाठवीत असत. बुलडाणा येथील तसेच जांभोरा येथील सभांचा वृत्तांत त्यांनी जांभोरा येथे तयार करून किनगावराजा पोस्टातून पाच वृत्तपत्रांना पाठविला. ही तारीख होती १-१०-२३ तर २-१०-२३ रोजी खामगावचे रा. ब. केशवराव जानराव देशमुख यांनाही पत्र टाकले. याच कामाबरोबर

त्यांनी विजयी मराठा साठी सहा वर्गणीदार नोंदविले. यावरून पंढरीनाथांना प्रसिद्धी माध्यमाचे महत्व पटलेले होते हे स्पष्ट दिसून येते.

याप्रमाणे पंढरीनाथांनी गावोगाव सभा, परिषदा व जलसे, व्याख्याने आयोजित करून संपूर्ण जिल्हा या निवडणूक निमित्ताने अक्षरश: ढवळून काढला. त्याबरोबरच ग्रामीण कार्यकर्ते व त्यातून ग्रामीण नेतृत्व आकारू लागले. अंबाशीचे गोविंदराव रामचंद्र देशमुख, बाजीराव केशवराव देशमुख, एकलाराचे हिम्मतराव देशमुख, मेरा बु॥ चे नारायण पुंजाजी पाटील, कोलाऱ्याचे राजाराम पाटील, शेंदूरजनचे भिवाजी शिंगणे, देऊळघाटचे मल्हारराव आणि रामराव देशमुख इत्यादी मंडळी पंढरीनाथांसोबत ठिकठिकाणी हजर असत. पंढरीनाथ पाटील स्वत:च धाडसी व परिपक्व विचारांचे तसेच ठाम निश्चयाचे होते. त्यामुळेच ते प्रतिपक्षाच्या सभास्थानी जाऊन त्यांच्याच व्यासपीठावर सत्यशोधकी विचार मांडून त्यांची सभा उधळून लावत.

दिनांक २४ आक्टोबर १९२३ रोजी देऊळघाट येथे बुलडाण्याच्या गर्दे वकिलांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत उमरावतीच्या नारायणराव बामणगावकरांची आणि अजाबराव देशमुख (संन्याशी) यांची भाषणे झाली. अडीच हजार जनसमुदायांच्या या सभेत पंढरीनाथांनी बेधडक व्यासपीठाचा ताबा घेऊन विरोधी पक्षाची मते खोडून टाकली. तसेच लगेच दोन दिवसांनी म्हणजे शुक्रवार दिनांक २६ आक्टोबर १९२३ रोजी डासाळा येथे माटरगाव परगणा परिषद श्री. आनंदस्वामी यांचे अध्यक्षतेखाली झाली. ही परिषद दुपारी १ वाजेपासून सायंकाळी ६ वाजेपर्यंत चालली. या परिषदेसाठी जमलेल्या लोकांसमोर पंढरीनाथांनी तर्कसंगत, सत्यनिष्ठ विचार मांडले. यावेळी देऊळघाटकर श्री. मल्हारराव व रामराव देशमुख, खामगावचे रा. ब. केशवराव देशमुख, गुलाबराव लोखंडे वगैरे मंडळीही उपस्थित होती. या परिषदेनंतर सायंकाळी याच गावात बुलडाण्याचे पिंप्रीकर, यादव माधव काळे व उमरावतीचे नारायणराव बामणगावकर यांची भाषणे झाली. तेव्हा लोकांनी हुर्रेऽऽ करून त्यांना पिटाळले. त्यानंतर ब्राह्मणेतरांचा जलसा व व्याख्याने झाली. लोकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

३१ ऑक्टोबर १९२३ रोजी बुधवारला चिखली तालुक्यातील एकलारा येथे दुपारी गोविंदराव देशमुख अंबाशीकर यांचे अध्यक्षतेखाली सभा होऊन तीत पंढरीनाथांचे भाषण झाले. रात्री त्याच गावी बुलडाण्याचे यादव माधव काळे, उमरावतीचे नारायणराव बामणगावकर, राष्ट्रीय शाळेचे शिक्षक श्री बाबूराव गर्दे यांची भाषणे सुरू असताना

त्यांच्या व्यासपीठावर जाऊन पंढरीनाथांनी ती सभा उधळून लावून सत्यशोधक जलसा होऊन पुन: पंढरीनाथांचे व्याख्यान झाले. ब्राह्मणी पक्षाने पंढरीनाथांची चांगलीच धास्ती घेतली. १ नोव्हेंबर १९२४ रोजी मंगरूळ येथे जाहीर करूनही काळे व बामणगावकर आले नाही. पंढरीनाथांनी मात्र त्याच गावी त्यांच्याच वेळेत जलसा व व्याख्यानातून लोकजागृती व निवडणूक प्रचार केला.

त्यानंतर ते ब्रह्मपुरी, किन्होळा, कोलारी, खुबगाव, सव, येळगाव करून देऊळघाटला मुक्कामी आले. दुसऱ्या दिवशी देवपूर वरून धाडला मुक्कामी आले. तो दिवस ४ नोव्हेंबर २४ रविवार होता तेथील कार्यकर्त्यांशी चर्चा करून श्री. मल्हारराव व बाबाराव देशमुख यांचेकडे कौन्सिलची कामे वाटून दिली. प्रचारासाठी आतापर्यंत पंढरीनाथांनी १९५ मैलांचा प्रवास करून १५ दिवसात तेरा सभामधून व्याख्याने दिली एवढ्या दिवासांसाठी त्यांना या काळात एकूण ९ रूपये एक आणा एवढा गाडीभाडे व इतर खर्च आला.

अशा रीतीने पंढरीनाथ पाटील व आनंदस्वामी वऱ्हाडप्रांतात सर्वत्र प्रचार करीत फिरले. त्यामुळे ब्राह्मणांच्या स्वराज्यपक्षाबद्दल लोकांमध्ये घृणा निर्माण झाली. ब्राह्मणांशिवाय धार्मिक कार्ये होऊ लागली. शेतीच्या व शेतकऱ्यांच्या प्रश्नावर ब्राह्मणेतर परिषदांमध्ये विचार होऊ लागला. त्यामुळे यावर्षी जिल्हा कौन्सिल निवडणूकीसाठी ब्राह्मणेतर पक्षाला अनुकूल वातावरण निर्माण होऊन वऱ्हाडातील सर्व जिल्हा कौन्सिली ब्राह्मणेतर पक्षाच्या ताब्यात आला. सत्यशोधक चळवळ व ब्राह्मणेतर चळवळीचा हा फार मोठा विजय समजल्या गेला. सामाजिक परिवर्तनातून राजकीय शक्ती निर्माण झाली. त्या राजकीय शक्तीतून ब्राह्मणेतरांना राजकीय सत्ता मिळाली. या यशाचे श्रेय फार मोठ्या प्रमाणात पंढरीनाथांकडे जाते. संपूर्ण वऱ्हाड मध्यप्रांतात ब्राह्मणेतर उमेदवार निवडून आले. परंतु, मराठ्यांचेच नव्हे तर ब्राह्मणेतर समाजाचे सर्व जातीपातीचे हितकर्ते उमरावतीचे डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख मात्र ब्राह्मणांच्या कपट कारस्थानाने ही निवडणूक हारले. (११८) (समाज भूषण श्री. पंढरीनाथ सीताराम पाटील गौरव ग्रंथ - ३० मे १९६८, पृष्ठ क्र. ३)

### अखिल भारतीय ब्राह्मणेतर काँग्रेस बेळगाव

वऱ्हाड मध्य प्रांतातील सर्व जिल्हा कौन्सिल ब्राह्मणेतर पक्षाच्या ताब्यात आल्यामुळे सर्वत्र आनंदाचे वातावरण होते. अशा या आनंदाच्या पार्श्वभूमीवर अखिल

भारतीय ब्राह्मणेतर काँग्रेसची पहिली बैठक बेळगाव येथे दिनांक २७ व २८ डिसेंबर १९२४ रोजी भरली. त्यावेळी २८ ठराव त्या बैठकीत पारित झाले. या बैठकीला बुलडाणा जिल्हा ब्राह्मणेतर संघाचे सेक्रेटरी पंढरीनाथ पाटील व आनंदस्वामी गेले होते. याच सभेत अखिल भारतीय ब्राह्मणेतर परिषदेची दुसरी बैठक उमरावती येथे घेण्याचे ठरले. त्याप्रमाणे वऱ्हाडमध्यप्रांतातील ब्राह्मणेतर पक्षाचे पुढारी ब्राह्मणेतर परिषदेच्या प्रचारार्थ दौरे करू लागले. (७) ( विजयी मराठा, पुणे ता. १२ जानेवारी १९२५)

बेळगाव काँग्रेस व ब्राह्मणेतर काँग्रेसची स्वतंत्र अधिवेशने झाली. त्यावेळी काँग्रेस अध्यक्षा सरोजिनी नायडू ब्राह्मणेतर काँग्रेसच्या व्यासपीठावर आल्या व त्यांनी या दोन्ही काँग्रेस एकत्र करण्याचा आग्रह धरला. त्यानंतर २५, २६, २७ डिसेंबर १९२५ रोजी उमरावती येथे ब्राह्मणतेरांची मजलीस झाली. त्यावेळी ब्राह्मणेतर, काँग्रेस, महिला काँग्रेस असे तीनही गट सहभागी झाले.

**वऱ्हाडप्रांतीय ब्राह्मणेतर राजकीय परिषद चिखली निवडणूक बोर्ड निर्मिती**

चळवळीतील अग्रेसरत्व व पदाची शक्ती यामुळेच बुलडाणा जिल्हा ब्राह्मणेतर संघाचे सेक्रेटरी रा. पंढरीनाथ पाटील यांनी चिखली जिल्हा बुलडाणा येथे वऱ्हाडप्रांतिय ब्राह्मणेतर राजकीय परिषद घेतली. ही परिषद दि. २५, २६, व २७ मे १९२६ रोजी अशी तीन दिवस चालली. या परिषदेचे स्वागताध्यक्ष राजेसाहेब आनंदराव जाधव करवंडकर हे होते. पहिल्या दिवशी त्यांचे स्वागतपर भाषण झाले. सदर परीषदेच्या अध्यक्षपदी वर्ध्याचे रा. ब. के. श्रीनिवासराव नायडू यांची रीतसर निवड झाली. स्वागताध्यक्ष राजेसाहेब आनंदराव जाधव व परिषद सेक्रेटरी श्री. पंढरीनाथ पाटील यांनी अध्यक्षांना पुष्पहार घालून स्वागत केले. त्यानंतर सेक्रेटरी श्री. पाटील यांनी आलेल्या संदेशाचे वाचन केले. रा. ब. के. श्रीनिवासराव नायडू यांचे अध्यक्षीय भाषण झाले. त्यांच्या भाषणात विचार परिपूर्णता व ओज होते. नंतर विषय नियामक कमिटीची निवड होऊन रात्री निंबोलीकरांचा सत्यशोधक जलसा झाला.

दुसऱ्या दिवशी म्हणजे २६ मे १९२६ रोजी ए. व्ही. स्कूलच्या मैदानावर सावळेकरांचे लाठीलाठींचे खेळ झाले. वस्ताद अर्जुन राऊत व इतर खेळाडूंना प्रत्येकी एक रौप्य पदक इनाम देण्याचे रा. पंढरीनाथ पाटलांनी जाहीर केले. दुपारी दादासाहेब कोठेकर वकील यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थी परिषदेचे काम उत्तम रीतीने पार पडले.

संध्याकाळी सहा वाजता श्री नानासाहेब अमृतकर वकील यांचे अध्यक्षतेखाली प्रांतिक ब्राह्मणेतर सामाजिक परिषदेच्या कार्याला सुरूवात झाली. प्रथम रावसाहेब धनुसकर यांनी स्वागतगीत म्हटल्यावर परिषदेचे स्वागताध्यक्ष वेदशास्त्रसंपन्न आनंदस्वामी यांचे एक तासभर भाषण झाले. त्यानंतर परिषदेचे जनरल सेक्रेटरी रा. पंढरीनाथ पाटील यांनी परिषदेला आलेल्या संदेशाचे वाचन केले. त्यानंतर परिषदेचे अध्यक्ष श्री अमृतकर वकील यांचे भाषण झाले. विषय नियामक कमिटीची निवड होऊन रात्री निंबोळीकरांचा जलसा झाला. तो जलसा इतका उत्तम वाटला की त्यास राजे त्र्यंबकराव जाधव यांनी सुवर्णपदक इनाम देण्याचे जाहीर केले.

तिसऱ्या दिवशी म्हणजे २७ मे १९२६ रोजी सकाळी विषयनियामक कमिटीची बैठक ए. व्ही. स्कूल हॉलमध्ये झाली. १० वाजता राजकीय परिषदेच्या तिसऱ्या दिवशीचे काम सुरू झाले. त्यात दहा ठराव पास झाले. अध्यक्षीय समारोपाचे छोटेसे भाषण होऊन रा. पंढरीनाथ पाटलांनी आभार मानले. व परिषदेचे कामकाज संपले. त्यानंतर सामाजिक प्रांतिक ब्राह्मणेतर कामास सुरूवात होऊन काही महत्वाचे ठराव पास होऊन परिषदेचे काम संपले.

या परिषदेचा परिपाक म्हणजे भावी कायदे कौन्सिल निवडणूकीसाठी ब्राह्मणेतरांनी मोठ्या संख्येने उमेदवार निवडून आणण्यासाठी निवडणूक बोर्डाची निर्मिती होऊन जाहीरनामा तयार करण्याचे ठरले. मध्यप्रांत वऱ्हाडच्या इतिहासातील ही एक महत्वाची घटना असून इतर प्रांतांच्या दृष्टीने ती अनुकरणीय असल्याचे राजकीय मूल्य तिला प्राप्त झालेले आहे.

राजकीय परिषदेत पास झालेले एकूण दहा ठराव असे -

१) समाजाचे दिवंगत नेते श्रीमंत अलीजा बहाद्दर सर माधवराव शिंदे व श्रीमंत पिराजीराव घाटगे यांच्या निधनाबद्दल दुखवटा व्यक्त करण्यात आला.

२) सध्याच्या सुधारणा अपुऱ्या असल्यामुळे प्रांतिक स्वायत्तेची मागणी.

३) मध्यवर्ती सरकारच्या ताब्यात आरमार व पराष्ट्रीय अशी दोनच खाती ठेवावी. व बाकीची सर्व खाती लोकप्रतिनिधींच्या हाती ठेवावी.

४) येत्या कायदे कौन्सिलच्या निवडणूकीकरिता वऱ्हाड मध्यप्रांतात ब्राह्मणेतर कॉंग्रेस कमिटीतर्फे ब्राह्मणेतर कॉंग्रेस पक्षाने तूर्त नागपूर प्रांतातील चार मराठी जिल्हे

(तसेच) वऱ्हाडमध्यप्रांतातील (अनुक्रमे नागपूर, भंडारा, वर्धा, चांदा आणि उमरावती, यवतमाळ, अकोला व बुलडाणा) चार असे एकूण आठ जिल्ह्यात ब्राह्मणेतर उमेदवार उभे करून निवडून आणावेत असे ठरले.

५) निवडणूकीसंबंधी हरएक काम करण्यासाठी आठ जिल्ह्यापैकी प्रत्येक जिल्ह्यातून पाच असे चाळीस सभासदांचे इलेक्शन बोर्ड नेमण्यात आले.

६) ब्राह्मणेतरांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात नोकऱ्या मिळून आजपासून त्यांची प्रमाणशीर भरती होईपर्यंत ब्राह्मण जातीच्या उमेदवारांना सरकारी नोकरीत दाखल करून घेऊ नये.

७) शेतकऱ्यांची व शेतमजूरांची उन्नती होण्याकरीता सरकारने गावोगाव ग्रामपंचायती स्थापन कराव्या तसेच दवाखाने, पाणीपुरवठा, प्राथमिक मोफत व सक्तीचे शिक्षण, रस्ते वगैरेबाबत सुधारणा प्रांतिक तिजोरीतून करण्याची व्यवस्था व्हावी.

८) वऱ्हाडमध्यप्रांत ब्राह्मणेतर पक्षाचे कार्य सतत चालू राहण्यासाठी फंड आवश्यक आहे. तो जमविण्यासाठी कमिटीची स्थापना करावी.

९) ब्राह्मणेतर राजकीय परिषदेचे चालू सालासाठी कार्यकारी मंडळ असावे.

१०) शेतकरी मतदारांच्या सोयींच्या दृष्टीने नागपूर कायदे कौन्सिलची निवडणूक डिसेंबरात व्हावी अशी सरकारला विनंती करणे.

या परिषदेत पंढरीनाथांनी आस्थेने लक्ष घालून सर्व व्यवस्था उत्तम प्रकारे केली. त्याबाबत विजयीमराठा वृत्तपत्रातील आलेले वृत्त असे - 'परिषदेच्या चालकांनी ती यशस्वी करण्याकरिता अत्यंत परिश्रम घेतलेले आहेत तसेच पास झालेल्या ठरावाकडे पाहिले असता चालकांनी किती दूरदृष्टीने परिषदेचा कार्यक्रम आखला आहे हे दिसून येईल. दुसरी विशेष महत्वाची गोष्ट म्हणजे इलेक्शन बोर्डाची नेमणूक ही होय. या बाबतीत वऱ्हाडमध्यप्रांताने महाराष्ट्राच्या पुढे पाऊल टाकले आहे. या त्यांच्या कार्यपद्धतीबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. परिषद यशस्वी करण्याकामी वऱ्हाडातील पुढारी रावबहादूर नायडू, वेदशास्त्रसंपन्न आनंदस्वामी, श्री. अमृतकर, श्री. पंढरीनाथ सीताराम पाटील व इतर सद्गृहस्थांनी अत्यंत परिश्रम घेतले. याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. बाकीच्या प्रांतांतील पुढारी यापासून काही बोध घेतील काय ? असे गौरवपूर्ण अभिमत नमूद केले आहे. (११) (विजयी मराठा, पुणे, ७ जून १९२६)

## पैसे ब्राह्मणेतरांचे पदे मात्र ब्राह्मणांसाठी

शिक्षणाअभावी, ब्राह्मणांनी, ब्राह्मणेतरांमध्ये अंधश्रद्धा जोपासून त्यांच्या अज्ञानाचा व अशिक्षितपणाचा फायदा ब्राह्मण कसे घेत आले याचे एक नमूनेदार उदाहरण म्हणून स्काउट गाईडच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडणूकीचे देता येईल. बुलडाणा येथे दिनांक १४ नोव्हेंबर १९२६ रोजी रविवारी डेप्युटी कमिश्नर साहेबांच्या अध्यक्षतेखाली या बैठकीत स्काउट फंडावर चर्चा झाली. तेव्हा तेथे उपस्थित असलेल्या ब्राह्मणेतरांनी या फंडासाठी शेकडो रूपयांच्या देणग्या दिल्या. या सभेत राष्ट्रीय शिक्क्याचे (टिळकपक्षीय) काही ब्राह्मण हजर होते. पण त्यापैकी एकानेही एक पैसाही देणगी दिली नाही. मात्र पदाधिकारी निवडीच्या वेळी सारे ब्राह्मण पगड्या फिरवून रा. काळे वकील अध्यक्ष व रा. कानिटकर उपाध्यक्ष अशी नावे साहेब रावबहादूरांनी सुचविली. राष्ट्रीय बाण्याचे व ब्राह्मण पदासाठी इंग्रजांच्या बाजूचे झाले. शिकलेले ब्राह्मणेतर असूनही ही पदे मात्र इंग्रजांच्या अधिकाऱ्याने या पगडी फिरूंना दिली. ब्राह्मणेतर ब्राह्मणांवर विसंबून राहिल्यामुळे त्यांचा ऐनवेळी विश्वासघात झाला. पैसेही गेले, पदही गेले. यावरून ब्राह्मण लोक गोऱ्या देवाची पूजा करून आपला नवस पूर्ण करून घेतात. म्हणून यापुढे तरी ब्राह्मणेतरांनी शहाणे व्हावे असा इशारा वर्ध्याच्या 'ब्राह्मणेतर साप्ताहिकाने' बुलडाण्याचे बातमीपत्रात दिला आहे.

दुसरे उदाहरण चिखली नगरपालिकेच्या सॅनिटेशन निवडणूकीचे देता येईल. चिखली सॅनिटेशन कमिटीची निवडणूक होऊन तीत ब्राह्मणेतर विजयी झाले. औषधालाही त्यात ब्राह्मण नव्हते. सुरळीत कामकाज सुरू झाले. परंतु भटांच्या कारस्थानामुळे या कमिटीची निवडणूक पुन्हा झाली व तीत ब्राह्मणेतरच विजयी होऊन ब्राह्मण तोंडघशी पडले. त्यातही विशेष असे की, ही निवडणूक अविरोध झाली. ब्राह्मणांची डाळ न शिजू दिल्याबद्दल वर्ध्याच्या 'ब्राह्मणेतर' पत्राने चिखलीकरांचे अभिनंदन केले आहे. (१५) ( ब्राह्मणेतर, संपादक व्यंकटराव गोडे, वर्धा ता. ८ डिसेंबर १९२६)

## बुलडाणा जिल्ह्यातील लोकल बोर्डाची निवडणूक

बुलडाणा जिल्ह्यातील लोकल बोर्डाच्या निवडणूका १९२७ सालच्या फेब्रुवारी महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात झाल्या. त्या निवडणूकीत ब्राह्मणेतर पक्षाचे उमेदवार मोठ्या संख्येने निवडून आले. कावेबाज ब्राह्मणांनी तपोवनच्या भिकू मारोती पाटलांना बगलेत घेऊन 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' या उक्तीप्रमाणे त्यांच्या माध्यमातून

ब्राह्मणेतरात फूट पाडण्याचा प्रयत्न केला. परंतु ब्राह्मणी पक्षाच्या ब्राह्मणेतर भिकू मारोतीशिवाय मतदारांनी ब्राह्मणांना मतदान केले नाही. त्यामुळे यावेळी ब्राह्मणेतर पक्षाचे उमेदवार मोठ्या संख्येने निवडून आले. मलकापूर तालुक्यात चौदा पैकी चौदा उमेदवार ब्राह्मणेतर, चिखली तालुक्यात १५ जागांपैकी १० जागी ब्राह्मणेतर, जळगाव तालुक्यातील १० जागांपैकी जामोदची निवडणूक व्हायची असून इतर ९ पैकी ८ जागी ब्राह्मणेतर उमेदवार, तसेच खामगाव तालुक्यातील दहाही जागा ब्राह्मणेतर पक्षाने प्रचंड मताने जिंकल्या. जिल्ह्यातील ६४ पैकी केवळ १२ जागी ब्राह्मण उमेदवार निवडल्या गेले. या सर्व विजयीवीरांचे बुलडाणा जिल्हा ब्राह्मणेतर काँग्रेस कमिटीचे जनरल सेक्रेटरी या नात्याने पंढरीनाथ पाटलांनी अभिनंदन केले. तसेच, पदाधिकारी निवडणूकीसाठी सर्व ब्राह्मणेतर प्रतिनिधींनी एकजूट राखण्याचे आवाहन करून सर्व पदाधिकारी ब्राह्मणेतर पक्षाचे येतील अशी अपेक्षा व्यक्त केली. (२७) ( विजयी मराठा, पुणे ता. २७-२-१९२८)

## बहुजनांच्या हिताची जबाबदारी टाळली नाही

ब्राह्मण विविध क्लृप्त्या करून ब्राह्मणेतरांवर कसा अन्याय करतात याचा एक मासला यापूर्वीच आम्ही दिलेला आहे. याठिकाणी पुन्हा एक नमुना देत आहोत. बुलडाणा येथील म्युनिसिपालीटीचे मतदार रूरल मध्ये कौन्सिल निवडणूकीसाठी मतदान करतात. त्यामुळे ग्रामीण भागावर अन्याय होतो ही गोष्ट लक्षात येताच ९ एप्रिल १९२८ रोजी करोडी तालुका अकोट जिल्हा अकोला येथे वऱ्हाडप्रांतिक सत्यशोधक समाज परिषद झाली. त्यानंतर २१ एप्रिल १९२८ रोजी बुलडाणा जिल्ह्यातील जळगाव तालुक्यातील जस्तगाव येथे बुलडाणा जिल्हा ब्राह्मणेतर परिषदेची चौथी बैठक झाली. या बैठकीत एकूण सात ठराव संमत झाले. त्यापैकी ठराव चौथा हा अत्यंत महत्वाचा होता. त्यातून ग्रामीण भागावर होणारा अन्याय दूर होईल अशी मागणी त्यात केलेली आहे. तो ठराव असा. 'बुलडाणा येथील म्युनिसिपालिटीचे मतदार कौन्सिलसाठी रूरल मध्ये मते देतात, ती त्यांनी अर्बनमध्ये द्यावीत अशी सरकारने व्यवस्था करावी. अशी ही परिषद सरकारास विनंती करते.'

बुलडाणा जिल्ह्यातील तालुका बोर्ड व जिल्हा कौन्सिलच्या निवडणूकीत धुमधडाक्याने प्रचार करून ब्राह्मणेतर उमेदवारांना बहुसंख्येने निवडून आणले. ग्रामीण भागाचे नेतृत्व विकसित केले. ग्रामीण भागाबरोबरच शहरी भागातील स्थानिक स्वराज्य

संस्था बहुजनांच्या अधिपत्याखाली याव्यात म्हणून दिनांक २८ मे १९२८ रोजी झालेल्या बुलडाणा म्युनिसिपालिटीच्या निवडणूकीत जुन्या गावातील ब्राह्मणेतर श्री. आनंदराव मारोती खंडागळे हे ब्राह्मणेतर पक्षाचे उमेदवार होते. त्यांनी त्यांच्यासाठी पोलींगवर जाऊन दिवसभर उभे राहून खंडागळेंना निवडून आणण्याची खटपट केली. परंतु अवघ्या तीन मतांनी त्यांचा पराभव झाला. या निवडणूकीच्या दिवशी पंढरीनाथ पाटलांची ताई सरकारी दवाखान्यात भरती केलेली होती. सकाळ, संध्याकाळ तिची काळजी घेऊन पंढरीनाथांनी खंडागळे करिता जीवाचे रान केले हे विशेष. (डायरी)

बुलडाणा जिल्ह्याप्रमाणेच ते वऱ्हाडातील बहुतेक जिल्ह्यामध्ये जिल्हा कौन्सिल निवडणूक प्रचारासाठी फिरले. ३१ मे १९२८ ते १४ जून १९२८ पर्यंत ते वर्धा जिल्ह्यात होते. तेथे त्यांनी हिंगणे सर्कलचे उमेदवार मोतीबाबा या ब्राह्मणेतर उमेदवाराचा धुमधडाक्याने प्रचार केला. पौनार, हिंगणी, शेलू धानोडी, नायगाव, देवळी इत्यादी गावी गेले तसेच भाऊराव चोरे यांच्या प्रचारार्थ गौळ, टाकळी, अंजी, कोळंब इत्यादी गावात जाऊन सारा मतदार संघ घुसळून काढला. तेथील ब्राह्मणेतर उमेदवारांना निवडून आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यावेळी त्यांचे सोबत भालेराव, काळे, माने इंजिनिअर इत्यादी कार्यकर्ते होते. (डायरी)

## भिकू मारोती पाटील यांचे मन वळविण्याचा प्रयत्न

बुलडाणा जिल्ह्यातील ब्राह्मणांनी ब्राह्मणेतरातील मातब्बर मराठा भिकू मारोती पाटील तपोवनकर यांना विविध प्रकारांनी आपलेसे करून ब्राह्मणेतरांच्या विरूद्ध वेळोवेळी त्यांचा वापर करण्याचे कंकणच त्यांनी बांधले होते. असे असले तरी पंढरीनाथ पाटलांनी भिकू पाटलांचे मन वळविण्याकरीता मानपान व प्रतिष्ठा बाजूला ठेऊन त्यांना वेळोवेळी भेटले व त्यांना ब्राह्मणेतर पक्षात आणण्याचा कसोशीने प्रयत्न केला. यापूर्वी ते त्यांना अनेकवेळा भेटले. तालुका बोर्डाच्या निवडणूका संपल्या व जिल्हा कौन्सिल चेअरमन, व्हाईस चेअरमनच्या निवडणूका आल्या. म्हणून पंढरीनाथ पाटील १९ जून रोजी मुर्ती मार्गे घोड्यावर बसून तपोवनला गेले. तेथे त्यांच्याशी जिल्हा कौन्सिलचे चेअरमन, व्हाईस चेअरमनचे निवडणूकीबाबत चर्चा केली. दुसऱ्या दिवशी २० जूनला चिखली, मेहकरला जाऊन मेहकर येथे रावसाहेब गणपती पाटील यांचेबरोबर जिल्हा कौन्सिल चेअरमन व्हाईस चेअरमन निवडणूकीबाबत चर्चा केली. भिकू पाटील मूगगिळे असल्यामुळे त्यांचे तोंड उघडणे आवश्यक होते. म्हणून, सोमवार दिनांक २५ जून

१९२८ रोजी मलकापूरला जाऊन भिकू पाटलांची भेट घेण्याचा प्रयत्न केला. पण भेट झाली नाही. परत दिनांक २६ जून रोजी बॅरिस्टर नारायणराव कायंदे यांचे कारकून आनंदरॉव खंडागळे यास तपोवनला भिकू पाटलांकडे पाठविले. २७ जूनला ते मलकापूरला गेले. परंतु, भिकू मारोती पाटील आले नाहीत. त्या दिवशी मलकापूरला मुक्काम करून दुसऱ्या दिवशी त्यांची वाट पाहिली. परंतु त्याही दिवशी ते आले नाही. ते येत नसल्याचा निरोप आला. २९ जूनला भिकू पाटील मुर्तीस येणार असल्याचे पंढरीनाथांना कळले म्हणून त्यांच्या भेटीसाठी आनंदराव खंडागळेंना भेटीस पाठविले. भिकू पाटील पंढरीनाथांना न भेटता ३० जून १९२८ रोजी रविवारी ते बुलडाणा येथे येऊन बाबुराव गर्दे (ब्राह्मण) यांचे बरोबर कारस्थान करून रावसाहेब कोर्डे यांना "व्हाईस चेअरमनचे जागेसाठी मी उभा राहत नाही." असे कबूल करून घेतले. रावसाहेब बाबुराव पाटील यांचे बरोबर त्यांचे वाकडे आणण्याचा प्रयत्न केला. तेव्हा दुपारी १ वाजता श्री बाबुराव पाटील, रावसाहेब गणपत पाटील व स्वत: पंढरीनाथ पाटील यांनी खलबतं केली. उद्या श्री कोर्डेसहित सर्वांनी मिळून मलकापूरला जमावे असे ठरले. त्यानंतर पंढरीनाथांनी श्री. कोर्डे यांची भेट घेतली. पंढरीनाथ अत्यंत चिवट होते. १ जुलै रोजी मलकापूरला पंढरीनाथ पाटील भिकू पाटलांना भेटले. त्यांच्याशी निवडणुकीबाबत बोलले. ठरल्याप्रमाणे गणपती पाटील व कोर्डे भिकू पाटलांकडे मलकापूरला येणार होते पण आले नाहीत. म्हणून तत्कालीन जिल्हा कौन्सिल चेअरमन श्री. बाबुराव पाटील यांनी बोलावल्यावरून पंढरीनाथ पाटील त्यांच्याकडे गेले व संध्याकाळपर्यंत त्यांच्याकडे थांबले. रात्री भिकू पाटलांना पुन्हा भेटले. ३ जुलै रोजी बुलडाणा येथे निवडणूक वाटाघाटी झाल्या. त्यासाठी भिकू पाटील येणार होते. पण शब्द देऊनही ते आले नाही. दिनांक ५ मे १९२८ रविवारी बुलडाणा जिल्हा कौन्सिलमध्ये जिल्हा बोर्डाचे सिलेक्शन झाले. ब्राह्मणेतरांचे बहुमत असल्यामुळे पंढरीनाथांनी यावेळी कोणासाठीच काम केले नाही. मात्र २८ एप्रिल १९२८ रोजी शनिवारी मलकापूर येथे जाऊन तपोवनकर भिकू मारोती पाटील यांच्याशी त्यासंदर्भात संपर्क साधला असता ते बरोबर बोलले नाही. त्यांनी कुणाला शब्द दिला असावा असे पंढरीनाथांना वाटले. पंढरीनाथ अत्यंत चिवट होते. ते कामाच्या सारखे मागे असायचे. जिद्दीने त्या कामाची तड लावायचे. भिकू पाटलांना ब्राह्मणांच्या तावडीतून सोडवून ब्राह्मणेतरांत आणण्याचा आटोकाट प्रयत्न सुरू ठेवला. दिनांक १ जून १९२८ रविवारी पुन्हा मलकापूरला जाऊन त्यांनी तपोवनकर भिकू पाटलांची भेट घेतली. त्या दिवशी त्यांची दोन वेळा भेट झाली. बोलणीही झाली. परत

३ जुलै १९२८ मंगळवारी बुलडाणा येथे भिकूपाटलांची भेट ठरली. पण ते आले नाही. ४ जुलै रोजी भिकू पाटलातर्फे (मेंबर नसलेले) त्यांचे चुलतभाऊ श्री. धोंडू पाटील हे आले. त्यांची अण्णासाहेब कोर्डे यांचेशी कोर्डे यांच्या घरी बोलणी झाली. दिनांक ५ जुलै १९२८ रोज गुरूवारी जिल्हा कौन्सिल बोर्ड अध्यक्ष व उपाध्यक्षांची निवडणूक झाली. अध्यक्षपदासाठी एक ब्राह्मण व एक भटाळलेला आणि रावसाहेब पाटील वकील (ब्राह्मणेतर पक्ष) असे तीन उमेदवार उभे राहिले. त्यात रावसाहेब पाटलांना सर्वात जास्त मते पडून ते अध्यक्ष म्हणून निवडले गेले. तर उपाध्यक्ष पदासाठी एक भट व बॅरिस्टर कायंदे (ब्राह्मणेतर पक्ष) उभे होते. बॅरिस्टर नारायणराव उर्फ अण्णासाहेब कायंदे यांना ब्राह्मणापेक्षा तिप्पट मते जास्त पडून ते उपाध्यक्ष झाले. अशा प्रकारे पंढरीनाथांचे श्रम फलद्रूप झाले. त्याचा त्यांना फारच आनंद झाला. त्याच दिवशी संध्याकाळी बॅरिस्टर नारायणराव कायंदे यांचे घरी सर्व निर्वाचित पदाधिकारी, सन्माननीय नेते व कार्यकर्ते यांना चहापान व पानसुपारी झाली.

### बाबुराव पाटलांना रावसाहेब किताब

बुलडाणा जिल्हा कौन्सिलचे चेअरमन श्री. बाबुराव पाटील यांना रावसाहेब किताब मिळाला. बुलडाणा जिल्ह्याच्या दृष्टीने ही एक महत्वाची घटना समजल्या जाते. त्यांचे अभिनंदन व गौरव करण्याकरिता दिनांक १७ जानेवारी १९३० रोजी मलकापूर येथील ए. व्ही. स्कूलमध्ये बुलडाणा जिल्ह्यातील निवडक पुढारी व कार्यकर्ते ह्यांना प्रीतीभोज देण्यात आला. त्यावेळी तीनशेवर लोक जमले होते. सभा होऊन सभेत बाबुराव पाटलांचा गौरव करणारी भाषणे झाली. त्यावेळी पंढरीनाथ पाटलांनी पाटलांचे गुणगौरवपर भाषण केले. त्या गावातील 'न भूतो न भविष्यती' अशी पार्टी झाल्याचे नमूद केलेले आहे.

### नागपूर कायदे कौन्सिल निवडणूक

१८ फेब्रुवारी १९३० रोजी नागपूर कायदे कौन्सिलच्या होणाऱ्या पोटनिवडणूकीकरिता कोण उमेदवार उभा करावा याबद्दल विचार विनिमय सुरू झालेला होता. ह्या विचार विनिमयासंदर्भात २३ जानेवारी १९३० रोजी पंढरीनाथ पाटील बॅरिस्टर जे. टी. केदार यांचे सह उमरावतीला गेले. त्याठिकाणी ते बॅरिस्टर बागवे, बॅरिस्टर पंजाबराव देशमुख एम.ए.,पीएच.डी., बार अ‍ॅट लॉ, बॅरिस्टर तिडके, चौबळ वकील

असे सर्व एकत्र जमले. या निवडणूकीत पूर्व वऱ्हाड अर्बनतर्फे नागपूर कायदे कौन्सिलच्या निवडणूकीसाठी विचारविनिमय केला. त्यात ठरल्याप्रमाणे दुपारी जानराव देशमुख, शिवराव पाटील व पन्नालाल संघई यांचे सह सर्व एकत्र जमून चर्चा झाली. तीत श्री. चौबळ वकील यांना उभे करण्याचे ठरले. तसेच कॉमर्स ॲन्ड इन्डस्ट्रीजच्या रिक्त जागेसाठी कोण उमेदवार द्यावा याचा विचार करण्याकरिता ॲडव्होकेट केदारांसह पंढरीनाथ पाटील २४ जानेवारी रोजी अकोला येथे गेले. त्या दोघांनी श्री. लक्ष्मीनारायण (माजी सेशन जज) यांची उमेदवारी या पदासाठी निश्चित केली. संध्याकाळी त्यांच्याकडे मुक्कामी थांबून त्यांच्याशी बोलणी केली. त्याप्रमाणे त्यांनी होकार दिला. श्री. लक्ष्मीनारायण यांची उमेदवारी कॉमर्स ॲन्ड इन्डस्ट्रीजच्या रिक्त जागेसाठी निश्चित झाली. (डायरी)

पुणे येथे ब्राह्मणेतर काँग्रेस भरवावी याबाबत चर्चा करण्याकरिता मुंबईस गेलेले पंढरीनाथ पाटील ६ फेब्रुवारी गुरूवार १९३० रोजी रावबहादूर नायडूंना भेटण्यासाठी वर्ध्यास गेले. त्यादिवशी त्यांची भेट घेऊन त्यांनी मुंबई दौऱ्याचा वृत्तांत नायडूंना सांगितला. तो ऐकून त्यांना फार आनंद झाला. दोघांची सतत ५ तास बोलणी झाली. नागपूर कायदे कौन्सिलचे निवडणूकीसाठी रावबहादूर के. श्रीनिवासराव नायडू उभे होते. रात्री आठ वाजता वर्ध्याच्या पुढाऱ्यांची नायडूंकडे बैठक झाली. त्यावेळी पंढरीनाथ तेथे हजर होते. चर्चेअंती कुठलेच कामाचे वाटप झाले नाही. म्हणून दुसऱ्या दिवशी सकाळी ७ फेब्रुवारी १९३० रोजी पंढरीनाथ भालेरावांसह रावबहादूर नायडूंच्या बंगल्यावर गेले. त्यांनी त्यांचे निवडणूकीचे काम व्यवस्थित व्हावे म्हणून प्रत्येक जिल्ह्यासाठी एक जबाबदार माणूस नियुक्त करण्याचे ठरले. त्याप्रमाणे तेथील कार्यकर्त्यांमध्ये कामाचे वाटप करून जिल्हावार जबाबदारी सोपवण्यात आली. त्यावेळी स्वत: पंढरीनाथांनी चांदा (आजचा चंद्रपूर) व भंडारा अशा दोन जिल्ह्यांची जबाबदारी घेतली व ते निवडणूक प्रचाराच्या कामाला लागले. पंढरीनाथ त्याच रात्री चांद्याला रवाना झाले. रेल्वे कामगारांचा संप सुरू होता. त्यामुळे ते उशीरा चांद्याला पोचले. ते जेथे जात तेथे खालच्या स्तरातील लोकांकडेच थांबत. चांद्याला पोचल्यावर ते नेहमीच्या सवयीप्रमाणे अंबादास पट्टेवाले नामक म्युनिसिपल कमिटीच्या मास्तरांकडे थांबले. त्यांच्याकडे जेवण घेतले. त्यानंतर चांदा शहरातील प्रमुख व्यक्ती श्री. पंडित बालगोविंद (परदेशी ब्राह्मण) व चांदा म्युनिसिपालीटीचे प्रेसिडेन्ट नगरसेठ श्री. खुशालचंद, चांदा तालुका बोर्डाचे प्रेसिडेन्ट श्री. सोनबा हूड, चांदा म्युनिसिपालिटीचे सेक्रेटरी श्री. शेषराव नायडू यांच्या

भेटी घेतल्या. रावबहादूर नायडूंसाठी या जिल्ह्यातील मते मिळवून देण्याची विनंती केली. ते वर्ध्यास परत येऊन श्री. भालेराव यांच्याकडे थांबले. त्यानंतर १२ फेब्रुवारी १९३० रोजी पंढरीनाथ, रावबहादूर नायडू व आत्माराम बाबु यांचेसह भंडाऱ्याला गेले. तेथील कट्टर ब्राह्मणेतर कार्यकर्ते रा. बाबुलाल नामक गृहस्थ होते. ही सर्व मंडळी त्यांचेकडे उतरली. त्यांच्याशी बोलणी झाली. बाबुलालने रावबहादूर नायडूंना मदत करण्याचे कबूल केले.

### पापापासून वाचले

पंढरीनाथ कामात कधीच कसूर करीत नसत. त्यांचा जलशातील चावटपणा आणि राजकारणातील चिवटपणा यामुळेच ते सर्वांच्या आदरास पात्र ठरून समाजभूषण म्हणून गौरविल्या गेले. रावबहादूर नायडूंच्या निवडणूक प्रचारासाठी ते भंडारा जिल्ह्यात दौरा करीत होते. डवा येथील सट्टबापू हा एक मतदार होता. भंडाऱ्याहून त्याच्यासाठी ४२ मैल ही मंडळी आली. पण तो भेटला नाही. तो जुमेदार होता. तो एका खेड्यावर असल्याचे कळले. पंढरीनाथ त्या खेड्यात गेले. तेथे तो सापडला. जुमेदार असला तरी त्याला दारू व रंडीबाजीचे व्यसन होते. त्यामुळे तो कर्जबाजारी होता. त्याची स्थिती फार हलाखीची होती. काल तो गावात असूनही त्यांना भेटला नाही. कारण त्याला त्याच्या दारिद्र्याची लाज वाटली. पंढरीनाथांनी त्याची भेट घेतली. तेव्हा त्याची जुमेदारी दिसून आली. तो दारू प्यालेला होता. त्याने मतदानासाठी येण्याचे नाकारले. त्यानंतर पंढरीनाथ गोंदिया येथे गेले. तेथील मतदारांकडे रात्री ९ वाजता भेटीस जातांना गावातील एका रस्त्यावर एका वेश्येने पंढरीनाथांना गोड बोलून फसविण्याचा प्रयत्न केला. परंतु पंढरीनाथांनी चांगला मनोनिग्रह करून तिच्या तावडीतून आपली सुटका करून घेतली. पापापासून वाचल्याचे त्यांना खूप समाधान लाभले. गोंदियातील एक मतदार राम गोपाल नामक कॉंग्रेसमन अप्रमाणिक आढळला. दुपारी त्याच्यासह ते भंडाऱ्यास आले. तेव्हा तेथे एक मारवाडी कामठीच्या डी. लक्ष्मीनारायण कडून गोंदियाच्या मतदारांकडे आल्याचे कळले. मतदार सारे मारवाडी होते. रावबहादूर नायडू हे ब्राह्मणेतर मताचे आहेत. ब्राह्मणेतर पक्ष भांडवलदारांच्या विरूद्ध झगडणारा आहे, हा बाल्शेव्हिकप्रमाणे जहाल पक्ष आहे असे तो गृहस्थ मारवाडी मतदारांना सांगत होता. हे पंढरीनाथांच्या निदर्शनास आले. दिनांक १७ फेब्रुवारी १९३० रोजी कौन्सिल ऑफ स्टेटची निवडणूक झाली. या निवडणूकीत नायडूंसाठी इतकी पायपीट करूनही भंडारा जिल्ह्यात नायडूंना १२

पैकी ३ मते मिळतील असे चित्र पंढरीनाथांना दिसले व ते लगेच वर्ध्याला नायडूंच्या घरी रवाना झाले.

दिनांक २२ फेब्रुवारी १९३० रोजी ब्राह्मणेतर काँग्रेसच्या कामासाठी ते मुंबईस जाण्यास निघाले. मलकापूरात रेल्वेत बसल्यानंतर टाईम्स ऑफ इंडियाच्या २२ फेब्रुवारी १९३० च्या अंकात कौन्सिल ऑफ स्टेटच्या निवडणूकीत रावबहादूर नायडू अयशस्वी झाल्याची बातमी त्यांना वाचायला मिळाली. त्यांना अत्यंत वाईट वाटले.

**राऊंड टेबल कॉन्फरन्सला ब्राह्मणेतर प्रतिनिधी पाठविण्याची मागणी**

विलायतेत भरणाऱ्या राऊंड टेबल कॉन्फरन्ससाठी विविध पक्षांनी आपली बाजू मांडण्यासाठी प्रतिनिधी पाठविण्याचे ठरविले. त्यात ब्राह्मणेतरांचे प्रतिनिधी नसल्याचे लक्षात आले. म्हणून बाबुराव जेधे व बागडे वकील यांना घेऊन २७ सप्टेंबर १९३० रोजी पंढरीनाथ कोल्हापूरचे श्रीमंत छत्रपती राजाराम महाराज यांचे पुणे येथील शिवराजवाड्यावर गेले. दुपारी ११ वाजता महाराजांची भेट झाली. महाराजांनी या सर्वांना आपल्या सोबत पंगतीला घेऊन जेवले. त्याचवेळी महाराजांशी पंढरीनाथांनी सुसंवाद साधला. लंडन येथे होणाऱ्या राऊंड टेबल कॉन्फरन्ससाठी हिंदूस्थानातून पाठविण्यात येणाऱ्या प्रतिनिधींच्या यादीत ब्राह्मणेतर / सत्यशोधकांचा प्रतिनिधी म्हणून रावबहादूर के. श्रीनिवासराव नायडूंच्या नावाचा समावेश व्हाईसराय आयर्विन यांनी केला नव्हता. त्यांनी या कॉन्फरन्ससाठी नायडूंना पाठविण्यासाठी महाराजांनी मिस्टर आयर्विन व्हाईसराय यांना पत्र द्यावे अशी विनंती पंढरीनाथांनी यावेळी केली. महाराजांनी लगेच मान्य केली व त्याप्रमाणे पत्र लिहून रवानाही केले. तसेच वऱ्हाडमध्यप्रांत ब्राह्मणेतर पक्षाचा सेक्रेटरी या नात्याने पंढरीनाथांनी नागपूर गव्हर्नर व व्हाईसराय आयर्विन यांना महाराजांच्या पत्रास पुष्टी देणाऱ्या तारा लगेचच केल्या.

त्यानंतर पंढरीनाथ वऱ्हाडात परत आले. लगेच नागपूर कायदेकौन्सिलाच्या निवडणूका १० नोव्हेंबर १९३० रोजी होणार असल्याचे जाहीर झाले. त्यामुळे खामगाव, चिखली व मेहकर या तालुक्यातून कोण उमेदवार उभा करावा याबाबत विचार करण्यासाठी २२ ऑक्टोबर १९३० रोजी रविवारला सभा बोलावण्याचे ठरले व तसे एक पत्रक कायंदे वकील, कोर्डे वकील व पंढरीनाथ पाटील यांच्या सह्यांनी काढून ठिकठिकाणी पोस्टाने पाठविण्यात आले.

**येथेही ब्राह्मणांचे पितळ उघडे पडले**

१९३१ साली ब्राह्मणेतर पक्षाने लोकल बोर्ड व जिल्हा कौन्सिलच्या निवडणूका लढविल्या व वऱ्हाडातील बहुतेक सर्व जिल्हा कौन्सिलात ब्राह्मणेतर पक्षाचे उमेदवार निवडून आले. १९३१ मध्ये ब्राह्मणेतर पक्षाचे जिल्हा कौन्सिलमध्ये बुलडाणा जिल्ह्यामध्ये एकूण ३० सदस्यांपैकी २९ सदस्य निवडून आले. निवडून आलेली एक ब्राह्मण सदस्या होती. २० ऑगष्ट १९३१ रोजी १ वाजता सभागृहात ३० पैकी २९ सदस्य उपस्थित होते. सभाध्यक्षांची रीतसर निवड झाल्यावर पंढरीनाथांनी मिसेस काळे (या. मा. काळेंची द्वितीय पत्नी) यांच्या वयाबाबत आक्षेप घेतला. "त्यांचे वय २१ वर्षापेक्षा कमी आहे. मत देण्यासाठी जे वय पाहिजे त्यापेक्षा ते कमी आहे." यावर सभेत उहापोह होऊन श्रीमती काळे यांना मत देता येत नाही असे सर्वानुमते ठरले. याबाबत ६० वर्ष वयाच्या काळेंच्या पत्नीला मत देता येत नाही. याचा उलगडा असा की, त्यांची पहिली पत्नी वारली व मागच्या वर्षी म्हणजे १९३० मध्ये पौष महिन्यात संक्रांतीचे वेळी त्यांनी दुसरे लग्न केले. दिनांक १२ जानेवारी १९३० रोजी गोदातीरावरील बासर या तीर्थक्षेत्री पुण्याचे 'मातापूर' घराण्यातील एका मुलीशी दुसरा विवाह केला. त्यावेळी त्यांचे धाकटे बंधू डॉ. तात्यासाहेब व भावजय सौ. लक्ष्मीबाई, दोन भाचे शिवरामपंत व दत्तोपंत कविमंडन आदि काही मोजकी मंडळी उपस्थित होती. (१२४) या. मा. काळे अल्पपरिचय - लेखक : मा. प्र. काळे पृ. क्र. १२,१३ व २२)

'घरच्या मंडळींना हे लग्न झाले माहित नाही म्हणतात, मग दुसऱ्या लोकांना कसे कळणार ?' काळे वकील देशभक्तीचे मूर्तिमंत पुतळे ! भिक्षुकांचे आधारस्तंभ !! तेव्हा ते एखाद्या ब्राह्मणाची शिफारस करण्याचे टाळून आपल्या पूर्ण वय नसलेल्या पत्नीची ऑफीसरकडे व मिनिस्टरकडे नाव देऊन हे घडले. कारण कोणीतरी नाव दिल्याशिवाय सरकार कोणतेही नॉमिनेशन करू शकत नाही. ब्राह्मण राष्ट्रीय देशभक्त कसा असतो व लोकांना कशा थापा मारून स्वत:चा स्वार्थ साधतो याचे हे उत्तम उदाहरण आहे.

१९३१ साली बुलडाणा जिल्ह्यातील तालुका लोकल बोर्ड व जिल्हा कौन्सिल ब्राह्मणेतरांच्या ताब्यात आली. यावेळी जिल्हा कौन्सिल चेअरमन व व्हाईस चेअरमन या पदासाठी होणाऱ्या निवडणूकीकरिता ब्राह्मणेतरात ब्राह्मणांनी फूट पाडण्याचा प्रयत्न केला. ब्राह्मणेतरात बहुजनसमाजाचा निधड्या छातीचा नेता नसल्यामुळे असे होते. यावेळी ब्राह्मणेतरात एकमताने चेअरमन, व्हाईस चेअरमन अविरोध न निवडता रावसाहेब

पाटील हे चेअरमन पदासाठी व श्री. अण्णासाहेब कायंदे हे व्हाईस चेअरमन पदासाठी ब्राह्मणेतर पक्षातर्फे व स्वतंत्र चेअरमनच्या जागेसाठी कोर्डे व व्हाईस चेअरमन पदासाठी बॅरिस्टर टी. एस. पाटील असे दोन दोन उमेदवार उभे राहिले. शेवटी ब्राह्मणेतर पक्षाचे रावसाहेब पाटील व अण्णासाहेब कायंदे हे निवडून आले. (३२) (राष्ट्रवीर, बेळगाव ता. २५-८-१९३१)

## पंढरीनाथ पाटलांचा गनिमी कावा

२३ जून १९३४ रोजी जिल्हा लोकल बोर्डाची अखेरची निवडणूक होऊन तीत ब्राह्मणेतर एकूण २५ प्रतिनिधीपैकी १६ प्रतिनिधी पंढरीनाथ पाटील व आनंदस्वामी यांचे सहकारी होते. त्यामुळे जिल्हा कौन्सिल अध्यक्षपदी पंढरीनाथ पाटील व उपाध्यक्षपदी श्री. पुंजाजी पाटील यांची निवड झाली. जिल्हा कौन्सिल निवडणूकीपूर्वीच्च प्रांतिक मंत्रीमंडळात राष्ट्रीय पक्षाचे खापर्डे व ब्राह्मणेतर पक्षाचे रावबहादूर के. श्रीनिवासराव नायडू निवडून आलेले होते व त्यांच्यात दिवाण होण्यासाठी समझौता झालेला होता. तसाच समझौता यावेळी जिल्हा कौन्सिलमध्ये व्हावा असे प्रयत्न रावबहादूर नायडूंनी केले. पंढरीनाथ पाटलांनीच हा तोडगा सुचविला व तो मान्य झाला. त्यानुसार सिलेक्शनमध्ये राष्ट्रीय पक्षाचे दोन व आपल्या (ब्राह्मणेतर) पक्षाचे तीन सभासद घेऊन असा करार केला. परंतु त्याचा भंग करून पंढरीनाथांनी ऐनवेळी गनिमीकावा साधला. आपलेच पाचही सभासद घेतले. यावेळी परिस्थितीचे भान ठेवून पंढरीनाथांनी पोलीस मदतही घेतली. ग्रामीण भागतील ब्राह्मणेतर सभासद एकत्र जमवून अज्ञातस्थळी ठेवले व त्यांना ऐनवेळी सभागृहात प्रगट केले. नॉमिनेशनच्या वेळीही पंढरीनाथांनी राष्ट्रीय पक्ष पुढाऱ्यांना हात दाखविला. राष्ट्रीय पक्षाचे म्हणणे होते की, सिलेक्शनमध्ये आम्हाला पूर्णपणे डावलले. म्हणून आता नॉमिनेशनमध्ये सर्व राष्ट्रीय पक्षाचेच लोक घेण्यात यावे, अशी मागणी केली. त्याप्रमाणे राष्ट्रीय पक्षाचे पुढारी बॅरिस्टर रामराव देशमुख यांनी बॅरिस्टर नायडू यांना पत्र लिहिले. त्या पत्रानुसार बॅरिस्टर नायडू यांनी राष्ट्रीय पक्षाचे कौन्सिल सभासद बुलडाण्याचे श्री. रामचंद्र अनंत कानिटकर, श्री. काळे व बॅरिस्टर पाटील यांची अशी समजूत घातली की राष्ट्रीय पक्षाचे दोन व ब्राह्मणेतर पक्षाचे तीन नॉमिनेट करून राष्ट्रीय पक्षाचे बॅरिस्टर श्री. पाटील यांना उपाध्यक्ष करून मी (नायडू) या दोन्ही पक्षात समेट घडवून आणतो. त्याप्रमाणे नॉमिनेशनमध्ये ब्राह्मणेतर पक्षाचे तीन सभासद म्हणजे खुद्द पंढरीनाथ पाटील, त्यांचे उजवे हात भटकर व रावसाहेब पाटील तर राष्ट्रीय पक्षाचे दोन सभासद तोताराम पाटील, पाडळी व खामगावचे मेटकर वकील असे

पाच सभासद नेमले. परंतु पूर्वीप्रमाणे पंढरीनाथ पाटलांनी ऐनेवेळी सभास्थळी पोलीस बंदोबस्तात आपले सहकारी सभासद नेहमीचा मार्ग सोडून दुसऱ्या दरवाज्याने मोटारीतून आत सोडले. दिवान नायडूंच्या वचनाला हरताळ फासला. बहुमताच्या जोरावर पंढरीनाथ पाटील जिल्हा कौन्सिल अध्यक्ष व त्यांचेच एक निरक्षर सहकारी पुंजाजी पाटील उपाध्यक्ष निवडले.

## अवास्तव भत्ता कमी केला

वऱ्हाडातील सर्वात मोठ्या जिल्हा कौन्सिल इंजिनिअरचा भत्ता दीडशे रूपयाच्या आत होता. तर बुलडाण्याच्या जिल्हा कौन्सिलच्या इंजिनिअरचा भत्ता तीनशे रूपयाच्याही वर जातो. जिल्हा कौन्सिलजवळ पैसा नाही म्हणून हा भत्ता शंभर रूपयाच्या आतच असावा असा आग्रहपूर्वक ठराव पंढरीनाथांनी २९ जुलै १९३४ च्या जिल्हा कौन्सिलच्या सभेत मांडला. सदर ठराव कायद्याच्या विरूद्ध आहे, असे म्हणताच दोन तृतीयांश मताने ठराव पास झाला तर तो कायदेशीर ठरणार ना ? असा प्रश्न करताच अध्यक्ष चूप बसले. ठराव मताला टाकला. तो पास झाला. २२ मते ठरावाला अनुकूल पडली. (३४) ( विदर्भ ता. २८-८-१९३४)

पुढे बाबुराव पाटील (माजी अध्यक्ष) यांनी नेमलेले जिल्हा कौन्सिल इंजिनिअर श्री. देसाई यांनी धाड-बुलडाणा रोडवर टाकलेली गिट्टी पंढरीनाथ पाटलांनी ओहरशिअर हयात खान यांना सोबत घेऊन रातोरात तपासली असता ती कमी भरली. त्यामुळे देसाईंनी संबंधीत कॉन्ट्रॅक्टरला दिलेले बील हे चुकीचे ठरले. श्री. देसाई यांना खाते चौकशी व पोलीस चौकशीलाही तोंड द्यावे लागले. तसेच सरकारी निवासस्थान सोडाव्या लागण्याच्या कार्यवाहीस सादर व्हावे लागले. त्यांचे सोबतच ओहरशिअर श्री. आरास यांनाही निलंबन पत्कारावे लागले. अशा रीतीने सत्तापदी जाताच बाबुरावांच्या कारकीर्दीत श्री. वसू यांच्यावर झालेल्या अन्यायाचा सूड उगवला. वसू हेही एक ओवरशिअर पंढरीनाथांच्या पठडीतले होते. (३५) (महाराष्ट्र, ९ जानेवारी १९३५)

## अखिल भारतीय लोकल सेल्फ गव्हर्नमेंट कॉन्फरन्स दिल्ली

पंढरीनाथांना एक लोकप्रतिनिधी या नात्याने अनेक सभा संमेलनात निमंत्रणे येत. तसेच एक जबाबदार घटक म्हणून विविध परिषदांना व कॉन्फरन्सना प्रतिनिधी

म्हणून उपस्थित राहण्याची निमंत्रणे येत. पंढरीनाथांचे एक वैशिष्ट्य सांगता येईल की, ते बहुतेक परिषदांना, कॉन्फरन्सना व कमिट्यांच्या बैठकांना आवर्जून उपस्थित राहत. एवढेच नव्हे तर अभ्यासपूर्ण मुद्देसूद टिपण तयार करून ते त्या ठिकाणी सक्रिय सहभाग घेत. शनिवार दिनांक २८ मार्च ते ३० मार्च १९३६ या अवधीत दिल्ली येथे टाऊन हॉलमध्ये सर हिदायतुल्ला यांचे अध्यक्षतेखाली अखिल भारतीय लोकल सेल्फ गव्हर्नमेंट कॉन्फरन्स झाली. सदर कॉन्फरन्समध्ये प्रतिनिधी म्हणून पंढरीनाथ पाटील उपस्थित राहून त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी या परिषदेसाठी प्रथम उत्तम मराठी निबंध लिहून त्याचे इंग्रजीत भाषांतर करून त्याच्या प्रती छापून घेतल्या व त्या परिषदेत वितरीत केल्या. त्यांनी आपला इंग्रजी निबंध ३० मार्च १९३६ रोजी स्वत: वाचला.

**पंचम जॉर्ज स्मारक समितीची स्थापना**

बादशहा पंचम जॉर्ज यांचे दिनांक २१ जानेवारी १९३६ रोजी निधन झाले. त्याबद्दल जिल्हा कौन्सिल अध्यक्ष पंढरीनाथ पाटील यांनी दुखवटा सभा घेऊन जिल्हा कौन्सिल कचेरीत सुटी जाहीर केली होती. जिल्हा कौन्सिलतर्फे दुखवट्याचे पत्र आठवे एडवर्डकडे पाठविले होते. त्यानंतर ५ एप्रिल १९३६ रोजी बुलडाण्यात एक सभा होऊन तीत बादशहा पंचम जॉर्ज स्मारक कमिटीची स्थापना करण्यात आली. तसेच, सदर कमिटीचे व्हाईस प्रेसिडेन्टपदी पंढरीनाथ पाटलांची निवड करण्यात आली होती.

**कायदेमंडळाच्या आगामी निवडणूकीचे रणसिंग फुंकले**

'मॉन्टेग्यु चेम्सफर्ड' सुधारणाप्रमाणे भारतात सर्वप्रथम १९२१ साली कायदेमंडळे निर्माण झाली. या निवडणूका दर तीन वर्षांनी होत असत. [१२६]

( या. मा. काळे यांचा अल्प परिचय, लेखक - मा. प्र. काळे, पृष्ट क्र. २२)

यापूर्वीच्या तीन निवडणूकीत पंढरीनाथ पाटलांना अपयश आले. अपयशाने हरून न जाता ते आता चौथ्या वेळेला नव्या दमाने असेंब्लीच्या निवडणूकीसाठी सामोरे जाण्यास कंबर कसून कामाला लागले. ३० ऑगष्ट १९३६ रोजी अकोला येथे पंढरीनाथ पाटलांनी श्री. ब्रिजलाल बियाणी यांची भेट घेतली व पुढील असेंब्ली इलेक्शनबाबत विचारविनिमय केला. त्यानंतर २७,२८ व २९ सप्टेंबर १९३६ रोजी पंचमढी येथे ना. रा. ब. नायडूंची भेट घेतली व आगामी निवडणुकीबाबत त्यांच्याशी बोलणी केली. २ व ३ ऑक्टोबरला उमरावती, यवतमाळ जिल्ह्याचा दौरा करून त्या जिल्ह्यातील

प्रमुख पुढाऱ्यांच्या भेटी घेतल्या. यवतमाळला रौफशा व नारायणराव पाटील यांची भेट घेतली. लगेच ४ ऑक्टोबरला अकोला येथे राजूरकरांशी विचारविनिमय करून वऱ्हाड जॉईंट बोर्डाची सभा करून दिनांक ११ ला आर्वीत श्री. गोपालदास व वसंतराव यांच्या भेटी घेतल्या. १ नोव्हेंबर १९३६ रोजी खामगाव येथे वऱ्हाडप्रांतिक लोकल बोर्ड व जिल्हा कौन्सिल यांची संयुक्त परिषद घेतली. या परिषदेचे अध्यक्ष ॲडव्होकेट केदार हे होते. या परिषदेत पंढरीनाथांचे प्रभावी भाषण झाले. ७ नोव्हेंबर १९३६ रोजी बुलडाणा जिल्हा कौन्सिलची जनरल सभा झाली. जिल्हा कौन्सिलचा नवा हॉल (टॉवर बिल्डिंग) बांधून तयार झाला होता. सदर हॉलचे उद्‌घाटन गव्हर्नर साहेबांच्या हस्ते व्हावे व त्यांना त्यावेळी मानपत्र द्यावे, असा ठराव संमत झाला. तसेच सदर हॉलमध्ये पंढरीनाथ पाटलांचा फोटो लावावा असाही ठराव जिल्हा कौन्सिलने पारित केला.

१० नोव्हेंबर १९३६ रोजी नागपूर कौन्सिलसमोर नामदार खापर्डे यांनी स्थानिक स्वराज्य कायद्यात दुरूस्ती सुचविणारे बील आणले. त्यास हाणून पाडण्याचा प्रयत्न करण्याचे ठरले. परंतु, ११ नोव्हेंबर रोजी नामदार दिवाण नायडू यांनी राजीनामा देण्याचे घोषित केले. त्यामुळे खापर्डे यांनी बील परत घेतले. या सर्व हालचाली कौन्सिलमध्ये पंढरीनाथांच्या उपस्थितीत झाल्या. १८ नोव्हेंबर १९३६ रोजी उमरावती येथे डॉ. पंजाबराव देशमुखांच्या घरी ब्राह्मणेतर, शेतकरी व राजकीय या तीन पक्षांनी एकत्र येऊन आगामी कौन्सिल निवडणुका लढवाव्यात असे ठरले. या सर्व प्रक्रियेत पंढरीनाथ पाटलांचा मोठा सहभाग होता.

२२ व २३ नोव्हेंबर रोजी पंढरीनाथ पाटील जबलपूरला होते. या दोन दिवसांत त्यांनी अनुक्रमे कमिशनर मि. ग्रीनफिल्ड व गव्हर्नर नामदार गोवण यांच्या भेटी घेतल्या व गोवण साहेबांना बुलडाण्यात येण्याचे निमंत्रण दिले. ते त्यांनी स्वीकारले.

### पंढरीनाथांची असेंब्लीसाठी निवड

शुक्रवार दिनांक ११ डिसेंबर १९३६ रोजी मेहकर तालुक्यातील शेंदुर्जन येथे चिखली व मेहकर तालुक्यातील ब्राह्मणेतरांची सभा झाली. या सभेत पंढरीनाथांनी असेंब्लीसाठी उभे रहावे असे एकमताने ठरले. तर १४ डिसेंबर १९३६ रोजी जळगाव व खामगाव येथे जळगाव व खामगाव मधून उभे राहावे असे लोकांच्या मागणीनुसार सर्वानुमते ठरले. दिनांक १६ पासून पंढरीनाथ पाटलांनी प्रचार सुरू केला. ही सभा

अंजनी बु ।। येथे झाली. त्या सभेतच त्यांनी आपली उमेदवारी घोषित करून प्रचाराचा नारळ फोडला. तर तिकडे १९ डिसेंबरला चिखलीकरांनी चिखली येथे पंढरीनाथ पाटलांनी निवडणूकीला उभे रहावे असे जाहीर केले. त्यानुसार जानेवारी १९३७ मध्ये असेंब्लीच्या निवडणूका होऊन या निवडणूकीत पंढरीनाथ पाटील चिखली व मेहकर मतदारसंघातून प्रचंड मतांनी निवडून आले व प्रथमच आमदार झाले.

### ब्राह्मणेतर पक्षाचे काँग्रेसमध्ये सामिलीकरण

वऱ्हाड मध्यप्रांत ब्राह्मणेतर परिषदेचे ९ वे अधिवेशन नागपूर येथे दिनांक १९ व २० आक्टोबर १९३८ रोजी झाले. या परिषदेचे अध्यक्ष दे. भ. श्री. केशवराव जेधे एम.एल.ए. (सेंट्रल) महाराष्ट्र प्रांतिक कमिटीचे अध्यक्ष हे होते. तर श्री. पंढरीनाथ पाटील व नागपूरचे बाबुराव भोसले हे सेक्रेटरी होते. या परिषदेचे अध्यक्ष कोणाला करावे हा मोठा गहन प्रश्न होता. श्री. केशवराव जेधे यांना स्वागत मंडळाचे अध्यक्ष निवडले खरे पण, या परिषदेला महाराष्ट्र काँग्रेसचा अध्यक्ष जाऊ शकत नाही, किंवा जाणे योग्य नाही अशी अडचण काँग्रेस धुरीणांसमोर उभी राहिली. ब्राह्मणेतर पक्ष हा जातीयवादी पक्ष आहे. अशा परिषदेला काँग्रेस पुढाऱ्यांनी जाणे योग्य नाही. असा पोक्तपणाचा सल्लाही पुढे आला. ब्राह्मणेतर पक्ष हा जातीय पक्ष नसून बहुजन समाजाचा पक्ष आहे. असे निर्धाराचे आणि युक्तीवादाचे तडफदार वृत्तीचे धोरण काँग्रेस श्रेष्ठींसमोर मांडण्यात आले. महाराष्ट्रातील काँग्रेस धुरीणांनी, जेधे यांनी या परिषदेला जाऊ नये यासाठी केंद्रीय काँग्रेस श्रेष्ठींसमोर तक्रार गुदरली. काँग्रेस श्रेष्ठींपैकी एक, सरदार वल्लभभाई पटेल यांचेकडे हा प्रश्न विचारार्थ आला.

डॉ. पंजाबराव देशमुख, पंढरीनाथ पाटील, प्रभृतींनी स्वागतमंडळाचा मनोदय व ब्राह्मणेतर पक्ष जातीय पक्ष नाही त्यात कार्य करणारे तरूण अस्सल राष्ट्रभक्तीने प्रेरित झालेले आहेत. सायमन कमिशनचा बहिष्कार, १९३० चा सत्याग्रह आणि १९३४ साली डॉ. धर्मवीर मुंजे विरूद्ध काँग्रेसचे बॅरिस्टर अभ्यंकर यांची जी असेंब्ली निवडणूक झाली त्यावेळी बहुसंख्येने याच ब्राह्मणेतर तरूणांनी हिरीरीने भाग घेतला आहे. हे जातीय नाहीत. हा युक्तीवाद सरदार वल्लभभाई पटेलांना पटला. महाराष्ट्राचे काँग्रेस पुढारीपण जेधे यांनी ब्राह्मणेतर परिषदेला जाऊ नये असे सांगत असतांनाही, जेधे यांना या परिषदेला जाण्याची अनुमती सरदार वल्लभभाई पटेलांनी दिली. या परिषदेसाठी श्री. केशवराव जेधे हे अध्यक्ष म्हणून गेले व सरदार वल्लभभाई पटेल यांचे प्रतिनिधी

म्हणून श्री. एन. व्ही. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ हे ब्राह्मण उपस्थित होते. ब्राह्मणेतर पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करण्याबाबत या परिषदेच्या विषय नियामक कमिटीच्या बैठकीत कडाक्याची चर्चा झाली. परिषदेसमोर ठेवण्याचा ठराव तयार करण्यात आला.

## ब्राह्मणेतर परिषद काँग्रेसमध्ये सामील होण्याचा ठराव

आजच्या आंतरराष्ट्रीय राजकारणाचा विचार केला असता हिंदी स्वातंत्र्य प्राप्तीकरिता पाश्चिमात्य राष्ट्राप्रमाणे हिंदुस्थानात एक सर्वशक्तीमान असा राजकीय पक्ष असणे अत्यंत आवश्यक आहे. ज्याअर्थी हिंदुस्थानवर सध्या लादण्यात आलेल्या सुधारणा अत्यंत टाकाऊ आणि राष्ट्रविघातक आहेत त्याअर्थी त्या शक्य तितक्या लवकर बदलणे व येऊ घातलेल्या फेडरेशनला एकजूटीने विरोध करणे अत्यंत जरूर आहे. गेल्या असेंब्लीच्या निवडणूकीपासून दिसून आलेल्या शेतकरी व मजूर वर्गाच्या इच्छा व भावना यांचा विचार केला असता ब्राह्मणेतर पक्षाने काँग्रेसशी एकजीव होऊन सेवा करावी. असा त्याचा निश्चित कल दिसून येतो. तसेच, ब्राह्मणेतर पक्ष व काँग्रेस यांचे ध्येय व कार्य यात तात्त्विक विरोध नसल्यामुळे ब्राह्मणेतर पक्षाला आपली उद्दिष्टे काँग्रेसमध्ये जाऊन अधिक लवकर साध्य करता येतील. वऱ्हाड प्रांतातील काँग्रेस संस्था विशिष्ट जातिनिष्ठ कंपूच्या हाती होत्या. ह्याच केवळ कारणामुळे ब्राह्मणेतर पक्ष काँग्रेसशी फटकून वागला. पण आता या कंपूचे स्वार्थी धोरण व अराष्ट्रीयता सर्वांचे दृष्टोत्पत्तीस येऊन या कंपूचे वर्चस्व काँग्रेसमधून निघून गेले. ही गोष्ट ध्यानात घेतली असता ब्राह्मणेतर पक्षाने काँग्रेसमध्ये जाण्याला आता काही एक प्रत्यवाय राहिला नाही. त्याअर्थी मध्यप्रांत वऱ्हाड परिषद ठरविते की, ब्राह्मणेतर पक्षाने, सभासदांनी काँग्रेसमध्ये अंत:करणपूर्वक भाग घ्यावा व काँग्रेसचे सभासद व्हावे.

हा ठराव श्री. पंढरीनाथ पाटील व डॉ. पंजाबराव देशमुख यांनी मांडला व परिषदेने चार विरूद्ध प्रचंड बहुमताने तो पास केला. परिषदेच्या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी नेमलेल्या कार्यकारी मंडळाने पंढरीनाथ पाटील व श्री. बाबुराव भोसले यांची सेक्रेटरी म्हणून निवड केली. (१२७) ( समाज भूषण पंढरीनाथ पाटील, एम. पी. गौरवग्रंथ, ता. ३०-५-१९६८, पृष्ठ क्र.५ व ६)

## मेहकर नगरपालिकेची निवडणूक

१८ फेब्रुवारी १९३९ रोजी पंढरीनाथांची जेलमधून सुटका झाल्यावर त्यांचे

सर्वत्र सत्कार समारंभ सुरू असतांना मेहकर म्युनिसिपालीटीची निवडणूक आली. यावेळी सर्वप्रथम वयात आलेल्या सर्व मतदारांकडून नगर परिषद अध्यक्षांची थेट निवडणूक ३ जुलै १९४१ रोजी झाली. ब्राह्मण व ब्राह्मणेतर असे दोन सरळ पक्ष निर्माण झालेले होते. दिनांक २७ जून रोजीच्या प्रचार धुमाळीत या दोन पक्षांच्या दरम्यान हाणामारी झाली. ब्राह्मण पक्ष म्हणजे हिंदू महासभेतर्फे त्र्यंबक सावजी तर ब्राह्मणेतर पक्ष म्हणजे पंढरीनाथ पाटील पक्षातर्फे जाधव वकील हे अध्यक्षपदाचे उमेदवार होते. सावजी पक्षातर्फे आठ दिवसापासून श्री. सोमण प्रचारसभा घेत होते. त्यांच्या सभेत ते पंढरीनाथ पाटलांवर टीका करीत होते. त्यांच्या टीकेला उत्तर देण्यासाठी पंढरीनाथांची दोन हजार लोकांची जाहीर जंगी सभा झाली. पुन्हा २९ जूनला मेहकरच्या सारंगधर मंदिरासमोर सभा होऊन त्या ठिकाणी पाटील यांनी साडेतीन तास बोलून टीकेला उत्तर दिले. त्यांनी सावजी पक्षाचा चांगला समाचार घेतला. २७ जून १९४१ रोजी झालेल्या दंग्याची चौकशी ३० जून १९४१ रोजी होऊन प्रमुख लोकांवर इंडियन पिनल कोड कलम १४७ प्रमाणे केस उभी राहिली. ब्राह्मणांनी या केसमध्ये पंढरीनाथ पाटलांना अडकविण्याचा आटोकाट प्रयत्न केला पण तो यशस्वी झाला नाही. दि. ३० जून व १ जुलै १९४१ रोजी दिवसभर संततधार पाऊस असतानाही पंढरीनाथांनी मेहकर शहरात ठाण मांडले. भंगीपुरा व मातंगवस्तीत जाऊन त्यांचे घरी चहापान सुपारी घेत सुधारणेबाबत उपदेश करीत प्रचार केला. ३ जुलै १९४१ रोजी निवडणूक होऊन जाधवांना सावजीपेक्षा ९१ मते कमी पडून सावजी विजयी घोषित झाले. सावजी पक्षाचे सहा तर जाधव पक्षाचे पाच उमेदवार निवडून आले. (३९) (राष्ट्रवीर बेळगाव ता. २५ जुलै १९४१)

### कानिटकर मानपत्राबाबत पत्र

ब्राह्मण मंडळी संधी प्राप्त होताच त्या संधीचे सोने कसे करतात याचा एक मासला यापूर्वी या. मा. काळेंच्या पत्नीच्या कोऑप्शन प्रकरणी आलेला आहे. तशाच प्रकारचा एक नमुना थोड्या वेगळ्या संदर्भात या ठिकाणी प्रस्तुत करीत आहोत. बुलडाणा येथील रामचंद्र अनंत कानिटकर यांचा पासष्टी सोहळ्याचा हा प्रसंग. श्री. कानिटकर हे जुने वकील. पण त्यावेळी नॅशनल वॉर फ्रंटचे पगारी ऑर्गनायझर होते. १७ जानेवारी १९४५ रोजी त्यांच्या वयाला ६५ वर्ष पूर्ण होत असल्यामुळे त्यादिवशी बुलडाणा म्युनिसिपालीटीतर्फे त्यांना मानपत्र देऊन त्यांचा वाढदिवस साजरा करण्याचे ठरले. त्यावेळी बहुसंख्येने निवडून आलेल्या काँग्रेस सदस्यांनी दोन-तीन

वर्षापूर्वीच काँग्रेसच्या आदेशानुसार राजीनामे दिलेले होते. त्यावेळचे काँग्रेसचे अध्यक्ष पंडित कानडे शास्त्री हे होते. ते अत्यंत लोकप्रिय होते. यावेळी ते सरकारी बंदिवान होते. थोडेसे राहिलेले काँग्रेसचे इतर सभासद व सरकारने नेमलेले पदाधिकारी अशा लोकांचीच त्यावेळी म्युनिसिपालिटी बनलेली होती. अशा स्थितीत कानिटकरांचा सत्कार होणे न्यायोचित नव्हते. त्याबाबत आक्षेप घेणारे एक पत्रक दिनांक १ जानेवारी १९४५ रोजी कृष्णराव गणपतराव देशमुख गारडगावकर एम.एल.ए., डॉ. महादेव नारायण पारसनीस, महादेव काशिनाथ चांदे ॲडव्होकेट, पंढरीनाथ पाटील एम.एल.ए. व एल.एस. भटकर एम.एल.ए. यांच्या नावानिशी व सह्यांनी काढलेले होते. त्या पत्रकात ते म्हणतात, '...त्यांच्या मतदार संघापुढे श्री. कानिटकर यांच्या मानपत्राचा विषय मुळीच नव्हता. बुलडाण्यातील मतदार लोकांची श्री. कानिटकरांच्या बद्दल वृत्ती लक्षात घेतल्यास शहरातील बहुमत खात्रीने त्यांच्या मानपत्राविरूद्धच पडेल. यात शंका नाही. सबब, बुलडाणा येथील म्युनिसिपालिटीला शहराच्या तर्फे बोलण्याचा अगर म्युनिसिपालिटीच्या नावे मानपत्र देण्याचा मुळीच अधिकार नाही. असे असतांना मतदारांच्या भावना व मते यांना धाब्यावर बसवून देण्याचे म्युनिसिपालिटीने ठरवावे हे त्यांच्या अराष्ट्रीयतेचे द्योतक असून लोकशाहीस पूर्ण विसंगत आहे.

श्री. कानिटकर यांची बुलडाणा म्युनिसिपालिटीतील कामगिरी केवळ शून्य आहे असे म्हटले तर ते पूर्णपणे वस्तुस्थिती निदर्शक होणार नाही. केवळ नावाच्या बढाईसाठी म्हणून त्यांनी म्युनिसिपल अध्यक्षांची खूर्ची अडवून ठेवली. त्यांच्या कारकीर्दीत पूर्णपणे अव्यवस्था माजवून म्युनिसिपल फंडाचे हजारो रूपयांचे नुकसान त्यांच्या ढिलाईमुळे झाले. (१३२) ( रा. अ. कानिटकर जीवन चरित्र, संपादक नागेश रामचंद्र कानिटकर, पृष्ठ क्र. ६७ )

गटबाजीची वागणूक व मानाचा हव्यास यामुळे त्यांच्या कारकीर्दीत लोकशाहीची गळचेपी झाली. सर्व राष्ट्र व लोकांना भेदभाव विसरण्याचे धडे गिरवण्यास सांगणारे श्री. कानिटकर व त्यांच्या पक्षाने ब्राह्मणांमधील देशस्थ व चित्पावन असा लाजिरवाणा वाद फैलाविला. त्याचा त्रास बुलडाणेकरांना भोगावा लागला. गेल्या कौन्सिल निवडणूकीच्या वेळी ज्या नॅशनॅलिस्ट पक्षाचे श्री. कानिटकर आपणास सभासद म्हणवित होते त्या पक्षातर्फे त्यांना नागपूर कौन्सिलमध्ये जागा मिळाली नाही. तेव्हा त्यांनी नॅशनल पक्षाची पर्वा न करता त्या पक्षाने ठरविलेल्या धोरणाविरूद्ध उघडउघड कारवाई करून श्री. तोताराम पाटील यास उभे केले. अशा प्रकारे कोणत्याही बाजूने

विचार केला असता श्री. कानिटकर हे वरील मानपत्रास पात्र नाहीत.

वरील समारंभ पार पाडण्यासाठी जी कमिटी नेमली आहे तीत फक्त नॅशनल वॉर फ्रंटचे व इतर तऱ्हेने सरकारचे पंखाखालील लोकांचाच भरणा आहे असे समजते.

वरील समारंभास राजकीय स्वरूप देण्याचा डाव आहे. श्री. कानिटकर यांची राजकीय मते व त्यांची कृत्ये ही बुलडाणा शहरातील जनतेला इतकेच नव्हे तर बुलडाणा जिल्ह्यातील जनतेला पूर्णपणे माहित, नापसंत आहेत. वीर वामनराव जोशी यांचेविरूद्ध ते दिल्ली असेंब्लीसाठी उभे राहिले असता खुद्द बुलडाण्यात त्यांची जी शोभा झाली त्यावरून ही गोष्ट स्पष्ट आहे. सर्व वऱ्हाडातही जनता त्यांचे धोरणाशी विरूद्ध आहे. तेव्हा त्यांच्या काही चाहत्यांनी त्यांच्या पासष्टाव्या वाढदिवशी निमित्त आनंद व संतोष व्यक्त करायचा असेल तर त्यांनी प्रातिनिधिक देखावा न आणता खाजगी समारंभ व आनंदप्रदर्शन करावे. हे खुद्द कानिटकरांच्या व त्यांच्या चाहत्यांच्या हिताचे होईल. श्री. कानिटकर यांच्याशी आमची कोणतीही व्यक्तीविषयक विरूद्ध भावना नाही. केवळ सार्वजनिकदृष्ट्या आम्हास लिहिणे भाग पडत आहे. वेळीच आम्हास हा खुलासा करण्याचे जरूर वाटते कारण त्यामुळे बहुजन समाजाची दिशाभूल होणार नाही. [४५]

(पंढरीनाथ पाटलांचे पत्रक १-१-१९४५), (१३३) रा. अ. कानिटकर जीवन चरित्र, पान ८५, संपादक नागेश रामचंद्र कानिटकर)

## स्वातंत्र्य संग्रामातील विदर्भाच्या घडामोडींची माहिती घेण्यासाठी कमिटी नियुक्त

१८ फेब्रुवारी १९४५ रोजी खामगाव येथे बुलडाणा जिल्हा काँग्रेस विधायक कार्यकर्त्यांची सभा झाली. त्या सभेत पुढील तीन वर्षांकरीता पंढरीनाथ पाटील यांची जिल्हा काँग्रेस अध्यक्षपदी निवड झाली. त्यानंतर विदर्भप्रांतिक कार्यकारिणीची सभा दिनांक ९ सप्टेंबर १९४५ रविवारी अकोला येथे प्रांताचे नामदार श्री. ब्रिजलाल बियाणी यांचे अध्यक्षतेखाली झाली. त्या सभेत नजीकच्या काळात निधन पावलेल्या कस्तूरबा गांधी, महादेवभाई देसाई, आर. एस. पंडित, सी. विजय, राघवाचार्य सत्यमूर्ती आणि बेगम आझाद यांच्या अकाली निधनाबद्दल दुखवटा व्यक्त करण्यात आला. त्यात ठरावाच्या दुसऱ्या भागात खास ठरावाने देशगौरव सुभाषचंद्र बोस यांना विशिष्ट परिस्थितीत आलेल्या अकाली व आकस्मिक मृत्युबद्दल हळहळ व्यक्त करून त्यांना आलेल्या वीरमृत्युबद्दल त्यांच्याप्रति आदर व्यक्त करण्यात आला. १९४२ च्या

ळवळीस काँग्रेस पुढाऱ्याच्या धरपकडीनंतर वैदर्भीय जनतेने ज्या अतुलनीय धैर्याने तोंड दिले व निरनिराळ्या प्रकारे मदत केली त्याबद्दल वैदर्भीय जनतेचे अभिनंदन करण्यात आले. १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीत विदर्भात घडलेल्या घडामोडींची माहिती गोळा करण्यासाठी खालील सदस्यांची एक समिती गठीत करण्यात आली.

१. श्री. पी. के. देशमुख, उमरावती

२. डॉ. गोपाळराव खेडकर, अकोला

३. श्री. नारायणराव पाटील, यवतमाळ

४. श्री. पंढरीनाथ पाटील, बुलडाणा

५. श्री. बी. एन. उदासी वकील, खामगाव (५२) (मातृभूमि, अकोला ता. १३-९-१९४५)

## वऱ्हाडाच्या भवितव्याचा प्रश्न महाराष्ट्र एकीकरणाने सुटेल

वऱ्हाडचा प्रश्न सर्वत्र चर्चिला जात असता पंढरीनाथ पाटलांनी वऱ्हाडचे आमदार व बहुजनांचे प्रमुख कार्यकर्ते या नात्याने एक पत्रक प्रसिद्ध केले. त्या पत्रकात ते लिहितात,

'बेळगावच्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाने केलेल्या संयुक्त महाराष्ट्राच्या घोषणेला माझा पूर्ण पाठिंबा आहे. महाराष्ट्र हा चार निरनिराळ्या राज्यसत्तांखाली विभागला गेलेला असल्यामुळे मराठा बहुजन समाज हाही विभागला गेला असून राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या त्याचे फार मोठे नुकसान झालेले आहे. महाराष्ट्रातील शेती परप्रांतीय सावकारांच्या आणि व्यापारधंदे परप्रांतीय भांडवलदारांच्या हाती गेलेले असून, सरकारी नोकऱ्या अर्थात राज्य नियंत्रक परप्रांतीय बुद्धिजिवी वर्गाच्या हाती गेले आहे. त्यामुळे मराठी जनता ही केवळ आज मजूर होऊन बसली आहे. या दुःस्थितीतून मराठा बहुजन समाजाचा उद्धार होऊन त्याच्या हाती राज्यसत्ता यायला संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेशिवाय दुसरा मार्ग नाही.

वऱ्हाडच्या भवितव्याच्या गुंतागुंतीचा प्रश्नही संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनेच सुटेल. मला आशा आहे की, घटना समितीतील नागपूर वऱ्हाडचे प्रतिनिधी संयुक्त महाराष्ट्राचा आणि वऱ्हाडच्या भवितव्याचा प्रश्न यशस्वीरित्या सोडवून घेतील.

वऱ्हाडातील बहुजन समाज संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा जोराने पुरस्कार करेल. (५३) (तरूण भारत, नागपूर ता. १-७-१९४६)

## संयुक्त महाराष्ट्र होणे का गरजेचे आहे ?

१४ जुलै १९४६ रोजी मुंबई येथे श्री. शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली भरणार असलेल्या संयुक्त महाराष्ट्र परिषदेसंबंधी तत्कालीन समाजधुरीण व राजकीय क्षेत्रातील मान्यवर नेते यांनी संयुक्त महाराष्ट्र होणे त्यात संपूर्ण मराठी भाषिक एकत्र येणे सामाजिक, राजकीय, व्यापारिक व आर्थिकदृष्ट्या कसे हिताचे ठरेल याबाबत आपली मते वृत्तपत्र प्रतिनिधीमार्फत व स्वतंत्र पत्रक काढून प्रकटपणे मांडली होती. त्यात नामदार नानासाहेब गोखले, नामदार काळीकर व पंढरीनाथ पाटील यांचा महत्वाचा उल्लेख आहे. वऱ्हाडच्या आठ जिल्ह्यांचे छोटे राज्य शिक्षण व मोठे प्रकल्प उभारण्यास आर्थिक उत्पन्नाच्यादृष्टीने कमजोर ठरेल. शिवाय व्यापार व राजकीय क्षेत्रातही लहानच राहील. महाराष्ट्राला सातशे किलोमीटरचा समुद्रकिनारा आहे. त्याचा फायदा वऱ्हाड संयुक्त महाराष्ट्रात राहिल्यास मिळेल. जर्मनी पराक्रमी राष्ट्र असूनही त्याला समुद्रकिनारा नाही. त्यामुळे कोंडमारा झाला, तसा आपला होईल. म्हणून भाषिक, सांस्कृतिक, व्यापारीक, सामाजिक, आर्थिक व राजकीय विकासासाठी विदर्भाचे आठही जिल्हे संयुक्त महाराष्ट्राला जोडून नागपूर वऱ्हाड, पुण्यामुंबईकडील महाराष्ट्र, गोमंतक आणि मराठवाडा मिळून एकूण तीन कोटी लोकसंख्या असलेला सलग मराठी प्रदेश तयार होतो. एवढे विस्तृत कार्यक्षेत्र महाराष्ट्रातील जनतेला प्राप्त होईल अशी भावना या सर्वांची होती. त्याप्रमाणे ती पुढे १ मे १९६० रोजी पूर्ण झाली. पण गोवा वेगळा झाला. कर्नाटकातील बेळगाव, कारवारचा काही मराठी भाषिक भाग अद्यापही कर्नाटकातच राहिला. हे शल्य बेळगावच्या मराठी भाषकांच्या मनात अजूनही आहे.

संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्यासंदर्भात नागपूरला दिनांक १८ मार्च १९४८ रोजी अखिल भारतीय कॉंग्रेसचे मुख्य सेक्रेटरी श्री. शंकरराव देव यांचे अध्यक्षतेखाली सभा झाली. या सभेत विविध वक्त्यांची भाषणे झाली. त्यात पंढरीनाथ पाटलांचे भाषण सर्वोत्कृष्ट झाल्याबद्दल सर्वांनीच त्यांची तारीफ केली.

## घटनासमितीवर प्रतिनिधी

११ जुलै १९४६ रोजी अकोला येथे विदर्भ प्रांतिक कॉंग्रेस कमिटीची सभा झाली. या सभेत घटनासमितीवर पाठवावयाच्या प्रतिनिधींच्या नावाचा विचार करण्यात आला. त्यावेळी ब्रिजलाल बियाणी, डॉ. पंजाबराव देशमुख, लक्ष्मणराव भटकर व गिबन अशी चार नावे विदर्भातून पाठवावयाचे ठरले. बियाणींनी भटकरांच्या नावास

विरोध केला. पण पंढरीनाथ पाटलांनी खूप खटपट केली. ठरल्याप्रमाणे १८ जुलै १९४६ रोजी असेंब्लीत संपूर्ण प्रांतातर्फे एकूण १७ प्रतिनिधी पाठविण्याचा निर्णय झाला. या १७ मध्ये अर्थातच डॉ. पंजाबराव देशमुख व लक्ष्मणराव भटकर यांचा समावेश होता. २१ जुलै १९४६ रोजी चिखली येथे घटनासमिती सदस्य या नात्याने प्रथम आगमनप्रसंगी लक्ष्मणराव भटकरांचे जंगी मिरवणुकीने स्वागत होऊन पंढरीनाथ पाटलांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

आक्टोबर १९४६ मध्ये नांदुरा व शेगाव म्युनिसीपालिटीच्या निवडणूका झाल्या. या निवडणूकांमध्ये पंढरीनाथ पाटलांनी धडाकेबाज प्रचार करून शेगाव म्युनिसीपालिटीत अध्यक्ष व १३ पैकी १० उमेदवार कॉंग्रेस पक्षाचे निवडून आले.

**क्रांतीसिंह नाना पाटील व पंढरीनाथ पाटलांची भेट**

१० व ११ नोव्हेंबर १९४६ रोजी नागपूर कायेदमंडळाचे अधिवेशन सुरू होते. याचवेळी क्रांतिसिंह नाना पाटील विदर्भाच्या दौऱ्यावर आले. उमरावती येथे १० व ११ नोव्हेंबर रोजी आयोजित ग्रामस्वराज्य शिबिरात नाना पाटील व पंढरीनाथ पाटील यांची भाषणे झाली. या शिबीरात क्रांतिसिंह नाना पाटील व पंढरीनाथ पाटील यांची प्रथमच भेट झाली. त्यांची ओळख झाली. या ठिकाणी त्यांनी क्रांतिसिंहाचे स्वागत केले. दिवसभर दोघेही कार्यक्रमात व्यस्त होते. संध्याकाळी २५ हजारांची जंगी सभा झाली. त्या सभेत नाना पाटलांचे भाषण झाले.

या असेंब्ली सत्र काळातच १२ नोव्हेंबर १९४६ रोजी मदन मोहन मालवीय यांचे निधन झाले. दिनांक १३ रोजी त्यांच्याप्रति शोक प्रदर्शित भाषणे झाली. पंढरीनाथांनी त्यात भाषण केले व आपल्या शोकसंवेदना व्यक्त केल्या. दिनांक १४ नोव्हेंबरला खास मोटारीने शेगावला येऊन त्यांनी क्रांतिसिंह नाना पाटलांचे स्वागत केले. नाना पाटलांनी शेगावला पाय ठेवताच प्रांतिक कॉंग्रेस सरकारने त्यांच्यावर भाषण बंदीची नोटीस बजावली. त्यामुळे सर्वत्र अत्यंत तीव्र स्वरूपाचा असंतोष लोकांमध्ये पसरला. त्यावेळी क्रांतिसिंहासोबत केशवराव जेधे, डॉ. पंजाबराव देशमुख व पंढरीनाथ पाटील हे होते. खामगाव, शेगाव, खांडवी व जळगाव येथे ही सर्व मंडळी सोबतच पोचली. या प्रत्येक ठिकाणी या सर्वांची भाषणे झाली. १५ नोव्हेंबरला ही सर्व मंडळी क्रांतिसिंहासोबत येरळी, नांदुरा, तरवाडी, मोताळा, मलकापूर, वाघजाळ, बुलडाणा,

सावरगाव, चिखली व मेहकर येथे गली. या सर्व ठिकाणी या सर्वांची भाषणे झाली. त्यावेळी या मंडळींची भाषणे ऐकण्यासाठी व क्रांतिसिंहांना पाहण्यासाठी प्रचंड संख्येने लोक जमत असत. दिनांक १६,१७,२१,२२ नोव्हेंबर या अवधीत ही सर्व मंडळी नाना पाटलांसोबत डोणगाव, धनज, नेतनसे, मालेगाव, वाशिम, उमरखेड, पुसद, दिग्रस, दारव्हा, यवतमाळ, कारंजा, मूर्तिजापूर इत्यादी गावांना गेले. नाना पाटलांच्या भाषणावर बंदी असल्यामुळे ही सर्व मंडळी भाषण करत. परंतु नाना पाटलांना पाहण्यासाठी लोक प्रचंड गर्दी करत. यवतमाळला तर ४० हजारांची सभा झाली. या संपूर्ण कालावधीत पंढरीनाथ पाटील व क्रांतिसिंह नाना पाटील एकमेकांच्या सहवासात येऊन त्यांची मने जुळली व त्यांच्यात मैत्री निर्माण झाली.

### बियाणी सुवर्ण जयंती व नाना पाटलांना मानपत्र

नामदार ब्रिजलाल बियाणी यांची सुवर्णजयंती साजरी करण्यासाठी विचारविनिमय करण्याकरिता १८ नोव्हेंबर १९४६ रोजी अकोला येथे एक सभा झाली. या सभेत पंढरीनाथ पाटील हजर होते. त्या सभेत ठरल्यानुसार ते ब्रिजलाल बियाणी सुवर्णजयंती महोत्सव फंड जमविण्यासाठी फिरले. ६ डिसेंबर १९४६ रोजी अकोला येथील सिनेमागृहात नामदार बियाणींचा ५१ वा वाढदिवस सुवर्णज्युबिली उत्सव श्री. एस. के. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. यावेळी बियाणींना १ लाख ६१ हजारांची थैली देण्यात आली.

१९ व २० नोव्हेंबरला मुसळधार पाऊस झाला. या पावसाने पिकांचे फार मोठे नुकसान झाले. अशा पावसातही पंढरीनाथ नाना पाटलांच्या मानपत्र कार्यक्रमासाठी रेल्वेने उमरावतीस गेले. १९ नोव्हेंबर १९४६ रोजी उमरावतीच्या म्युनिसिपालिटीने व उमरावती जिल्हा कौन्सिलने क्रांतिसिंह नाना पाटलांना मानपत्रे दिली. त्या दिवशी रात्री मुक्कामास असतांना पंढरीनाथ पाटील, पंजाबराव देशमुख, क्रांतीसिंह नाना पाटील, केशवराव जेधे यांची विविध विषयांवर चर्चा झाली. विशेष: शेतकरी व शेतमजुरांचे संघटन काँग्रेसमध्ये कसे करावे यावरच या चर्चेचा भर होता.

### म्युनिसिपल निवडणुका, न्याय पंचायत व ग्रामपंचायत स्थापना

या अवधीत खामगाव म्युनिसीपालिटी निवडणूकीचे प्रचार कार्य सुरू होते.

त्यासाठी ७ डिसेंबर १९४६ रोजी पंडित कानडे शास्त्री व पंढरीनाथ पाटील यांनी खामगावच्या टिळक मैदानावर प्रचाराची जाहीर व्याख्याने दिली. हा निवडणूक प्रचार सुरू असतानाच त्यांनी ग्रामीण भागांकडे दुर्लक्ष होऊ दिले नाही. चिखली तालुक्यात ग्रामपंचायती व न्यायपंचायती कोठे कोठे व कशा कशा स्थापन कराव्यात याबाबत १२ डिसेंबर रोजी पंढरीनाथांनी चिखली येथे दिवसभर विचार केला. त्यानंतर १५ डिसेंबर रोजी मेहकर येथील तहसीलदाराशी संपर्क साधून त्या तालुक्यातील ग्रामपंचायत व न्याय पंचायती कोठे-कोठे स्थापन कराव्यात याबाबत निश्चित निर्णय केला. ग्रामीण भागाची व्यवस्था लावून पंढरीनाथ पाटील खामगाव म्युनिसीपालिटीच्या निवडणूक प्रचारासाठी १४ डिसेंबर रोजी खामगाव येथे जाऊन टिळक मैदानावर झालेल्या प्रचार सभेत त्यांनी भाषण दिले. १६ डिसेंबर रोजी खामगाव म्युनिसीपालिटीची निवडणूक झाली. त्यावेळी पंढरीनाथ पाटलांनी सर्व मतदान केंद्रावर फेरफटका मारून आपली जबाबदारी चोख पार पाडली. मतदान सुरू असताना पावसाने हजेरी लावली. रात्री बुलडाण्यालाही चांगला पाऊस झाला. कारण १७ डिसेंबर रोजी पेनला पूर असल्यामुळे बुलडाणा-मेहकर वाहतूक सकाळी बंद होती.

या काळात ॲडव्हायझरी कमिटीच्या सभा, म्युनिसीपालीटीच्या निवडणूका, ग्रामपंचायत व न्याय पंचायतींच्या स्थापना सुरू असतानाच जळगाव तालुका बोर्डाच्या तसेच इतर तालुका बोर्डांच्या व जिल्हा कौन्सिल निवडणूकीची धावपळ सुरू झाली. त्यादृष्टीने पंढरीनाथांनी आपल्या आगामी दौऱ्याची योजना निश्चित करून ते २४ डिसेंबर ते ३० डिसेंबर १९४६ दरम्यान जळगाव, खामगाव, चिखली या तालुक्यातील बहुतेक गावात जाऊन प्रचार कार्य सुरू केले. याच दरम्यान त्यांनी शिक्षण परिषदांचेही आयोजन केले. ३१ डिसेंबरला खामगाव येथे शिक्षक परिषद भरविली. त्याच परिषदेत त्यांना जिल्हा शिक्षक संघाचे अध्यक्षपदही प्राप्त झाले. तालुका व जिल्हा बोर्डाच्या निवडणूकीची तयारी म्हणून पंढरीनाथ पाटलांनी पाचही तालुक्यात काँग्रेसच्या तेलघाणे, चरखा, खादी वगैरे कार्याचा प्रचार सुरू केला. तसेच शिक्षक संघाच्या पाचही तालुक्यांच्या परिषदा जाहीर केल्या. त्याप्रमाणे शिक्षण परिषदाही भरविल्या.

दुसरे महायुद्ध नुकतेच संपले होते. युद्धाचा परिणाम सर्वच क्षेत्रावर जाणवत होता. अन्नधान्याची टंचाई होती. १५ जानेवारी १९४७ रोजी अकोला येथे प्रांतिक काँग्रेस कमिटीची व विदर्भ असेंब्ली सभासदांची संयुक्त सभा अन्नधान्याच्या परिस्थितीचा

विचार करण्याकरिता भरली. अन्नधान्य मंत्री नामदार आर. के. पाटील व इतर वक्त्यांसह पंढरीनाथ पाटलांचे यावेळी भाषण झाले. ५ जानेवारी १९४७ रोजी खामगाव येथे बुलडाणा जिल्हा काँग्रेस कमिटीची सभा झाली. त्या सभेत काँग्रेसने तालुका व जिल्हा बोर्डाच्या निवडणूका लढू नये असे ठरले होते. परंतु या बोर्डाच्या निवडणुका काँग्रेसने लढाव्यात असे या सभेत ठरले. त्यामुळे पंढरीनाथांनी ५ जानेवारीच्या सभेत मांडलेल्या त्यांच्या मताला पुष्टी मिळाली. त्यामुळे त्यांचा उत्साह वाढला.

## कार्यकर्त्यांना जपले

असा कामाचा व्याप सतत वाढत असतानाही पंढरीनाथ पाटील कार्यकर्त्यांना जपत असत. त्यांच्यावर होणारे अन्याय निवारण्यासाठी वरिष्ठांकडे त्यांची बाजू समर्थपणे मांडून अन्याय दूर करण्याचा प्रयत्न करीत असत. जून १९४६ मध्ये मेहकर व मलकापूर तालुक्यातील काँग्रेस कमिटी पदाधिकाऱ्यांच्या तसेच जिल्हा काँग्रेस कमिटी पदाधिकाऱ्यांच्या निवडणूका झाल्यावर २७ जून रोजी नागपूरला जाऊन पंढरीनाथ पाटलांनी प्रिमीयर रविशंकर शुक्ल व पंडित द्वारकाप्रसाद मिश्र, नामदार देशमुख, आर. के. पाटील या मंत्र्यांना डॉ. पंजाबरावांसह भेटून आनंदस्वामींना सोडण्याबद्दल आग्रहपूर्वक प्रयत्न केले. तसेच दिनांक १७ जानेवारी १९४७ रोजी अकोला येथे नामदार बियाणींशी चर्चा करून ते नागपूरला पोचले. मुख्यमंत्री नामदार रवीशंकर शुक्ल यांची भेट घेऊन तपोवनकर श्री. भगवान पाटील यांचे वरील बोर्डाचा खटला सरकारने काढून घ्यावा म्हणून त्यांचे मन वळविण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.

लोकल बोर्ड इलेक्शन प्रचाराला चांगली गती आली होती. ५ फेब्रुवारी १९४७ रोजी खामगावला जिल्हा काँग्रेस कमिटीची सभा नामदार ब्रिजलाल बियाणी यांच्या उपस्थितीत झाली. या सभेत लोकल बोर्ड निवडणूकीसाठी जिल्हा काँग्रेस इलेक्शन बोर्ड स्थापन करण्यात आले. या बोर्डात पंढरीनाथांसह एकूण सात सदस्यांची निवड करण्यात आली. या बोर्डामुळे प्रचार कार्याला अधिकृत संघटित स्वरूप प्राप्त झाले. पंढरीनाथ पाटील तालुका ॲडव्हायझरी कमिटीतही सदस्य होते. त्या कमिटींच्या कामासाठी ते मेहकर, चिखली भागात सतत फिरत असत. त्याचाही फायदा त्यांना या निवडणूक प्रचारात झाला. पंढरीनाथ पाटील केवळ बुलडाणा जिल्ह्यातच नव्हे तर अकोला जिल्ह्यातही लोकल बोर्ड निवडणूक प्रचारासाठी श्री. गोपाळराव खेडकर,

श्री. कृष्णराव गारडगावकर यांचेसह फिरले. दिनांक २० फेब्रुवारी १९४७ रोजी विठोली येथे रात्री पंढरीनाथ पाटलांच्या अध्यक्षतेखाली मंगरूळपीर तालुका परिषद झाली.

## संयुक्त महाराष्ट्रात नवे प्रांतिक भेद माजतील

स्वातंत्र्याचा सूर्योदय होत असतानांच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राज्य शकट कसे चालवावे या संदर्भात १९१९ पासूनच राज्यकर्त्यांनी व हिंदुस्थानच्या पुढाऱ्यांनी विचारविनिमय सुरू केला होता. त्यासाठी घटना समिती नेमण्यात आली. या घटना समितीने एक उपसमिती नियुक्त केली. या उपसमितीने भाषांवर प्रांतरचना करण्याच्या इराद्याने मराठी बोलणारांचा स्वतंत्र प्रांत निर्माण करण्यास चालना मिळाली. भाषावार प्रांतरचना करण्याच्या दृष्टीने पावले उचलण्याचे ठरविले. त्याबाबत पंढरीनाथ पाटलांनी आपले मत निर्भिडपणे, स्वतंत्र, जाहीरपणे मांडले. त्यांच्या मते, संयुक्त महाराष्ट्रात नवे प्रांतिक भेद माजतील. याबाबत ते लिहितात, “ हिंदुस्थानच्या घटनासमितीने भाषावार प्रांतरचना करण्याच्या इराद्याने त्या कार्यासाठी एक उपसमिती नेमली असल्यामुळे आता मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांच्या स्वतंत्र प्रांताच्या स्थापनेला चालना मिळणे क्रमप्राप्त झाले आहे. म्हणून मी माझे मत नमूद करीत आहे. वस्तुत: मराठी भाषा बोलणाऱ्या मुंबई, वऱ्हाड व नागपूर या प्रांतातील सुमारे दोन कोटी लोकांचा संयुक्त महाराष्ट्र असा एकच प्रांत व्हावयास पाहिजे. परंतु त्यामुळे बेळगाव ते भंडारा यातील अंतर एक हजार मैलावर राहून राज्यकारभाराच्या दृष्टीने एका प्रांतिक सरकारला ते गैरसोयीचे अवघड असे होणार आहे या शिवाय सध्या मुंबई इलाक्यात जसे महाराष्ट्र, गुजरात व कर्नाटक किंवा वऱ्हाड, नागपूर व महाकोशल असे प्रांतिक वाद चालू आहेत तसे उद्याच्या महाराष्ट्रात महाराष्ट्र, वऱ्हाड किंवा नागपूर असे प्रांतिक वाद उभे राहण्याचाही संभव आहे. असल्या प्रांतिक भेदभावांनी नागपूर व वऱ्हाड प्रांताचे तोंड गेल्या २५ वर्षात चांगलेच भाजलेले असल्यामुळे तूर्त वऱ्हाड व नागपूर विभागाच्या मराठी बोलणारांचा ९-१० जिल्ह्यांचा महाविदर्भ प्रांत करण्यात यावा असे माझे स्पष्ट मत आहे. आणि हेच आजच्या राजकीय आर्थिक व भाषिकदृष्टीने श्रेयस्कर आहे.” (५८)

(मातृभूमि, अकोला ता. ३-७-१९४७)

मराठी भाषा बोलणारांचा संयुक्त महाराष्ट्र १ मे १९६० रोजी निर्माण झाला. त्यात गत ४३ वर्षात वऱ्हाड व नागपूर भागावर जो अन्याय पश्चिम महाराष्ट्राने केला व त्यातून विकासाचा अब्जावधी रूपयांचा अनुशेष निर्माण झाला. मराठवाडाही दुर्लक्षित

राहिला. यावरून पंढरीनाथ पाटलांचा पूर्वानुभव कथन करीत त्यांनी भविष्याचा वेध घेत स्वतंत्र महाविदर्भाची कल्पना मांडली. त्यातून त्यांचे द्रष्टेपण दिसून येते. त्यांच्या द्रष्टेपणाला दाद मिळाली असती तर आज जो अनुशेष वाढत आहे तो वाढण्याची पाळी आली नसती.

पंढरीनाथ पाटलांचे वरील स्पष्टीकरणात्मक व निर्णायक मत हे भविष्याचा अचूक वेध घेणारे होते. हे आज विदर्भासंदर्भात जे वाद गाजत आहेत त्यावरून स्पष्ट होते. आज स्वतंत्र विदर्भाची मागणी जोर धरू लागली आहे. एकेकाळी स्वतंत्र विदर्भाच्या मुद्यावर जांबुवंतराव धोटे जेलमध्ये असतांना निवडून आले. आजही बनवारीलाल पुरोहित व जांबुवंतराव धोटे एकत्र येऊन स्वतंत्र विदर्भाच्या मुद्यावर स्वतंत्र विदर्भ अभियान राबवत आहेत. काँग्रेसचे रणजित देशमुखही हा मुद्दा उचलून धरीत आहे. यावरून स्वतंत्र विदर्भ राज्य निर्माण होणे लोकहितास्तव व प्रशासकीय यंत्रणेच्या सोयीसाठी आवश्यक आहे. म्हणूनच पंढरीनाथांचे मत किती दूरदृष्टीचे होते हे दिसून आले. तसेच केवळ भाषिक विचार न करता राज्यशकट चालविण्यासाठी त्या प्रांतातील शेवटच्या माणसापासून राजधानीचे अंतरही विचारात घेणे किती महत्वाचे आहे हे अपण आज अनुभवतो आहोत. मुंबईच्या मंत्रालयात 'बुलडाणा कोठे आहे?' असा प्रश्न तेथे बसलेले सेक्रेटरी आजही विचारत असतात. म्हणून भाषावार प्रांतरचना भावनिक व सांस्कृतिकदृष्ट्या इष्ट असली तरी प्रशासकीयदृष्ट्या अडचणीची ठरल्यास एकाच भाषिक राज्याऐवजी एकाच भाषिकांचे अनेक राज्ये स्थापनेस हरकत नसावी अशा भाषिक राज्यांचा संघ असावा. तो सांस्कृतिक, भाषिक व आर्थिक अंगांच्या विकासाचा धोरणात्मक विचार करून नीती ठरवेल. त्या नीतीनुसार ती भाषिक राज्य कायदे तयार करून विकासाचे कार्य करतील. त्यामुळे सर्वसामान्य माणसालाही न्याय मिळेल. आजही हिंदी भाषकांची अनेक राज्ये आहेतच. तशीच ती मराठी भाषकांची राज्ये होण्यास अडचण नसावी.

### स्वतंत्र वऱ्हाड समिती

पुढे स्वतंत्र वऱ्हाड समितीची स्थापना होऊन तिचे ध्येयधोरणाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी जिल्हा व तालुका काँग्रेस पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन पंढरीनाथ पाटील गावोगाव फिरले. ब्रिटीश योजना, अन्नधान्य परिस्थिती, सेवादले, स्वतंत्र वऱ्हाड समितीचे कार्य या विषयांवर त्यांनी व्याख्याने दिली. (५९) (शेतकरी, मलकापूर ता. १२-७-४७)

दिनांक २५ एप्रिल १९४७ रोजी अकोला येथे स्वतंत्र वऱ्हाड समितीची सभा झाली. या सभेत पंढरीनाथांनी भाग घेतला. तसेच रात्री अखिल भारतीय पुरोगामी (फारवर्ड ब्लॉक म्हणजेच नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी स्थापन केलेला पक्ष) पक्षाचे अध्यक्ष सरदार शार्दूलसिंह कवीश्वर सिख यांचे जाहीर व्याख्यान ऐकले. दुसऱ्या दिवशी दिनांक २६ एप्रिल १९४७ रोजी नागपूर येथे पंतप्रधान ना. रवीशंकर शुक्ल यांच्या बंगल्यावर प्रांतिक काँग्रेस असेंब्ली पक्षाची सभा झाली. या सभेत पंचवार्षिक योजना मंजूर करायची होती. या सभेत 'सक्तीचे मोफत शिक्षण योजना' सरकारने हाती घ्यावी म्हणून पंढरीनाथ पाटलांनी अक्षरश: भांडण केले. त्यातच ती सभा संपली. प्राथमिक मोफत सक्तीच्या शिक्षणासाठी ते सतत संघर्ष करीत आले. त्यातून बहुजन समाज शिकून शहाणा व्हावा ही त्यांची तळमळ व्यक्त झाली.

१० मे १९४७ रोजी खामगाव येथे स्वतंत्र वऱ्हाड समितीच्या जिल्हा शाखेची सभा झाली. सदर सभेचे निमंत्रक पंढरीनाथ पाटील होते. या सभेत १० लोक कोऑप्ट करण्यात आले व त्यानंतर दिनांक ११ मे १९४७ रोजी स्वतंत्र वऱ्हाड समितीची सभा झाली. या सभेत पंढरीनाथ मुद्दाम हजर राहिले.

## चिखली म्युनिसिपालिटी अविरोध काँग्रेसच्या ताब्यात

दिनांक २१ एप्रिल १९४७ ते १६ मे १९४७ चिखली नगरपालिकेच्या निवडणूकीची धामधूम सुरू होती. या निवडणूकीत काँग्रेसचे उमेदवार निवडून आणण्यासाठी पंढरी पाटलांनीही खूपच पायपीट केली. हिंदु-मुसलमानांचे प्रमुख कार्यकर्ते सोबत घेऊन शहरभर फिरले. मुसलमानांची मनधरणी करीत त्यांना आपलेसे केले. १६ मे १९४७ रोजी निवडणूक होऊन चिखली म्युनिसीपालिटीचे अध्यक्ष व आठ सभासद काँग्रेसने उभे केले होते. ते सर्व अविरोध निवडून आल्याचे घोषित झाले. कारण १५ मे रोजी अनेक काँग्रेस विरोधी उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले होते. या सर्व विजयी उमेदवारांचे स्वागत रात्री एका जाहीर सभेत पंढरीनाथ पाटलांच्या अध्यक्षतेखाली झाले.

## स्वतंत्र वऱ्हाड बुलडाणा जिल्हा समितीची निर्मिती

स्वतंत्र वऱ्हाड बुलडाणा जिल्हा समितीचे निमंत्रक या नात्याने पंढरीनाथ पाटलांनी १८ मे १९४७ रोजी बुलडाणा जिल्हा शाखेच्या अध्यक्षाची निवड करण्यासाठी

खामगाव येथे सभा बोलावली होती. या सभेत डॉ. पारसनीस यांची स्वतंत्र वऱ्हाड जिल्हा समितीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

### वऱ्हाडाची कैफियत

२९ जून १९४७ रोजी अकोला येथे स्वतंत्र वऱ्हाड समितीची सभा झाली. या सभेत पंडीत जवाहरलाल नेहरू व सरदार वल्लभभाई पटेल यांचेकडे वऱ्हाड बद्दल डेप्यूटेशन पाठवावे असा ठराव पंढरीनाथ पाटलांनी मांडला. तो सर्वानुमते पास झाला. परत १० जुलै १९४७ रोजी अकोला येथे स्वतंत्र विदर्भ समितीची सभा झाली. सदर सभेत ठरल्याप्रमाणे तिच्यातर्फे प्रिमियरकडे वऱ्हाडची कैफियत मांडण्यासाठी डेप्युटेशन पाठविण्याचे ठरले. त्या डेप्युटेशनमध्ये अर्थातच पंढरीनाथ पाटलांचा समावेश होता. हे डेप्युटेशन दिनांक १२ जुलै १९४७ रोजी नागपूरला प्रिमियर नामदार पंडित रविशंकर शुक्ल व नामदार पंडित व्दारकाप्रसाद मिश्र यांना भेटले. या उभयनेत्यांशी एक तास चर्चा करून वऱ्हाडची कैफियत त्यांच्या कानावर घातली. लगेच दिनांक १३ जुलै ते १५ जुलै १९४७ या तीन दिवसात अबकारी खात्याचे मंत्री नामदार बाबासाहेब रोहोणेकर यांच्यासोबत बुलडाणा, चिखली, मेहकर, वाशिम, पुसद, दिग्रस, दारव्हा व यवतमाळ इत्यादी ठिकाणी सभा घेऊन निजाम व वऱ्हाड या विषयावर पंढरीनाथ पाटील व बाबासाहेब देशमुख रोहोणेकर यांची विस्तृत भाषणे झाली. त्यातून वऱ्हाड निजाम राज्यात जाऊ नये हे पटवून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. चिखली येथील सभेत पंढरीनाथ पाटलांनी देशातील एकूण परिस्थितीचा आढावा घेऊन स्वतंत्र वऱ्हाड समितीच्या कार्याची विस्तृत खुलासेवार माहिती दिली. बाबासाहेबांनी अन्नधान्य परिस्थिती वाईट / गंभीर निर्माण झाली तर दिल्लीचे मध्यवर्ती सरकार व मध्यप्रांत वऱ्हाड सरकार त्याचा प्रतिकार करेल. अशी ग्वाही दिली. निजामाने शिवाजी शिक्षण संस्थेला देणगी दिली असली तरी पंढरीनाथांनी मराठी बाणा सोडला नाही. हे स्पष्ट झाले. (६०) (शेतकरी, मलकापूर ता. २६-७-१९४७)

### निजाम व वऱ्हाडबाबत पत्रक

निजामाच्या सरहद्दीवरील हालचालींची पाहणी करण्यासाठी आमदार पंढरीनाथ पाटील यांनी निजाम सरहद्दीचा दौरा करून दिनांक १८ जुलै १९४७ रोजी एक पत्रक प्रसिद्ध केले. त्या पत्रकात ते म्हणतात, "स्वतंत्र विदर्भ समितीच्या दिनांक १० जुलै १९४७ रोजी अकोला येथे झालेल्या सभेच्या ठरावान्वये एक शिष्टमंडळ दिनांक १२

रोजी नागपूर येथे मध्यप्रांत वऱ्हाडचे पंतप्रधान नामदार पंडित रविशंकर शुक्ल यांना भेटले. वऱ्हाडच्या संरक्षणाबाबतची सरकारची बाजू शिष्टमंडळाने समजावून घेतली. आपली बाजू सरकारकडे मांडली. नामदार शुक्लाजींनी सरकारतर्फे वऱ्हाडी जनतेला संरक्षणाची जी आश्वासने दिली ती निजामच्या सरहद्दीवरील वऱ्हाडी जनतेला समाजावून सांगण्यासाठी व सरहद्दीवरील प्रत्यक्ष परिस्थिती पाहण्यासाठी मी (पंढरीनाथ पाटील) तारीख १४, १५ व १६ रोजी मलकापूर, बुलडाणा, चिखली, मेहकर, वाशिम, पुसद, दिग्रस दारव्हा व यवतमाळ ह्या सरहद्द भागात दौरा केला. वाशिमपासून माझेबरोबर स्वतंत्र वऱ्हाड समितीचे एक सदस्य व विदर्भ प्रांतिक काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी श्री. अप्पासाहेब कुळकर्णी (जी. आर. ) हे होते. आमच्या दौऱ्यात झालेल्या जाहीर सभांमधून अलोट जनसमुदाय लोटत होता. यावरून जनतेत या प्रश्नाबाबत किती तळमळ आहे हे दिग्दर्शित होत होते.

या दौऱ्यात जनतेवर वऱ्हाडच्या भावी भवितव्याची काय प्रतिक्रिया झाली ती आम्ही समजावून घेतली. सरहद्दीवरील जनतेत एक निजामाच्या फौजी आक्रमणाची व दुसरी निजामी हद्दीतील व वऱ्हाडातील गुंडांच्या आक्रमणाची अशी दुहेरी भीती निर्माण झाल्याचे आम्हाला स्पष्ट दिसून आले. यापुढे त्याभागातील लोकांत चिंतेचे वातावरण पसरलेले आहे. अशा गंभीर परिस्थितीत मला प्रांतिक सरकारला निक्षून सांगावयाचे आहे की, तारीख १५ ऑगष्ट नंतर वऱ्हाडच्या जनतेच्या संरक्षणाची पूर्ण हमी सरकारने घ्यावी. याबाबतीत सरकार काय कारवाई करणार आहे. याविषयी एक खुलासेवार पत्रक काढून ते वऱ्हाडचे जनतेत वाटणे आवश्यक आहे.

याशिवाय सरहद्दीवरील प्रमुख स्थळी पोलिसांची सशस्त्र दले लवकर उभारावी व शस्त्रे पुरवावीत अशी जनतेची मागणी आहे. या मागण्यांचा सरकारने तातडीने विचार करावा. 'वऱ्हाडची ब्राह्मणेतर जनता निजामी अधिपत्याखाली जाण्यास तयार आहे.' असा खोटा प्रचार काही मतलबी व्यक्तींकडून प्रांताबाहेर होत असल्याचे माझ्या निदर्शनास आले आहे. या बाबतीत मी एकच गोष्ट सांगितल्यास पुरे होईल की, या प्रांतातील ब्राह्मणेतर चळवळीचा मी एक प्रवर्तक होतो. म्हणून अधिकारयुक्त शब्दात मी सांगतो की, वऱ्हाडचा तो सारा बहुजन समाज देशाचे स्वातंत्र्य संपादनासाठी आज काँग्रेसमध्ये विलीन झाला आहे. आणि स्वतंत्र वऱ्हाड समितीचा तो मुख्य शक्ती बनला असून कोणत्याही परिस्थितीत निजामाचे अंशरूपानेही स्वामित्व स्वीकारण्यास त्याचा तीव्र विरोध आहे. म्हणून अशा खोट्या प्रचारावर कोणीही विश्वास ठेवू नये.

गेली साठ वर्षे कॉंग्रेसच्या तिरंगी निशाणाखाली देशाच्या स्वातंत्र्य युद्धात वऱ्हाडने पुरा हिस्सा उचललेला आहे. १५ ऑगष्ट रोजी देशाच्या इतर भागावर स्वतंत्र भारताचा तिरंगी ध्वज फडकेल त्या दिवशी तो एकच ध्वज वऱ्हाडवरही फडकला पाहिजे.

निजामाचा ध्वज जर त्या दिवशी स्वतंत्ररित्या अथवा राष्ट्रीय ध्वजाबरोबर फडकविण्यात आला तर गुलामगिरीचे प्रतीक असलेल्या त्या ध्वजाशी आपल्या सर्व शक्तीनिशी वऱ्हाडची जनता लढा देईल. अशी स्वतंत्र वऱ्हाड समितीने घोषणा केली आहे. ती अटळ आहे. स्वतंत्र वऱ्हाड समिती जो लढा देईल त्या लढ्यात चाळीस लाख वऱ्हाडी जनता सामील होऊन अखेर आपले स्वातंत्र्य संपादन करील अशी मला खात्री आहे." (६१) (शेतकरी, मलकापूर ता. २-८-१९४७)

**महात्मा गांधींना पत्र**

बहुजन ब्राह्मणेतर समाज संयुक्त महाराष्ट्र हवा या मताचा असताना काही ब्राह्मणेतर द्वेष्ट्यांनी वऱ्हाडातील ब्राह्मणेतर समाज निजामी राज्यात जाण्यास उत्सुक असल्याचे महात्मा गांधींना भासविले. ही बाब पंढरीनाथ पाटलांच्या लक्षात येताच त्यांनी तारीख १७ जुलै १९४७ रोजी महात्मा गांधींना एक पत्र लिहून कळविले की, आपण हे ऐकले आहे ते खोटे आहे. ब्राह्मणेतर समाज निजाम राज्यात जाण्यास उत्सुक नाही. त्यांना मराठी भाषिकांचा संयुक्त महाराष्ट्रच हवा आहे. त्यानंतर त्यांनी लगेच २० जुलै १९४७ रोजी चिखली तालुका स्वतंत्र विदर्भ समितीच्या पोटशाखेची सभा घेऊन वरीलबाबत जाहीर खुलासा करणारे विस्तृत भाषण केले.

पंढरीनाथ पाटलांच्या या मताला पूरक व पोषक असा ठराव स्वतंत्र वऱ्हाड कृती समितीच्या तारीख ४-८-४७ रोजी अकोला येथील राजस्थान भवनमध्ये ब्रिजलाल बियाणी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेने पास केला. (६२) (बुलेटिन नं. ५ ता. ४-८-१९४७)

१४ जुलै १९४७ रोजी रात्री दिल्ली येथे श्री. शंकरराव देव यांच्या घरी भरलेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे श्री. शंकरराव देव आणि ब्रिजलाल बियाणी यांच्या सहीने, "मुंबई, विदर्भ व नागपूर या प्रांतातील मराठी भाषा बोलणाऱ्यांचा प्रांत बनविण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी" तारीख ७ व ८ ऑगष्ट १९४७ रोजी या तीन भागातील निमंत्रितांची औपचारिक सभा बोलावण्यात आली. ही सभा अकोला येथे श्री. शंकरराव

देव यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वी रीतीने पार पडली. या सभेला लोकनायक बापूजी अणे आणि श्री ब्रिजलाल बियाणी, श्री. पूनमचंद राका, म. म. प्रो. द. वा. पोतदार प्रिन्सिपॉल धनंजयराव गाडगीळ, श्री. दा. वि. गोखले, बॅरिस्टर रामराव देशमुख, डॉ. पंजाबराव देशमुख, श्री गजाननराव माडखोलकर, बॅ. शेषराव वानखेडे, प्रि. श्रीमन्नारायण अग्रवाल, सौ. प्रमिला ओक, डॉ. गोपाळराव खेडकर, श्री. पंढरीनाथ पाटील व अप्पासाहेब कुळकर्णी इत्यादी हजर होते. या सभेत चर्चा होऊन गाडगीळांनी ठरावाचा मसुदा तयार केला. तो असा -

It is agreed that shall be one Province of united Maharashtra (Samyukta Maharashtra) with sub-Provinces for the Marathi-Speaking areas of central Province & Berar commonly styled. Mahavidarbh and West Maharashtra with separate legistatars and cabinets for the sub-provinces and with specifaied subject under their jurisdiction... There shall be a comman public service commission for the whole Province.(64)

(Tarun Bharat, Nagpur Dt. 13-8-1947)

(संयुक्त महाराष्ट्र म्हणून एक प्रांत राहून त्यामध्ये मध्यप्रांत वऱ्हाडमधील मराठी भाषा बोलणाऱ्या प्रदेशाचा, ज्याला सर्वसाधारणत: महाविदर्भ म्हणून संबोधण्यात येते व पश्चिम महाराष्ट्राचा असे उपप्रांत ठेवण्यात यावे. उपप्रांतांना अलग कायदेमंडळे आणि मंत्रीमंडळे राहून काही विशिष्ट खाती त्यांचेकडे सोपविण्यात येतील. ज्यावेळी आवश्यकता भासेल व शक्यता असेल त्यावेळी उपप्रांतासमान घटक निर्माण करण्याचा अधिकार प्रांताला राहील. संबंध प्रांतासाठी एक गव्हर्नर, एक डेप्युटी गव्हर्नर राहून त्यांची निवडणूक संबंध प्रांतातर्फे होईल. संपूर्ण प्रांतासाठी एक कायदेमंडळ राहून काही विशिष्ट प्रांतीय खाती त्याकडे सोपविण्यात येतील. प्रांतीय कायदेमंडळात लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधी राहतील. उपप्रांतांच्या निवडणुकी अलग अलग होतील. विशिष्ट प्रांतीय खाती त्याकडे सोपविण्यात येतील. विशिष्ट बाबींसाठी सबंध प्रांताचे खास ट्रायब्युनल राहून उपप्रांताची हायकोर्टस् अलग अलग राहतील. सबंध प्रांतासाठी एकच पब्लिक सर्व्हिस कमिशन राहील. (६३)

(संयुक्त महाराष्ट्र, अकोला ता. १०-८-१९४७)

या ठरावाबाबत सर्वश्री शंकरराव देव, ब्रिजलाल बियाणी, रामराव देशमुख, मा. श्री. अणे, द. वा. पोतदार, ध. रा. गाडगीळ, मा. सा. कन्नमवार, ग. त्र्यं.

माडखोलकर, गोपाळराव खेडकर, पंजाबराव शा. देशमुख, पुनमदचंद राका, सौ. प्रमिला ओक, श्रीमन्नारायण अग्रवाल, शे. कृ. वानखेडे, जी. आर. कुळकर्णी, दा. वि. गोखले व पंढरीनाथ पाटील यांच्या सह्या आहेत.

## डॉ. पंजाबराव देशमुखांचे आश्वासन

संयुक्त महाराष्ट्राची ही घटना जर कोणत्याही अडचणींमुळे घटनासमितीत मंजूर होऊ शकली नाही तर आम्ही बिनशर्त संयुक्त महाराष्ट्रात सामील व्हायला तयार होऊ. पण कोणत्याही परिस्थितीत संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न डावलला जाऊ देणार नाही. असे आश्वासन डॉ. पंजाबराव देशमुख, बॅ. शेषराव वानखेडे, श्री. पंढरीनाथ पाटील प्रभूती कार्यकर्त्यांनी श्री. शंकरराव देव यांना दिले. हा ठराव मंजूर झाल्यावर नागपूर प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे कार्यवाहक श्री. बा. गो. गावंडे यांना आज हिंदी प्रांतात अंतर्भुत असलेल्या मराठी भाषी प्रदेशाची पाहणी करून व त्यासंबंधी आकडेवार माहिती गोळा करून महाविदर्भाच्या सरहद्दी निश्चित करण्याच्या दृष्टीने पूर्वतयारी करण्याची सूचना श्री. शंकरराव देव यांनी केली व श्री. कन्नमवार यांनी हे काम ताबडतोब हाती घेण्याचे मान्य केले. (६४) ( तरूण भारत, नागपूर ता. १३-८-१९४७)

## स्वतंत्र वऱ्हाड प्रांत केल्याबद्दल वल्लभभाईंचे अभिनंदन

वरीलप्रमाणे प्रयत्नांना यश येऊन सरदार वल्लभभाई पटेलांनी वऱ्हाडप्रांत निजामाच्या राज्यात सामील न करता स्वतंत्र केला. त्याबद्दल पंढरीनाथांनी आनंदित होऊन सरदार वल्लभभाई पटेल यांना तारीख २७ ऑगष्ट १९४७ रोजी अभिनंदनाची तार दिल्लीला पाठविली. वऱ्हाड निजामाच्या सत्तेखाली नसावा असे सुरूवातीपासूनच पंढरीनाथ पाटलांचे धोरण होते. त्यानुसार त्यांनी प्रयत्न केले व त्यांना त्यात यश आले.

## महाकोशल व महाविदर्भ निर्माण करण्याची मागणी

नागपूर कायदे कौन्सिलचे अधिवेशन ६ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर या काळात भरणार होते. या अधिवेशनात मांडावयाचे महत्वाचे तीन ठराव पंढरीनाथ पाटलांनी तयार केले व ते या अधिवेशनासाठी पाठविले. त्यातील पहिला ठराव हा मध्यप्रांत वऱ्हाड कायदेमंडळाने यापूर्वीच पास केला की स्वतंत्र हिंदुस्थानातील प्रांतांची पुनर्रचना भाषावार तत्त्वावर व्हावी. तसेच हे तत्व कॉंग्रेसने कित्येक वर्षापूर्वी मंजूर केले असून

हिंदुस्थान संघराज्याच्या घटनासमितीने तर त्याबाबत एक कमिटी नेमून तिचा रिपोर्ट मागविला आहे. सबब हे कायदेमंडळ मध्यप्रांत वऱ्हाडचे ना. गव्हर्नर यांना अशी विनंती करते की, त्यांनी भाषावार तत्त्वावर ह्या प्रांताचे दोन उपप्रांतात महाकोशल व महाविदर्भ एकाच गव्हर्नरखाली निर्माण करून अलग अलग राज्यकारभार सुरू करावा.

## चिखली परिसरातील मुसलमानांना दिलासा

वऱ्हाड निजामाच्या जोखडातून सुटल्यामुळे मुसलमानात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली. त्यातुळे ते वऱ्हाड सोडून जाण्याच्या मन:स्थितीत होते. पंढरीनाथ पाटलांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी चिखली येथे १२ ऑक्टोबर १९४७ ला चिखलीतील हिंदूमुसलमानांची संयुक्त सभा घेऊन वऱ्हाड निजामाच्या जोखडातून मुक्त झाल्याबद्दल मुसलमानांनी भीती बाळगू नये. त्यांनी वऱ्हाड सोडून जाऊ नये असे आवाहन केले. या सभेला मुसलमान मोठ्या संख्येने हजर होते. चिखली भागातील मुसलमान हा भाग सोडून बाहेर जाणार नाही असे उपस्थित सर्व मुसलमानांनी एक मताने या सभेत ठरविले. पंढरीनाथ पाटलांच्या आवाहनास त्यांनी विश्वासपूर्ण प्रतिसाद दिला.

## काँग्रेसच्या भांडवलशाही संरक्षक धोरणाबद्दल नापसंती - नाना पाटलांचा दुसरा दौरा

२७ सप्टेंबर १९४७ ला क्रांतिसिंहांचा दुसरा दौरा उमरावतीला झाला. हा दौरा पंढरीनाथ पाटलांनी खास करून आयोजित केलेला होता. नाना पाटील उमरावतीस आले. त्याठिकाणी पंढरीनाथ पाटलांसह विविध कार्यकर्त्यांच्या भेटी घेतल्या कार्यकर्त्यांचे मनोगत हे सर्वसामान्यांचे मनोगत असते. सामान्य जनतेला काय हवे हे त्यातून त्यांना कळले. त्यानंतर डॉ. पंजाबराव देशमुख, अप्पासाहेब लाड, बापूसाहेब लाड व तेथील इतर नेते मंडळीशी या दोन पाटलांनी चर्चा करून काँग्रेसच्या भांडवलशाही संरक्षक धोरणाबद्दल नापसंती व्यक्त केली. याबाबत सर्वांचे एकमत झाले. दिनांक २८ सप्टेंबर रोजी वऱ्हाडातील ग्रामस्वराज्य सेवादल सैनिकांची सभा झाली. या सभेत डॉ. पंजाबराव देशमुख, पंढरीनाथ पाटील त्यानंतर श्री. अप्पासाहेब लाड, श्री. बापूसाहेब लाड यांची भाषणे झाली. तीस हजारावर लोक जनसमुदायासमोर काँग्रेसच्या भांडवलशाही संरक्षक नीतीबद्दल नापसंती लोकांसमोर मांडली. आयोजित केल्याप्रमाणे क्रांतिसिंह नाना पाटील दिनांक १ आक्टोबर १९४७ रोजी खामगाव, बुलडाणा होऊन

रात्री मुक्कामी ते चिखलीस आले. रात्री पाऊस असल्यामुळे १० वाजता अत्यंत कमी लोक जमले होते. म्हणून हा कार्यक्रम अपुरा राहिला. तो २ आक्टोबर गांधीजयंती निमित्त पंढरीनाथ पाटलांच्या अध्यक्षतेखाली ठेवून क्रांतिसिंह नाना पाटलांचे भाषण झाले. त्याच दिवशी रात्री गांधी जयंती निमित्त मलकापूर येथे क्रांतिसिंह नाना पाटील, पंढरीनाथ पाटील व नाशिकचे काकासाहेब वाघ यांचीही भाषणे झाली. यावेळी मोठी मिरवणूक काढण्यात आली. समोर महात्माजींचा फोटो व मागे टांग्यात क्रांतिसिंह नाना पाटील अशी व्यवस्था होती. गांधींच्या फोटोचे दर्शन व क्रांतिसिंह नाना पाटील यांना पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी होती. त्यांचे सोबत काकासाहेब वाघ, सौ. सुंदराबाई जाधव, सौ. लीलाताई, आमदार पंढरीनाथ पाटील, घटनासमितीचे सभासद श्री. लक्ष्मणराव भटकर व केळवदचे श्री. नारायणराव पाटील इत्यादी मंडळी होती.[६६]
(शेतकरी, मलकापूर, ता. ११-१०-१९४७)

## धाडमध्ये नाना पाटील - तिसरा दौरा

क्रांतिसिंह नाना पाटील यांचा दौरा यावेळी निजाम सरहद्दीवर ठेवण्यात आला. या दौऱ्याची पूर्वतयारी पंढरीनाथ पाटलांनी १६ नोव्हेंबर रोजीच केली. पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार क्रांतिसिंह नाना पाटील शुक्रवार तारीख २१ नोव्हेंबर १९४७ रोजी लोणारमार्गे चिखलीस आले व रात्री ९ वाजता धाड येथे निजामसरहद्दीला लागून पंढरीनाथ पाटलांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. या सभेत नाशिकचे काकासाहेब वाघ व क्रांतिसिंह नाना पाटील यांची जोरदार भाषणे झाली. यावेळी पंचक्रोशीतील दहा हजारावर लोक एवढ्या रात्री जमलेले होते.

## कोल्हापूर संस्थानच्या रयतेस राजकीय हक्क प्रदान

फुले जयंतीनिमित्त पंढरीनाथ पाटील कोल्हापूरला गेलेले होते. २९ नोव्हेंबरला ते माधवराव बागलांकडे थांबले. ३० नोव्हेंबर १९४७ रोजी कोल्हापूरचे महाराज छत्रपती शहाजी राजे भोसले यांनी कोल्हापूर संस्थानच्या प्रजेस नवीन राजकीय हक्क दिले. त्यामुळे अष्टप्रधानात सात प्रधान लोकनियुक्त होते. शिवाय संस्थानची राज्यघटना तयार करण्यासाठी लोकनियुक्त घटनासमितीची निवडणूक होणार होती. हे हक्क मिळाल्याबद्दल प्रजा परिषदेतर्फे ता. ३० नोव्हेंबर १९४७ ला संस्थानभर लोकांनी "विजयदिन" मोठ्या थाटात पाळला-साजरा केला. या उत्सवासाठी श्री. भाई माधवराव बागल यांनी पंढरीनाथ

पाटलांना मुद्दाम ठेवून घेतले. सर्व शहरात गुढ्या, तोरणे, झेंडे, पताका, हत्ती घोड्यांवरून मिरवणूक निघाली. बागलांच्या अध्यक्षतेखाली विराट सभा झाली. हा सारा सोहळा पाहून पंढरीनाथ हर्षभरित हृदयाने रात्री बेळगावकडे रवाना झाले.

### बहुजन समाजास काँग्रेसमध्ये जाण्याचे आवाहन

बेळगावला राष्ट्रवीरचे संपादक श्री. शामराव देसाई यांच्याकडे ते उतरले. दिनांक १ डिसेंबर १९४७ रोजी रात्री तेथील मराठा समाज सुधारणा मंडळातर्फे रंगुबाई पॅलेसमध्ये पंढरीनाथ पाटलांचे व्याख्यान झाले. त्यावेळी त्यांनी बहुजन समाजाने काँग्रेसमध्ये जाऊन त्या पक्षात आपले बहुमत करावे. काँग्रेसमार्फत देशात शेतकरी, कामकरी वर्गाचे राज्य स्थापन करावे. अशा आशयाचे भाषण केले. या भाषणाचा चांगला परिणाम झाला. अनेक कार्यकर्ते त्यांना भेटले. मराठा समाजाचे अध्यक्ष डॉ. कोवाळकर यांनी रात्री त्यांना उत्तम मेजवानी दिली.

### पंतप्रधान शुक्लांची चोखामेळा बोर्डींगला भेट

मध्य प्रांत वऱ्हाडचे पंतप्रधान पं. रविशंकर शुक्ल हे दिनांक ७ डिसेंबर ते १० डिसेंबर १९४७ बुलडाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. त्यांचा व पंढरीनाथांचा घनिष्ठ संबंध असल्यामुळे या दौऱ्यात पंढरीनाथ पाटलांचे कार्यक्षेत्र असलेल्या चिखली, बुलडाणा, लोणार तसेच जिल्ह्यातील मुख्य शहर खामगाव येथे त्यांच्या सभा झाल्या. दिनांक ८ रोजी चिखलीला मुक्कामी असतांना पंतप्रधान शुक्ल यांनी चिखली येथील चोखामेळा बोर्डिंगला भेट दिली. बोर्डींगातील मुलांसमोर उद्‌बोधक भाषण केले. त्यानंतर ते पंढरीनाथांच्या घरी जाऊन त्यांनी त्यांच्याकडे अल्पोपहार घेतला. पंढरीनाथांचे सामाजिक काम पाहून ते प्रभावित झाले.

### जनपदांचे निर्मिती प्रक्रिया सुरू

स्वातंत्र्याची बाल्यावस्था व भारतीय राज्यघटनेचे रांगणे सुरू होते. सामाजिक सुधारणा व राजकीय सुधारणांचा तो काळ होता. स्वातंत्र्यात लोकतंत्र कसे राबवायचे याबाबत विविध मतप्रवाह होते. त्यापैकीच एक सत्तेचे विकेंद्रीकरण हा एक मतप्रवाह होता. जनपद सभांची निर्मिती करण्याची प्रक्रिया सुरू होती. 'जनपद सभा' या बीलाच्या ड्राफ्टींग कमिटीची सभा दिनांक २२ डिसेंबर १९४७ रोजी जबलपूर येथे झाली. त्या

सभेत एक सदस्य म्हणून पंढरीनाथांनी सक्रिय सहभाग घेतला व ग्रामीण लोकांच्या दृष्टीने हितकारक अशा सूचना व सुधारणा त्यांनी त्या ठिकाणी मांडल्या.

### सेवादल सैनिक शिबीर व महात्मा गांधी हत्या

दक्षिण, पश्चिम व उत्तर महाराष्ट्र दौरा करून पंढरीनाथ पाटील व त्यांचे सहकारी वऱ्हाडात परत आले. वऱ्हाडात आल्यावर त्यांनी बुलडाणा जिल्ह्याच्या चिखली तालुक्यातील सावरगाव येथे युवकांसाठी सेवादलाचे शारीरिक व बौद्धिक तसेच लष्करी शिक्षणाचे शिबीर घेण्याचे ठरवून त्यासाठी वर्गणी जमविली. दिनांक २१ जानेवारी ते २१ फेब्रुवारी १९४८ असे एक महिन्याचे शिबीर घेण्याचे ठरविले. त्यासाठी २० जानेवारीला जिल्ह्यातून १०० युवक जमा झाले. पंढरीनाथ पाटलांच्या अध्यक्षतेखाली व नामदार ब्रिजलाल बियाणींच्या हस्ते सदर शिबीराचे उद्घाटन २० जानेवारी १९४८ रोजी झाले. या शिबिरार्थींना शिकविण्यासाठी श्री. पांडूरंग भटकर बी. ए. यांनी लाठीकाठी, भाला इत्यादी व लष्करी कवायत कॅप्टन श्री. राम लाड यांनी २१ जानेवारीपासूनच जोमाने शिकविण्यास सुरूवात केली. या शिबिरासाठी खास तज्ज्ञ म्हणून व्याख्याने देण्याचे शिक्षण देण्यासाठी मुंबई येथील सत्यशोधक समाज विद्यार्थी संघातर्फे श्री. काटकर, शिंगटे, पाटणकर हे दिनांक २२ जानेवारीला सावरगावला पोचले. त्याच दिवशी काटकरांनी सुंदर व्याख्याने सुरूवात केली. शारीरिक शिक्षणाबरोबरच ही मुंबईकर मंडळी सैनिकांना व्याख्याने देण्याचे शिक्षण देऊ लागली. शिबिरात पंढरीनाथ पाटील स्वत: हजर असत. शिबिराचे काम उत्तम रीतीने सुरू असताना दिनांक ३० जानेवारी रोजी रात्री महात्मा गांधींचा खून झाल्याची वार्ता आली. त्यामुळे शिबिरावर शोककळा पसरली. पंढरीनाथ पाटील व शिबिरातील सर्वच अत्यंत दु:खी झाले. गांधी हत्येमुळे देशात मोठा हाहा:कार माजला. सर्वत्र शोककळा पसरली. १०० सेवादल सैनिकांसह चिखलीस येऊन पंढरीनाथ पाटलांनी ३१ जानेवारीला शहरातून महात्मा गांधींच्या फोटोची मोठी मिरवणूक काढली. नदीकाठी मिरवणूकीचे विसर्जन होऊन तिचे सभेत रूपांतर झाले. पंढरीनाथ पाटलांनी महात्मा गांधींचे गुणगौरवपर व्याख्यान केले. चिखलीवरून सावरगावास परत गेल्यावर १ तारखेला त्यांना कळले की, महात्मा गांधींचा खूनी नथुराम गोडसे नामक तरूण हा कोकणस्थ ब्राह्मण आहे. २ फेब्रुवारीला देशभर रक्षाविसर्जन झाले. चिखलीसही हा कार्यक्रम झाला. लोक नदीकाठी ज़मले. तेथे पंढरीनाथ पाटलांचे भाषण झाले.

## ब्राह्मण डेप्युटी कमिश्नर जोशींकडून शिबीर सैनिकांना अटक करण्याचा प्रयत्न

सर्वत्र हाहा:कार माजलेल्या स्थितीत पंढरीनाथ पाटील दिनांक ७ फेब्रुवारीला बुलडाणा येथे येऊन त्यांनी डेप्युटी कमिश्नर श्री. जोशी व डिस्ट्रीक्ट सुपरिटेंडेंन्ट ऑफ पोलिस श्री. पांडे यांची भेट घेतली. तेव्हा श्री जोशी यांनी सांगितले की, सावरगाव शिबिरातील सैनिकांनी तेथील पटवाऱ्याचे घर लुटले. पंढरीनाथ पाटील परत सावरगावला गेले. त्यांनी चौकशी केली असता त्यांना कळले की जोशींची माहिती खोटी आहे. पुढे हेही लक्षात आले की, जोशी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित होते. संघाशी संगनमत करूनच हा कट रचला गेला. जोशी सेवादल शिबीर सैनिकांना कट करून अटकविण्याचा प्रयत्न करतो आहे. म्हणून १६ फेब्रुवारी १९४८ रोजी ते पुन्हा डेप्युटी कमिशनर जोशी व डी.एस.पी. पांडे यांना भेटले. सावरगाव प्रकरणावर बोलले. १७ फेब्रुवारीला पंडित दिनकर कानडे शास्त्री यांनी शिबिराला भेट देवून समाधान व्यक्त केले. एवढेच नव्हे तर २५ रूपये देणगीही दिली. १८ फेब्रुवारीला जोशी व पांडे सावरगावला चौकशीला आले. त्यावेळी पंढरीनाथ पाटलांचीही त्यांनी भेट घेतली. सदर शिबीराचा समारोप २१ फेब्रुवारीला श्री. कृष्णरावबापू गारडगावकर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न होऊन दुसरे दिवशी मुंबईकरांचा चिखली येथे पोवाडे व कीर्तनाचा कार्यक्रम होऊन पंढरीनाथांचे भाषण झाले. या शिबिरात मुंबईकरांनी व्याख्याते निर्माण करण्याचे कार्य उत्तम रीतीने पार पाडले.

## सावरगाव प्रकरणाची तड

आपल्या माणसांवर होणारे अन्याय व अत्याचार थांबविण्यासाठी व आपल्या माणसांचा बचाव करण्यासाठी ते नेहमी अग्रेसर असत. सावरगाव शिबीरातील सैनिकावर ब्राह्मण डी.सी. व डी.एस.पी. ने जे खोटे खटले दाखल केले होते, ते काढून घेण्यासाठी सरकारवर दबाव आणण्यासाठी त्यांनी २ एप्रिल १९४८ रोजी झालेल्या असेंब्ली काँग्रेस पक्षाच्या सभेत त्याबद्दल काम तहकुबीची सूचना मांडली. ते खटले काढून घेण्याचे अभिवचन मिळाल्यावरच तहकूबीची सूचना मागे घेतली. अन् आपल्या अनुयायांचे संरक्षण करण्याची क्षमता व ताकत कोठे केव्हा व कशी वापरावी याची चुणूक पंढरीनाथांनी यावेळी दाखविली. जो आपल्या अनुयायांचे संरक्षण करतो तो खरा त्राता व तोच खरा नेता. हे व्यवहारी तत्व त्यांना चांगलेच अवगत झालेले होते. त्यामुळे या प्रसंगातून त्यांचे नेतृत्वगुणही दिसून आले. ४ ते ६ एप्रिल १९४८ या काळात ते

नागपूरातील आपल्या मित्रांना भेटले त्यांच्या सहयोगाने सावरगाव प्रकरणाची तड लावण्याचा प्रयत्न केला. त्यात त्यांना ६ एप्रिलला यश आले. आपल्या सैनिकांच्यावरील खटले सरकारने काढून घेतले. त्याचा सात्विक आनंद त्यांनी अनुभवला.

जोशींनी जिल्ह्यातील आणखीही काही काँग्रेस कार्यकर्त्यांवर खोट्या केसेस भरल्या होत्या. त्यात पिंपळगाव काळे, वडशिंगी व सातगाव भुसारी या गावचे कार्यकर्ते होते. तसेच सावरगावचे संतोषराव पाटील, सात आठ कार्यकर्ते व सरकारी कामदार महार यांचा त्यात समावेश होता. त्या केसेस खोट्याच असल्यामुळे कोर्टात टिकू शकल्या नाहीत. द्वेषमूलक भावनेतून ह्या बनावट केसेस भरल्या असल्याचे लक्षात येताच मॅजिस्ट्रेटनी त्या केसेस काढून टाकल्या. पटवाऱ्याच्या घरातून चोरीस गेलेला माल मालगणी येथे त्याच्या नातेवाईकाकडे सापडला.

**ब्रिजलाल बियाणींच्या खोडीतून राजकीय संघर्ष**

६ मे १९४८ रोजी प्रांतिक काँग्रेस कमिटीची निवडणूक झाली. त्या निवडणूकीत विश्वासघाताने बियाणींनी डॉ. पंजाबरावांचा पाडाव केला. बियाणींच्या या विश्वासघाताने पंजाबरावांना वाईट वाटले. त्यांनी पंढरीनाथ पाटलांना तार करुन व उमरावतीस बोलावून घेतले. त्याप्रमाणे पंढरीनाथ पाटील दिनांक १० मे १९४८ रोजी उमरावतीस गेले. दोघांची भेट होऊन राजकीय परिस्थितीवर विचार विनिमय झाला. यापुढे ब्रिजलाल बियाणीला विरोध करण्याचे ठरले. कारण खोडी बियाणींनी केली. यावेळेपासून वऱ्हाडच्या राजकारणाला कलाटणी मिळाली.

भारतीय राज्यघटना समिती, भाषावार प्रांतरचना समिती व जिल्हा कौन्सिलांची तालुका जनपदात रूपांतर करण्याची प्रक्रिया सुरू होती. वऱ्हाड निजाम सत्तेखाली राहिला नाही. तो मुक्त झाला. या संदर्भात पंढरीनाथ पाटलांनी दिनांक १२ मे १९४८ ला वऱ्हाडप्रांताचे कमिश्नर श्री. कामत आय.सी.एस. यांची भेट घेतली. यावेळी त्यांच्यासोबत घटनासमितीचे सदस्य श्री. लक्ष्मणराव श्रावणजी भटकर हेही होते. या भेटीत त्यांनी बुलडाणा जिल्ह्याची भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक स्थिती निजामराज्य हद्द यावर गंभीर चर्चा केली.

प्रांतिक काँग्रेस कमिटी सदस्यांची निवड झाल्यावर दिनांक १३ मे १९४८ ला प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदाच्या निवडणूकीची तारीख लागली. पंढरीनाथ

पाटील तारीख ११ व १२ ला खामगाव, जळगाव व मलकापूर तालुक्यात फिरून प्रांतिक काँग्रेस कमिटी सदस्यांना भेटले. या निवडणूकीत ब्रिजलाल बियाणीला विरोध करण्याचे ठरले. त्यांच्या विरोधी प्रचार करून पंढरीनाथ पाटील दिनांक ११ लाच पाच मतदार मेंबर सोबत घेऊन मूर्तिजापूरास रात्रीच पोचले. दिनांक १२ ला तेथे डॉ. पंजाबराव देशमुख व वामनराव जोशीही आलेले होते. बियाणी विरोधात तेथे सोळा सभासद एकत्र झाले. दिनांक १३ ला डॉ. पंजाबराव देशमुख, वामनराव जोशींसह सर्वप्रांतिक काँग्रेस कमिटी मेंबर्स मूर्तिजापूरला जेवण करून दुपारी दोन वाजता अकोल्यास पोचले. प्रांतिक काँग्रेस अध्यक्षांची निवडणूक झाली. त्या निवडणुकीत बियाणींना २७ तर जवादेंना १७ मते पडली व येथूनच राजकीय संघर्षाला सुरूवात झाली.

## डेप्युटी कमिशनर जोशींचा पाणउतारा

पदांची निर्मिती होत असतांना जिल्हा कौन्सिलांची मालमत्ता जनपदांना हस्तांतरण करण्यासाठी एक कमिटी निर्माण करण्यात आली. त्या कमिटीत अनुभवसंपन्न जिल्हा कौन्सिल अध्यक्ष व आमदार म्हणून पंढरीनाथ पाटलांचा समावेश झालेला होता. त्या कमिटीची सदस्य संख्या पाच होती. या कमिटीची सभा दिनांक १५ मे १९४८ रोजी बुलडाणा येथे झाली. दुसरी सभा २० मे १९४८ रोजी परत बुलडाणा येथे झाली. तीत जिल्हा कौन्सिलची मालमत्ता जिल्ह्यातील पाच तालुका जनपदात कशी विभागावी याचा विचार झाला. त्याचप्रमाणे बुलडाणा जिल्ह्यात गोपाळराव खेडकरांचा दौरा झाला. या दरम्यान किनगावराजा सर्कलची शेतकरी परिषद दिनांक २३ मे १९४८ रोजी राहेरी बु॥ येथे झाली. या परषिदेत गोपाळराव खेडकर व पंढरीनाथ पाटलांची भाषणे झाली.

सावरगाव शिबिरार्थींवर खोट्या केसेस केल्याबद्दल डेप्युटी कमिशनर जोशी यांच्याबद्दल पंढरीनाथांच्या मनात चीड निर्माण झालेली होती. तो कोठे तावडीत सापडतो याची संधी ते शोधत होते. दिनांक २९ मे १९४८ रोजी बुलडाणा येथे जिल्हा लाचलुचपत प्रतिबंध कमिटीची सभा झाली. या सभेत पाटलांनी जोशीचा चांगलाच पाणउतारा केला.

## मराठा मनोवृत्ती व बियाणी

पंढरीनाथांसह पंजाबराव देशमुखांनी दिनांक २१ व २२ जून १९६१ ला

मोझरी आणि नागपूर दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी मोझरीला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची भेट घेऊन त्यांच्याशी बदलत्या राजकीय व सामाजिक परिस्थिती संदर्भात एक तास चर्चा केली व नागपूरला जाऊन पंडीत द्वारकाप्रसाद मिश्र यांची भेट घेतली.

दिनांक २९ जून १९४८ रोजी नागपूरला विदर्भ प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या २१ सभासदांची बैठक राजे प्रतापसिंह भोसले यांचे बंगल्यात झाली. बियाणींनी डॉ. पंजाबराव देशमुखांना प्रांतिक काँग्रेस कमिटीवर निवडून येण्यास विश्वासघाताने खोडा घातला. याची खंत या सर्व सभासदांना वाटत होती. बियाणींवर अविश्वास ठरावाद्वारे सूड उगवावा असे सर्वांच्या मनोमनी ठरले असावे व त्याचा सुगावा अर्थातच बियाणींना लागला असावा. म्हणूनच की काय त्यांनी दिनांक २९ जून १९४८ रोजी राजीनामा दिला. त्यामुळे त्यांच्यावरील अविश्वास ठरावाची मोहिम थंडावली.

बियाणींनी प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या पदाचा राजीनामा दिला. ते नव्या जोमाने प्रतिपक्षावर मात करण्यासाठी कामाला लागले. एकमेकांचे पायात पाय अडकवून स्वजनांना पाडणे - मागे ओढणे - हीच मराठ्यांची खरी ओळख आहे. हे बियाणींना माहित असणार म्हणूनच त्यांनी पंजाबरावांच्या स्वजनांपैकी डॉ. गोपाळराव खेडकरांना प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदाचे उमेदवार करण्याचे ठरविले. बियाणींच्या गळाला मासा लागला. ८ जुलै १९४८ रोजी प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या २२ सभासदांसह डॉ. पंजाबराव देशमुख, वामनराव जोशी व पंढरीनाथ पाटील हे अकोला येथे आले. बियाणीतर्फे गोपाळराव खेडकर तर पंजाबरावतर्फे बाबुराव देशमुख एकमेकांच्या विरोधी अध्यक्षपदाच्या निवडणूकीत उभे ठाकले. बियाणींनी याही वेळी पक्षपात करून डॉ. गोपाळराव खेडकरांना निवडून आणले. डॉ. पंजाबराव देशमुख व ब्रिजलाल बियाणी यांच्यातील दरी वाढत गेली. दिनांक २८ जुलै १९४८ रोजी हे २२ प्रांतिक काँग्रेस कमिटीचे मेंबर दिल्लीला राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्याकडे बियाणींनी केलेल्या पक्षपाताबद्दल न्याय मागण्यासाठी रवाना झाले.

### मराठा-मारवाडी दरी वाढली

वर नमूद केल्याप्रमाणे मराठे व मारवाडी अशी दरी निर्माण झाली. तिचा शेक आता जिल्हा पातळीवरील राजकारण्यांनाही लागू लागला. दिनांक ११ जुलै १९४८ रोजी बुलडाणा जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदाची निवडणूक झाली. तीत

पंढरीनाथ पाटलांना १८ तर भिकू मारोती पाटील यांना मराठेतर मारवाड्यांची १९ मते पडून ते निवडून आले. बियाणी गट जिल्हा पातळीवर वरचढ ठरला.

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीची चळवळ सुरू झाली होती. दिनांक २० जुलै १९४८ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख व पंढरीनाथ पाटील हे ना. पंडित द्वारकाप्रसाद मिश्र यांना भेटले. त्याच दिवशी अखिल भारतीय काँग्रेसचे मुख्य सचिव श्री. शंकरराव देव यांचे अध्यक्षतेखाली महाराष्ट्र, नागपूर व वऱ्हाड या तीनही प्रांतातील २१ मेंबर प्रतिनिधींची सभा झाली. या प्रतिनिधींमध्ये पंढरीनाथ पाटलांचा समावेश होता.

याचवेळी जनपदाची निर्मिती प्रक्रिया सुरू झाली होती. त्या कामासाठी पंढरीनाथ पाटील ४ व ५ ऑगष्टला नागपूरात होते. या दोन दिवसात त्यांनी नामदार पी. के. देशमुख व नामदार गोखले यांची भेट घेतली. त्याठिकाणी त्यांनी त्यांच्या मतानुसार चिखली व मेहकर तालुक्यातील जनपद सभांची सर्व सभासदांची नॉमिनेशन्स पंढरीनाथांच्या मनाप्रमाणे करून दिली.

पंढरीनाथ पाटलांनी शिफारस केलेली सर्व तालुका जनपद सदस्यांची नावे दिनांक १६ ऑगष्ट १९४८ रोजी सरकारकडून मंजूर होऊन आली. सावरगावचे श्री. संतोषराव पाटील चिखली जनपदाचे चेअरमन झाले. त्यानिमित्त सावरगावला त्यांच्या अभिनंदनाची सभा झाली. त्या सभेत पंढरीनाथ पाटलांनी संतोषराव पाटलांचा गुणगौरव केला.

### लोहपुरूषाची कार्यवाही व निजामाची शरणागती

भारताला स्वातंत्र्य मिळाले तरी निजाम हैद्राबाद व जुनागड (गुजरात) ही मुसलमानाची राज्य अद्यापही भारतात विलीन झालेली नव्हती. धार्मिक मुद्यावर पाकिस्तानची निर्मिती झाली. त्यामुळे या दोनही इस्लामी सत्ताधाऱ्यांचा कल अद्यापही भारतात विलीन होण्याचा नव्हता. या दोन्ही संस्थानात राज्यकर्ते मुसलमान होते. मात्र रयत मोठ्या संख्येने हिंदू होती. अर्थातच रयतेला स्वतंत्र भारतात विलीन व्हावे असे वाटणे साहजिक होते. मराठवाड्यातील ज्येष्ठ श्रेष्ठ स्वातंत्र्यप्रेमी निमाज हद्दी बाहेर येऊन निजाम हद्दीतील स्वातंत्र्य चळवळीला प्रोत्साहन देत. लोकमताचा कल पाहून त्यावेळी भारताचे गृहमंत्री असलेले पोलादी पुरूष श्री. वल्लभभाई पटेल यांनी सरहद्दीवरील काँग्रेस कार्यकर्त्यांना निजामी राजवटीतील लोकांचे मनोबल वाढविण्यासाठी, सरहद्दीच्या गावातून

दौरे काढून, दिल्ली सरकार रयतेच्या संरक्षणासाठी कटिबद्ध आहे. त्यांनी धीर सोडू नये. याची ग्वाही देण्यासाठी पाठविले. दिनांक ५ सप्टेंबर १९४८ रोजी पंढरीनाथ पाटलांनी धाड (ता. चिखली) गावाजवळील सरहद्दीवर निजाम हद्दीलगतच्या गावातील लोकांच्या भेटी घेऊन त्यांना धीर दिला. ७ सप्टेंबर १९४८ रोजी नागपूरला काँग्रेस असेंब्ली पक्षाची सभा झाली. त्या सभेत पंढरीनाथ पाटलांनी परिस्थितीची जाणीव करून दिली. त्याच दिवशी त्यांनी नागपूरात असलेले त्यांचे जुने मित्र हेन्द्री ग्रीनफिल्ड यांची भेट घेऊन जुन्या मैत्रीला उजाळा दिला.

रयतेचे मनोबल वाढविण्यासाठी पंढरीनाथ पाटलांचा निजाम हद्दीवरील गावांचा दौरा सुरू असतांनाच १२ सप्टेंबर १९४८ रविवारी रात्री १२ वाजता नंतर म्हणजेच सोमवारी १३ सप्टेंबर १९४८ दुपारी १ वाजता निजाम संस्थानात लोकराज्य स्थापनेस्तव व रजाकारी अत्याचार थांबविण्यासाठी हिंदी युनियन सरकारच्या फौजा घुसल्या. ही धाडसी निर्णायक कार्यवाही तत्कालीन भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी केली. ही कार्यवाही सतत ५ दिवस चालली. शुक्रवार ता. १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजाम हिंदी सरकारला संध्याकाळी ५ वाजता शरण आला. ही बातमी पंढरीनाथ पाटलांना चिखली येथे त्याचदिवशी सायंकाळी साडेपाच वाजता ऐकायला मिळाली. दिनांक १८ ला पंडीत जवाहरलाल नेहरूंनी आकाशवाणीवर रात्री साडेआठ ते पावणेनऊ वाजेपर्यंत भाषण केले. त्यात त्यांनी सांगितले की, हैद्राबादचा राज्यकारभार तेथील जनता ठरवेल त्या घटनेप्रमाणे चालेल. हे भाषणही पंढरीनाथ पाटलांनी चिखली येथेच ऐकले.

निजाम शरण आला तरी सरहद्दीवरील गावात रजाकारांचा धुडगूस सुरूच होता. म्हणून पंढरीनाथ पाटलांनी दिनांक १९ सप्टेंबर १९४८ रोजी रविवारी या रजाकारांचा बंदोबस्त करण्यासाठी पंतप्रधान मुंबई व नागपूर यांना पत्रे पाठविली. वरील संदर्भात नामदार खेर मुंबई व नामदार पं. द्वारकाप्रसाद मिश्र नागपूर यांना तारा केल्या. तसेच लगेच रात्रीच डी.सी. व डी.एस.पी. यांचीही भेट घेतली. या द्रुतगती हालचालींचा परीणाम होऊन दिनांक २१ सप्टेंबर १९४८ रोजी हिंदुस्थानी सरकारकडून रजाकारांचा बंदोबस्त करण्यासाठी डी.एस.पींना पंढरीनाथ पाटील पुन: भेटले व मिलिटरी फोर्स मागविला. तो फोर्स तत्काळ आलाही. त्याचबरोबर पंढरीनाथ पाटील धाडपासून देऊळगावराजापर्यंत सरहद्दीने फिरले.

## जनपदांची निर्मिती

या सर्व घडामोडी दरम्यान तारीख १४ सप्टेंबर १९४८ मंगळवार रोजी असेंब्लीची बैठक संपल्यावर संध्याकाळी ८ वाजता नागपूरला राजेप्रतापसिंह भोसले यांच्या बंगल्यात मुंबई, नागपूर व वऱ्हाड प्रांतातील प्रतिनिधींची संयुक्त महाराष्ट्र समितीची सभा झाली. या सभेत पंढरीनाथ पाटलांनी आपले विचार सडेतोडपणे मांडले.

जनपदांची निर्मिती झाल्यावर चिखली जनपद सभेची पहिली सभा तारीख २८ सप्टेंबर १९४८ मंगळवारी झाली. या सभेत सब कमिट्यांची निर्मिती होऊन पंढरीनाथ पाटलांची वर्णी अर्थ व स्थापत्य या दोन कमिट्यावर लागली.

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीची बैठक गुरूवार दिनांक ३० सप्टेंबर १९४८ रोजी नागपूरला झाली. या बैठकीपूर्वी पंढरीनाथ पाटलांनी पंतप्रधान रविशंकर शुक्ल व नामदार पंडित व्दारकाप्रसाद मिश्र तसेच मेहता, माकडे व नामदार आर. के. पाटील यांच्या भेटी घेतल्या व रात्री श्री. हिरे यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त महाराष्ट्र समितीची सभा झाली. त्या सभेत पंढरीनाथ पाटलांनी आपले विचार मांडले.

नव्यानेच जनपदांची निर्मिती झाली म्हणून त्यांच्या उद्‌घाटनाचा सोहळा उमरावतीला ना. द्वारकाप्रसाद मिश्र यांचे हस्ते शुक्रवार तारीख १ आक्टोबर १९४८ रोजी पार पडला. तत्पूर्वी तेथेच श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या कॉमर्स कॉलेजच्या इमारतीचे उद्‌घाटनही नामदार मिश्र यांच्या हस्ते झाले. या दोनही प्रसंगी पंढरीनाथ पाटील उपस्थित होते.

अबकारी मंत्री आचार्य माकडे यांचा ७ व ८ आक्टोबर १९४८ या दोन दिवसांचा बुलडाणा जिल्हा दौरा झाला. या दौऱ्यात पंढरीनाथ पाटील, चिखली व मेहकर तालुक्यात त्यांच्यासोबत होते. त्यावेळी बुलडाणा येथील नार्मल स्कूलला पंढरीनाथ पाटलांसोबत नामदार मंत्र्यांनी भेट दिली.

१४ ऑक्टोबर १९४८ रोजी चिखली व बुलडाणा जनपदांच्या उपसमित्यांच्या अध्यक्षांच्या निवडणूकी पंढरीनाथ पाटलांच्या मार्गदर्शनाखाली बिनविरोध झाल्या.

## संयुक्त महाराष्ट्र परिषद मुंबई

संयुक्त महाराष्ट्र समितीच्या कामाला आता बरीच गती आलेली होती. बैठकावर बैठका होऊ लागल्या. १६ ते १७ आक्टोबर १९४८ शनिवार व रविवारला शिवाजी

पार्क, मुंबई येथे विशाल मंडपात संयुक्त महाराष्ट्र परिषद भरली. या परिषदेचे स्वागताध्यक्ष होते डॉ. पंजाबराव देशमुख तर अध्यक्ष बॅ. रामराव देशमुख. या परिषदेला पंढरीनाथ पाटील प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. या परिषदेसाठी एक लाखावर मराठी भाषक लोक जमले होते. दुसऱ्या दिवशी या परिषदेतील तिसऱ्या ठरावावर पंढरीनाथ पाटलांचे विस्तृत असे भाषण झाले.

## सिलेक्ट कमिटीवर नियुक्ती

पंढरीनाथ पाटील अभ्यासू व चिकित्सक वृत्तीचे होते. तसेच त्यांचा सरकार दरबारी सर्वत्र परिचय होता. त्यामुळे त्यांना अनेक सरकारी कमिट्यांवर काम करण्याची संधी मिळाली. अशाच एका पब्लिक हेल्थ (सार्वजनिक आरोग्य) बीलाच्या सिलेक्ट कमिटीवर त्यांची नियुक्ती झाली. त्या कमिटीची सभा दिनांक १९ व २० आक्टोबर रोजी नागपूरला झाली. या कमिटीच्या सभेसाठी पंढरीनाथ पाटील नागपूरला गेले असता त्यांनी स्वतंत्र विदर्भ परिषद व संयुक्त महाराष्ट्र परिषद यांच्यातील वाद मिटविण्याचाही प्रयत्न केला.

स्वतंत्र विदर्भ, संयुक्त महाराष्ट्र या समित्यांच्या कामाबरोबरच भाषावार प्रांतरचनेच्या कमिशनच्या कामालाही वेग आलेला होता. हे कमिशन दिनांक २३ आक्टोबर १९४८ शनिवारला नागपूरला आले असता या कमिशनपुढे पहिली साक्ष डॉ. पंजाबराव देशमुख व पंढरीनाथ पाटलांची झाली. त्याच दिवशी रात्री संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे प्रांतिक संमेलन डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या संमेलनात पहिला ठराव पंढरीनाथ पाटलांनी मांडला व तो पास झाला.

## गांधीभवन निर्मिती

गांधी तत्त्वज्ञान विचार व खादीचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी स्मारक म्हणून गांधी भवनांची उभारणी सर्व देशभरच सुरू झाली. बुलडाणा जिल्ह्यात हे काम पंढरीनाथ पाटील व पंडित कानडे शास्त्री यांनी हाती घेतले होते. ६ नोव्हेंबर १९४८ पासून पंढरीनाथ पाटलांनी लोकवर्गणी गोळा करण्याचा आरंभ केला. त्यासाठी ते चिखलीचे तहसीलदारांना सोबत घेऊन गावोगाव फिरत व वर्गणी जमवित असत. त्यातूनच बुलडाणा येथे पंडित कानडे शास्त्री यांच्या देखरेखीखाली बुलडाण्यातील गांधी भवनाची निर्मिती झाली.

## ग्रामपंचायत व न्यायपंचायतींची निर्मिती

स्वातंत्र्यात लोकशाही जीवनपद्धती रूजविण्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण महत्वाचे आहे. हे पंढरीनाथांना चांगले माहित होते. म्हणूनच त्यांनी आता जनपदांची निर्मिती व कार्य सुरू झाल्यावर ग्रामपातळीवरील लोकांचा सहभाग लोकशाही जीवनपद्धतीत वाढविण्यासाठी ग्रामपंचायती व न्यायपंचायती यांच्या निर्मितीची प्रक्रिया सुरू केली. दिनांक ६ डिसेंबर १९४८ रोजी चिखली तालुक्यातील ग्रामपंचायत व न्यापंचायत पंचांच्या याद्या मंजूर करून घेण्याचे काम पंढरीनाथ पाटलांनी केले. पंढरीनाथ पाटलांचे काम करण्याचे कसब व सहकाऱ्यांना आपल्या कार्यात सामावून घेण्याची हातोटी वाखाणण्यासारखी होती. पंढरीनाथ पाटील त्यांना हवे तेच करीत. परंतु त्यांना हवे ते आपल्या सहकाऱ्यांकडून वदवून घेत. तसे प्रस्ताव लेखी स्वरूपात त्यांच्याकडून मागवून घेत. १७ डिसेंबर १९४८ रोजी मेहकर तालुक्यातील ग्रामपंचायती व न्यायपंचायतीत सरकारने कोणते पंच द्यावेत याची यादी तयार करण्यात आली. तिला मेहकर जनपद सभेची सल्ला व सहमती घेऊन मान्यता देण्यात आली. म्हणजेच पंढरीनाथ पाटलांनी तयार केलेली यादीच जनपद सभेने मंजूर केली.

## नागपूर असेंब्लीत धमाल उडवून दिली

नागपूर असेंब्लीचे सेशन सुरू होते. दिनांक ४ मार्च १९४९ रोजी जनपद सभासद, न्यायपंचायत पंच व ग्रामपंचायत पंच यांच्या बिलावर चर्चा सुरू असताना पंढरीनाथ पाटलांनी धमाल उडवून दिली. सदर संस्थात 'नॉमिनेशन' ने सभासद व पंचाची नियुक्ती होते. त्यासाठी आपली वर्णी लागावी म्हणून अनेकजण सदर कायदेमंडळ कार्यकाळात नागपूरात जमले होते. त्यांचा उल्लेख पंढरीनाथ पाटलांनी 'भुतावळ' असा केला. हिंदीभाषी पं. मिश्र चेअरमन होते. त्यांना 'भुतावळ' शब्दाचा अर्थ समजला नव्हता. श्री.बेलसरे यांनी 'भुतावळ' शब्द पार्लमेंटरी आहे का ? असा प्रश्न केला. भुतावळ काय प्रकरण आहे ? असा प्रश्न मिश्र यांनी विचारला. सभागृहात हशा पिकला. मध्येच आवाज आला, 'भुतावळ म्हणजे शंकराचे अनुयायी' (हशाच हशा) अध्यक्ष (हसत), 'म्हणजे भगवान शंकराचे अनुयायी (पुन्हा हशा) ना ?' पंडित मिश्र म्हणाले, 'भगवान शंकराचे अनुयायी पार्लमेंटरी असलेच पाहिजे.' (प्रचंड हशा) 'डेप्युटी कमिशनरांचा हस्तक्षेप नको' पंढरीनाथ पाटील पुढे म्हणाले, 'डेप्युटी कमिशनरांची मध्यस्थी घेतली तर त्याचा परिणाम योग्य होत नाही. असा अनुभव आहे. म्हणून न्याय

पंचायतचे पंच मुकर्रर करण्याचा अधिकार हा अधिकाऱ्यांचा असू नये असा आग्रह धरावासा वाटतो. वकील वर्गाचाही याबाबत शिरकाव होता कामा नये. कारण वकील या कार्यात गोंधळ निर्माण करण्यास समर्थ आहे. देव आणि भक्त यांच्या दरम्यान दलाल नको. पंच हे सुद्धा मानवातील परमेश्वरच आहेत. हे पंच आणि जनता यांच्यात वकीलाची दलाली नको.' असे स्पष्ट प्रतिपादन पंढरीनाथ पाटलांनी केले. (७०) (तरूण भारत, नागपूर ता. ५ मार्च १९४९)

## ग्राम व न्यायपंचायत अधिकारी नियुक्ती

दिनांक ८ जानेवारी १९५० रोजी, प्रस्तुत लेखकाचे जन्मगाव तराडखेड ज्या न्यायपंचायत कक्षेत होते. त्या मासरूळ (ता. चिखली) गावाच्या ग्राम व न्याय पंचायतीचे उद्‌घाटन पंढरीनाथ पाटलांच्या हस्ते झाले. दिनांक १६ व १७ जानेवारी १९५० या दोन दिवसात पंढरीनाथ पाटलांनी ना. पी. के. देशमुख, ना. पंडीत द्वारकाप्रसाद मिश्र यांची भेट घेऊन न्याय व ग्रामपंचायत ऑफीसवर कोणकोणते लोक घ्यावेत याबाबत विचारविनिमय केला. या संबंधी विचार करण्यासाठी ना. पी. के. देशमुख यांनी पंढरीनाथ पाटलांना तार पाठवून पुन्हा २३ जानेवारीला बोलावले व त्यानुसार २३ जानेवारी १९५० रोजी न्याय व ग्रामपंचायत ऑफिसर म्हणून प्रत्येक तालुक्याला एक-एक ग्रॅज्युएट इसम दरमहा २५०० रूपये पगारावर दिनांक १ फेब्रुवारी १९५० पासून प्रांतिक सरकार नियुक्त करणार असे निश्चित झाले.

## मध्यप्रांताचे गव्हर्नर चिखली नगरात

पूर्व नियोजनानुसार मध्यप्रांताचे राज्यपाल (गव्हर्नर) यांचे आगमन चिखली शहरात १७ फेब्रुवारी १९५० रोजी झाले. त्या दिवशी चिखली शहर एखाद्या नवरीप्रमाणे सजलेले होते. सर्वत्र कमानी, तोरणे, पताका लागलेल्या होत्या. स्वागतफलक ठिकठिकाणी झळकत होते. सर्वत्र उत्साही वातावरण होते. चिखली शहर यापूर्वी असे कधी शृंगारले गेले नव्हते. दुपारी १.३० ते ३.३० या वेळात चिखली, मेहकर तालुका न्याय व ग्रामपंचायत परिषदांचे उद्‌घाटन परमश्रेष्ठ राज्यपाल श्री. मंगलदास पक्वासा यांनी केले. स्वागताध्यक्ष या नात्याने पंढरीनाथ पाटलांचे भाषण झाले. सदर समारंभाच्या अध्यक्षपदी ना. मंत्री महोदय श्री. बारलिंगे हे होते. दोन्ही तालुक्यातून २० हजारावर लोकसमुदाय उपस्थित होता. जिल्ह्यातील प्रमुख मंडळीही उपस्थित होती. शांतता व सुव्यवस्थेकामी डी.सी. श्री. वर्मा व डी.एस.पी. श्री. पांडे यांनी चोख व्यवस्था ठेवली

होती. सदर कार्यक्रम ठरविण्यात तत्कालीन कायदेमंडळाचे उपाध्यक्ष श्री. पंडित कानडे शास्त्री यांचे मोलाचे सहकार्य पंढरीनाथ पाटलांना मिळाले होते.

## स्वतंत्र भारतातील पहिली असेंब्ली बैठक

२६ जानेवारी १९५० रोजी गुरूवारी मध्यरात्रीनंतर भारतीय राज्यघटनेचा अंमल सुरू झाला. त्यानंतर स्वतंत्र भारतातील कायदेमंडळाचे पहिले अधिवेशन प्रजासत्ताक गणराज्यात २४ फेब्रुवारी १९५० रोजी शुक्रवारी प्रथमच भरले. म्हणून भारतीय राज्यघटनेनुसार कायदेमंडळाच्या सर्व सभासदांचा शपथविधी प्रथमच झाला. त्यानंतर परमश्रेष्ठ राज्यपाल श्री. मंगलदास पक्वासा यांचे भाषण होऊन राज्यपालांतर्फे सर्वांना चहापान देण्यात आले. यावेळी सभागृहात पंढरीनाथ पाटलांच्या सहधर्मचारिणी सौ. सरस्वतीबाई हा सोहळा पाहण्यास सभागृहात पंढरीनाथांसोबत होत्या. या उभयतांच्या जीवनातील विशेषत: सरस्वतीबाईंच्या जीवनातील परमभाग्याचा दिवस ठरला. त्याचा त्यांना अवर्णनीय आनंद झाला.

## अटीतटीच्या गटपंचायत निवडणुका

एप्रिल १९५० ते मे १९५० पंढरीनाथ पाटील सतत दौरा करीत होते. जून महिन्यात काँग्रेसच्या निवडणुका होणार होत्या. त्यासाठी त्यांनी प्रचारसभांचा धुमधडाका सुरू केला. त्यांनी चिखली व मेहकर तालुके ढवळून काढले. याच काळात ना. पी. के. उपाख्य अण्णासाहेब देशमुख हेही बुलडाणा जिल्ह्यातील प्रचार मोहिमेत सहभागी झाले. ११ मे रोजी ते देऊळघाट व १२ मे ला चिखली, सुलतानपूर (तालुका मेहकर) येथील सभांमधे पंढरीनाथ पाटलांच्या अध्यक्षतेखाली त्यांची जाहीर व्याख्याने झाली. दिनांक १४ ला चिखली येथे तालुक्यातील प्राथमिक काँग्रेस गट पंचायतीच्या निवडणूकीसाठी उमेदवारांच्या उमेदवारी अर्ज रिटर्निंग ऑफिसरसमोर दाखल होऊ लागले. दरम्यान केळवद येथील जानकीराम बापू पाटील यांचे दिनांक १७ मे रोजी निधन झाले. अंत्यविधी प्रसंगी पंढरीनाथ पाटलांनी जानकीराम पाटलांचे गुणगौरवपर श्रद्धांजलीचे भाषण केले. एक चांगला सहकारी निघून गेल्याबद्दल पंढरीनाथांना अति दु:ख झाले.

यावेळी पक्षीय राजकारणात काँग्रेसमध्ये पंढरीनाथ पाटील विरूद्ध ब्रिजलाल बियाणी असे दोन गट बुलडाणा जिल्हा काँग्रेसमध्ये पडले. त्या गटनिहाय दाखलअर्जावर दिनांक १८ मे रोजी हरकत अर्ज दाखल झाले. काँग्रेस गट पंचायत निवडणुकीचा प्रचार शिगेला पोचला. पंढरीनाथ पाटील गांवागावात जाऊन प्रचार करीत होते. दिनांक

२८ मे १९५० रोजी चिखलीस त्यांच्या असे निदर्शनास आले की, तालुकाभर रिटर्निंग ऑफिसरने पंढरीनाथ पाटील गटाच्या विरूद्धचेच लोक प्रत्येक पोलींगवर पोलींग ऑफिसर नेमले. दिनांक ३१ मे १९५० रोजी चिखली व मेहकर तालुक्यातील गटपंचायतीच्या निवडणुका होत्या. चिखली तालुक्यात सगळ्यात मोठे मतदान केंद्र अंचरवाडी येथे पंढरीनाथ पाटील स्वत: थांबले. सायंकाळी निवडणुकीचा निकाल जाहीर झाला. त्यात पंढरीनाथ पाटलांचे आठ उमेदवार निवडून येऊन त्यांनी बियाणी गटांवर मात केली. त्यांनी चिखली तालुक्यात बियाणी गटाचा धुव्वा उडवला. परंतु मेहकर तालुक्यात मात्र त्यांना यश आले नाही. या तालुक्यात ब्राह्मणी पुढाऱ्यांचे वर्चस्व अद्याप कायम राहिले. त्यामुळे बियाणी गट या तालुक्यात अग्रेसर राहिला.

## मलकापूर तालुक्यात पारडे फिरले

मलकापूर तालुका म्हणजे बियाणी गटाचा बालेकिल्ला समजण्यात येत असे. पण दादासाहेब बॅ. टी. एस. पाटील व इतर त्यागी व निष्ठावान यांचे जीवापाड मेहनतीने आणि जनसेवक वृत्तपत्राच्या सत्यप्रचारामुळे मलकापूर तालुक्यात बियाणी गटाला जनतेकडून झणझणीत थप्पड बसली. निवडणूकीचे पारडे फिरले. या तालुक्यात एकूण ३४ पंचायतीत एकूण १८५ जागांपैकी बॅ. टी. एस. पाटील यांच्या पक्षाला (वीर वामनराव जोशी पक्षाला) ११३ जागा बहुमताने मिळाल्या. त्यागी व निष्ठावानांच्या या दणदणीत विजयांमुळे बियाणी, भाडोत्री सेना पराभवामुळे काळे तोंड लपवीत होते. चिखली तालुक्यात ना. पंढरीनाथ पाटील यांच्या गरनाळ तोफेने बियाणी गटाची दाणादाण उडवून वीर वामनराव जोशी पक्षाचे ५० उमेदवार अविरोध निवडून आले. जळगाव आणि खामगाव तालुक्यात त्यागी व निष्ठावान पक्षाचे उमेदवार बहुसंख्येने निवडून आले. तेथेही बियाणी गटाची डाळ शिजली नाही. एकूणच बुलडाणा जिल्ह्यात बियाणी गटाला पंढरीनाथ पाटील, वीर वामनराव जोशी यांनी धूळ चारली. [७६]

(जनसेवक, जळगांव ता. १-६-१९५०)

दिनांक ३ जून १९५० रोजी मलकापूर येथे बॅ. तुकाराम शंकर पाटील यांचेकडे पंढरीनाथ पाटील मुक्कामी राहिले. रात्रभर खलबते केली. बॅ. पाटील यांना मलकापूर तालुक्यातून प्रांतिक काँग्रेससाठी उमेदवारी देण्याचे ठरले. दिनांक ११ जून १९५० रोजी मलकापूर येथे बॅ. तुकाराम पाटील यांचे घरी तालुक्यातून बियाणी गट विरोधी निवडून आलेल्या काँग्रेस गट पंचायत सदस्यांची बैठक झाली. त्याठिकाणी पंढरीनाथ

पाटलांच्या उपस्थितीत प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या निवडणुकीसाठी मलकापूर तालुक्यातून बॅ. टी. एस. पाटील व श्री. के. आर. पाटील या दोघांनी दोन जागेसाठी उभे राहावे असे ठरले.

दिनांक १३ जून १९५० रोजी मेहकर तालुक्यातील मेहुणा गटाची काँग्रेस पंचायतीची फेरनिवडणूक झाली. तीत पंढरीनाथ पाटलांच्या गरनाळ तोफेने बियाणी पक्षाचे सर्व उमेदवार आडवे करून पंढरीनाथ पाटील गटाचे तीनही उमेदवार निवडून आले. पंढरीनाथ पाटलांनी मेहकर तालुक्यातही ब्राह्मणी बालेकिल्ल्यात आपले पाय रोवले. दिनांक १४ जून १९५० रोजी चिखली येथे तालुक्यातून निवडून आलेल्या पंढरीनाथ पाटील पक्षाच्या काँग्रेस पंचायतदारांच्या सभेत गठित समितीने दिनांक १८ रोजी निकाल दिला की, अखिल भारतीय काँग्रेस कमिटी प्रतिनिधी निवडणूकीसाठी चिखली तालुक्याच्या 'ब' विभागासाठी पंढरीनाथ पाटील तर 'अ' विभागासाठी श्री. संतोषराव पाटील असे या दोघांनी अर्ज भरावे असे ठरले. तसे त्यांनी अर्ज भरले.

विदर्भ काँग्रेस कमिटीच्या अन्यायी वागणूकीच्या विरूद्ध प्रांतिक काँग्रेसच्या २२ मेंबरांनी ८ जुलै १९४८ रोजी राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेन्द्र प्रसाद यांच्याकडे केलेल्या तक्रारीची दखल घेऊन त्याची सुनावणी दिनांक २३ जून १९५० रोजी अकोला येथे अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने नेमलेल्या श्री. गोकुळभाई भट्ट यांच्यासमोर झाली. त्याठिकाणी पंढरीनाथ पाटलांनी अन्याय कसा झाला. याची अनेक उदाहरणे दाखल करून आपली बाजू भरभक्कमपणे मजबूत केली.

३० जून १९५० रोजी पंढरीनाथ पाटलांनी चिखली तालुक्यातील आपले सर्व मतदार केळवद येथे एकत्रित करून मुक्काम केला. 'अ' विभागासाठी बुलडाणा येथे व 'ब' विभागासाठी चिखली येथे पोलींग सेंटर होते. दिनांक १ जुलै १९५० रोजी मतदान होऊन सायंकाळी निकाल जाहीर झाला. त्यात चिखली पोलींगवर ६७ पैकी ४९ मते पंढरीनाथ पाटलांना व बियाणी गटाचे आनंदा गोपाळा ढमक यांना १८ मते पडली. तर बुलडाणा केंद्रात ( 'अ' गट) श्री. संतोषराव पाटील यांना ६३ तर बियाणी गटाला केवळ २२ मते पडली. अशा रीतीने पंढरीनाथ पाटील व संतोषराव पाटील हे आगामी नाशिकयेथे भरणाऱ्या अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनासाठी प्रतिनिधी निवडल्या गेले.

काँग्रेसचे नाशिक अधिवेशन जवळ येत होते. त्यासंदर्भातील हालचाली सुरू झाल्या होत्या. दिनांक ३ ऑगष्ट १९५० रोजी ना. पंडित द्वारकाप्रसाद मिश्र यांनी

पंढरीनाथ पाटलांना फोन करून बोलावून घेतले. ते ४ ऑगष्ट रोजी नागपूरला पंतप्रधान पंडित रविशंकर शुक्ल यांचे बंगल्यावर पोचले. तेथे प्रांतातील इतरही प्रतिनिधी उपस्थित होते. १४ डेलीगेटसनी सह्या करून राजर्षी टंडन यांचे नाव काँग्रेस अध्यक्षपदासाठी सुचविले. या चौदांमध्ये पंढरीनाथांचाही समावेश होता.

मेहकर तालुक्यातील काँग्रेस गटपंचायतीच्या निवडणूकीत बियाणी पक्षाने केलेला अन्याय निवारण्यासाठी पंढरीनाथ पाटलांनी वरिष्ठांकडे अपील केले होते. ते अपील सुनावणीसाठी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने श्री. गोकुळभाई भट्ट यांचेकडे सोपविले होते. त्यासाठी गोकुळभाई चिखली, मेहकर, खामगाव, अकोला असे दौरे करून दिल्लीत परत गेले. पण त्यांच्याकडून याबाबत सुनावणीचे काम पूर्ण झाले नव्हते. त्यांच्या गैरहजेरीत हे अपील श्री. वैद्य व श्री. खेडकर यांनी दिनांक १४ ऑगष्ट १९५० रोजी अकोला येथे सुनावणीस घेतले. त्यांनी उभयपक्षांचे म्हणणे ऐकून घेतले. पण निर्णय दिला नाही. म्हणून पंढरीनाथ पाटील दिनांक १५ ऑगष्ट १९५० रोजी उमरावतीस गेले. तेथे त्यांनी श्री. पी. के. देशमुख व श्री. वामनराव जोशी यांची भेट घेऊन त्यांचेकडून मेहकर प्रकरणासाठी गोकुळभाईंनी पुन्हा वऱ्हाडात यावे असा दिल्लीस फोन करविला.

### अखिल भारतीय काँग्रेस अध्यक्षपदाच्या निवडणुकीचे वेध

काँग्रेस अध्यक्षपदाच्या निवडणूकीचे वेध आता सर्वत्र लागले होते. पंढरीनाथ पाटील इस्ट इंडिया कॉटन असोसिएशनच्या सभेसाठी दिनांक १८ ऑगष्ट १९५० ला मुंबईत असताना त्यांनी मुंबईत असलेले अखिल भारतीय काँग्रेसचे चार-पाच डेलीगेटस श्री. भवानजी खिमजी वगैरेंना भेटून राजर्षी टंडन यांच्यासाठी मते मागितली. दुसऱ्या दिवशी दिनांक १९ ला ते मराठा शिक्षण परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या सभेसाठी पुण्यास असताना तेथे त्यांनी असलेल्या चार-पाच डेलीगेटसला भेटून राजर्षी टंडनसाठी मते मागितली. पुण्यावरून ते थेट नाशिकला २० ऑगष्टला जाऊन पोचले. अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन जेथे भरणार होते ती जागा त्यांनी पाहिली. नाशिकमध्ये जे चारपाच डेलीगेटस होते त्यांना भेटले व त्यांनी राजर्षी टंडनसाठी मते मागितली. त्यावेळी श्री. हिरे तेथे नसल्यामुळे पंढरीनाथ पाटील एकटेच तेथील चार डेलीगेटसला भेटले. त्यानंतर ते २१ तारखेला अकोला येथे आले. मेहकर तालुक्यातील काँग्रेस गटपंचायत निवडणुकीविरूद्धचे अपील श्री. गोकुळभाई भट्टने ऐकले. अर्थातच गोकुळभाईंनी पंढरीनाथ पाटलांच्या विरोधात निकाल दिला.

पंढरीनाथ पाटील यांच्यात असलेली राजकीय परिपक्वता, सामाजिक जाण, ...लबुद्धी, चातुर्य, विवेकशक्ती व वाकपटुत्व इत्यादी गुणांमुळे पंढरीनाथ पाटील, पंतप्रधान ...विशंकर शुक्ल व गृहमंत्री पंडित द्वारकाप्रसाद मिश्र यांच्या निकटवर्तीयापैकी एक मानले जात होते. हे दोघेही पंढरीनाथ पाटलांशी प्रसंगोपात सल्लामसलत करीत असत. पंडित द्वारकाप्रसाद मिश्रांनी बोलावल्यावरून पंढरीनाथ पाटील दिनांक २२ ऑगष्ट रोजी नागपूरात दाखल झाले. गृहमंत्री पंडित द्वारकाप्रसादांची त्यांनी भेट घेतली. दोघांची खलबते झाली. त्यानंतर २३ ऑगष्टला पंढरीनाथ पाटलांनी मा. श्री. कृपलानी यांना ओपन लेटर (अनावृत पत्र) लिहून ते प्रेस ट्रस्ट ऑफ इंडियाच्या नागपूर बातमीदाराजवळ दिले. हे पत्र प्रसिद्ध झाल्यावर आचार्य कृपलानींनी जाहीरपणे त्या पत्राला उत्तर दिले.

पंढरीनाथ पाटील, पंडित रवीशंकर मिश्रांच्या निकटवर्तीयातील असल्यामुळे मध्यप्रांत वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. मा. सा. कन्नमवार यांनी द्वारकाप्रसाद मिश्रांची मदत त्यांना मिळवून द्यावी, अशी आमदार पंढरीनाथ पाटलांना विनंती केली. कन्नमवारांच्या विनंतीनुसार दिनांक २५ ऑगष्ट १९५० रोजी नागपूरला पंडित मिश्रांची भेट घेऊन कन्नमवार यांचेशी झालेले बोलणे पंढरीनाथांनी त्यांच्या कानावर घातले. त्यांनी कन्नमवारांना मदत करावी, अशी त्यांची मनधरणी केली. त्यांचे मन वळविले. रात्री दोघांची भेट घालून दिली. दुसऱ्या दिवशी दिनांक २६ ऑगष्टला पंढरीनाथ पाटील व कन्नमवार पंडित मिश्रांना परत भेटले. कन्नमवारांना मदत करण्याचा तपशील ठरला. मिश्रा, पाटील व कन्नमवार यांची एकजूट झाली. नाशिक महाअधिवेशनाकडे पंढरीनाथ पाटलांची शक्ती संघटित होत चालली.

### राष्ट्रीय पातळीवरील राजकारणात प्रवेश

अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन नाशिकसाठी प्रतिनिधी निवडणूकीत आनंदा गोपाळा ढमक यांच्यावर मात करून पंढरीनाथ पाटील निवडून आले होते. या निवडीला आव्हान देणारी याचिका प्रांतिक काँग्रेस इलेक्शन ट्रिब्युनलकडे दाखल केली होती. त्याबाबत पंढरीनाथ पाटलांनी लेखी जबाब दिनांक २७ ऑगष्ट १९५० रोजी अकोला येथे राजस्थान भवनमध्ये ट्रिब्युनलपुढे दाखल केला.

नाशिक येथे भरणाऱ्या अखिल भारतीय काँग्रेस अधिवेशनाच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली. श्री. राजर्षि टंडन, श्री. आचार्य कृपलानी व श्री. शंकरराव देव हे तीन उमेदवार अध्यक्षपदाच्या निवडणूक रिंगणात उतरले होते.. दिनांक २९ ऑगष्टला

अकोला येथे प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या नवनिर्वाचित सभासदांची सभा अखिल भारतीय काँग्रेस अध्यक्ष निवडणूक मतदानासाठी झाली. उपरोक्त तीन उमेदवारांपैकी, पंढरीनाथ पाटलांसह बहुतेक सर्वांनीच, राजर्षी टंडन यांनाच मतदान केले. त्यामुळे पंढरीनाथ पाटलांचा राष्ट्रीय पातळीवरील राजकारणात शिरकाव होऊन पंढरीनाथांचे बळ वाढले.

## फेरनिवडणुकीतही बियाणी गटाचा धुव्वा

श्री. गोकुळभाई भट्ट यांनी दिलेल्या निकालावरून दिनांक ३१ ऑगष्ट १९५० रोजी मेहकर तालुक्यात काही ठिकाणी काँग्रेसच्या गटपंचायतीच्या फेरनिवडणूका झाल्या. सवडद गटासाठी लोणी पोलींग सेंटरवर मतदान झाले. त्यावेळी पंढरीनाथ पाटलांचे तीनही उमेदवार प्रचंड मताने निवडून आले व बियाणी गटाचा त्यांनी धुव्वा उडविला. २ सप्टेंबरला या फेरनिवडणूकीतही बियाणी पक्षाने मेहकर तालुक्यातील लोणी गवळी, अंत्री, चायगाव वगैरे ठिकाणी अन्याय केला. म्हणून पंढरीनाथ पाटलांनी त्वरीत नामदार पी. के. देशमुख यांना फोनद्वारे कळविले व श्री. गोकुळभाई भटांनाही पत्र लिहिले.

मेहकर तालुक्यातील काँग्रेस गटपंचायत फेरनिवडणूकीनंतर दिनांक १७ सप्टेंबर १९५० रोजी या तालुक्यातून अखिल भारतीय काँग्रेस अधिवेशनासाठी दोन डेलीगेटस निवडण्यासाठी निवडणूक होणार होती. त्यासाठी या तालुक्याचे 'अ' व 'ब' असे दोन गट करण्यात आले. 'अ' गटातून पंढरीनाथ पाटील गटाचे प्राबल्य होते. या गटातून त्यांचा डेलिगेट निवडून येण्याची आशा होती. परंतु प्रत्यक्ष निवडणूकीत 'अ' गटातून ८३ मतापैकी पंढरीनाथ पाटील पक्षाचे उमेदवार श्री. आयाजी परसाजी पाटील यांना फक्त ३७ मते पडून अपयश पदरी बांधावे लागले. कारण याहीवेळी बियाणी पक्षाने मतदारांना भरपूर लाच दिली, असे पंढरीनाथ पाटलांनी नमूद केले.

## गटासाठी बलिदान

१३ सप्टेंबर १९५० रोजी उमरावती येथे अखिल भारतीय काँग्रेस अधिवेशनासाठी प्रतिनिधी निवडण्यासाठी निवडणूक होणार होती. त्या कामासाठी पंढरीनाथ पाटील दिनांक १२ लाच नामदार पी. के. देशमुख यांचेसाठी उमरावतीस उपस्थित झाले. त्याठिकाणी खलबते होऊन १३ च्या निवडणूकीसाठी डॉ. पंजाबराव देशमुख व त्यांचे लोक यांचेबरोबर नामदार पी. के. देशमुखांसाठी पंढरीनाथ पाटलांनी

तडजोडीची बोलणी केली. तसेच काही मतदारांच्या भेटीही घेतल्या. डेलीगेटच्या निवडणूकीसाठी ना. पी. के. देशमुख विरूद्ध श्री. नारायणराव जानराव देशमुख असा सामना झाला. हा सामना चांगलाच रंगला. बियाणी व बॅ. रामराव देशमुख पोलींगवर हजर होते. तरीही मतदारांनी त्यांचे न ऐकता ना. पी. के. देशमुख यांना प्रचंड मतांनी विजयी केले. ना. पी. के. देशमुखांना ६१ तर विरूद्ध बाजूला २२ मते पडून नामदार पी. के. देशमुखांचा दणदणीत विजय झाला. पंढरीनाथ पाटलांची तडजोड कामी आली. परिणामी १५ सप्टेंबर १९५० रोजी अकोला येथे प्रांताध्यक्षांच्या निवडणूकीसाठी बहुमत नसले तरी विरोधासाठी विरोध करण्यासाठी तात्त्विक बाब म्हणून पंढरीनाथ पाटलांना डॉ. पंजाबराव देशमुख व नामदार पी. के. देशमुख यांनी उभे केले. या निवडणूकीत पंढरीनाथ पाटील व गोपाळराव खेडकर असा सामना झाला. खेडकरांना ३० मते पडली. तर पंढरीनाथ पाटलांना ९ मते पडली. परंतु त्यांनी 'जातीसाठी माती खाऊन' आपल्या गटाचे नाव राखले. आपल्या समर्थक मतदारांना दुसऱ्याच्या नावासमोर शिक्के मारण्याच्या मानहानीपासून वाचवून त्यांनी ताठ मानेने मारलेल्या शिक्क्यांसह सन्मानपूर्वक हार स्वीकारली. गटाच्या अस्तित्व व स्वत्वासाठी स्वबलिदान त्यांनी श्रेष्ठ मानले.

### नाशिकचे अखिल भारतीय काँग्रेस अधिवेशन

अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन दिनांक २० व २१ सप्टेंबर १९५० या अवधीत भरले. या अधिवेशनासाठी बुलडाणा जिल्ह्यातून पंढरीनाथ पाटील व संतोषराव पाटील हे दोघे प्रतिनिधी नाशिकला गेले. प्रतिनिधी म्हणून त्यांनी अधिवेशनात सहभगा घेतला. सदर अधिवेशनाचे अध्यक्ष राजर्षी पुरूषोत्तमदास टंडन हे होते, तर स्वागताध्यक्ष नाशिक भागातील प्रसिद्ध नेते भाऊसाहेब हिरे हे होते. या अधिवेशनासाठी पंडीत जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल इत्यादि पुढारी व ३० हजारावर लोक उपस्थित होते. सदर अधिवेशनाचा समारोप २१ सप्टेंबरला रात्री ११ वाजता झाला. दिनांक २२ सप्टेंबर रोजी संतोषराव पाटलांसह पंढरीनाथ पाटील काँग्रेस अध्यक्ष राजर्षी पुरूषोत्तमदास टंडन यांचे निवासस्थानी जाऊन त्यांना भेटले व त्यांच्याशी पाच मिनिटे संभाषण केले.

### चिखली तालुक्यात काँग्रेस गट पंचायत पदाधिकाऱ्यांची निवडणूक

ब्रिजलाल बियाणी यांच्या कटकारस्थानाचा भाग म्हणून नियोजित

कार्यक्रमानुसार १५ आक्टोबर १९५० रोजी रिटर्निंग ऑफिसरने चिखली तालुक्यातील 'ब' विभागातील काँग्रेस गटनिवडणूका घेतल्या नाही. त्या त्याने दिनांक २१ ला घेतल्या. या निवडणूकीत 'ब' भागातील काँग्रेस गटपंचायतीतर्फे त्यांचे पदाधिकारी व तालुका काँग्रेस कमिटीवर पाठविण्याचे प्रतिनिधी यांची निवड करण्याचे काम झाले. त्यावेळी पंढरीनाथ पाटील एक तटस्थ प्रेक्षक म्हणून हजर होते. त्यानंतर दिनांक २२ रोजी पंढरीनाथ पाटलांच्या अध्यक्षतेखाली चिखली तालुका काँग्रेस कमिटीची सभा चिखली येथे झाली. या सभेत पुढील तीन वर्षासाठी श्री. संतोषराव पाटील अध्यक्ष निवडल्या गेले. इतर पदाधिकारी आणि जिल्हा काँग्रेस कमिटीवर पाच सभासद बिनविरोध निवडल्या गेले.

### विदर्भातील चारही अध्यक्ष बियाणी गटाचे

दिनांक ३० ऑक्टोबर १९५० रोजी उमरावती जिल्हा काँग्रेस अध्यक्षाची निवडणूक झाली. तत्पूर्वी पंढरीनाथ पाटील २७ तारखेलाच उमरावतीला पोचले. तेथून दोन मित्रांना सोबत घेऊन ते नागपूरला गेले. तेथील मंडळींशी विचार विनिमय करून ते लगेच २९ ऑक्टोबरला बुलडाणा जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्ष निवडीसाठी मलकापूरला पोचले. या निवडणूकीत बियाणी गटाचाच उमेदवार अध्यक्षपदी निवडून आला. दिनांक ३० ऑक्टोबरला उमरावती जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्षाची निवड होऊन त्या ठिकाणीही बियाणी गटाचाच उमेदवार निवडून आला. विदर्भातील चारही जिल्ह्यातील जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष हे बियाणी गटाचेच निवडल्या गेले व भांडवलदार गटाचा दबदबा वाढला.

### क्षय आरोग्यधाम प्रकरणी एक रूपयाची कपात सूचना

मार्च १९५१ मध्ये नागपूर असेंब्लीचे बजेट सेशन सुरू होते. दिनांक १६ मार्च १९५१ रोजी प्रांतातील क्षयआरोग्य धामाच्या प्रश्नावरून पंढरीनाथ पाटलांनी एक रूपया कपातीची सूचना मांडली. या कपात सूचनेला लाला अर्जूनसिंग, सौ. राधादेवी गोयनका व डॉ. ज्वालाप्रसाद मिश्र यांनी दुजोरा दिला. त्यानंतर डॉ. बारलिंगे आरोग्यमंत्री म्हणाले, 'सॅनिटोरियम काढण्याची सूचना मला मान्य आहे.' त्यानंतर डॉ. हसून म्हणाले, 'मध्यप्रांतात क्षयरोग्यांची संख्या वाढत असून दर मिनिटाला या रोगाने एकाचा बळी जातो. यात तरूणांचे प्रमाण जास्त आहे.' 'क्षयरोगाला प्रतिबंध करण्यासाठी व औषधोपचाराची सोय व्हावी म्हणून बुलडाणा व छिंदवाडा येथे

आरोग्यधाम सुरू करून क्षयरोग्यांच्या उपचाराची व्यवस्था करण्यात यावी.' अशी सूचना पंढरीनाथ पाटलांनी मांडली. तेव्हा 'बुलडाण्यातील लोकांनी एक लाख साठ हजार रूपये दिल्यास तेथे सॅनिटोरियम काढणे शक्य आहे.' त्यानंतर डॉ. बारलिंगे यांच्या विनंतीवरून पंढरीनाथ पाटलांनी कपात सूचना मागे घेतली. पुढे बुलडाण्याचे सॅनिटोरियम निर्माण झाले. (७८) ( तरूण भारत, नागपूर ता. १७-३-१९५१)

**भारतात घटनेनुसार होऊ घातलेल्या प्रथम निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर**

दिनांक १७ व १८ मार्च १९५७ रोजी नागपूर येथे नागपूर, विदर्भ व महाकोशल काँग्रेस या तीनही प्रांतिक काँग्रेस कमिट्यांच्या विभक्त व संयुक्त सभा झाल्या. अहमदाबाद येथे अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने जो ऐक्याचा ठराव पास केला व त्यानंतर मध्यप्रदेशचे गृहमंत्री, पार्लमेंटरी बोर्डाचे सदस्य व प्रांताचे प्रमुख काँग्रेस पुढारी पंडीत द्वारकाप्रसाद मिश्र यांनी या ऐक्याच्या ठरावाची प्रतिक्रिया दर्शविणारे एक वक्तव्य युनायटेड प्रेसच्या खास बातमीदाराला देऊन काँग्रेसमध्ये 'नवचैतन्य व नवजीवन' यांचा संचार होऊन काँग्रेस बलवान व कार्यक्षम बनेल असा आत्मविश्वास प्रकट केला होता. त्यामुळे या तीन प्रांतिक काँग्रेस कमिट्यांच्या संयुक्त बैठकीबाबत विशेष उत्साह व उत्कंठा निर्माण झाली होती. तथापि प्रत्यक्ष सभेत किंवा त्यानंतर या आशा व तो उत्साह टवटवीत व्हावा अशी प्रतिक्रिया कोठेही दिसली नाही.

सदर संयुक्त सभा महाकोशल प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सेठ बाबु गोविंददासजी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या सभेत सर्वप्रथम श्री. पंढरीनाथ पाटील यांचे भाषण झाले ते म्हणाले, ' सर्व काही विसरून सहकार्यानं वागण्याचे ठरविले पाहिजे. हे संमेलन यशस्वी करूनच भागणार नाही तर आजचे सत्कार्य सुरू राहील अशी यंत्रणा निर्माण करावयास पाहिजे.' सेनापती जनरल मंचर्शा आवारींनीही "काँग्रेस सर्वश्रेष्ठ आहे व तिचा आदेश हाच आम्हाला शेवटचा हुकुम आहे. सरकारही आमचेच आहे. आम्ही सहकार्य करावयास पाहिजे. मंत्रिमंडळ व काँग्रेस कमिट्या यांच्यात संपर्क राहावा म्हणून काहीतरी यंत्रणा पाहिजे. प्रांतिक काँग्रेसचे एक सदस्य पंढरीनाथ पाटील यांनी त्यासाठी प्रत्येक काँग्रेस कमिटीचे सर्व पक्षातील पाच पाच सभासद निवडून एकंदर १५ सदस्यांची एक मार्गदर्शक कमिटी स्थापन करण्यात यावी." अशी सूचना मांडली होती. अहमदाबाद येथील ऐक्याच्या ठरावाच्या दृष्टीने पाहिल्यास काँग्रेसमधील

पक्षोपक्षात 'समझौता' घडवून आणण्यास या कमिटीचा बराच उपयोग झाला असता. असे मानण्यास हरकत नव्हती. परंतु, स्नेहसंमेलनातील अंतस्थ हेतू व ज्यांच्यासमोर ही सूचना मांडण्याचे धाडस श्री. पंढरीनाथ पाटील यांनी केले त्यासभासदांची मनोवृत्ती यांचा ज्यांनी बरोबर अंदाज केला होता त्यांना ही सूचना संमेलनात उचलून धरली जाईल व मान्य केली जाईल अशी तीळमात्रही अपेक्षा नव्हती. आणि सरतेशवटी तसेच झालेही. यानंतर ९ जणांची मार्गदर्शक कमिटी नेमण्यात आली. परंतु तिचे स्वरूप पंढरीनाथ पाटलांना अपेक्षित प्रातिनिधिक स्वरूपापासून अगदी भिन्न होते. या कमिटीत तीनही प्रांतिक काँग्रेस कमिट्यांचे अध्यक्ष व चिटणीस असे सहा सभासद व मंत्रिमंडळातील नामदार पंडित रविशंकर शुक्ल, ना. पंडित द्वारकाप्रसाद मिश्र व दोन प्रमुख मंत्री व त्यांच्याच योग्यतेचे अथवा त्यांच्यापेक्षाही अधिक योग्यतेचे राजकारणपटू व बडे मुत्सद्दी व विदर्भ प्रांतिक काँग्रेस कमिटीचे सूत्रसंचालक, सभासद, परंतु पुढेमागे मध्यप्रदेशाचे होऊ घातलेले एकमेवद्वितीय नेते श्री. सेठ बियाणी असे तीन इतर सभासद होते. (७९) (स्वतंत्र हिंदुस्थान, ता. ३०-३-१९५१)

## सरकारी उत्पन्नवाढीचे स्त्रोत

मध्यप्रदेश प्लॅनिंग बोर्ड निर्माण होऊन त्याच्या कामाला सुरूवात झाली. या बोर्डाचे एक सदस्य म्हणून पंढरीनाथ पाटील शेतकरी हिताच्या योजना व शिक्षण प्रसाराच्या योजना यावर जोर देत असत. हे दोनही विषय त्यांच्या आवडीचे व समाजहिताचे होते. या विषयावर होणारा खर्च सरकारला ज्या अनेक कारणामुळे पेलवत नव्हता त्यातील महत्वाचे कारण म्हणजे दुसऱ्या महायुद्धानंतर प्रशासकीय खर्चात वाढलेला डोंगर हा होय. हा खर्च सरकारला पेलवेनासा झाला. म्हणून या योजनांसाठी पैसा कसा उभा करावा याबाबत साप्ताहिक 'तरूण महाराष्ट्र'शी बोलतांना पंढरीनाथ पाटील म्हणाले, ' आमचे बोर्ड केवळ योजना सांगत नसून योजनांसाठी लागणारा पैसा उभा करण्याचे मार्गही सांगते.' असे म्हणून ते पुढे म्हणाले, 'प्लॅनिंग बोर्डासमोर सरकारास सुचविण्यासारख्या अनेक उत्पन्न वाढविण्याच्या बाबी आहेत. त्यात सालाना दीड हजार रूपयांच्या वरील शेतीच्या उत्पन्नावर कर बसविणे, शेतसाऱ्यावर रूपयास चारआणे प्रमाणे सरचार्ज बसविणे, मृत्युकर बसविणे, सुधारणा कर बसविणे, सेल्स टॅक्स वाढविण्याचे मार्ग शोधणे इत्यादी उत्पादन वाढीचे उपाय बोर्ड सुचवू शकते.' (७५)
(तरूण महाराष्ट्र, अकोला ता. १०-५-१९५१)

**स्वतंत्र भारतातील भारतीय राज्यघटनेनुसार पहिली निवडणूक**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर राजकारण सत्तास्पर्धेकडे केंद्रित होऊ लागले. त्यामुळे पंढरीनाथ पाटील व ब्रिजलाल बियाणी यांचे संबंध विकोपाला गेले. दोघेही काँग्रेसमध्ये असून एकमेकांविरूद्ध कारवाया करू लागले. १९५२ साली स्वतंत्र भारतातील राज्यघटनेतील तरतूदीनुसार पहिल्या निवडणुका लागल्या. १९५२ च्या पहिल्या विधानसभा निवडणुकीसाठी विदर्भ प्रांतिक काँग्रेस निवडणुक बोर्डाने बुलडाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील चिखली व बुलडाणा मतदारसंघासाठी अनुक्रमे साहेबराव तुकाराम सावळे वकील व नामदेवराव पुंजाजी पवार यांच्या नावाची शिफारस केली होती. परंतु चिखली मतदार संघातून पंढरीनाथ पाटील यांना प्रत्यक्ष काँग्रेसचे तिकिट मिळाले. बुलडाणा मतदारसंघातून श्री. नामदेवराव पवार यांची वर्णी लागली.(८१)

(मातृभूमि, अकोला ता. १८-१०-१९५१)

पंढरीनाथ पाटलांनी चिखली मतदार संघातून मध्यप्रदेश कायदेमंडळाच्या निवडणूकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. पण काँग्रेसच्या बियाणी गटाने पंढरीनाथ पाटील निवडून येणार नाही. अशी व्यवस्था केली. पंढरीनाथ पाटलांच्या विरूद्ध श्रीमंत त्र्यंबक भिकाजी खेडेकर यांनी योजना केली. शिवाय शेतकरी कामकरी पक्षाची मते पंढरीनाथ पाटलांना मिळू नये म्हणून शेतकरी कामगार पक्षाच्या श्री. दौलत गोपाळा म्हस्के यांची योजना केली. शिवाय ऐनवेळी काँग्रेस कार्यकर्त्यांत फंदफितूरी करून पंढरीनाथ पाटलांना या निवडणूकीत पराभूत होण्याची वेळ आली. याप्रमाणे काँग्रेस मताची विभागणी करून पंढरीनाथ पाटलांनी प्रयत्न करूनही अपयश पदरी घेतले. काँग्रेसमध्ये राहून शेतकरी, शेतमजूरांच्या हिताची भूमिका घेऊन लोकजागृती करीतच तसे कायदे व नियम केले. त्याचे परीणाम म्हणून भांडवलदार, व्यापारी व उद्योगपतींनी पंढरीनाथांचे पंख छाटण्याचे काम यावेळी केले. या निवडणूकीत भांडवलदारांनी पंढरीनाथ पाटलांचे विरोधी मराठा उमेदवारच उभा करून मत विभागणी केली. त्यामुळे स्वतंत्र उमेदवार श्री. त्र्यंबक भिकाजी पाटील खेडेकर यांना निवडून आणले. दौलत गोपाळा म्हस्के यांची अनामत रक्कम सरकारात जमा झाली. पण त्यांनी पंढरीनाथ पाटलांना आमदारकीची पथारी गुंडाळायला लावली. शिवाय त्र्यंबकराव खेडेकरांसारखा मोठा जमीनदार मराठा पंढरीनाथ पाटलांच्या विरोधी राजकारणात तयार केला. ही निवडणूक दिनांक २ जानेवारी बुधवर १९५२ रोजी होऊन तिचा निकाल ४ जानेवारी १९५२ रोजी शुक्रवारी लागला. त्यांनी आपल्या सर्व समर्थकांना हसतमुखाने खिलाडी वृत्ती

जोपासून धीर दिला. पंढरीनाथ पाटलांच्या पराजयाबद्दल विरोधी काँग्रेसवाल्यांनी तारा पाठवून ब्रिजलाल बियाणींचे अभिनंदन केले.

पंढरीनाथ पाटलांनी खिलाडू वृत्तीने पराभव स्वीकारून ते हैदराबाद असेंब्लीच्या निवडूकीसाठी मराठवाड्यात काँग्रेस पक्षातर्फे निवडणूक लढविणारे त्यांचे मित्र श्री. भगवंतराव गाढे वकील यांच्या विनंतीवरून त्यांच्या प्रचारासाठी जालना येथे दिनांक ६ जानेवारी १९५२ रोजी पोचले. प्रचार दौरा आखून त्याप्रमाणे त्यांच्या सभांच्या तारखा जाहीर केल्या. त्यानुसार गावोगाव जाऊन सभा घेतल्या. पंढरीनाथांना पाहण्यासाठी व त्यांचे भाषण ऐकण्यासाठी पायी व बैलगाड्यांनी लोकांच्या झुंडीच्या झुंडी ठिकठिकाणी जमू लागल्या. ६ जानेवारी ते ९ जानेवारी त्यांनी तुफानी प्रचार दौरा करून अंबड विधानसभा मतदारसंघ एकूण ३५ खेड्यात सभा घेऊन ढवळून काढला. त्यांच्या प्रभावी वक्तृत्वाने भगवंतराव गाढे वकील विजयी झाले. त्यांच्या मेहनतीचे चीज झाल्याबद्दल त्यांना खूप आनंद झाला.

## निवडणूक हारले तरी प्रिमियरचे सल्लागार राहिलेच

स्वातंत्र्यपूर्व काळापासून पंढरीनाथ पाटील आमदार असतांना त्यांचे असेंब्ली मेंबर्स, मंत्री, गृहमंत्री व मुख्यमंत्री यांच्याशी चांगले संबंध होते. त्यांचे अमोघ वक्तृत्व, दूरदृष्टी, विचारांची परिपक्वता, धोरणात्मक निर्णय घेण्याची क्षमता, आलेल्या प्रसंगाला धाडसाने सामोरे जाण्याची शक्ती इत्यादी बहुआयामी व्यक्तिमत्वामुळे त्यांच्या मतांना व विचारांना ही सर्व मंडळी महत्व देत असत. वेळोवेळी त्यांच्याशी महत्वाच्या बाबतीत सल्लामसलत करीत असत. असे त्यांचे व्यक्तिमत्व विकसित झालेले होते. पारतंत्र्योत्तर स्वातंत्र्यातील पहिल्या घटनात्मक निवडणूकीत ते पराभूत झाले तरी मंत्री व आमदारात त्यांच्याबद्दल आदर कायम होता. उच्चपदस्थ अधिकारी व सचिवसुद्धा त्यांचा मानसन्मान करीत व त्यांच्या शब्दाला महत्व देत. ते पराभूत झाले यावर प्रिमियर नामदार रविशंकर शुक्ल यांचा विश्वास बसला नाही. म्हणून त्यांनी बुलडाण्याच्या कलेक्टरांना फोन करून खात्री करून घेतली होती. मध्यप्रदेश नवीन मंत्रिमंडळाची रचना करण्यासाठी दिनांक १० फेब्रुवारी १९५२ रोजी पंढरीनाथ पाटलांना खलबते करण्यासाठी शिक्षणमंत्री पी. के. देशमुख यांनी तातडीने बोलावून घेतले. नागपूरला पोचताच त्यांनी काही व्यक्तींशी संपर्क साधला. दिनांक ११ फेब्रुवारी १९५२ रोजी पंढरीनाथ पाटील काँग्रेस असेंब्ली

मेंबरांसह, असेंब्ली काँग्रेस पक्षाचे पुढारी पंडित रविशंकर शुक्ल यांना भेटून श्री. पी. के. देशमुख यांना त्यांच्या मंत्रिमंडळात घेण्यासाठी रदबदली केली. आग्रहपूर्वक विनंतीवरून श्री. पी. के. देशमुख यांना मंत्रिमंडळात घेण्याबाबत पंडित शुक्लांकडून होकारही मिळविला. त्याचबरोबर आणखी कोणकोण मंत्री मंत्रिमंडळात घ्यावे याबाबतही त्यावेळी गंभीर चर्चा होऊन चार पाच दिवसात मंत्रिमंडळाची घोषणा करण्याचे पंडित शुक्लांनी जाहीर केले. १० फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी या संपूर्ण आठवड्यात पंढरीनाथ पाटील राजधानी नागपूर येथे थांबले. नवनिर्वाचित आमदार, माजी मंत्री यांच्या भेटी घेत आपली प्रेमाची माणसं मंत्रिमंडळात कशी पाठविता येतील याबाबत सतत प्रयत्नशील राहिले. श्री. मंडलोई व श्री. कन्नमवारांसाठी पंढरीनाथ पाटलांनी रदबदली केली. त्यासाठी त्यांनी द्वारकाप्रसाद मिश्र व पंडित रविशंकर शुक्ल यांची दोनवेळा भेट घेतली. दिनांक १६ फेब्रुवारी रोजी पंडीत शुक्लांनी कलेक्टरांना फोन करून श्री. पंढरीनाथ खरेच निवडणुकीत हरले का ? अशी विचारणा केल्याचे शुक्लांनी पाटलांना सांगितले. त्याचदिवशी मडलोई व कन्नमवार यांना मंत्रिमंडळात घेण्याची कबूली पंडित शुक्लांकडून पंढरीनाथ पाटलांनी मिळविली. म्हणजे पंढरीनाथांचे निकटवर्ती तीन स्नेही आता मंत्री होणार होते. तर अग्निभोज, माकडे व पी. के. देशमुख (शिक्षणमंत्री) हे तिघे कायदेमंडळाच्या निवडणुकीत पराभूत झाल्याने पंडित शुक्लांना फारच वाईट वाटल्याचे पी. के. देशमुखांकडून दिनांक १८ फेब्रुवारी रोजी पंढरीनाथ पाटलांना कळले. त्या तिघांनाही कौन्सिल ऑफ स्टेटवर घेण्याबाबत पंडित शुक्लांनी हायकमांडला लिहिल्याबाबत पी. के. देशमुखांनी पंढरीनाथ पाटलांना सांगितले.

## पराभूतांना स्टेटवर संधी नाही

पंडीत रविशंकर शुक्लांनी त्यांच्या पूर्वमंत्रिमंडळातील पराभूत सहकारी व त्यांना हवे असलेले इतर पराभूत सहकारी यांना कौन्सिल ऑफ स्टेटवर घेण्याबाबत हायकमांडला केलेली विनंती नाकारण्यात आली. त्यामुळे उपरोक्त तीन माजी मंत्री व पंढरीनाथ पाटील यांना कौन्सिल ऑफ स्टेटवर घेता आले नाही. ही माहिती देण्यासाठी पंडित रविशंकर शुक्ल यांनी पंढरीनाथ पाटलांना बोलावण्यावरून ते १२ मार्च रोजी नागपूरला पोचले. तेथे त्यांना हायकमांडचा निर्णय सांगण्यात आला. पंढरीनाथ पाटलांना कौन्सिल ऑफ स्टेटवर घेता येत नसल्याची खंत पंडित रविशंकर शुक्लांनी व्यक्त केली. १३ मार्चला नवीन सभासदांची कौन्सिल ऑफ स्टेटवर जाण्यासाठी निवड झाली.

### काँग्रेसला रामराम ठोकण्याचा विचार

बदलत्या राजकीय परिस्थितीचा विचार करत असता पंढरीनाथांच्या लक्षात आले की, शेतकरी व कामकऱ्यांचे हितासाठी आपण आपल्या सहकाऱ्यांसह ब्राह्मणेतर चळवळ व त्याद्वारा समाजाचे झालेले संघटन तसेच जागृत संघशक्ती काँग्रेसमध्ये विलीन केली. पण प्रत्यक्ष अनुभव असा आला की, काँग्रेस ही सर्वसामान्यांची हितकर्ती नसून ती भांडवलदारांची पक्षपाती आहे. ती शेतकरी, शेतमजूर, कामगार व ग्रामीण जनतेचा उद्धार करू शकत नाही. म्हणून त्यांनी काँग्रेसला रामराम ठोकण्याचा विचार केला. हा विचार मनात घोळत असतानाच त्यांनी तो दिनांक ९ ऑक्टोबर १९५२ रोजी कागदावर उतरविला. त्यांनी काँग्रेसच्या सभासदत्वाचा राजीनामा लिहून काढला व त्यात वरील कारणेही नमूद केली. परंतु तो वरिष्ठांकडे न पाठविता स्वत:जवळ ठेवून घेतला. त्याबाबत त्यांनी पुढे उमरावती व नागपूरला जाऊन आपल्या मित्रांशी चर्चा केली. ना. पी. के. देशमुख, नागपूर कार्पोरेशनचे मेयर बॅ. शेषराव वानखेडे, पंडित द्वारकाप्रसाद मिश्र, पंडित रविशंकर शुक्ल यांचीही दिनांक ३ डिसेंबरला भेट घेतली. तशातच डॉ. पंजाबराव देशमुख यांना १२ ऑगष्ट १९५२ रोजी केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान मिळून ते भारत सरकारचे शेतकीमंत्री झाले. दिनांक १७ ऑक्टोबर १९५२ रोजी खास तार पाठवून डॉ. पंजाबराव देशमुखांनी पंढरीनाथ पाटलांना दिनांक २६ ते २८ पर्यंत उमरावतीस येण्याचे कळविले. या काळात डॉ. पंजाबराव देशमुख उमरावती येथे राहतील. असे त्या तारेत कळविले होते. त्याप्रमाणे पंढरीनाथ पाटील व श्री. संतोषराव पाटील सावरगाव डुकरे मिळून तारीख २८ रोजी उमरावतीस पोचले. परंतु त्यावेळी पंजाबरावांना येता आले नसल्यामुळे त्यांची भेट होऊ शकली नाही. पुढे त्यांच्या बुलडाणा जिल्हा दौऱ्याचा कार्यक्रम पंढरीनाथ पाटलांच्या सल्ल्याने डिस्ट्रीक्ट कमिश्नर श्री. पटवर्धन यांनी दिनांक १७ नोव्हेंबर १९५२ रोजी आखला. भारत सरकारचे शेतकीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचा दौरा त्यानुसार दिनांक २१ रोजी नांदुरा येथे झाला. त्यावेळी त्यांनी मलकापूर भागातील नापिकीची पाहणी केली. या पाहणीच्या वेळी त्यांचेसोबत डी.सी. श्री. पटवर्धन व पंढरीनाथ पाटील हे होते. त्यानंतर ते दिनांक २२ नोव्हेंबरला केळवद, किन्होळा व सावरगाव डुकरे येथेही गेले. सावरगावला भारत सरकारचे शेतकीमंत्री म्हणून त्यांचा जाहीर सत्कार झाला. चिखलीस येऊन डॉ. पंजाबराव देशमुखांनी श्री शिवाजी हायस्कूलला भेट देऊन श्री. भटकर व श्री. पंढरीनाथ पाटील यांच्या वास्तूतही पायधूळ झाडली. जळगाव, मलकापूर व सावरगाव येथे डॉ. पंजाबराव देशमुख व पंढरीनाथ पाटलांची भाषणे झाली.

### अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था परिषद मद्रास

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थांची परिषद मद्रास (चेन्नई) येथे दिनांक २५, २६ व २७ एप्रिल १९५३ या कालावधीत श्री. सिध्वा यांचे अध्यक्षतेखाली राजाजी हॉलमध्ये भरली होती. या परिषदेसाठी बुलडाणा जिल्ह्यातून चिखली जनपदाचे प्रतिनिधी म्हणून पंढरीनाथ पाटील व संतोषराव पाटील असे दोघेही तर मेहकर जनपदाचे प्रतिनिधी म्हणून श्री. गोविंदराव पवार उपस्थित होते. दिनांक २५ एप्रिल शनिवारी सकाळी सदर परिषद सुरू झाली व दिनांक २७ ला सायंकाळी साडेपाच वाजता तिचे सूप वाचले. या कालावधीत सदर प्रतिनिधींनी सकाळी परिषद कामकाजात हजेरी लावली तर दुपारी १ ते ५ वाजेपर्यंत मद्रास शहर पाहिले.

तारीख २७ ला सदर परिषदेतील सर्व प्रतिनिधींनी मद्रास शहरातील वाटर वर्क्स, उत्तम बागा व इतर संस्थांना भेटी दिल्या. सायंकाळी सर्वांचा ग्रुप फोटो देऊन परिषद संपली.

सदर परिषदेसाठी ही मंडळी दिनांक २२ रोजी चिखलीहून निघून मोटारीने जालन्यास पोचली. तेथून रेल्वेने २३ तारखेला सिकंदराबादला पोचले. सकाळी तेथे उतरताच ते एका धर्मशाळेत सामान ठेवून दिवसभर हैद्राबाद शहरामध्ये फिरले. संध्याकाळी तेथे असलेले डॉ. चंपतराव वसू (एम.डी. जर्मनी) यांना त्यांच्या घरी जाऊन भेटले व लगेच रात्री मद्रासला रवाना झाले. २४ ला सायंकाळी ५ वाजता मद्रासला पोचले. त्यांची राहण्याची व्यवस्था मद्रास कायदेमंडळाच्या सभासदांच्या विश्रांतीगृहात केलेली होती. त्यासाठी त्यांना दररोज प्रत्येकी ४ रूपये भाडे आकारले होते. सदर परिषदेचे सूप वाजल्यानंतर दुसऱ्या दिवशी तारीख २८ ला त्यांनी मद्रासचा मुख्य बाजार, विद्यापीठ, हायकोर्ट, प्रवासी बंदर पाहून मद्रासपासून ८० मैल अंतरावरील महाबलीपूरम पाहिले. महाबलीपूरमचे दगडातील कोरीव काम अजिंठा व वेरूळ येथील कामापेक्षाही कमी प्रतीचे आहे असे पंढरीनाथ पाटलांनी नमूद केले. त्यानंतर ते रेल्वेने बंगलोरला सकाळी ८ वाजता पोचले. तेथे त्यावेळी देऊळगावराजा येथील सरकारी सेवेत असलेले जनावरांचे डॉक्टर श्री रंगाचारी सुटीत बंगलोरला घरी गेलेले होते. ते त्यावेळी दोन महिन्यांच्या रजेवर होते. या मंडळींनी त्यांची भेट घेतली. त्यांना बरोबर घेऊन बंगलोर शहर पाहिले. समीक्षक वृत्तीच्या व चिकित्सक पंढरीनाथ पाटलांनी 'बंगलोर शहर पाहण्यासारखे आहे. दिल्लीप्रमाणे हे शहर आधुनिक पद्धतीने बांधलेले आहे.' असे नमूद केले आहे. दुसऱ्या

दिवशी डॉ. रंगचाऱ्यांनी पाहुण्यांसाठी खास दोन मोटारी दिवसभरासाठी त्यांच्या आप्तांकडून मागवून आणल्या. त्यातून या मंडळींनी बंगलोर शहरातील विमानांचा कारखाना व सिल्क मील पाहिली. १ मे ला ही मंडळी म्हैसूरला पोचली. तेथे रंगाचाऱ्यांच्या भावाकडे उतरली. दिवसभर म्हैसूर शहरात फिरून बागा, राजवाडा, प्राणीसंग्रहालय, जवळच्या टेकडीवरील महिषासूर, महिषासूर मर्दिनी देवीचे मंदीर, नंदी पाहून नंतर सुप्रसिद्ध कृष्णराजसागर पाहिला. आग्रा, अजिंठा प्रमाणेच हे शहर प्रेक्षणीय असल्याची नोंद पंढरीनाथ पाटलांनी केली. हुबळी येथे काही लोक मराठी बोलतात व सर्व लोकांना मराठी समजते येथूनच मराठी मुलूख सुरू होतो. त्या दिवशी ते मीरजला मुक्कामी थांबले. दिनांक ३ मे रोजी ते कोल्हापूरला पोचले.

**संयुक्त महाराष्ट्र चळवळ**

संपूर्ण मराठी भाषिक लोकांचा संयुक्त महाराष्ट्र व्हावा यासाठी लोकजागृतीची चळवळ सुरू होती. गणपती उत्सवाच्या काळात दिनांक १९ सप्टेंबर १९५३ रोजी उमरावतीस व दिनांक २० ला यवतमाळ येथे पंढरीनाथ पाटलांची 'संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती' या विषयावर जोरदार भाषणे झाली.

संयुक्त महाराष्ट्र निर्मिती चळवळीचे नेतृत्व संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे अध्यक्ष शंकरराव देवल हे करीत होते. त्यांनी जानेवारी १९५६ मध्ये मुंबईचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई मराठवाडा व विदर्भातील नेत्यांच्या भेटी दिनांक ३ जानेवारी १९५६ रोजी घेतल्या. (८६) (तरूण भारत, नागपूर ता. ४-१-१९५६)

एप्रिल १९५६ मध्ये 'दिल्लीस पंडित नेहरूंनी सर्व मराठी खासदारांची मुलाखत घेतली. त्यावेळी विदर्भाच्या प्रतिनिधींनी प्रादेशिक कमिटीची मागणी केली असल्याचे पंडित नेहरू बोलले. या प्रादेशिक समितीला महाराष्ट्रीय खासदारांनी विरोध केला. आणि विदर्भाला जे संरक्षण हवे ते नागपूर कराराने दिले आहे असे सांगितले. हा नागपूर करार होऊन तेव्हा तीन वर्षे होत आली होती. लोकांच्या स्मृतीतून तो गेला होता. ती स्मृती ताजी करावी यासाठी तो साप्ताहिक लोकमान्य या पत्राने दिनांक ३० एप्रिल १९५६ च्या अंकात सारांश रूपाने दिला. विदर्भाला महाराष्ट्रात सामील करण्यासाठी वैदर्भी पुढाऱ्यांचे मन वळवावे या हेतूने भाऊसाहेब हिरे प्रभृती पुढारी नागपूरला गेले. तेथे हा करार करण्यात आला. २८ सप्टेंबर १९५६ रोजी हा करार झाला असून त्यावर आर. के. पाटील, पी. के. देशमुख, भाऊसाहेब हिरे, देवकीनंदन नारायण, यशवंतराव

चव्हाण, लक्ष्मणराव भटकर, पंढरीनाथ पाटील, रामराव देशमुख, गोपाळराव खेडकर, शेषराव वानखेडे, नानासाहेब कुंटे इतक्यांच्या सह्या आहेत. हा करार करतांना मुंबई काँग्रेसला व स. का. पाटील यांना विचारण्यात आले नाही. अशी बरीच टीका त्यावेळी झाली. पण वस्तुस्थिती अशी होती की, त्यापूर्वी व त्यानंतरही त्यांच्याशी महाराष्ट्र पुढाऱ्यांनी विचार विनिमय करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. परंतु, मुंबई महाराष्ट्रात जाता कामा नये. या एकाच मुद्याशी सुसंगत असे बोलण्यास श्री. पाटील तयार होते. त्यामुळे महाराष्ट्र पुढारी व पाटील यांचेदरम्यान समान भूमिकाच कधी निर्माण होऊ शकली नाही. उलट मुंबईच्या मुद्यांवर विदर्भ, मराठवाडा व मुंबई राज्यातील मराठी जिल्हे यांचे एकमत होते.'

## नागपूर करारातील कलमे

नागपूर कराराच्या पहिल्या कलमात ''राज्यपूनर्रचना समिती स्थापन होत असल्याने मराठी भाषिक प्रदेश स्थापन करण्यासाठी आपण पुढील करार करू या.'' असे म्हटले आहे. दुसऱ्या कलमात मुंबई, मध्यप्रदेश व हैद्राबाद या तीन राज्यातील सलग मराठी भाषा मुलूख एकत्र आणावा व त्याच्या पोटात परकी मुलूख 'एन्क्लेव्ह' ठेऊ नये. असे म्हटले आहे. या मराठी भाषी राज्यास 'महाराष्ट्र' अथवा 'मराठी प्रदेश' असे नाव द्यावे असेही कलमात म्हटले आहे. 'मराठी प्रदेश' या नावास आक्षेप घेऊन 'महाराष्ट्र' हे नाव नकाशावरून पुसून टाकण्याचा हा डाव आहे. अशी एक टीका करण्यात आली. पण नागपूर करारानेच 'मराठी प्रदेश' या नावास संमती दिली आहे. हे येथे लक्षात घेतले पाहिजे. शिवाय ऐतिहासिक नाव त्या त्या इतिहासाचा अभिमान बाळगणारी माणसे असेपर्यंत विसरले जात नाही. महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, विदर्भ, सौराष्ट्र, आंध्र, मराठवाडा ही नावे शंभराहून अधिक वर्षाइतका काळ नकाशावर नव्हतीच. तरी ती इतिहासात कायम राहिली. विदर्भ हे नाव कोणत्याच राज्याला राहणार नाही. तरी त्याचा इतिहास व त्याचे नाव अमर राहणारच आहे. त्यामुळे विदर्भ व मराठवाड्याची तशी मागणी असलीच तर 'महाराष्ट्र' या नावाचा आग्रह सोडून 'मराठी प्रदेश' हे नाव घेण्यास आजच्या महाराष्ट्राने तयारी दाखविली पाहिजे. नागपूर करार करणाऱ्या पुढाऱ्यांनी यापूर्वीच मार्गदर्शन केले असून या प्रश्नावर थोडेही रण माजू देण्यात येऊ नये.

तिसऱ्या कलमात आधी उल्लेख केलेले तीन घटक विकास व राज्यकारभार यासाठी एका राज्यात असावे असे म्हटले आहे. अर्थात या तीन घटकांचे पृथकत्व

व्यवहारात कायम राहून राज्यकारभार व विकास कार्य करावे असा हेतू या कलमात या संबंध करारात स्पष्टपणे दिसतो. कारण चौथ्या कलमात मराठी भाषी राज्य हे एक असले तरी वरील तीन घटकांवर लोकसंख्येच्या प्रमाणात विकास करायचा खर्च व्हावा. मराठवाडा मागासलेला असल्याने तेथे सर्वांगीण उन्नती व्हावी आणि दरसाल राज्यविधानसभेपुढे मराठवाड्याच्या अहवालाचा स्वतंत्र खरडा ठेवावा असे म्हटले आहे. पाचव्या कलमात मंत्रिमंडळ बनवितानाही प्रत्येक घटकाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात मंत्री घ्यावेत असे ठरविण्यात आले आहे. सर्व प्रकारच्या शिक्षणसंस्था तीनही घटकातील लोकसंख्येच्या प्रमाणात विद्यार्थ्यांना सोयी व सवलती द्याव्यात, असे सहाव्या कलमात म्हटले आहे. सातव्या कलमात हायकोर्टाचे मुख ठिकाण मुंबई हे असावे व दुय्यम ठिकाण नागपूर हे ठेवून नागपूरच्या जज्जांनी सामान्यत: विदर्भाकडील कामे पहावीत असे म्हटले आहे. तसेच विदर्भ व मराठवाड्यातील वकील आणि वरिष्ठ अधिकारी यातून हायकोर्ट जज्ज पदासाठी योग्य प्रमाणात माणसे निवडली जावी. आणि सरकारी खात्यात आणि सरकार नियंत्रित धंद्यात नोकर घेतांना ते या तीन घटकातील लोकसंख्येच्या प्रमाणात घेतले जावे असे आठव्या कलमात म्हटले असून नवव्या कलमात विकेंद्रीकरणास पाठींबा दिला आहे; व तीनही घटकातील घटनेचा राज्यकारभाराशी संबंध यावा अशी इच्छा व्यक्त केली आहे. दहाव्या कलमात नागपूर राजधानी ठेवण्याचा मुद्दा आला आहे. नागपूर हे दीर्घकाळ एका प्रांताचे राजधानीचे शहर आहे. त्यामुळे त्याचे विशिष्ट फायदे त्या शहरास मिळत आले आहे. आता मराठी भाषी राज्य झाल्यावर त्या राज्याची कारभारक्षमता न बिघडता नागपूरचे वैशिष्ट्य व तेथील जनतेचे फायदे टिकविणे आवश्यक आहे. या दृष्टीने दरसाल काही काळ राजधानी नागपूरास राहावी व राज्यविधानसभेचे एक अधिवेशन नागपूरास भरावे असे सुचविले असून या कामाचे बाबतीत तज्ज्ञांचा सल्ला घेण्यात यावा असे हे कलम सांगते. शेवटच्या म्हणजे अकराव्या कलमात जिल्ह्याच्या हद्दी ठरविताना बहुसंख्य मराठी भाषी सलग खेडी मराठी भाषी राज्यास जोडावी असे म्हटले आहे.' (८२) (सा. लोकमान्य, ता. ३०-४-१९५६)

## स्वतंत्र भारतातील दुसरी विधानसभा निवडणूक

१९५२ साली स्वतंत्र भारतातील पहिली निवडणूक होऊन घटनेतील तरतूदीनुसार राज्यविधान मंडळातील लोकप्रतिनिधींनी आपल्या कुवतीनुसार कायदे करून कारभार केला. त्याला तेव्हा पाच वर्षे पूर्ण होत आली होती. दुसऱ्या निवडणुकीची

चाहूल लागली होती. त्याप्रमाणे १९५७ च्या विधानसभा निवडणूकीची तयारी सुरू झाली होती. विदर्भातील काँग्रेस उमेदवारांची यादी जवळजवळ पक्की झाली होती. तीत डॉ. गोपाळराव खेडकर व ब्रिजलाल बियाणी यांना अनुक्रमे तीन व दोन नावे सुचविण्याची संधी मिळाली. त्याप्रमाणे डॉ. खेडकरांनी १. रा. जा. घारफळकर २. डॉ. कोरपे आकोटकर किंवा सरनाईक वकील वाशिम आणि ३. पंढरीनाथ पाटील चिखली किंवा सौ. विमलाबाई देशमुख अमरावती तर बियाणींनी बुलडाणा जिल्ह्यातून मुंबई कौन्सिलसाठी सांगळे वकील किंवा महादेवराव आळशी ता. खामगाव व उमरावती जिल्ह्यातून बाबासाहेब सांगळूदकर पण दिनांक २९ सप्टेंबर १९५६ रोजी रात्री साडेआठ वाजता अकोला येथील स्वराज्य भवनात विदर्भ काँग्रेस पार्लमेंटरी बोर्डाची सभा झाली. तिच्यासमोर मांडण्यासाठी खालील पाच नावे जवळजवळ पक्की झाल्यागत पुढे आली. १. घारफळकर २. कोरपे ३. पंढरीनाथ पाटील ४. बियाणी ५. आळशी पुढे खटपटी-लटपटी करून बियाणींनी विदर्भ पार्लमेंटरी बोर्डात आपले नाव स्वत:च सुचवून पास करून घेतले. बियाणींना मुंबई कौन्सिलात पाठविण्याची विदर्भ काँग्रेसची सूचना बहुधा केंद्रीय काँग्रेस निवडणूक समितीला मान्य होणार नाही, याची चाहूल बियाणींना लागली. तशा बियाणीविरोधी तक्रारीच्या तारा गेल्या होत्याच. वातावरणाचा अंदाज घेऊन बियाणींनी आपले नाव मागे घेतले. कारण, काही असले तरी बियाणींच्या नावाऐवजी पंडित कानडेशास्त्रीचे नाव आल्याची वदंता पसरली होती. तसेच सौ. विमलाबाई देशमुख यांचे नाव आल्याची वदंता पसरली होती. तसेच सौ. विमलाबाई देशमुख यांचे नाव वगळून अकोल्याच्या सौ. सुभद्राबाई जोशी यांचे नाव संमत झाल्याची वार्ता पसरली होती. थोडक्यात, या निवडणुकीत बियाणींना सर्वत्र प्रतिकूल वातावरण होते. त्यामुळे त्यांची अवस्था केविलवाणी झालेली होती. (८३) (तरूण भारत, नागपूर ता. ५-१०-१९५६)

## बुलडाणा जिल्हा मराठवाड्याला जोडण्याची मागणी

केंद्र सरकारने मागास भागांचा विकास साधण्यासाठी जादा रकमेची तरतूद करण्याचे धोरण स्वीकारले. मराठवाडा सगळ्यात जास्त मागासलेला आहे. तसेच इतर जिल्ह्यांच्या तुलनेत बुलडाणा जिल्हा फारच मागासलेला आहे. म्हणून बुलडाणा जिल्हा १ नोव्हेंबर १९५६ पासून अस्तित्वात येणाऱ्या द्वैभाषिक मुंबई राज्यात न जाता तो मराठवाड्याला जोडावा अशी मागणी बुलडाणा जिल्ह्यातील चिखलीचे माजी आमदार श्री. पंढरीनाथ पाटील यांच्या नेतृत्वात बुलडाणा जिल्ह्यातील लोकांनी केली

होती. या मागणीमागे बुलडाणा जिल्ह्याचा विकास व्हावा हीच वास्तव व रास्त भावना होती. (८४) (गावकरी, जळगांव ता. २७-१०-१९५६)

## लोकनायक अणेंवर शिस्तभंग कारवाई

१९ जून १९६० रोज रविवारी अकोला येथे स्वराज भवनात आमदार भिकू फकिरा पाटील यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या विदर्भ विभाग काँग्रेस कार्यकारिणी सभेत आमदार माकडे गुरूजी व आमदार ताडूरवार यांच्या दु:खद निधनाबद्दल दु:ख व्यक्त करणारा ठराव पास करण्यात आला. त्यानंतर चार ठरावांचे मसुदे स्वीकृत करण्यात आले. त्यात सत्याग्रहींना मदत करण्यासंबंधी, लोकनायक बापूजी अणे यांनी जातीयवादी उद्गार काढल्याबद्दल निषेध व्यक्त करून त्यांच्या विरूद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत, महिलांची समिती नेमण्यासंबंधी आणि विदर्भ आंदोलनाच्या नावाखाली हिंसात्मक प्रकार व प्रचार करणारांवर कडक कारवाई करण्यासंबंधी.

या सभेत काँग्रेस कार्यकारिणीचे सभासद आणि महाराष्ट्र प्रदेश सरकारातील वऱ्हाडचे मंत्री व उपमंत्री उपस्थित होते. या उपस्थितात सर्वश्री डॉ. आबासाहेब उर्फ गोपाळराव खेडकर, नानासाहेब चिने, दादासाहेब खोडे, अप्पासाहेब सरनाईक, शांताबाई पागे, गोविंददास भाटिया, डॉ. कोरपे, एन. यु. देशमुख, एस. जी. काजी, बाळासाहेब पळसपगार, नानासाहेब वैराळ हे होते. (८७) (वृत्तपत्राचे नाव नाही पण वर्ष १ ले अंक १३८ वा, अकोला सोमवार ता. २०-६-१९६०)

## महाबळेश्वर शिबीर : चिंतन, मंथन मेळावा

३० नोव्हेंबर १९६० रोजी नागपूर येथे धनवटे रंगमंदिरात डॉ. गोपाळराव खेडकर यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र काँग्रेस कमिटीची बैठक व काँग्रेस कार्यकर्त्यांचा मेळावा झाला. या मेळाव्यात महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांचे मार्गदर्शक भाषण झाले. याच मेळाव्यात पंढरीनाथ पाटलांनीही आपली मते स्पष्टपणे मांडली. त्यावेळी ते म्हणाले, "मंत्रिमंडळात बहुजन समाजाचे प्रतिनिधी आहेत. पण खेड्यावर राज्य करणारे तहसिलदार वगैरे अधिकारी शेतकऱ्यांचे प्रतिनिधी नाहीत." याबाबत बोलतांना मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण म्हणाले, ‘श्री. पंढरीनाथ पाटील यांनी महाबळेश्वरच्या निर्णयाकडे चुकीच्या दृष्टिकोनातून पाहिले आहे. असे मला वाटते. बहुजन समाजाला शिक्षणाचे क्षेत्र खुले असले पाहिजे अशी जी त्यांची मागणी आहे ती

मला मान्य आहे. पण तहसीलदार व इतर सरकारी नोकऱ्यांत जागा बहुजन समाजाला मिळाल्या पाहिजे, असे जे त्यांचे म्हणणे आहे त्यास मी सहमत नाही. नोकऱ्या मिळण्यासाठी शिक्षण द्यावयाचे असेल तर ते अजिबात बंद झालेले चालेल, असे माझे मत आहे. आपण सत्तेचे विकेंद्रीकरण मागतो ते नोकऱ्यासाठी नसून ते ग्रामपंचायतीपर्यंत पोचावे म्हणून मागत आहोत. नोकऱ्यांसाठी शिक्षण घेतले तर आपण महाराष्ट्राचे व पर्यायाने भारताचे नुकसान कराल. १९६० साली काँग्रेसवाला अशा दृष्टीकोनातून विचार करू लागला तर ते काँग्रेसला मारक ठरेल. १९६१ साली काँग्रेसविरोधी सर्व शक्ती उफाळून येतील. एवढेच नव्हे तर उग्र रूप धारण करतील. तेव्हा पंढरीनाथ पाटील यांची तत्त्वे चांगली असली तरी दृष्टिकोन मात्र दूषित आहे. शिक्षण व नोकरी याची सांगड ब्रिटीश राजवटीत घातल्या गेली. त्या चाकोरीतून आम्हास बाहेर पडावयास पाहिजे. त्यांच्या विचारासारखे व्हावयास सत्तेचे विकेंद्रीकरण हाच मार्ग आहे. केवळ नोकऱ्यात प्रवेश हा नव्हे ! गेल्या दोन महिन्यात मी शासनविषयक कामापेक्षा संघटनात्मक दौरे जास्त केले. त्यात मला आढळून आले की, सर्वसामान्य जनतेचा काँग्रेसवरील विश्वास वाढत आहे. मात्र आम्ही त्यास पात्र ठरविण्याची पराकाष्ठा केली पाहिजे. आता जनतेला जे रूचेल ते बोलण्याची वेळ नाही. तर खरे तेच बोलणे जरूरीचे आहे. त्यासाठी आपला दृष्टिकोन साफ असणे आवश्यक आहे.''

या बैठकीत व मेळाव्यात महाबळेश्वर शिबीरात पास करण्यात आलेल्या निवेदनावर चिंतन व मंथन होऊन तो पास करणे हा मेळाव्याचा विषय होता. या निवेदनाचे अनुकरण झाले तर शासन व संघटन यात उत्पन्न होणारा संघर्ष टळू शकेल. म्हणून प्रत्येक कार्यकर्त्याने या निवेदनानुसार कार्यप्रवृत्त व्हावे असे मार्गदर्शक उद्‌गार मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सभेत भाषण करताना काढले. यावेळी सभेसमोर १. महाबळेश्वर निवेदनास पाठिंबा देणे. २. नागपूर येथून अखिल भारतीय काँग्रेस कमिटीवर प्रतिनिधी पाठविणे आणि ३. शेती व सहकार यासाठी दोन उपसमित्या नेमणे एवढेच महत्वाचे विषय होते.

महाबळेश्वरातील निवेदनाला मान्यता देण्याचा ठराव श्री. भाऊसाहेब हिरे यांनी मांडला व त्याला पंढरीनाथ पाटील व उपमंत्री मधुसूदन वैराळे यांनी पाठिंबा दिल्यावर तो एकमताने पास झाला. श्री. भाऊसाहेब वर्तक यांनी उपसमितीबाबत ठराव मांडला व श्री. कन्नमवार यांनी नागपूरतर्फे अखिल भारतीय काँग्रेस कमिटीवर प्रतिनिधी म्हणून

उपमंत्री श्री मदन गोपाल अग्रवाल यांचे नाव सुचविले आणि त्यास श्री गावंडे यांनी अनुमोदन दिल्यावर उपरोक्त दोन्ही ठराव मंजूर झाले. (८८) (तरूण भारत, नागपूर २-१२-१९६०)

## भारतीय राज्यघटनेनुसार विधानसभेची तिसरी निवडणुक

१९५० साली भारतीय राज्यघटनेचा अंमल सुरू झाला. त्यानुसार दोन निवडणुका सुरळीपणे पार पाडून भारतीय रयतेचे लोकप्रतिनिधी उत्तम राज्यशकट चालवू शकतात याचा प्रत्यय गत दहा वर्षात आला होता. लोकामध्ये सुद्धा राजकीय जागृती निर्माण झाली. अशा स्थितीत स्वतंत्र भारतातील राज्यघटनेनुसार १९६२ साली होणाऱ्या विधानसभांच्या तिसऱ्या निवडणूकीची गडबड सुरू झाली. बुलडाणा जिल्ह्यातील विधानसभा प्रचाराची पहिली प्रचारसभा दिनांक १६ नोव्हेंबर १९६१ रोजी गांधी चौक, शेगाव येथे पंढरीनाथ पाटील यांनी प्रचारसभा मंचावर प्रत्यक्ष नारळ फोडून झाली. निवडणूक प्रचाराचा नारळ आतापर्यंत पंढरीनाथ पाटलांनीच फोडला. त्या प्रथेला अनुसरूनच प्रचाराची सुरूवात त्यांचे हस्ते नारळ फोडून काँग्रेसने काँग्रेस विधानसभा, प्रचार मोहिमेचा आरंभ केला. यावेळी पंढरीनाथ पाटलांचे दणदणीत भाषण झाले. या सभेला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस श्री. राजाराम बापू पाटील व अखिल भारतीय काँग्रेसचे निरीक्षक खासदार श्री. विजय वर्गीस हे प्रमुख पाहूणे होते. गोविंददासजी भाटियाही यावेळी उपस्थित होते. तर सभेचे अध्यक्ष म्हणून श्री. लक्ष्मणराव देशमुख हे स्थानापन्न झाले होते. (८९) (तरूण भारत, नागपूर ता. १८-११-१९६१)

## पंढरीनाथ राज्यसभेत

डॉ. बाबासाहेब आंबडेकरांचे सच्चे अनुयायी कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड यांनी पक्षद्रोही बी. सी. कांबळे यांचा दिनांक ३० मार्च १९६२ रोजी झालेल्या राज्यसभा निवडणूकीत पराभव केला. पहिल्या फेरीत श्री. गायकवाड यांना ३५ व श्री. कांबळे यांना अवघी १९ मते पडली. तर दुसऱ्या फेरीत या दोघांना अनुक्रमे ३५.०९ व ३५.२४ मते पडली व गायकवाड एका मताने निवडून आले. याशिवाय भारताचे अमेरिकेतील राजदूत श्री. महंमद करीम छागला, मुंबईचे माजी मंत्री श्री. ग. दे. तपासे, धैर्यशील पवार, श्री. पंढरीनाथ पाटील आणि ताराबाई साठे हे काँग्रेसचे पाचही उमेदवार विजयी झाले व अशा तऱ्हेने पंढरीनाथ पाटलांचा शिरकाव राष्ट्रीय पातळीवरील राजकारणात होऊन ते संसदेचे सभासद झाले.

## गोवा हायकोर्ट बिलास विरोध

लोकसभेने पास केलेले गोवा हायकोर्ट विधेयक दिनांक ४ मे १९६४ रोजी राज्यसभेत ११ पैकी १० सदस्यांनी अडविले. यात अडवणूक करणाऱ्यांमध्ये महाराष्ट्रातील दोन काँग्रेस खासदार व एक अपक्ष खासदार सर्वश्री मोहन धारिया, पंढरीनाथ पाटील (दोघेही काँग्रेस) व श्रीमती शकुंतला परांजपे (अपक्ष) यांचा समावेश होता. सदर बिल वादग्रस्त असल्यामुळे ते सिलेक्ट कमिटीकडे संदर्भार्थ पाठवावे अशी सुधारणा श्री. डी. बी. देसाई यांनी केली पण ती फेटाळण्यात आली. ते वादग्रस्त बिल पास होऊ नये कारण ते पास झाले तर गोव्यातही काश्मीरसारखी परिस्थिती निर्माण होऊन तिला केंद्रसरकारला तोंड द्यावे लागेल असे पंढरीनाथ पाटलांनी ठणकावून सांगितले.

(१०) टाइम्स ऑफ इंडिया न्यु दिल्ली ता. ५-५-१९६४), (११) Patriot New Delhi ता. ५-५-१९६४

(१२) The Stateman ता. २७ मे १९६४, (१३) दै. मराठा, बुधवार ता. २७ मे १९६४

## किसनवीरांचा सत्कार

पंढरीनाथ पाटलांचा जिल्ह्यातील प्रत्येक गावाशी संपर्क होता. तसाच तो महाराष्ट्रातील सर्व शिखर नेत्यांशीही होता. क्रांतिकारक, स्वतंत्रता संग्राम सैनिकांशी त्यांचा संपर्क होता. अशापैकी एक क्रांतीकारक स्वातंत्र्यसैनिक सातारा जिल्ह्याचे श्री. किसनवीर हे होते. ते दिनांक ३ ऑक्टोबर १९६६ रोजी काँग्रेस प्रचारासाठी मलकापूर येथे आले असता खासदार पंढरीनाथ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचा सत्कार सार्वजनिक रीतीने तेथील सार्वजनिक संस्था, कार्यकर्ते व नागरिकांनी केला. नगरपालिका उपाध्यक्ष श्री. आबाराव सुपराव देशमुख यांनी नगरपालिकेतर्फे देण्यात आलेल्या मानपत्राचे वाचन केले. सदर मानपत्र न. पा. अध्यक्ष श्री. जगन्नाथराव जाधव यांनी चांदीच्या करंड्यातून खा. किसनवीर यांना अर्पण केले. सभाध्यक्ष श्री. पंढरीनाथ पाटील यांनी सन्माननीय किसनवीरांचा परिचय करून दिला. तसेच काँग्रेस सत्तेवर आल्यापासून गत ३० वर्षात किती प्रगती झाली व किती लोकोपयोगी कामे झाली याची माहिती दिली. विरोधक जनतेची कशी दिशाभूल करतात हे सप्रमाण पटवून दिले. (१४)

(यशवंत संदेश, मलकापूर ता. ८-१०-१९६६)

## इंदिरा काँग्रेस हीच खरी समाजवादी काँग्रेस

पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी संस्थानिकांचे तनखे बंद केले, तसेच १४

बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. त्यामुळे सामान्य माणसाला बँकेच्या कर्जाचा लाभ मिळू लागला. बँकेसारख्या संस्थेच्या ठेवीत जमा होणारा जनतेचा पैसा आतापर्यंत गोरगरिबांच्या उत्थानांकरिता वापरल्या जात नव्हता. परंतु या बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यामुळे ही सार्वजनिक मालमत्ता सर्वसामान्य लोकांच्या हिताकरिता उपयोगात आणण्याचा मार्ग इंदिरा गांधींनी अत्यंत कणखरपणे स्विकारला. सर्वसामान्य माणसाला या चौदा बँकांचे दरवाजे खुले केले. समाजासाठी पैसा पुरवठा करण्याची व्यवस्था केली म्हणून इंदिरा काँग्रेस हीच खरी समाजवादी काँग्रेस आहे, हा काँग्रेस पक्षच केंद्रात कणखर व स्थिर सरकार देऊ शकतो, असे पंढरीनाथ पाटलांनी लोकांना पटवून दिले व "येत्या (१९७२) निवडणुकीत मतदारांनी इंदिरा काँग्रेसलाच मते द्यावी." असे आवाहन दलितमित्र समाजभूषण, खासदार पंढरीनाथ पाटील आपल्या प्रचारसभांमधून करीत असत. असे असले तरी खासदार पंढरीनाथ पाटील व त्यांचे जवळचे सहकारी इंदिरा काँग्रेस उमेदवारांच्या विरूद्ध प्रचार करीत असल्याच्या अफवा प्रतिपक्ष पसरवीत असे. अशा प्रचाराला बळी पडू नये असे ते लोकांना वारंवार सांगत. (१०६) (दै. लोकमत ता. २२-२-७२)

## शंकरराव चव्हाणांचा गुणगौरव

शंकरराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. त्यानंतर ते १५ मार्च १९७५ रोजी औरंगाबाद नांदेडच्या दौऱ्यावर होते. त्यावेळी १५ मार्च १९७५ रोजी औरंगाबादला झालेल्या शंकररावांच्या सत्कार समारंभात नागपूर करारावर सही करणारे विदर्भाचे वयोवृद्ध नेते म्हणून पंढरीनाथ पाटील यांनी शंकररावांचा गुणगौरव करणारे भाषण केले. (११३) (दै. अजिंठा, औरंगाबाद ता. १६-३-१९७५)

❋

# भाग - ४

# शैक्षणिक कार्य

## जांभूळधाब्यात पहिली शाळा सुरू केली

जांभूळधाब्याला न्यायपंचायती पाठोपाठ त्यांनी शैक्षणिक कार्याला महत्व दिले. जांभूळधाब्याला पंढरीनाथांचे चुलते राहत होते. ते श्रीमंत, सत्यनिष्ठ होते. त्यामुळे गावात त्यांचे वजन होते. सदर जांभूळधाबा गावची लोकसंख्या त्यावेळी एक हजाराच्या जवळपास होती. त्या गावात गरिबांच्या मुलांसाठी शाळा काढण्याचा निश्चय पंढरीनाथांनी केला.

शिक्षण नसल्यामुळे खेड्यातील लोकांची दैना झाली होती, हे त्यांना चांगले समजलेले होते. शिक्षणाशिवाय खेड्यातील लोकांचे भले होणार नाही, खेडी सुधारणार नाहीत, हे त्यांना पक्के पटलेले होते. म्हणून त्यांनी हे गाव साक्षर करण्याचे ठरविले. त्यांनी गावकऱ्यांच्या मदतीने ताबडतोब 'सार्वजनिक मराठी शाळा' ही संस्था सुरू केली. पहिल्याच महिन्यात सुरूवातीला चार वर्ग उघडले. त्यात एकूण ३५ मुले दाखल झाली. केवळ मराठेच नव्हे तर त्यात महार, मांग इत्यादी अस्पृश्य जातींची मुलेही होती. मुलींची संख्याही बरीच होती.

## प्रौढांसाठीही शाळा सुरू केली

त्यावर्षीचा पावसाळा संपताच प्रौढांसाठी रात्रीचा साक्षरता वर्ग सुरू केला. वर्गात सुरूवातीला तीन इसम दाखल झाले. पुढे ही संख्या वीसपर्यंत जाऊन पोहोचली. या उपक्रमासही गावकऱ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला.

१९२१ च्या डिसेंबर महिन्यात सुगी संपताच सीताराम पाटलांचे मामे भाऊ श्री. सखाराम पाटलांनी गावच्या शेतकऱ्यांकडून वर्गणी रूपाने ज्वारी जमा केली. ही सारी मदत सखाराम पाटलाने पंढरीनाथांनी काढलेल्या बोर्डिंगसाठी पिंप्रीस पंढरीनाथांच्या वडिलांकडे पाठविली. त्यांना त्यावेळी बरे वाटले. कारण आपल्या मुलाने नोकरी करावी अशी त्यांची इच्छा होती. प्रत्येक बापाला असेच वाटत असते. मोरोपंत म्हणतात,

**सुविद्य, धन मेळवी, वचन आयके, आवरी ।**
**प्रपंच, भर घे शिरी, करि कृपा पिता त्यावरी ॥**
**असा जरि नसे, रूचे तरि न तो अभद्र क्षण ।**
**तसा तुजचि आवडे करिसि तूचि तद्रक्षण ॥**
(केका क्रमांक / ९४)

कारण कमावता मुलगाच बापाला आवडतो.

## वाचनालयाची स्थापना केली

वाचनाशिवाय ज्ञान मिळत नाही हे पंढरीनाथांना 'ब्राह्मण आणि बहिष्कार', 'बिजक' व 'सत्यार्थप्रकाश' यांच्या वाचनातून कळले होते. असे विचारधन केवळ ग्रंथालयाच्या माध्यमातूनच सर्वसामान्यांना उपलब्ध होऊ शकते, हेही त्यांना कळून चुकले होते. म्हणून शाळेत शिकून बाहेर पडल्यावर तरूणांच्या ज्ञानाची कक्षा रुंदावण्यासाठी, विविध विषयांचे ज्ञान मिळविण्यासाठी, विविध ग्रंथ उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असते, हेही त्यांना चांगले कळून चुकलेले होते. म्हणून त्यांनी जांभूळधाब्याला एक सार्वजनिक वाचनालय सुरू केले. त्याकाळी त्या वाचनालयात आठ दहा वृत्तपत्रे येत. त्यात काही काँग्रेस मताची तर काही सत्यशोधक मताची होती. त्या काळात पंढरीनाथांवर काँग्रेसमतांचा पगडा होता. पण मोहनीबुवाशी 'मी क्षत्रिय की शूद्र ?' हा वाद लहानपणी वाचलेल्या 'ब्राह्मण आणि बहिष्कार' व 'सत्यार्थप्रकाश' यांच्या वाचनामुळे करू शकलो, हे त्यांना चांगले आठवते. तेव्हापासूनच त्यांच्या मनात सत्यशोधक चळवळीची बीजे रूजली. त्यातूनच या वाचनालयातील 'सत्यप्रकाश', 'विजयीमराठा', 'दीनमित्र' इत्यादी सत्यशोधक मताच्या वर्तमानपत्रातील लिखाणांचा पंढरीनाथांवर दिवसेंदिवस अधिक पगडा बसू लागला. त्यातूनच ते सत्यशोधक चळवळींकडे वळले. कारण काँग्रेस सामाजिक स्थितीचा विचार करण्यास तयार नव्हती. काँग्रेसला फक्त स्वातंत्र्य हवे होते तर सत्यशोधक चळवळीच्या मते अस्पृश्यता व जातिभेद याने देशात विस्कळीतपणा व कमजोरी आली. शिक्षण प्रसाराच्या साह्याने देशात प्रथम सामाजिक समता निर्माण करणे गरजेचे आहे. त्याशिवाय मिळणारे स्वातंत्र्य कुचकामी ठरेल. सामाजिक समता व ऐक्याअभावी देश कमकुवत राहील. त्यामुळे स्वातंत्र्य मिळूनही ते टिकणार नाही. याची जाण या चळवळीमुळे आली. म्हणूनच पंढरीनाथांना काँग्रेसपेक्षा सत्यशोधक चळवळ भावली.

## उत्कृष्ट निकालाबाबत बोनस

जांभूळधाब्याची शाळा सुरू होऊन एक वर्ष झाले. २५ जून १९२२ रोजी येथील शाळेतील मुलांची वार्षिक परीक्षा झाली. ही परीक्षा सरकारी शाळाखात्याच्या स्कूल इन्स्पेक्टरकडून घेतली गेली. दहा महिन्यात धुळाक्षरापासून सुरूवात होऊन काही मुलांनी तर तिसरीचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यापर्यंत मजल मारली व त्यांनी याच वर्षी तिसरीची परीक्षाही दिली. काहींनी दुसरी तर काहींनी पहिलीची उत्तम तयारी केली. परीक्षेचा निकाल समाधानकारक लागला. परीक्षेत बसलेल्या ३० मुलांपैकी इयत्ता तिसरीचे तीन दुसरीचे सात व पहिलीचे पंधरा अशी एकूण पंचवीस मुले उत्तीर्ण झाली. त्याबद्दल पंढरीनाथांना बोर्डाकडून या उत्कृष्ट कार्याबद्दल एकशे पन्नास रूपये (बोनस) बक्षिसादाखल मिळाले.

## बोर्डींगची स्थापना

शैक्षणिक, सामाजिक व राष्ट्रीय कार्यामुळे पंढरीनाथांचे मित्रमंडळ विस्तारले. विचारात परिपक्वता आली. आत्मविश्वास वाढला. सामाजिक कार्याची जाण येऊ लागली. शिक्षणाचे महत्व कळालेच होते. त्याचबरोबर वाचनाचे महत्त्वही कळाले होते. सामाजिक व राजकीय विचारांची दिशा दाखविणारे ग्रंथ व वृत्तपत्रवाचन बहुजनांसाठी किती गरजेचे आहे हेही त्यांना कळून आले होते. म्हणूनच त्यांनी आंबोडा येथे शाळा व जांभूळधाब्याला वाचनालयाची स्थापना केली. १९२१ साली त्यांनी बुलडाण्यातही एक वाचनालय स्थापन केले. १९२२ साली चिखली येथे मराठा व तत्सम जातींच्या विद्यार्थ्यांसाठी बोर्डींग सुरू केले. पुढे १९३३ साली या बोर्डींगचे रूपांतर श्री शिवाजी मराठा एज्युकेशन सोसायटीत झाले व ती कायद्याने नोंदवण्यात आली. १९३३-३४ पर्यंत पंढरीनाथ पाटील या संस्थेचे सेक्रेटरी होते. पण १९३३ साली ते जिल्हा कौन्सिलमध्ये निवडून गेल्यामुळे त्यांनी सेक्रेटरी पदाचा राजीनामा दिला व त्यांच्या जागेवर त्याच बोर्डींगचा माजी विद्यार्थी राजाराम कडतूजी पाटील या तरूण उत्साही व्यक्तीची निवड करण्यात आली. १९३२ सालीच या संस्थेला खामगाव रोडवर ५०० रूपये किंमतीची अडीच एकर जमीन विकत घेण्यात आली होती. त्याचवर्षी बुलडाणा येथेही विद्यार्थी वसतिगृह सुरू केले. तत्पूर्वी त्यांच्याच प्रेरणेने व सहकार्याने १९२१ साली चिखली येथे लक्ष्मणराव भटकरांनी चोखामेळा बोर्डींगची स्थापना केली. बहुजनांच्या शाळेत शिकणाऱ्यांची राहण्याची सोय झाली. (१२०)

(श्री. देवसिंग जयसिंग भोंडे, अध्यक्ष यांनी मराठा बोर्डिंग इमारत फंड देणगीदारास जाहीर विनंती पत्रक, दि. १-७-१९३७).

### भागवतबुवा देहूकरांचा कैवार

पिंप्री आढाव येथे १९२१ साली जे बोर्डींग स्थापन केले त्याला मदत मिळविण्यासाठी पंढरीनाथ धुळ्याला गेले. त्यावेळी त्या जिल्ह्यातील कुंकुरमुंडा या गावी भागवत भक्तांनी एक यज्ञ सुरू केला होता. हा यज्ञ सात दिवस चालला होता. परिसरातील हजारो भाविक दररोज यज्ञासाठी येत असत. या यज्ञासाठी देहूचे भागवतबुवा देहूकर हे संत तुकारामाचे वंशज आलेले होते. तेथील विठ्ठल मंदिरात त्यांचे कीर्तन ठेवण्यात आले. तुकारामाचा वंशज म्हणजे शूद्र म्हणून तेथील पुजाऱ्यांनी भागवतबुवांना मंदिराच्या परिसरात कीर्तन करण्यास मनाई केली. त्याचवेळी नेमके पंढरीनाथ तेथे पोचले. पंढरीनाथांना हे कळताच ते देहूकरांच्या मदतीला धावून गेले. देऊळ ब्राह्मणांच्या ताब्यात होते. त्यांनी विठ्ठलाच्या देवळातच तेथील शास्त्रीपंडितांना आवाहन केले की, 'विठोबाजवळ भेदभाव नाही, जाती धर्म इत्यादी कोणताच आपपरभाव नाही' तेथेच त्यांनी तुकोबारायांचे अनेक अभंग पुरावे म्हणून मुखोद्‌गत सादर केले व त्यांची बोलती बंद केली. भागवतबुवा देहूकरांना शूद्र म्हणून कीर्तन करण्यास मनाई करणाऱ्या प्रवृत्तीची त्यांच्या मनात चीड निर्माण झाली.

### भ्रष्टाचारी मुख्याध्यापकास धडा शिकविला

२ मे १९२८ रोजी चिखली येथील मराठी शाळेच्या मुलांची परीक्षा सुरू होती. त्यावेळी पंढरीनाथ पाटील शाळा समितीचे चेअरमन होते. या परीक्षेत मुलांनी सर्रास कॉप्या केल्या. त्यात मास्तरलोकांचे पूर्ण प्रोत्साहन होते. ही बाब गंभीरतेने घेऊन पंढरीनाथ तत्कालीन शाळा निरीक्षक श्री. जोगळेकर यांना भेटले. चौधरी नामक शिक्षकाने मुलांकडून रात्री पैसे घेऊन हा प्रकार घडला असे लक्षात आले. मुलांकडून तक्रार अर्ज आलेले होते. चौधरी मास्तरांनी घेतलेले पैसे मुलांना परत केले व पंढरीनाथ पाटलांना माफीपत्र लिहून दिले. त्यानंतर त्यांनी जिल्हा शाळा निरीक्षकांकडे मुख्याध्यापकाविरूद्ध तक्रार अर्ज केले.

### जातील तेथे बोर्डींगसाठी वर्गणी मागणी

पंढरीनाथ पाटील सतत फिरतीवर असत. लग्नसोहळा असो की सत्काराचा कार्यक्रम त्याठिकाणी ओळखीच्या सधन लोकांना भेटून ते आपल्या मराठा बोर्डींगसाठी वर्गणी मागत असत. दिनांक ११ मे १९२८ रोजी ते वर्धा जिल्ह्यातील रोहणा येथील

श्रीमंत नानापाटील मालगुजार यांचे भावाचे सोबत बोरीअडगाव येथील श्रीमंत कृष्णराव रामजी पाटील यांच्या मुलीच्या लग्नासाठी गेले. हा लग्नसोहळा चार दिवस चालला. या चार दिवसात लग्नाच्या आनंदात सहभागी असताना पंढरीनाथांना आपल्या बोर्डींगच्या मुलांची काळजी होती. या लग्नात प्रचंड खर्च झाला. या लग्नात वरमुलास हुंडा बराच मिळाला. या श्रीमंताच्या लग्नास नाच होता. त्याबाबत पंढरीनाथ नमूद करतात, 'संभावित मंडळी ही टारगटपणा करीत होती. या लग्नात नाचण्यासाठी आणलेल्या वेश्यांना तीनशे ते चारशे रूपये मिळाले. परंतु मराठा बोर्डींगसाठी मात्र अवघे ७५ रूपये जमा झाले.' याचा अर्थ पंढरीनाथाने तेथे जमलेल्या मंडळीपैकी ओळखीच्या श्रीमंतांना बोर्डींगसाठी मदत मागितली. रंगिल्या रसिकांना गरीब मुलांच्या शिक्षणासाठी मदत करण्यापेक्षा वेश्यांवर पैसा ओतण्यास जास्त आनंद मिळाला. हा समाजमनाचा पैलूही त्यांच्या लक्षात आला. त्यानंतर ते लगेचच नायगाव येथील डोंगरसिंग रामजी पाटील वकील यांच्या मुलीच्या लग्नासाठी उपस्थित राहिले. पंढरीनाथ आपल्या आप्तमित्र व हितचिंतकांच्या सुख दु:खात आवर्जून सहभागी होत असत. १३ मे १९२८ रोजी लग्न पानसुपारीप्रसंगी 'विद्येचे महत्त्व' या विषयावर पंढरीनाथांचे भाषण झाले.

एवढ्या धकाधकीतही भटकंतीवर असताना दीनदुबळे व मागासांची काळजी वाहण्यात पंढरीनाथ विसरले नाहीत. ५ जुलै १९२८ रोजी जिल्हा कौन्सिल ऑफीस बेअररची निवडणूक होताच दुसऱ्या दिवशी बुलडाणा येथील मराठा बोर्डींगसाठी भाड्याने जागा पाहिली. तर पाचव्या दिवशी म्हणजे दिनांक ९ जुलै १९२८ रोजी सोमवारी आनंद चांभार या विद्यार्थ्यांस सोबत घेऊन ते उमरावतीस गेले व चिरंजीव आनंदा महादेव याची मोची स्कूलात जाऊन व्यवस्था लावून दिली. यातून गरीब मागास समाजाबद्दलची कळकळ व्यक्त झाली.

## कापूस ओटाई प्रात्यक्षिकाने अत्यानंद

३ जानेवारी १९३० रोजी पिंप्री आढाव येथे असतांना पिंप्री आढाव येथील मिडल स्कूलचे मुख्याध्यापक व तेथील श्री शिवाजी बोर्डींगचे संस्थापक श्री चहादू विठोबा भगत यांनी उद्योगधंदा प्रसाराच्या पवित्र हेतूने पिंप्री येथे दोन रेचे, एक रहाट, एक हातमाग इत्यादी साहित्य महात्मा गांधी यांच्या साबरमती येथील सत्याग्रह आश्रमातून ६५ रूपयात बोलावले. त्यापैकी कापूस ओटायीचे प्रात्यक्षिक त्यांनी करून दाखविले. ही बाब तशी छोटीशी असली तरी पंढरीनाथ नमूद करतात..., 'चहादू मास्तरांनी कापूस

ओटण्याचे काम मला करून दाखविले. त्यावेळी देशातील उद्योगधंद्याच्या प्रसारापैकी तो एक छोटासा - अगदी छोटासा का होईना पण प्रयत्न पाहून माझ्या मनाला एक मोठाच आनंद झाला, तो इतका की, तसा आनंद माझ्या आयुष्यात मला फारच थोड्या वेळा झाला. खेड्यातील दीन प्रजेत उद्योगधंद्याची वाढ होऊन ती सुखी होवो असे अभीष्टचिंतन मी आज चिंतिले व हा प्रयोग पाहून मला भावी यशाची आशा वाटली. त्यांचे बरे होवो.' पंढरीनाथांची ही आशा स्वातंत्र्यप्राप्तीनंतर फार मोठ्या प्रमाणात सफल झाली. आज खेड्यापाड्यातून सहकारी क्षेत्रात कापूस ओटायचे कारखाने उभे झाले आहेत.

## समतेची ज्योत प्रज्वलित झाली

पंढरीनाथांच्या सहवासामुळे व वेळोवेळी त्यांची भाषणे ऐकल्यामुळे व त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक विचारामुळे चिखलीच्या मराठा बोर्डींगातील मुलांमध्ये अस्पृश्यता निर्मूलनाची व सामाजिक समतेची ज्योती प्रज्वलित झाली. त्याचा प्रत्यय त्यांना दिनांक १९ फेब्रुवारी १९३० रोजी खामगाव येथे आले असता कळला. दिनांक ६ फेब्रुवारी १९३० रोजी चिखलीच्या ए. व्ही. स्कूलमधील अस्पृश्य मुलांना त्याशाळेतील पाण्याच्या भांड्यास शिवून पाणी पिता यावे म्हणून मराठा बोर्डींगच्या मुलांनी सत्याग्रह केला. त्यात त्यांना यश येऊन त्यांनी योग्य हक्क मिळवून दिले. हे ऐकून त्यांना फार समाधान मिळाले. शिक्षणाचा परिणाम त्यांना दिसून आला. यावर्षी जिल्हा कौन्सिलने पंढरीनाथांना ए. व्ही. स्कूलवर मेंबर निवडले. तसेच मराठा बोर्डींग कमिटीचे ऑनररी सेक्रेटरी व सुपरिटेंडेंट म्हणून निवडल्या गेले. त्यामुळे ते पाणी प्रकरण समजावून घेणे त्यांच्या दृष्टीने गरजेचे होते. चिखलीस येताच त्यांनी ए. व्ही. स्कूलच्या हेडमास्तरास बोलावून ते समजून घेतले.

चिखलीच्या ए. व्ही. स्कूलमधील ब्राह्मण हेडमास्तर व स्कूल कमिटी कसा त्रास देतात याबाबतचे गाऱ्हाणे त्यांनी ५ व ६ जुलै १९३० रोजी अमरावती येथे असिस्टंट इन्स्पेक्टर ऑफ स्कूल बेरार श्री सुफी यांची भेट घेऊन त्यांच्या कानावर टाकली. तसेच 'सुबोधमाला' पत्राचे संपादक यांची भेट घेऊन त्यांच्याही कानी ही गोष्ट घातली. यावरून पंढरीनाथ पाटील शैक्षणिक क्षेत्रातील दीन, दलित व गरिबांवर होणारे अन्याय व अत्याचार निपटून काढण्यासाठी किती दक्ष असत हे दिसून येते. श्री सुफी हे पंढरीनाथांचे नाव ऐकून होते. त्या दिवशी त्यांची प्रत्यक्ष भेट होताच ते पंढरीनाथांबद्दल आदर व्यक्त

करून बोलले. यावरून वरिष्ठ अधिकारीही पंढरीनाथांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याबद्दल परिचित होते, त्यांना मानणारे होते, हेही दिसून आले.

## मराठा हायस्कूल अमरावती दशवार्षिक उत्सव

१९२५ साली स्थापन झालेल्या श्री शिवाजी मराठा हायस्कूल, उमरावती या संस्थेचा दशवार्षिक उत्सव इ. स. १९३५ साली साजरा झाला. त्यावेळचे कमिश्नर श्री ग्रीन फिल्ड हे या समारंभाचे अध्यक्ष होते. बॅरिस्टर रामराव देशमुख, डॉ. पंजाबराव देशमुख इत्यादी मोठमोठी प्रमुख मंडळी समारंभाला उपस्थित होती. त्यावेळी पंढरीनाथांचे जे भाषण झाले ते फारच उत्कृष्ट म्हणून गाजले. त्यावेळी पंढरीनाथ म्हणाले, 'तुम्ही सारे स्वतःला शिवाजीचे वंशज म्हणविता. शिवाजीने आपल्या अल्पायुष्यात कितीतरी मोठे किल्ले बांधले. आणि तुम्ही त्यांचे वंशज तट्ट्याच्या इमारतीत शाळा भरविता. याची तुम्हाला खंत वाटायला पाहिजे.' त्यांच्या या परखड भाषणाचा श्रोत्यांवर फारच मोठा परिणाम झाला. (१२५) समाजभूषण पंढरीनाथ पाटील यांचे जीवनदर्शन, हि. ए. चव्हाण, पृष्ट क्र. ५५

## नवीन शाळा उघडण्याचा सपाटा

पंढरीनाथ पाटील जिल्हा कौन्सिलचे पदाधिकारी व शिक्षणसमितीप्रमुख असल्यामुळे ते जिल्हाभरातील शाळांची पाहणी करीत असत. दिनांक २८ जानेवारी ते १० फेब्रुवारी १९३६ या काळात शाळा तपासणी दौऱ्यावर होते. या काळात त्यांनी बुलडाणा जिल्ह्यातील पिंप्री आढाव, मेंढळी, जवळा बाजार, वरखेड, आसलगांव (शेतकी शाळा), जळगाव, चिखली, देऊळगाव राजा, किनगाव राजा (कोंडवाडा), अडगावराजा (रस्ता), सोनोशी बाजाराची जागा, इत्यादी शाळा पाहिल्या. यातून पंढरीनाथ पाटील ग्रामीण भागातील विकास कामासाठी व शालेय शिक्षणाचा स्तर उंचावण्यासाठी व शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी गावोगाव फिरून वातावरणनिर्मिती करीत होते. लोकांचा सहभाग त्यासाठी मिळवत होते.

त्यानंतर ते लगेचच शनिवार दिनांक ८ व १० फेब्रुवारी रोजी सवणा मराठी शाळा तसेच पांग्रीची शाळा तपासून चिखलीहून खामगावला जाताना ११ फेब्रुवारी १९३६ रोजी वाटेतच गारांच्या पावसाने त्यांना झोडपले. यावरून पंढरीनाथांच्या कामाचा व प्रवासाचा वेग दिसून येतो. हा माणूस पायाला भोवरा बांधल्यागत सतत जिल्हाभर

पायी, बैलगाडी, तर कधी मोटारीने फिरत असे. शाळांना भेटी देण्यात त्यांना विशेष रस होता तसेच प्रत्येक ठिकाणी जाहीर व्याख्यान देऊन समाजप्रबोधनाची संधी ते कधीच दवडत नसत. १३ फेब्रुवारी १९३६ रोजी त्यांनी चांदूरबिस्वा, वडनेर भोलजी गावांना भेटी दिल्या. वडनेर भोलजीला व्याख्यान झाले. सुगदेवराव डोके व पंढरीनाथांनी बिस्व्याला बैठक घेऊन वर्तमानपत्र सुरू करण्याचा विचार केला. कारण त्या काळात ब्राह्मणेतरांची वृत्तपत्रे जवळजवळ नव्हतीच. त्यातही बुलडाणा जिल्ह्यात नव्हतीच. म्हणूनच त्यांनी हा विचार केला असावा.

तारीख १४ जून १९३६ रविवारी हिंगणे बाळापूर व १५ जून रोजी गौळखेड येथील शाळांची सुरूवात पंढरीनाथांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. तसेच १० जुलै १९३६ रोजी चिखली तालुक्यातील किन्होळा येथील शाळेचे उद्‌घाटन पंढरीनाथांच्या हस्ते झाले. शनिवार दिनांक २ ऑगष्ट १९३६ रोजी किन्होळा येथील मराठी बोर्डींगचा उत्सव पंढरीनाथ पाटलांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. रविवार दिनांक ९ ऑगष्ट १९३६ रोजी पिंप्री आढाव येथे आनंदस्वामी यांना मानपत्र देण्यात आले. व त्याचवेळी पिंप्रीला मिडल स्कूल उघडले. २२ व २३ ऑगष्टला जिल्ह्यातील पातुर्डा खुर्द शाळेची इमारत उघडली.

## शिक्षणात शारीरिक शिक्षण व औद्योगिक शिक्षणाला स्थान मिळवून दिले

पंढरीनाथ पाटील जिल्हा कौन्सिल अध्यक्ष झाल्यावर त्यांनी शाळा व शिक्षण सुधारणेकडे विशेष लक्ष पुरविले. शालेय शिक्षणात त्यांनी शारीरिक शिक्षणाला महत्त्व दिले. त्यासाठी त्यांनी नागरिक व शिक्षक तसेच विद्यार्थ्यांसाठी १९३७ सालच्या मे महिन्याच्या उन्हाळी सुटीत शारीरिक शिक्षणाचा खास वर्ग आयोजित केला. त्यासाठी विविध खेळ व क्रीडा प्रकारांचे तज्ज्ञ मार्गदर्शक बोलावून वर्गाची उत्तम तयारी करून घेतली. प्रोफेसर शिरभाते यांनी भाल्यावर शीर्षासन, खिळ्याच्या शय्येवर झोपवून छातीवर दगड फोडून घेणे, जमीनीत पुरून घेऊन वर अग्नि पेटविणे वगैरे अचाट शक्तीचे प्रयोग केले.

नागपूरहून औद्योगिक क्षेत्रातील तज्ज्ञ बोलावून औद्योगिक शिक्षणाचाही लाभ या वर्गातील लाभार्थींना दिला. पंढरीनाथांचा हा वर्ग इतर जिल्हा कौन्सिलांना आदर्श व प्रेरणादायी ठरावा असे उद्‌गार समारोप प्रसंगी दिनांक २८ मे १९३७ रोजी श्री. के. एन. नगरकट्टी आय.सी.एस. डेप्युटी कमिशनर बुलडाणा यांनी व जिल्हा कौन्सिल अध्यक्ष पंढरीनाथ पाटील यांनी काढले.

## शिक्षणप्रसारासाठी प्रिन्स ऑफ बेरारच्या स्वागताची तयारी

बहुजनांच्या शिक्षणासाठी व शिक्षण संस्थासाठी मिळेल तेथून मदत घेण्यासाठी पंढरीनाथ पाटील शिकस्त करीत असत. उमरावतीच्या शिक्षण संस्थेसाठी आर्थिक मदत मिळावी म्हणून डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुखांच्या सहकार्याने त्यांनी हैद्राबादचे निजामपुत्र प्रिन्स ऑफ बेरार यांचा स्वागताचा कार्यक्रम ठेवला. त्यासाठी प्रिन्स ऑफ बेरार उमरावती व खामगाव येथे येणार होते. त्यासाठी श्री. अब्दुल रऊफ शाह व वराडचे कमिश्नर मि. इनामुल रहिम आय.सी.एस., डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्याशी चर्चा करून २० जानेवारी १९४५ रोजी अकोला येथे पत्रकार परिषद घेऊन निजामपुत्र आगमनाबाबत माहिती दिली. तसेच २८ जानेवारी १९४५ रोजी उमरावती मुक्कामी उमरावतीचे मराठा हायस्कूल व खामगावचे अंजुमन हायस्कूल या संस्थांच्या संयुक्त शिष्टमंडळासह वऱ्हाडचे क. मि. इनामुल रहिम यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर नागपूरला जाऊन डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुखांसह धनिकांच्या भेटी घेऊन उमरावतीच्या मराठा हायस्कूलसाठी देणग्या मिळविल्या. तसेच १ व २ फेब्रुवारी १९४५ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख, लक्ष्मणराव भटकर व पंढरीनाथ पाटील यांचे डेप्युटेशन मि. ग्रीनफिल्ड अॅडव्हायजर ऑफ दी गव्हर्नर यांना नागपूर सेक्रेटरीएट मध्ये जाऊन भेटले. त्यांना निजामपुत्र आगमनाबद्दल अवगत केले.

## बॅरिस्टर कायंदेकडून रक्कम वसूल केली

पंढरीनाथ पाटलांना त्यांच्यापेक्षा जास्त शिकलेले बॅरिस्टर सहकारी मिळाले. अशा मंडळींनी पंढरीनाथांना वारंवार छळले. त्यापैकीच एक आतापर्यंत पंढरीनाथांना मानणारे अॅडव्होकेट नारायणराव कायंदे बुलडाणा यांनी चिखलीच्या मराठा बोर्डींगसाठी मिळालेली लोकवर्गणी हडपली. पंढरीनाथांनी त्यांच्यावर दावा दाखल केला. छिंदवाडा कोर्टामार्फत ६ मार्च १९४५ रोजी ती रक्कम वसुली केली. जवळच्या उच्चविद्याविभूषित ठगांना पंढरीनाथांनी उघडे पाडले. लोकांचा पैसा सत्कारणी लागावा याची नैतिक जबाबदारी या प्रकरणातून प्रकट झाली.

## उमरावतीच्या मराठा हायस्कूलसाठी देणग्या मिळविल्या

छिंदवाड्याहून पंढरीनाथ उमरावतीस येऊन डॉ. पंजाबराव देशमुखांना भेटले. इतरही मित्र सोबत घेऊन प्रिन्स ऑफ बेरारच्या आगमनाचे काम सुरू केले. त्याच सोबत उमरावतीच्या मराठा हायस्कूलसाठी लोकवर्गणी गोळा करण्याचा सपाटा लावला.

नागपूरला सर हेन्री ग्रीनफिल्ड यांना भेटून मराठा हायस्कूलसाठी उमरावतीच्या जवळा।। असलेली सरकारी जमीन शेतकी शिक्षणासाठी मंजूर करून घेतली. नागपूरच्या धनि मित्रांकडून वर्गणीही मिळविली. तसेच उमरावती व अकोला येथेही पंजाबरा देशमुखांसोबत येऊन वर्गणी गोळा केली. १६ मार्च १९४५ रोजी खामगावला बाजीरा ना. बोबडे वकिलांकडे जिल्ह्यातील ३०, ४० पुढाऱ्यांची सभा घेऊन पंजाबराव देशमुख व पंढरीनाथ पाटील यांची भाषणे झाली. त्याठिकाणी उमरावतीच्या मराठा हायस्कूलसाठी दोन हजार रूपये वर्गणी गोळा झाली व १७ मार्चला अकोला येथे ११०० रूपये जमा झाले. अशा रीतीने मराठा हायस्कूलसाठी हजारो रूपये जमा होऊन लोकांचा उत्साह वाढला.

**मराठा विद्यार्थी संमेलनाचे प्रांतिक अधिवेशन व विदर्भ मराठा परिषद**

या उत्साहाचा भर म्हणजे १९ मार्च १९४५ रोजी उमरावती येथे पंढरीनाथ पाटलांच्या अध्यक्षतेखाली मराठा विद्यार्थी संमेलनाचे प्रांतिक अधिवेशन व तारीख २० व २१ मार्च १९४५ रोजी त्यांच्याच अध्यक्षतेखाली विदर्भ मराठा परिषद झाली. या परिषदेत वऱ्हाडाचे कमिशनर श्री. इमा उल रहिम व निजामाचे एजंट नबाब सर मिर्झा यारजंग यांचीही भाषणे झाली. यावेळी दोन हजारावर लोक उपस्थित होते.

या परिषदेचे स्वागताध्यक्ष श्री. बापूसाहेब देशमुख होते. ही परिषद श्री शिवाजी हायस्कूलच्या प्रांगणात झाली. सदर परिषदेचे अध्यक्ष पंढरीनाथ पाटील आपल्या भाषणात म्हणाले, 'मराठा समाज हा विदर्भात बहुसंख्य व देशात लढाऊ वृत्तीचा वर्ग असून तो राजकीय, सामाजिक, आर्थिक तसेच शैक्षणिक क्षेत्रात आज मागासलेला आहे. त्याने सर्व क्षेत्रातून आपले पायावर उभे राहून पुढे येणे आपल्या समाजाच्या तसेच देशाच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. शिक्षण हा सर्व सुधारणांचा पाया असल्यामुळे ते संपादन करणे हे मराठा व तत्सम शेतकरी समाजाचे आद्यकर्तव्य आहे.' त्यानंतर समाजसुधारणेबाबत अध्यक्षांनी अनेक अंगोपांगांचा आढावा घेतला.

नबाब मिर्झा यारजंग बहादूर निजाम सरकारचे वऱ्हाडाचे एजंट म्हणाले, "मराठा समाजाने सुधारणा करण्यासाठी शिक्षणाचा प्रथम आश्रय घेणे आवश्यक आहे. याबाबतीत मराठा समाजाला निजाम सरकारची सदैव आवश्यक ती सहानुभूती व मदत मिळेल."

वऱ्हाडचे कमिशनर श्री इनामुल रहिम म्हणले 'मराठा समाज बहुसंख्य असून शिक्षणात फारच मागासलेला आहे. या समाजाचे या प्रांतात उमरावती येथे एकच हायस्कूल चालले आहे. एकट्याने समाजसुधारणा होणे अशक्य आहे. शीघ्र सुधारणा होण्यासाठी माझ्या कारकीर्दीत मराठा हायस्कूल मराठा कॉलेजमध्ये रूपांतर व्हावे अशी माझी तीव्र इच्छा आहे. या कार्यात मी शक्य ते सर्व सहाय्य आवश्यक देईन.'

या परिषदेत दुसऱ्या दिवशी एकूण ११ ठराव पारित झाले. त्यापैकी शिक्षण व समाज उन्नतीशी संबंधित १. व्हाईसरायच्या कार्यकारी मंडळावर मराठा प्रतिनिधी नसल्याबद्दल तीव्र असंतोष व दोन मराठा प्रतिनिधी ताबडतोब घेण्याबद्दल नामदार व्हाईसराय यांना सुचविले. २. विदर्भातील मागासलेल्या जातींनी चालविलेल्या सर्व हायस्कूलांचे एक फेडरेशन स्थापावे व एक मराठा कॉलेज काढावे. ३. नायब तहसीलदारीच्या जागा मराठा व हरीजन समाजातून भरण्याबदूलचे अर्ज, सरकार गॅझेट मधून मागविते पण त्या जागा पुढारलेल्या उमेदवारांना देते. याबाबत विषाद व्यक्त करून सरकारी प्रत्येक खात्यात मराठा व तत्सम उमेदवारांना घेण्याची शिफारस. ४. मराठा सैनिकांच्या मुलांमुलींच्या शिक्षणासाठी उमरावती येथे मराठा हायस्कूलला जोडून मोफत वसतीगृहे काढण्याबाबतची मागणी. ५. जनरल 'पोस्टवार' डेव्हलपमेंट शिक्षण ॲडव्हायजरींग बोर्डात १२ मार्च ४५ च्या सभेत प्राथमिक शिक्षण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हातून काढून घेऊन सरकारचे हाती देण्याबद्दल जी शिफारस केली तिचा निषेध. ६. प्राथमिक चौथ्या व सातव्या वर्गाची परीक्षा प्रांतात एकाच दिवशी सामान्य प्रश्नपत्रिका काढून घेण्यात यावी. ७. या प्रांतात मराठा व तत्सम वर्गाने चालविलेल्या हायस्कूलांना सरकारने शिक्षण खात्याकडून ताबडतोब मान्यता द्यावी. ८. समाजाने ताबडतोब छापखाना घेऊन एक वर्तमानपत्र काढावे. ९. नागोराव पाटील वायगाव यांनी दोनशे वीस एकर, श्री. यशवंतराव देशमुख सोनोरीकर यांनी २५ एकलर जमीन व श्री. बाबासाहेब, सखाराम पाटील सावरगाव डुकरे जि. बुलडाणा यांनी वार्षिक ५१ रूपये मराठा हायस्कूलला देणगी दिल्याबद्दल अभिनंदन. १०. प्रांतिक मराठा लीग स्थापन्यात येत असून तिचे डॉ. पंजाबराव देशमुख यांचे अध्यक्षतेखाली कार्यकारी मंडळ नेमण्यात यावे.

या परिषदेसाठी श्री. बापूसाहेब देशमुख, अध्यक्ष जिल्हा कौन्सिल उमरावती, श्री. नाथे एम.एल.ए., श्री. एस. व्ही. देशमुख उमरावती, श्री. नारायणराव पाटील

एम.एल.ए. यवतमाळ, श्री. रा. ब. कोरडे अकोला, श्री. रा. ब. राजूरकर एम.एल.ए. अकोला, श्री. खंडारे एम.एल.ए. अकोला, रावसाहेब देवसिंग पाटील भोंडे बुलडाणा, श्री. गणपतराव पाटील बुलडाणा व श्री. कृष्णराव पाटील, बुलडाणा इत्यादी चारही जिल्ह्यातील प्रमुख पुढारी व पाचशे प्रतिनिधी हजर होते. याशिवाय निजामसरकारचे एजंट सर मिर्झा यारजंग बहादूर आणि वऱ्हाडप्रांताचे कमिश्नर श्री. इनामुल रहिम आय.सी.एस. हेही सन्माननीय पाहुणे म्हणून अध्यक्षांबरोबर व्यासपीठांवर बसलेले होते.

दिनांक २० मार्च १९४५ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख हैद्राबादला जाऊन २२ मार्चला परत आले. त्याच दिवशी उमरावतीस दुपारी पंढरीनाथांच्या अध्यक्षतेखाली प्रांतिक इंग्लिश ट्रेन्ड टिचर्स कॉन्फरन्स झाली. ही कॉन्फरन्स मराठा हायस्कूलमध्ये झाली. या कॉन्फरन्ससाठी विदर्भातून ५० टिचर्स आलेले होते.

## वऱ्हाड युवराजाचे थाटात स्वागत व मुसलमानांविषयी कृतज्ञता

ठरल्याप्रमाणे २३ मार्च १९४५ रोजी वऱ्हाडच्या युवराजाचे थाटात आगमन झाले. खास सजविलेली रेलगाडी सकाळी दहा वाजून पंधरा मिनिटांनी उमरावती स्टेशनात आली. त्यावेळी पंढरीनाथ पाटील, डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांचेसह एकूण पंचवीस प्रमुख मंडळी स्वागतासाठी खादीचा रंगीत पोषाख व मराठेशाही पागोटे चढविलेले होते. स्वागत समारंभ होऊन अवघ्या पाच मिनिटांत वऱ्हाडचे कमिशनर श्री. रहिम यांनी ओळख परिचय करून दिला.

दुपारी साडेचार वाजता युवराज निजाम पुत्र नबाब मीर हिदायतअली खान अझमजाई हे मराठा हायस्कूलमध्ये आले. युवराजांनी शिवाजी मराठा हायस्कूल वसतिगृहाचे उद्‌घाटन केले. यावेळी डॉ. पंजाबराव देशमुखांनी हायस्कूलची माहिती दिली. ते म्हणाले, "आमच्या वसतिगृहाच्या छोट्या इमारतीचे उद्‌घाटन आपण करून प्रशंसनीय सौजन्य दाखविले आहे. नुकतेच आपण जगातील सर्वात मोठ्या तुंगभद्रा योजनेचे उद्‌घाटन केल्याचे लक्षात घेतल्यास या लहानशा इमारतीसंबंधीही आपण तितकाच आपुलकीचा भाव दाखविला. हे पाहून आपल्या सौजन्याचा अथांगपणा दृष्टोत्पत्तीस येतो.

तुंगभद्रेच्या धरणामुळे कोट्यावधी लोकांचे कल्याण होणार असले तरी या लहानशा संस्थेतून बाहेर पडणारा प्रत्येक विद्यार्थी खेड्यापाड्यात घरोघरी पसरलेल्या

अज्ञान अंध:कारात ज्ञानाचा प्रकाश नेईल हे लक्षात घेतल्यास या संस्थेचे कामही तितकेच कल्याणप्रत नाही काय ? मराठा मुसलमान ऐक्य संपादने ही आमच्या संस्थेची कोनशिला आहे. आमच्या धर्मबांधवांनी निर्माण केलेल्या व वाढविलेल्या अडचणी मुसलमान अधिकाऱ्यांनी दूर केल्या आहेत हे विसरता येत नाही.''

## युवराजांचे भाषण

उत्तरादाखल भाषण करताना युवराज म्हणाले, 'अनेक अडचणींना तोंड देऊन आपण आपल्या या लहानशा संस्थेस आजचे रूप आणले, हे अभिनंदनीय होय. आपल्या हाताशी असलेल्या तुटपुंज्या साधनांनी आपण धैर्याने उन्नतीचा हा टप्पा गाठला, हे पाहून मला आनंद वाटतो. आपल्या कार्याकडे व प्रगतीकडे मी यापुढेही वैयक्तिक नजर ठेवून संस्थेच्या कार्याची आपुलकीने चौकशी करीन. ज्ञान आणि संस्कृती यांच्या योगाने सर्व बंधने तुटतात. मानवतेच्या व नागरिकत्वाच्या व्यापक स्वरूपाची जाणीव करून देणे हेच शिक्षणाचे खरे ध्येय आहे. या संस्थेतून प्रत्येक विद्यार्थी त्या ध्येयाने प्रेरित होऊन बाहेर पडेल अशी मला आशा वाटते. ज्ञान व संस्कृतीचा दीप ते वऱ्हाडच्या प्रत्येक खेड्यात नेतील अशी आशा मी प्रदर्शित करतो.'

कार्यक्रम संपल्यावर सायंकाळी युवराजांकडून ७०० लोकांना मेजवानी (ॲट होम) देण्यात आली. त्यानंतर कमिशनरकडून युवराजाला डिनर दिले. त्यावेळी निवडक ४० लोक होते त्यांत पंढरीनाथांचा समावेश होताच. त्यानंतर २४ मार्च रोजी युवराज स्पेशल गाडीने खामगावला गेले. यावेळी त्यांचे सोबत डॉ. पंजाबराव देशमुख व पंढरीनाथ पाटील हे होते. खामगावला अंजुमन हायस्कूलमध्ये युवराजांचे स्वागत करण्यात आले व मानपत्र देण्यात आले. (५७) (तरूण भारत, नागपूर दि. २५-३-१९४५)

## हिंदूत्ववाद्यांचा विरोध

पंढरीनाथ पाटील सत्यशोधक चळवळीचे अग्रदूत होते. तर डॉ. पंजाबराव देशमुख व पंढरीनाथ पाटील दोघेही ब्राह्मणेतर चळवळीचे नेते होते. त्यामुळे साहजिकच या कार्यक्रमाच्या आयोजनामुळे हिंदुत्ववाद्यांच्या पोटात गोळा उठल्यास नवल नाही. त्यामुळेच त्यांनी निजामपुत्राच्या आगमनाच्या वेळी काळे झेंडे दाखवून निषेधाच्या घोषणा केल्या. त्यासंदर्भात पुण्याच्या केसरीने दिलेला वृत्तांत हा एक मासला या ठिकाणी देत आहोत. 'वऱ्हाडची पवित्र भूमी किंगमेकर शहाजी राजे यांची कर्मभूमी. त्या भूमीवर

पाय ठेवण्याची जेव्हा जेव्हा निजामाने इच्छा धरली तेव्हा मराठ्यांनी त्याला पराभूत केले. पण घर फिरले म्हणजे घराचे वासे फिरतात असे म्हणतात. त्याप्रमाणे उमरावतीत छत्रपती श्री. शिवाजींच्या नावाने स्थापन झालेल्या मराठा हायस्कूलच्या बोर्डींगला प्रिन्स ऑफ बेरारचे नाव द्यावे असे श्री. पंजाबराव देशमुख प्रभृति पुढाऱ्यांनीच ठरवून निजामपुत्राला पाचारण केले. अनेक वेळा त्यात अडथळे आले. पण शेवटी २३ ला सकाळी सव्वाअकरा वाजता उमरावती येथे एकदाचे निजामपुत्राचे आगमन झाले. दिनांक २० ला त्यांची प्रकृती एकाएकी बिघडली तेव्हा आता तूर्त चार सहा महिने तरी ही भेट होत नाही असे वाटले होते. पण आयत्यावेळी केलेल्या धावपळीचा उपयोग झाला. कालपासून स्टेशनवर स्वागताची पुनश्च जय्यत तयारी सुरू झाली. फुलांच्या माळांनी स्टेशन फुलविले व गालीच्यांनी ते भूषविले. शहरात निषेधकांच्या सूचनेनुसार घराघरांवर काळे झेंडे फडकत होते. श्री. बाबाराव खापर्डे यांचे घरावरही काळे निशान पाहून व त्यांच्याच सांगण्यावरून वऱ्हाड प्रांतिक सभेने रूपये शंभरची देणगी निषेध करणाऱ्यांना दिल्यावरून 'प्रांतिक सभेचा या कार्याला पाठिंबा नाही.' असे म्हणणाऱ्यांच्या तोंडाला कुलूपच बसले.

स्टेशनवर मि. रहिम यांनी स्वागत केल्यावर बाहेरच्या यार्डमध्ये पोलिसांनी गार्ड ऑफ ऑनर दिला. शिवाजी मराठा हायस्कूलची ५०-६० मुले स्टेशनवर आली होती. स्टेशनचे बाहेर पडताच प्रा. देशपांडे नि त्यांचे सहकारी व स्वयंसेवक यांनी 'निजाम गो बॅक', 'वऱ्हाडचे राज्य वऱ्हाडी लोकांचे', 'निजाम वऱ्हाडचे राजे नाही', 'निजामपुत्र वऱ्हाडचे राजपुत्र नाहीत' इत्यादी घोषणा चालू ठेवल्या. निजामपुत्र लगेच निवासस्थानी गेले.

स्टेशनवर कमिशनर साहेब डी.सी. डिस्ट्रीक्ट सुपरिटेन्डेंड ऑफ पोलिस, डी.आय.जी. वगैरे अधिकारी आणि सर मोरोपंत जोशी, रावबहादूर आठवले, पंजाबराव देशमुख, पंढरीनाथ पाटील इत्यादी मोजकी मंडळी उपस्थित होती.

आज पहाटे पाचचे सुमारास शहरातील एक कमान एकाएकी जळाल्यामुळे पुष्कळांना सायंकाळचा कार्यक्रम व्यवस्थित पार कसा पडतो याची काळजी लागून राहिली होती. पण सर्व सुरळीत पार पडले.

सायंकाळी पाऊणेपाच वाजता शिवाजी मराठा हायस्कूलच्या 'प्रिन्स ऑफ

बेरार' होस्टेलचे उद्घाटन झाले. श्री. पंजाबरावांनी आपले भाषण इंग्रजीत वाचून दाखविले. श्री. पंढरीनाथ पाटलांनी त्याचा मराठी अनुवाद केला. उत्तरादाखल युवराजांनी ४-५ मिनिटे भाषण केले आणि त्यात त्यांनी शिक्षणाने सर्व मतभेद विसरले जातात. या हायस्कूलचे विद्यार्थी वऱ्हाडातील खेड्यापाड्यात जाऊन जनतेला शिक्षण देणारे होवोत असा आशीर्वाद प्रकट केला. उदयीक हे पाहुणे खामगावला जाऊन तेथून लगेच निजाम हद्दीत जातील, पूर्वीच्या कार्यक्रमातील सार्वजनिक स्वरूपाचे इतर सर्व कार्यक्रम गाळून टाकून केवळ दोन संस्थांना भेट एवढाच भार शिल्लक ठेवण्यात आला. आणि ही भेट सर्वस्वी खाजगी आहे असे दर्शविण्यात आले. दिनांक २३ ला सकाळी शहरातील वातावरण थोडेसे गरम झाले होते. पण काही विशेष न घडता उभयविध कार्यक्रम सुरळीत पार पडले. याचे बरेचशे श्रेय अधिकाऱ्यांच्या समंजसपणास दिले पाहिजे.''
(४६) (केसरी, पुणे दि. २७-३-१९४५)

या वृत्तपत्रीय वृत्तांतवरून निजामपुत्राची भेट व मराठा हायस्कूल वसतीगृहाच्या उद्घाटन कार्याला हिंदूत्व वाद्यांचा विरोध होता हे स्पष्ट दिसले. परंतु तरीही कमानजळीत प्रकरण त्यांनी निषिद्धच मानले. त्याच्याशी हिंदूत्ववाद्यांचा संबंध नसल्याचा खुलासाच वि. घ. देशपांडे यांनी केला. वि. घ. आणि पंढरीनाथ हे दोघेही जिजामातेच्या माहेरच्या बुलडाणा जिल्ह्यातील सुपुत्र, तात्विक विरोध प्रकट केला पण कार्यक्रमात बाधा आणली नाही. हे सामंजस्य वि. घं. नी जोपासले. त्या दोघांची मान ताठ राहिली.

आमदार पंढरीनाथ पाटलांच्या कामाचा व्याप आता बराच वाढला होता. या व्यापातही ते सार्वजनिक पैशाचा हिशोब चोख ठेवीत. निजाम युवराजाच्या भेटीच्या कार्यक्रमाचा हिशोब लगेच २५ मार्च १९४५ रोजी पूर्ण केला. डॉ. पंजाबरावांचाही सार्वजनिक पैशाच्या हिशोबात पारदर्शीपणा होता. उभय पुढाऱ्यांच्या पारदर्शक आर्थिक व्यवहारामुळेच लोक त्यांना सार्वजनिक कामासाठी सढळ हाताने मदत करीत असत.

पंढरीनाथांना शैक्षणिक क्षेत्रात रस वाटू लागला. शिक्षण प्रसारासाठी अहोरात्र झटू लागले. मे १९४६ मध्ये पंढरीनाथांनी डॉ. पंजाबराव देशमुखांसह खामगावला येऊन तेथील मंडळीशी चर्चा करून खामगावला हायस्कूल काढण्याचे ठरले.

तारीख २५ मे १९४६ रोजी औरंगाबाद येथे डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली स्टेट मराठा शिक्षण परिषद भरली. त्या परिषदेत तसेच २६ मे रोजी तेथेच भरलेल्या स्टेट मराठा युवक परिषदेत पंढरीनाथांचीही भाषणे झाली. तसेच तारीख

२ जुलै १९४६ रोजी बुलडाणा व चिखली येथे मराठा बोर्डींगची स्थापना केली आणि उमरावती येथे मराठा कॉलेजही उघडले.

## चिखली येथे सरकारी हायस्कूलची स्थापना

बुलडाणा जिल्हा शिक्षणात बराच मागासलेला होता. शिक्षणाची सोय बऱ्याच खेड्यात नव्हती. तसेच माध्यमिक शिक्षणाची सोय जवळजवळ नव्हतीच. आमदार पंढरीनाथ पाटलांच्या प्रयत्नाने चिखली येथील आय.ई.एम. स्कूलचे रूपांतर हायस्कूलात झाले. या सरकारी हायस्कूलचे उद्घाटन चिखली म्युनिसीपालिटीचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ बोन्द्रे यांचे अध्यक्षतेखाली व आमदार पंढरीनाथ पाटील यांचे हस्ते १ ऑगष्ट १९४६ रोजी झाले.

या दिवशी श्री. शिवाजी एज्युकेशन सोसायटीची (चिखली) सभा म्हसल्याचे रावसाहेब देवसिंग भोंडे यांचे अध्यक्षतेखाली झाली. रावसाहेब भोंडे हे या संस्थेचे अध्यक्ष होते. ही सभा मराठा बोर्डींगच्या इमारतीत झाली. यावेळी आमदार पंढरीनाथ पाटीलांनी या सोसायटीचा स्थापनेपासूनचा इतिहास कथन केला. तसेच सोसायटीने बुलडाणा व चिखली येथे जी नुकतीच बोर्डींगे उघडली त्यांना मदत करण्याचे आवाहन केले. यावेळी नवी कार्यकारिणी निवडण्यात आली. तसेच बुलडाणा व चिखली येथील वसतिगृहांच्या कमिट्यांचीही निवड करण्यात आली. (५४) दै. महाराष्ट्र ता. ८-८-१९४६

बोर्डींगसाठी त्याकाळी शासकीय मदत मिळत नसे. पण पंढरीनाथांना शिक्षणाचे महत्व पटलेले होते. चिखली व बुलडाणा येथील बोर्डींगात राहणाऱ्या गरीब मुलांसाठी ते गावोगाव फिरून शेतकरी वर्गाकडून ज्वारी व धनिकांकडून पैसा मिळवत. त्या कामासाठी फिरताना ते लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी व सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी व्याख्याने देत. १४ ऑगष्ट १९४६ रोजी त्यांनी पांग्री गावी जाऊन शेतकऱ्यांकडून ज्वारी मिळविली व तेथे भाषणही दिले.

पंढरीनाथ जेथे संधी मिळेल तेथे व्यासपीठाचा वापर करून शैक्षणिक कार्याचा वसा घेऊन ते मोठ्या उमेदीने पार पाडत. १२ सप्टेंबर १९४६ रोजी नागपूर असेंब्लीची बैठक सुरू झाली. ते एक जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी या बैठकीत १४ व १७ सप्टेंबर १९४६ रोजी आपल्या तळमळीच्या भाषणामधून सक्तीच्या व मोफत शिक्षणावर विचार मांडून या बजेट अधिवेशनात एक रूपयाची कपात सूचना मांडली.

यानंतर त्यादिवशी रात्री युनिव्हर्सिटी कन्व्होकेशन हॉलमध्ये 'सामाजिक सुधारणा' या विषयावर भाषण दिले.

पंढरीनाथांचे राजकीय, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील कार्य शिखरावर पोचलेले होते. अशा वेळी अनेक संघटनांचे नेतृत्वही त्यांच्याकडे चालून आले. १ जानेवारी १९४७ रोजी बुलडाणा जिल्हा शिक्षक संघ अध्यक्ष म्हणून त्यांनी सूत्रे हाती घेतली. खामगाव जिल्हा शिक्षक संघाचे मुख्यालय ठेवून पाचही तालुक्यातील शिक्षकांच्या परिषदा भरविण्याचे त्यांनी ठरविले. तशा सोयीच्या तारखा निश्चित करून तारखा व कार्यक्रम पत्रिकाही प्रसिद्ध केली. ते वेळापत्रक व कार्यक्रमपत्रिकेनुसार त्यांनी जोमाने कामाला सुरूवात केली. शिक्षक संघटनेत नवचैतन्य संचारले. पाटलांचाही हुरूप वाढला. जिल्ह्यातील सारे शैक्षणिक क्षेत्र चैतन्यमय झाले.

मलकापूर तालुका शिक्षक परिषद लगेच ४ जानेवारीला मलकापूरच्या गजानन थिएटरात तर चिखली तालुका शिक्षक परिषद ६ जानेवारीला चिखली येथे घेतली. खामगाव तालुका शिक्षक परिषद जलंबला १२ जानेवारीला झाली. त्याच दिवशी रात्री जळगाव येथे जळगाव तालुका शिक्षक परिषद भरली. तर १४ जानेवारी १९४७ रोजी संक्रांतीच्या दिवशी मेहकर येथे मेहकर तालुका शिक्षक परिषद झाली. या सर्व परिषदांमधून प्रचंड उत्साहात पंढरीनाथांनी आपले सुधारणावादी विचार शिक्षणाचे महत्व यांना अनुसरून विधायक मते मांडली. शिक्षक कार्यकर्ते तसेच कॉंग्रेसचे प्रमुख पुढारी यांच्या भेटीगाठी होऊन निवडणूक प्रचारकार्याला पोषक पार्श्वभूमी तयार केली.

## सुशिक्षित स्थानिकांना नोकऱ्यात प्राधान्य द्यावे : नागपूर असेंब्लीत मागणी

नागपूर असेंब्ली सुरू असताना बुलडाणा जिल्हा शिक्षक संघ अध्यक्ष या नात्याने शिक्षकांचे प्रश्न घेऊन ते असेंब्लीत गेले व बाहेर दिनांक १० मार्च १९४७ रोजी शिक्षकांनी विधानसभेसमोर सत्याग्रह सुरू केला. सभागृहात अंदाजपत्रकावर त्याच दिवसापासून चर्चा झाली. त्याची चुणूक त्यांनी २५ फेब्रुवारीच्या भाषणात दाखविली. असेंब्लीच्या त्या १३ मार्चच्या झालेल्या बैठकीत पंढरीनाथ पाटलांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याची मागणी केली. ते म्हणाले, "कॉंग्रेस सरकार आल्यावर सुद्धा गोरगरिबांच्या मुलांना शिक्षणाची काहीच सोय झालेली दिसत नाही. जवळजवळ दीडकोटीच्या बजेटमध्ये प्राथमिक शिक्षणावर ६८ हजाराची रक्कमच खर्च केली जाते. प्राथमिक शिक्षण सक्तीचे केल्याशिवाय व्हायचे नाही. प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराबाबत

आमचा प्रांत अत्यंत मागासलेला आहे. हिंदुस्थानला वैभवाच्या शिखरावर पोचवायचे असेल तर प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे लागेल. मॅट्रीकची परीक्षा पास झालेल्या बेकार विद्यार्थ्यांकडून प्राथमिक शाळेचे शिक्षक म्हणून काम करता येईल. शिक्षक न मिळाल्याची लंगडी सबब व्यर्थ ठरेल. बहुजन समाजाची उन्नती करायची असेल तर त्यांच्या मुलांना साक्षर करणे आवश्यक आहे. अजून बेसिक पद्धतीचे शिक्षण सर्वत्र सुरू केले नाही. लहान मुलांना आकलन होईल अशा पद्धतीची पुस्तके तयार करावयास हवी.'' असे श्री. पाटील यांनी सुचविले. १४ मार्च १९४७ रोजी आपल्या भाषणाला सुरूवात करतांना पंढरीनाथ पाटील म्हणाले, 'प्रांतातील नोकरवर्गात प्रांताबाहेरील रहिवाशांचा बऱ्याच प्रमाणात भरणा आहे. त्यामुळे ते सर्वसाधारण जनतेशी तादात्म्य पावू शकत नाही. किंवा त्यांना या प्रांताबद्दल आत्मीयताही वाटत नाही. तरी सरकारने प्रांतातील नोकऱ्या प्रांतातील रहिवाशांनाच प्रथम देण्याचे धोरण स्वीकारावे.''

या भाषणातून शिक्षणाचे महत्व व स्थानिक सुशिक्षितांना नोकऱ्या मिळण्याबाबत पंढरीनाथांच्या मनात तळमळ होती हे वारंवार व्यक्त झाले. म्हणूनच हिदायत अली खांनी 'मंत्री आणि पार्लमेंटरी सेक्रेटरी यांच्या जागा खारीज करण्यासंबंधीच्या मागणीला पाठींबा देताना अब्दुल रज्जाक खान यांनी एक रूपयाची कपात सुचना आणली व त्यासंबंधीत चर्चेला पाटलांच्या भाषणाने सुरूवात झाली. त्यांनी अब्दुल रज्जाक यांच्या कपातसूचनेला पाठींबा दिला.

श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटीची उत्तम कार्यपद्धती पाहून हैद्राबादच्या निजामाने यापूर्वीच संस्थेला बरीच मदत केली. १० एप्रिल १९४७ रोजी श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटीच्या 'हैद्राबाद' इमारतीचा कोनशिला समारंभ हैद्राबादचे पंतप्रधान सर मिर्झा इस्माईल यांच्या हस्ते झाला. त्यावेळी डॉ. पंजाबराव देशमुखांचे स्वागताचे, मिर्झाचे उत्तराचे तर पंढरीनाथांचे आभार प्रदर्शनाचे भाषण झाले. आपल्या भाषणात पंढरीनाथांनी निजामाने प्रजेला स्वायत्ततेचा अधिकार द्यावा अशी मागणी केली. यावेळी निजामाने श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटीला दोन लाख रूपये देणगी दिली. (५९)

शेतकरी, मलकापूर ता. १२-७-१९४७

## कर्मवीर भाऊरावांची भेट व धोरणात्मक निर्णय

पंढरीनाथांना बहुजनांच्या शिक्षणाची तळमळ असल्यामुळे बहुजनांच्या शिक्षण

संस्थांशी संबंधित मान्यवर व्यक्तींच्या ते सतत संपर्कात असत. ते त्यांच्याशी सल्लामसलत करत. २ डिसेंबर १९४७ रोजी ते, भाऊराव पायगौडा उर्फ कर्मवीर भाऊराव पाटील आजारी असल्यामुळे, पुण्याच्या ससून हॉस्पिटलमध्ये त्यांच्या भेटीस गेले. त्यांची प्रकृती त्यावेळी बरीच सुधारलेली होती. तेथे त्यांनी भाऊरावांशी शैक्षणिक स्थितीबाबत चार तास चर्चा केली. त्यानंतर त्यांनी त्याच दिवशी पुण्यातील त्यांचे जुने मित्र श्री बाबुराव जेधे व श्री शंकरराव मोरे वकील यांच्या भेटी घेतल्या. तत्कालीन परिस्थितीत बहुजन समाजाने कोणते धोरण ठेवावे याबद्दल प्रदीर्घ चर्चा केली. दुसऱ्या दिवशी सकाळी मुंबईस जाऊन तेथे त्यांनी डॉ. मोरे, डॉ. दळवी, श्री. कवळी वकील व श्री. गोविंदराव शिंदे या जुन्या मित्रांच्या भेटी घेतल्या तसेच डिलाईड रोडवरील सत्यशोधक विद्यार्थी कार्यालयासही भेट दिली.

एप्रिल १९४८ च्या उत्तरार्धात बुलडाणा जिल्ह्यात डॉ. पंजाबराव देशमुख, बाबासाहेब देशमुख व नामदार आर. के. पाटील यांचा दौरा झाला. या दौऱ्यात पंढरीनाथांनी, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २१ एप्रिल १९४८ रोजी दाताळा येथे बुलडाणा जिल्हा शिक्षण परिषद, तारीख ४ मे १९४८ रोजी मेहकर तालुका परिषद घेतली. मेहकर परिषदेचे उद्घाटक ब्रिजलाल बियाणी व प्रमुख वक्ते पंढरीनाथ पाटील हे होते. तत्पूर्वी १ मे १९४८ रोजी केळवद येथे पंढरीनाथांच्या अध्यक्षतेखाली समाजशिक्षण केंद्राची स्थापना होऊन या केंद्राचे उद्घाटन सावरगावचे संतोषराव नारायणराव उर्फ आप्पासाहेब पाटील यांनी केले.

### अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद नाशिक

दिनांक ८ ते १० मे १९४८ रोजी नाशिक येथे अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद भरली. सदर परिषदेच्या अध्यक्षस्थानी कोल्हापूरचे महाराज छत्रपती शहाजी भोसले होते. त्या परिषदेत तारीख ९ मे १९४८ रोजी शिक्षणावर पंढरीनाथांचे उत्कृष्ट भाषण झाले. या भाषणाचा प्रभाव परिषदेवर झाला. त्याचठिकाणी त्याचदिवशी अखिल भारतीय मराठा महिला परिषद झाली. त्या परिषदेलाही उपस्थित होते. १० मे १९४८ रोजी दुपारचे तिसरे प्रहरी महाराणी छत्रपती कोल्हापूर यांचे अध्यक्षतेत अखिल भारतीय महिला परिषद झाली. तीत एका ठरावावर पंढरीनाथांचे पाऊणतास भाषण झाले.[१३०]

( नासिक शिक्षण परिषद गौरव ग्रंथ, पान ७ व डायरी)

## लोककलेतून लोकशिक्षण

शालेय शिक्षणाबरोबरच लोकशिक्षणाचे कार्य पंढरीनाथ पाटील सतत करीत असत. लोकशिक्षणासाठी तत्कालीन लोककलांचा प्रभावी माध्यम म्हणून त्यांनी उत्तमरीतीने वापर केला. जलसा, तमाशा, कीर्तन व नाटक ही लोकशिक्षणाची तत्कालीन प्रभावी माध्यमे होती. पंढरीनाथांनी स्वत:च सत्यशोधकी जलसे ठिकठिकाणी स्थापन केलेले होते. अशा माध्यमांपैकीच एक प्रभावी माध्यम 'इनसे बचो' हे असेच लोकांना शिक्षण देणारे एक नाटक होते. या नाटकाच्या प्रयोगाचे उद्‌घाटन तारीख ११ डिसेंबर १९४८ रोजी बुलडाणा येथील थिएटरात पंडित कानडे शास्त्री यांचे भाषणाने झाले तर त्या कार्यक्रमाचा समारोप पंढरीनाथांच्या भाषणाने झाला.

पंढरीनाथ पाटील शिक्षक संघटना, पाटील संघटना या संघटनांचे पदाधिकारी होते. त्यांच्या अध्यक्षीय मार्गदर्शनाखाली इतर संघटनेची संमेलने होत, परिषदा होत. तारीख १५ डिसेंबर १९४८ रोजी बुलडाणा येथील जनपदाच्या श्री शिवाजी सभागृहात अकोला व बुलडाणा जिल्ह्यातील शिक्षण खात्यांच्या नोकरांची परिषद झाली. या परिषदेत पंढरीनाथांचे मुख्य भाषण झाले.

## यवतमाळ दौरा

डॉ. पंजाबराव देशमुख व पंढरीनाथ पाटील एम.एल.ए. हे श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटी, उमरावती द्वारा संचालित शाळा महाविद्यालयांना भेटी देत. त्यांच्या अडचणी समजावून घेत. त्या सोडविण्यासाठी त्यांना मदत व मार्गदर्शन करीत. तारीख २६ जानेवारी १९४९ रोजी यवतमाळ येथील टाऊन हॉलमध्ये त्यांचे जाहीर व्याख्यानाचा कार्यक्रम झाला. त्यावेळी पंढरीनाथांनी फारच उद्‌बोधक व जागृतीपर भाषण केले. दुसऱ्या दिवशी सकाळी साडेआठ वाजता श्री शिवाजी विद्यालयाच्या मैदानावर संस्थेचे कार्यकर्ते शिक्षक, विद्यार्थी व पालक यांची सभा झाली. त्यावेळी पंढरीनाथ आपल्या भाषणात म्हणाले 'मागासलेला वर्ग आता जागा झालेला आहे. त्याला उठून उभे राहण्यास थोड्या आधाराचीच काय ती गरज आहे. जागे असणाऱ्यांनी ती गरज भागवायला पाहिजे. म्हणजे परिणाम फार गोड होतील. नाहीतरी तो उठल्याशिवाय राहणारच नाही. त्याला आता झोपायचे नाही. जागे व्हायचेच आहे. पण आधाराने काम लवकर होऊन सहकार्याची भावना विजयी होईल; आणि हा मागाहून जागा झालेला समाजच पुढे येईल. ज्याप्रमाणे पडीत जमीन लागवड केल्यास पीक फारच फोफावून उठते. त्याचप्रमाणे

मागासलेल्या समाजास पडीत जमीन समजल्यास तीत झालेल्या ज्ञानाच्या बीजारोपणापासून प्रचंड कार्यशक्तीचे पीक फोफावून निघेल.' विद्यार्थ्यांना उद्देशून ते म्हणाले, 'तुम्ही आपल्या परिस्थितीची जाणीव ठेवून पालकांच्या कष्टांची आठवण करीत शिक्षण घ्या. शहरातील शानशौकीला न भूलता नैसर्गिक सद्गुण वाढीस लावा.'

(६८) (संदेश १३-२-१९४९)

## शिक्षणसंस्थेला मिलिटरी बॅरेक्स मिळविल्या

बहुजन समाजाची मुले शिकावी, बहुजनांच्या शिक्षणसंस्था वाढाव्यात यासाठी पंढरीनाथ सतत प्रयत्नशील असत. उमरावती येथील श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटीला मिलिटरी बरॅक्सपैकी काही इमारती मिळाव्यात म्हणून ते डॉ. पंजाबराव देशमुखांसह दिनांक १५ जुलै १९५० रोजी गृहमंत्री नामदार पंडित द्वारकाप्रसाद मिश्रा यांना भेटले. त्यांच्याकडून संस्थेसाठी काही बरॅक्स मिळाव्या म्हणून त्यांच्याशी बोलणी केली. त्याचा परिणाम म्हणून संस्थेला बरॅक्स मिळाल्या. यात पंढरीनाथांची काम करण्याची जिद्द दिसून आली. जे काम ते हाती घेत ते पूर्ण होईपर्यंत ते स्वस्थ बसत नसत. सतत ते त्या कामाचा पिच्छा पुरवत व त्यात यशस्वी होत.

शिक्षणप्रसारासाठी त्यांनी बुलडाणा जिल्ह्यात प्राथमिक शाळांची संख्या वाढविण्यासाठी सतत प्रयत्न केले. १८ जुलै १९५० रोजी जनपदात सरकारी जिल्हा शिक्षण अधिकारी, जनपदाचे अध्यक्ष व ते स्वत: मिळून तालुक्यातील दहा गावी प्राथमिक शाळा उघडण्याबाबत निर्णय घेतला. गावांची नावे निश्चित केली व त्याप्रमाणे शाळा उघडल्या.

## श्री शिवाजी लोकविद्यापीठाची स्थापना

कृषिक्रांतीचा नेता व बहुजनांचा त्राता डॉ. पंजाबराव देशमुख व समाजभूषण पंढरीनाथ पाटील यांनी उमरावती येथे श्री शिवाजी लोकविद्यापीठ स्थापन केले. त्या लोकविद्यापीठाच्या उद्घाटनासाठी भारताचे राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांना बोलाविण्याचे ठरले. सदर सोहळा दिनांक ३० डिसेंबर १९५० रोजी दुपारी २ वाजता नियोजनबद्ध व अत्यंत कडक शिस्तीत आयोजित केला. या कार्यक्रमासाठी रयत शिक्षण संस्था सातारा या संस्थेचे संस्थापक श्री. भाऊराव पाटील हेही आलेले होते. ते तारीख २९ लाच आलेले असल्यामुळे रात्री त्यांच्याबरोबर शिक्षणात मागासलेल्या

समाजाच्या शिक्षणप्रसारासाठी कोणते प्रयत्न करावेत याविषयी पंढरीनाथांनी त्यांच्याशी चर्चा केली. तारीख ३० ला दुपारी २ वाजता राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांच्या हस्ते श्री शिवाजी लोकविद्यापीठाचा उद्घाटन सोहळा मोठ्या थाटात पार पडला. या समारंभासाठी संपूर्ण वऱ्हाड व महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून ७ हजारावर लोक उपस्थित होते. त्यानंतर सर्कीट हाऊसवर राष्ट्रपतींना अल्पोपहार व चहापान झाले. त्यावेळी जी निवडक १० मंडळी होती. त्यात पंढरीनाथांचा समावेश होता. यापूर्वी राष्ट्रपतींची व त्यांची वर्धा येथे भेट झालेली होती. यावेळी राष्ट्रपतींनी त्यांना ओळखले व त्यांच्याशी दोन मिनिटे बोलले.

## मराठा हायस्कूलचे स्नेहसंमेलन

या कार्यक्रमानंतर भाऊराव पाटील १ जानेवारी १९५१ पर्यंत उमरावतीस डॉ. पंजाबराव देशमुखांकडे थांबले. ते सत्यशोधक समाजाचे मोठे कार्यकर्ते होते व पंढरीनाथ पाटलांचे जिगर दोस्त होते. डॉ. पंजाबराव देशमुख व पंढरीनाथ पाटील यांचेबरोबर भाऊराव पाटलांनी बहुजन समाजाच्या सर्वांगीण उन्नतीबद्दल चर्चा केली. तारीख १ जानेवारी १९५१ रोजी मराठा हायस्कूलचे स्नेहसंमेलन श्री भाऊराव पाटलांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. त्या संमेलनाचे उद्घाटन पंढरीनाथांच्या भाषणाने झाले. यावेळी पूर्व पश्चिम महाराष्ट्रातील शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील काम करणाऱ्या उच्च कोटींच्या महापुरूषांना एकमेकांशी चर्चा करण्याची संधी उपलब्ध झाली. त्याचा फायदा त्यावेळी बहुजन समाजाला निश्चित झाला व आजही होत आहे.

## सामाजिक व शैक्षणिक कार्यास वाहून घेतले

जानेवारी १९५२ मध्ये असेंब्ली निवडणुका झाल्या. त्यात त्यांना अपयश आले म्हणून त्यांनी यापुढे निराश न होता सामाजिक व शैक्षणिक कार्यास वाहून घेण्याचे ठरविले व त्याप्रमाणे कामाला लागले. २१ जानेवारी १९५२ रोजी किन्होळ्याचे श्री. सीताराम राघोजी पाटील बाहेकर व श्री. बंडूजी रंभाजी पाटील बाहेकर यांना सोबत घेऊन चिखलीवरून ते सावरगाव डुकरे येथे गेले. तेथे रात्री मुक्कामी थांबून तेथील प्रमुख मंडळीशी भावी समाजसुधारणेबाबत चर्चा केली. त्यावेळी त्यांच्या असे लक्षात आले की पंढरीनाथ पाटील निवडणूक हारल्यामुळे तेथील मंडळीची खूपच नाराजी झाली. ते निरूत्साही दिसू लागले. दुसऱ्या दिवशी तारीख २२ जानेवारी १९५२ रोजी येथे सकाळपासूनच चिखली तालुक्यातील प्रमुख मंडळी जमली. त्यांच्यासमोर पंढरीनाथ

पाटील आपल्या भाषणात म्हणाले, 'आता आपण चिखली येथील श्री शिवाजी हायस्कूलचे बांधकाम हाती घेऊ.' परंतु उदास व निरूत्साही मंडळी फारशी उत्स्क दिसली नाही. म्हणून त्यांनी स्वत: एकट्यानेच हे काम हाती घेण्याचा निश्चय केला.

शाळेसाठी वर्गणी जमविण्यासाठी पंढरीनाथ पाटील आता गावोगाव एकटेच फिरू लागले. विशेषत: चिखलीच्या आसपासच्या खेड्यातून ते वर्गणी गोळा करू लागले. पळसखेड दौलत, सवणा, वळती, केळवद, ब्रम्हपुरी, मुंगसरी, राजूर, पांग्री, मेरा बु॥, निमगाव गुरू, मंगरूळ नवघरे यासारख्या लहान गावी ते तीन तीन दिवस मुक्कामी राहून चारशे ते आठशे रूपये वर्गणी मिळवू लागले. लोकांमध्ये दानत आहे, आपण त्यांच्यापर्यंत पोचलो पाहिजे याची अनुभूती त्यांना या खेड्यांनी दिली. त्यांचा आत्मविश्वास व उत्साह वाढला. शाळेची इमारत उभी होऊ शकते, याची खात्री त्यांना वाटली.

**चिखली येथील श्री शिवाजी हायस्कूलच्या इमारतीचे बांधकाम सुरू**

शिक्षणाचे महत्व ओळखून असल्यामुळे त्यासाठी ते शाळा उघडत. इमारती बांधत. जास्तीत जास्त मुलांनी शाळेत शिक्षण घ्यावे म्हणून पालकांना भेटून मुलांना शाळेत पाठविण्यास त्यांना प्रोत्साहन देत. थोरामोठ्या प्रौढांनी शिकावे म्हणून त्यांनी ठिकठिकाणी समाजशिक्षण केंद्रे स्थापन केली. तारीख ५ व ६ जून १९५२ रोजी अशाच दोन समाजशिक्षणकेंद्रात टाकरखेड हेलगा व कोलारी त्यांची व त्यांचे सहकारी श्री. संतोषराव पाटील यांची व्याख्याने झाली. शालेय इमारत बांधकामासाठी उपरोक्त गावामधून त्यांनी हजारो रूपये लोकांकडून मिळविले. तारीख १९ जून रोजी बांधकामासाठी विटा, चुना इत्यादी सामानांची व्यवस्था केली. तारीख १६ जून १९५२ रोजी सोमवारी शाळेच्या इमारतीच्या बांधकामासाठी गवंडी सुतार व मजूर निश्चित केले. तारीख १७ जून १९५२ आषाढ कृष्णदशमी संवत २००८ रोज मंगळवारी श्री शिवाजी हायस्कूल चिखलीच्या इमारत बांधकामाची सुरूवात झाली. अर्थात मागील वर्षी तयार केलेल्या ओट्यावर ही इमारत उभारण्याचे काम सुरू झाले.

**श्री शिवाजी हायस्कूल चिखलीच्या इमारतीचे उद्घाटन झाले**

१९५२ च्या पहिल्या लोकसभा निवडणूकीत डॉ. पंजाबराव देशमुख निवडून

आले. त्यानंतर वऱ्हाडच्या इतिहासात व मराठा समाजाच्या सौभाग्याने बहुजनांच्या हिताच्या ज्या काही ऐतिहासिक महत्वाच्या घटना घडल्या त्यापैकी सुवर्णाक्षरांनी नोंद होणारी घटना म्हणजे १२ ऑगष्ट १९५२ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख यांचा समावेश केन्द्रीय मंत्रिमंडळात झाला. त्यावेळी पंढरीनाथांचा आनंद गगनात मावेना. त्यांनी त्यांचे तारेने दिनांक १३ रोजी अभिनंदन केले व १५ ऑगष्टला शिवाजी हायस्कूल चिखलीच्या उद्घाटनासाठी आमंत्रित केले. परंतु एवढ्या अल्पावधीत डॉ. पंजाबरावांना ते शक्य नव्हते. म्हणून त्यांनी तसे लगेच उत्तराच्या तारेत पंढरीनाथांना कळविले. डॉ. पंजाबराव देशमुखांचे श्री शिवाजी शाळा चिखलीच्या इमारतीच्या उद्घाटनासाठी येणे लांबणीवर पडले. या मधल्या कालावधीत इमारतीच्या बांधकामातील बारीक सारीक कामे पूर्ण करून घेतली. यावेळी ते स्वत: कामावर देखरेख करीत असत. त्यांनी या शाळेच्या उद्घाटनासाठी डॉ. भाऊसाहेब देशमुखांनी यावे म्हणून त्यांना १७ ऑगष्ट १९५२ रोजी पुन्हा पत्र लिहिले. त्या पत्रात त्यांनी लिहिले की, आता देशातील मागासलेला वर्ग व खेड्यातील जनतेसाठी काय काय करावे जेणे करून त्यांचे कल्याण होईल याबाबत उपयुक्त सूचना केल्या. या पत्राचे उत्तर म्हणून डॉ. पंजाबराव देशमुखांनी पाठविलेले पत्र पंढरीनाथ पाटलांना ३० ऑगष्टला मिळाले. त्या पत्रानुसार डॉ. पंजाबराव देशमुख, भारत सरकारचे मंत्री, हे तारीख १८ सप्टेंबर १९५२ पासून एक आठवड्याचा दौरा वऱ्हाडात करतील असे त्यांना कळविण्यात आले. तसेच त्या दौरा काळात डॉ. पंजाबराव देशमुख हे तारीख २२ सप्टेंबर १९५२ रोजी चिखलीस शाळेच्या इमारतीच्या उद्घाटनास येतील असे ४ सप्टेंबर रोजी श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या कचेरीत झालेल्या बैठकीत ठरले.

दिनांक १३ सप्टेंबर १९५२ रोजी बुलडाणा येथे जनपद सभागृहात जिल्ह्यातील प्रमुख लोकांची सभा झाली. तीत तारीख २२ सप्टेंबर रोजी चिखली येथे डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख, भारत सरकारचे मंत्री, यांचे जिल्ह्याच्या वतीने जंगी स्वागत करण्याचे ठरले. त्यासाठी पंढरीनाथांच्या अध्यक्षतेखाली स्वागत समिती गठित करण्यात आली. कार्यक्रमाची तयारी सुरू झाली. हस्तपत्रके व निमंत्रणपत्रिका पाठविण्यात आल्या. बुलडाणा जिल्ह्यातील प्रत्येक गावात सदर हस्तपत्रके व निमंत्रणपत्रिका व निवडक मंडळींसाठी अल्पोपहार पत्रिकाही स्वतंत्रपणे पाठविण्याचे काम तारीख १७ सप्टेंबरपर्यंत पूर्ण झाले. मध्यप्रदेशातील सर्व जिल्ह्यात या पत्रिका पाठविल्या गेल्या. तसेच राष्ट्रातील प्रमुख शहरातील निवडक व्यक्तींनाही अगत्याने पाठविण्यात आल्या.

जसजशी कार्यक्रमाची तारीख जवळ येऊ लागली, तसतशी चिखली नगरी झाडलोट होऊन इमारतींना रंगसफेदी होऊन गल्लीबोळही स्वच्छ झाले. ठिकठिकाणी रस्त्यारस्त्यावर चौकाचौकात कमानी, तोरणे व पताका लागल्या. सारी चिखली नगरी तारीख २१ सप्टेंबरच्या रात्री डॉ. पंजाबरावांच्या स्वागतासाठी सज्ज झाली. पंढरीनाथांनी स्वागताध्यक्ष म्हणून आपले भाषण प्रथमच लिहून काढले. यापूर्वी त्यांनी लेखी भाषण कधीही वाचून दाखविलेले नव्हते. तारीख २२ सप्टेंबर सोमवार चिखलीचा बाजारही होता. त्यामुळे नगरात लोक मावत नव्हते. सर्वत्र उत्साह व आनंद ओसंडत होता. रात्री १० ते १२ पर्यंत श्री शिवाजी हायस्कूलच्या नव्या इमारतीचा उद्घाटन सोहळा भारत सरकारचे कृषिमंत्री डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या शुभहस्ते मोठ्या थाटात पार पडला. कार्यक्रमातील शिस्त, सुव्यवस्था, आनंदाचे उधाण तसेच मंडपाचे राजवैभवाने कार्यक्रमात महत्त्वाचे स्थान पटकावले. पंढरीनाथांनी अर्ध्या तासात स्वागतपर भाषण वाचले. डॉ. पंजाबरावही अर्धाच तास बोलले. दुसऱ्या दिवशी बुलडाणा येथे डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुखांना सुवर्ण ट्रान्सपोर्ट कंपनीत चहापान झाले. तर गांधीभवनात त्यांचा बुलडाणा नगरवासियांतर्फे जाहीर सत्कार करण्यात आला. बुलडाण्याच्या इतिहासात एक पान सुवर्णाक्षरांनी नोंदविल्या गेले. त्यानंतर उमरावती येथे तारीख २५ सप्टेंबर व नागपूर येथे २७ सप्टेंबर १९५२ रोजी डॉ. पंजाबरावांचा सत्कार समारंभ झाला. उमरावतीच्या शिवाजी एज्युकेशन सोसायटीतर्फे झालेल्या सत्कार समारंभाच्या छापलेल्या पत्रिकेत मुख्य आमंत्रक म्हणून त्या पत्रिकेवर श्री. पंढरीनाथ पाटील चिखली व श्री. दादा कोरडे मुर्तिजापूर या दोघांची नावे होती. दिनांक २८ रोजी दादासाहेब पार्डीकर देशमुख यांनी डॉ. पंजाबराव देशमुखांना मेजवानी दिली व श्री शिवाजी शिक्षण मंडळ उमरावती या संस्थेस एक हजार एकशे एक रूपये देणगी दिली. त्यावेळी पंढरीनाथ पाटलांनी आभाराचे भाषण केले. उमरावती व नागपूर या दोन्ही ठिकाणच्या कार्यक्रमात व जेवणावेळी पंढरीनाथ पाटील सन्मानपूर्वक उपस्थित होते. डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख मंत्री झाल्यामुळे संस्थेतील त्यांच्या गैरहजेरीत श्री शिवाजी शिक्षण मंडळाचा कारभार कसा चालावा याचे मार्गदर्शन तारीख २९ रोजी उमरावती येथे संचालक मंडळाच्या सोबत बोलताना पंढरीनाथांनी केले.

मधल्या काळात तारीख १२ ऑक्टोबर १९५२ रोजी उमरावती येथील मराठा हायस्कूलचे गॅदरिंग मध्यप्रदेशचे राज्यपाल मा. श्री. डॉ. बी. पट्टाभिसितारामय्या यांचे

हस्ते व पंढरीनाथांच्या उपस्थितीत झाले. त्या दिवशी सायंकाळी श्री शिवाजी शिक्षण मंडळाच्या कार्यकारिणीच्या सभेत मांडलेली घटना दुरूस्ती सूचना मंजूर झाली.

श्री शिवाजी हायस्कूल चिखलीच्या जागेवर तारीख १८ डिसेंबर १९५२ रोजी पायाभरणी कार्यक्रमासाठी पंढरीनाथ पाटलांच्या अध्यक्षतेखाली पश्चिम वऱ्हाड (अकोला) चे शिक्षणाधिकारी श्री. आपटे यांच्या हस्ते कुदळ मारून कामाला सुरूवात झाली.

## वैशिष्ट्यपूर्ण कार्यपद्धती

शिक्षण, शेती, अन्न व आरोग्य हे ग्रामीण भागाचे महत्वाचे व लोककल्याणाशी संबंधित विषय आहेत. या विषयासंबंधी निर्माण झालेल्या अडचणी सोडवून घेण्यासाठी पंढरीनाथ पाटलांनी श्री. लक्ष्मणराव भटकर, संतोषराव पाटील व श्री. कोटंबकर यांचे एक शिष्टमंडळ त्यांच्याच नेतृत्वात नागपूरला तारीख २ जानेवारी १९५३ रोजी नेले. पहिल्या दिवशी व तारीख २ जानेवारीला सदर शिष्टमंडळ श्री. पी. के. देशमुख (स्थानिक स्वराज्य मंत्री) व त्यांचे खात्याचे सेक्रेटरी श्री. गुप्ता व दुय्यम सेक्रेटरी श्री. देशमुख यांना भेटले. दुसऱ्या दिवशी तारीख ३ जानेवारीला ते मुख्यमंत्री श्री. रविशंकर शुक्ल, विकासमंत्री श्री. रा. कृ. पाटील, आरोग्यमंत्री श्री. मारोतराव सांबशिव कन्नमवार, मालकाळी मंत्री श्री. भगवंतराव अण्णाभाऊ मंडलोई व शिक्षणमंत्री श्री. पुरूषोत्तम काशीराव देशमुख व त्याशिवाय शिक्षणखात्याचे डायरेक्टर, शेतीखात्याचे डायरेक्टर, स्थानिक स्वराज्य खात्याचे सेक्रेटरी, अन्न व स्थापत्य इत्यादी खात्याचे सेक्रेटरी या सर्वांची भेट घेतली. या शिष्टमंडळ सदस्यांसह पंढरीनाथ पाटील यांनी चिखली जनपद सभेला येणाऱ्या अडचणी समजावून सांगितल्या. त्या दूर करण्यासाठी उपाय सुचविण्याची मागणी केली. त्यांच्या या कृतीतून सर्वसामान्य माणसाच्या हिताची कळकळ व्यक्त झाली. तसेच आपल्या सहकार्यांना वरिष्ठ अधिकारी, पदाधिकारी व मंत्री यांना भेटून आपल्या समस्या कशा मांडाव्यात व सोडवून घ्याव्यात याचा प्रत्यक्ष पाठच त्यांनी दिला.

## अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद कोल्हापूर

तारीख २ मे १९५३ पासून कोल्हापूर येथे भारत सरकारचे शेतकी मंत्री डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय मराठा

शिक्षण परिषदेचे अधिवेशन सुरू झाले होते. त्या परिषदेत पंढरीनाथ पाटील प्रतिनिधी म्हणून हजर राहिले. सदर परिषद तारीख ३ मे ला दुपारी २ वाजता संपली. तेथेच पंढरीनाथ पाटलांना त्यांचे काका भावजी पाटील आजारी असल्याचे कळले. दुसऱ्या दिवशी ४ मे ला ते मुंबईत आले व एम्पायर हॉटेलमध्ये थांबले. आयुष्याच्या आतापर्यंतच्या प्रवासात हॉटेलमध्ये पंढरीनाथ पाटील थांबल्याची ही पहिलीच नोंद आहे. मुंबईहून ते सरळ चिखलीस परत आले. (८५) तरूण भारत, नागपूर दि. ५-४-१९५७

## श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीची बुलडाणा जिल्ह्यातील पहिली शाळा

श्री शिवाजी शिक्षण संस्था चिखली शाळेचा उद्‌घाटन सोहळा आटोपल्यानंतर जिल्ह्यातील वातावरण चैतन्यमय झालेले होते. लोकांना शिक्षणाचे महत्व कळले म्हणून शैक्षणिक संस्था उभारणे ही काळाजी गरज आहे हे हेरून भाऊसाहेब पंजाबरावांनी उमरावती येथील श्री शिवाजी शिक्षण संस्थेची बुलडाणा जिल्ह्यातील पहिली शाखा म्हणून ओळखली जाणारी नांदुरा येथील श्री शिवाजी हायस्कूलची स्थापना १९४९ साली केली. या हायस्कूलच्या पक्क्या इमारतीचा उद्‌घाटन समारंभ माजी आमदार श्री. पंढरीनाथ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. इंगळे यांच्या हस्ते झाला. सुरूवातीलाच त्यांनी लहानसे भाषण करून शुभेच्छा व्यक्त केली. सदर शाळेच्या कामात सदाशिव पाटील खडदगावकर यांनी लक्ष घातल्यामुळे शाळेची भरभराट होत आहे. यापूर्वी तेथे सुरू झालेल्या शाळेला कोठारी घराण्यातील सधन विधवा बाईने मोठी रक्कम दान दिली. म्हणून त्या शाळेला कोठारी हायस्कूल नाव दिले गेले. श्री शिवाजी हायस्कूललाही एका श्रीमंत बाईनेच मदत केली आहे. खेड्यातील जनतेनेही बरीच मदत केली. त्यावेळी शाळेचा एकच मजल तयार झालेला होता. समाजाने मदत केल्यास तिचे रूपांतर दुमजली वा तिमजली इमारतीत होईल म्हणून जनतेने सदर शाळेला मदत करावी असे जाहीर आवाहन पंढरीनाथ पाटलांनी केले. त्यामुळेच सदर शाळेची इमारत दुमजली झालेली आहे. हे समाजाने त्यागभावनेतून दाखवून दिलेले आहे. (८५)

तरूण भारत, नागपूर दि. ५-४-१९५७

## श्री शिवाजी विद्यालय देऊळगाव मही

श्री शिवाजी हायस्कूल नांदुरा येथील शाळेची इमारत पूर्ण होऊन तिचे उद्‌घाटन झाल्यानंतर पंढरीनाथांनी लगेच देऊळगाव मही येथे दुसरे हायस्कूल सुरू केले. त्याठिकाणी

सप्टेंबर १९५२, ५३ ला सुरूवातीच्याच काळात नांदुरा येथें असलेले श्री. डी. के. पाटील मुख्याध्यापक यांची बदली देऊळगाव मही येथे करण्यात आली. त्यांच्या मुख्याध्यापकीय प्रशासनाखाली तेथील शाळेचा कारभार सुरू झाला. त्याठिकाणी जोशी नावाचे गृहस्थ स्थानिक सेक्रेटरी होते. तसेच अर्जूनराव गाढवेही त्याठिकाणी प्रमुख नागरिक या नात्याने त्या शाळेकडे लक्ष देत असत. श्री. कमलाकर मासोदकर आणि घुगावकर यांनी श्री शिवाजी हायस्कूल देऊळगाव मही बाबत एक पत्रक प्रसिद्ध केले. त्यावर नागपूरच्या तरूणभारत दैनिकात २१ ऑगष्ट १९६९ रोजी टिकात्मक लेख प्रसिद्ध झाला. त्यात श्री. डी. के. पाटील मुख्याध्यापक यांना सरव्यवस्थापक पंढरीनाथ पाटील यांनी कायदा व नियमांचे उल्लंघन करून काढून टाकल्याचा आरोप आहे. सदर पत्रकाबाबत उपव्यवस्थापक पंढरीनाथ पाटलाने खुलासा केला, की श्री. डी. के. पाटील मुख्याध्यापक हे १९६७ साली बी. टी. प्रशिक्षणासाठी अकोला येथील बेसिक प्रशिक्षण महाविद्यालयात गेले. तेथील प्रशिक्षण पूर्ण करून ते एक एप्रिल १९६८ ला श्री शिवाजी हायस्कूल देऊळगाव मही येथे पूर्ववत रूजू झाले नाही. तसेच ते बी. टी. प्रशिक्षित नसताना त्यांनी बी. टी. मुख्याध्यापक पदाचा पगार काढला व कोणताही चार्ज न देता घाईने निघून गेले. सदर अनधिकृत पगाराची जास्तीची रक्कम शिक्षणखात्याने ग्रॅन्ट मधून कपात केली.

तसेच के. टी. काळे व वि. पु. शिंगणे यांना काढल्याबाबत श्री. पाटील म्हणतात, 'श्री. काळे हे विज्ञान शिक्षक होते. त्यांची नेमणूक केवळ मार्च ६९ पर्यंत काही महिन्यांसाठी करण्यात आली होती. शेवटची सायन्स पदवी परीक्षा पास झालेला शिक्षक नेमला, त्यामुळे त्यांच्यावर कोणताही अन्याय झालेला नाही. तसेच श्री. शिंगणे हे लोअर मॅटीक अप्रशिक्षित शिक्षक होते. त्यांची ही नेमणूक अस्थायी होती. त्यांनी शाळेच्या रेकॉर्डमध्ये खोडतोड करून खोटी गैरहजेरी दाखविली. त्यामुळे त्यांच्यावर कमी करण्याची कारवाई करावी लागली. तेथील कारकून अकार्यक्षम होता. त्याच्याने काम रेटेना म्हणून दुसरा टायपिस्ट कारकून नेमला.'

श्री. रा. पु. नारखेडे हे 'आदर्श शिक्षक' असूनही त्यांची बदली केली. नोकरीत बदली अपरिहार्य आहे. आदर्श शिक्षकाने एकाच ठिकाणी १५ वर्षे राहून बदलीचा आदेश न पाळणे म्हणजे वरिष्ठांचा अवमान आहे. याबद्दल श्री. पंढरीनाथ पाटील यांनी आश्चर्य व्यक्त केले.

कागदी व नगदी पगाराबाबत पंढरीनाथ पाटलाने पत्रक लेखकालाच प्रतिप्रश्न विचारून 'स्वानुभव आहे काय ?' असे खडसावले आहे. शिक्षक संच अप्रशिक्षित ठेवल्याबद्दलचा आक्षेप फेटाळत त्यांनी दरवर्षी सेवाज्येष्ठतेनुसार प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येत असल्याची मागील माहिती सादर केली. एकूण हा सर्व खोडसाळपणाच असल्याचे स्पष्ट झाले. (१०३) तरूण भारत, नागपूर ३-९-१९६९

याबाबत देऊळगावमहीचे माजी मुख्याध्यापक श्री. डी. के. पाटील वय वर्षे ७८ यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, 'मी ६/८/४९ ला नांदुरा येथील श्री शिवाजी हायस्कूलवर होतो. १९५२-५३ ला डिप्टी झालो. त्यानंतर सप्टेंबर १९५३ ला देऊळगावमहीला मुख्याध्यापक झालो. अर्थात नांदुरा येथील रिलिवींग सर्टीफिकेटसह हेडमास्तर म्हणून डेप्युटेशनवर आलो. तेथे श्री. जोशी सेक्रेटरी होते. अर्जूनराव गाढवेंची बनवाबनवी अंगाशी आली. त्यांचा मुलगा एकनाथ हा अपदवीधर (बी.एस्सी.कृषि नापास) शिक्षक म्हणून लावला. तो त्रासदायक होता. शेवटी त्याने पैठणच्या नाथसागरात आत्महत्या केली.' तसेच पंढरीनाथ पाटील हे श्री शिवाजी शिक्षण संस्थेने डेप्युटी मॅनेजर पदी नेमले होते असेही त्यांनी सांगितले.

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ देऊळगावमही तालुका चिखलीचे अध्यक्ष श्री. पिराजी सखाराम पाटील व सेक्रेटरी उत्तमराव व्यंकटेश जोशी यांनी शिवाजी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पंढरीनाथ पाटील यांच्यावर तारीख ८ सप्टेंबर १९७१ रोजी बुलडाणा येथील व्यवहार न्यायाधीश सिनियर डिव्हीजन यांचे कोर्टात दावा दाखल केला.

१९५३ मध्ये वादीच्या सोसायटीने देऊळगावमही येथे हायस्कूल काढण्याचे ठरविले. त्यांची सोसायटी रजिष्टर नसल्यामुळे श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटी उमरावती यांच्यामार्फत श्री. पंढरीनाथ पाटील यांचा सल्ला घेऊन पुढील कारवाईस सुरूवात झाली व हायस्कूल चालू केले. त्याकरीता निरनिराळ्या देणग्या शाळेच्या इमारतीसाठी १९५५ ते १९५९ व १९६१ ते १९६३ पावेतो मिळविल्या. एकंदर रूपये १५ हजार शाळेच्या इमारतीसाठी खासदार पंढरीनाथ पाटील यांनी ग्रँट मिळविली. त्याचा हिशोब दाखविला नाही. वादीने आपली संस्था १९७० मध्ये रजिष्टर करून घेतल्यावर त्यांनी प्रतिवादीस देऊळगावमही शाळेचा सर्व कारभार त्यांच्या सुपूर्द करण्याबाबत हिशेब देण्याबाबत म्हटले. पण त्यांनी तसे केले नाही. प्रतिवादी विरूद्ध डिक्लेरेशन इंजेक्शन व

हिशेबासाठी दावा आणला आहे, असे समजते. असे तरूण भारताचे वृत्त आहे (१०४) (तरूण भारत, नागपूर १६-९-१९७१)

वास्तविक संस्थाच मुळात रजिष्टर्ड नसताना श्री शिवाजी शिक्षण संस्था देऊळगावमही या संस्थेला हायस्कूल मिळणे शक्य नव्हते. म्हणून श्री पंढरीनाथ पाटील यांच्या माध्यमातून श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटी उमरावती यांनी ही शाळा मिळविली. व त्या शाळेला इमारत वर्गणी व मुख्यमंत्री निधीतून १५ हजार रूपये मिळाले. देऊळगावमहीच्या श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाला नव्हे, हे एवढे स्पष्ट असताना व हे मंडळ १९७० साली नोंदले असताना सदर मंडळाला उपरोक्त शाळेच्या कारभारात हस्तक्षेप करण्याचा अधिकारच पोचत नाही. तरीही त्यांनी दावा लावला. पण त्यांना शाळा मिळाली नाही. पंढरीनाथ पाटलांनी त्यांना हिशेबही दिले नाहीत. कायदा व नियम श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटी उमरावतीच्या पर्यायाने पंढरीनाथ पाटलांच्या बाजूने होते व आजही आहेत. म्हणूनच देऊळगावमहीची श्री शिवाजी हायस्कूल ही श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटी, उमरावाती द्वारा संचालित आहे. सध्या ते सुरळीत सुरू आहे. याबाबत विधानसभेत प्रश्नोत्तरे झाली. त्यावेळी अनुदान रक्कम शाळेच्या निधीत जमा नसल्याचे मुख्यमंत्र्यांनी उत्तरात सांगितले. (१०५) मातृभूमि अकोला २५-९-१९७१

### श्री शिवाजी हायस्कूल बुलडाणा

प्रांतिक काँग्रेस निवडणुकीनंतर माजी दिवाण श्री. बाबासाहेब रोहोणेकर व पंढरीनाथ पाटील दिनांक १४ जून १९४८ ला अकोल्यास डॉ. गोपाळराव खेडकरांकडे मुक्कामी होते. दुसऱ्या दिवशी ते शेगावला पोचले. तेथे ते श्री. रामराव पाटील भांड यांचेकडे थांबले. हेच रामराव पाटील भांड, साखळी खु॥ चे त्र्यंबकराव यशवंतराव देशमुख यांचे सासरे होते. हे पंढरीनाथांना माहीत होते. पुढे याच साखळीकरांच्या अध्यक्षतेखाली धोडपच्या (ता. चिखली) श्री. बापूराव संपतराव कोल्हे या तरूणाने कृषक युवक शिक्षण संस्था स्थापन करून १९६१ साली बुलडाणा येथे श्री शिवाजी हायस्कूलची स्थापना केली. १९६३-६४ ला ते हायस्कूल पंढरीनाथ पाटील, रामभाऊ राऊत वकील व रा. दे. भोंडे वकील यांनी श्री. कोल्हे बी.एड्. प्रशिक्षणासाठी गारगोटी (जि. कोल्हापूर) ला असताना अण्णासाहेब (त्र्यं. य. देशमुख) साखळीकरांकडून ताब्यात घेतले व पुढे ते श्री शिवाजी शिक्षण संस्था, उमरावतीला जोडले. (या शाळेच्या स्थापनेपासून प्रस्तुत ग्रंथलेखक शिक्षक या नात्याने या शाळेच्या

परिवारातील एक घटक म्हणून या क्षणापर्यंत संपर्कात आहे. पुढे सदर लेखक श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीच्या संस्थेचे आजीव सभासद झाले.) हेच श्री शिवाजी हायस्कूल, श्री शिवाजी शिक्षण संस्था, उमरावती परिवारातील विदर्भातील सर्वात मोठे व नावाजलेले हायस्कूल म्हणून ओळखल्या जाते.

**बहुजनांना सत्तापदी बसविण्याची धडपड**

ग्रामीण भागातील शेतकरी व शेतमजूरांच्या कल्याणासाठी पंढरीनाथ पाटील सतत धडपडत असत. त्यांचे कल्याण व्हावे, त्यांना शिक्षण मिळावे, शिक्षण ही सर्वांच्या कल्याणाची गुरूकिल्ली आहे हे ते चांगले जाणून होते. म्हणून ते शिक्षण क्षेत्रात जास्त रस घेत. बहुजनांच्या शिक्षणासाठी व कल्याणासाठी ते सतत प्रयत्नशील असत. शैक्षणिक क्षेत्रातील महत्वाच्या सत्तापदीही बहुजनांनी असावे यासाठी ते धडपडत असत. त्यामुळेच या क्षेत्रातील विविध पातळ्यांवरील निवडणूकांमध्ये हिरीरीने भाग घेत व जिद्दीने काम करीत असत. १९७० साली नागपूर विद्यापीठ कोर्टाच्या निवडणूकीत त्यांनी अनेक ब्राह्मणेतर तरूण उच्चविद्याविभूषित उमेदवार उभे करून मोठ्या संख्येने त्यांना निवडून आणण्याचा प्रयत्न केला. ३ सप्टेंबर १९७० रोजी झालेल्या निवडणूकीत बरेच ब्राह्मणेतर निवडून आले. त्याचवेळी महाराष्ट्र खासदार संघातून श्री. के. जी. देशमुख व पंढरीनाथ पाटील तसेच सायन्स फॅकल्टीतून श्री. रा. कि. सोनुने हे निवडून आले. पुढे हेच श्री. रा. कि. सोनुने जिजामाता महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी विराजमन होऊन निवृत्त झाले.

*

# भाग - ५

# ब्राह्मणेतर चळवळ

६ मे १९२२ रोजी राजर्षी शाहू छत्रपती महाराजांचे निधन झाले. त्यामुळे पंढरीनाथ पाटलांना अति दु:ख झाले. पंढरीनाथ पाटील शाहूंच्या वेदशाळेतील विद्यार्थी होते. त्याकाळात ते त्यांच्या अवतीभवती वावरले. राजर्षी शाहू महाराजांच्या अंत्यविधीला ते उपस्थित नसावे. तेरवीच्या कार्यात मात्र ते होते असे त्यांचे एक सहकारी स्वातंत्र्य सैनिक व पत्रकार डॉ. श्री. नारायणराव खेळकर, शिवसंदेशकार यांनी प्रत्यक्ष भेटीत सांगितले. छत्रपती राजे शिवाजी महाराज, म. फुले, राजर्षी शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ब्राह्मणांनी शूद्र म्हणून केलेला अपमान पंढरीनाथ पाटलांनाही मोहनीबुवांकडून तसेच धुळे जिल्ह्यातील भागवतबुवा देहूकरांच्या बाबतीत घडलेला प्रसंग अनुभवाला मिळाला. त्यामुळे पुरोहितशाहीविरूद्ध त्यांनी हा बंडाचा झेंडा खांद्यावर घेतला. फुले, शाहू व आंबेडकरांच्या अस्पृश्यता निर्मूलन व समतेचा संदेश देण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले.

बुलडाणा जिल्ह्याच्या मलकापूर तालुक्यातील वरखेड येथील विदर्भातील पहिल्या सत्यशोधक परिषदेनंतर लगेचच बुलडाणा येथे ब्राह्मणेतर परिषद घेतली. तत्पूर्वीच १९२२ सालीच बुलडाणा जिल्ह्याच्या मलकापूर तालुक्यातील जांभूळधाबे येथे विदर्भातील पहिली ब्राह्मणेतर परिषद, श्रावणातल्या पहिल्या सोमवारीच खामखेडकर दानाजी पाटील यांचे अध्यक्षतेखाली झाली. (१) (सत्यप्रकाश, तासगांव जि. सातारा ता. २२ आक्टोबर १९२२)

सत्यशोधक चळवळ व ब्राह्मणेतर चळवळीत फरक आहे. हा फरक सर्व सामान्यांच्या लक्षात चटकन येत नाही. सत्यशोधक चळवळीत बहुजनांबरोबर पुरोगामी व सुधारणावादी विचारांचे ब्राह्मणही सभासद होऊ शकतात. ब्राह्मणेतर चळवळीत व परिषदेत ब्राम्हणांना स्थान नाही. ब्राह्मणाशिवाय इतर जातींना ब्राह्मणेतर चळवळ व परिषदेत प्रवेश होता.

### वऱ्हाड मध्यप्रांत ब्राह्मणेतर परिषद मोर्शी

वरखेड सत्यशोधक, जांभूळधाबे बुलडाणा ब्राह्मणेतर परिषद नंतर १९२३

च्या उन्हाळ्यात उमरावती जिल्ह्यातील मोर्शी येथे पहिली ब्राह्मणेतर वऱ्हाडमध्यप्रांत परिषद पंढरीनाथ पाटलांनी मोर्शीचे नानासाहेब अमृतकर वकील व भाऊसाहेब गुंड यांच्या सहकार्याने घेतली. या परिषदेसाठी मुंबई प्रांताचे शिक्षणमंत्री भास्करराव जाधव हे अध्यक्ष होते. या परिषदेत ब्राह्मण कुळकर्णी व अधिकारी ब्राह्मणेतरांना कसे छळतात व पिळतात याबाबत माहितीपूर्ण भाषणे झाली. तसेच ही छळवणूक कशी थांबवता येईल याबाबत उपायही शोधण्याचा विचार झाला.

## कुळकर्णी व पटवारी यातील फरक

जांभूळधाबे ब्राह्मणेतर परिषदेत कुळकर्णी छळापासून मुक्ती मिळविण्यासाठी कुळकर्णीपद बरखास्त करून पटवारी पद निर्माण करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली. अशा मागण्यांचे रूपांतर ठरावात करून ते ठराव मंजूर करण्यात आले. हे सर्व ठराव संबंधीत सर्व अधिकाऱ्यांना पाठविण्याचे अधिकार या परिषदेने पंढरीनाथ पाटलांना दिले.

सदर परिषदेने दिलेले अधिकार वापरून पंढरीनाथ पाटलांनी ते ठराव ना. गव्हर्नर साहेब व डेप्युटी कमिशनर साहेब बुलडाणा यांचेकडे पाठविले. तेव्हा वऱ्हाडात विशेषत: बुलडाणा जिल्ह्यात ही नवीनच चळवळ व तीही १०-२० गावातील लोकांची झालेली सभा म्हणून रयतेच्या ठरावाकडे दयाळू सरकारने दुर्लक्ष केले. तसेच मे. रा. ब. सबडिव्हीजनल साहेब बुलडाणा यांचे हुकूमावरून पंढरीनाथ पाटलांना दिनांक १२-९-१९२२ रोजी मलकापूर तहसील कोर्टात हजर व्हावे लागले. या परिषदेतील ठराव संदर्भात पंढरीनाथ पाटलांना अनेक प्रश्न विचारण्यात आले. त्यांनी त्या सर्व प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली. त्यावेळी त्यांनी सांगितले की, कुळकर्णीपण हे वंशपरंपरेने चालत आलेले असल्यामुळे त्यांच्या विरोधी शेतकरी व इतर कोणीही तक्रार करण्यास धजावत नाही. हे कुळकर्णीच शेतकऱ्यांच्या शेताच्या हद्दी दर्शक खुणा व वरूळ्या टाकतात. त्यातून शेतकऱ्यांत कज्जे निर्माण होतात. त्यातूनच हे कुळकर्णी कशी पिळवणूक करतात. दहशत निर्माण करतात हे पटवून दिले. तसेच पटवारीपद हे सरकारने निर्माण केलेले असेल, ते वंशपरंपरा चालणार नाही. सरकार त्या पदी योग्य व्यक्तीची नियुक्ती करेल. त्याच्या विरोधी कोणीही तक्रार करण्यास मागेपुढे पाहणार नाही. सरकार त्याला शिक्षा करेल, त्याची बदली करेल. इत्यादी बाबी पंढरीनाथ पाटलांनी तहसीलदारांना तर्कसंगत मांडणीने पटवून दिल्या. (२) (सत्यप्रकाश, तासगाव, जि. सातारा ता. २९-१-१९२३, पृष्ठ क्र. २)

त्यानंतर पंढरीनाथ पाटलांनी तासगाव (सातारा) येथून प्रकाशित होणाऱ्या सत्यप्रकाश या वृत्तपत्रातून एक लेखमाला लिहून पाटील-कुळकर्णी यांची वंशपरंपरागत वतने नष्ट करण्याची मागणी करून ही पदे भरण्यासाठी ब्राह्मणेतर बहुजन समाजातील तरूण, होतकरू व लायक व्यक्तींची नियुक्ती करावी अशी सूचना केली. तसेच अस्पृश्यता नष्ट करण्याचे विचारही या लेखमालेतून व्यक्त केले. त्याबाबत अनेकांनी आपल्या प्रतिक्रिया पाठवून आनंद व्यक्त केला.

## बुलडाणा ब्राह्मणेतर परिषद

कुळकर्णी व पटवारी यातील फरक लोकांच्या लक्षात आणून देण्यासाठी व कुळकर्णीपण घालवून पटवारीपदाची निर्मिती करण्यासाठी लोकमत तयार करणे आवश्यक होते. त्यासाठी ब्राह्मणेतरात जागृती करणे गरजेचे होते. लोकजागृतीसाठी ब्राह्मणेतर परिषदा पंढरीनाथ पाटलांनी घेण्याचा सपाटा सुरू केला. दिनांक २४-९-१९२३ रोजी बुलडाणा येथे एक ब्राह्मणेतर परिषद घेतली. या परिषदेचे अध्यक्ष जवळच्या जळगाव जिल्ह्यातील ब्राह्मणतेर चळवळीतील धडाधडीचे कार्यकर्ते सीताराम नाना चौधरी हे होते. या परिषदेत पंढरीनाथ पाटील, आनंदस्वामी, डासाळ्याचे श्रीरामकृष्ण उकर्डा सवडदकर, तुळशीराम पाटील, केशवराव देशमुख, खामगावचे बाजीराव ना. बोबडे वकील, लोटू बुवा इत्यादी उपस्थित होते. आनंदस्वामी व पंढरीनाथ पाटील यांची या परिषदेत मार्गदर्शक भाषणे झाली. त्यानंतर दिनांक २७ सप्टेंबर १९२३ रोजी संध्याकाळी जांभोरा ता. मेहकर येथे आनंदस्वामींच्या अध्यक्षतेखाली पंढरीनाथ पाटलांचा स्वागत समारंभ झाला.

## जांभूळधाबा येथे ब्राह्मणेतर संघाची सभा

ब्राह्मणेतर चळवळीला संघटित रूप देण्यासाठी ब्राह्मणेतर संघाची स्थापना करण्यात आली. या ब्राह्मणेतर संघाची सभा दिनांक १७ ऑगष्ट १९२४ रोजी जांभुळधाबा येथे झाली. या सभेचे अध्यक्ष श्री. सखाराम पाटील होते. या सभेत आनंदस्वामी, पंढरीनाथ पाटील, ह.भ.प. लोटूबुवा व जगदेवराव भालेराव यांची उद्‌बोधक व प्रेरक अशी भाषणे झाली. या सभेत खालील ठराव पास करण्यात आले. १) तलाठी पद्धत सुरू करणे. २) नागपूर कायदे कौन्सिलातील स्वराज्य पार्टीचा निषेध. ३) सरकारी नोकरीत ब्राह्मणेतरांना ५० टक्के जागा देण्याची मागणी. ४) येत्या लोकल बोर्डाच्या निवडणूकीत ब्राह्मणेतर उमेदवारांनाच मतदान करणे.

## नव्याने सुधारित निवडणूक कायद्याची माहिती देणारे पत्रक

यापमाणे सभा घेऊन पंढरीनाथ पाटील ब्राह्मणेतर संघाचे जिल्हा सेक्रेटरी या नात्याने त्यांनी बहुजनांना विरोधी भूमिका घेण्यास प्रवृत्त करण्याचे कमालीचे प्रयत्न केले. तसेच येणाऱ्या लोकल बोर्ड निवडणूकीत नव्या कायद्याने झालेल्या सुधारणाही एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे मतदार व वृत्तपत्रांना कळविल्या.

या नवीन सुधारणेनुसार -

१) २५ रूपये साऱ्याची जमीन कसणारास अगर तितक्या साऱ्याची जमीन मक्त्याने करीत असलेल्यास मत देण्याचा आणि उमेदवार म्हणून उभे राहण्याचा अधिकार आहे.

२) मतदारांच्या कच्च्या याद्या तालुक्यातून पहावयास मिळतात. त्यात आपले नाव आहे की नाही हे प्रत्येक उमेदवाराने जरूर पहावे. यादीत नाव नसल्यास ते दाखल करण्यासाठी जिल्हाधिकारी व लोकलबोर्ड प्रेसिडेन्टकडे ताबडतोब नाव नोंदण्यासाठी लिहिणे.

३) प्रत्येक तालुक्याचे दहा ते पंधरा भाग पडले आहेत. प्रत्येक भागातून एकेक उमेदवार निवडून द्यावयाचा आहे. म्हणून उभे राहणाऱ्या ब्राह्मणेतर बंधूंनी आतापासूनच आपण उभे राहणार असल्याचे सुचविले पाहिजे.

४) उमेदवार ज्या भागातून उभा राहणार असेल त्या भागातच तो राहणारा असला पाहिजे.

५) प्रत्येक भागातून निवडून आलेल्या यशस्वी उमेदवारास तालुकाबोर्ड मेंबर मानण्यात येणार असून ते तालुका बोर्ड मेंबर आपल्यामधून जिल्हा बोर्ड मेंबर निवडणार आहेत व हे जिल्हा बोर्ड मेंबर आपल्यापासून प्रेसिडेंन्ट वगैरे पदाधिकाऱ्यांची निवड करतील.

ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनी आपल्या भागात फिरून लोकास लोकलबोर्डाचे महत्व व ब्राह्मणेतरास मते देण्याची जरूरी नीट समजावून सांगावी तरच हे बोर्ड खात्रीने ब्राह्मणेतरांच्या ताब्यात येतील असे फतवेच त्यांनी काढले.

## अमरावतीस ब्राह्मणेतर मजलिस

ब्राह्मणेतर परिषद व ब्राह्मणेतर संघातून अ. भा. ब्राह्मणेतर कॉंग्रेसची स्थापना

झाली व तिचे पहिले अधिवेशन डिसेंबर १९२४ मध्ये बेळगावला झाले. याच सभेत अखिल भारतीय ब्राह्मणेतर परिषदेची दुसरी बैठक उमरावती येथे घेण्याचे ठरले. त्याप्रमाणे वऱ्हाड प्रांतातील ब्राह्मणेतर पक्षाचे पुढारी दौरे काढून प्रचार करू लागले. २५,२६ व २७ डिसेंबर १९२५ या तीन दिवसात उमरावती येथे ब्राह्मणेतरांची मजलिस झाली. यावेळी ब्राह्मणेतर काँग्रेस, महिला काँग्रेस या मजलिसमध्ये सहभागी झाले.

## ब्राह्मणेतर पत्रकार पंढरीनाथ पाटील

पंढरीनाथ पाटील आता २० वर्षांचे तरूण होते. त्यांचा चळवळीतील सक्रिय सहभाग, वैचारिक परिपक्वता, आक्रमकवृत्ती, ब्राह्मणेतरांबद्दल सहानुभूती व त्यांच्या कल्याणाची तळमळ इत्यादी बाबी सर्वांच्या नजरेत आलेल्या होत्या. त्यामुळेच त्यांचेकडे बुलडाणा जिल्हा ब्राह्मणेतर संघाचे सेक्रेटरी पदही चालून आले होते. ब्राह्मणेतर चळवळ वाढविण्यासाठी सामाजिक सुधारणा व ब्राह्मणेतरात आत्मभान आणण्यासाठी प्रसार माध्यमांची गरज आहे, हे ओळखून पंढरीनाथ पाटलांनी वैचारीक प्रगल्भतेसाठी वाचन व त्यासाठी वाचनालय यांची जशी गरज आहे, तसेच आपली मते, विचार, कार्य व कार्यक्रम लोकांपर्यंत पोचविण्यासाठी वृत्तपत्र माध्यमांची गरज आहे हे ओळखून त्यांनी १९२२ सालीच जळगाव खान्देशहून प्रकाशित होणारे वृत्तपत्र 'आत्मोद्धार' ची मलकापूर आवृत्ती पंढरीनाथ पाटलांच्या संपादकत्वाखाली सुरू केली.

पुढे **'आत्मोद्धार'** वृत्तपत्राच्या बुलडाणा जिल्हा आवृत्तीचे दुय्यम संपादकपदही मिळविले व मलकापूरहून त्याचे प्रकाशनही सुरू केले. त्यातून ते ब्राह्मणेतरांच्या कल्याणाचे विचार मांडू लागले. (९) (विजयी मराठा, पुणे ता. २-११-१९२५)

या ब्राह्मणेतर संपादकाच्या लेखनीमुळे व सभांमधील भाषणामुळे ब्राह्मणेतरांमध्ये जागृती झाली. परिणाम स्वरूप दिनांक ७ जुलै १९२६ रोजी झालेल्या चिखली सॅनिटेशन कमिटीच्या निवडणूकीत ब्राह्मणीपक्षाचा धुव्वा उडवून ब्राह्मणेतर उमेदवार मोठ्या संख्येने निवडून आले. चिखलीची सॅनिटेशन कमिटी ब्राह्मणेतरांच्या ताब्यात आली. हे वृत्तपत्र त्यांनी १९२६ पर्यंत उत्तम रीतीने चालविले. (१२) कर्मवीर, ता. १४-७-१९२६, (१३) मराठा समाचार, अकोला ता. १७-७-१९२६

## पिंपळगावचे भिकमसिंह क्षत्रीय

ब्राह्मणेतरात शिक्षणाचे प्रमाण कमी, त्यामुळे सरकारी नोकऱ्यात त्यांना संधी

कमी. जे अल्पस्वल्प ब्राह्मणेतर सरकारी नोकरीत होते त्यांना ब्राह्मण, कुळकर्णी, अधिकारी छळत होते. बुलडाणा जिल्ह्यात यादव माधव काळे, कानिटकर, गर्दे इत्यादी ब्राह्मण मंडळीचे त्याकाळात बरेच प्रस्थ होते. ब्राह्मणेतरातील पिंपळगाव सराईचे भिकमसिंह क्षत्रीय हे मातब्बर ब्राह्मणेतर असहकार चळवळीत सुरूवातीपासून असल्यामुळे ही चळवळ ब्राह्मणांच्या नेतृत्वात राष्ट्रीय सभेद्वारा (काँग्रेसद्वारा) चालविली जात असे. त्यामुळे साहजिकच भिकमसिंह काँग्रेसमध्ये राहिले. ब्राह्मणेतर चळवळ फक्त सामाजिक चळवळ होती. पण पुढे तिला राजकीय स्वरूप आले. त्यातूनच भिकमसिंहाबद्दल ब्राह्मणेतर 'ब्राह्मणाळलेला' म्हणून संबोधले जाऊ लागले. ब्राह्मणेतर चळवळीतील पंढरीनाथ पाटील, आनंदस्वामी, भटकर इत्यादी पुढाऱ्यांपासून भिकमसिंहाला दूर ठेवण्यात ब्राह्मण पुढाऱ्यांनी काळजी घेतली. त्यांच्या सहीने ब्राह्मणेतरांबद्दल चुकीचा समज पसरविणारे पत्रक काढून त्यांचा वापर ब्राह्मणेतरांविरूद्ध ब्राह्मणेतर झुंजविण्यात करीत असत. याबाबत छत्रपती शाहू महाराजांचा अनुभव नमूद करण्याचा मोह आवरत नाही. कोल्हापूरातील पुतळा डांबर प्रकरणातील हा अनुभव आहे. या प्रकरणी बोध घेऊन राजर्षी छत्रपती शाहू महाराज म्हणतात, "ब्राह्मण एखाद्या माणसाच्या नातेवाईकांना व मित्रांना त्यांच्या विरूद्ध लढण्यास कसा प्रवृत्त करतो याचे हे उदाहरण लक्षात ठेवण्यासारखे आहे. आमच्या तथाकथित मित्रांनी ध्वनित केलेल्या आरोपाबाबत आम्ही यापुढे अर्थातच दक्ष राहण्याची काळजी घेऊ आणि गैरसमज करून घेणे टाळू." (शाहू छत्रपती आणि लोकमान्य - य. दि. फडके पृष्ठ २०४) बुलडाणा जिल्ह्यात भिकमसिंह क्षत्रीय यांच्याबाबत हाच प्रकार घडलेला आहे. म्हणूनच ते ब्राह्मणेतर असूनही ब्राह्मणेतराविरूद्ध लेख लिहून त्यांचे नाव प्रसिद्ध करून त्यांचा वापर ब्राह्मणांनी केला. उमरावतीहून प्रसिद्ध होणाऱ्या उदय पत्रात या. मा. काळे व भिकमसिंहाची मुलाखत व १५० पोलीसांच्या नियुक्ती खर्चाचे प्रकरण (रूपये दोन लक्षची तरतूद) प्रसिद्ध झाले.[१०] (उदय, अमरावती ता. २२ मार्च १९२६)

### भिकमसिंहाबद्दल खंत

भिकमसिंह ब्राह्मणेतर मातब्बर आसामी होती. परंतु त्यांचे योगदान ब्राह्मणेतर चळवळीला लाभले नाही. भिकमसिंहाबद्दल पंढरीनाथ पाटलांच्या मनात आदराची व आपलेपणाची भावना होती, हे पिंपळगाव सराई येथे झालेल्या भंडाऱ्याच्या वेळी तेथे झालेल्या बॅ. कायंदेच्या अध्यक्षतेखाली सभेत अनुभवाला आले. ते सभेत बोलताना

म्हणाले, ''भिकमसिंह ब्राह्मणाळले. पण ते आपल्यासोबत असते तर किती मजा आली असती अशी पुष्टीही त्यांनी सहज जोडली''. म्हणजे भिकमसिंह कर्तबगार होते पण चुकीच्या लोकांबरोबर गेल्याची खंत व्यक्त झाली. (१४) (उदय, अमरावती ता. २८ सप्टेंबर १९२६)

## पंढरीनाथ पाटलांना मानपत्र

जानेवारी १९२८ मध्ये अकोला ब्राह्मणेतर परिषद तुलंगा मुक्कामी श्री. दिनकरराव जवळकरांचे अध्यक्षतेखाली उत्तम रीतीने पार पाडली. या परिषदेसाठी श्री. गोविंदराव शिंदे, माधवराव शितोले, आनंदस्वामी, पंढरीनाथ पाटील, शामराव, सखाराम भवानी निकस, किसन पाटील इत्यादी मंडळी होती. स्वागताध्यक्ष गणपतराव नवलाजी तुलंगेकर यांनी धार्मिक गुलामगिरी लवकर नष्ट करा असा कळकळीचा उपदेश केला तर अध्यक्षांनी आपल्या भाषणात भिक्षुकशाहीचे वाभाडे काढले व तिचे पापी अंत:करण निरनिराळे पुरावे देऊन जनसमुदायास पटवून दिले.

या परिषदेत पंढरीनाथ पाटील यांना मानपत्र देण्यात आले. 'मी अशीच जनसेवा करीन' असे थोडक्यात उत्तराचे भाषण केले. उत्तम व्यवस्थेबद्दल शिवाजी पथक, छत्रपती पथक यांना गोविंदराव शिंदे यांनी ५ रूपये व आनंदस्वामी यांनी प्रत्येकी एक रूपया बक्षिस दिले. जलशासही माधवराव शितोळे व गोविंदराव शिंदे यांनी सुवर्णपदक दिले. (२४) (विजय मराठा, पुणे ता. ९-१-१९२८)

## खामगाव तालुका ब्राह्मणेतर परिषद

१४ जानेवारी १९२८ रोजी खामगाव तालुक्यातील किन्ही (महादेव) येथे बॅरिस्टर अण्णासाहेब कायंदे यांच्या अध्यक्षतेखाली खामगाव तालुका ब्राह्मणेतर परिषद पार पडली या परिषदेसाठी तालुक्यातून ४-५ हजार लोक उपस्थित होते. अध्यक्ष श्री. कायंदे व पंढरीनाथ पाटील यांची प्रदीर्घ भाषणे झाली. दुपारी ४ ते रात्री २ वाजेपर्यंत कामकाज चालले. या परिषदेत निरनिराळे सहा ठराव पास झाले. त्यानंतर श्री. कृष्णराव पाटील, मेसर्स उकंडराव टाले, एल. एस. भटकर, सखाराम भवानी निकस व तुलंगेकर मास्तर यांची भाषणे झाली. (२५) (विजयी मराठा, पुणे ता. २३-१-१९२८)

## रॉयल कमिशनबाबत खलबत

२२ जानेवारी १९२८ रोजी अकोला येथे श्री. किसनसिंग पाटील यांचे

अध्यक्षतेखाली एक सभा झाली. या सभेत अ. भा. सत्यशोधक समाज परिषद, अखिल भारतीय महात्मा फुले शतसांवत्सरिक महोत्सव समिती, अ. भा. ब्राह्मणेतर काँग्रेस, अ. भा. शेतकरी परिषद, अ. भा. क्षत्रीय माळी शिक्षण परिषद, अ. भा. मराठा शिक्षण परिषद वगैरे परिषदांचा विचार करण्यासाठी ब्राह्मणेतर पुढारी सहभागी झाले. यात मोर्शीहून श्री. नानासाहेब अमृतकर वकील, श्री. मोतीरामजी वानखेडे, श्री. पंढरीनाथ पाटील, श्री. बळीरामनाथ, श्री. चंपतराव डबरे इत्यादी प्रमुख व्यक्तींचा समावेश आहे. ब्राह्मणेतर पक्षाचे निश्चित धोरण काय असावे याबाबत या बैठकीत चर्चा झाली.

रॉयल कमिशनबाबत अ. भा. ब्राह्मणेतर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष पानगळचे राजे साहेब, मद्रास प्रांताचे मुख्यमंत्री श्री. राम निमगार एम.ए., यांचे बरोबर बंगाल व वऱ्हाड मध्यप्रांतातील पुढाऱ्यांचे खलबत सुरू झाले होते. त्या अनुषंगाने वरील बैठक झाली. सायमन कमिशनबाबत निश्चित धोरण ठरविण्यासाठी अ. भा. ब्राह्मणेतर काँग्रेस अकोला येथे भरवावी व तिच्या सोबतच उपरिनिर्दिष्ट परिषदा भरवाव्या असे ठराव पास करण्यात आले. श्री. मोतीराम म्हैसने यांचे अध्यक्षतेखाली तात्पुरते कार्यकारी मंडळ स्थापन करण्यात आले. त्याने करोडी येथे फेब्रुवारी १९२८ च्या तिसऱ्या आठवड्यात आपली सभा बोलावून स्वागत मंडळ स्थापन करावे असेही ठरले. सर्व परिषदा यशस्वी करण्यासाठी एक स्वयंसेवक संघ स्थापन करावयाचा असून फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यात अकोला येथे अकोला जिल्हा ब्राह्मणेतर परिषदेचे स्पेशल अधिवेशन महाराष्ट्रातील प्रसिद्ध ब्राह्मणेतर पुढारी श्री. केशवराव गणेश बागडे यांचे अध्यक्षतेखाली भरण्याचे ठरले. (२६) (विजयी मराठा, पुणे ता. ३०-१-१९२८)

## मुंबई इलाखा ब्राह्मणेतर परिषद बैठक तिसरी – कल्याण

महात्मा फुले यांचे दुसरे चरित्र लिहिण्यासाठी पंढरीनाथ पाटील चरित्रसाधने जमविण्यासाठी मुंबई इलाख्यात दौरा करीत होते. १५ जुलै १९२८ रोजी ते कल्याणला पोचले. त्या दिवशी कल्याण येथील तुकाराम सिनेमा थिएटरात मुंबई इलाखा ब्राह्मणेतर परिषदेची तिसरी बैठक झाली. आदल्या दिवशीच तेथे ज्येष्ठ ब्राह्मणेतर पुढाऱ्यांपैकी वर्ध्याचे रा. बहादूर के. श्रीनिवासराव नायडू, यंडे, वसू, नानासाहेब अमृतकर, काळे, डॉ. चव्हाण इत्यादी मंडळी अगोदरच पोचली होती. त्या ठिकाणी पंढरीनाथ पाटील व उकंडराव टाले जाऊन पोचले. या बैठकीचे स्वागताध्यक्ष शंकरराव झुंजारराव तर अध्यक्ष रा. ब. श्रीनिवासराव नायडू होते. याशिवाय महाराष्ट्रातूनही बरीच बडी बडी प्रमुख

मंडळी यावेळी उपस्थित होती. या बैठकीत सायमन कमिशन बरोबर सहकार्य करण्याचा, सारा वाढ, बारडोली, तुकडेबील इत्यादीबाबत सरकारचा निषेध करण्याचा ठराव पास झाला.

## अमरावती-अकोला जिल्हा संयुक्त ब्राह्मणेतर परिषद भटोरी

३० नोव्हेंबर १९२८ रोजी शुक्रवारी मूर्तिजापूर तालुक्यातील भटोरी (हिंगणी) येथे अकोला व अमरावती जिल्हा संयुक्त ब्राह्मणेतर परिषद झाली. या परिषदेचे अध्यक्ष श्री. मोतीराम तुकाराम वानखडे होते. या परिषदेत आनंदस्वामी व पंढरीनाथ पाटील उपस्थित होते. ही परिषद दुपारी ४ ते रात्री १ वाजेपर्यंत चालली. रात्री १२ वाजता पंढरीनाथ पाटलांचे विस्तृत माहितीपूर्ण भाषण झाले. रात्री ते आनंदस्वामीसह बैठकीच्या तंबूतच झोपले. काल ते बळीराम जयराम नावाच्या या नाथ जातीच्या गृहस्थाच्या घरी मुक्कामी राहिले. त्यांनी कधी जातपात पाळली नाही व बडेजावही ठेवला नाही.

## समाजभूषण किताब

दिनांक २५,२६ व २७ डिसेंबर १९२९ या कालावधीत वर्धा येथे प्रांतिक ब्राह्मणेतर परिषद, प्रांतिक सत्यशोधक सामाजिक परिषद व प्रांतिक तरूण ब्राह्मणेतर परिषद या चार संघटनांच्या परिषदा एकाच छताखाली संपन्न झाल्या. रा. ब. नवले डेप्युटी स्पीकर मुंबई कायदे कौन्सिल यांचे अध्यक्षतेखाली सत्यशोधक समाज परिषद, श्री. श्रीपतराव शिंदे यांचे अध्यक्षतेखाली सामाजिक परिषद तसेच तरूण ब्राह्मणेतर परिषदा पार पडल्या.

१९२६ मध्ये चिखली, १९२७ मध्ये सालबर्डी (उमरावती) येथे ब्राह्मणेतर व सत्यशोधक परिषदा झाल्या. या दोनही परिषदेचे जनरल सेक्रेटरी पंढरीनाथ पाटील होते. पंढरीनाथ पाटलांनी वऱ्हाडात बुलडाणा, अकोला व यवतमाळ जिल्ह्यातही लोक जागृतीचे लक्षणीय कार्य केले. त्यांच्या कार्याचे मोल जाणूनच ॲड. तुकाराम जयराम केदार हे ब्राम्हणेतर पक्षात आले. पंढरीनाथ पाटलांच्या कामाची नोंद घेऊन या परिषदेत ॲड. केदारांनी पंढरीनाथ पाटलांचे गौरवपूर्ण अभिनंदन करून त्यांना 'समाजभूषण' हा किताब बहाल करणारा ठराव मांडला. तसेच आपल्या गौरवपर भाषणात केदारांनी त्यांना 'बहुजनांचा शंकराचार्य' या विशेषणाने संबोधले. (१२३) समाजभूषण पंढरीनाथ सीताराम पाटील एम. पी. गौरवग्रंथ ता. ३०-५-१९६८, पृष्ट क्र. २३

### बुलडाणा जिल्हा ब्राह्मणेतर परिषद बैठक चौथी – जस्तगाव

करोडी ता. अकोट जि. अकोला येथील वऱ्हाड प्रांतिक सत्यशोधक परिषद झाल्यावर दिनांक २१ एप्रिल १९२८ रोजी बुलडाणा जिल्हा ब्राह्मणेतर परिषदेची चौथी बैठक बुलडाणा जिल्ह्याच्या जळगाव तालुक्यातील जस्तगाव येथे झाली. या बैठकीत सर्वश्री पंढरीनाथ पाटील, लक्ष्मणराव श्रावणजी भटकर, श्रीपतराव उर्फ गणपतराव पाटील, मच्छिंद्र खेडकर, बॅरिस्टर नारायणराव अजन कायंदे, आनंदस्वामी, जगदेवराव भालेराव, तोताराम महादू पाटील सावळी, तुळशीराम भगवान पाटील पातुर्डा इत्यादी मंडळी उपस्थित होती. यावेळी नवी कार्यकारिणी निवडण्यात आली.

१) अध्यक्ष - बॅ. कायंदे २) उपाध्यक्ष - आनंदस्वामी

३) जनरल सेक्रेटरी - पंढरीनाथ पाटील

४) जॉइंट सेक्रेटरी - श्री. जगदेवराव भालेराव व इतर सर्व सभासद म्हणून निवडले.

या बैठकीत एकूण सात ठराव पास करण्यात आले. पैकी चौथा ठराव हा अत्यंत महत्वाचा आहे. त्यातून ग्रामीण भागावर होणारा अन्याय दूर होईल. तो ठराव असा - 'बुलडाणा येथील म्युनिसीपालिटीचे मतदार कौन्सिलसाठी रूरलमध्ये मते देतात, ती त्यांनी अर्बन मध्ये द्यावीत. अशी सरकारने व्यवस्था करावी अशी ही परिषद सरकारास नम्र विनंती करते.'

### ब्राह्मणांचे शहरात राहून खेडे विभागात मतदान थांबवा

बहुतेक म्युनिसीपालिटीत ब्राह्मणांची सत्ता असे व ते असेंब्ली कौन्सिलच्या निवडणूकीत ग्रामीण भागात मतदान करून ब्राह्मणेतर उमेदवारास विरोधी मतदान करून ग्रामीण भागातूनही ब्राम्हण किंवा ब्राह्मणाळलेला ब्राह्मणेतर निवडून आणण्याच्या कसोशीने प्रत्यन करीत. त्यामुळे ग्रामीण भागातील बहुजन ब्राह्मणेतरांवर अन्याय होत असे. त्यांची ग्रामीण भागावर ही एकप्रकारे कूरघोडीच होती. तिला या ठरावाने पायबंद बसेल. हाच महत्वाचा हेतू या ठरावात आहे. निर्भीडपणे पण सनदशीर मार्गाने आपल्या हक्कांचे रक्षण करण्याचे व त्यातून बहुजन कल्याणाचे कार्य पंढरीनाथ पाटील करीत असत, हे त्यातून स्पष्ट झाले. (१२९) रा. अ. कानेटकर जीवन चरित्र स्मृतीग्रंथ - संपादक, नागेश रामचंद्र कानेटकर पृ. ६७

### अखिल भारतीय ब्राह्मणेतर काँग्रेस पुण्यात भरविण्याची जबाबदारी

चळवळ ही एकट्याने होत नसते. तीत समविचारी व समान ध्येयाचे लोक

असावे लागतात, याची उत्तम जाण पंढरीनाथ पाटलांना होती. त्यांनी बहुजन हिताचे विचार पेरले. त्यातून सर्वांच्या हितासाठी झटणारे अनुयायी निर्माण झाले. ब्राह्मण हेच आपले हितशत्रू आहेत ही भावना बहुजनांच्या मनात रुजली. त्यामुळे स्वतंत्र ब्राह्मणेतर चळवळ उभी राहिली. या चळवळीला राजकीय शक्तीत परिवर्तीत करण्याचे काम पंढरीनाथांनी सुरू केले. त्यासाठी त्यांनी आपल्या जवळच्या सहकाऱ्यांच्या भेटीगाठी घेण्याला प्राधान्य दिले. दिनांक ९ जानेवारी १९३० रोजी सकाळीच त्यांनी तोताराम गणपत पाटील वरखेडकर यांचेसह बुलडाणा जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष श्री. बाबुराव रामचंद्र (रावसाहेब) पाटील यांची भेट घेतली. उमरावती जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष श्री. शंकरराव यशवंतराव पाटील यांची भेट घेतली. चळवळीबद्दल त्यांच्याशी प्रदीर्घ विचारविनिमय केला. नंतर ते रात्री ११ वाजता वध्यार्स पोचले. १० तारखेला विश्रांती घेतली. वर्धा ब्राह्मणेतर परिषदेचा रिपोर्ट लिहिण्याचे काम अद्याप पूर्ण झाले नाही. ते त्यांनी त्या रात्री दिनांक ११ जानेवारी १९३० ला लिहिण्याचे काम केले. १२ तारखेला ते रा. ब. नायडूंकडे गेले. तेथे तुकाराम जयराम केदार वकीलही भेटले. दिवसभर घटनेबाबत त्यांनी चर्चा केली. या सर्वांनी ऑल इंडिया ब्राह्मणेतर काँग्रेस पुणे येथे घडवून आणण्याची जबाबदारी पंढरीनाथ पाटलांवर टाकली. त्यासाठी त्यांनी पुण्याला जावे असेही ठरले.

दुसऱ्या दिवशी रा. ब. नायडूंनी १३ जानेवारी १९३० रोजी श्री. श्रीपतराव शिंदे यांना एक पत्र तसेच मद्रास येथील रामस्वामी मुदलीयार यांना एक पत्र पाठविले. त्यासोबतच मुंबई प्रांतात श्री. नवले, तसेच मुंबई प्रांताचे कायदे कौन्सिलचे शेतकी खात्याचे दिवाण श्री. भास्करराव जाधव यांना, पंढरीनाथ पाटील मुंबई प्रांतात येत असल्याची पत्रे पाठविली. वर्धा ब्राह्मणेतर परिषद रिपोर्ट लिहिण्याचे काम सुरूच होते. सवडीनुसार ते स्वतःच लिहीत असत. १४ जानेवारी १९३० च्या दुपारपर्यंत त्यांनी रिपोर्ट लिहिण्याचे काम केले.

### वर्धा ब्राह्मणेतर परिषदेचे पडसाद 'जस्टीस मध्ये'

डिसेंबर १९२९ अखेर वर्धा येथे पार पडलेल्या ब्राह्मणेतर परिषदेतील नवले यांच्या भाषणाचे पडसाद 'जस्टीस' या इंग्रजी दैनिकाच्या दिनांक १७ जानेवारी १९३० च्या संपादकीयात उमटले. ब्राह्मणेतर बहुजनांनी राष्ट्रीय प्रवाहात येऊन असहकारितेच्या चळवळीत सक्रिय सहभागी व्हावे. त्यासाठी केशवराव जेधे व पंढरीनाथ पाटील

यासारख्या तरूणांनी पुढे येऊन ब्राह्मणेतर युथलिगची स्थापना करावी. आपला मूळ उद्देश मुख्य म्हणजे सामाजिक परिवर्तन हे बहुजनांना पटवून द्यावे. अशा आशयाचे विचार 'जस्टीस'च्या संपादकीयात व्यक्त झाले. हे चित्र पाहून बुलडाणेकरच नव्हे तर संपूर्ण वऱ्हाड-मध्यप्रांत ब्राह्मणेतर चळवळीला पंढरीनाथ पाटलांसारखा शेतकरी कुटुंबातला एक रांगडा अल्पशिक्षित तरूण काळाचे भान ठेवून बहुजन समाजाला काळाबरोबर चालण्याची दिशा देतो, एवढेच नव्हे तर वऱ्हाड मध्यप्रांत व मुंबई राज्यातील उच्च विद्याविभूषित कायदेकानुंदांनाही आपल्याला अनुकूल करून बहुजनांच्या हितासाठी स्वत:चे नेतृत्व फुलवितो याचा सार्थ अभिमान वाटला. (29) (Justice Dt. 17-1-1930)

## अखिल भारतीय ब्राह्मणेतर काँग्रेस पुणे पूर्वतयारी

वर्धा येथे दिनांक १२ जानेवारी १९३० रोजी ठरल्याप्रमाणे पंढरीनाथ पाटील कामाला लागले. ते दिनांक २६ जानेवारी १९३० रोजी पुण्यास पोचले. पुणे जिल्ह्यातील प्रमुख पुढाऱ्यांची सभा त्यांनी त्याच दिवशी सायंकाळी ७ वाजता जेधे मेंशनमध्ये बोलावली. त्या सभेत पुणे येथे मुंबई इलाखा ब्राह्मणेतर परिषद पुणे येथे भरविण्याबाबत विचार विनिमय करण्याचे ठरले. त्या सभेसाठी नवलेंना आठवणीने पंढरीनाथ पाटलांनी येण्यास सांगितले होते. सदर बैठक पुणे जिल्हा बोर्डाचे अध्यक्ष श्री बापुसाहेब काटे यांचे अध्यक्षतेखाली सुरू झाली. तीत पंढरीनाथ पाटलांचे मुख्य भाषण झाले. पुणे येथे ब्राह्मणेतरांची अखिल भारतीय काँग्रेस भरविण्यास पुणेकर मंडळी अनुकूल नव्हती. पण पंढरीनाथ पाटलांच्या प्रभावी भाषणाने ती मंडळी अनुकूल झाली. या बैठकीत मोरे, बागडे, शिंदे, बाबुराव व केशवराव जेधे यांचीही भाषणे झाली. पुण्यात अखिल भारतीय ब्राह्मणेतर काँग्रेस भरण्याचा ठराव पास झाला. त्याच ठिकाणी लगेच मुंबई प्रांतिक परिषदेचे स्वागत मंडळ स्थापन करण्यात आले.

## नामदार भास्करराव जाधवांचे मन वळविले

मुंबई प्रांतिक कौन्सिलचे शेतकी खात्याचे दिवाण भास्करराव जाधव हे अखिल भारतीय ब्राह्मणेतर काँग्रेस भरविण्याच्या विरूद्ध होते. त्यांचे मन वळविण्यासाठी पंढरीनाथ पाटील मुंबईस गेले. ते मुंबईस ३० जानेवारी १९३० ते १ फेब्रुवारी १९३० असे तीन दिवस मुंबईत होते. ३० जानेवारी १९३० रोजी भास्करराव जाधवांच्या घरी पोचले. मुंबईस गेले म्हणजे पंढरीनाथ पाटील भास्करराव जाधवांकडेच उतरत असत. त्याप्रमाणे ते त्यांच्या घरी गेले. ही सर्व मंडळी घरी आल्याचे कळताच भास्करराव जाधव सेक्रेटरीएट

मधून लगेच घरी आले. दिवसभर चळवळीबाबत चर्चा झाली. सायंकाळचे जेवणही जाधवांकडेच झाले. १२ वाजेपर्यंत चर्चा रंगली. पंढरीनाथांच्या तर्कसंगत तळमळीच्या बोलण्यातून भास्करराव जाधव अखिल भारतीय ब्राह्मणेतर भरविण्यास अनुकूल झाले.

## कोल्हापूरचे छत्रपती राजाराम महाराजही अनुकूल

भास्करराव जाधवांचे मन अनुकूल करण्यात यश आल्यामुळे पंढरीनाथांचा उत्साह वाढला. त्यांनी कोल्हापूरचे छत्रपती राजाराम महाराज यांची भेट घेऊन त्यांचेही ब्राह्मणेतर चळवळीत योगदान मिळविण्याचा निश्चय करून त्यांच्याशी संपर्क साधला. दिनांक २ फेब्रुवारी १९३० रविवारी १० वाजता त्यांना भेटण्याची वेळ महाराजांनी दिली. त्यावेळेवर हुकूम केशवराव जेधे पंढरीनाथ पाटलांना सोबत घेऊन, कोल्हापूरचे छत्रपती राजाराम महाराज यांच्या 'शिवतीर्थ पॅलेस' बंगल्यावर गेले. 'शिवतीर्थ पॅलेस' मुंबईत वार्डन रोडवर आहे. बरोबर १० वाजता ते तेथे पोचले. महाराजांनी त्यांची आस्थेने चौकशी करून थांबवून घेतले. चहापान झाले. दुपारी १२ वाजता महाराजांच्या पंगतीलाच त्यांचे जेवण झाले. याचा पंढरीनाथ पाटलांना खूप आनंद झाला. जेवणानंतर लगेच भेटीची बैठक झाली. त्या बैठकीत केशवराव जेधे, पंढरीनाथ पाटील, बॅरिस्टर सावंत व रावसाहेब यशवंतकृष्ण हे दरबारी गृहस्थ उपस्थित होते. छत्रपती राजाराम महाराजांसोबत एक तासभर बोलणे झाले. महाराजांनी अत्यंत प्रेमळ व मोकळ्या मनाने गोष्टी केल्या. जेधे व पाटलांनी विनंती केली की, महाराजांनी ब्राह्मणेतर जनतेच्या हिताची कामे करावी. बहुजन ब्राह्मणेतरांचे पुढारीपण करावे. पुणे येथे ब्राह्मणेतर कॉंग्रेस भरविण्यास मदत करावी. त्यानुसार महाराजांनी अनुकूल कौल दिला. पंढरीनाथ पाटलांचा आनंद द्विगुणित झाला. आत्मविश्वास वाढला. महाराजांच्या इच्छेनुसार त्यांच्याच मुंबईच्या 'शिवतीर्थ पॅलेस' बंगल्यात दिनांक २३ फेब्रुवारी १९३० रोजी अखिल भारतीय ब्राह्मणेतर पुढाऱ्यांची सभा भरविण्याचे ठरले. रात्री ११ वाजता पंढरीनाथ मोठ्या आनंदाने वऱ्हाडाकडे येण्यास निघाले.

पंढरीनाथ पाटील मुंबईहून थेट वर्धा येथे पोचले. रावबहादूर के. श्रीनिवासराव नायडू नागपूरच्या कौन्सिल ऑफ स्टेटच्या निवडणूकीत उभे होते. ते प्रचारार्थ बाहेरगावी गेलेले होते. नेहमीप्रमाणे ते वर्ध्याला श्री. भालेराव यांचेकडे उतरले. दिनांक ९ फेब्रुवारी १९३० रोजी रावबहादूर के. श्रीनिवासराव नायडू Vice Precident All India Non Brahman Congress Commitee यांच्या सहीने त्यांनी दिनांक २३ फेब्रुवारी

१९३० रोजी मुंबईत 'शिवतीर्थ पॅलेस' ला होणाऱ्या अखिल भारतीय ब्राह्मणेतर काँग्रेसच्या कार्यकारी मंडळाच्या सभेच्या नोटीसा तयार केल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजता पंढरीनाथ पाटील, केदार व रावबहादूर नायडू मेलने नागपूरसाठी रवाना झाले.

दिनांक १० फेब्रुवारी १९३० रोजी नागपूरात, नागपूरची तरूण ब्राह्मणेतर संघाची मंडळी त्यांना भेटली. अखिल भारतीय ब्राह्मणेतर काँग्रेस वर्कींग कमिटीच्या दिनांक २३ फेब्रुवारी १९३० रोजी मुंबईत होणाऱ्या सभेच्या निमंत्रण पत्रिका रावबहादूर नायडूंच्या सहीने इंग्रजीत छापून घेतल्या. रात्री साडे अकरा वाजेपर्यंत नायडूंशी गोष्टी झाल्या. नेहमीप्रमाणे मुक्काम केदारांकडे झाला.

### अखिल भारतीय ब्राह्मणेतर पुढाऱ्यांची सभा

नियोजनाप्रमाणे पंढरीनाथ पाटील दिनांक २३ फेब्रुवारी १९३० रोजी मुंबईला पोचले. नेहमीप्रमाणे मुंबई क्राफर्ड (आता म. फुले मार्केट) मार्केटातील एक व्यापारी व सदर मार्केटचे ठेकेदार श्री. रघुनाथराव बहिरट यांचेकडे ते उतरले. दुपारी १२ वाजता मुंबई कायदे कौन्सिलचे शेतकी दिवान नामदार भास्करराव जाधव यांचे घरी मुंबई इलाखा ब्राह्मणेतर पक्ष कार्यकारी मंडळाची सभा झाली. १५० लोक हजर होते. या बैठकीत पंढरीनाथ उपस्थित होते. नंतर दुपारी ३ वाजता कोल्हापूरचे छत्रपती राजाराम महाराज यांचे 'शिवतीर्थ पॅलेस' मध्ये मुंबई, मद्रास, वऱ्हाड व मध्यप्रांत येथील प्रमुख सुमारे ३०० पुढारी असतील. या अखिल भारतीय ब्राह्मणेतर पुढाऱ्यांची सभा झाली. सर्वपक्षीय सभेसाठी प्रतिनिधी निवड व पुण्यास ब्राह्मणेतर काँग्रेस भरावी हे ठराव पास झाले. त्यानंतर या सर्व मंडळीचे पंढरीनाथ पाटलांनी आभार मानले.

'शिवतीर्थ पॅलेस' हॉलमधील सभेच्या अध्यक्षस्थानी मद्रासचे (चेन्नईचे) सुप्रसिद्ध पुढारी सर ए. पी. पेट्रो हे होते. वेगवेगळ्या प्रांतातून आलेल्या पुढाऱ्यांत सर ए. पी. पेट्रो मद्रास, मद्रास कार्पोरेशनचे अध्यक्ष नामदार मि. ए. रामस्वामी मुदलियार व मि. पी. सुब्रह्मण्यम चेट्टी, वऱ्हाड व मध्यप्रांताचे रावबहादूर नायडू, श्री. केदार, बॅरिस्टर व्ही. एन. पाटील, पंढरीनाथ पाटील, कर्नाटकचे रावबहादूर कंबळी, रावबहादूर पाटील व श्री. सरदेसाई, श्री. दळवी वकील, मुंबईचे नामदार भास्करराव जाधव, रावबहादूर बोले, ॲड. सुर्वे, रावसाहेब डॉ. चव्हाण, रावसाहेब वंडेकर, मे. आसवले, बाळासाहेब कदम, गोविंदराव शिंदे, कालेकर, राणे, भालेकर, ना. पो. बनकर, रिंढे, दौंडकर वकील,

थोरात, बहिरट, कंबळी, र. दे. बनकर, मानसिंगराव जगताप, लक्ष्मणराव सपकाळ, मारूतीराव बोराडे, डॉ. वडगावकर, पुण्याचे मेसर्स बाबुराव जेधे, केशवराव जेधे, बागडे वकील, श्रीपतराव शिंदे, काळभोर, मोरे वकील, नगरचे सरदार थोरात व श्री. नवले, सोलापूरचे श्री. मोरे वकील, नाशिकचे मेसर्स शिंदे वकील व वाघ, खानदेशचे श्री. चौधरी, रत्नागिरीचे कॅ. डफळे व धामनसकर, कुलाब्याचे मेसर्स पाटील, ना. ना. पाटील व शिंदे, ठाण्याचे मेसर्स शंकरराव झुंजारराव राऊत, सावंत, बांदल, गोडे, सातार्‍याचे रा. ब. अचरेकर वकील, नलवडे वकील, शिंदे वकील, भाऊराव पाटील व बाबूराव यादव शासने मास्तर वगैरे मंडळी प्रामुख्याने उपस्थित होती.

आरंभीच अध्यक्षांचे भाषण झाले. त्यात त्यांनी तत्कालीन राजकीय परिस्थितीचा विचार मांडला. डोमोनियन स्टेटस्‌ची आवश्यकता व त्यासाठी सनदशीर रीतीने चळवळीची जरूरी, व्हाईसरॉय साहेबांच्या जाहीरनाम्यातील उदार धोरण, राऊंडटेबल कॉन्फरन्सपुढे एकमुखी मागणी करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. त्यानंतर ब्राह्मणेतर चळवळ हीच बहुजनसमाजाची व राष्ट्रीय चळवळ आहे असे प्रतिपादन करून ती जातिनिष्ठ नसून तिची द्वेषाच्या पायावर उभारणी नाही हे सप्रमाण पटवून दिले.

प्रांतिक स्वायत्ता, राखीव जागात वाढ व सोलापूर, कुलाबा व खानदेश येथे एक एक राखीव जागेची मागणी, कर्नाटक वेगळा करणे, भाषावार प्रांतरचना, वयातील सर्व स्त्री-पुरूषास मतदानाचा हक्क असणे, लोकसंख्येच्या प्रमाणात कौन्सिलात सभासद असणे व अस्पृश्य आणि मुसलमान यांचे स्वतंत्र मतदार संघ असणे वगैरे मागण्या करण्यात याव्यात असा ठराव बहुमताने पास झाला. तसेच दिल्ली येथे होणार्‍या सर्वपक्षीय सभेसाठी सर ए. पी. पेंट्रो (मद्रास) ना. मि. रामस्वामी मुदलियार, मेसर्स व्ही. पी. राजन, दिवानबहादूर बी. मनुस्वामी नायडू, व्यंकटगिरीचे कुमार राजे (मद्रास) रावबहादूर कंबळी, श्री. खासेसाहेब पवार, मेसर्स नवले, बागडे, ॲड. सुर्वे, श्री. असवले, रावबहादूर बी. एल. पाटील, रावबहादूर अचरेकर (मुंबई) रावबहादूर नायडू व बॅ. व्ही. एन. पाटील (मध्यप्रांत) यांना दिल्लीस सर्वपक्षीय सभेस प्रतिनिधी म्हणून पाठविण्याचे ठरले. काही आठदहा तरूणांनी मवाळांच्या सभेप्रमाणे ही सभा उधळून लावण्याचा प्रयत्न केला पण तेथे त्यांना शेरास सव्वाशेर भेटल्याने निरूपाय होऊन क्रांतिकारक आरोळ्या (बोंब) मारीत निघून गेले. (३०) नवयुग, मुंबई दि. २-३-१९३०

### बृहन्महाराष्ट्र ब्राह्मणेतर संघ

पूर्वनिश्चित कार्यक्रमानुसार रविवार दिनांक २९ जून १९३० रोजी वर्धा येथे वऱ्हाड मध्यप्रांत ब्राह्मणेतर काँग्रेस कमिटीच्या कार्यकारी मंडळाची सभा झाली. या सभेच्या अध्यक्षस्थानी रा. ब. नायडू होते. ही सभा श्री. केदार यांचे बंगल्यात झाली. या सभेला पंढरीनाथ पाटील उपस्थित होते. या सभेत कार्यकारिणीचे ४० व इतर ६० असे एकूण शंभर लोक उपस्थित होते. या सभेत १) बृहन्महाराष्ट्र ब्राह्मणेतर संघ काढावा असे ठरले. २) त्या संघावर पंढरीनाथ पाटलांना सदस्य म्हणून निवडले. ३) बृहन्महाराष्ट्र ब्राह्मणेतर संघास मुंबई प्रांतिक ब्राह्मणेतर काँग्रेस कमिटीने मान्यता द्यावी, अशी विनंती करणारा ठराव पास झाला. ४) वर्धा जिल्हा सारावाढ प्रतिबंधक कमिटी निवडण्यात आली.

### हरिजन उद्धारक चळवळ सभा

दिनांक १३ डिसेंबर १९३३ रोजी वर्धा येथे टिळक भवनात हरिजनोद्धारक चळवळीची सभा झाली. या सभेत पुण्याचे ब्राह्मणेतर पुढारी, श्री. जेधे व बुलडाण्याचे श्री. पंढरीनाथ पाटील यांची भाषणे झाली. उभय वक्त्यांनी विशेषत: पंढरीनाथ पाटलांनी लोकनायक बापूजी अणे, तात्यासाहेब केळकर, वीर वामनराव जोशी, डॉ. मुंजे इत्यादी मंडळीवर व स्थानिक (वर्ध्याचे) श्री. मनोहरपंत देशपांडे यांच्यावर व त्यांच्या सहकाऱ्यांवर चांगलेच तोंडसुख घेतले. ते म्हणाले हे सर्व सनातनी वृत्तीचे ब्राह्मण असून त्यांचे वर्चस्व कायम राहण्यसाठी ते हरिजनोद्धारक चळवळीस विरोध करतात. विशेषत: मनोहरराव देशपांडे आणि कंपनी संबंधी त्यांचा रोष होता की, देशपांडे यांनी स्थानिक सनातन्यांना मिळून 'वर्णाश्रम स्वराज्य संघ' स्थापन करविला. म्हणून ते या चळवळीस विरोधक आहेत. वर्धा जिल्ह्यात देशभक्त जमनालालजी बजाज व रा. ब. नायडू हेच खरे हरिजनोद्धारक आहेत. (३३) महाराष्ट्र, दि.२०-१२-१९३३

### अमरावती जिल्हा ब्राह्मणेतर परिषद एलिचपूर

वर्ध्याच्या हरिजन उद्धारक चळवळ बैठकीनंतर समाजभूषण पंढरीनाथ पाटील यांनी जिल्हा कौन्सिल कामकाजात लक्ष केंद्रित केले. जवळजवळ दीडदोन वर्षे त्यांनी हे काम केले. या काळात अनेक लोकोपयोगी कामे तर केलीच परंतु त्यांच्या पूर्व कौन्सिलमधील भ्रष्टाचारही निपटून काढला. त्यानंतर ते पुन्हा विविध चळवळीत सक्रीय

झाले. २४ फेब्रुवारी १९३५ रोजी एलिचपूर येथे त्यांच्या अध्यक्षतेखाली उमरावती जिल्हा ब्राह्मणेतर परिषद झाली. या परिषदेचे उपाध्यक्ष श्री. कोल्हेकर पाटील हे होते. यावेळी अमृतकर वकील, बॅ. बागवे, श्री. गुलाबराव पाटील नायगावकर, श्री. भाऊसाहेब गुंड, दादासाहेब कळाशीकर, श्री. पी. के. देशमुख वकील, श्री. दादासाहेब वाटाणे, श्री. मोतीरामजी वानखेडे, श्री. कदम इत्यादी प्रमुख पुढारी व बऱ्याचशा ब्राह्मणेतर भगिनीही यावेळी उपस्थित होत्या. या परिषदेत एकूण आठ ठराव पास झाले. यावेळी देशपातळीवर इंडिया बिलावर चर्चा सुरू होती. अध्यक्ष पंढरीनाथ पाटलांनी जो पहिलाच ठराव मांडला तो या बिलासंदर्भात होता. (३७) साप्ताहिक विदर्भ, दि. २७-२-१९३५

## प्रांतिक ब्राह्मणेतर परिषदचे आठवे अधिवेशन उमरावती

समाजभूषण पंढरीनाथ पाटलांचे एक वैशिष्ट्य मोठे मनोवेधक व अनुकरणीय आहे. केलेल्या कामाचा आढावा घेणे. यापूर्वी वर्धा येथे झालेल्या सत्यशोधक व ब्राह्मणेतर परिषदांचे रिपोर्ट त्यांनी गंभीरतापूर्वक चिंतन, मनन करून दीर्घकाळपर्यंत लिहिण्याचे काम केले. १९३४ साली ते जिल्हा कौन्सिल अध्यक्ष झाले. १९३४-३५ साली केलेल्या कामाचा रिपोर्ट त्यांनी लगेच २ मार्च ते ४ मार्च १९३६ या काळात लिहून काढला. त्यानंतर ते पुन: चळवळीकडे वळले.

रविवार दिनांक १५ मार्च १९३६ रोजी यवतमाळ येथे प्रांतिक ब्राह्मणेतर पक्षाच्या कार्यकारी मंडळाची सभा झाली. या सभेला उपस्थित राहून तीत सहभाग घेतला. तसेच दिनांक १६ मे १९३६ रोजी उमरावती येथे प्रांतिक ब्राह्मणेतर पक्षाच्या कार्यकारी मंडळाची सभा झाली व १७ मे १९३६ रोजी उमरावतीच्या सुदर्शन थिएटरात प्रांतिक ब्राह्मणेतर परिषदेचे ८ वे अधिवेशन झाले. त्यातही ते सक्रीय सहभागी झाले. या अधिवेशनाचे अध्यक्षस्थानी श्री. केशवराव जेधे एम.एल.ए. पुणे हे होते.

दिनांक १८ मे १९३६ रोजी तेथेच प्रांतिक ब्राह्मणेतर परिषद भरली. या परिषदेत काही महत्वाचे ठराव समाजभूषण पंढरीनाथ पाटलांनी मांडले. त्यावर प्रदीर्घ चर्चा झाली. तसेच दिनांक २२ मे १९३६ रोजी शुक्रवारी चिखलदरा (अमरावती) येथे वऱ्हाड जॉईंट बोर्डाची बैठक झाली. तिला ते उपस्थित होते.

## बुलडाणेकर नोकरशाहीचा निषेध

त्या काळात बहुजन समाजात शिक्षितांचे प्रमाण अत्यल्प होते. शिक्षित

ब्राह्मणांचा भरणा सरकारी नोकऱ्यात मोठ्या प्रमाणात होता. गावपातळीवर कुळकर्णी ब्राह्मणच असे. तालुका व जिल्हा पातळीवरील सरकारी कार्यालयात उच्च पदस्थ अधिकारी व कारकून ब्राह्मणच होते. ते ब्राह्मणेतरांच्या कामात खोडा घालून त्यांची पिळवणूक करीत. बुलडाणा जिल्हा त्याला अपवाद नव्हता. उलट ब्राह्मणेतर चळवळीचा जोर बुलडाणा जिल्ह्यात जास्त होता. तरीही ब्राह्मण नोकरशहा ब्राह्मणेतरांना छळत असत. त्याबाबतच्या तक्रारी समाजभूषण पंढरीनाथ पाटील उपाख्य नानासाहेबांच्या कानावर लोक घालत असत. त्याची नोंद घेऊन त्यांनी या प्रश्नाला वाचा फोडली. १३ सप्टेंबर १९३६ रोजी नागपूरला रावबहादूर नायडूंच्या बंगल्यात प्रांतिक ब्राह्मणेतर कार्यकारी मंडळाची सभा झाली. त्या सभेत नाना साहेबांनी बुलडाणेकर नोकरशहांकडून होणारा छळ प्रतिपादन केला. तेव्हा या सभेने बुलडाणेकर ब्राह्मण नोकरशाहीचा निषेध केला.

**भगवा झेंडा चित्रपटाचा निषेध**

ही गोष्ट १९४० सालातील आहे. त्यावेळी शिक्षणाचा फारसा गंधही बहुजन समाजाला नव्हता. निरक्षरतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे वाचनही कोणी जास्त करीत नव्हते. पंचांगानुसार तिथी, वार गावब्राह्मण 'कोरन' मागून घरोघर जाऊन सांगत असे. देवदेवतांच्या व वीर पुरूषांच्या भाकडकथा लिहून पोथी पुराणाच्या माध्यमातून लोकांच्या कानी कपाळी घालत. त्यातून समाजाचे सांस्कृतिकीकरण करीत असत. याच प्रकारे पौराणिक व ऐतिहासिक ग्रंथ ब्राह्मणांनी लिहिलेले असत. कोरन मागणाऱ्या ब्राह्मणापासून तर वृत्तपत्रे, ग्रंथ पारायणे, सत्यनारायण पूजा व पुढे सिनेमा सारखी मुकी व बोलती साधने व आता दृकश्राव्य प्रसार प्रचार माध्यमे ही सारी ब्राह्मणांच्याच वर्चस्वाखाली होती व आहेत. १९४० साली मुद्रित वृत्तपत्रे बहुतेक सारी ब्राह्मणांनीच काढलेली असत. समाजप्रबोधनाची ही सारी साधने त्यांच्याच अखत्यारित होती. रयत अक्षरशत्रू असल्यामुळे ब्राह्मण बोलतील व लिहितील ती पूर्व दिशा असे. ते प्रत्यक्ष भूदेवच होते. इंग्रजी राजकीय सत्ता व ब्राह्मणी मानसिक व बौद्धिक गुलामगिरीत रयत जीवन जगत होती. या परिस्थितीचा पुरेपूर फायदा घेऊन ब्राह्मणी श्रेष्ठत्व जोपासण्याचा ते सतत प्रयत्न करीत आले आहेत. त्याला पायबंद घालण्यासाठी व ब्राह्मणेतरांना ब्राह्मणांच्या धार्मिक-मानसिक गुलामीतून मुक्त करण्यासाठीच ब्राह्मणेतर चळवळ उदयास आली. १९४० साली ब्राह्मणेतरांच्या अभ्यासू व चिकित्सक दृष्टीला एक गोष्ट खटकली.

त्यावेळी 'भगवा झेंडा' हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. त्यात मराठ्यांचा भगवा ध्वज हा रामदासांनी शिवरायांना देऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना करण्यास मंत्र सामर्थ्याने सैन्यदल स्थापिले असे दाखविले. त्याचा अर्थ छत्रपती शिवाजी महाराजांची नीती, दृष्टी, धोरण, सामर्थ्य श्रेष्ठ नाही हे दाखविण्याचा प्रयत्न त्या चित्रपटातून झाला. हे सर्व कपोलकल्पित, असत्य आहे. खोट्या इतिहासाचे दृढीकरण आहे. म्हणून त्या चित्रपटाचा निषेध करण्यासाठी नागपूर येथील व्यंकटेश थिएटरात दिनांक २५ जानेवारी १९४० रोजी डॉ. पंजाबराव देशमुख एम.ए.,पीएच.डी., अमरावती, यांचे अध्यक्षतेखाली सभा झाली. या सभेत सरदार अहिलोजीराव अहिरराव, श्री. आबासाहेब गुजर, नारायणराव पाटील यवतमाळ, पंढरीनाथ पाटील बुलडाणा इत्यादी मान्यवरांची निषेधपर भाषणे झाली. निषेधाचा ठराव नागपूरचे इतिहास संशोधक समितीचे सदस्य व जनता वृत्तपत्राचे संपादक यांनी मांडला. (संपादक गोविंदराव प्रधान वकील, यादवराव शिर्के व बाबुराव घोरमारे) रावबहादूर या. गो. शिर्के वकील, रावसाहेब झाडे, रावसाहेब डोंगरे, रावसाहेब बाबुराव सोळंकी पाटील, रावसाहेब समाजभूषण पंढरीनाथ पाटील, श्री. एन. एम. बोंडे बी.ए., यांनी ठरावास पाठिंबा देणारी भाषणे केली. [३८]

मातृभूमी, अकोला दि. ७-५-१९४०

त्यानंतर दिनांक २७ जानेवारी १९४० रोजी म्युनिसिपल हिंदी हायस्कूलच्या हॉलमध्ये 'भगवा झेंडा' विरोधी सभा घेण्यात आली. त्या सभेत राजकमल टॉकीजमध्ये बोलपट सुरू झाल्यास निदर्शने कशी करावी, याचा तपशील ठरविण्यात आला. या सभेच्या अध्यक्षस्थानी जागतिक कृषक क्रांतीचा विधाता, लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख हे होते. अमरावतीच्या राजकमल सिनेमा थिएटरात एप्रिल महिन्यात हा सिनेमा लागला असता वरील असत्य घटना पाहून तत्कालीन तरूण सत्यशोधक श्री. उत्तमराव मोहिते यांनी सिनेमाचा पडदा फाडला. यानंतर ४ दिवसांनी नेहरू मैदानावर सभा होऊन मोहित्यांच्या गौरवपर भाषणे झाली. त्या सभेत भाऊसाहेबांनी त्यांना 'वीर' पदवी देऊन गौरविले. डॉ. पंजाबरव देशमुखांनी मोहित्यांना पूर्ण संरक्षण दिले. मोहित्यांवर भरलेला खटला पंजाबरावांनी सर्वसामर्थ्यानिशी लढवून मोहित्यांची मुक्तता केली. पुढे त्यांना 'वीर' उत्तमराव मोहिते म्हणून ओळखले जाऊ लागले.

*

# भाग - ६

# शेतकरी चळवळ

## शेतकऱ्यांचा कैवारी

शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाचा अनुभव त्यांनी घेतलेला असल्यामुळे शेतकरी कर्जमुक्त करण्याकरिता व शेती उत्पन्न वाढविण्याकरिता, त्यातून देश संपन्न करण्याकरीता सोयीसवलती, आधुनिक अवजारे, संकरित बी-बीयाणे, कीटकनाशके, बुरशीनाशके, पाण्याचे पाट, विहीरी खोदण्यासाठी आर्थिक सहाय्य, इत्यादी बाबींचाही त्यांनी विचार करून त्यासाठी शेतकरी चळवळ सुरू केली. १९२१ सालीच देऊळघाटचे मल्हारराव देशमुख, नवाब साहेब, रामराव पाटील, साखळीचे रावसाहेब सखाराम अप्पा या मंडळींनी पंढरीनाथांना सक्रिय सहकार्य केले. या चळवळीला त्या काळात शेतकऱ्यांचे बंड म्हणून संबोधले गेले होते.

बुलडाणा जिल्हा, विदर्भात-वऱ्हाड मध्यप्रांतात पंढरीनाथ व त्यांचे सहकारी १९२३ च्या जिल्हा कौन्सिल निवडणूकीची तयारी करीत होते. ब्राह्मण पुढाऱ्यांच्या सभा उधळून त्यांना नामोहरम करत होते. तर तिकडे पुण्यात छत्रपतींच्या मेळ्यांनी ब्राह्मणांना सळो की पळो करून सोडले होते. गणेश उत्सवाच्या कार्यक्रमात जेधे व जवळकरांनी छत्रपती मेळे सर्वत्र कार्यरत केले. त्यांचे पालुपद होते,

**आला छत्रपती मेळा । पळा भटांनो पळा ।**

(१३५) (महाराष्ट्र हिंदु महासभेच्या कार्याचा इतिहास, पृष्ट क्र. ३९)

१९२३ च्या जिल्हा निवडणुकीचे वातावरण अनुकूल करण्यासाठी खेड्यापाड्यातून शेतकरी मेळावेही पंढरीनाथ पाटलांनी आयोजित केले. सावकारी पाशात अडकलेल्या शेतकऱ्याला मुक्त करण्यासाठी त्यांच्यात जागृती निर्माण करणे आवश्यक होते. शेतकरी वर्ग कर्जाच्या व्याजाने पिचून गेला होता. जेवढे शेतात पिकेल तेवढे सावकार खळ्यावरूनच कर्ज वसुलीत घेऊन जात असत. अशा संकटसमयी पंढरीनाथ पाटलांसारखा निधड्या छातीचा तरुण पुढे आला. सावकाराचे कडक व्याज व खंड विरोधी आंदोलन पंढरीनाथ पाटलांनी गोवागाव छेडले. गावोगाव कुळांचे मेळावे

घेऊन पंढरीनाथ पाटील व आनंदस्वामी यांनी शेतकऱ्यांत जागृती निर्माण केली. त्यांच्या जोडीला बजाबा गायकवाड विंचूरकरांचा जलसा असायचा. या आंदोलनामुळे सेठसावकार कोर्टात गेले. खामगावच्या कोर्टाचे फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेट श्री. बॅनर्जी आय.सी.एस. यांनी बंदी हुकूम जारी केला. कलम १२४ नुसार आंदोलकांच्या पुढाऱ्यांवर नोटीसा बजावल्या. त्यानंतर पुढे कुळांचे पुढारी श्री. पंढरीनाथ पाटील व आनंदस्वामी यांचेसह जमीनदारांचे प्रतिनिधी यांच्यात समेट घडवून आणला. व्याजाचे दर व खंडाची रक्कम कमी करण्यात आली. या आंदोलनातून शेतकुळे व शेतकरी यांच्या असंतोषाला सरकारला तोंड देणे वऱ्हाडप्रांतात जड झाले असते. म्हणूनच साम्राज्यवादी इंग्रज सरकारने हे आंदोलन दडपून टाकले. (११७) (पंढरीनाथ सीताराम पाटील यांचे जीवनदर्शन - हि. ए. चव्हाण पृष्ट क्र. १७)

## मेंढळी येथील जंगी शेतकरी सभा

चिखली तालुक्यानंतर पंढरीनाथ पाटलांनी शेतकरी चळवळीचे लोण घाटाखाली सुध्दा नेले. दिनांक १२ डिसेंबर १९२४ रोजी मलकापूर तालुक्यातील मेंढळी येथे जिल्ह्यातील शेतकऱ्यांची जंगी सभा श्री. जगदेवराव भालेराव यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी या सभेसाठी जिल्हाभरातून दोन हजारावर शेतकरी उपस्थित होते. या सभेत सर्वश्री व्यास, आणेकर, ओझरकर, भिकमसिंग, आनंदस्वामी, लोटूजीबुवा, पंढरीनाथ पाटील आंबोडेकर यांची प्रेरणादायक मार्गदर्शनपर भाषणे झाली. या सभेत खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आले. १. सारावाढीबाबत एक महिन्याची मुदत अपुरी असून ती सहा महिन्याची तरी मिळावी. २. सरकारी रिपोर्टात म्हटल्याप्रमाणे शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारली नसून उलट खालावली आहे, म्हणून शेतसारा वाढीला मुळीच जागा नाही. (५) मराठा समाचार, दि. १८-१२-१९२४

पंढरीनाथ पाटलांनी बुलडाणा जिल्ह्यात शेतकरी चळवळ सुरू केल्यानंतर त्यांचे नाव सर्वदूर पसरले. पुणे येथे २३ जुलै १९२८ रोजी झालेल्या शेतकरी परिषदेच्या स्वागत कमिटीची सभा होती. त्या सभेतही बुलडाणा जिल्ह्याच्या वतीने उपस्थित शेतकरी परिषदेला (जी - शेतकरी परिषदेचे कोणीच पुढारी न आल्यामुळे ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनी भरविली.) उपस्थित राहून त्याठिकाणी शेतकऱ्यांसमोर एक तास शेतकऱ्यांच्या विविध अडचणी व त्यावर मात करणारे उपाय याबाबत व्याख्यान दिले. या परिषदेत आठ ठराव पास झाले. सदर परिषदेचे अध्यक्षपद श्री. जयरामजी बनसोडे यांनी भूषविले.

**कापसाचा भाव सकाळीच जाहीर होऊ लागला**

पूर्वी खामगाव कापूस बाजार पेठेत सकाळी कापूसगाड्यांची मोजणी होत असे व भावमात्र दुपारी दोननंतर जाहीर होत असे. हा एकप्रकारे शेतकऱ्यावर फार मोठा अन्याय होता. अडाणी शेतकऱ्यांचा माल आधी मोजून घ्यायचा व नंतर त्याला भाव सांगायचा. यासारखी शेतकऱ्यांची लुबाडणूक जगाच्या पाठीवर इतरत्र कोठेही पहायला मिळणार नाही. अशा प्रकारची शेतकऱ्याची लूट होऊन त्यांचे फार मोठे नुकसान व्हायचे. ही बाब पंढरीनाथ पाटील स्वत:च गाडी घेऊन खामगाव पेठेत गेले तेव्हा त्यांना अनुभवाला आली. म्हणून त्यांनी १९२५ साली तीन हजार सह्यांचा एक अर्ज बुलडाण्याचे डेप्युटी कमिशनर यांना पाठवून त्यात वरील बाबींचा निषेध करून भाव सकाळीच जाहीर व्हावा अशी मागणी केली होती. तिचा परिणाम होऊन २० जानेवारी १९३० साली पंढरीनाथ पाटील स्वत: कापूस गाडी घेऊन पेठेवर गेले असता त्या दिवशी त्यांना कापसाचा भाव सकाळी ९ वाजताच सूचना फलकावर लिहिलेला आढळला. त्या दिवशी बाजारात दीडहजार कापूस गाड्या आलेल्या होत्या. १९२५ च्या अर्जावर विचार होऊन सरकारने सकाळी पाटीवर मराठीत खामगाव कापूस बाजारात कापसाचा भाव लिहिण्याची व्यवस्था केलेली होती. ही व्यवस्था पाहून पंढरीनाथ पाटलांना फारच आनंद झाला.

१९३१ च्या निवडणूकी तोंडाशी आल्या होत्या. तशा बुलडाणा जिल्ह्यातील जिल्हा कौन्सिलला उभे राहू इच्छिणाऱ्यांच्या प्रचारदौऱ्याच्या पत्रिका प्रसिद्ध होऊ लागल्या. चिखली मेहकर तालुक्यात ब्राह्मण, मारवाडी व सावजींचे सावकारी जाळे कातिणीच्या जाळ्याप्रमाणे विणलेले होते. सर्व शेतकरी त्या जाळ्यात अडकून अगतिक झाले होते. त्यामुळे या भागात अद्याप पेशवाईच आहे असे चित्र दिसत होते. शेकडा १० शेतकऱ्यांजवळ जमीन राहिली नव्हती. ह्या शेतकऱ्यांची जमीन सावकारांनी गिळली होती. ही बाब मध्यप्रांत कायदे कौन्सिलचे शिक्षण खात्याचे मंत्री नामदार पंजाबराव देशमुख हे दिनांक ५ फेब्रुवारी १९३१ ला बुलडाणा येथे आले असता जिल्ह्यातील प्रमुख मंडळींनी दिनांक ६ फेब्रुवारी रोजी त्यांच्या कानी घातली. यामध्ये प्रमुख पुढारी मंडळीत श्री. अण्णासाहेब कोर्डे, श्री. अण्णासाहेब कायंदे, श्री. रावसाहेब बाबुराव रामजी पाटील, श्री. पंढरीनाथ पाटील, श्री. लक्ष्मणराव भटकर, श्री. सखाराम भवानी निकस, श्री. कृष्णराव रामजी पाटील, श्री. नरसिंगराव देशमुख इत्यादींचा समावेश होता. ही सर्व मंडळी पंजाबरावांना भेटून, सावकारी जुलूम व शेतकऱ्यांचे हाल याबाबत,

त्यांनी पंजाबराव देशमुखांना माहिती दिली. तसेच अधिकाऱ्यांचे धोरण व भिक्षूक शाहींचे कुटील कारस्थानही त्यांनी डॉ. पंजाबराव देशमुखांना कथन केले.(३१)
(राष्ट्रवीर, बेळगाव ता. २४-२-१९३१)

## लवाद बोर्ड लॅन्ड मॉर्टगेज बँक

२४ फेब्रुवारी १९३५ रोजी उमरावती जिल्हा ब्राह्मणेतर परिषद अचलपूर येथे पंढरीनाथ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या परिषदेत एकूण ९ ठराव पास झाले. यातील पहिला ठराव या परिषदेचे अध्यक्ष पंढरीनाथ पाटील यांनी मांडला. त्यात 'जॉइंट पार्टी कमिटीचा रिपोर्ट असमाधानकारक असून जस्टीस पार्टीने केलेल्या किमान मागण्या जर इंडिया बीलात समाविष्ट केल्या तरच ते बील थोडेतरी समाधानकारक होईल. असे सभेचे मत आहे.' असे नमूद केले आहे. इतर ठरावात जिल्ह्यात सर्वत्र कर्ज लवाद बोर्ड व लँड मॉर्टगेज बँका उघडाव्यात व त्यातून जास्तीत जास्त सभासद ब्राह्मणेतर असावेत, यावर्षी नापिकी झाल्यामुळे सरकारने मागील वर्षीचा शेतसारा व तकावी कर्ज माफ करावे, पुढील वर्षासाठी तकावी द्यावी. जेधे, पंढरीनाथ पाटील, नानासाहेब बागवे, नानासाहेब अमृतकर, ही ब्राह्मणेतर पक्षाची कट्टर मंडळी निवडून आल्याबद्दल त्यांचे अभिनंदन, कोणत्याही निवडणूकीत ब्राह्मणेतर उमेदवारालाच मतदान करणे, अस्पृश्यता निवारण कार्य हाती घेणे, जिल्हा कौन्सिलच्या शाळांमध्ये जोतीराव फुल्यांचा फोटो लावणे / पुतळा उभारणे, चौथीच्या कॉमन परीक्षा सुरू ठेवण्याची विनंती आणि मुलांप्रमाणेच मुलींनाही सक्तीचे शिक्षण कायद्याने मिळावे अशा मागण्या शेवटचा नववा ठराव सुभद्राबाई कांबळे यांनी मांडला व त्यास अनुमोदन प्रभावतीबाई खांडे यांनी दिले हे विशेष. (३७) (साप्ताहिक विदर्भ ता. २७-२-१९३५)

## पहिले लवाद कोर्ट स्थापन

त्यानंतर शनिवार दि. १९ जानेवारी १९३६ रोजी मलकापूर तालुक्यातील देवधाबा येथे तालुका शेतकरी परिषद झाली. त्यावेळी परिषदेचे अध्यक्ष दादा वाटाणे व पंढरीनाथ पाटील यांना त्यांच्या कार्याचा गौरव करून मानपत्र देण्यात आले. त्यानंतर ७ एप्रिल ते ३० एप्रिल १९३६ या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजनातून जळगाव तालुक्यातील पळसखेड, जामोद, लाडणापूर, टुणकी, बावनबीर, पिंपळगाव काळे, चिखली तालुक्यातील धाड, देऊळघाट, देऊळगाव मही, जांभोरा, देऊळगाव धनगर, किन्होळा, मेहकर तालुक्यातील किनगाव राजा, सावत्रा इत्यादी गावी व्याख्याने

झाली. याच काळात शिवजयंतीचे कार्यक्रमही झाले. सर्वत्र शेतकरी जागरण होऊन १ मे १९३६ रोजी चिखली येथे पहिले लवादकोर्ट स्थापन होऊन पंढरीनाथ पाटील त्याचे सदस्य झाले. या कोर्टाचे कामात पंढरीनाथ पाटलांनी १२ मे १९३६ पर्यंत काम केले.

दिनांक २५, २६ मे व १ जून तसेच २९ ऑगष्ट १९३६ रोजी चिखली लवाद कोर्टात पंढरीनाथ पाटलांनी शेतकरी हिताचे काम केले. २९ ऑगष्ट व ८ आक्टोबर १९३६ रोजी त्यांनी लवाद कोर्टाचे चेअरमन पदही भूषविले. तसेच १० डिसेंबर १९३६ रोजी मलकापूर येथे डी.सी. व डेप्युटी डायरेक्टर शेतकी खाते यांच्या उपस्थितीत उत्तम गौळाऊ गायींच्या पैदासीसाठी शेतकऱ्यांना दहा सांड वाटले. यावेळी दीड हजारावर लोक उपस्थित होते. त्यांच्यासमोर पंढरीनाथ पाटलांनी शेतीसुधारणेच्या संदर्भात व शेतकरी सुखी कसा होईल याबाबत उत्तम प्रबोधक भाषण केले.

**भव्य कृषिप्रदर्शन आयोजन**

१९३७ साली पंढरीनाथ पाटील मध्यप्रांत कायदेमंडळात एम.एल.ए. झाले. शेती व शेतकरी हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय. जिल्हा कौन्सिल अध्यक्ष व एम.एल.ए. असताना त्यांनी जिल्हा कौन्सिलमध्ये व असेंब्लीमध्ये शेतकऱ्यांच्या हिताच्या जपणूकीसाठी व त्यांच्या कल्याणासाठी कायदे व नियम करण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांना विकासाची दृष्टी मिळावी, स्वत्वाची जाणीव व्हावी म्हणून शेती उत्पन्न वाढविण्याकरिता व शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारावी म्हणून त्यांनी प्रसंगानुरूप कृषिप्रदर्शनांचे आयोजन केले. २२ फेब्रुवारी १९३७ रोजी चिखली येथे असेच एक भव्य कृषि प्रदर्शन आयोजित केले. अशा प्रकारचे भव्य कृषिप्रदर्शन हे जिल्ह्यातील चौथे प्रदर्शन होते. शेतकऱ्यांना शेतीविषयी नवीन माहिती व तंत्र अवगत करण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असत. कृषिकार्यक्रमांचे आयोजनातही त्यांचा हाच हेतू होता. शेतकऱ्यांचे आर्थिक हित साधण्यासाठी उत्तीम बी-बियाणे, जातीवंत व दुधाळ गायी म्हशींची पैदास वाढविण्यासाठी उत्तम जातीचे वळू शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले. या प्रदर्शनात श्रीमंत शेतकऱ्यांना हिस्सार जातीचा सांड विकत घेण्यास प्रवृत्त केले. डोंगरखंडाळा, डोंगरशेवली, अमडापूर व मंगरूळ नवघरे या केंद्रांना डेप्युटी कमिश्नर श्री. डी. व्ही. रेगे आय.सी.एस. यांचे हस्ते बक्षिसे वाटण्यात आली. यावेळी जिल्हा कौन्सिल अध्यक्ष श्री. पंढरीनाथ पाटील यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांची हलाखीची परिस्थिती त्यांच्या भाषणात वर्णन केली.

### शेतकरी मेळावे व परिषदांचा झपाटा

शेतकरी सावकारी कर्जाने त्रस्त झाले होते. तसेच शेतमालकाकडून कष्टकरी शेतकऱ्यांची पिळवणूक होत होती. ही पिळवणूक थांबविण्यासाठी व सावकारांच्या तावडीतून शेतकऱ्यांची मुक्तता करण्यासाठी पंढरीनाथ पाटलांनी शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करण्याकरीता ठिकठिकाणी शेतकरी सभा, मेळावे व परिषदा आयोजित करण्याचा सपाटा सुरू केला. ३ नोव्हेंबर १९४६ रोजी मेहकर तालुक्यातील नागापूर येथे पंढरीनाथ पाटलांच्या अध्यक्षतेखाली जहागीर गावांच्या कुळांची जाहीर परिषद झाली. आपल्या अध्यक्षीय भाषणात कुळांना हक्क कसे प्राप्त होतील व त्यांची पिळवणूक कशी थांबेल, याबाबतचे विविध उपाय सांगून त्यांनी त्याबाबत विशेष मार्गदर्शन केले. काही महत्वाचे ठरावही या परिषदेत पारित करण्यात आले. धाड सर्कलच्या शेतकऱ्यांची पहिली परिषद चिखली तालुक्यातील प्रसिद्ध अशा मायंबा येथील यात्रेत २२ जानेवारी १९४७ रोजी एका सिनेमाच्या थिएटरात घेतली. यावेळी या परिसरातील तीन हजारावर लोक उपस्थित होते. या परिषदेतही शेतकरी हिताचे एकूण सहा ठराव पारित झाले. या परिषदा घेत असतानाच पंढरीनाथ पाटील जून्या पत्रव्यवहारांचा अभ्यास करून अशा शेतकरी परिषदांमध्ये घ्यावयाचे विषय व त्याबाबतचे मुद्देसूद आशय आत्मसात करून टिपण तयार करीत असत. तसेच गावोगाव फिरून शेतकऱ्यांची गाऱ्हाणीही ऐकत. मायंबा शेतकरी परिषदेपूर्वी त्यांनी अकोला येथील अन्नधान्य परिस्थितीबाबत प्रांतिक काँग्रेस व विदर्भातील असेंब्ली मेंबरांच्या सभेचा तसेच २० जानेवारी १९४७ रोजी चिखली येथे भेटलेले शेतकरी यांची ऐकलेली गाऱ्हाणी, त्यादिवशी बाजारात ज्वारी रूपयाची साडेतीन शेर तर गहू रूपायाला एक शेर असा भाव असल्याचे पाहिले. त्यावरून किती महागाई वाढली याचा अंदाज त्यांनी घेतला होता. तसेच त्यांनी जुनी वर्तमानपत्रे चाळली होती. यावरून कोणत्याही परिषदेत जातांना व्याख्यानासाठी अभ्यासपूर्वक तयारी करून जात असत. त्यामुळेच त्यांचे भाषण प्रभावी होत असे. धाड सर्कल परिषदेनंतर ते लगेचच चांडोळ, म्हसला, मासरूळ येथे जाऊन शेतकऱ्यांना भेटले. त्यांना एकत्र करून त्यांची गाऱ्हाणी ऐकली. त्यानंतर २५ जानेवारी १९४७ रोजी या सर्व गावातील शेतकऱ्यांची मासरूळ येथे सभा घेतली. या सभेत म्हसला, सातगाव, कुंबेफळ, डोमरूळ, धामणगाव, पारध (मराठवाडा) येथील शेतकरी मोठ्या संख्येने हजर होते. पंढरीनाथ पाटलांनी शेतकऱ्यांच्या अडचणी एकत्रितपणे मांडून त्या अडचणी सोडविण्याचे उपाय एक तासभर भाषण करून शेतकऱ्यांना समजावून सांगितले.

धाडलाही त्यांनी शेतकरी व गावातील प्रमुख मंडळींच्या भेटी घेतल्या. ते एवढ्यावरच थांबले नाहीत तर त्यांनी २७ जानेवारी १९४७ रोजी बुलडाणा येथे तत्कालीन डेप्युटी कमिशनर रावसाहेब श्री. एम. आर. जोशी यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या सर्व अडचणी त्यांच्या कानावर घातल्या. त्याबाबत त्यांच्याशी चर्चा केली. शेतकऱ्यांबद्दल असलेली आस्था त्यातून प्रगट झाली. शेतकऱ्यांचा कैवारी म्हणून लोक पंढरीनाथ पाटलांकडे आशेने पाहू लागले.

पंढरीनाथ पाटील शेतकऱ्यांच्या प्रश्नाशी निगडित अशा लॅंड रेव्हेन्यू व सेटलमेंट खात्याच्या कमिटीचे मेंबर होते. या कमिटीची सभा दिनांक ३१ जानेवारी १९४७ रोजी सेक्रेटरीएटमध्ये त्या खात्याचे दिवाण ना. आर. के. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्या सभेत पंढरीनाथांनी सक्रिय सहभाग घेतला व शेतकऱ्यांची बाजू समर्थपणे मांडली.

**विधी मंडळात शेतकरी हित संरक्षण–काळाबाजार करणारांना केवळ दंड नको तर कडक शिक्षा करा : विधीमंडळात मागणी**

२४ फेब्रुवारी १९४७ रोजी नागपूर असेंब्लीचे अंदाजपत्रकीय अधिवेशन सुरू झाले होते. दिनांक २५ रोजी अंदाजपत्रकावरील चर्चेत पंढरीनाथ पाटलांनी भाग घेतला. अन्नधान्याची टंचाई होती. व्यापारी मनमानी करीत होते. भारत संरक्षण कायदा गेल्यामुळे त्यांना फावले होते. महागाई शिगेला पोचली होती. आगपेटीच्या एका पेटीला आठ आणे द्यावे लागत. वऱ्हाडात कापूस पिकतो, सरकीचा मोठा व्यापार चालतो, व्यापाऱ्यांनी शेकडो मोटारी भरून रातोरात वऱ्हाडातील सरकी दुसरीकडे नेऊन विकली. दुष्काळ पडला तर तेथील शेतकऱ्यांना आपल्या गुरांसाठी सरकीचा एकही दाणा उपलब्ध होणार नाही. अशी परिस्थिती निर्माण झाली. नियंत्रण आले की वस्तू काळ्या बाजारात गडप होतात. कोणत्या वस्तूवर कंट्रोल येणार हे व्यापाऱ्यांना अगोदरच कळते आणि मग काळा बाजार फोफावतो. भाकरीवर तेल तिखट मिळू नये अशी परिस्थिती त्यावेळी वऱ्हाडात उत्पन्न झाली होती. या परिस्थितीबाबत बोलतांना पंढरीनाथ पाटील म्हणाले, "सरकारने एखाद्या वस्तूवर कंट्रोल बसविताच लोक त्या वस्तूला पारखे होतात असा अनुभव आहे. ज्या व्यापाऱ्यांना परवाने देण्यात येतात त्यांना जणू काळाबाजार करण्याचा परवाना मिळाला आहे असा देखावा दिसतो. आज काळ्या बाजारवाले रंकाचे राव

बनले आहेत व बहुजनाचा रक्तशोष करणाऱ्या त्यांच्या व्यापारात सरकारी अधिकारी सामील असल्याचा अनुभव येतो आहे. ९३ कलमी राजवटीत सरकारी अधिकाऱ्यांचा जो जुलूम होता, तो काँग्रेसच्या राज्यात यत्किंचितही कमी झालेला नाही. म्हणून काळा बाजारवाल्यांना सरकारने कडक शासन केले पाहिजे. त्याला ५०० रूपये दंड करणे म्हणजे त्याचा एक दिवसाचा नफा कापणे आहे. एवढ्याने काय होणार ? काळा बाजारवाल्यांना फ्रान्समध्ये फासावर दिले जाते. तशी शिक्षा येथे व्हावी असे मी म्हणत नाही, पण ५०० रूपये दंड करण्याऐवजी त्यांना ५ वर्षाची सक्त मजुरी ठोठावली तर काळा बाजार करण्याची हिम्मत कोणताही व्यापारी किंवा अधिकारी करणार नाही.''(५६)
(तरूण भारत, नागपूर ता. २६-२-१९४७)

## मालगुजारी नष्ट होणार नाही पण कर वाढेल

३ मार्च १९४७ रोजी अंदाजपत्रकावर बोलतांना पंढरीनाथ पाटील म्हणाले, या बिलामुळे मालगुजारी नष्ट होणार आहे अशी कित्येकांची समजूत झाली आहे. पण ती बरोबर नाही. या बिलामुळे सरकारला देण्यात येणारा कर वाढणार आहे इतकेच. हा कर वाजवी व न्याय्य आहे, आणि त्यादृष्टीने बिल योग्य वेळीच पुढे आले आहे. या बिलात जर वऱ्हाडच्या इजारदाराचाही समावेश महसूलमंत्र्यांनी केला असता तर अधिक आनंद झाला असता. येथील जहागीरदार आणि इजारदार हे दुसरे मालगुजारच आहेत. भांडवलदार लोक गरिबांची पिळवणूक करणारे आहेत. वऱ्हाडात ज्यांच्याजवळ हजारो एकर जमीन आहे. त्यांच्यासंबंधीही अशाच तऱ्हेचे बिल आणावे. अशी माझी विनंती आहे. जग साम्यवादाकडे चालत जात आहे. त्यादृष्टीने सरकारने तरतूद केली पाहिजे. प्रयत्न केले पाहिजे. (५५) (तरूण भारत, नागपूर ता. ४-३-१९४७)

## अन्नधान्य परिस्थिती समिती

दुसऱ्या महायुद्धामुळे तसेच दुष्काळ व प्रतिकूल परिस्थितीमुळे देशात अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली होती. शेतकरी हवालदिल झाले होते. शेतकरी व अन्नधान्य परिस्थितीबाबत पंढरीनाथ पाटील सतत जागृत असत. त्यांनी बुलडाणा जिल्हा काँग्रेस शेतकरी समितीची स्थापना केली. या समितीत त्यांनी १० शेतकरी स्वीकृत सदस्य म्हणून घेतले. या समितीची रीतसर निवडणूक करून श्री. कृष्णरावबापू गारडगावकर अध्यक्ष व नारायणराव पाटील केळवदकर सेक्रेटरी निवडले. या समितीच्या

कामाला गती आली. २६ ऑगष्ट १९४७ रोजी या समितीचे डेप्युटेशन डेप्युटी कमिश्नर यांना भेटले व त्यांच्याशी अन्नधान्य टंचाईबाबत चर्चा केली.

## कसेल त्याची जमीन व शेतकऱ्यांच्या मुलांसाठी राखीव जागा

६ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर १९४७ या कालावधीत भरणाऱ्या नागपूर विधिमंडळ अधिवेशनासाठी पंढरीनाथ पाटलांनी तीन ठराव तयार करून पाठविले होते. त्यात दुसऱ्या ठरावाअन्वये 'कसेल त्याची शेती' हे तत्व लागू करावे अशी भूमिका घेतली. त्या ठरावात ते लिहितात, "वऱ्हाडातील हजारो एकर शेती थोड्या श्रीमंत व सावकार लोकांजवळ आहे. खरा शेतकरी मात्र जमिनीला पारखा झालेला आहे. ज्यांचेजवळ हजारो एकर शेती आहे. ते जातीवंत शेतकरी नसल्यामुळे तिची मशागत करू शकत नाहीत. त्यामुळे शेतीचे उत्पन्न दिवसेंदिवस कमी होत आहे. आर्थिक विषमता निर्माण झाली आहे. ही विषमता नष्ट करून प्रांतात योग्य आर्थिक रचना करणे व उत्पन्न वाढविणे हे आपल्या सरकारचे कर्तव्य आहे. सबब हे कायदेमंडळ सरकारला अशी शिफारस करते की जे सावकार आणि जमीनदार स्वत: शेती करू शकत नाहीत त्यांची सर्व जमीन लँड ॲक्वीझिशन कायद्याखाली ताब्यात घेऊन त्या त्या खेड्यातील जातिवंत शेतकऱ्यास सहकारी पद्धतीने वहिवाट करण्यास द्यावी. काँग्रेस व संघ सरकारने देशात शेतकरी, कामकरी लोकांचे राज्य लवकरात लवकर निर्माण करण्याचे ठरविले. पण शेतकरी व कामकरी यांची मुले शिक्षणापासून वंचित असल्यामुळे नोकऱ्या व राजकीय सत्तेपासून दूर आहेत म्हणून खेड्यातील शेतकरी व शेतमजूरांच्या मुलांसाठी महाविद्यालयात व सरकारी नोकऱ्यात राखीव जागा ठेवाव्यात. कारण खेड्यात शैक्षणिक सुविधा नाहीत. ते शहरी मुलांच्या स्पर्धेत मागे राहतात. सबब हे प्रांतिक कायदेमंडळ सरकारला अशी शिफारस करते की, शेतकरी व कामकरी लोकांच्या मुलांना व उमेदवारांना हायस्कूल, कॉलेज व सरकारी नोकऱ्यात ८०% राखीव ठेवाव्यात."(६५)

(साप्ताहिक आहुती, ता. २९-९-१९४७)

## राष्ट्रपतींची भेट

असेंब्लीत सुटी असताना पंढरीनाथ पाटील आपल्या मित्रांच्या भेटीस त्यांच्या गावी जात. तसेच महत्त्वाच्या व्यक्तींच्या भेटी घेत. २५ मार्च १९४८ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख व पंढरीनाथ पाटील यांनी नागपूरातील मित्रांच्या शिमग्याच्या सुटीत भेटी घेतल्या.

त्यानंतर ते वर्ध्यास गेले. तेथे भारताचे राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद आलेले होते. त्याठिकाणी या मित्रद्वयांनी डॉ. राजेंद्रप्रसाद यांची भेट घेतली. त्या भेटीत त्यांनी देशातील शेतकरी व शेतमजूर यांच्या दुर्दशेबद्दल राष्ट्रपतींना माहिती दिली. त्यांची सुधारणा करण्याबाबत विविध उपाय योजनांची चर्चा केली. शेतकरी व शेतमजूरांची स्थिती सुधारण्यासाठी केंद्रसरकार मार्फत राष्ट्रपतींनी उपाय योजना कराव्या असे आग्रही प्रतिपादन केले. ९ एप्रिल १९४८ रोजी पंढरीनाथ पाटील स्वत: एकटेच वर्ध्याला जाऊन राष्ट्रपतींना भेटले. त्यांनी परत शेतकरी व शेतमजूरांच्या प्रश्नांची तड लावण्याची आग्रही मागणी केली. शेतकरी व शेतमजूरांचे प्रश्नात पंढरीनाथ पाटलांना कळकळ होती. त्यांची सुधारणा करण्यासाठी शासनाने काही ठोस उपाय करावे, म्हणून ते तिसऱ्यांदा दिनांक ११ एप्रिल १९४८ रोजी वर्धा येथे राष्ट्रपतींना भेटले. या तिसऱ्या भेटीच्या वेळी पंढरीनाथ पाटलांनी आपल्यासोबत वऱ्हाड काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. ब्रिजलाल बियाणी व ५० वर कार्यकर्ते नेले होते व त्यांचेसोबत या डेप्युटेशनमध्ये सहभागी झाले होते. या डेप्यूटेशनशी डॉ. राजेंद्रप्रसाद दोन तास बोलले. त्यात जास्त वेळ अर्थातच पंढरीनाथ पाटील यांना मिळाला.

## शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी समिती निर्मिती

डॉ. पंजाबराव देशमुख व पंढरीनाथ पाटील ही जोडी सतत शेतकरी व शेतमजूरांच्या प्रश्नांबाबत राज्याचे विविध खात्याचे दिवाण, अधिकारी व प्रिमियर यांच्याशी चर्चा करीत. तसेच त्यांनी वेळोवेळी शासनाकडे निवेदने दिली. राष्ट्रपतींची तीन वेळा भेट घेऊन हिंदुस्थान सरकारने शेतकऱ्यांच्या प्रश्नांना 'हल' करण्यासाठी एक समिती नेमली. त्या समितीने सूचित केल्याप्रमाणे अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने एक शेतकी सुधारणा समिती नेमली. या समितीसमोर नागपूर असेंब्ली हॉलमध्ये दिनांक २८ जून १९४८ रोजी पंढरीनाथ पाटलांची साक्ष झाली. एवढे करूनही पंढरीनाथ पाटील स्वस्थ बसले नाही. कुमारप्पा अखिल भारतीय शेतकी कमिशनकडे पाठविण्यासाठी दिनांक ८ ते १० जुलै या तीन दिवसात शेतकरी शेतमजुरांच्या प्रश्नांच्या सर्वांगांना स्पर्श करणारी अशी एक कैफियत टाईप करून ती अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने नेमलेल्या कुमारप्पा शेतीसुधार समितीकडे दिनांक १० जुलै रोजी दिल्लीला रवाना केली. (डायरी)

## इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीवर नेमणूक

९ सप्टेंबर १९४८ रोजी असेंब्ली सेशन संपले. त्याच दिवशी पंढरीनाथ पाटील

यांची सेंट्रल कॉटन कमिटीवर नेमणूक झाली. शेतकरी व शेतमजूर यांच्या जीवनाची जाणीव असलेला शेतकरी प्रतिनिधी या महत्वाच्या कमिटीवर नियुक्त झाला. ही **शेतकऱ्यांच्या दृष्टीने सुखद व अप्रुप घटना** होती. **त्यांची नियुक्ती** झाल्यानंतर इंडियन **सेंट्रल कॉटन कमिटीची पहिली सभा २४ व २५ सप्टेंबर १९४८** रोजी मुंबईत सर दातारसिंग यांचे अध्यक्षतेखाली झाली. सदर सभेला पंढरीनाथ पाटील हजर होते. पहिल्या सभेत त्यांनी सक्रीय सहभाग घेतला. पहिल्या दिवशी सभा संपल्यावर सर दातारसिंग यांनी सर्व सदस्यांना ताजमहाल हॉटेलात चहा दिला. २५ तारखेला पंढरीनाथ पाटलांनी सरकारने कापसाचे भाव कमी करण्याच्या निर्णयावर कडाडून हल्ला केला. आधीच शेतकऱ्यांची स्थिती हलाखींची त्यात सरकारने कापसाचे भाव कमी करणे हा फार मोठा अन्याय आहे, अशा आशयाचे प्रभावी भाषण पंढरीनाथ पाटलांनी दिले. या भाषणाबद्दल सर पुरूषोत्तम दास, सर चुनीलाल मेहता वगैरे अनेक मेंबर्सनी सभेतच पंढरीनाथ पाटलांची खूप तारिफ केली. त्याच दिवशी रात्री मुंबईतील सत्यशोधक समाजात पंढरीनाथांचे भाषण झाले.

### वादळ व पावसाने पिकाचे नुकसान

पंढरीनाथ पाटील सामाजिक व राजकीय क्षेत्रात वावरतांना त्यांनी आपल्या कुटूंबाकडे व आपल्या नातलगांकडे दुर्लक्ष होऊ दिले नाही. त्यांनी त्यांचे धाकटे बंधू श्री. रामभाऊ राऊत यांना उत्तमप्रकारे शिक्षण देऊन वकील केले. श्री. रामभाऊ यांनी १६ नोव्हेंबर १९४८ ला वकीली व्यवसाय सुरू केला. त्यानंतर लगेच २० ते २४ नोव्हेंबरला जोराचे वादळ होऊन खूप पाऊस पडला. पीकांचे -विशेषत: कापसाचे व ज्वारीचे फार मोठे नुकसान झाले. जेमतेम चारआणे पीक वाचले असेल. यंदा शेतसारा माफ करावा, शेतकरी आणि शेतमजुरांना सरकारने यावर्षी मदत करावी असे पंढरीनाथ पाटलांनी सरकारला कळविले.

### शेतकरी कामकरी वर्गच हिंदुस्थानची सुप्त शक्ती आहे

शेतकरी शहाणा व्हावा, त्याला व्यवहारज्ञान प्राप्त व्हावे व राजकारणातही त्याने सक्रीय सहभाग घ्यावा यासाठी पंढरीनाथ पाटील नेहमी प्रयत्नशील असत. १९ डिसेंबर १९४८ रोजी चिखली तालुका शेतकी असोशिएशनची वार्षिक खास सभा पंढरीनाथ पाटलांच्या अध्यक्षतेखाली झाली. या सभेत नवी कार्यकारिणी निवडली

गेली. या नवीन मंडळीत मोठ्या संख्येने शेतकरी निवडून आलेले होते. त्याचा आनंद पंढरीनाथ पाटलांना झाला. दिनांक २६ डिसेंबर ते ३० डिसेंबर १९४८ रोजी ते आपल्या मित्रांच्या भेटीसाठी दारव्हा, यवतमाळ, रोहोणी या गावी जाऊन आले. या दौऱ्यात दिनांक २६ ला त्यांच्या अध्यक्षतेखाली तरनोळी येथे दारव्हा तालुका शेतकरी, कामकरी परिषद मोठ्या थाटात व उत्साहात पार पडली. यावेळी ते आपल्या भाषणात म्हणाले, "शेतकरी व कामकरी वर्ग हा हिंदुस्थानची सुप्त शक्ती आहे. वेळोवेळी त्यांनीच कॉंग्रेसला साथ देऊन स्वातंत्र्य मिळविण्यास मदत केली. परकीय सरकारने त्यावेळी या महान शक्तीकडे दुर्लक्ष केले. आता जनतेचे राष्ट्रीय सरकार आहे. हे आपलेच सरकार आहे. स्वातंत्र्यातील शेतकरी समाज सुसंघटित झाला तरच तो आपला व राष्ट्राचा उद्धार करू शकेल." राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या चळवळीचा या सभेत निषेध करण्यात आला. शेतकरी हिताचे बरेच ठराव पास झाले. या सभेत दे. भ. भोगाडे, डॉ. स्वामी, चव्हाण, मसेकर इत्यादी वक्त्यांची भाषणे झाली. त्यानंतर दे. भ. नारायणराव पाटील यांनी स्वतंत्र हिंदुस्थानातील शेतकऱ्यांचे कर्तव्य काय आहे हे उत्तम रितीने समजावून सांगितले. या परिषदेला तीन हजारावर लोक उपस्थित होते. दिनांक २७ ला ते यवतमाळ व रोहोणीस गेले. तेथे त्यांचे मित्र गुलाबराव वसू होते. त्यांचेकडे मुक्कामास थांबले. दिनांक २८ ला रात्री रोहोणीस जाहीर सभेत लोक आग्रहास्तव 'कायदेमंडळातील कामकाज' या विषयावर बहारदार व्याख्यान झाले. दुसऱ्या दिवशी दिनांक २९ ला श्री. गुलाबराव वसू व श्री. वामनराव वसू या दोघा बंधुंच्या मालमत्तेच्या वाटण्या झाल्या. त्यास पंढरीनाथ पाटील, शंकरराव वसू, दादाराव देशमुख व श्री. साबळे हे साक्षीदार होते. ३१ डिसेंबरला वसू बंधुंकडे रोहोणीस थाटाचे जेवण झाले व या वर्षाचा शेवट गोड झाला. [६७]

(संदेश, ता. १६-१-१९४९)

## बजेटच्या भाषणात सरकीचा प्रश्न लावून धरला

पंढरीनाथ पाटील सतत शेतकरी हितासाठी प्रयत्नशील असत. असेंब्लीत व असेंब्लीबाहेरही ते वेळोवेळी शेतकऱ्यांच्या परिस्थितीबाबत व त्या परिस्थितीची सुधारणा होण्याबाबत सतत शेतकरी हिताचे बोलत. १९४८ साली त्यांनी असेंब्लीत बजेटवर भाषण करतांना सरकीचा प्रश्न लावून धरला होता. तसाच तो १९४९ सालच्या बजेट सेशन मध्येही लावून धरला. १९४९ च्या मार्चच्या पहिल्या आठवड्यात त्यांनी असेंब्लीत गतवर्षी शासनाने व्यापाऱ्यांचेच हित पाहिले हे सांगताना ते म्हणाले, "शेतकऱ्याला

सरकी मिळणे गतवर्षी दुर्मिळ झाले होते. पण व्यापारी वर्गाचे मात्र उखळ पांढरे झाले होते. खामगाव, अकोला, हैद्राबाद येथील चार व्यापाऱ्यांनी एक फर्म बनवून वऱ्हाडातील सर्व सरकी खरेदी केली होती. सरकीच्या निर्यातीबाबत हा एक कटच होता. त्याबाबत मंत्र्यांकडे शिष्टमंडळे गेली. पण व्यापारी सरकी देईना. असा खेळ जून अखेरपर्यंत चालू होता. सरकी पेरण्यासाठी बी सुध्दा नाही, अशी स्थिती शेवटी निर्माण झाली. हा प्रश्न मोठा विचित्र झालेला आहे. आणि म्हणून १) सरकीवर नियंत्रण ठेवावे काय ? २) नियंत्रणात कोणते भाव ठेवावे ? ३) हे कोणत्या तऱ्हेने अंमलात आणले जावे ? आणि ४) आणि ते कसे लागू करावे ?'' या प्रश्नांची व सूचनांची सरकारकडून अपेक्षा व्यक्त केली. श्री. पाटील यांनी गतवर्षी व्यापारी वर्गाने ३५ लाख रूपये नफा मिळविल्याचे सांगून ते पुढे म्हणाले, **" आंधळे दळते, कुत्रे पीठ खाते"** असा सरकारचा कारभार झालेला आहे. झालं आहे ते असं झालं आहे. यापुढे असं होऊ नये. सरकीच्या भावावर कंट्रोल असणे जरूर आहे. भावावर नियंत्रण ठेवणे जर सरकारला शक्य नसेल तर सरकीची निर्यात तरी बंद झाली पाहिजे व प्रांतिक सरकारने हिंद सरकारकडून तसे करवून घ्यावे. सरकीची व्यवस्था सरकारने केल्यास तुमचा प्रश्न आपोआपच सुटेल.''

(७१) (तरूण भारत, नागपूर ता. ८-३-१९४९)

**कर धोरणावर टिका**

याच बजेट सेशनमध्ये दिनांक २ मार्चला पंढरीनाथ पाटील बजेटवर बोलतांना गत दोन-तीन वर्षाचा आढावा घेऊन म्हणाले, " आपण प्रगतीच्या मार्गावर आहोत असे बिलकूल वाटत नाही.'' असे सांगून ते पुढे म्हणाले, "जुनी विटी नवे राज्य असे हे बजेट आहे. उत्पन्न वाढविण्याची या बजेटात आर्थिक तरतूद नाही. सरकारी नोकरांचे उत्पन्न वाढविण्याची तरतूद करण्यात आली आहे. बेसिक शिक्षणासाठी व नेहमीच्या शिक्षणासाठी सरकारी अधिकारी नेमून अनाठायी खर्च होत आहे. नोकरशाहीमधील हे अधिकारी कामाचे पोकळ आकडे सरकारला सादर करीत आहेत. भूकेलेल्यांना अन्न, नेसण्यास वस्त्र, राहण्यास घरे यांची जरूरी आहे. त्याची तरतूद प्रथम झाली पाहजे. त्याचप्रमाणे प्रांतात काळाबाजार व लाचखोरी इतकी बोकाळली आहे की..., उत्पन्न कमी दाखविणे जरूर होते. पण तसे केल्याचे दिसत नाही. विक्रीकरात ज्या वस्तूंची भर घातली आहे हे करणे योग्य नसून चैनीच्या वस्तूवर आणखी कर जरी वाढविला असता तरी हरकत नव्हती. (६९) (दै. महाराष्ट्र, नागपूर ता. ३-३-१९४९)

दिनांक १७ मार्च १९५० रोजी असेंब्लीत शेती सुधारणे संबंधी बोलताना शेतकी खात्यासंबंधी होणारा प्रचार किंवा प्रदर्शने समाधानकारक नसतात. आणि बडे अधिकारी सर्वसामान्य शेतकऱ्यात मिसळत नाहीत. ह्या संबंधीच्या एक रूपयाची कपात सूचना पंढरीनाथ पाटलांनी आणली होती. (७२) (तरूण भारत, नागपूर ता. १८-३-१९४९)

## शेतकऱ्यांना मदत मिळाली

गतवर्षी नोव्हेंबर मध्ये अति पाऊस व वादळाने शेतकऱ्यांची झालेली हानी याबद्दल त्वरीत पंढरीनाथ पाटलांनी सरकारच्या कानी घातले होते. त्याचा परीणाम होऊन शेतकऱ्यांना जवळजवळ १८ लाख रूपये 'सस्पेंशन देण्याची व्यवस्था दिनांक २५ मार्च १९४९ रोजी असेंब्लीत एक कायदा पास करून करण्यात आली. त्यावेळी कर्जाबद्दल बोलताना ते म्हणाले, "चक्रवाढ व्याजाने एक रूपयाची तीन वर्षात दामदुप्पट होते. असे गृहीत धरले तर त्या हिशेबाने.... १०० वर्षानंतर ती ६ अब्ज आणि ५० लक्ष रूपयांच्या वर रक्कम जाते... म्हणून परिस्थितीचा विचार करून सरकारने शेतकऱ्यांचे कर्ज माफ करायला हवे. काही असो पण काँग्रेसच्या आमदानीत या बिलामुळे जितकी मदत व सहाय्य मिळाले तितके पूर्वी कधीच मिळाले नव्हते ते मुद्दाम सांगावेसे वाटते."

(७३) तरूण भारत, नागपूर ता. २६-३-१९४९, (७४) महाराष्ट्र, नागपूर ता. २६-३-१९४९

## कुळ कायदा बिल

सावकारी पाशातून शेतकऱ्यांची सुटका करताना 'कसेल त्याची जमीन' या तत्त्वानुसार प्रत्यक्ष शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना, प्रत्यक्ष न राबणाऱ्या शेठ सावकार व व्यापारी जमीन मालकांच्या जमीनी प्रत्यक्ष त्या शेतीत राबणाऱ्या कुळाला मिळाव्यात. त्यासंबंधीत एक कायदा यावेळी येणार असल्याची चर्चा सुरू होती. असे बिलही असेंब्लीत आलेले होते. त्या संभाव्य कायद्याची माहिती पंढरीनाथ पाटील शेतकऱ्यांना समजावून सांगण्यासाठी गावोगाव जाऊन व्याख्यान देत असत. "विदर्भ जमीन मालकी आणि पट्टे (बिल नंबर ७३ कुळकायदा बिल)" असे त्या बिलाचे नाव होते. या दौऱ्यातून त्यांनी गावोगाव शेतकऱ्यांचा या बिलास पाठींबा असल्याबाबत ठराव पास करून घेतले. या बिलावरील पंढरीनाथ पाटलांचे भाषण ऐकण्यासाठी हजारो शेतकरी गर्दी करीत असत.

या बिलावरील व्याख्यानासाठी फिरतांना ते ग्राम व न्याय पंचायती स्थापून उद्‌घाटने करीत असत. पंढरीनाथ पाटलांनी बुलडाणा जिल्ह्यातील पाचही तालुक्यात कुळकायद्यासंबंधी हजारो सभा घेतल्या. आता तर त्यांना पर जिल्ह्यातूनही कुळकायद्याबाबत व्याख्याने देण्यासाठी बोलावणे येऊ लागले. ११ जानेवारी १९५० रोजी सातगाव भुसारीची सभा आटोपून ते अकोला जिल्ह्यातील वाशिम तालुक्यातील कुरळ व मालेगावलाही पोचले. त्याठिकाणी या निमित्ताने जाहीर व्याख्याने होऊन त्यांचे स्वागत समारोह झाले.

## कृषितंत्रज्ञान व गुरांचे प्रदर्शन

दर शुक्रवारी मुंबईस इस्ट इंडिया कॉटन असोसिएशनच्या डायरेक्टर बोर्डाची सभा होत असे. नेहमीप्रमाणे ती सभा करून पंढरीनाथ पाटील दिनांक ४ फेब्रुवारी रोजी दर्यापूर येथील सत्यशोधक समाज शिबीरास भेट देऊन दिनांक ५ फेब्रुवारी १९५० रोजी अकोला येथे सायंकाळी सहा वाजता विदर्भातील जनपदे, ग्राम व न्यायपंचायतीच्या परिषदेचे उद्‌घाटन कार्यक्रमास उपस्थित राहिले. १२ फेब्रुवारी १९५० रोजी मेहकर येथे कृषितंत्रज्ञान व गुरांच्या प्रदर्शनाचे समारोप व बक्षिस वितरण समारंभास उपस्थित राहिले. शेती, शेतकरी हा पंढरीनाथांचा जिव्हाळ्याचा विषय. म्हणूनच त्यांनी शेतकरी वर्गास शेतीचे आधुनिक तंत्रज्ञान, संकरीत बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशक औषधी इत्यादींची माहिती ग्रामीण भागातील शेतकऱ्याला व्हावी म्हणून मेहकर येथे जिल्हास्तरीय शेतकी व गुरांचे प्रदर्शन भरविले. त्याचा समारोप, बक्षिस वितरण समारंभ दिनांक १२ फेब्रुवारी १९५० रोजी आ. पंढरीनाथ पाटील यांनी ना. श्री. पु. का. देशमुख यांचे हस्ते पार पाडला. त्याच दिवशी दर्यापूरात जाऊन तेथे मुंबईच्या सत्यशोधक विद्यार्थी संघाच्या बौद्धिक शिबिरास भेट दिली व सायंकाळी दर्यापूर न्यायपंचायतीचा उद्‌घाटन समारंभ तेथील गांधी चौकात आठ हजारावर लोकांच्या उपस्थितीत पंढरीनाथ पाटलांच्या हस्ते पार पडला.

## कापसाच्या भाववाढीची मागणी

पंढरीनाथ पाटील अनेक कमिट्यांवर सदस्य म्हणून काम करीत असत. २३ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर १९५० या कालावधीत ते विविध कमिट्यांच्या सभांसाठी मुंबईत होते. या संपूर्ण सप्ताहात त्यांनी कॉटन कमिटीच्या विविध उपसमित्यांच्या सभांना

उपस्थित राहून कामकाजात सक्रिय सहभाग घेतला. २५ व २७ तारखेला इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीच्या शेतकी संशोधन सबकमिटीच्या सभेला, २६ ला टेक्नॉलाजीकल सबकमिटीच्या सभेला, २९ ला प्लँट इंडस्ट्री इंदुरच्या संस्थेच्या गव्हर्नर्सच्या सभेला, सकाळी व दुपारी इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीच्या सभेला उपस्थित राहून त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. ही सभा मुंबई येथे भारतीय केंद्र कापूस समितीच्या सभागृहात झाली. त्यावेळी पंढरीनाथ पाटील एम.एल.ए. चिखली (वऱ्हाड) यांनी मध्यप्रदेशातील कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांची परिस्थिती विस्तृत भाषण करून मांडली. पंढरीनाथ पाटील हे शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून पोटतिडकीने बोलले. ते म्हणाले, " हिंद सरकारने शेतकऱ्यांच्या कापसाचे भाव वाढविले असले तरी गिरणी मालकांच्या कारवायांना आमचे सरकार बळी पडण्याची भीती आता उत्पन्न झाली आहे. कारण मागील वर्षी जरीला रूईचा नियंत्रित भाव ६२० रूपये प्रति खंडी होता. तरी देखील मील मालक कापसाच्या बाजारात उतरून त्यांनी शेतकऱ्यांचा कापूस ३२५ रूपये खंडीप्रमाणे (रूईचा भाव ८७५ रूपये खंडी) खरेदी केला. पण आता हिंद सरकारच्या दिनांक २ मे १९५० च्या पत्रकाप्रमाणे नियंत्रणाचे व वितरणाचे काम सरकारने आपल्याकडे घेतले असून त्याची अंमलबजावणी यंदा कडकपणे सरकार करणार आहे. याचा सरळ अर्थ असा आहे की, यंदा रूईचा भाव सरकारने दरखंडीस १५० रूपये वाढविला असून देखील त्या हिशेबाने कापसाच्या बाजारात शेतकऱ्याला सन १९५०-५१ च्या चालू हंगामात कापसाचा भाव दर खंडीस २७५ रूपये फक्त मिळेल. सरकारचे हे नवीन नियंत्रण व मील मालकावर खुल्या बाजारात कापूस खरेदी करण्यास घातलेली बंदी ध्यानात घेतल्यास यंदा नियंत्रित रूईचे भाव दरखंडीस १५० रूपयाने वाढवून देखील कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्याला गेल्यावर्षी पेक्षा यंदा त्याच कापसास दर खंडीस ५० रूपये किंमत कमी मिळणार आहे. करिता या समितीने मील मालकास कापूस खरेदीस घातलेली बंदी उठविण्याबद्दल आणि कापसाचे किमान भाव ९०० ते १२०० रूपये दर खंडीस वाढविण्याबद्दल हिंद सरकारकडे आग्रह धरावा, त्याशिवाय कापूस पिकविणारा शेतकरी जगू शकणार नाही." यानंतर त्यांनी कापूस उत्पादन का घटले याबद्दल सविस्तर माहिती देऊन लागवडीचे क्षेत्र वाढविण्याचे उपायही सुचविले. (७७) ( दै. महाराष्ट्र, नागपूर ता. ३०-१०-१९५०)

**जनपदांच्या सभा व नापिकीमुळे विविध कामांची मागणी करणारे ठराव पास**

१९५०-५१ च्या खरीप हंगामात अत्यल्प पावसामुळे नापिकीची परिस्थिती

निर्माण झाली. त्याबाबत जिल्ह्याचे डी.सी. श्री. वर्मा यांनी दिनांक २३ नोव्हेंबर १९५० रोजी सर्वपक्षीय सभा घेऊन भावी टंचाईच्या बाबतीत त्यांच्याकडून त्यावर उपाय योजनांचा विचार केला होता. त्या सभेतील सर्वपक्षीय धोरणात्मक निर्णयानुसार दिनांक ५ डिसेंबर १९५० रोजी बुलडाणा येथे चिखली जनपदाच्या अर्थसमितीची सभा व नंतर जनपदाची खास सभा भरून पुढील साली नापिकी व बेकारीमुळे सरकारने या तालुक्यासाठी ६ हजार टन धान्य बाहेरून आणावे व शेतमजूरांसाठी व शेतीच्या उत्पादनासाठी लहान पाटबंधारे, विहिरीवर इंजिन पंप बसविणे, रस्ते, सडका तयार करणे, खामगाव ते जालना रेल्वेरस्ता बांधणेबद्दल ठराव पास केले. या दोनही सभात जे कामकाज झाले व निर्णय झाले तसे कामकाज व निर्णय मेहकर तालुका जनपदाच्या दिनांक ६ डिसेंबर १९५० रोजी झालेल्या सभेत झाले. या तीनही सभांत पंढरीनाथ पाटलांनी उपस्थित राहून अत्यंत तळमळीने व जबाबदारीने मार्गदर्शन केले. नोव्हेंबर १९५० मध्ये केंद्रसरकारने रिजनल कॉटन कमिटी स्थापन केली. या समितीची सभा २२ डिसेंबर रोजी नागपूर येथे धनवटे चेंबरमध्ये प्रथमच भरली. पंढरीनाथ पाटील दिनांक २१ डिसेंबर रोजी मुंबईतील इस्ट इंडिया कॉटन असोसिएशनची सभा करून नागपूरातील या रिजनल कॉटन कमिटीच्या पहिल्या सभेला प्रथमच उपस्थित राहिले. या कमिटीत मील मालकाचे तीन प्रतिनिधी, कापूस व्यापाऱ्याचे तीन प्रतिनिधी, शेतकऱ्यांचा एक प्रतिनिधी व दोन सरकारी अधिकारी असे एकूण ९ मेंबर्स होते. पंढरीनाथ पाटील हे शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून या कमिटीमध्ये समाविष्ट झालेले होते.

### साप्ताहिक 'तरूण महाराष्ट्र' शी संभाषण

मध्यप्रदेश प्लॅनिंग बोर्डावर असताना दिनांक २८ एप्रिल १९५१ रोजी अकोला येथे तरूण महाराष्ट्र अकोल्याच्या प्रतिनिधीने त्यांची भेट घेतली व पंचवार्षिक योजनांबद्दल माहिती मिळण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी पंढरीनाथ पाटलांनी मनमोकळेपणे चर्चात्मक माहिती दिली. ' शेती उत्पादन वाढ व ग्रामीण रोजगार उपलब्धीबाबत बोलतांना ते म्हणाले, 'शेतीचे उत्पादन वाढीसाठी सुधारित बियाणे, खते व शेतीची आधुनिक अवजारे यांचा वापर करून अन्नधान्ये, कापूस, फळे, भाजीपाला इत्यादींची पैदास वाढविण्याचे प्रयत्न केले जातील. तसेच घरगुती उद्योगांपैकी सुतारी, लोहारी, मातीची भांडी तयार करणे, विणकाम इत्यादी धंद्यांना उत्तेजन दिले जाईल. तसेच प्राथमिक शिक्षण, समाजशिक्षण, मूलोद्योग शिक्षण या सर्व योजनांवर भर दिला जाईल. सहकारात केवळ

कर्ज देणाऱ्या सहकारी पतपेढ्यांचे स्वरूप बदलून मल्टीपर्पज सोसायट्यांची वाढ करण्यात येईल व त्यातूनच सामुदायिक शेतीची शक्यताही आजमावता येईल. (७५)
( तरूण महाराष्ट्र, अकोला ता. १०-५-१९५१)

## विदर्भ कूळकायदा बील मंजूर

नागपूर असेंब्लीचे अधिवेशन ६ सप्टेंबर १९५१ ला समाप्त झाले. या अधिवेशनात पंढरीनाथ पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांच्या प्रयत्नामुळे 'कसेल त्याची जमीन' या तत्वानुसार प्रत्यक्ष शेतीत राबणाऱ्या शेतकऱ्यांसाठी विदर्भ कूळकायदा बिल आलेले होते. सदर बिलास पाठींबा देताना पंढरीनाथ पाटील म्हणाले, 'हे बिल आहे तशा स्वरूपात संमत झाल्याने श्रमजीवी शेतकऱ्यांचा फायदा होणार नाही. असे विरोधकांचे म्हणणे आहे, पण तसे नाही. जमीन कसेल त्याच्याच मालकीची झाली तर अधिक धान्य पिकविण्याची मोहीम साध्य होईल. वऱ्हाडचा शेतकरी आज मजूर बनला आहे. शेटजी व जमीनदार यांच्या आहारी आज वऱ्हाडातील जमिनी गेल्या आहेत. या कायद्यामुळे वऱ्हाडच्या शेतकऱ्यात फार मोठा संतोष निर्माण होणार आहे. त्याबद्दल ना. पु. का. देशमुख हे धन्यवादास पात्र आहेत. ह्या कायद्यामुळे पट्टेदाराची स्थिती सुधारेल व शेतीलाही आपोआपच उत्तेजन मिळेल. असा आम्हाला विश्वास वाटतो."
(८०) (तरूण भारत, नागपूर ता. १-९-१९५१)

## अभ्यासपूर्ण भाषणामुळे सचिवाशी जिव्हाळ्याचे संबंध दृढ झाले

पंढरीनाथ पाटील इस्ट इंडिया कॉटन कमिटीत शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून काम करीत होते. त्यांनी या कमिटीच्या व तिच्या उपकमिट्यांच्या सभा सहसा टाळल्या नाहीत. अगदी निरूपाय म्हणूनच क्वचित वर्षातून एखादी सभा टळली असेल. एरवी दर शुक्रवारी पंढरीनाथ पाटील सदर कमिटीच्या सभागृहात ते केवळ हजर राहत नसत तर कापूस व कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या बाबत सतत माहिती मिळवून ते त्या सभेत अभ्यासपूर्ण व अनुभवसंपन्न मते मांडत असत, सूचना करीत असत व योजना सूचवत असत. दिनांक २९ जानेवारी १९५२ रोजी सदर समितीच्या मुंबई येथील सभागृहात खास सभा झाली. या सभेत भारत सरकारचे उद्योग खात्याचे सचिव श्री. वाय. सुखटणकर मुद्दाम उपस्थित होते. त्यावेळी पंढरीनाथ पाटलांनी कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथा, कापूस बाजार व कापसाचा भाव ठरविण्याची पद्धत, आधारभूत किंमत इत्यादीबाबत

सविस्तर विवेचन करून व्यापारी, उद्योगपती व दलालांकडून कापूस उत्पादकांची कशी पिळवणूक होते याबद्दल त्यांनी शेतकऱ्यांची बाजू उत्तम रितीने मांडली. शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचे योग्य मूल्य मिळण्यासाठी, शेतकऱ्यांचे कष्टाचे फळ मिळण्यासाठी या कमिटीच्या विचारपीठाचा जबाबदार प्रतिनिधी म्हणून उपयोग करून घेतला. या भाषणाचा प्रभाव व पूर्व परिचय असल्यामुळे सभेनंतर सचिव सुखटणकरांनी पंढरीनाथ पाटलांशी बराच वेळ खाजगी बोलणी केली व त्यातून त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध दृढ झाले.

## चिमणलाल पारेख यांचेकडून श्री शिवाजी हायस्कूल चिखलीस ५ हजार रूपये देणगी

दिनांक २२ फेब्रुवारी ते ७ मार्च १९५२ या काळात पंढरीनाथ पाटील इस्ट इंडिया कॉटन असोसिएशनची, भारतीय मध्यवर्ती कापूस समितीच्या उपसमितीची, ॲग्रीकल्चरल रिसर्च सब कमिटीची अशा विविध सभांच्या लागोपाठ बैठका होत्या. त्यासाठी जवळजवळ १५ दिवस पंढरीनाथ पाटील मुंबईतच राहणार होते. म्हणून या कामासाठी मुंबईला जाताना त्यांनी मुंबई पाहण्यासाठी आपल्यासोबत तत्कालीन सहकारी सर्वश्री सीताराम राघो बाहेकर, बंडू रंभाजी पाटील बाहेकर, बंडू पाटील केळवदकर या मित्रांना सोबत घेऊन गेले. या सर्व मित्रांची मुंबई पाहून झाल्यावर बुधवार दिनांक ५ मार्च १९५२ रोजी पंढरीनाथ पाटील यांनी आपल्या या सर्व सहकारी मित्रांना सोबत घेऊन कापूस समितीच्या जनरल सभेसाठी गेले. त्याठिकाणी चिमणलाल पारिख यांची भेट घेतली. चिमणलाल पारिख हे या समितीचे सभासद व व्यापारी होते. त्यांची व पंढरीनाथांची या समितीच्या माध्यमातून चांगली ओळख झालेली होती. या भेटीत आपल्या मित्रांना चिमणलालजींची ओळख करून दिली; व त्यांच्याकडून चिखली येथील श्री शिवाजी हायस्कूल साठी ५ हजार रूपयांची देणगी मिळविली.

## वऱ्हाड कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांची परिषद अमरावती - किमान भाव बांधणीची मागणी

मुंबईत भारतीय मध्यवर्ती कापूस समितीच्या उपसमितीच्या बैठका करून पंढरीनाथ पाटील तारीख २४ मार्च १९५२ सोमवारी उमरावतीस आले. तेथे त्याच दिवशी वऱ्हाडातील कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांची परिषद बॅरिस्टर रामराव

देशमुखांच्या अध्यक्षतेखाली घेतली. त्या परिषदेत पंढरीनाथ पाटलांनी अभ्यासपूर्ण भाषण करून कापसाला किमान भाव रूई ७२० रूपये खंडी बांधावे अशी मागणी केली. कापूस भावाबद्दल या परिषदेत बरीच चर्चा झाली. त्यानंतर पंढरीनाथ पाटलांनी केलेल्या किमान भावाची मागणी प्रचंड बहुमताने मंजूर झाली. कारण केंद्रीय कापूस समिती, इस्ट इंडिया कॉटन असोशिएशन व तिच्या उपसमित्यात कापूस काय भाव आहे याची सविस्तर माहिती त्यांना मिळाली होती. त्या आधारेच त्यांनी या परिषदेत रास्त भावाची वास्तव मागणी परिषदेला पटवून दिली होती.

## जी. आय. पी. रेल्वेकडून नुकसान भरपाईची मागणी

शेतकऱ्यांचे हित जोपासण्यात पंढरीनाथ पाटील सदैव अग्रेसर असत. चिखली येथे चिखली तालुका शेतकी संस्थेचे कापड दुकान होते. या कापड दुकानासाठी संस्थेने सोलापूरहून कापडाची एक गाठ मागविली होती. ती तत्कालीन जी.आय.पी. (ग्रेट इंडियन पेनीन्सुला) रेल्वे कंपनीच्या रेल्वेतून वाहतुकी दरम्यान गहाळ झाली. हे पंढरीनाथ पाटलांना कळताच त्यांनी शेतकी संस्थेच्या सेक्रेटरींना सोबत घेऊन १५ मे १९५२ रोजी मुंबई गाठली. ते जी.आय.पी. रेल्वे अधिकाऱ्यास भायखळा येथे भेटून संस्थेच्या नुकसान भरपाईची मागणी केली. शेतकऱ्यांच्या संस्थेचे हित रक्षण करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न तात्काळ केले.

शेतकरी व शेतमजूरांच्या हलाखींच्या जीवनाबद्दल राज्य व केंद्र सरकारच्या मंत्र्यांशी बोलण्याची एकही संधी ते दवडत नसत. इस्ट इंडिया कॉटन असोशिएशनची सभा दर शुक्रवारी मुंबईस होत असे. या असोशिएशनच्या प्रत्येक सभेत पंढरीनाथ पाटील उपस्थित असत. यावेळी म्हणजे दिनांक १ आक्टोबर १९५२ रोजी मात्र ही सभा बुधवारी मुंबईतच मलबार हिलवरील सर पुरूषोत्तमदास ठाकूरदास यांचे बंगल्यावर झाली. वार आणि स्थळ बदलले असले तरीही या सभेला पंढरीनाथ पाटील उपस्थित राहिले. कारण या सभेत भारत सरकारचे उद्योगमंत्री श्री. टी. कृष्णम्माचारी उपस्थित होते. या सभेत पंढरीनाथ पाटलांनी शेतकऱ्यांच्या हलाखीचे वर्णन करून शेतकऱ्यांच्या हिताच्या मागण्या त्यांच्यासमोर मांडल्या.

## मुंबई वायदेबाजाराची सुरूवात – कुळकायदा आला

मुंबई वायदेबाजार ता. १२ सप्टेंबर १९५२ रोजी सुरू झाला. त्याबाबत भारत

सरकारने ज्या अटी घातल्या होत्या त्यावर इस्ट इंडिया कॉटन असोशिएशनच्या दिनांक ८ डिसेंबर १९५२ च्या सभेत विचार होऊन तसा ठराव पास केला. हा ठराव भारत सरकारने मान्य केल्याची माहिती इस्ट इंडिया कॉटन असोशिएशनच्या गुरूवार दिनांक ११ डिसेंबर १९५२ च्या सभेत देण्यात आली.

ते आमदार असताना १९५२ साली त्यांनी जहागीरदारी नष्ट करण्याची मोहीम हाती घेतली व कुळकायदा आणला.

## राज्यसभेत कापूस गाजला

ज्या ज्या वेळी संधी मिळेल त्या त्या वेळी पंढरीनाथ पाटील शेतकरी आणि शेतीमाल भावाबद्दल बोलण्याची संधी साधत असत. संसदेच्या वरिष्ठ सभागृहात (राज्यसभेत) ते सदस्य असताना दिनांक २८ नोव्हेंबर १९६८ रोजी प्रश्नोत्तराच्या तासात तत्कालीन व्यापार मंत्री दिनेशसिंग यांचेकडे कापसाचे भाव घसरल्याची तक्रार केली. भाव मिळत नसल्यामुळे विदर्भातील शेतकरी लांब धाग्याच्या कापसाची लागवड कमी प्रमाणात करीत असत. त्यामुळे परदेशातून मोठ्या प्रमाणात लांब धाग्याच्या कापसाची आयात होऊन विदेशी मुद्रा मोठ्या प्रमाणात दान दिल्यासारखी स्थिती होती. त्यामुळे शासन शेतकऱ्यांचे नुकसान कसे करीत आहे हे समर्थपणे समजावून सांगितले. शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाला वाचा फोडली.[१०२] (दैनिक शिवशक्ती, अकोला ता. २९-११-१९६८)

*

# भाग - ७

# सामाजिक कार्य

छत्रपती शिवाजी महाराज स्मारक शिलान्यास समारंभ पुणे येथे युवराज प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या हस्ते पार पडला. या समारंभाला पंढरीनाथ पाटील उपस्थित होते. हिंदुस्थानातील मान्यवर मराठा समाजाचे नेते या कार्यक्रमासाठी आलेले होते. त्यांच्यापैकीच एक मान्यवर ग्वाल्हेरचे श्रीमंत माधवराव महाराज होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई इलाखा पाटील परिषदेचे अधिवेशन भरविण्यात आले. ही पाटील परिषद शुक्रवार पेठेतील मराठा हायस्कूलच्या मैदानावर उभारलेल्या भव्य मंडपात पार पडली. या परिषदेसाठी २५ हजार गावांचे पाटील (पोलिस व मुलखी) उपस्थित होते. या परिषदेवर छत्रपती शाहू महाराजांचे वर्चस्व सर्वत्र जाणवत होते. शाहू महाराजांच्या उत्तुंग व्यक्तिमत्वाच्या वटवृक्षाच्या छायेत ही परिषद विविध विषयांच्या चर्चेने चांगलीच रंगली होती. देशभरातील ज्येष्ठ श्रेष्ठ मान्यवर, तज्ज्ञ पोटतिडकीने बोलत होते. शिक्षणाचे महत्व सर्वसामान्य माणसाला कळावे. शेवटच्या माणसापर्यंत शिक्षणाचा प्रकाश पोहचावा व तोही प्रकाशित व्हावा. अस्पृश्यतेचे उच्चाटन व्हावे. जातपात न मानणारा समाज निर्माण व्हावा, सामाजिक समता निर्माण व्हावी, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील ब्राह्मणी वर्चस्व घालवून ब्राह्मणेतरांना समान अधिकार मिळावेत असा आवाज या परिषदेत उठविण्यात आला. ही चर्चा सतत दोन दिवस चालली. सर्व विषय बहुअंगाने चर्चिल्या गेले. सभामंडपात सत्यशोधकी जलशांच्या माध्यमातून सतत दोन रात्री कासेगावकर, जोपूळकर, रेळ्ळूकर या जलशांनी करमणुकीतून समाज जागृतीची हळी दिली. त्यामुळेच लोळागोळा झालेला सारा महाराष्ट्र नव्या विचारांच्या नव्या दमाने जागा झाला. या परिषदेचा पंढरीनाथांच्या तरूण संवेदनक्षम मनावर चांगलाच परिणाम झाला. आतापर्यंत अनुभवातून, वाचनातून व श्रवणातून त्यांच्या मनाची मशागत झालेली होती. ती आता उपजावू जमिनीप्रमाणे तयार झाली. पुण्यात असताना त्यांनी विजयीमराठाचे संपादक श्री. श्रीपतराव शिंदे, जागरूक वृत्तपत्राचे संपादक वालचंद हिराचंद कोठारी, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, बाबुराव जेधे, भास्करराव जाधव इत्यादी मान्यवरांच्या भेटी घेतल्या. परिचय करून घेतला व आपलाही परिचय त्यांना दिला.

तेथे त्यांच्या मनात समाजसेवेचा कोंब अंकुरला. सत्यशोधक चळवळीचे लोण समाजसुधारणेसाठी संपूर्ण वऱ्हाडात पसरविण्याचे कंकण बांधूनच ते नव्या विचारांचे वादळ घेऊन वऱ्हाडात परतले. (११४) (शाहू छत्रपती व लोकमान्य, लेखक- य. दि. फडके, पृष्ठ क्र. २९६,२९७)

## भटकर-पंढरीनाथ भेट

सामाजिक क्षेत्रात विशेषत: अस्पृश्यता निवारण कार्यात पंढरीनाथ पाटलांना साह्यभूत ठरणारे त्यांचे परमस्नेही बुद्धवासी लक्ष्मण श्रावण भटकर हे होते. १९२१ साली ते चिखलीस पंढरीनाथ पाटलांकडे आले. ते महार जातीचे होते. त्या काळात महारांना अस्पृश्य मानले जाई. असे असतानाही पंढरीनाथ पाटलांनी त्या काळातही अस्पृश्यास्पृश्य भेदाभेद पाळला नाही. लक्ष्मणराव भटकर हे गुरूवर्य विठ्ठल रामजी शिंदे यांच्या मुंबई येथील डिस्प्रेसड् क्लास मिशनमध्ये तयार झालेले व ब्राह्मो तसेच प्रार्थना समाजाचे बाळकडू प्यालेले तरूण सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांना त्याच तत्त्वाचा व महात्मा फुलेंच्या सत्यशोधक समाजाशी इमान राखणारा असामान्य सेवक पंढरीनाथ पाटलांच्या रूपाने मिळाला.

पंढरीनाथ पाटील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक कोनशिला समारंभात गेले असता पुणे मुक्कामी ते जेधे मेन्शनमध्ये थांबले. सत्यशोधक चळवळीतील थोरामोठ्यांचा मुक्काम जेधे मेन्शनमध्येच असे. जेधे मेन्शन हे सत्यशोधक चळवळ व ब्राह्मणेतर चळवळीचे एक प्रमुख केंद्र होते. तेथे पंढरीनाथ पाटलांच्या या चळवळीतील नावाजलेल्या नेत्यांशी भेटी झाल्या. कोनशिला समारंभातील भाषणे व नेत्यांच्या संपर्कामुळे ते प्रभावीत झाले.

शाहू छत्रपती वेद मानणारे होते. (११५)(शाहू छत्रपती व लोकमान्य, लेखक- य. दि. फडके, पृष्ठ क्र. १८९) वैदिक धर्मात जाती व भेदाभेद नाही. हे त्यांना दयानंद सरस्वतींच्या ब्राह्मोसमाज व आर्यसमाज यातून कळलेले होते. वेदोक्त प्रकरणापासून ते ब्राह्मणांचा राग करू लागले. वेद व धर्मशास्त्राबाबत त्यांच्या प्रस्थापित अधिकारांना छेद देऊ लागले. ते सत्यशोधकांना जवळ करीत असत. त्यांना मदतही करीत असत. पण ते सत्यशोधक नव्हते. ते मूर्तिपूजा व वैदिक धर्म मानणारे होते. बहुजनांनी संस्कृत अध्ययन करून बहुजनांच्या मुलांना वेदविद्या अवगत व्हावी म्हणून त्यांनी क्षात्रजगत्‌गुरू पद निर्माण केले. वैदिक शाळा काढली. पंढरीनाथ पाटील पुण्याला सात दिवस होते. ते शाहू छत्रपतींनी काढलेल्या

वैदिक शाळेतही सहा महिने विद्यार्थी होते. त्या काळात त्यांना छत्रपती शाहूंना जवळून पाहता आले. त्यांच्या अवतीभोवती वावरता आले. त्यांच्या मानवी मूल्यवर्धक भव्य व्यक्तिमत्वाचा तसेच त्यांच्या व्यापक आणि वास्तव विचारांचा त्यांच्यावर चांगलाच प्रभाव पडला. त्या सहा महिन्यात क्षात्रजगत्‌गुरू सदाशिवराव बेनाडीकर, हरिभाऊ लक्ष्मण चव्हाण, खंडेरावजी बागल (भाई माधवराव बागलांचे वडील), बाबुराव यादव (पहाडी आवाजाचा वक्ता-महान काळी तोफ) व दिनकरराव जवळकर यांच्याशी पंढरीनाथांचा परिचय झाला.

## जात-पात न मानणारे पंढरीनाथ पाटील

छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ब्राह्मणीवृत्तीच्या व्यक्तींनी जे सामाजिक चटके दिले तोच अनुभव पंढरीनाथ पाटील यांच्याही वाट्याला आला. मोहनीबुवा प्रकरण, भागवतबुवा देहुकर प्रकरण यातून सामाजिक उच्चनीचतेची भावना प्रकट झाल्यामुळे या समाजामध्ये जातपात न मानणारा असा नवा समाज घडविण्याचे काम त्यांनी हाती घेतले. ही सुरूवात त्यांनी स्वत:पासूनच केली. ते ज्या ठिकाणी जात त्या त्या ठिकाणी ते शक्यतोवर ब्राह्मणेतरातील कमी लेखलेल्या जातीच्या मित्रांकडे थांबत असत. निवडणुकीच्या प्रचारार्थ भटकत असतांना १९२३ साली ते उतरादा व मेरा खुर्द येथे जनसंपर्क बैठका घेण्यासाठी जाऊन मेरा खुर्द येथे रात्री मुक्कामी म्हतारजी न्हावी यांचेकडे थांबले. जातपात पाळायची नाही व जातिविरहित समाज निर्माण करायचा. ही सुरूवात त्यांनी याच ठिकाणापासून स्वत:च्या आचरणाने सुरू केली.

## चांभार व महार परिषद

१७ व १८ नोव्हेंबर १९२४ रोजी हिंगणे कारेगाव येथे झालेल्या निर्णयानुसार खामगांव तालुकास्तरीय सत्यशोधक परिषद झाली. या परिषदेच्या मांडवातच खामगावचे बाजीराव ना. बोबडे वकीलांच्या अध्यक्षतेखाली प्रथम खामगांव तालुका चांभार परिषद भरली व नंतर एल. एस. भटकर यांच्या अध्यक्षतेखाली महार परिषद उत्तम रितीने पार पडली. या परिषदांमध्ये आनंदस्वामी, गवई, भटकर वगैरे वक्त्यांची मार्गदर्शक भाषणे झाली. तसेच त्या त्या समाजास उपकारक असे ठरावही पास झाले. या सर्व परिषदांच्या आयोजनात पंढारीनाथ पाटलांची प्रेरणा होती.

## दर्यापूरची चांभार परिषद

दिनांक २५, २६ व २७ मे १९२६ रोजी चिखली येथे वऱ्हाडप्रांतीय ब्राह्मणेतर राजकीय परिषद झाली. या परिषदेपूर्वीच २१ व २२ मे १९२६ रोजी दर्यापूर येथे चांभार परिषद झाली. यावेळी या परिषदेचे अध्यक्षस्थान आनंदस्वामी यांनी भूषविले. ही सभा बॅ. रामराव देशमुखांच्या आश्रयाने झाली. आनंदस्वामी व देशमुखात राजकीय मतभेद असले तरी अस्पृश्योद्धारक कार्यात ते आघाडीवर असत. त्यांच्या आश्रयानेच तेथे अस्पृश्यांसाठी वसतिगृह उत्तमप्रकारे चालविले गेले, याचा गौरवपूर्ण उल्लेख आनंदस्वामींनी केला. यावेळी पंढरीनाथ पाटलांचे जोरदार भाषण झाले. अस्पृश्योद्धार कार्यात पंढरीनाथ पाटलांना चांगलाच रस होता. जातिभेद नष्ट केल्याशिवाय राष्ट्रोन्नती होणार नाही. असे आनंदस्वामींनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बजावून सांगितले.

## मातंग परिषद पुणे

सामाजिक कार्यासाठी विशेषत: दलित मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी ते सतत झटत असत. गावागावात जाऊन मागासवर्गीयांच्या वस्तीत सभा, बैठका घेऊन सामाजिक सुधारणेचे विचार मांडत तसेच इतरांनी भरविलेल्या परिषदांच्या कार्यक्रमात आवर्जून उपस्थित राहून सक्रिय सहभाग घेत असत. दिनांक २० जुलै १९२७ रोजी सायंकाळी साडेसात वाजता पुणे येथे मातंग वस्तीत आयोजित मातंग परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सोबत वऱ्हाड प्रांताचे सामाजिक कार्यकर्ते पंढरीनाथ पाटील उपस्थित होते. या परिषदेचे अध्यक्ष 'दीनबंधू' चे संपादक डॉ. नवल हे होते. डॉ. बाबासाहेबांच्या भाषणानंतर पंढरीनाथ पाटलांचे भाषण सुरू असताना मातंग वस्तीतील एका आजारी व्यक्तीचे निधन झाल्याची वार्ता तेथे आली. पंढरीनाथ पाटलांचे भाषण शोकसभेच्या भाषणात रूपांतरित झाले व ही परिषद संपली. या परिषदेसाठी तीन हजारावर लोक पाऊस सुरू असताना शेवटपर्यंत उपस्थित होते. [१२२]

(डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे व लेख खंड १८ - भाग १, पृष्ट क्र. ५७ व ५९)

## सातगाव भुसारी येथील महार परिषद

बुलडाणा जिल्ह्यात सत्यशोधक चळवळीत पंढरीनाथ पाटील तर आंबेडकरी चळवळीत सातगाव भुसारीचे मारोती काळुजी जाधव हे आघाडीवर होते. हे दोघेही कार्यकर्ते काही काळ पुणे परिसरात वर्षातून एकदोन वेळा जाऊन सभासम्मेलने घेऊन

लोकजागृती व प्रबोधनाचे कार्य करीत. या दोनही चळवळी एकमेकींना पूरक होत्या. तसेच हे दोघेही कार्यकर्ते एकमेकांना सहाय्यक होते. या दोघांनीही वऱ्हाडमध्यप्रांतातील बुलडाणा जिल्ह्यातील सातगाव भुसारी येथे १९२७ साली या दोन्ही चळवळींचे माध्यमातून 'वऱ्हाडप्रांतीय अस्पृश्य महार परिषद' चे भव्य आयोजन केले. या परिषदेसाठी मराठवाड्यातील महार मोठ्या संख्येने उपस्थित होते. या परिषदेतील पंढरीनाथ पाटील व बुलडाणा जिल्ह्यातील पहिले आय.सी.एस. झालेले सातगाव भुसारीचे श्री. एम. के. जाधव यांची प्रेरक भाषणे झाली. या भाषणातून प्रेरणा घेऊन त्याचवर्षी अकोला जिल्ह्यात रिसोड येथे आंबेडकरी कार्यकर्ते श्री. कचरू जुमळे यांनी रिसोड व वाशिम येथे तर काशिनाथ बाबा गुरूब्रम्हानंद यांनी बुलडाणा येथे अशी मागासवर्गीयांसाठी वसतीगृहे सुरू केली.

१९२४ साली बी.ए. झालेले एम. के. जाधव १९२७ साली आय.सी.एस. झाले. या परिषदेत पंढरीनाथ पाटलांनी त्यांचा जाहीर गौरव केला. ते भारतातील अस्पृश्यांपैकी पहिले आय.सी.एस. होते. त्यांच्या या गौरवामुळे महारांमध्ये आपल्या मुलांना शिकविण्याची प्रेरणा मिळाली.

याच परिषदेत दुसऱ्या दिवशी मोर्शीचे समाजभूषण नारायणराव उर्फ नानासाहेब अमृतकर यांच्या सत्यशोधकी पौरोहित्यात अस्पृश्यांना जाणवे घालण्याचा कार्यक्रम झाला. भटांना लाजविण्यासाठी, धार्मिक समता प्रस्थापिण्यासाठी अमृतकरांनी मंत्रोच्चार करीत पंढरीनाथ पाटील, आनंदस्वामी, एम. के. जाधव व एल.एस.भटकर हे अस्पृश्यांना जाणवे घालत. ते जाणवे परिधान केलेला अस्पृश्य आपल्या गावी जायचा, तेव्हा तेथील ब्राह्मणांची डोकी भडकत. या परिषदेनंतर उमनगावचे निंबाजी महार (मोरे) स्नान करून गीतापठन करीत.

(श्री. पी. एन. मोरे, इतिहास संशोधक, बुलडाणा)

महात्मा फुलेंचे दुसरे चरित्र लिहिण्यासाठी साधने शोधत असताना ते फिरत फिरत मुंबईला पोचले. त्यावेळी ते पहिल्या दिवशी वंडेकरांकडे थांबले व दुसऱ्या दिवशी १७ जुलै १९२८ रोजी दुपारी जेवणासाठी पंडित नामक न्हांव्याकडे सर्व सहकाऱ्यांसह पोयबावाडीत गेले. ते जेथे जात तेथे ते आपल्या अस्पृश्य मानलेल्या मित्रांकडे अगत्याने जात व जाती पाती नष्ट करण्यासाठी प्रयत्न करत. समता स्थापन करण्यासाठी स्वआचरणाने इतरांना प्रेरित करत.

**मित्रांचे घरगुती वाद मिटविण्याचे प्रयत्न**

दिनांक २७ डिसेंबर १९३० रोजी ते यवतमाळ व रोहणीस गेले. तेथे त्यांचे मित्र गुलाबराव वसू होते. दिनांक २९ ला श्री. गुलाबराव वसू व श्री. वामनराव वसू या दोघा बंधुंच्या मालमत्तेच्या वाटण्या झाल्या. त्यास पंढरीनाथ पाटील, शंकरराव वसू, दादासाहेब देशमुख व श्री. सावळे हे साक्षीदार होते. ३० डिसेंबरला वसू बंधुंकडे रोहणीस थाटाचे जेवण झाले व या वर्षाचा शेवट गोड झाला.

**बुलडाणा जिल्हा मराठा परिषद : मराठेतरांनी योजलेली**

पंढरीनाथ पाटलांच्या संपर्कातून व त्यांच्या भाषणातून मराठा समाजात जागृती आलेली होती. या जागृतीचा परिणाम मराठा समाज संघटित होण्यास साह्यभूत ठरला असे दिसून आले. दिनांक ३० व ३१ डिसेंबर १९३४ रोजी मेहकर तालुक्यातील जानेफळ येथे बुलडाणा जिल्हा मराठा परिषद झाली. सदर मराठा परिषद, बुलडाणा जिल्ह्यातील भटाळलेले, ब्राह्मणेतर, प्रभू व मराठे यांनी बोलावली होती. परंतु ती मराठा परिषद असून तेथे मराठा समाजाशिवाय इतरांना वाव नसावा अशी धारणा जाती परंपरा व रूढी आहेत. ज्या जातीची परिषद त्याच जातीचे अध्यक्ष, स्वागताध्यक्ष व आयोजक मंडळ असते. परंतु तेथे मात्र विष्णुपंत कोरडे वकील प्रभू यांनी ही परिषद बोलावली. आपले बहुमत सिद्ध करण्यासाठी त्यांनी आपल्या प्रभावळीतील प्रभू, वंजारी, माळी, गवळी इतकेच नव्हे तर मारवाडी लोकांना सुद्धा मराठा परिषदेच्या स्वागत मंडळात सामील करून घेतले. आपल्या प्रभावळीतील या लोकांच्या सहकार्याने प्रथमच मराठा समाजाचा जिल्हा कौन्सिल अध्यक्ष झालेल्या पंढरीनाथ पाटलांवर निंदाव्यंजक ठराव पास करावा अशा नीच हेतूने ही परिषद या मराठेतरांनी ब्राह्मणाळलेल्या मराठ्यांच्या मदतीने बोलावली होती. परंतु जिल्ह्यातील जागरूक मराठ्यांच्या व पुढाऱ्यांच्या लक्षात ही बाब आली. या परिषदेला फार मोठ्या संख्येने मराठे उत्स्फूर्तपणे जमले होते. आदल्या दिवशी रात्रीच स्वागत मंडळातील स्वाभिमानी मराठ्यांनी स्वागत मंडळाची सभा घेऊन सदर परिषदेचे अध्यक्षस्थानी या जिल्ह्यातील मराठा पुढारी श्री. जगदेवराव भालेराव (चांदूरबिस्वा) यांची निवड केली व तसा ठराव पास झाला.

परिषद बोलावणाऱ्यांनी नियोजित केलेल्या अध्यक्षांऐवजी पूर्वरात्री स्वागत मंडळाने ठरविलेले अध्यक्ष श्री. जगदेवराव भालेराव यांचे नाव, इशस्तवन व स्वागताध्यक्ष रामभाऊ थोरात यांचे स्वागतपर भाषण झाल्यानंतर परिषदेचे सेक्रेटरी श्री. विठ्ठलराव

पवार यांनी अध्यक्षाचे नाव सुचविले. त्यास आनंदस्वामी यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर लगेच स्वागत मंडळाचे उपाध्यक्ष श्री. चोपडे यांनी उत्तमराव इटकीकर एम.एल.ए. यांचे नाव सुचविले व त्यास मेतकर वकील यांनी दुजोरा दिला. त्यामुळे अध्यक्षाच्या जागेवर कुणी बसावे असा पेच निर्माण झाला. अखेरीस आनंदस्वामी यांनी आपण सुचविलेला अध्यक्ष हा काल रात्री स्वागत मंडळाने ठरविला आहे असे सांगून आपली सूचना कायदेशीर असल्याचे त्यांनी जाहीर केले. त्यामुळे जनसमुहानेही जगदेवराव भालेराव यांनीच अध्यक्षस्थान स्वीकारावे अशी मागणी केली. दोन महिने कष्ट व मेहनत करून बोलाविलेल्या परिषदेत मराठा नसलेल्या कोर्डे प्रभृती यांनी मराठ्यात दुफळी माजविण्याच्या व पंढरीनाथ पाटील व आनंदस्वामी यांच्यासारख्या खंबीर व बाणेदार वृत्तीच्या मराठा पुढाऱ्यांच्या जीवावर उठलेल्या प्रभु, वंजारी, दाळवाले इत्यादी जातीचे वकील बॅरिस्टर व श्री. भिकू मारोती पाटील इत्यादी राष्ट्रीय उर्फ भटाळलेले असंतुष्ट व आशाळभूत असलेले हे थोडे मराठे यांना मराठा समाजाकडून चांगलीच थप्पड मिळाल्यामुळे लगेच परिषदेच्या मंडपातून आपल्या लग्नाचे बाशिंग बांधून आलेल्या अध्यक्ष उत्तमराव इटकीकरांसह... घालून काढता पाय घेतला. त्यावेळी सात हजारावर जमलेल्या मराठा जनसमूहाने जगदेवराव भालेराव अध्यक्षस्थानी विराजमान होतांना टाळ्यांचा कडकडाट केला. त्यानंतर दोन दिवस परिषदेचे काम मोठ्या थाटात पार पडले. त्यात पहिला मराठा जिल्हा कौन्सिल अध्यक्ष म्हणून पंढरीनाथ पाटलांचा व उपाध्यक्ष म्हणून पुंजाजी पाटलांचा सत्कार झाला. एकूण सोळा ठराव पास झाले. आनंदस्वामी व पंढरीनाथ पाटील तसेच अध्यक्ष जगदेवराव भालेराव यांची मराठा व शेतकरी हितवर्धक दोन दोन तासांची व्यासंग करून मार्गदर्शक भाषणे झाली. पास झालेल्या सोळा ठरावात-

१. शिक्षणप्रसार २. धार्मिक विधी स्वत: करणे. ३. वाईट चालीरीती सोडणे. ४. लग्नात काटकसर ५. नापिकीमुळे शेतसारा माफी ६. तकावी जास्त मिळावी. ७. लवाद कायदा दुरूस्ती. ८. मेहकर लवाद कोर्टावर मराठ्यांच्या संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधी ९. तलाठी पद्धत सुरू करणे. १०. कामगार पाटलास मुशाहिरा व नक्कल फी मिळणे. ११. आखाडे काढणे १२. जिल्हा मराठा परिषदेत धाडस दाखविल्याबद्दल स्वागत मंडळाध्यक्ष श्री. रामभाऊ थोरात व सेक्रेटरी श्री. विठ्ठलराव पवार, लक्ष्मणराव पाटील, यशवंतराव पाटील, विठ्ठलराव काळे यांचे स्वागतमंडळाचे व अध्यक्षस्थान स्विकारल्याबद्दल भालेराव यांचे अभिनंदन करण्यात आले. (३६) (श्याम सुंदर, नागपूर ता. ८-१-१९३५)

### देऊळगाव राजा येथे हरिजन सभा व उंद्री अस्पृश्यता विरोधी संमेलन

पंढरीनाथ पाटील जातिभेद निर्मूलन, ब्राह्मणशाहीचे वर्चस्व नाकारणे व सामाजिक समता प्रस्थापित करणे यासाठी सतत झटत असत. त्यांना ब्राह्मणेतर समाजाकडून उत्तम सहकार्य मिळत असे. त्यांच्या अध्यक्षतेखाली सभासम्मेलने होऊन सामाजिक जनजागृतीचे कार्य होत असे. दिनांक २ नोव्हेंबर सोमवार १९३६ रोजी देऊळगाव राजा येथे पंढरीनाथ पाटलांच्या अध्यक्षतेखाली सात हजारावर हरिजन बांधवांचा मेळावा होऊन त्याठिकाणी झालेल्या सभेत पंढरीनाथ पाटलांचे समाजजागृती करणारे व सुधारणा करणारे जोरदार भाषण झाले.

त्याचवर्षी उंद्री ता. चिखली जि. बुलडाणा येथे एस. के. नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्यता विरोधी सम्मेलन घेतले. यावेळी २० हजारावर लोक उपस्थित होते. विहिरी व मंदिरे अस्पृश्यांना खुल्या करण्यात याव्यात असा ठराव पारित करून निर्णय घेतला.

### हटकर मराठा परिषद केळवद

२२ फेब्रुवारी १९४५ रोजी केळवद येथे हटकर मराठा समाज परिषदेचे दुसरे अधिवेशन झाले. त्यात समाजसुधारणेबाबत पंढरीनाथ पाटलांचे दीड तास उद्‌बोधक भाषण झाले. तसेच चिखली येथील उर्दू शाळेत २६ फेब्रुवारी १९४५ रोजी महंमद पैगंबर दिनानिमित्त पंढरीनाथ पाटलांचे भाषण झाले. त्या काळात जाहिराती फार मोठ्या प्रमाणात करण्याची सोय नव्हती, म्हणून समाजजागृतीतून निर्माण झालेली दृष्टी काही समाजबांधवांच्या प्रत्यक्ष कृतीतून दिसून आली. त्या काळात लग्नपत्रिकेत जाहीर केल्याप्रमाणे टुनकी येथे नामदेवराव टापरे यांच्या मुलाच्या लग्नात 'समाजसुधारणा' या विषयावर भाषण झाले. तसेच त्या दिवशी रात्री तुकाराम बीजेनिमित्त पंढरीनाथांचे तुकारामांच्या संदर्भात माहितीपूर्ण असे भाषण झाले. नामदेवराव टापरे यांनी लग्नपत्रिकेत सदर कार्यक्रमाची सूचना प्रसिद्ध करून काटकसरीचाही आदर्श घालून दिला. हे समाजजागृतीचेच लक्षण होय.

### कामाचा उरक

पंढरीनाथ पाटलांचा जनसंपर्क, कामाचा वकुब व उरकही वाखाणण्यासारखा होता. विविध सभा सम्मेलनांचे व संघटनांचे संदेश ते हातोहात पोचवून पार पाडत

असत. २ एप्रिल १९४५ रोजी अशाच दोन सभा झाल्या. बुलडाणा जिल्हा पाटील संघ कार्यकारी मंडळ व जिल्हा पाटील संघ परिषद, अधिवेशन भरविण्यासाठी खास सभा त्यांच्या चिखली निवासस्थानी होऊन स्वागतमंडळ सभाही तेथेच झाली. त्यात विविध प्रश्नांची चर्चा व ते प्रश्न सोडविण्याचे मार्ग शोधण्याबाबत सविस्तर चर्चा होऊन महत्त्वाचे ठराव पास करण्यात आले.

## बुलडाणा जिल्हा कामगार पाटील परिषद

दुसरे महायुद्ध संपले होते. महायुद्धाची धामधूम संपल्यावर शांततामय वातावरण निर्माण झालेले होते. त्यामुळे आता विविध संघटना आपल्या कामाला लागल्या. गावचा कारभार पाहणाऱ्या पाटलांच्या संघटनेचे बुलडाणा जिल्हा कामगार पाटलांच्या परिषदेचे बुलडाणा जिल्हा कौन्सिलच्या श्री शिवाजी सभागृहात तिसरे अधिवेशन रविवार दिनांक ३ जून १९४५ रोजी भरले. या परिषदेस जिल्ह्याच्या विविध भागातून ५० प्रतिनिधी उपस्थित होते. या परिषदेचे स्वागताध्यक्ष म्हसल्याचे रावसाहेब देवसिंग पाटील हे होते. त्यांचे स्वागतपर भाषणानंतर डेप्युटी कमिश्नर श्री. रोले यांचे उद्घाटनपर भाषण झाले. सदर परिषदेचे अध्यक्षस्थान उमरावती जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष श्री. बाबुराव देशमुख यांनी मंडित केले. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात युद्धकाळात पाटील लोकाकडून दोस्त राष्ट्रांना झालेल्या अमोल मदतीचे वर्णन करून त्यांच्या सध्याच्या हलाखीचे चित्र उत्तम प्रकारे रेखाटले. नंतर आ. पंढरीनाथ पाटील व लक्ष्मणराव भटकर यांची भाषणे झाली. या परिषदेत १. दोस्त राष्ट्रांच्या विजयाबद्दल आनंद. २. मुशाहिऱ्यात वाढ ३. पाटलांना बंदुकीचे परवाने फी न भरता घेता यावे. ४. कार्यकारिणी मंडळाची निवड वगैरे ठराव करण्यात आले. [(४८) (महाराष्ट्र ता. १०-६-१९४५)]

## वऱ्हाडातील एक मोहरा गेला

वऱ्हाडात सत्यशोक चळवळ ज्या लोकांनी जिद्दीने व जोमाने चालविली. अशा लोकांपैकीच एक नायगाव जिल्हा अमरावतीचे श्रीमंत गुलाबराव खुशालराव पाटील राणा शिसोदा नायगावकर हे एक ज्येष्ठ श्रेष्ठ असे कार्यकर्ते होते. दिनांक २६ जून १९४५ मंगळवारी त्यांचे निधन झाले. त्यावेळी पंढरीनाथ पाटलांनी आपल्या शोकसंवेदना चिखली येथे व्यक्त करताना म्हणाले, 'वऱ्हाडातील एक सुप्रख्यात सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते व पट्टीचे कट्टे अस्पृश्योद्धारक श्रीमंत गुलाबराव खुशालराव पाटील राणा शिसोदा

नायगावकर जि. अमरावती यांना दिनांक २६ जून १९४५ रोजी दुपारी ४ वाजता देवाज्ञा झाली. मरण समयी त्यांचे वय सुमारे ५५ वर्षांचे असेल. कै. गुलाबराव पाटील यांनी आयुष्याची ३५ वर्षे सतत सत्यशोधक प्रचारार्थ व प्रसारार्थ घालविले. भटभिक्षुकांनी त्यांच्यावर तसाच एक मोठा खटला भरला होता. तथापि अखेर सत्याचा जय होऊन गुलाबराव पाटील हे त्या सर्व खटल्यातून सहीसलामत सुटले. वऱ्हाडात सर्वत्र गाजलेला नायगावकरांचा सत्यशोधक जलसा यांच्याच आश्रयाने अनेक वर्षे प्रचंड जागृती करीत होता. सत्यशोधक समाजाच्या प्रसारार्थ त्यांनी हजारो रूपये खर्च केले. ते मोठे दानशूर, दिलदार व उमद्या स्वभावाचे होते. त्यांचा मित्रपरिवार दांडगा होता. एक वर्ष ते ऑनररी बेंच मॅजिस्ट्रेट, चांदुर लोकलबोर्डाचे मेंबर व उमरावती जिल्हा कौन्सिलचे सभासद होते. ते खरे कळकळीचे व कर्ते समाजसुधारक होते. त्यांनी लोककल्याणाची अनेक कामे केली. त्यांच्या वडीलांनी कै. भालेकर, डुमरे व श्री. नारोबाबाजी महाभट यांना ५० वर्षापूर्वी वऱ्हाडात आश्रय देऊन सत्यशोधक समाजास प्रोत्साहन दिले होते. तेच कार्य गुलाबराव पाटील यांनी सतत चालविले होते. त्यांच्या मृत्युमुळे वऱ्हाडाच्या सत्यशोधक समाजातील एक मोहरा गेला आहे. कधीही भरून न येणारे असे हे मोठे नुकसान आहे. ईश्वर मृतात्म्यास शांती देवो.' (४९)

(४९) राष्ट्रवीर, बेळगाव ता. १३-७-१९४५, (५१) सिंध मराठा ता. २९-७-१९४५

## कै. वीर गुलाबराव पाटील स्मारक निधी समिती

कै. गुलाबराव पाटलांच्या निधनाबद्दल अनेक शोकसंदेश आले. त्यांच्या तेरवीचा कार्यक्रम दिनांक ९ जुलै १९४५ रोजी झाला. भोजनोत्तर दुपारी ३ वाजता नायगाव येथे पंढरीनाथ पाटील एम.एल.ए. चिखली यांच्या अध्यक्षतेखाली शोकप्रदर्शनार्थ प्रचंड सभा झाली. कै. वीर गुलाबराव पाटील यांच्यावर गुणगौरवपर भाषले झाली. त्यात सर्वश्री भाऊसाहेब गुंड, मोर्शी, दादासाहेब कळाशीकर, काशीराव पाटील, तुकारामजी चव्हाण सुनगाव, कदम वकील आर्वी, करीमभाई मंगरूळ, आनंदराव लटक अमरावती इत्यादी व्यक्तींचा समावेश होता.

समारोपाच्या भाषणात अध्यक्ष पंढरीनाथ पाटील यांनी वीर गुलाबराव पाटलांच्या स्मारकाची कल्पना मांडली. ती सर्वांनी स्वीकारून जागेवरच ५६२३ रूपयांचे आकडे पडले. या सभेत एक स्मारक समिती स्थापन करण्यात आली. ती अशी, अध्यक्ष पंढरीनाथ पाटील एम.एल.ए. चिखली, खजिनदार श्री. अंबादासराव पाटील

(गुलाबरावांचे वडीलबंधु), चिटणीस श्री. कदम वकील, सहचिटणीस श्री. काशीराव पाटील. सदर कमिटीचे कार्यालय नायगाव येथे ठेवण्यात आले. सदर स्मारकासाठी वीस हजार रूपये जमविण्याचे लक्ष्य ठरले. सदर रक्कम ही सत्यशोधक समाजाचे अंगभूत कार्य शिष्यवृत्त्या, उमरावतीत समाजमंदीर उभारणे अथवा छापखाना उभारून नियतकालीक (वा) वाङ्मय प्रकाशित करणे. यापैकी योग्य ते कार्य हाती घेण्याचे ठरले.

## वीर पदवी

कै. गुलाबराव पाटील हे धार्मिक स्वातंत्र्याच्या लढ्यात लढत असताना समरांगणावर पतन पावले म्हणून त्यांना 'वीर' ही पदवी संबोधण्याचा ठराव करण्यात आला. (५०) (तरूण भारत, नागपूर ता. १८-७-१९४५)

## वऱ्हाड पाटील पटवारी परिषद

शेतकरी व शिक्षकांप्रमाणेच पंढरीनाथ पाटलांनी गावपातळीवरील अधिकारी व पाटील पटवारी यांच्याही परिषदा घेण्याचे काम केले. २ फेब्रुवारी ११९४६ रोजी अकोला येथे भरलेल्या वऱ्हाड पाटील, पटवारी परिषदेत पंढरीनाथ पाटलांनी उत्कृष्ट मार्गदर्शन करून समस्या निवारक भाषण केले.

## सर्वसामान्यात सहकारी तत्त्व रूजविण्याचा प्रयत्न

पंढरीनाथ पाटील स्वदेशी चळवळीबरोबर सहकारी चळवळीचे काम खेडोपाडी करीत असत. सहकाराचे तत्व सर्वसामान्य माणसात रूजविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. व सहकाराचे महत्व पटवून देण्यासाठी खेडेगावात सहकारी दुकानाची सुरूवात केली. अशाच एका सहकारी दुकानाचे दिनांक १३ ऑगष्ट १९४६ रोजी चिखली जवळील केळवद येथे पंढरीनाथ पाटलांनी उद्‌घाटन केले. त्यावेळी सहकाराचे माध्यमातून जनकल्याण कसे साधल्या जाते हे त्यांनी आपल्या भाषणातून लोकांच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न केला.

## सामाजिक परिवर्तनाची पावती

पंढरीनाथ पाटलांचा जनसंपर्क दांडगा होता. तसेच अधिकारी वर्गाशी त्यांची स्नेहसंबंध चांगला होता. एक काळ होता, पंढरीनाथ पाटलांना लक्ष्मणराव भटकरांबरोबर

ते अस्पृश्य असल्यामुळे बैलांच्या गोठ्यात जेवावे लागले. तर आता त्यांच्या जातीचे व प्रेमीजन त्यांना मेजवानीसाठी आपल्या घरी बोलावू लागले. अधिकारी पंढरीनाथ पाटलांना भेटण्यासाठी त्यांच्या घरी येऊ लागले. १७ ऑगष्ट १९४६ रोजी बुलडाण्याचे डी.एस.पी. त्यांना भेटण्यासाठी चिखलीस त्यांच्या घरी आले. तर साहेबराव लोखंडे (पारध शाहुराजा) यांनी पंढरीनाथ पाटलांना २५ लोकांसह त्याचदिवशी बुलडाणा येथे मेजवानी दिली. दिनांक २५ ऑगष्ट १९४६ रोजी पंढरीनाथांना भेटण्यास आलेल्या दिवाण नामदार बारलिंगे व नामदार देशमुख यांना पंढरीनाथ पाटलांनी आपल्या घरी मेजवानी दिली. हे दोनही दिवाण लोणार, चिखली, सावरगाव व बुलडाणा येथे जाऊन लोकांच्या भेटी घेऊन आले. पंढरीनाथांच्या लोकसंग्रहाची, सामाजिक कार्याची व राजकीय कार्याची प्रचिती त्यांना आली. सामाजिक परिवर्तनाची ही पावतीच होती.

उच्चपातळीवरील अधिकारी व पदाधिकारी यांचेशी पंढरीनाथांचा जसा संबंध होता तसाच संबंध गावपातळीवरील अधिकारी, कर्मचारी व पदाधिकारी यांच्याशीही होता. हा संबंध दृढ करण्यासाठी व ठेवण्यासाठी ते सतत या लोकांमध्ये वावरत. त्यांची संमेलने व परिषदा भरवत. त्यात मुद्दाम अध्यक्ष व वक्ता म्हणून भाषण करीत. दिनांक २७ ऑगष्ट १९४६ रोजी मलकापूर येथे गावपातळीवरील अधिकारी, पाटील व पटवारी यांची परिषद डॉ. गोपाळराव उपाख्य आबासाहेब खेडकर यांच्या अध्यक्षतेखाली घेऊन त्यांनी या परिषदेचे उद्घाटनपर भाषण केले.

पंढरीनाथ पाटील एक जबाबदार लोकप्रतिनिधी होते. लोकप्रतिनिधी म्हणून ते ज्या संस्थांवर प्रतिनिधित्व करीत त्या सर्व संस्थांच्या प्रत्येक सभेला उपस्थित राहण्याचा व सक्रिय सहभाग घेण्याचा ते आटोकाट प्रयत्न करीत. पक्षाच्या जिल्हा सल्लागार मंडळावर त्यांची सदस्य म्हणून २ सप्टेंबर १९४६ रोजी नियुक्ती झाली. ते पक्ष व सल्लागार समितीस आपले मार्गदर्शन देत. सामाजिक तेढ निर्माण होणार नाही याची काळजी घेत. १९४६ साली सर्वप्रथम हिंदुमुस्लीम तंट्यात चिखलीत उपद्रव सुरू झाला. यावर्षी गणपती उत्सव शांततेने पार पडावा म्हणून ८ सप्टेंबर १९४६ रोजी रात्री शांतता समितीची सभा बोलावली. पंढरीनाथ पाटलांनी मार्गदर्शक भाषण करून सामाजिक एकी निर्माण करण्यास लोकांना प्रोत्साहित केले. शांतता समितीची स्थापना केली. संभाव्य जातीय तेढ निर्माण होण्याचा धोका टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपयायांची व्यवस्था केली व शहरामध्ये शांतता व सुव्यवस्था राखण्यास आपल्या व्यक्तिमत्वाचा, पदाचा व अधिकाराचा त्यांनी योग्य तो त्यावेळी वापर केला.

उमरावती येथील ग्रामस्वराज्य शिबीरात दिनांक १० नोव्हेंबर १९४६ रोज रविवारी क्रांतिसिंह नाना पाटील व पंढरीनाथ पाटील यांची पहिली भेट झाली व त्या दोघांची वैचारिक मैत्री जमली. समाजकारणाशिवाय राजकारणाला अर्थ नाही हे त्यांना चांगलेच समजले होते. म्हणून त्यांनी नागपूर भागात आपला प्रभाव पाडण्यासाठी क्रांतिसिंह नाना पाटील यांचा दौरा नागपूर भागात आयोजित करण्यासाठी बॅ. शेषराव वानखेडे, डॉ. भिंगारे वगैरे मित्रांच्या १८ जानेवारी १९४७ रोजी नागपूर येथे भेटी घेऊन नाना पाटलांचा दौरा निश्चित केला. नागपूर भागात शेतकरी परिषदा नाना पाटलांच्या अध्यक्षतेखाली घ्याव्या असे त्यांनी आपल्या मित्रांशी विचारविनिमय करून ठरविले.

अन्नधान्य परिस्थिती बिकट होऊ लागली. त्यासंदर्भात १३ फेब्रुवारी १९४७ रोजी अकोला येथे राजस्थान भवनात असेंब्ली मेंबरांची व विदर्भ प्रांतिक काँग्रेस कमिटीची संयुक्त सभा झाली. अन्नधान्याचा प्रश्न कठीण आहे म्हणून बोर्डाच्या निवडणुकी सरकारने पुढील हंगामापर्यंत पुढे ढकलाव्यात असा ठरावच पास झाला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी जळगाव तालुका परिषद वडशिंगी येथे झाली. तिचे उद्घाटन पंढरीनाथ पाटलांनी केले.

### अन्नधान्य टंचाई

दुसऱ्या महायुद्धानंतर देशामध्ये दुष्काळ एकापाठोपाठ एक पडू लागले. युद्धकाळात देशातील धान्याचे साठे कमी झालेले होते. त्यात दुष्काळाची भर पडली व देशात अन्नधान्य टंचाई निर्माण झाली, ही टंचाई नियंत्रित करण्याठी तालुका सल्लागार समित्या नियुक्त करण्यात आल्या. सर्वसामान्य गरीब माणसाला अन्नधान्य सहज व रास्त भावात उपलब्ध व्हावे याची काळजी या सल्लागार समित्या घेत असत. बुलडाणा जिल्ह्यातील अशा सल्लागार समित्यांची एक संयुक्त सभा दिनांक ३१ मे १९४७ रोजी खामगाव येथे ना. आर. के. पाटील अन्नधान्य खात्याचे दिवाण यांचे अध्यक्षतेखाली झाली. या सभेत जिल्ह्यातील अन्नधान्य परिस्थिती वाईट असल्याचे निदर्शनास आले. ही परिस्थिती सुधारण्यासाठी पंढरीनाथ पाटलांनी उपाय सुचविण्याचे काम उत्तम रितीने केले. काही बाबतीत चर्चा व वादही झाले. त्यानंतर ना. दिवाण श्री. आर. के. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७ जून १९४७ रोजी पातुर्डा बु॥ येथे शेतकरी परिषद झाली. त्या परिषदेत पंढरीनाथांनी मार्गदर्शन केले.

अन्नधान्य परिस्थिती बिकट झाली होती. मजुरांना सरकारी दुकानातून

अन्नधान्य मिळावे म्हणून पंढरीनाथ पाटील दिनांक १६ जून १९४७ रोजी चिखली येथील सरकारी दुकानावर बंदोबस्तासाठी स्वत: हजर राहिले. दिवसभर तेथे थांबले होते. सुमारे ५००० मजूर ज्वारीसाठी त्यादिवशी आलेले होते. एवढ्या सर्व जमावाला त्यांनी शिस्तीत काबूत ठेवले. दुसऱ्या दिवशी त्यांच्या भेटीसाठी डेप्युटी कमिश्नर श्री. एम. आर. जोशी हे चिखलीस आले. अन्नधान्याच्या बिकट परिस्थितीतून कसा मार्ग काढावा याबद्दल त्या दोघांनी दीड तास चर्चा केली. टंचाई काळात गरीबांना व्यवस्थित अन्नधान्य मिळविण्याची पंढरीनाथ पाटलांनी खूपच काळजी घेतली.

**यात्रा-जत्रांचा उपयोग**

गाडगे महाराज कधीही कोणत्याही मंदिरात गेले नाही. पण, जेथे यात्रेत गर्दी असते, त्या गावच्या यात्रेत ते मुद्दाम जात असत. त्या ठिकाणी कीर्तनातून सामाजिक सुधारणा व अंधश्रद्धा निर्मूलनाबाबत लोकांना सांगत असत, शिकवित असत. त्याच तंत्राचा अवलंब पंढरीनाथ पाटलांनी २० डिसेंबर १९४७ रोजी उमरावती जिल्ह्यातील बहिरमच्या यात्रेसाठी केला. त्यादिवशी तेथे हजारो लोक जमले होते. त्या यात्रेत क्रांतिसिंह नाना पाटलांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम ठेवला होता. तेथे पंढरीनाथ पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख व क्रांतिसिंह नाना पाटील यांची व्याख्याने झाली. यावेळी वीस हजारावर लोकसमुदायास शेतकरी, कामकरी हिताचे विचार ऐकविले. शेतकऱ्यात जागृती निर्माण करण्यासाठी या यात्रेचा पंढरीनाथांनी फायदा घेतला.

**पाटील संघटनेच्या अध्यक्षपदाची माळ गळ्यात पडली**

पंढरीनाथ पाटलांचे सामाजिक व राजकीय कार्याचा पाया हा लोकसंपर्क व लोकसंग्रहातून उभारला गेला. शिक्षित वर्गात शिक्षकांची संख्या मोठी होती. त्यांच्यावर लक्ष ठेवणारा त्याकाळी पाटील वर्ग होता. गावागावातील पाटील मंडळींना त्याकाळी 'रूसुम' (ठराविक मेहनताना रक्कम) मिळे. त्यांच्याही काही शासकीय, प्रशासकीय व सामाजिक समस्या असत. त्यांची संघटना होती. या पाटील संघटनेची वऱ्हाड पातळीवरील एक परिषद दिनांक ३० मे १९४८ रोजी नांदुरा येथे पंढरीनाथ पाटलांच्या अध्यक्षतेखाली भरली. वऱ्हाडातील ५०० पाटील यावेळी उपस्थित होते. या परिषदेत वरील तीनही प्रकारच्या अडचणी, समस्या व त्यावर उपाय यावर चर्चा करण्यात आली. पंढरीनाथ पाटलांच्या सामाजिक व राजकीय शक्तीचा या संघटनेला फायदा मिळावा

म्हणून या परिषदेमध्ये पुढील वर्षासाठी पंढरीनाथ पाटलांची या संघटनेच्या कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

**आप्तमित्रांच्या कौटुंबिक कार्यात सहभाग : मामाचे नाते जोपासले**

सामाजिक क्षेत्रात पंढरीनाथांचा संपर्क व लोकसंग्रह अत्यंत जबरदस्त होता त्याचे कारण ते आपल्या संपर्कातील प्रेमाच्या व आप्तजनांच्या सुखदु:खाच्या प्रसंगी हमखास उपस्थित असत. घटनासमितीचे सदस्य लक्ष्मणराव भटकर यांच्या रवि नामक मोठ्या मुलाचे लग्न अंजनगावला दिनांक ५ जून १९४८ रोजी तेथील डोमाजी नामक व्यक्तीच्या मुलीशी झाले. त्याप्रसंगी पंढरीनाथ पाटील मुलाचे मामा म्हणून मुद्दाम याप्रसंगी उपस्थित राहिले. कारण पंढरीनाथ पाटील व भटकरांची पत्नी सौ. जाईबाई यांचे बहिणभावाचे प्रेमाचे नाते होते. त्यावेळी पंढरीनाथ पाटील, भंडारी, लक्ष्मणराव भटकर, गवई, बियाणी व प्रमिलाताई ओक यांची या लग्नसोहळ्यात आशीर्वादपर भाषणे झाली.

**सावरगावची वडार परिषद**

पंढरीनाथ पाटील सारखे फिरत असायचे. ते गावोगाव दलित वस्तीत, बहुजन समाजात जाऊन सामाजिक सुधारणेबाबत लोकांशी बोलत असत. तसेच दलित, मागास व भटके यांच्याशी संपर्क साधून त्यांचे सुखदु:ख जाणून घेण्याचा प्रयत्न करीत. अशा संपर्कातूनच दिनांक ११ नोव्हेंबर १९४८ रोजी चिखली जवळील सावरगाव येथे वडार समाजाची जंगी सभा आयोजित करून त्यारात्री त्याठिकाणी पंढरीनाथ पाटलांनी या समाजाच्या सुधारणेसाठी विविध प्रकारचे उपाय व मार्ग याबाबत भाषण केले. त्या लोकांना उन्नतीचा मार्ग दाखवला.

१९५० साली पाऊस आलाच नाही. त्यामुळे फार मोठा दुष्काळ पडला. पाणी समस्या फार मोठी होती. पाणी समस्येची तीव्रता जाणून पंढरीनाथ पाटलांनी २ जुलै १९५० रोजी बुलडाणा येथे डी.सी. श्री. वर्मा व डी.एस.पी. श्री. गद्रे यांना भेटून या गंभीर बाबीबद्दल चिंता व्यक्त केली. या परिस्थितीमध्ये लोकांना दिलासा देण्यासाठी दुष्काळी कामे काढण्याबाबत सांगितले.

**श्री. अनंतकुमार देशमुखांचे स्वागत**

डॉ. पंजाबराव देशमुखांचे चिरंजीव अनंतकुमार हे आपला विद्याभ्यास पूर्ण

करून ५ जुलै १९५० रोजी इंग्लंडहून भारतात परत आले. ते विमानाने मुंबईच्या सांताक्रुझ विमानतळावर उतरले . त्यावेळी त्याठिकाणी डॉ. पंजाबराव देशमुख, पंढरीनाथ पाटील व श्री. लक्ष्मणराव भटकर एम.पी. हे स्वागतासाठी उपस्थित होते. त्याचदिवशी मुंबईत त्यावर्षीचा पहिला मुसळधार पाऊस झाला. दिवसभर पाऊस पडल्यामुळे सर्वत्र आनंदीआनंद पसरला होता. अनंतकुमारांचे मामा श्री. वैद्य हे मुंबईचे राहणारे होते. ही सर्व मंडळी अनंतकुमारांची आई सौ. विमलाबाई देशमुख यांचेसह वैद्यांकडे मुक्कामी थांबली.

## दुष्काळी कामे सुरू केली

मुंबईला पाऊस पडला तरी वऱ्हाडात मात्र पाऊस पडला नाही. अन्नधान्याची परिस्थिती बिकट झाली होती. मुंबईहून परत येताच पंढरीनाथ पाटील पुन्हा डी.सी. व डी.एस.पी. ना भेटले व दुष्काळी कामे म्हणून गिट्टी फोडणे, रस्ते बांधणे इत्यादी कामे सुरू करण्यासाठी शासनाकडे तगादा लावण्याबद्दल त्यांना अवर्जून सांगितले. एवढेच नव्हे तर गरिबांना विशेषत: शेतमजुरांसाठी बाजारातून सरकारी धान्ये विकण्याची व्यवस्था केली. ती व्यवस्थित पार पडत आहे की नाही हे पाहण्यासाठी श्री. वर्मा डेप्युटी कमिश्नर यांचेबरोबर मराठवाडा सरहद्दीवरील म्हसला बु।। येथील बाजारात बुधवार तारीख १२ जुलै १९५० रोजी प्रत्यक्ष पाहणी केली. यंत्रणा उत्तम काम करीत असल्याचे त्यांना दिसून आले. त्याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. पाऊस नाही म्हणून चिखली तालुक्यातील ढालसावंगी व दुधा येथेही मजुरांसाठी सरकारी कामे सुरू करण्याचे ठरले. दुष्काळात घरात बसून न राहता पंढरीनाथ पाटील सतत जनसंपर्कात राहून जनतेच्या हितासाठी शासन व प्रशासनाशी प्रत्यक्ष संपर्क साधून लोकहिताची कामे करून घेत असत. १८ जुलै पर्यंत पाऊस आला नव्हता. ठिकठिकाणी मजुरांसाठी दुष्काळी कामे सुरू करण्यात आली होती. चिखली तालुक्यातील अनेक गिट्टी खदानींवर मजूर काम करीत होते. अशाच एका खदानीपैकी मेहुणी येथील गिट्टी खदानीची दिनांक १९ जुलै रोजी पाहणी केली. या खदानीवर पाचशेवर मजूर काम करीत होते. त्यांनी त्या मजुरांच्या भेटी घेतल्या. त्यांच्या अडीअडचणी समजावून घेतल्या. त्या अडचणींची सोडवणूक करण्यासाठी व समस्या निवारण्यासाठी पंढरीनाथ पाटलांनी लगेच सरकारला कळविले.

## पंढरीनाथांच्या सुधारणावादी मतांचा परिणाम दिसू लागला

बहुजन समाज अशिक्षित व अडाणी असल्यामुळे काही वाईट चालीरिती व

कुप्रथांमुळे समाजाचे शोषण होत होते. शोषणमुक्त समाज निर्माण करण्याकरिता शिक्षणाचा प्रचार, प्रसार व अंगिकार होण्याकरीता तसेच समाजातील वाईट चालीरीती व प्रथा बंद पाडून नवीन चांगल्या चालीरीती व प्रथा सुरू करण्याचा प्रयत्न व त्यातून सामाजिक सुधारणा करण्याचे कार्य पंढरीनाथ पाटील सतत करीत होते. काही लोकांच्या बाबतीत या मतांचा, भाषणांचा व विचारांचा परीणाम होऊन काही सामाजिक प्रथा बदलवून नवीन प्रथा सुरू करण्याचा प्रयत्न समाजातील जाणते, शहाणे व सुधारणावादी करू लागले होते. पंढरीनाथ पाटलांच्या एका सहकाऱ्यांपैकी श्री. संतोषराव पाटील सावरगाव डुकरे हे एक होते. संतोषराव पाटलांचे आजोबा आश्रू पाटील हे परलोकवासी झाल्यावर त्यांच्या अस्थी सावटण्याचा कार्यक्रम होता. मरहुम आश्रू पाटील हे दिनांक ९ ऑगस्ट १९५० रोजी बुधवारला वारले. त्यांच्या दुखवट्याची सभा दिनांक ११ ला झाली. त्यावेळी श्री. लक्ष्मणराव भटकर व पंढरीनाथ पाटील यांची भाषणे झाली. त्याचा परिणाम म्हणून संतोषराव पाटलांनी आजोबाच्या तेरवीसाठी खर्च न करता त्या खर्चाएवढी रक्कम काही शिक्षणसंस्थांना दान दिली. एक नवा विचार कार्यान्वित होऊन नवी प्रथा सुरू केली. याचा आनंद पंढरीनाथ पाटलांना झाला.

## दुष्काळात लोकांनी स्थलांतर केले

१९५० च्या दुष्काळात १७ ऑगष्टपर्यंत बुलडाणा जिल्ह्यात पावसाची हजेरी लागलेली नव्हती. नाही म्हणायला चिखली व मेहकर भागात आतापर्यंत ५ इंच पाऊस झाल्याची नोंद झाली होती. एवढ्या अपुऱ्या पावसामुळे पेरणी पूर्ण झाली नव्हती. जनावरांना चारा नव्हता. लोक चिंतातूर झाले होते. सदर ग्रंथलेखकाचे गाव तराडखेड हे चिखली तालुक्यात होते. त्यावेळी या गावातील बरेच लोक गाव सोडून पोट भरण्यासाठी जळगाव खान्देश व नाशिक भागात गेले होते. त्यावेळी लेखकाचे वय केवळ बारा वर्षाचे होते. मजुरांना पुरेशे काम नाही, अन्नधान्य नाही. म्हणून लोक स्थलांतर करू लागले होते. सर्वत्र चिंतेचे व काळजीचे सावट पसरले होते. अशा परिस्थितीत पंढरीनाथ पुन्हा पुन्हा डी.सी.कडे जाऊन हे सर्व सांगत व प्रांतिक सरकारला पत्राने कळवीत असत. दिनांक १७ ऑगष्टला डी. सी. व सरकारला ही सर्व परिस्थिती कळविली होती. (सरकारी दुकानातून माफक प्रमाणात गुलाबी चना नियंत्रित दराने अधूनमधून मिळत असे. लोकांकडे पूर्वहंगामाची करडी व मोहाची फुले असत. भिजवलेले हरभरे, करडी व मोहाची फुले भाजून लोक खात होती. त्यावरच गुजराण क़रीत असत. पन्नास

साठ मैलांवरून सातपुड्याच्या कडेकपारीवरील वाळलेले गवत शेतकरी आपल्या गुराढोरांसाठी आणून त्यांना कसेबसे जगवत होते. आम्ही शाळकरी मुले मोहाची फुले, हरभरे व करडी भाजून दुपारचे जेवणासाठी पुरचुंडी बांधून नेत असू.)

## बहुभार्या प्रतिबंधक व विवाह विच्छेद विधेयक

पंढरीनाथ पाटील सतत फिरून समाजातील सुधारणांबद्दल सतत बोलत असत. एवढेच नव्हे तर त्यांनी विधीमंडळ व्यासपीठाचाही फायदा या कामी उत्तम तऱ्हेने करून घेतला. एक सच्चा जाणीवजागृत लोकप्रतिनिधी एम.एल.ए. म्हणून आपल्या कामाची चुणूक त्यांनी दाखवली. विधीमंडळात १३ आक्टोबर १९५० रोजी बहुभार्या प्रतिबंधक व विवाहविच्छेद विधेयक चर्चिले जात होते. या विधेयकावर पंढरीनाथ पाटलांनी सभागृहात दीड तास भाषण केले. त्या विधेयकाच्या सर्वांगावर त्यांनी माहितीपूर्ण असे विवेचन केले. त्यातून त्यांचे संसदपटूत्व प्रकट झाले. अभ्यासूवृत्ती दिसून आली. जबाबदार लोकप्रतिनिधीचे दर्शन झाले. हिंदूसमाजातील वाईट चालीरिती व कुप्रथांची विधिमंडळात चर्चा होऊन सामाजिक सुधारणा होणे किती आवश्यक आहे व त्या सुधारणा कशा करता येतील याचे विस्तृत मार्गदर्शनही पंढरीनाथ पाटलांच्या भाषणातून सभागृह व सरकारला मिळाले.

## दुष्काळास तोंड देण्यासाठी तरतूद

पावसाअभावी त्यावर्षी पीक फारच कमी आले. त्यामुळे दिवाळीच्या सणात उत्साह नव्हता. चाऱ्याची टंचाई होती. त्यामुळे पुढील पावसाळ्यापर्यंत लोकांना सरकारी कामे, अन्नधान्याची उपलब्धता व गुरांच्या चाऱ्याची व्यवस्था आतापासून करण्यासाठी पंढरीनाथ पाटील प्रशासन व शासनाच्या मागे सतत तगू लावून होते. त्याचा परिणाम म्हणून २३ नोव्हेंबर १९५० रोजी खामगाव येथे दुपारी २ ते ५ च्या दरम्यान सरकारी हायस्कूलमध्ये डी.सी. श्री वर्मा यांनी जिल्ह्यातील सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांची सभा घेतली. या सभेत अन्नधान्य परिस्थिती व शेतमजुरांसाठी उन्हाळ्यात कोणती कामे उघडावीत याबाबत चर्चा झाली. त्या सभेत पंढरीनाथ पाटलांनी बहुमोल मार्गदर्शन केले. दिनांक ७ डिसेंबर १९५० ला चिखली तालुक्यातील सावरगाव डुकरे येथे चिखली तालुका काँग्रेस कमिटी सभासदांची व सर्व काँग्रेस गट पंचायत सभासदांची सभा होऊन त्या सभेत अन्नधान्य परिस्थिती, बांधकामे व शेतमजुरांच्या बेकारीचा विचार करण्यात आला.

जनपदाच्या ठरावाप्रमाणे याही सभेत ठराव पास झाले. रात्री पंढरीनाथ पाटलांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन तीत श्री. सीताराम नाना चौधरी जळगाव (खा.) यांचे व्याख्यान झाले. तसेच दिनांक ८ डिसेंबर रोजी केळवदला आमदार पंढरीनाथ पाटील व सीताराम नाना चौधरी यांनी तेथील मंडळीबरोबर त्या गावच्या अनेक सुधारणा करण्याबाबत विचारविनिमय केला.

### सावधगिरीने योजनाद्वारे जनकल्याण साधता येते

पंढरीनाथ पाटलांचे वक्तृत्व, सामाजिक जीवनाचा तसेच राजकीय जीवनाचा समृद्ध अनुभव, राष्ट्रीय कल्याणाची जाण व समाजसेवेचा वसा यामुळे पंढरीनाथ पाटील सरकार दरबारी सर्वांच्या परिचयाचे झालेले होते. त्यामुळे पंढरीनाथ पाटील शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून तत्कालीन प्रांतिक सरकारच्या व केंद्र सरकारच्या महत्वाच्या समित्यांवरही काम करीत असत. ते मध्यप्रदेश प्लॅनिंग बोर्डावर असताना एका वृत्तपत्राने त्यांची मुलाखत घेतली. त्यावेळी ते म्हणाले, '१९५१ ते ५५-५६ या पंचवार्षिक योजनेत मध्यप्रांत सरकार लोकांचा जीवनाचा स्तर उंचावण्यासाठी व सामाजिक हिताबरोबर राष्ट्रीय हितासाठी त्या कालावधीत ५७ कोटी रूपये खर्च करणार असल्याचे सांगितले. भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे त्या वर्षात पहिल्या योजनेत शेती, जंगले, सहकारी चळवळ, ग्रामसुधारणा, कालवे, ग्रामोद्योग, रस्ते, सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण, टाऊन प्लॅनिंग इत्यादीबाबत जनतेच्या उद्धाराच्या योजना आखण्याचा प्रश्न त्यांच्या बोर्डासमोर असल्याचे सांगितले. या सर्व योजना सावधगिरीने राबविल्यास त्यांच्यामार्फत निश्चित उद्दिष्ट साध्य होईल' असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

### बुलडाणा जिल्हा धनगर परिषद

सामाजिक सुधारणा करण्याच्या प्रयत्नात पंढरीनाथ पाटील अग्रेसर होते. ते सर्व जाती धर्माच्या व्यासपीठावर जाऊन कुरूढी, वाईट चालीरिती व परंपरांवर हल्ला करीत. दिनांक २५ मे १९५२ रोजी पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार चिखली येथील सिद्धविनायक थिएटरात बुलडाणा जिल्हा धनगर समाज परिषद पंढरीनाथ पाटलांच्या अध्यक्षतेखाली झाली. या परिषदेचे उद्घाटन वीर वामनराव जोशी उमरावती यांच्या हस्ते झाले. या परिषदेत उभय नेत्यांनी सामाजिक प्रबोधन करणारी भाषणे दिली.

## बुलडाणा 'क्षयरोग आरोग्यधाम'चा भूमिपूजन समारंभ

दिनांक ११ डिसेंबर १९४७ रोजी बुलडाणा येथे क्षयरोग आरोग्यधाम सुरू करण्याबाबतचे बील नं. ३० हे सिलेक्ट कमिटीच्या सभेसमोर आले होते. त्यावेळी पंढरीनाथ पाटील स्वत: हजर होते. पंढरीनाथांनी या बिलावरील चर्चेत भाग घेतला होता. त्याबाबत विधायक सूचना केल्या होत्या. त्यानंतर मध्यप्रदेश सरकारने छिंदवाडा व बुलडाणा येथे क्षय रोग्यांसाठी आरोग्यधाम सुरू करण्याची मंजूरी दिली होती. १९५२ च्या पावसाळ्यात उत्तम पाऊस होऊन २० जून पासूनच पेरण्या सुरू झाल्या होत्या. सर्वत्र उत्साह संचारला होता. पाऊस उत्तम झाल्यामुळे पेरण्या उत्साहात सुरू होत्या. त्या उत्साहातच पंढरीनाथ पाटलांनी चिखली येथील श्री शिवाजी विद्यालयाचे इमारतीचे बांधकाम मोठ्या जोमाने सुरू करून ते त्या कामावर स्वत: देखरेख करू लागले. या उत्साही व आनंदी वातावरणात बुलडाणा जिल्ह्याच्या इतिहासात आणखी एक महत्वाची घटना घडली. पंढरीनाथ पाटलांनी यापूर्वीच छिंदवाडा व बुलडाणा येथे क्षयरोग्यांसाठी आरोग्यधाम निर्माण करण्याचे विधेयक नागपूर असेंब्लीत पास करून घेतले होते. त्याची कारवाई २४ जून १९५२ रोजी सुरू झाली. ता. २८ जून १९५२ रोजी बुलडाणा येथे मध्यप्रांत वऱ्हाडचे पंतप्रधान पंडित रविशंकर शुक्ल यांच्या हस्ते क्षयरोग आरोग्यधामाच्या बांधकामाचा पायाभरणी व कोनशिला समारंभ संपन्न झाला. सदर समारंभ बुलडाणा गावापासून २ मैल अंतरावर असलेल्या धाड रोडवरील सरकारी तलावाच्या पश्चिम बाजुला जागतिक कीर्तीची पहिली क्रांतिकारक स्त्री लेखिका ताराबाई शिंदे यांच्या वडिलांच्या शेतात झाला. दुसऱ्या दिवशी दिनांक २५ ला पंढरीनाथ पाटलांनी मुख्यमंत्री पंडित रविशंकर शुक्ल यांची भेट घेऊन बुलडाणा मुक्कामी, बुलडाणा जिल्ह्याची सर्व परिस्थिती त्यांच्या कानावर घातली. तसेच जनपदातर्फे श्री शिवाजी सभागृहात त्यांना जिल्ह्याच्या वतीने मानपत्र अर्पण केले. २६ जून रोजी चिखली येथे शेतकी संस्थेच्या नेताजी दिवाणखान्यात पंतप्रधानांना उपहार देण्यात आला. त्यावेळी संस्थेतर्फे शेतकऱ्यांच्या अडचणी लेखी स्वरूपात वाचून दाखविण्यात आल्या व त्या त्यांना सादर करण्यात आल्या. त्याचदिवशी सायंकाळी खामगाव येथे स्त्रियांच्या रूग्णालयात (सी पारीख) प्रसुतिगृहाचे उद्‌घाटन नामदार शुक्लांच्या हस्ते झाले. या सर्व कार्यक्रमात पंढरीनाथ पाटील पंतप्रधानांच्या सोबत सहभागी होते.

१९५२ पासून क्षय आरोग्यधाम सुरू झाले. सदर आरोग्यधामाचे उद्‌घाटन तत्कालीन केंद्रीय आरोग्यमंत्री श्रीमती राजकुमारी अमृत कौर यांचे हस्ते व पंडित कानडेशास्त्री यांचे उपस्थितीत ता. ९ जुलै १९५४ रोजी झाले होते. त्याचे नाव महाराष्ट्रभर

पोचले. परंतु आज या आरोग्यधामात राहण्यास न परवडणारी स्थिती निर्माण झाली असून आता ते केवळ सल्ला व औषधी वितरण केंद्र होऊ पाहत आहे. त्याला शासनाची आर्थिक दुर्बलता व राजकीय अस्थिरता हे कारणीभूत आहे.

## धार्मिक गुलामगिरीचा नाश का करावा ?

पंढरीनाथ पाटील यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात अंधश्रद्धा निर्मूलन धार्मिक गुलामगिरी नष्ट करण्याबाबत लोकामध्ये सत्यशोधक जलसे व ब्राह्मणेतर चळवळीच्या व्यासपीठावरून काम केले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर घटनेने भाषा, विचार, मते यांचे अविष्कार स्वातंत्र्य प्राप्त झालेले आहे. त्या अधिकाराचा वापर करून पंढरीनाथांनी दिनांक १५ ऑगष्ट १९५२ रोजी सावरगाव डुकरे येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त सायंकाळी झालेल्या सभेत 'धार्मिक गुलामगिरीचा नाश का करावा ?' या विषयावर व्याख्यान दिले. राजकीय स्वातंत्र्य मिळाले आहे, परंतु पुरोहितशाहीची धार्मिक हुकुमशाही सुरूच होती. धार्मिक गुलामगिरी नष्ट झाल्याशिवाय खरे स्वातंत्र्य मिळाले असे म्हणता येणार नाही, हे पंढरीनाथ पाटलांना चांगले माहित होते. स्वातंत्र्य पूर्व काळात त्यांनी धार्मिक गुलामगिरी व पुरोहितशाहीविरूद्ध सत्यशोधक जलसे व सभांमधून लोकजागृती व समाजप्रबोधनाचे काम मोठ्या प्रमाणात केले होते. आजही त्याची गरज आहे. हे ते जाणून होते व म्हणूनच त्यांनी ही मोहीम सुरू ठेवली होती.

## गाडगेबाबा व पंढरीनाथ पाटील भेट

संत गाडगेबाबा हे मोठे सामाजिक संत होते. ते यात्रा-जत्रात जात. क्षेत्री-तीर्थक्षेत्री जात. पण ते कधीही देवळात गेले नाही. या यात्राजत्रांनिमित्त जमणाऱ्या लोकांना सामाजिक सुधारणा सांगण्यासाठी या संधीचा फायदा घेत. पंढरीनाथ पाटीलही सत्यशोधक होते, समाजसुधारक होते व समाजातील कुप्रथा, रूढी, कुरूढी, वाईट परंपरा व चालीरिती यांचे निर्मूलनाचे कार्य करणाऱ्या अशा या दोन सामाजिक प्रबोधनकारांची व समाजसुधारकांची दिनांक २१ मे १९५३ रोजी सावरगाव डुकरे (ता. चिखली) येथे संत गाडगेबाबांच्या कीर्तनाप्रसंगी भेट झाली. त्यादिवशी पंढरीनाथ पाटील मुद्दाम गाडगेबाबांच्या कीर्तनासाठी सावरगावला गेले होते. गाडगेबाबांचे कीर्तन झाल्यानंतर संत गाडगेबाबांनी पंढरीनाथ पाटलांना व्याख्यान देण्याचा आदेश दिला. म्हणून त्यांनी कीर्तनानंतरही अर्धा तास समाजप्रबोधक भाषण केले. (डायरी १९५३)

### विकासाची जाण असलेला संसदपटू

पंढरीनाथ पाटील कष्टमय अशा शेतकरी कुटुंबात जन्मले. शेतकरी व शेतमजूरांचे जीवन प्रत्यक्ष अनुभवत ते लोकसभेत त्यातही संसदेच्या वरिष्ठ सभागृहात सदस्य झाले. त्यांना शेवटच्या माणसाच्या समस्याची जाणीव होती. त्यांच्या कल्याणाचा ध्यास त्यांनी घेतला होता. त्यासाठी ते अनेक उपाय शोधून कार्यान्वित करण्याचा प्रयत्न करीत. सरकारलाही लोकोपयोगी कामे करायला भाग पाडत असत. राष्ट्रीय महामार्ग व रेल्वेमार्ग हे राष्ट्राच्या शरीरातील धमन्या व रक्तवाहिन्या आहेत, हे ते जाणून होते. खेड्यांच्या विकासासाठी पक्के रस्ते, व्यापार, उद्योग व व्यवसायांच्या वाढीसाठी रेल्वेमार्गांची गरज आहे याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच त्यांनी जिल्हा कौन्सिलमध्ये असतांना जिल्ह्यातील मुख्यरस्ते बांधण्याचा प्रयत्न केला. खासदार झाल्यावर त्यांनी महाराष्ट्रातील नवे रेलमार्ग सुचविले. तसेच मीटरगेजचे रूपांतर ब्रॉडगेजमध्ये करण्याचे तसेच जूने मार्ग विस्तारण्याचे प्रस्ताव संसदेत मांडले. सरकारचे रेल्वे अंदाजपत्रक संसदेत मंजूरीसाठी आले असता, दिनांक १४ जून १९६७ रोजी त्यांनी या अंदाज पत्रकावर अभ्यासपूर्ण भाषण केले. महाराष्ट्रातील खामगाव-जालना रेल्वेमार्ग व्हावा, दारव्हापासून पुढे पुसदपर्यंत रेल्वेमार्गाचे लांबीकरण व्हावे, परतवाडा ते यवतमाळ रेल्वेमार्गावर तीस स्टेशन्सपैकी त्यावेळी दहा स्थानकावर इमारती होत्या, उर्वरित सर्व स्टेशनवर इमारती व्हाव्यात, नांदेड ते मनमाड मीटरगेजचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर करावे, मुंबई ते रत्नागिरी व गोवा रेल्वे मार्ग व्हावा, पुणे ते मिरज मीटरगेज त्यावेळी ब्रॉडगेजमध्ये रूपांतरीत होत होता, तो कोल्हापूरपर्यंत ब्रॉडगेज करवा, महाराष्ट्रातील पाचोरा ते जामनेर हा नॅरोवेज मार्ग होता तो जामनेरपासून चिखलीपर्यंत व तेथून हिंगोलीपर्यंत वाढवावा त्यामुळे पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा जोडले जातील. खामगाव व उमरावती कापसाच्या पेठा असल्यामुळे त्या मुंबई-कलकत्ता (कोलकाता) मार्गावर आणाव्यात. नागपूर-पुणे अशी एक एक्सप्रेस गाडी सुरू करावी. अशा अनेक बहुमोल सूचना केल्या. आज जवळजवळ या सर्व मागण्यांची पूर्तता झालेली आहे. खामगाव-जालना व जामनेर-हिंगोली वगळता इतर बाबींचा विचार होऊन बरीच कामे झालेली आहेत. त्यावरून पंढरीनाथ पाटील दूरदृष्टीचे योजनातज्ज्ञ व लोकहितदक्ष लोकप्रतिनिधी होते हे स्पष्ट होते.

(९५) दै. शिवशक्ती, अकोला ता. १९-६-१९६७, (९६) दै. अजिंठा, औरंगाबाद ता. २१-६-१९६७)

(९७) दै. मराठवाडा, औरंगाबाद ता. २२-६-१९६७, (९८) सा. यशवंत संदेश, मलकापूर ता. २४-६-१९६७)

### पंढरीनाथ पाटलांच्या कार्यांचा गौरव

पंढरीनाथ पाटलांनी सतत सामाजिक, राजकीय, सत्यशोधकीय, ब्राह्मणेतर

चळवळ या माध्यमातून अनेक लोकोपयोगी कामे केली. सामाजिक सुधारणा केल्या. शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. शेतकऱ्यांचा कैवारी म्हणून ग्रामपातळीपासून देशाच्या सार्वभौम संसदेपर्यंत त्यांच्या समस्यांना वाचा फोडत त्यांच्या हिताचे कार्य केले. या संपूर्ण कार्याची दखल घेऊन समाजाने ३० मे १९६८ ला गुरूवारी त्यांच्या पासष्टीचा सोहळा मोठ्या भव्यस्वरूपात साजरा केला. या कार्यक्रमासाठी भारताचे तत्कालीन गृहमंत्री ना. श्री. यशवंतराव चव्हाण व महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक हे आलेले होते. त्यावेळी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली व गृहमंत्र्यांच्या हस्ते आणि पद्मभूषण कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या उपस्थितीत पंढरीनाथ पाटलांच्या कार्याचा गौरव म्हणून समाजाने तीन लाख रूपयांची थैली पंढरीनाथ पाटलांना दिली. सदर कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी चरित्रलेखकाला मिळाली. पंढरीनाथ पाटलांना याप्रसंगी मिळालेले तीन लाख रूपये त्यांनी स्वत:साठी न ठेवता ही सर्व रक्कम शिक्षणासाठीच खर्च केली जाईल अशी घोषणा त्याच ठिकाणी तत्काल केली. याची नोंद लगेच नागपूरच्या विदर्भ साहित्य संघाने घेतली. पंढरीनाथ पाटलांना आमंत्रित करून दिनांक ७ नोव्हेंबर १९६८ रोजी तात्यासाहेब कोल्हटकर स्मृतिदिन कार्यक्रमात त्यांचा सत्कार करण्यात आला. (९९) लोकसत्ता, मुंबई ता. ६-६-१९६८ तृतीय डाक आवृत्ती)

(100) Indian Express III Dak, मुंबई ता. ६-६-१९६८, (१०१) दै. मराठा ता. १०-६-१९६८)

## अंदमान निकोबार बेट विकासाबाबत

पंढरीनाथ पाटील शेती, शेतकरी, शेतमजूर व दलितपिडीतांचे हिताकरीता सदैव झटत असत. तसेच ते भारताच्या छोट्या बेटांच्या विकासासाठीही मागे नव्हते हे त्यांनी अंदमान निकोबार बेटाच्या विकासाच्या संदर्भात लेख लिहून सिद्ध केले. त्यावेळी ते लोकलेखासमितीचे (पब्लीक अकाऊंट कमिटी) सभासद होते. या समितीने फेब्रुवारी १९७३ मध्ये हिंदी महासागरातील अंदमान व निकोबार या द्विपसमूहात केंद्रीय शासनाकडून जी विकासकामे चालू होती त्यांची पाहणी केली. या द्विपसमूहासाठी जो पैसा खर्च होतो त्याची छाननी करण्यासाठी त्यांचा हा दौरा होता. त्या दौऱ्यात त्यांनी या द्विपसमूहाची पाहणी करून त्यांचा विकास कसा करता येईल याबाबत टिपण तयार केले. त्याआधारे पंढरीनाथ पाटलांनी अभ्यासपूर्ण लेख लिहिला व आकाशवाणीवरही भाषण केले. त्यातून त्यांची अभ्यासूवृत्ती व विकासाचा ध्यास दिसून येतो. (११०) दै. बातमीदार

जळगाव ता. १६-३-१९७३, (१११) आकाशवाणी पोर्टब्लेअर दि. १६-३-७३ (मूळ हिंदी भाषण) (११२) शिवशक्ती, अकोला ता. २४-३-१९७३,

❋

# भाग - ८

## महात्मा फुले चरित्र पहिले

सत्यशोधक चळवळ, सत्यशोधक समाजाची स्थापना, ब्राह्मणेतर चळवळ, ब्राह्मणेतर परिषद, ब्राह्मणेतर काँग्रेस इत्यादी कळसाला पोचले. सामाजिक, धार्मिक व राजकीय जागृती झाली. ब्राह्मणेतरात आत्मभान आले. हे सर्व ज्या व्यक्तीमुळे घडले, ज्या व्यक्ती मतांचे तात्त्विक अधिष्ठान प्राप्त झाले, वैचारिक वारसा निर्माण झाला, ती व्यक्ती म्हणजे महात्मा जोतीराव फुले. एवढे सारे परिवर्तन घडवून आले परंतु त्या व्यक्तीबद्दल विशेष माहिती लोकांना नव्हती. त्यांचे चरित्र लिहिले गेले नव्हते. त्यांच्या वास्तव जीवनाची माहिती सर्वसामान्यांना नव्हती. याची खंत पंढरीनाथ पाटलांना सतत वाटत होती. चळवळींच्या माध्यमातून त्यांनी श्रेष्ठ विद्वान वक्त्यांची भाषणे ऐकली. छोट्या मोठ्या पुस्तिका व ग्रंथ वाचले. त्यातूनच फुलेंचे चरित्र लिहिण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. १९२६ साली विविध वृत्तपत्रातून त्यांनी जनतेला आवाहन करून महात्मा फुलेंच्याबाबत असलेली लिखित , ऐकीव माहिती, आठवणी, अनुभव इत्यादी माहिती मिळविण्यास सुरूवात केली. पंढरीनाथांचे शिक्षण अवघ्या ७ व्या इयत्तेपर्यंत झालेले होते. परंतु त्यांची दृष्टी व्यापक, वेधक व संग्राहक होती. त्यांना चांगला अनुभव व समज आलेली होती. ते व्यासंगी, जिद्दी, चिकित्सक व विवेकशक्तीचा उपयोग करणारे होते. म. फुलेंचे पहिले चरित्र लेखनासाठी त्यांनी जी साधने जमविली, जे वाचन केले त्यातून त्यांची प्रगल्भताही दिसून येते.

इ. स. १९२७ हे महात्मा फुले यांचे जन्मशताब्दी वर्ष होते. याची जाणीव ठेवून पंढरीनाथांनी म. फुलेंचे चरित्र लिहिण्यास १९२६ सालीच सुरूवात केली. ते जून १९२७ मध्ये प्रसिद्ध झाले. या चरित्र लेखनासाठी त्यांनी हजारो मैलाचा प्रवास केला. शेकडो लोकांना भेटले. तत्पूर्वी व तत्कालीन तसेच अद्ययावत प्रसार, प्रचार माध्यमे व ग्रंथ यांची काळजीपूर्वक निवड करून मधुमक्षिकावृत्तीने बारीकसारीक माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. विविध परिषदांचे अहवाल, आयोगाचे अहवाल, तत्कालीन थोरांची चरित्रे त्यात टिळक, आगरकर, चिपळूणकर, सावरकर, कर्मवीर भाऊराव पाटील, अण्णासाहेब लठ्ठे इत्यादींची चरित्रे, ग्रंथालये, दप्तरखाने याचा धांडोळा घेऊन

महात्मा फुले यांचे सर्वांग सुंदर चरित्र लिहून मराठी सारस्वतात एका संदर्भसंपन्न चरित्रग्रंथाची भर घातली. त्यातही सामाजिक सुधारणांच्या क्रांतीकारक वैचारिक वाङ्‌मयात मोलाची भर घातली. त्यासाठी त्यांनी १४२ पुस्तकांचे वाचन केले. २३ विविध परिषदांचे अहवाल वाचले. सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीतील महत्वाचा दस्तऐवज दर्जा असलेले असे हे चरित्र लिहिले. खऱ्या अर्थाने म. फुलेंचे हे पहिले चरित्र होय. यापुढील फुले चरित्रकारांना सदर ग्रंथाचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. एवढे संदर्भ मूल्य त्यासही प्राप्त झालेले आहे. या ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीच्या दोन हजार प्रती छापून त्यांनीच प्रकाशित केल्या. त्यासाठी त्यांनी आपल्या मित्रांकडून कर्ज घेतले होते. त्याचाच अर्थ पदरमोड करून सदर चरित्र ग्रंथ छापला. तुपाने भरलेल्या बरणीप्रमाणे लोकांना घरपोच पोचता केला. त्यामुळेच आमच्यासारखे अनेक अज्ञानी व दुबळे समाज घटक सदर ग्रंथातील सकस, वास्तव पण जहाल विचारांच्या आधाराचे व आत्मीकरणाचे तूप खाऊन पुष्ट झाले आहेत. या सामाजिक परिवर्तनकारी विचारांची कास धरून नवसमाज निर्मितीचे कार्य करीत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या वैचारिक वारस्यातून भरभक्कम तात्त्विक बैठक असलेली भारतीय राज्यघटना राष्ट्राला देऊ शकले. याचा सर्वांना अभिमान व आनंद वाटतो. आज सर्वत्र फुले, शाहू, आंबेडकरांचे पुतळे, फोटो व त्यांचे ग्रंथ वाचनास महत्व आले आहे. त्याच्या मुळाशी पंढरीनाथ पाटलांनी अत्यंत कष्टाने, जिद्दीने व तन्मयतेने लिहिलेले हे फुले चरित्र समजून घेतले पाहिजे.

त्यानंतर त्यांनी १९३८ साली महात्मा फुलेंचे दुसरे - जास्तीच्या नवीन माहितीचे चरित्र लिहिले. या चरित्रपुस्तकांची ते साधने जमविण्यासाठी मध्यप्रदेश, मुंबई, पश्चिम महाराष्ट्र, गुजरात इत्यादी भागात फिरले. मुंबई, पुणे, सातारा, कोल्हापूर येथील ग्रंथालये, महानगरपालिका कार्यालय व दप्तरखाने त्यांनी धुंडाळले, अनेक व्यक्तींच्या भेटी घेतल्या. हे जास्तीच्या माहितीचे दुसरे चरित्र त्यांनी सन १९३८ साली प्रसिद्ध केले. पण यात बहुतेक जुनीच पहिल्या पुस्तकातील माहिती आहे.

त्यानंतर धनंजय कीर यांनी म. फुलेंचे विस्तृत चरित्र इंग्रजीत लिहिले. ग्रंथ मोठा असला तरी त्यात म. फुलेंना योग्य न्याय मिळाला नाही असे पंढरीनाथ पाटलांनी त्याबाबत आपले मत व्यक्त केले. म. फुलेंना न्याय देण्यासाठी त्यांनी फुलेंचे तिसरे चरित्र लिहिण्याचा संकल्प केला. त्यानुसार त्यांनी १९६७-६८ च्या दरम्यान ७३

प्रकरणांचे मथळे तयार करून लिहिण्यास सुरूवात केली. यावेळी आम्ही त्यांच्या सान्निध्यात चिखलीस श्री शिवाजी अध्यापक विद्यालयात सेवारत होतो. त्यावेळी सदर ग्रंथाच्या लेखनासाठी त्यांना योग्य व अचूक अर्थाच्या छटा असलेले विविध शब्द हवे असत. त्याबाबत ते आम्हा दोन शिक्षकांशी चर्चा करीत. शुद्धलेखन नियमानुसार वाक्यरचना करवून घेत. सदर तिसरे चरित्र पूर्ण झाले की नाही याबाबत मात्र काही माहिती आज उपलब्ध नाही. या चरित्राबद्दल आठवण म्हणून श्री. जे. एन. बोंबटकर यांनी लिहिले की, चरित्राचे हस्त लिखित श्री. बाबा आढाव, पुणे यांचेकडे सुपूर्त केले आहे.

महात्मा फुलेंच्या पहिल्या चरित्राबाबत कोल्हापूरहून प्रसिद्ध होणाऱ्या 'हंटर' या वृत्तपत्राच्या शुक्रवार दिनांक ८ जुलै १९२७ च्या अंकात पृष्ठ ६ वर लिहिलेले आहे (१६) हंटर, कोल्हापूर दि. ८-७-१९२७ ते असे -

१) महात्म्याचे चरित्र भेटीस पाठविल्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत. असले हे पवित्र कार्य हाती घेऊन तडीस नेण्याच्या प्रयत्नाबद्दलच आपण स्तुतीस पात्र आहात. इतकी एकत्रित माहिती दुसऱ्या पुस्तकात मिळत नाही.

२) ......... हिंदू फुटून दुसऱ्या धर्मात जातील या भीतीने घाईघाईने झालेली संघटना खरी नव्हे, उच्चनीच भेद काढून टाकण्यासाठी हिंदूधर्माला काळोखी फासणारी, मनुष्याला हीन कोटीत नेऊन बसविणारी, जुलमी अस्पृश्यता काढून अंत:शुद्धीची चळवळ हीच खरी संघटना करणार आहे. ही चळवळ म. फुलेंनीच हाती घेतली होती. त्यांचे चरित्र त्याची साक्ष आहे.

फुलेंचे चरित्र चांगले दोनशे पानापेक्षा जास्त आहे. माहिती पुष्कळ मेहनतीने मिळविली आहे. महात्माजींच्या खाजगी पवित्र आचरणाची ओळख पुस्तकाने बरीच होते. त्यांचे अंगावर हजार रूपये देऊन ब्राह्मणांनी मारेकरी घातले असता त्यांनी मोठ्या आनंदाने "माझ्या मरणाने तुम्हा गरीब कुटुंबास अन्न मिळत असेल तर बाबांनो बेलाशक मारा." म्हणून मान पुढे केली. गरिबांच्या सुखासाठी आपला प्राण जात आहे म्हणून त्यांना उलट आनंद वाटला.... पुस्तक अशा बऱ्याच गोष्टींनी भरले आहे. पुस्तकाचा प्रसार जास्त होण्याकरिता किंमत कमी ठेवली (त्यावेळी किंमत रूपया १। म्हणजे

आजचे १ रूपया २५ पैसे) असती तर बरे झाले असते.'' अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यातून पुस्तकाचे महत्व व्यक्त झाले.

यावरून पुस्तकाची मौलिकता, महत्व व ते घराघरात जाणे आवश्यक असल्याची इच्छा म्हणून किंमत कमी ठेवण्याची अपेक्षा या साऱ्या गोष्टी या पुस्तकाची गरज समाजाला किती मोठी आहे तसेच हे लेखनकार्य किती मोलाचे आहे याचे निदर्शक आहे.

म. फुले चरित्राचे महत्व सांगतांना अमरावतीचे माजी खासदार ॲड. जे. एस. अकर्ते लिहतात-

''.... असल्या भयानक (परिस्थितीत) कालखंडात ब्राह्मणी वर्चस्व, जुलूम आणि अधिसत्ता यांचे विरूद्ध बंड करण्याकरिता अलौकिक धैर्याची व त्यागाची आवश्यकता होती.

श्री. पंढरीनाथांनी ते गुण प्रकर्षाने दाखविले व वऱ्हाडात ब्राह्मणेतर व सत्यशोधक चळवळ सुरू केली. ब्राह्मणांनी महात्मा फुलेंचे सर्व कागदपत्र दडपून टाकले होते. त्यावेळी मला म. फुलेंचे पुस्तक पाहिजे होते. ते कुठेही सापडले नाही. फक्त राबर्टसन नावाच्या इंग्रजी मिशनऱ्याच्या घरी 'गुलामगिरी' या पुस्तकाचा शोध लागला. अशा परिस्थितीत पंढरीनाथांनी अहोरात्र अमर्याद कष्ट करून व अहर्निश धडपड करून महात्मा फुलेंचे चरित्र लिहून काढले. त्यांनी एवढेच जरी केले असते तरी ब्राह्मणेतर समाज कायमचा ऋणी राहिला असता.'' (१२८) (डॉ. पंजाबराव देशमुख व पंढरीनाथ पाटील स्मारक समिती स्मरणिका ता. १६-५-१९८७, पृष्ठ क्र. ३०)

**ब्राह्मणांनी उल्लेख केला तो उत्कृष्ट पण ब्राह्मणेतरांनी मेहनतीने उत्कृष्ट लिहिले ते मात्र निकृष्ट**

ब्राह्मणवादी वृत्तपत्रांपैकी दै. महाराष्ट्रने पंढरीनाथ पाटील यांनी लिहिलेल्या म. फुले चरित्राची दखल घेतली. महाराष्ट्राच्या ता. ७ माहे ऑगष्ट १९४७ च्या अंकात लिहिले आहे.

''सत्यशोधक समाजाचे संस्थापक जोतीराव फुले यांचे हे चरित्र श्री. पं. सी. पाटील यांनी लिहिले आहे. अव्वल इंग्रजी अमदानातील कर्त्यासुधारकात जोतीरावांची गणना होते. त्यांच्या कामगिरीचे सुंदर वर्णन श्री. न. चि. केळकर यांनी लोकमान्यांच्या

चरित्रात केले आहे. जोतीरावांची समाज सुधारणेची तळमळ व त्यांनी केलेले कार्य जरी प्रशंसनीय असले तरी त्यांची सर्वच मते ग्राह्य आहेत असे नाही...

...त्यांनी आपल्या पुस्तकात प्रकट केलेली मते अज्ञानी व दुराग्रहाची द्योतक आहेत.... जोतीरावांची ती विधाने करण्यात फक्त अज्ञान दिसून आले. पण या पुरस्कर्त्यांची मात्र असत्यप्रियता सिद्ध होते. श्री. पाटील यांनी या पुस्तकात ठिकठिकाणी केलेली ब्राह्मणवर्गाची निंदाही अप्रस्तूत व अवास्तव आहे.... समाजातील सर्वच वतनदार वर्गाकडून समाज सुधारकांचा छळ नेहमीच होत असतो. या छळाची दरकार न करता जोतीरावांनी स्त्री शिक्षण व अस्पृश्योद्धार या चळवळींचा आरंभ केला. याबद्दल त्यांना धन्यवाद देणे आवश्यक आहे. या चरित्रात ऐकीव गोष्टी आणि साधार माहिती यांची संशयोत्पादक सरमिसळ श्री. पाटील यांनी केली असल्यामुळे ऐतिहासिक दृष्टीने या चरित्राला फारसे महत्व देता येणार नाही. तथापि जोतिरावांच्या कार्याची रूपरेषा समजायला या पुस्तकाचा उपयोग होईल.''

केळकरांनी लिहिले म्हणून उत्कृष्ट पण पाटलांनी लिहिले म्हणून निकृष्ट व संशयोत्पादक. म्हणून हे पुस्तक फारसे महत्वाचे नाही. त्याला ऐतिहासिक महत्व नाही. पण या पुस्तकामुळे फुल्यांच्या कार्याची रूपरेषा सर्वसामान्यांना समजेल हे तर मान्य केले. पुस्तक लिहिण्याचा हेतूच मुळी तो आहे. तो यशस्वी झाला हे आजच्या सामाजिक व राजकीय परिवर्तनातून स्पष्ट झाले. ब्राह्मणांनी लिहिलेले ते उत्कृष्ट, ब्राह्मणेतरांनी लिहिले ते सदोष व म्हणून अवास्तव व ऐतिहासिक दृष्ट्या महत्व नसलेले ही वृत्ती या टीकेतून प्रकट झाली.

या पुस्तकाच्या दोन हजार प्रतींपैकी १५०० प्रती १५ ऑगष्ट १९२७ पर्यंत संपल्याची 'विजयी मराठा' पुणे या वृत्तपत्राच्या अंकात नमूद आहे. अवघ्या दोन महिन्यात पहिली दोन हजारांची आवृत्ती त्याकाळी संपणे हे त्या पुस्तकाच्या उपयुक्तता व आवश्यकता याचे द्योतक आहे. महाराष्ट्र वृत्तपत्रासारख्या ''कावळ्याच्या शापाने गाई मरत नसतात.'' हेच खरे !

**आनंदस्वामी व पंढरीनाथ पाटील यांचा महात्मा फुले जन्म शतसंवत्सर दौरा**

वऱ्हाडमध्यप्रांतातील सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीचे अग्रदूत वे.शा.सं. आनंदस्वामी व पंढरीनाथ पाटील यांनी सामाजिक परिवर्तनासाठी सत्यशोधक चळवळ

व ब्राह्मणेतर चळवळ ह्या जोरदारपणे चालविल्या. या चळवळी लोकचळवळी व्हाव्यात म्हणून त्यांनी महात्मा फुले जन्मसंवत्सर वर्षात ऑगष्ट, सप्टेंबर व डिसेंबर १९२७ या कालावधीत संपूर्ण महाराष्ट्राचा दौरा केला. या दौऱ्याचा नियोजित कार्यक्रम प्रसिद्ध करून त्यांनी प्रथम वऱ्हाड मध्यप्रांतातील प्रमुख पुढाऱ्यांच्या भेटी घेऊन चर्चा केली. काही प्रमुख गावी सभाही घेतल्या. त्यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रक क्रमांक २ दिनांक १४-७-१९२७ अनुसार त्यांनी वर्धा, यवतमाळ, उमरावती, अकोला व बुलडाणा या जिल्ह्यांचा दौरा केला. त्यात वऱ्हाड प्रांताचे सर्व श्रेष्ठ पुढारी रावबहादूर नायडू यांचेशी चर्चा केली. समाजभूषण नानासाहेब अमृतकर, बॅरिस्टर कायंदे, तपस्वी, काशिराव बापूजी देशमुख, श्री. व्यंकटराव गोडे, डॉ. चव्हाण बंधू, गुंड इत्यादी पुढाऱ्यांनी आनंदस्वामी व पंढरीनाथ पाटील यांच्या दौऱ्याची माहिती देऊन कौतुक केले. ५ जुलै १९२७ रोजी अकोला येथे त्यांना पानसुपारी देण्यात आली. दि. १२ जुलै १९२७ रोजी ही जोडगोळी महाराष्ट्राच्या प्रचार दौऱ्यावर निघाली. अकोलेकर पुढाऱ्यांनी निरोप देतांना म. फुले अखिल भारतीय शतसांवत्सरिक उत्सव व अ. भा. सत्यशोधक समाज परिषद, अकोला येथेच भरतील असे लोकमत मिळवा अशी सूचनाही या उभयतांस केली.

महाराष्ट्र दौरा १२ जुलै रोजी सुरू होऊन त्यांचा पहिला मुक्काम जळगाव जिल्ह्यातील भुसावळला झाला. त्यानंतर ते उत्तर महाराष्ट्रात धुळे जिल्ह्यात शिरले. त्या भागातील कार्यकर्त्यांच्या भेटी घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. त्यांचे मार्गदर्शनही घेतले.

त्यानंतर ते सातारा जिल्ह्यात ८ ऑगष्ट १९२७ रोजी पोचले. त्याच दिवशी सातारा येथे प्रताप हॉलमध्ये सातारा जिल्हा काँग्रेसची सभा भरली होती. त्या सभेत ब्राह्मणेतर पक्षाने काँग्रेसमध्ये मिळावे की नाही यावर चर्चा झाली. याच सभेत वऱ्हाडचे सुपुत्र पंढरीनाथ पाटील, वे.शा.सं. आनंदस्वामी यांचीही भाषणे होणार असल्याचे व 'पेशवा' वृत्तपत्राचा निषेध होणार असल्याचे आगाऊच प्रसिद्ध झाले होते. त्यामुळे त्या सभेला खूप गर्दी जमली होती. सभागृह ओसंडून भरले होते. लोकांना हॉलमध्ये बसण्यास जागा नव्हती. त्यामुळे बरेच लोक बाहेर उभे होते. तुफान गर्दी झाली होती. रावसाहेब सोनटक्के, पोलीस सुपरिंटेंडेंट बडोदे यांचे अध्यक्षतेखाली वे.शा.सं. आनंदस्वामी व पंढरीनाथ पाटील यांची सत्यशोधक समाज संघटन व फुले सोसायटीची आवश्यकता, फुले शतसंवत्सर उत्सव इत्यादी बाबत भाषणे झाली. त्यानंतर 'पेशवा' वृत्तपत्राच्या

निषेधाचा ठराव पास झाला. शेवटी ब्राह्मणेतर पक्षाने काँग्रेसमध्ये विलीन होण्याची चर्चा होऊन ब्राह्मणेतर पक्षाने काँग्रेमध्ये विलीन व्हायचे की नाही याचा निकाल मुंबईच्या स्पेशल काँग्रेस पूर्वी सातारा जिल्हा ब्राह्मणेतर काँग्रेस भरवून तीत निकाल लावावा असे ठरले. त्यावेळी श्री. शिंदे, राणे, विचारे, भाऊराव पाटील, भाऊसाहेब देशमुख, भिलारे, पाडळे, जगताप इत्यादी पुढारी मंडळींची भाषणे झाली. [१७] (विजयी मराठा, पुणे ता. १५-८-१९२७)

सातान्याहून ही जोडगोळी पुसेगावला पोचली तेथे रात्री आनंदस्वामींचे कीर्तन झाले. तर पंढरीनाथ पाटलांनी "भागवत धर्म आणि भिक्षुकशाही" या विषयावर व्याख्यान दिले. दिनांक १० ऑगष्ट १९२७ रोजी ते गोंदवले येथे मुक्कामी होते. त्या ठिकाणी त्यांना बरेच महत्वाचे कागदपत्र मिळाले. १८९४ साली याच गावी तेथील सत्यशोधक पंडित धोंडिराम आणि श्रृंगेरी मठाचे शंकराचार्य यांचा वाद होऊन पंडीत धोंडिरामांनी जगद्गुरूचा पराभव केला. सत्यशोधक समाजास शंकराचार्यांनी अजिंक्यपत्र दिले. त्याचदिवशी म्हणजे १० ऑगष्ट १९२७ रोजी पंढरीनाथ पाटील, म. फुले यांचे मूळ गाव जे करगुण तेथे गेले. तेथे त्या दिवशी त्यांचे व्याख्यान झाले. करगुण जवळच्या सातगुण येथेही पंढरीनाथ पाटील गेले. म. फुलेंच्या बहुतेक सर्व वंशज भाऊबंधांना भेटले. या दोनही गावात या दोनही पाहुण्यांचा स्वागत सोहळा व भाषणे झाली. त्यानंतर हे वऱ्हाडचे सुपुत्र ११ ऑगष्ट रोजी कोल्हापूरला पोचले. दिनांक १२ ऑगष्ट १९२७ रोजी तेथील सत्यशोधक समाज मंदीरात श्री. बागल वकिलांचे अध्यक्षतेखाली सभा झाली. त्या सभेत 'संघटना' या विषयावर उभय पाहुण्यांची उत्कृष्ट भाषणे झाली. त्यानंतर सत्यशोधक समाज संघटन, म. फुले सोसायटीची स्थापना, महात्मा फुले स्मारक इत्यादी विषयांवर या दोनही वऱ्हाड सुपुत्रांनी चर्चा केली. या विषयांवर सत्यशोधक समाज मंदिरात अशी सुंदर चर्चा यापूर्वी कधी झाली नव्हती असे अनेक वक्त्यांनी आपल्या भाषणातून व श्रोत्यातूनही मत व्यक्त झाले.

दिनांक १४ ऑग।ष्ट १९२७ रोजी कोल्हापूर ब्राह्मणेतर संघाच्या कार्यालयात 'पेशवा' पत्राचे 'विधाना'वर नामदार भास्करराव जाधव, रावसाहेब निंबाळकर, रावसाहेब बागडे, श्री. आनंदस्वामी व श्री. बाबूराव यादव यांची भाषणे झाली. त्यानंतर ते १५ ऑगष्ट रोजी बेळगावला गेले.

दिनांक १५ व १६ ऑगष्ट १९२७ या दोन दिवसात त्यांनी बेळगावला तेथील मारूती मंदिरात "हिंदुसंघटन" व "सत्यशोधक समाजाची तत्वे" या विषयावर या

दोनही वक्त्यांची तर्कसंगत, प्रेरक जोरदार भाषणे झाली. तीन हजाराच्या जवळपास समुदाय उपस्थित होता. बेळगावात ते ठिकठिकाणी जाऊन त्यांनी ब्राह्मणेतर व सत्यशोधक विचार आपल्या भाषणातून आठवडाभर मांडले. बेळगावकरांना हा आठवडा म्हणजे एक पर्वणीच होती. (१८) (ब्राह्मणेतर, वर्धा ता. २१-८-१९२७)

बेळगावचा आठवडाभर दौरा करून स्वामी व पाटील परत दिनांक १८ ऑगष्ट रोजी कोल्हापूरला आले. सायंकाळी तेथील सत्यशोधक समाज मंदिरात ''हिंदी संघटन'' या विषयावर डॉ. के. के. चव्हाण यांचे अध्यक्षतेखाली या दोघांची भाषणे झाली. यावेळी या दोघांनीही हिंदूसंघटन, हिंदु मुसलमानांची एकी व सत्यशोधक समाज मताचा प्रसार या मुद्यांचे सखोल विवेचन करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. दिनांक १९ ऑगष्ट १९२७ रोजी सोलापूर जिल्ह्यातील सांगोला म्युनिसिपल हॉल समोरच्या मैदानावर जंगी सभा झाली. या सभेचे अध्यक्षपद सरदार शामराव लिंगाडे एम.एल.सी. यांनी भूषविले. यावेळी आनंदस्वामी, पंढरीनाथ पाटील, पतंगे व सभेचे अध्यक्ष सरदार लिंगाडे यांची उत्कृष्ट भाषणे झाली. सरदार लिंगाडे या जोडींवर जाम खुष झाले. त्यांनी त्यांना दोन दिवस मुक्कामाला ठेवून घेतले.

दिनांक २१ ऑगष्ट १९२७ रोजी पंढरपूर येथील आठवडी बाजारात मोरे वकीलांच्या अध्यक्षतेखाली विराट सभा झाली. या सभेत आनंदस्वामींचे स्फूर्तीदायक भाषण झाले. या सभेला ब्राह्मण, वकील, बडवे व व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हिन्दुसंघटन, अस्पृश्यांना देवळात प्रवेश देण्याची आवश्यकता व देवस्थान बील कायदे कौन्सिलात आणण्याची जरूरी, सत्यशोधक मताचा प्रचार इत्यादी विषयांचे सांगोपांग विवेचन करण्यात आल्यामुळे श्रोतृवर्ग माना डोलू लागला होता. त्यानंतर २२ ऑगष्ट १९२७ रोजी तेथील चोखामेळा धर्मशाळेत मोरे वकिलांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्यांची जाहीर सभा झाली. त्या सभेत दोनही पाहुण्या वक्त्यांनी अस्पृश्यता निवारणावर भाषणे केली. त्यानंतर वऱ्हाडकर पाहुणे नगर जिल्ह्यात गेले.

**म. फुले चरित्र दुसरे - साधनांचा शोध**

जून १९२७ मध्ये पंढरीनाथ पाटलांनी लिहिलेल्या म. फुलेंच्या पहिल्या चरित्राच्या दोन हजार प्रती केव्हाच संपल्या म्हणून व नवीन जास्त माहिती मिळवून विस्तृत चरित्र लिहिण्यासाठी पंढरीनाथ पाटलांनी नवी साधने शोधण्याची मोहीमच

हाती घेतली. त्यासाठीच त्यांनी म. फुले जन्मशताब्दी निमित्त उत्तर-पश्चिम महाराष्ट्राचा दौरा केला. त्या दौऱ्यात ते २ सप्टेंबर १९२७ रोजी आनंदस्वामींसह नारायणगावला गेले. तेथे स्वामींची सभा व कीर्तने झाली. तेथून ते ६ ऑक्टोबर १९२७ रोजी ओतूरला पोचले. तेथील मारूती मंदिरात त्यांची सुश्राव्य भाषणे झाली. पंढरीनाथांचे भाषण ऐकून सर्वच खूष झाले. तेव्हा अण्णासाहेब देशमुखांनी पंढरीनाथ पाटलांना पागोटे-शेला पाघरून त्यांचा सन्मान केला. म. फुलेंबद्दल माहिती मिळविण्यासाठी ते ओतूर, चांदोली, जुन्नर येथे ४/५ दिवस मुक्कामी होते. त्यानंतर ते पुण्याहून मुंबईस रवाना झाले.

(२२) विजयी मराठा, पुणे ता. २४-१०-२७

आनंदस्वामी व पंढरीनाथ पाटील पंधरा दिवस मुंबईत थांबले. या अवधीत त्यांनी चोरवाडी, डोंगरी, कुर्ला इत्यादी ठिकाणी व्याख्याने दिली. मुंबईत असताना पंढरीनाथ पाटील यांना म. फुले यांच्या चरित्राबद्दल बरीच महत्वपूर्ण माहिती मिळाली. त्यानंतर हे दोघेही समाजसेवक नेमाड, बऱ्हाणपूरकडे मध्यप्रांतात गेले. तिकडे २७ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर १९२७ पर्यंत थांबून ते ८ नोव्हेंबर रोजी वऱ्हाडात परत आले. (२३)

( विजयी मराठा, पुणे ता. २१-११-१९२७)

वऱ्हाडात परतल्यावर ते दिनांक २७ मे १९२७ रोजी पिंप्रीला (ता. मलकापूर) असताना त्यांनी दुसरे चरित्र साधन म्हणून म. फुलेंनी लिहिलेले 'गुलामगिरी' हे पुस्तक वाचायला घेऊन त्याचे वाचन दिनांक २३ मे १९२८ रोजी पूर्ण केले. २४ मे १९२८ रोजी 'इशारा' व ठाणे येथील सत्यशोधक समाज परिषद रिपोर्टही पिंप्री आढावलाच वाचले. दिनांक २६ मे १९२८ रोजी बुलडाणा मुक्कामी असताना 'शूद्र जातीतील पंचायती' हे पुस्तक वाचायला घेऊन त्याची ६० पाने वाचली.

दिनांक ३१ मे १९२८ पासून १४ जून १९२८ पर्यंत वर्धा जिल्ह्यात जिल्हा कौन्सिल निवडणूक प्रचारासाठी असतानाच त्यांनी वर्धा येथील नेटिव्ह जनरल लायब्ररीत पुणे शहर भाग १ व २ पुस्तकाचे वाचन केले. त्यातून त्यांनी म. फुले चरित्र दुसरे साठी महत्वाच्या मुद्यांची नोंद घेतली. तर २९ जूनला बुलडाणा मुक्कामी टिळक चरित्राचा पहिला खंड वाचायला सुरूवात केली. पहिल्या चरित्रासाठी त्यांनी घेतलेल्या कर्ज परतफेडी पोटी उमरावतीच्या नानासाहेब अमृतकरांना पहिल्या फुले चरित्राच्या दोनशे प्रती दिल्या. त्या दिवशी अमृतकरांकडे भाऊसाहेब गुंडही मुक्कामी होते. त्यावेळी त्या दोघांशी फुल्यांच्या दुसऱ्या चरित्र लेखना संदर्भात चर्चा केली.

दिनांक २० व २१ जुलै १९२८ रोजी पुणे येथील नगर वाचनालयात 'चिपळूणकरांचे चरित्र' व लेखांचे 'साधारण स्वरूप' ही पुस्तके मिळवून वाचली. रात्री ९ वाजेपर्यंत 'मजूर' पत्राच्या कार्यालयात जाऊन त्या पत्राच्या जुन्या फाईल्स मधून शोध घेण्याचा प्रयत्न केला व काही माहिती शोधून काढून नोंद घेतली. २२ जुलै १९२८ रोजी ते पुण्यातील ''विजयी मराठा'' या वृत्तपत्राचे संपादक श्री. श्रीपतराव शिंदे यांना भेटले. त्यांच्याशी तीन तास चर्चा करून नंतर ते 'सर्व्हन्टस् ऑफ इंडिया सोसायटीत' जाऊन तेथे 'ज्ञानप्रकाश'च्या जुन्या फाईलींचा धांडोळा घेतला. पण काहीच हाताला लागले नाही. स्वराज्य पत्राच्या कार्यालयात जाऊन नंतर श्री. वाघुलेबाबा व गुप्ते वकील यांच्या घरी जाऊन माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला पण काहीच सापडले नाही. दिनांक २३ जुलैला त्यांना लोकहितवादी हा निबंध मिळाला. परंतु त्यात लोकहितवादी चरित्राऐवजी स्वामी दयानंदांचे चरित्र वाचावयास मिळाले. शेवटी त्यांनी लोकहितवादींचे चरित्र बाजारातून विकत घेतले व वाचले.

दिनांक २५ जुलै १९२८ ते २६ जुलै १९२८ या कालावधीत त्यांनी पुणे मुक्कामी 'विष्णुशास्त्री चिपळूणकर' हे विठोबा रामचंद्र धामनस्कर लिखित चरित्र तसेच डॉ. श्रीमती आनंदीबाईचे चरित्र, कै. घोरपडे व डॉ. भांडारकर यांची चरित्रे वाचली. २ ऑगष्ट १९२८ रोजी पुणे मुक्कामी त्यांनी ज्या म्युनिसिपालिटीचे सदस्य म. फुले होते, त्या म्युनिसिपालिटीच्या कार्यालयात जाऊन फुलेंच्या कार्यकाळात त्यांनी केलेल्या कामाची माहिती १८७४-७५ सालातील म्युनिसीपालिटी प्रोसिडिंग बुकातून मिळविली. त्याकामी त्यांना नामदेव गणेश बागडे, लक्ष्मण रघुनाथ भिडे यांची खूप मदत झाली. फुलेंनी केलेली कामे व त्यांच्या कामाची पद्धत त्यांना कळली. ३ ऑगष्ट १९२८ रोजी त्यांनी पुणे नगर वाचनालयातून मांडलिककृत 'हिन्दुस्थानचा इतिहास' मिळविला. त्यातून बरीच माहिती उतरवून घेतली. दिनांक ४ ऑगष्टला श्री. भाऊ डुंबरे, घोले व जेधे यांच्या भेटी घेतल्या. ५ ऑगष्ट रोजी हिन्दुस्थानच्या उपरोक्त इतिहासाबाबत श्री. श्रीपतराव शिंदे यांच्याशी चर्चा केली. तसेच म्युनिसीपालिटीच्या रेकॉर्डमधून म. फुलेंनी सुरू केलेल्या अनाथालयातील मुलांच्या जन्मतारखा शोधण्याचा प्रयत्न केला.

म. फुलेंची वंशावळ शोधण्यासाठी त्यांनी (वंशावळी लिहिणारे) फुलेंचे भाट मालगण उर्फ उपाध्याय यांचेकडे चाकण, खेड, चास व वाडा येथे ८ ऑगष्ट रोजी डॉ. अभंग यांना भेटले. त्यांच्याकडून फुले वंशावळीची बरीच माहिती त्यांना मिळाली.

फुल्यांकडील पोरक्या पोरींची माहिती त्यांनी म्युनिसिपल कमिटीच्या रेकॉर्डमधून मिळवून तपासली. १० ऑगष्ट रोजी त्यांना १८७८ सालापासूनचे पुणे म्युनिसिपालिटीचे रेकॉर्ड मिळाले. त्यात म. फुलेंनी म्युनिसिपालिटीत केलेल्या कामाचा इंग्रजी रिपोर्ट मिळाला. त्यातून महत्वाच्या नोंदीचे मराठी भाषांतर करून उतरवून घेतल्या. दिनांक ११ ऑगष्ट रोजी सकाळी भाऊ डुंबरे यांचे घरी जाऊन त्यांची व जेधेंची भेट घेतली. त्यावेळी उपलब्ध झालेले रावबहादूर टुल्लू लिखित 'अर्वाचीन महाराष्ट्र' हे पुस्तक वाचले. त्याचदिवशी दुपारी म. फुले यांच्या घरात असलेल्या सावता माळी बोर्डिंगातील विद्यार्थ्यांसमोर पंढरीनाथांचे म. फुले चरित्रावर तीन तास व्याख्यान झाले.

महात्मा फुले चरित्र दुसरे माहितीने समृद्ध करण्यासाठी पंढरीनाथांनी जीवाचे रान केले. ते पुण्याहून दिनांक १२ ऑगष्ट रोजी मुंबईस गेले. तेथे त्यांनी त्याच दिवशी श्री. गोविंदराव शिंदे, श्री. नाईक, डॉ. गोवंडे, बॅरिस्टर आंबेडकर, रावसाहेब वंडेकर व डॉ. चव्हाण यांच्या भेटी घेतल्या. तसेच मराठी ग्रंथसंग्रहालय, 'कैवारी' वृत्तपत्राचे कार्यालय, खादी भंडार, प्रार्थना समाज इत्यादी ठिकाणीही जाऊन आले. दिनांक १३ ऑगष्ट १९२८ रोजी डॉ. गोवंडे यांचेकडे जाऊन डॉ. गोवंडेंनी 'ज्ञानोदय' संपादक रेव्हरंट एडवर्ड यांची भेटही घेतली. हे शोधकार्य त्यांनी २५ सप्टेंबर १९२८ पर्यंत केले. याच दरम्यान २३ सप्टेंबर १९२८ रोजी चिंचपोकळी येथील सार्वजनिक गणपतीपुढे झालेली मान्यवर वक्त्यांची व्याख्याने ऐकली. त्याच दिवशी रात्री १० वाजता भायखळा येथील सेहेर मार्केटमध्ये सातार्‍याचे श्री. भाऊराव पाटील यांचे अध्यक्षतेखाली पंढरीनाथांचे म. फुले चरित्रावर व्याख्यान झाले. पुण्यास जाऊन ते परत ४ ऑक्टोबर १९२८ रोजी मुंबईस जाऊन बॅरिस्टर तालचेकर आणि रेव्हरंट मिस्टर एडवर्ड यांना भेटले. रॉयल एसियाटिक सोसायटीतही गेले.

पिंप्री आढावला असताना दिनांक ५ जानेवारी १९३० रोजी लठ्ठे लिखित 'धर्म आणि ब्राह्मण' हे पुस्तक ६ जानेवारीला कालेलकर कृत 'जेधे जवळकरास उत्तर' ही पुस्तके दुसर्‍या चरित्रासाठी वाचली. ७ जानेवारी १९३० रोजी म. फुले कृत 'सत्यधर्म' हे पुस्तक वाचणे सुरू केले. जे अल्पावधीत वाचून पूर्ण केले. तसेच त्यासोबत मुंबई प्रांतिक ब्राह्मणेतर पक्षाचा बेळगाव ब्राह्मणेतर परिषदेने १९२१ साली पास केलेला जाहीरनामा त्यावेळी राष्ट्रवीर पत्रात प्रसिद्ध झालेला व वर्‍हाड मध्यप्रांतीय ब्राह्मणेतर परिषदेच्या चिखली अधिवेशनात पास झालेला जाहीरनामा दप्तरातून शोधून काढून वाचले.

दुसरे फुले चरित्राबद्दल माहिती मिळविण्यासाठी पंढरीनाथ पाटील दिनांक २६ जानेवारी १९३० रोजी अहमदनगरला पोचले. तेथे ते श्री. एकनाथराव नवले यांचेकडे उतरले. त्या ठिकाणी वयोवृद्ध (वय वर्षे ९०) ज्येष्ठ मिशनरीबाई श्रीमती फेरबॅक बी.ए.एलएल.बी. यांना भेटले. तसेच ज्येष्ठ वकील श्री पारवे यांचीही त्यांनी भेट घेतली. तेथून ते पुण्याला गेले. ते पुण्याला जेधे मेंशनमध्ये नेहमीप्रमाणे थांबले. तेथ त्यांनी २८ व २९ जानेवारी १९३० च्या अवधीत बागडे, शिंदे, ठोसर, डॉ. नवले, भिडे, लाड इत्यादी पुढाऱ्यांच्या भेटी घेतल्या. श्री. भिडे यांना सोबत घेऊन ते 'डेक्कन हेरॉल्ड' या जुन्या दैनिकाच्या संपादकांनाही भेटले. फुलेंवरील मृत्युलेख पाहण्यासाठी ते 'केसरी' कार्यालयातही गेले. तेथे त्यांना 'मराठा' या इंग्रजी दैनिकाचे संपादक दा. वि. गोखले व दै. केसरी पत्राचे मॅनेजर रावसाहेब विव्दांस हे दोघे भेटले. परंतु केसरी व मराठाच्या कार्यालयाने ताकास तूर लागू दिली नाही. ब्राह्मणेतर संशोधकांना - लेखकांना टिळकभक्त कशी मदत करणार ? पंढरीनाथांना टिळक संस्कृतीची यावेळी प्रत्यक्ष अनुभूती आली.

दिनांक ३१ जानेवारी १९३० रोजी मुंबईत असताना ते जेधे बंधुसोबत कोल्हापूरच्या महाराजांच्या समुद्रतटावर असलेल्या बंगल्यावर व नंतर ठाकूरद्वार येथे असलेल्या 'इंदुप्रकाश' या पत्राचे संपादक श्री. दामोदर सावळाराम यंदे यांना भेटण्यासाठी गेले. परंतु महाराज कोल्हापूरला गेलेले होते. तसेच इन्दुप्रकाशच्या फाईल्स उपलब्ध नसल्याचे कळले. परंतु यंद्यांकडून पंढरीनाथांना श्रीमद्‌भगवत गीतेची शेवटच्या भागाच्या पुस्तकाची एक प्रत भेट स्वरूपात मिळाली.

२ फेब्रुवारी १९३० रोजी मुंबईहून वऱ्हाडात येण्यासाठी रेल्वेने निघाले. दुसऱ्या दिवशी सकाळी गाडीतच योगायोगाने म. फुलेंचे मित्र श्री. सदाशिवराव गोवंडे यांचे धाकटे नातू श्री. माधवराव गोवंडे यांची भेट झाली. त्यांच्याशी म. फुले चरित्राबाबत बोलत ते बडनेऱ्यापर्यंत सोबत आले. तेथे गोवंडे उमरावतीसाठी उतरले. तर पंढरीनाथ पाटील वर्ध्यासाठी पुढे रवाना झाले.

२३ फेब्रुवारी १९३० रोजी मुंबईत अखिल भारतीय ब्राह्मणेतर पुढाऱ्यांची सभा झाली. त्या सभेनंतर पंढरीनाथ दिनांक २५ फेब्रुवारी १९३० ते १५ मार्च १९३० या कालावधीत म. फुलेंच्या दुसऱ्या चरित्रासाठी साधनांचा शोध घेण्यासाठी मुंबईतच थांबले. या काळात त्यांनी 'ज्ञानोदय' वृत्तपत्राच्या संचयिका (फाईल्स) वाचून त्यातून

फुले चरित्रासाठी उपयुक्त माहिती उतरवून घेतली. दिनांक २ मार्च १९३० रोजी, त्यांचे जुने स्नेही श्री. नवरंगे यांची कन्या, डॉ. काशीबाई नवरंगे यांची भेट झाली. डॉ. बाईंना पूर्वीचे काहीच माहीत नव्हते. पंढरीनाथांनी आपले ओळखीचे जाळे पसरले. त्यानंतर ते ज्ञानोदयाच्या कार्यालयात जाऊन पुन्हा म. फुलेंच्या चरित्राचा शोध घेत सायंकाळपर्यंत बहुतेक सर्व फाईल्स हाताळल्या. त्यानंतर ते 'कैवारी' वृत्तपत्राचे संपादक श्री. गणपतराव जाधव यांचे अध्यक्षतेखाली भायखळा येथे शिवाजी हॉलमध्ये झालेल्या सभेत 'पाऊणशे वर्षापूर्वीचा महाराष्ट्र' या विषयावर दोन तास बोलले. ३ मार्च १९३० रोजी मुंबईच्या कामाठीपुरा, कुलाबा, भायखळा, चिखलवाडी, दादर आदि भागातील म. फुलेंशी संबंधित नातलग, कार्यकर्ते, मित्र यांचा शोध घेत फिरले. त्यांना चिखलवाडीत दत्तात्रय इमातीतील रामस्वामी आय्यावारूचा मुलगा शेशव स्वामी भेटला. परंतु फारशी माहिती हाती आली नाही. दुसऱ्या दिवशी ४ मार्चला त्यांनी 'फुल्यांची पत्रकारिता' याविषयी शोध घेण्यासाठी टाऊनहॉल मधील एशियाटिक सोसायटीच्या संग्रहातील 'टाईम्स ऑफ इंडिया' या इंग्रजी दैनिकाच्या सन १८५९-६० च्या संचयिका (फाईल्स) हाताळल्या. ते ७ मार्च १९३० पर्यंत नियमित एशियाटिक सोसायटीत जाऊन संशोधन करीत राहिले. या अवधीत त्यांनी फुल्यांची पत्रकारिता, 'रिपोर्ट ऑफ इंडिया एज्युकेशन कमिशन १८२२'', ''इंडिया फॅक्टरी कमिशन रिपोर्ट १८९०'' वाचले. पहिल्या रिपोर्टात फुलेंचा तर दुसऱ्या रिपोर्टात लोखंडेंचा गौरवपूर्ण उल्लेख असल्याचे त्यांना आढळले. त्यातून फुले चरित्रासाठी उपयुक्त माहिती टिपून घेतली. महात्मा जोतीबा फुले चरित्र लेखनासाठी चिवटपणे व जिद्दीने संशोधन करणाऱ्या ग्रामीण भागातील ब्राह्मणेतर मान्यवर कार्यकर्त्या पुढाऱ्यांचे शहरी उच्च विद्याविभूषित शहरी ब्राह्मणेतर कार्यकर्त्या पुढाऱ्यांनी खरे पाहता कौतुक करून प्रोत्साहनच द्यायला हवे. परंतु चळवळीतील अध्वर्यूच त्यांच्या कामात मदत करण्याऐवजी अडसर आणू लागलेले पाहून त्यांना फार वाईट वाटले. मुंबईत असताना त्यांनी एशियाटिक सोसायटीतून फुलेंनी हंटर कमिशन समोर दिलेली साक्ष महत्प्रयासाने शोधून काढून उतरवून घेतली होती. ते टिपण मुंबईस्थित अखिल भारतीय सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष नामदार भास्करराव जाधव - मुंबई कायदे कौन्सिलचे शेतकी खात्याचे दिवाण यांनी, पंढरीनाथांनी टाईप करून वाचावयास दिलेले, बऱ्याच वेळा मागूनही पंढरीनाथांना परत दिले नाही. दुसरी प्रत काढून देण्याचे कबूल करूनही दिले नाही. त्यामुळे पंढरीनाथांना मोठा उद्वेग आला. एक जबाबदार माणूस असे वागला याची त्यांना चीड आली. अशा मनस्थितीतच ते त्या दिवशी म्हणजे दिनांक ८

मार्च १९३० रोजी सायंकाळी सयाजीराव राजे गायकवाड यांच्या अभिनंदन सभेसाठी थियासिफिकल सोसायटीच्या मंदिरात गेले.

पंढरीनाथ महात्मा फुलेंचे दुसरे चरित्र माहितीने समृद्ध करण्यासाठी, वास्तव माहितीचा शोध घेण्यासाठी पायाला भवरा बांधल्यागत फिरत होते. दिनांक ९ मार्च १९३० ते पुन्हा मुंबईच्या कामाठी पुऱ्यात गेले. तेथे जोतीरावांच्या बोर्डींगात विद्यार्थी राहिलेले काही तेलगू लोक असल्याचे कळल्यावरून ते तेथे गेले. तेथे त्यांना 'शामबा सेठ' म्हणून प्रसिद्ध असलेला माजी विद्यार्थी भेटला. त्याने जोतीबाबद्दल त्याला जेवढी माहिती होती, तेवढी लिहून देण्याचे कबूल केले. त्याची भेट घेऊन पंढरीनाथ पाटील दुपारी ठाकरशी हॉलमध्ये भरलेल्या अ. भा. सत्यशोधक समाजाच्या परिषदेसाठी गेले. ही परिषद दीनमित्राचे संपादक श्री. मुकुंदराव पाटील यांचे अध्यक्षतेखाली झाली. स्वागताध्यक्ष श्री. आसवले हे होते. या सभेत पंढरीनाथांशिवाय कोणीही परप्रांतीय नव्हते. पंढरीनाथांनी या परिषदेत मिश्र विवाहाचा ठराव मांडण्याचा प्रयत्न केला. पण परिषद अध्यक्षांनी त्यांना परवानगी दिली नाही.

रावसाहेब वंडेकरांनी फुले चरित्रासाठी ५० रूपये देणगी देण्याचे कबूल केले. पण पंढरीनाथांनी ती देणगी नाकारली. कारण मुंबईतील ब्राह्मणेतरांचे पुढारी म्हणून गणले गेलेले रावसाहेब रामचंद्रराव विठ्ठलराव वंडेकर यांनी पंढरीनाथांना फसविण्याचा प्रयत्न केला. 'हे गृहस्थ एकवचनी नाहीत व त्यांच्या अंगी इतरांविषयी साधी सहिष्णूताही कमी आहे' असे पंढरीनाथांच्या लक्षात, अनुभवास आले होते.

जोतीरावांचे काही तेलगू स्नेही होते. त्यांच्या फोटोचे ब्लॉक पंढरीनाथांनी त्याच दिवशी श्री. पारशा यांचेकडून तयार करून घेतले. तसेच डॉ. यशवंतराव फुले यांचे बोर्डिंगातील एक विद्यार्थी श्री. जाया इंजिनिअर, कुलाबा मील मध्ये काम करणारे, यांची भेट झाली त्यांनी सावित्रीबाई फुले व डॉ. यशवंतराव फुले यांची माहिती लिहून देण्याचे कबूल केले. त्यानंतर त्याच दिवशी १० मार्च रोजी सोमवारी न्यायमूर्ती रानडेंचे चरित्रकार न. र. फाटक बी.ए. यांची भेट त्यांनी घेतली. १५ मार्च १९३० पर्यंत ते यावेळी मुंबईत होते. या काळात त्यांनी एशियाटिक सोसायटी, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय येथे सतत जाऊन फुले चरित्रासाठी संशोधन केले. तसेच श्री गोविंदराव शिंदे, श्री. गोवंडे, श्री. केळुसकर, श्री. दामोदर सावळाराम यंदे, कालेलकर, बोले, राणे यांच्या भेटी घेतल्या. त्यांच्याशी चर्चा केली.

बडोद्याचे सयाजीराव महाराज यांचेकडे म. फुले यांची माहिती मिळू शकेल

असे श्री. दामोदर सावळाराम यंदे यांचेकडून कळले. म्हणून महाराजांच्या भेटीसाठी बडोद्यास जाण्याचे पंढरीनाथांनी ठरविले. महाराजांच्या भेटीसाठी श्री. यंदे यांनी महाराजांचे बंधू श्रीमंत संपतराव गायकवाड यांना, पंढरीनाथांसाठी ओळखपत्र दिले. ते पत्र घेऊन पंढरीनाथ ता. १५ मार्च १९३० रोजी स्वगृही वऱ्हाडात येण्यास निघाले.

**बडोद्यास प्रस्थान**

श्री. दामोदर सावळाराम यांचे ओळखपत्र घेऊन घरी आले. २० मार्च १९३० रोजी ते फुलेंच्या माहितीचा शोध घेण्यासाठी माहितीचा ठेवा व जिव्हाळा असलेल्या बडोदा सरकार सयाजीराव महाराज गायकवाडांच्या भेटीसाठी निघाले. वाटेत जळगाव खानदेशला त्यांनी आत्मोद्धाराचे संपादक सीताराम नाना चौधरी यांची भेट घेतली. जळगावहून रेल्वेने प्रवास करीत दिनांक २१ मार्च १९३० रोजी सायंकाळी ५ वाजता ते बडोदा येथे पोचले.

बडोद्यास पोचल्यावर दुसऱ्या दिवशी श्री. भगवंतराव पाळेकर जागृती पत्राचे संपादक यांना सोबत घेऊन सयाजीराव गायकवाड महाराजांचे बंधू श्रीमंत संपतराव गायकवाड महाराज यांना भेटले. तेव्हा कळले की, सयाजीराव महाराज त्यावेळी आजारी होते. ते बोलू शकणार नव्हते. पुढच्या वर्षी तुमची भेट करून देऊ असे पंढरीनाथांना सांगण्यात आले. पंढरीनाथांना वर्षभर थांबणे शक्य नव्हते. ते चांगले खटपटी होते ते लगेच किर्तीमानराव निंबाळकर पोलीस अधिकारी यांना भेटले. नंतर ते भगवंतराव पाळेकरांकडे गेले. ते पाळेकरांकडेच उतरले होते. पाळेकरांच्या घरी त्यांनी 'विविधज्ञान विस्तार' मासिकाचे काही अंक वाचले. संध्याकाळी ८ वाजेपर्यंत बडोदा संस्थान कचेरी व राजमहाल पाहिला. ते बडोद्याला २१ मार्च ते ७ एप्रिल १९३० पर्यंत होते.

या काळात त्यांनी पाळेकरांकडे थांबून विविधज्ञान विस्तारचे जानेवारी, फेब्रुवारी, मार्चचे अंक वाचले. त्यापैकी फेब्रुवारी मार्चच्या अंकात श्री. न. र. फाटक बी.ए. यांनी लिहिलेली विष्णुशास्त्रीवरील टीका वाचून आवश्यक ते उतारे, मुद्दे आपल्या वहीत नोंदवून घेतले. १९२७ साली वर्ध्याला असताना खरांगणा येथील एक तरूण त्यांना भेटला होता. तो यावेळी तेथे कॉलेजात शिकत होता. त्याची भेट झाली. त्याचे नाव चिंतामणराव पांडे, त्याचे ओळखीमुळे सयाजीराव महाराजांचे मुख्य ए.डी.सी. सडेकर पवार यांचेकडे ते गेले. ते सुस्वभावी व सहकारी वृत्तीचे गृहस्थ होते. त्याने पंढरीनाथ व महाराज यांची भेट घडवून देण्याचे कबूल केले. दरम्यानच्या काळात

पंढरीनाथ तेथील सरकारी सेंट्रल लायब्ररीत गेले. तेथील सर्व ग्रंथ याद्या तपासून महत्वाच्या ग्रंथांची नावे व पत्ते लिहून घेतले. त्यात महात्मा जोतीरावासंबंधी काही पुस्तके होती. ती मागितली असता एकही पुस्तक मिळाले नाही. या लायब्ररीत मराठी पुस्तकांची लांछनीय स्थिती पाहून त्यांना वाईट वाटले. त्यामानाने जयसिंगराव लायब्ररी त्यांना बरी वाटली. ते त्या लायब्ररीचे वर्गणीदार झाले. तेथे त्यांना 'मराठा मित्र' मासिकाचे जुने संग्रहीत अंक मिळाले. विविधज्ञान विस्ताराची फाईलही मिळाली. 'दंभहारक' मासिकाच्या फाईल फुले चरित्रासाठी उपयुक्त म्हणून वाचल्या. आवश्यक ते मुद्दे व उतारे नोंदवून घेतले. या लायब्ररीत ते रोज जाऊ लागले. तेथे त्यांना बरीच उपयुक्त माहिती मिळाली.

महाराजांची तब्येत अजूनही सुधारली नव्हती हे दिनांक २७ मार्चला पंढरीनाथ सडेकर पवारांना भेटले तेव्हा त्यांना कळले. सडेकर पवारांनी महाराजांना विचारावयाचे प्रश्न पंढरीनाथांकडून लिहून घेतले. सदर प्रश्नांचा कागद घेऊन पंढरीनाथ सडेकर पवारांसोबत लक्ष्मी विलास राजवाड्यात गेले. सडेकरांनी पंढरीनाथांची महाराजांच्या सेक्रेटरीशी भेट करून दिली. पूर्वी १९२७ साली प्रकाशित केलेल्या, म. फुले चरित्राची एक प्रत महाराजांना वाचण्यासाठी नजर केली. शनिवार दिनांक २९ मार्च १९३० देवास (थोरली पाती) चे महाराज तुकोजीराव पवार श्रीमंत सयाजीराव महाराजांकडे पाहुणे होते. पंढरीनाथ पाटील तेथे असल्याचे त्यांना पाळेकरांकडून कळले. परंतु महाराजांचा तसा खास निरोप नसल्यामुळे ते गेले नाही. रविवार दिनांक ३० मार्च १९३० रोजी सयाजीराव महाराजांचे ए.डी.सी. सडेकर पवार यांनी पंढरीनाथांना सायंकाळी ५॥ वाजता लक्ष्मी विलास पॅलेसवर नेले. महाराज थोडे आजारी होते. त्यामुळे त्यांच्याशी चर्चा वा बोलणे झाले नाही. सदर चरित्र लिहिण्यास घेतल्याबद्दल महाराजांनी समाधान व्यक्त केले. १९२७ साली प्रकाशित झालेल्या चरित्राची एक प्रत महाराजांपुढे ठेवण्यात आली. नंतर महाराजांच्या सांगण्यावरून पंढरीनाथांसोबत एक माणूस देऊन लक्ष्मी विलास राजवाडा दाखविण्यात आला. राजवाड्याचे बांधकाम त्यातील नक्षीकाम, स्वच्छता व टापटीप पाहून पंढरीनाथ प्रसन्न झाले. शनिवार दिनांक ५ एप्रिल १९३० रोजी पुन: एकदा सडेकर पवार व महाराजांचे नायब हुजूर कामगार मि. गुप्ते यांची पंढरीनाथांनी भेट घेतली. फुल्यांविषयी महाराज जास्त बोलू शकतील एवढी त्यांची प्रकृती चांगली नसल्याचे कळले. मंगळवार पर्यंत थांबावे असा सल्ला दिला.

मंगळवार दिनांक ७ एप्रिल १९३० रोजी महाराजांचे ए.डी.सी. श्री. सडेकर

पवार यांची त्यांनी भेट घेतली. पण त्याही दिवशी महाराजांची भेट झाली नाही. परंतु त्या दिवशी पूर्वखानदेशचे (जळगावचे) श्री. केशवराव पाटील सेक्रेटरी, विद्याप्रसारक मराठा समाज जळगाव हे भेटले. त्यांच्यासह एका शिपायाने गायकवाड महाराजांचा नजरबाग राजवाडा दाखविला. श्रीमंत सयाजीराव महाराजांनी बडोदा संस्थानात किती चांगली सुधारणा केली याचे विहंगमदृश्य या राजवाड्यावरून दिसते.

## पुन्हा मुंबई – पुण्याकडे धाव

महात्मा फुलेंचे दुसरे चरित्र लिहिण्यासाठी जास्तीत जास्त साधनांचा शोध घेण्याचे कार्य पंढरीनाथांनी सुरू केले. अत्यंत चिकाटी व जिद्द त्यांच्यात होती म्हणूनच ते बडोद्यापर्यंत जाऊन आले. आतापर्यंत त्यांनी केलेल्या संशोधनात कमी राहू नये म्हणून बडोद्याहून ते पुन्हा मुंबई पुण्याकडे धावत आले. गुरूवार दिनांक ८ मे १९३० रोजी ते मुंबईला पोचले. नेहमीप्रमाणे ते श्री. रघुनाथ शेकूजी बहिरट यांचेकडे उतरले. रामचंद्र दादाजी कोळी बी.ए. यांना सोबत घेऊन ते मुंबई प्रांतिक सरकारच्या शिक्षण खात्याच्या जुन्या कागद पत्रांचा धांडोळा घेऊ लागले. तसेच मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात जाऊन तेथे इ. स. १८९० च्या 'नेटिव्ह ओपिनियन' व 'विहार वार्ता' या पत्रातील जोतीरावांचे मृत्युचे लेख उतरवून घेतले. रविवार दिनांक ८ जून रोजी पुणे येथील टिळकांचे घरी जाऊन केसरी पत्राच्या फाईल्स वाचल्या. दिनांक ९ जून १९३० रोजी अहमदनगर येथे नामदार जाधवरावांचे जावई श्री. भापकर यांचेकडे जाऊन 'ज्ञानोदय' पत्राच्या फाईल्स पाहिल्या. तर दिनांक १०,११ व १२ जून १९३० रोजी अमेरिकन मिशन सोसायटीच्या मिसेस फेअर बॉक यांचेकडे जाऊन 'ज्ञानोदय' च्या काही फाईल्स वाचून आवश्यक त्या बाबींची टिपणे घेतली. दिनांक १२ जून रोजी पुण्यास परत जाताना वाटेत वाघुंडे गावी उतरून आनंद स्वामी यांचे भाऊ व बहीण यांची भेट घेऊन पुणे गाठले. वाघुंडे हे आनंदस्वामींचे गाव. श्री. ल. र. भिडे यांना सोबत घेऊन पंढरीनाथ पुण्याहून दिनांक १२ जून १९३० रोजी मुंबईस पोचले. तेथे तीन दिवस थांबून एल्फिस्टन कॉलेज इमारतीत मुंबई सरकारच्या शिक्षण खात्याचे जुने दप्तर आहे. त्यातून फुले चरित्रासंबंधी माहिती धुंडाळून आवश्यक उतारे व नोंदी घेतल्या.

मुंबईतील काम संपवून ते १५ जून रोजी पुण्याला पोचले. पुण्याहून ते आपल्या गावी जाऊन नंतर चिखली येथे गेले. तेथे त्यांनी छत्रपती प्रतापसिंह महाराज सातारकर भोसले यांचे चरित्र वाचले. ते १७ जून ते २८ जून या अवधीत चिखली येथेच होते. एवढी सारी साधने धुंडाळून म. फुलेंचे दुसरे चरित्र प्रकाशित करण्यास ८ वर्षे लागली.

❋

# भाग - ९

# राष्ट्रीय चळवळ

## खादीचा अंगीकार व प्रचार

१९२१ मधे राष्ट्रीय चळवळीत उडी घेऊन त्यांनी खादीचा अंगीकार केला. खादीचा प्रचार व प्रसारास चालना दिली. तारीख २० जुलै १९३९ रोजी तत्कालीन विदर्भ काँग्रेसचे अध्यक्ष नामदार ब्रिजलाल बियाणी यांच्या हस्ते सावरगाव डुकरे येथील ग्रामोद्योग केंद्राचे उद्घाटन झाले. त्यावेळी बुलडाण्याचे ज्येष्ठ काँग्रेस कार्यकर्ते पं. दिनकर लक्ष्मण कानडे शास्त्री अध्यक्ष चिखली तालुका काँग्रेस कमिटी व श्री. कृष्णराव बापू गारडगावकर उपस्थित होते. यावेळी प्रारंभीच पंढरीनाथांचे भाषण झाले. त्यांनी प्रांतातील जनतेच्या आर्थिक परिस्थितीविषयी माहितीपूर्ण विवरण आपल्या भाषणात केले. आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी ग्रामोद्योग महती वर्णन केली. पंढरीनाथ पाटील हे या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते.

याच काळात निवडणूकीचे वारे वाहू लागले. ब्राह्मणेतर पक्ष काँग्रेसमध्ये विलीन झाल्यामुळे ब्राह्मणांचे धाबे दणाणले. त्यांनी राष्ट्रीय सभेशी विश्वासघात केला. नवे मंत्रीमंडळ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा तत्कालीन ब्राह्मणांचे पुढारी डॉ. ना. भा. खरे यांना इशारा देणारे व त्यांचे मनसुबे धुळीस मिळतील असे अंदाज वर्तविणारे एक पत्रकच पंढरीनाथांनी एप्रिल १९४० मध्ये प्रसिद्ध केले. काँग्रेस आमदार यापुढे खऱ्यांना वश होणार नाहीत असे स्पष्ट जाहीर केले. (३८) ( मातृभूमि अकोला ता. ७-५-१९४० )

असहकाराचा भाग म्हणून डिसेंबर १९४० मध्ये गांधीजींनी सत्याग्रह घोषित केला होता. परंतु त्यांनी तो लगेच तहकूब करून पुढे ढकलला. तो १ जानेवारी १९४१ मध्ये सुरू झाला. पंढरीनाथ सत्याग्रहात भाग घेण्यासाठी जाणार म्हणून पिंप्री आढावला गावातून मोठी मिरवणूक काढण्यात आली. ठिकठिकाणी सुहासिनींनी पंढरीनाथांना प्रेमादराने व भक्तिभावाने ओवाळले. मिरवणूकीचे रूपांतर सभेत झाले. त्या सभेत गावकऱ्यांनी पंढरीनाथांचे अभिनंदनपर भाषणे केली. पंढरीनाथांनी काँग्रेसचा विधायक कार्यक्रम समजावून सांगितला. त्यानंतर पंढरीनाथ ३ जानेवारी १९४१ रोजी बुलडाणा

येथे डी. सी. श्री. सिंग आय.सी.एस. व डी. एस. पी. श्री. हुसैन यांची भेट घेऊन ता. ७ जानेवारी १९४१ रोजी सावरगाव डुकरे येथे करण्यात येणाऱ्या सत्याग्रहाची त्यांनी लेखी नोटीस दिली.

४ जानेवारी १९४१ रोजी मच्छिंद्रखेड, गौळखेड येथे पंढरीनाथांच्या अभिनंदनपर सभा झाल्या. त्या सभातून पंढरीनाथांनी राष्ट्राभिमान जागविणारी भाषणे केली. त्याच दिवशी दुपारी त्यांनी खामगाव येथे बुलडाणा जिल्हा काँग्रेस कमिटीच्या सभेतही सहभाग घेतला. त्यानंतर ते केळवद चिखलीमार्गे सावरगावला गेले.

७ जानेवारी १९४१ रोजी केळवद ता. चिखली जि. बुलडाणा येथे लक्ष्मणराव श्रावण भटकर एम.एल.ए. यांनी सत्याग्रह केला. त्यावेळी वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस अध्यक्ष श्री. वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. अनेक वक्त्यांनी सविनय कायदेभंगाच्या संदर्भात भाषणे केली. पन्नास संस्थांनी भटकरांचा हार घालून जंगी सत्कार करून अभिनंदनपर भाषणे केली. भटकरांनी सत्याग्रह करताच त्यांना सबडिव्हीजनल ऑफिसरांनी कैद केले व स्पेशल मोटारीत बुलडाणा येथे नेले. त्यानंतर ही सर्व मंडळी दुपारी सावरगावला गेली तेथे गावातून पंढरीनाथांची जंगी मिरवणूक काढण्यात आली. अनेक सुहासिनींनी ओवाळले. अनेक हार पंढरीनाथांच्या गळ्यात पडले.

फुले मैदानावर दुपारी ३ वाजता वऱ्हाडप्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष वामनराव जोशी उमरावती यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन अनेक प्रमुख वक्त्यांची पंढरीनाथांचे अभिनंदनपर भाषणे झाली. नंतर बुलडाणा जिल्हा काँग्रेस अध्यक्ष डॉ. पारसनिस, वऱ्हाडप्रांत काँग्रेस अध्यक्ष वामनराव जोशी अकोला, जिल्हा कौन्सिल अध्यक्ष व अकोला जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव खेडकर, बुलडाणा जिल्हा कौन्सिलचे व्हाइस चेअरमन श्री. चंद्रभान राऊत यांनी आपल्या संस्थांतर्फे पंढरीनाथांना हार घातले. नंतर मलकापूर, खामगाव, मेहकर व चिखली काँग्रेस कमिट्यांच्या अध्यक्षांनी हार घातले. म्युनिसिपल कमिटी बुलडाणा, चिखली, देऊळगावराजा व इतर ग्रामसंस्थांनी शंभराच्यावर हार घातले. त्यानंतर पंढरीनाथांनी छोटेसे भाषण करून सत्याग्रह केला. त्यावेळी पाच हजार लोक जमलेले होते. दुपारी १२ वाजता बुलडाणा येथील सबडिव्हीजनल ऑफिसर मि. नाईक यांचेबरोबर तहसिलदार चिखली, सर्कल इन्स्पेक्टर पोलिस चिखली इत्यादी पोलीस ताफा होता. सव्वा चार वाजता त्यांनी पंढरीनाथांना

अटक करून बुलडाणा येथे भटकरांसह जेलमध्ये पाठविले. सायंकाळी ६ वाजता त्यांना बंद करण्यात आले.

कायदेभंग केल्याबद्दल ८ जानेवारी १९४१ रोजी बुलडाणा फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेटसमोर त्यांना हजर करण्यात आले. कोर्ट जेलमध्येच भरले. सरकारी साक्षीदार तपासले. इंडियन डिफेन्स अॅक्ट ३८/५ प्रमाणे त्यांच्यावर आरोप ठेवून त्यांचे म्हणणे काय आहे ते विचारले. त्यांनी गुन्हा कबूल केला. कोर्टाला जे लेखी निवेदन दिले ते त्यांचे म्हणणे असल्याचे त्यांनी सांगितले. ९ जानेवारी १९४१ रोजी पाटील व भटकर यांना जेलमध्येच भरलेल्या कोर्टाने प्रत्येकी सहा महिने सक्त मजूरीची शिक्षा सांगून त्यांना ब वर्ग दिला व रात्रीच त्यांना नागपूरला हलविले. १० जानेवारी १९४१ रोजी नागपूर रेल्वेस्टेशनवर उतरताच नागपूर जिल्हा कौन्सिलचे चेअरमन बॅरिस्टर शेषराव वानखेडे व मित्रमंडळी आली. त्यांनी त्यांच्या मोटारीतून त्यांना नागपूर सेंट्रल जेलमध्ये नेले. सन १९४०-४१ मध्ये त्यांनी सत्याग्रहात सहभाग घेतला म्हणून त्यांना अटक होऊन शिक्षा झाली.

## जेलमधून सुटका व स्वागत

दिनांक १९ जून १९४१ रोजी (२० दिवसांची सूट मिळून) पंढरीनाथांची नागपूर जेलमधून सुटका झाली. बाहेर येताच नागपूरच्या मित्रांनी त्यांना फुलांचे व सुताचे हार घालून त्यांचे स्वागत केले. भाई मदनलाल बागडी यांचे घरी मेजवानी झाली. बुलडाणा जिल्ह्यात आल्यावर जलंब-खामगाव स्टेशनवर त्यांचे जंगी स्वागत झाले. जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व सेक्रेटरी तसेच हजारो कार्यकर्ते यांनी दोन हजारावर हार घालून पंढरीनाथांचे जल्लोषात जंगी स्वागत केले. खामगावला डॉ. एकबोटे यांचेकडे मेजवानी व श्रीमंत श्री. केलासेठ यांचेकडे अल्पोपहार झाला.

त्यानंतर चिखली तालुक्यात उन्द्री व चिखली येथे त्यांचे स्वागत झाले. चिखली येथे म्युनिसिपल कमिटी प्रेसिडेन्ट नथमलसेठ यांनी हार घालून स्वागत केले. गावातून जंगी मिरवणूक निघाली. रात्री मराठी मिडलस्कूल मैदानावर म्युनिसिपल कमिटीचे अध्यक्ष श्री. नथमलसेठ यांच्या अध्यक्षतेखाली विशाल सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेत पंढरीनाथांना चिखली नगरपरिषदेतर्फे मानपत्र देण्यात आले. शुक्रवार तारीख २० जून १९४१ रोजी सावरगाव डुकरे येथे भव्य मिरवणूक निघून रात्री विशाल

जनसमुदायाची सभा झाली. त्याठिकाणी गावकऱ्यांतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराच्या उत्तरात पंढरीनाथांनी देशभक्तीपर भाषण केले. २१ जून रोजी किन्होळा व २२ जून रोजी केळवद येथे त्यांचे जाहीर सत्काराचे कार्यक्रम झाले.

८ ऑक्टोबर १९४१ रोजी नामदार ब्रिजलाल बियाणी यांची जेलमधून सुटका झाली. त्यावेळी त्यांचे स्वागतासाठी पंढरीनाथ पाटील अकोला येथे गेले. त्यावेळी जिल्हा काँग्रेस कमिट्या अस्तित्वात नव्हत्या. १४ ऑक्टोबर रोजी खामगावचे डॉ. पारसनीस व पंढरीनाथ पाटील अनुक्रमे अध्यक्ष उपाध्यक्ष असलेली बुलडाणा जिल्हा विधायक कार्यकारी समिती निवडण्यात आली. महात्मा गांधींच्या वाढदिवसानिमित्त जिल्ह्यातून सात लाख वार सूत व पाचशे रूपये जिल्ह्याच्या वतीने पाठविण्यात आले.

बुलडाणा जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष श्री पंढरीनाथ पाटील एम.एल.ए. यांनी मे १९४१ मध्ये दिनांक १६ मे ते २१ मे १९४२ पर्यंत काँग्रेस मताचा प्रचार व प्रसार करण्यासाठी देऊळगाव राजा, देऊळगावमही, पेठ, किन्होळा, केळवद, साखळी खुर्द, दुधा, धाड, कोलवड व देऊळघाट या गावात जाऊन सभा घेतल्या त्याचवेळी त्यांच्यासोबत चिखली तालुका काँग्रेस अध्यक्ष श्री. चंपालालजी मेवाडे व जिल्हा काँग्रेस कमिटीचे सभासद श्री मुरलीधरजी बोरूळ होते. हे तिघेही या सभांमधून काँग्रेस मताच्या प्रचाराची ओजस्वी भाषणे देत असत.

त्यानंतर बुलडाणा जिल्हा काँग्रेसच्या वतीने खामगाव येथील टिळक राष्ट्रीय विद्यालयात दिनांक १५ मे ते ३१ मे ४२ पर्यंत हिंदसेवा दलाचे शिबीर झाले. या शिबिराचे उद्‌घाटक खामगावचे प्रसिद्ध व्यापारी रायचंद भाई मेहता हे होते. समारोपाला वऱ्हाडप्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष श्री. बियाणी हे अध्यक्ष होते.

३१ मे १९४२ रोजी खामगाव येथे बुलडाणा जिल्हा काँग्रेस कमिटीची सभा झाली. या सभेचे अध्यक्ष बुलडाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. पंढरीनाथ पाटील हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रांताध्यक्ष श्री. ब्रिजलाल बियाणी हे उपस्थित होते. (४१) मातृभूमी दि. २-६-१९४२

१३ जून १९४२ रोजी अकोला येथील राजस्थान भवनात विदर्भ प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या कार्यकारिणी सभा झाली. सभाध्यक्ष विदर्भ प्रांताध्यक्ष श्री. ब्रिजलाल बियाणी हे होते. नामदार बियाणींसह कार्यकारी मंडळाचे श्री. अप्पासाहेब कुळकर्णी प्रांतमंत्री, डॉ. भाऊसाहेब पारसनीस, डॉ. गोपाळराव खेडकर (सरसेनापती हिंदसेवादल)

श्री. अ. रा. महाजन वकील, श्री. अण्णासाहेब देशमुख वकील हे सभासद आणि बुलडाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री पंढरीनाथ पाटील एम.एल.ए. हे खास निमंत्रणावरून हजर होते. या सभेत १. जागतिक परिस्थितीचे वादळ थैमान घालत असतांना आणि त्याच्या लाटा भारताच्या सीमांत प्रदेशावर आदळत असतांना ह्या देशाला कालोचित कर्तव्य पार पाडण्याच्या मार्गात ब्रिटीश सत्ता एक मोठी धोंड आहे. २. हिंदुस्थान सरकारच्या दडपशाही धोरणाचा विचार करणे गरजेचे. ३. या प्रांतात काँग्रेस ध्येय धोरणानुसार कार्य करणाऱ्या स्वयंसेवक दल संघटनेची गरज व तिची स्वायत्तता (Autonomous) राखणेसाठी सालोसाल निवडणूक न करता संस्थेचे कार्य सुनियंत्रित करण्यासाठी डॉ. गोपाळराव खेडकरांची नियुक्ती. ४. काही तालुक्यांची मुख्यालये निश्चिती. ५. खामगाव तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सत्याग्रही नसले तरी ते नियुक्त अध्यक्ष असल्यामुळे ते जिल्हा काँग्रेस कमिटीचे सदस्य राहतील. ६. यवतमाळ म्युनिसिपल कमिटीचे अध्यक्ष यांच्यावरील शिस्तभंगाबाबत ठराव असे एकूण सहा ठराव पारित झाले. [(४२)] (मातृभूमि अकोला ता. १६-७-१९४२)

## बुलडाणा जिल्हा हिंदसेवादलाची स्थापना कशासाठी ?

बुलडाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आमदार पंढरीनाथ पाटील यांनी एप्रिल १९४२ मध्ये काँग्रेस प्रचार व खादीचे महत्त्व पटवून देणारा कार्यक्रम लोकांना समजून सांगत संपूर्ण जिल्हाभर दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी काँग्रेसची ध्येयधोरणे ही शेतकरी, शेतमजूर व गरिबांच्या कल्याणाची असून खादीचा वापर व उत्पादन वाढविण्यास चालना देणारी भाषणे केली. तसेच हिंद सेवा दलाची आवश्यकता काय आहे हेही पटवून दिले. खामगाव येथे दिनांक २५ ते ३१ मे १९४२ या काळात काँग्रेस प्रेमी जनतेला जागतिक घडामोडी कळाव्या व खेड्यातील, शहरातील नागरिकांचे स्वास्थ्य कायम राहून लोकात अधिक धैर्य व शक्ती उत्पन्न व्हावी यासाठी हिंदसेवादलाची स्थापना झाली आहे. [(४०)] हिंदसेवादलाबद्दल पंढरीनाथांचे पत्र त्यानंतर लगेच १७ सप्टेंबर १९४२ ते २ ऑक्टोबर १९४२ याकाळात पंढरीनाथ पाटलांनी बुलडाणा जेलमधे कारावास भोगला. [(४३)]

(बुलडाणा जेल प्रमाणपत्र दि. १७-९-१९४२ ते २-१०-१९४२)

## कस्तूरबा गांधी स्मारक योजना समिती

महात्मा गांधींच्या पत्नी कस्तुरबा गांधी यांच्या निधनानंतर त्यांच्या स्मारकाबद्दल चर्चा सुरू झाली. त्याबाबत बुलडाणा जिल्ह्यातही पंढरीनाथांनी प्रमुख पुढाऱ्यांशी चर्चा

करून खामगावचे अण्णासाहेब नांदे यांनी जिल्हा समिती स्थापन करण्यासाठी देणगीदारांची व कार्यकर्त्यांची एक सभा बोलावली. पण ती काही कारणास्तव स्थगित झाली. ही स्थगित सभा पुढे पंढरीनाथ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली २५ मे १९४५ रोजी खामगावच्या सिव्हील कोर्टासमोरील शामसुंदर छापखान्यात झाली. त्या सभेत खालीलप्रमाणे नियामक समिती असावी असा ठराव पास झाला. अध्यक्ष सौ. इंदिराबाई एकबोटे, खामगाव. मंत्री सौ. सीताबाई झुनझुनवाला खामगाव, सौ. शांताबाई मेवाडे देऊळगावराजा (ता. चिखली), श्री. कृष्णराव देशमुख एम.एल.ए. गारडगाव (तालुका खामगाव), श्री. नामदेवराव टापरे निलज (ता. जळगाव), श्री. शंकरलालजी मुंधडा मेंढळी (ता. मलकापूर), श्री. नारायणराव मारोती पाटील ता. मलकापूर. प्रांतिक समितीवर प्रतिनिधी आनंदराव देशमुख देऊळगाव साकरशा, (ता. मेहकर) व प्रांतिक समितीवर प्रतिनिधी श्री. एल. एस. भटकर एम.एल.ए. चिखली. (४७) ( मातृभूमि, अकोला २९ मे ४५)

हा स्वातंत्र्याच्या चळवळीचा कळस गाठलेला काळ होता. लोक मंतरल्यागत चळवळीत सहभागी होत असत. स्वदेशीचे महत्वही त्यांना कळू लागले होते. १९४२ साली महात्मा गांधींनी दिलेला 'चलेजाव' चा नारा लोकांना स्फूर्ती देणारा होता. त्याचे महत्व अनन्यसाधारण होते. पंढरीनाथांनी ९ ऑगष्ट १९४६ रोजी चिखली शहरात प्रभातफेरी काढून या दिवसाची स्मृती जागवली. स्वदेशीचे महत्व पटवण्यासाठी याच दिवशी सूत कताईचा सामुदायिक कार्यक्रम घेतला. तसेच त्यांच्या अध्यक्षतेखाली जाहीरसभा झाली. त्या सभेत त्यांनी स्वातंत्र्यचळवळीबद्दल प्रेरक असे भाषण केले. शहीददिन व शिक्षकदिन स्वातंत्र्यपूर्व काळातही साजरे होत असत. १६ ऑगष्ट १९४६ व १८ ऑगष्ट १९४६ हे अनुक्रमे शहीददिन व शिक्षकदिन म्हणून पंढरीनाथ पाटलांच्या अध्यक्षतेखाली चिखली येथे संपन्न झाले. १६ ऑगष्ट १९४६ रोजी शहीददिनानिमित्त पंढरीनाथांनी गावातून प्रभातफेरी काढून जाहीर सभा घेतली. पंढरीनाथांनी २१ आक्टोबर १९४६ रोजी डोणगाव येथे हिंददिनही साजरा केला. त्याठिकाणी झालेल्या सभेत राष्ट्रभक्तीने ओतप्रोत भरलेले असे भाषण त्यांनी केले. बंगालमधील नौखाली येथे झालेल्या दंगलीत अनेक लोक बळी पडले. देशाचे फार मोठे आर्थिक नुकसान झाले. तेथील आपदग्रस्तांना मदत करण्यासाठी २७ ऑक्टोबर १९४६ रोजी पंढरीनाथांनी जाहीरसभा घेतली. त्यासभेत नौखाली आपदग्रस्तांना मदत करण्याचे कळकळीचे आवाहन केले. लोकांनी उत्तम प्रतिसाद दिला. जमा झालेला निधी संबंधितांना पाठविण्यात आला. या सभेत बंगाल सरकारचा निषेध करण्यात आला.

दिनांक ३ मार्च १९४७ रोजी सायंकाळी नागपूरच्या चिटणीस पार्कवर मेजर आवारी यांच्या अध्यक्षतेखाली क्रांतिसिंह नाना पाटील यांची सभा झाली. धो-धो पाऊस पडत असतांनाही या सभेला अलोट जनसागर लोटला होता. या सभेत तात्यासाहेब जेधे व क्रांतिसिंह नाना पाटील यांची राष्ट्रभक्तीपर स्फूर्तीदायक भाषणे झाली. यावेळी डॉ. पंजाबराव देशमुख, पंढरीनाथ पाटील, पूनमचंद राका इत्यादी मान्यवर उपस्थित होते. त्यावेळी असेंब्ली अधिवेशन सुरू होते. दिनांक ४ मार्च १९४७ रोजी सायंकाळी तत्कालीन शिक्षणमंत्री नामदार संभाजी विनायक गोखल यांनी राष्ट्रभाव दृढ व्हावा म्हणून असेंब्लीत वऱ्हाडातील सर्वच जातीधर्माच्या असेंब्ली मेंबरांना आपल्या बंगल्यावर चहाफराळासाठी बोलावले होते. त्यावेळी पंढरीनाथ पाटलांनी सर्वांच्या वतीने आभाराचे भाषण केले. तेव्हा त्यांनी वऱ्हाडातील हिंदूमुस्लीम मेंबरात ऐक्य भाव दृढ असल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले. हिंदुस्थान स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर पोचला असताना हिंदूमुसलमानात ऐक्य जोपासण्याचे प्रयत्न काँग्रेस पक्ष करीत होता. त्याचे प्रदर्शनच पंढरीनाथांनी यावेळी केले असे दिसत होते.

१५ ऑगष्ट १९४७ शुक्रवारी भारताला स्वातंत्र्य मिळाले. हिंदुस्थान स्वतंत्र झाला. देशभर राष्ट्रीय उत्सव साजरा झाला. चिखली येथे पंढरीनाथांच्या अध्यक्षतेखाली हा स्वातंत्र्यसोहळा पाच हजार लोकांच्या जाहीर सभेत प्रचंड उत्साहात व जल्लोषात साजरा झाला. स्वातंत्र्याच्या पूर्वरात्रीच लोकांनी दीपोत्सव साजरा केला. तोरणे, पताका, राष्ट्रीय झेंडे, मिरवणुका, हवाई काम इत्यादींनी मोठ्या उत्साहाने साजरा झाला. रात्री दोन वाजेपर्यंत जल्लोष सुरू होता. जाहीर सभेत लोकांनी राष्ट्रनिष्ठेची शपथ घेतली.

याच दिवशी सकाळी चिखली येथे श्री शिवाजी हायस्कूलमध्ये पंढरीनाथ पाटलांच्या हस्ते पहिले राष्ट्रीय ध्वजारोहण म्हणून हा दिवस साजरा करण्यात आला. त्याच दिवशी सायंकाळी सावरगाव डुकरे येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त ‘धार्मिक गुलामगिरीचा नाश का करावा ?’ या विषयावर पंढरीनाथांचे तर्कसंगत प्रदीर्घ भाषण झाले. कारण राजकीय स्वातंत्र्य मिळाले. परंतु पुरोहित शाहीची धार्मिक हुकुमशाही सुरूच होती. धार्मिक गुलामगिरी नष्ट झाल्याशिवाय खरे स्वातंत्र्य मिळाले असे म्हणता येणार नाही. हे पंढरीनाथांना स्वानुभवातून चांगलेच माहित होते. स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांनी धार्मिक गुलामगिरी व पुरोहितशाहीविरूद्ध सत्यशोधक जलसे व जाहीरसभांमधून लोकजागृती आणि समाजप्रबोधनाचे काम फार मोठ्या प्रमाणात केलेले आहे. त्याची आजही गरज आहे.

*

# भाग - १०

## पंढरीनाथांची जीवनयात्रा संपली

पंढरीनाथ पाटील श्रमिक शेतकरी कुटुंबात जन्मले. जन्मत:च ते अत्यंत किडकिडीत होते. बालकांना होणारे बहुतेक रोग त्यांच्यावर प्रसन्न होते. त्यामुळे ते रोगाने सतत आजारी असत. तरूणाईकडे वाटचाल करताना घराच्या आर्थिक विवंचना, सामाजिक जाणिवा त्यांना सतत संघर्षाची प्रेरणा देत. बाल्यावस्थेपासूनच त्यांच्या जीवनात सामाजिक जाणिवेतून, आर्थिक टंचाईतून, शैक्षणिक अभावातून, अंधश्रद्धा, कुरूढी व परंपरा यांच्या सुरेख वेणीतून होणाऱ्या अन्यायाला तोंड देण्याची व आलेल्या प्रसंगातून मार्ग काढून मात करण्याची जिद्दही परिस्थितीनुरूप त्यांच्यात निर्माण होत गेली. हे जरी कौतुकास्पद असले तरी शारीरिक आरोग्याच्या बाबतीत त्यांची स्थिती निराशाजनक होती. त्यांना दम्याचा आजार होता. अपचन, आम्लपित्त, बद्धकोष्ठता यामुळे ते बेचैन असत. ॲलोपॅथी ऐवजी ते आयुर्वेदिक, युनानी व होमोपॅथीची औषधे पसंत करीत असत. औषधी सेवन नाईलाज म्हणूनच ते करीत. पथ्य पाळूनच ते या व्याधिंना सुरक्षित अंतरावर ठेवण्याचा सतत प्रयत्न करीत.

व्याधींना वचक म्हणून ते जेवणही अत्यंत साधे व सीमित घेत असत. दूध भाकर, मेथीची, शेपूची व पालकाची भाजी, थोडे वरण व भात, फुलके व क्वचित पोळी व तूप ते खात असत. तळीव पदार्थांना सहसा ते हात लावीत नसत. प्रवासात दुधात तयार केलेल्या घरच्या दशम्या, दाळ्या, रेवड्या, फुटाणे, मुरमुरे, शेंगदाणे व गुळ या गरिबांच्या मेव्याला ते प्राधान्य देत. पथ्य, औषधी, जेवण, व्यायाम, फिरणे व योग साधना इ. बाबत नियमित असत. फिरण्याला ते प्राधान्य देत. दम्याच्या व्याधीसाठी दर कोजागिरी पौर्णिमेला ते चित्रकूटची जडीबुटी सेवन करीत असत. त्यासाठी रात्री बारा वाजेपर्यंत निवासाच्या गच्चीवर स्टोव्हवर दूध अटवून त्यात ती जडीबुटी मिसळून मध्यात्री आलेल्या चंद्राचे प्रतिबिंब त्यात पाहून मग ते सिद्ध केलेले दूध ते घेत असत.

### भाजी भाकरी खाणारा व चुनाघाणी चालविणारा खासदार

पंढरीनाथ पाटलांनी लहानपणापासूनच श्रमाची कामे केलेली होती. त्यामुळे

श्रमप्रतिष्ठा त्यांना माहीत होती. ते खासदार होते तरीही त्यांनी श्रमिक जीवनाचा त्याग केला नाही. दिल्लीहून जेव्हा ते चिखलीस येत तेव्हा त्यांच्यासाठी बसस्थानकावर बैलगाडी पाठविली जाई. गडीमाणसांना बसस्थानकावर पोचण्यास उशीर झाला तर ते सरळ पायी चालत घराकडे येत. त्यांची ट्रंक घेण्यासाठी ते भारवाहकाला संधी देत नसत. त्याला दुसरेही एक कारण होते. हमालाला पैसे द्यावे लागत. श्रमातून पैशाचे मोल त्यांना कळलेले होते. ते काटकसरी होते. म्हणूनच ते आपले हलके फुलके सामान स्वत:च घेऊन येत.

ते चिखलीस असले म्हणजे सकाळीच चुना मळण्याची घाणी सुरू करीत. चिखली येथील संस्थेच्या इमारतींचे बांधकाम सतत सुरू होते. आठ ते दहा फूट त्रिज्येची, एक फूट रूंद व दीड फूट खोलीची फाड्यांची वर्तुळाकार नाली, म्हणजे घाणी. तीत दीड दोन क्विंटल वजनाचे दगडी चाक. त्यात ८-१० फूट लांबीचा दांडा. मध्यभागी छिद्रात बसवून वर्तुळाकार घाणीच्या मध्यभागी असलेल्या खुंटाची आरी चाक दांड्याच्या दुसऱ्या टोकाला बसवलेल्या लोखंडी / लाकडी मानीत बसविलेली असे. घाणीच्या चाकातून दांड्याचे एक टोक दोन तीन फूट बाहेर आलेले असे. त्या टोकाला एक छिद्राचा लाकडी ठोकळा बॉलबेअरींग सारखा बसविलेला असे व त्याला एक भोरकडी ठोकलेली असे. भोरकडीला लांब दोर अडकवून तो लाकडी जाडी (जोखड) ला वेठलेला असे. जाडी बैलाचे मानेवर अडकविली, शिवळा घातल्या की पंढरीनाथ पाटील एक आसूड, पैजामा, बंडी-कोपरी व डोक्यावर उपरण्याची टापर बांधून चष्मा लावत. पायात, चप्पल, हातात छटका-कोरडा-पुराण किंवा एखादी ओली फोकी जे तेथे उपलब्ध असे ते घेऊन स्वत: बैलामागे फिरून घाणी चालवित.

सकाळी ८-१० चे दरम्यान भेटणारे लोक येत. घाणी घरासमोरच होती. त्यामुळे येणारा अधिकारी नवीन असेल तर तो येताक्षणी दिसणाऱ्या घाणीच्या माणसालाच (पाटलांनाच) 'पाटील साहेब आहेत का घरी ?'. घाणी न थांबता व न बोलता चालू राही. नवखा साहेब त्या घाणीवाल्यावर चडफडे तेव्हढ्यात वसतीगृहातील एखादा मुलगा येई. त्यांना हे दृश्य नेहमीचेच होते. तो नवख्या साहेबांना इशारा करून सांगे की हेच पाटील साहेब आहेत. नवख्या साहेबांचा विश्वास कसा बसणार ? शेवटी कोणी कामावरचा माणूस वा शिक्षक येत व त्या नवागताला घराबाहेर ओट्यावर बसण्यास सांगत किंवा पाटील साहेब स्वत:च कधी, 'त्यांना बैठकीत बसायला सांग'. म्हणून जैनू मियाँ विद्यार्थी किंवा शिक्षक जे असतील त्यांना सांगत. घाणी हाकताना ते

नवागताशी सहसा बोलत नसत. जैनूमियाँ साहेबांचा खास विश्वासू, प्रामाणिक व निष्ठावान माणूस होता. एखादा ओळख झालेला अधिकारी पुन्हा आला तर मात्र तोही पाटील साहेबांशी बोलत बैलांच्या मागे फिरत असे. हे दृष्य मोठे मजेशीर असे.

श्रमिक शेतकऱ्यापासून ते समाजभूषण, आमदार व संसद सदस्य आणि दलितमित्र (१५ ऑगस्ट १९७१) पुरस्काराने सन्मानित झाले तरी पण त्यांच्यात अहंभाव निर्माण होऊ शकला नाही. आपला मोठेपणा विसरून ते आप्त, स्वकीय व नातलगांच्या अडीअडचणी, आजार व संकटाच्या वेळी धावून जात असत. ते नागपूर, मध्यप्रदेश असेंब्लीचे सदस्य-आमदार असताना त्यांची एक आतेबहीण हाताला मोठे गळू झाल्यामुळे बुलडाणा येथील सरकारी दवाखान्यात होती. जाऊन तिला भेटत. पण ते- आमदार- तेथे आल्याबाबत सिव्हील सर्जनना कळू न देण्याची दक्षता घेत. तसे ताईला भरती केले तेव्हा सिव्हील सर्जनना पेशंटची काळजी घेण्याचे सांगण्यास ते विसरले नाही. पण वारंवार भेटीमुळे दवाखान्याच्या अधिकारी व सेवकांना त्रास होऊ नये याचीही काळजी घेत असत हे यावरून स्पष्ट झाले.

सौ. सरस्वती पाटलांना शेवटच्या आजारात बुलडाण्याच्या सरकारी दवाखान्यात ठेवले होते. दवाखान्यातही बाईंनी कडक सोवळे पाळले. त्यावेळी जिल्हा माहिती कार्यालयात नुकतेच नोकरीस लागलेले, आताचे बुलडाणा जिल्हा माहिती अधिकारी श्री. सुरेश कोरके यांनी पाटलांच्या चिखली येथील निवासस्थानासमोरील विहिरीचेच पाणी त्यांना दवाखान्यात असेपर्यंत आणून देण्याची सेवा केली आहे. शेवटी सरस्वती बाईंचा अंत झाला. त्यांच्या स्मरणार्थ पाटील साहेबांनी जिल्हा रूग्णालयास पन्नास हजाराची देणगी देऊन स्वागत कक्षाला कै. सरस्वतीबाई पाटील यांचे नाव देण्यात आले. त्यांचे भव्य तैलचित्रही त्या हॉलमध्ये लावण्यात आले.

१९७८ पर्यंत भारतीय संसदेच्या वरिष्ठ सभागृहाचे सदस्य होते. सौ. सरस्वती बाईंच्या निधनापासून ते मनाने व शरीरानेही बरेच खचले होते. शरीरही वयोमानानुसार खंगत होते. त्यांना शेवटी बुलडाणा येथील दवाखान्यात अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले. सर्व सोयी-सुविधा उपलब्ध होत्या परंतु निसर्ग नियमानुसार ता. २ आक्टोबर १९७८ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक चळवळीतील पर्व संपले. शेतकऱ्यांचा शेतमजूर व दलित पीडितांचा कैवारी गेला. पंढरीनाथ पाटलांची जीवन यात्रा संपली.

*

# भाग - ११

## परिशिष्ट - १
# आठवणी

( २६ वर्षे कै. पंढरीनाथ पाटलांच्या सहवासात राहिलेले पिंपळगाव राजा ता. खामगाव जि. बुलडाणा येथील श्री. जे. एन. बोंबटकर यांनी कै. पंढरीनाथ पाटलांच्या पाठविलेल्या आठवणी)

### काटकसरी व हिशेबी स्वभाव

एकदा पंढरीनाथ पाटलांनी मला बाजारहाट करण्यासाठी पाचसहा रूपये दिले. सामानाची यादी दिली. यादीप्रमाणे सर्व वस्तू खरेदी केल्या. वस्तू निवडक व चांगल्या दर्जाच्या होत्या. चांगल्या दर्जाच्या असल्यामुळे खरेदी करताना दोन आण्याची तूट आली (कमी पडले) तेव्हा मी माझ्या पदरचे दोन आणे जास्त खर्च केले व तसे त्यांना सांगितले. तेव्हा मधुकर पाटील यांना त्यांनी घरातून दोन आणे आणून मला देण्यास सांगितले व मला म्हणाले, ''गुरूजी इत:पर असे करीत जाऊ नका. बाजारातून दोन - चार आणे उलट वापस आणले पाहिजेत.'' संस्थेचे बांधकाम साहित्य खरेदी करताना अनेक ठिकाणी चौकशी करून नंतरच चांगला पण स्वस्त माल ते खरेदी करीत असत.

### संयमी स्वभाव

प्रसंगी राग आला असतानासुद्धा ते वरवर हसून देत असत. सहसा राग आलेला दाखवीत नसत.

एकदा असे झाले की, शाळेतील एका शिक्षकाला उन्हाळ्याच्या सुटीत दोन महिने कामावरून कमी केले. अस्थायी शिक्षकांना दोन महिन्यांसाठी कमी करण्याचा नियम होता. त्याचा पगार मिळत नसे. कोलते नावाच्या एका शिक्षकाला पाटील साहेबांनी कमी केले होते. त्यावरून तो पाटील साहेबांशी भांडू लागला. मी पाटील साहेबाजवळ पत्रलेखन करण्यासाठी बसलो होतो. तो शिक्षक अपशब्द बोलू लागला. शिव्याशाप देऊ लागला. पण पाटील साहेब मात्र गप्प ! शांतपणे ऐकत राहिले. ते खासदार म्हणजे राज्यसभेचे सदस्य होते. मनात आणले असते तर त्या शिक्षकाविरूद्ध ते पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करू शकले असते. पण त्यांनी तसे केले नाही. तो शिक्षक निघून

गेल्यावर किंचित हसून ते मला म्हणाले, 'अरे ! त्याची नोकरी गेली. आपण त्याच्या पुढील जेवणाचे ताट ओढून घेतले. मग तो रागावणार नाही तर काय करील ? फुले वाहून, उदबत्ती लावून तो काय आपली पूजा करील ?'' मी पाहतच राहिलो.

## समतावादी दृष्टी व तशीच कृती

शिक्षण संस्थेमधे नोकऱ्या देताना, कर्मचारी नेमताना ते जात किंवा धर्म पाहून नेमणूका करीत नसत. एकदा आपल्या जावयासाठी नोकरी मागणाऱ्या एका गृहस्थाची त्यांनी चांगलीच सरडपट्टी काढली. तो प्रसंग असा -

एकदा लेखन कामासाठी मी त्यांच्याकडे बैठकीत बसलो असताना शिंदखेड विभगातून एक मराठा मनुष्य जावयाला घेऊन आला व पाटील साहेबांना म्हणाला, "हे माझे जावई बी. ए. झालेले आहेत. त्यांना तुम्ही आपल्या संस्थेत नोकरी द्या.'' तेव्हा पाटील साहेब म्हणाले, " हे प्रशिक्षित नाहीत. यांना नोकरी कशी मिळेल ? आणि हे पहा नोकऱ्या थोड्या, मागणारे जास्त; मी प्रत्येकालाच नोकरी कशी देणार !'' तेव्हा तो गृहस्थ म्हणाला, " ही मराठ्यांची संस्था आहे आणि इथे एका मराठ्याला नोकरी मिळत नाही हे कसे ?'' तेव्हा पाटील साहेब म्हणाले, " काहो ! मळ्यातील ज्वारी आणि माळावर पिकलेली ज्वारी यांना बाजारात सारखाच भाव मिळेल की कमी जास्त मिळेल ? आणि अशा जातीपातीच्या गोष्टी इथे चालत नाहीत.'' तो गृहस्थ तरातरा तेथून निघून गेला.

## सुधारणावादी नीती तशी प्रत्यक्ष कृती

पाटील साहेबांच्या धर्मपत्नी सरस्वरतीबाई पाटील यांच्या अंत्यसंस्कारा वेळचा प्रसंग -

कै. सरस्वतीबाई पाटील यांना संस्थेच्या परिसरातील शाळेच्या शेतात अग्नी देण्याचे ठरले. सरणासाठी सरपण तेथे नेण्यात आले. गरजेपेक्षा जास्त सरपणाची लाकडे आणून टाकलेली होती. तेव्हा पाटील साहेब म्हणाले, " ही जास्तीची लाकडे परत घेऊन जा.'' तेव्हा लोक म्हणाले, "सरणासाठी स्मशानात आणलेली लाकडे कुणी परत नेत नसतात.'' तेव्हा पाटील साहेब म्हणाले, " मग ही सरपण टाकून आणलेली गाडी पण लाकडाचीच आहे ना ? मग द्या तरी या सरणावर टाकून. खुळचट कल्पना लोक धरून बसतात.

## ब्राह्मण अधिकारी आणि पाटील साहेब

ब्राह्मण अधिकारी पाटील साहेबांनी सांगितलेली कामे त्वरित व मोठ्या तत्परतेने करून देत असत. पण काही अपवाद असतातच-

एकदा बुलडाणा जिल्हा सोल्जर फंडातून ५०१/- रू. देणगी पाटील साहेबांनी संस्थेसाठी सैनिक बोर्डाकडून मंजूर करून घेतली. पण जिल्हाधिकारी जोशी साहेबांनी आडकाठी घातली. 'तशी देणगी देता येत नाही' असे म्हणाले. पाटील साहेबांचे सरकार दरबारी वर हात पोचतात याची त्यांना कल्पना नसावी. कुठे किल्ली फिरली कुणास ठाऊक पण दुसऱ्याच दिवशी कलेक्टर साहेबांची बदली गडचिरोलीला झाल्याची तार आली.

काही ब्राह्मण अधिकारी पाटील साहेबांना खूप मानत असत. त्यांची योग्यता ते आळून असत. श्री. जे. इ. पटवर्धन नावाचे एक कलेक्टर पाटील साहेबांना त्यांचा प्रत्येक कामात मदत करीत असत. पाटील साहेबांनी त्यांना संस्थेत आणून त्यांचा सत्कारपण केला होता. ह्या प्रसंगी पटवर्धन साहेबांनी नवीन सुरू झालेल्या संगीत वर्गासाठी लागणारे सर्व साहित्य - तबला, पेटी, विणा, झांज इ. विकत घेऊन संस्थेला देणगी म्हणून दिले.

## कोणा शेटजी-भटजीबद्दल टीका टिपणी नाही

मला जवळजवळ २६ वर्षे त्यांचा सहवास लाभला. त्या कालावधीत पाटील साहेबांनी कधीही कोणत्याही शेटजी-भटजीवर आपल्या भाषणात वा लिखाणात टीका केली नाही किंवा अपशब्द वापरले नाहीत. संस्थेत कर्मचारी नेमतांना कधी जातिभेद केला नाही. संस्थेत बहुजन समाजाबरोबर अनेक ब्राह्मण, मुसलमान, बौद्ध, ख्रिश्चन वगैरे सर्व जाती धर्माचे लोक होते, आजही आहेत. "बहुजन हिताय, बहुजन सुखाय ! हा त्यांच्या कार्याचा मूलमंत्र होता. पददलिताबद्दल त्यांना कळवळा होता. म्हणूनच त्यांना 'दलित मित्र' ही पदवी शासनाने दिली होती. आणि समाज सेवेतच त्यांनी त्यांचे उभे आयुष्य वेचले म्हणूनच त्यांना लोकांनी 'समाजभूषण' ही सार्थ पदवी दिली होती.

## यशवंतराव चव्हाणांनी गौरविले

महाराष्ट्राचे थोर नेते कै. यशवंतराव चव्हाण पंढरीनाथ पाटील साहेबांना फार मानत असत. पाटील साहेबांच्या षष्ट्यब्दीपूर्ती समारंभासाठी यशवंतरावजी चव्हाण

चिखलीला आले होते. त्यावेळी आपल्या भाषणात त्यांनी पाटील साहेबांचा गौरव केला. ते म्हणाले की, म. जोतिबा फुले यांच्या जीवन कार्याची ओळख प्रथम पंढरीनाथ पाटील यांनी फुले चरित्र लिहून महाराष्ट्राला करून दिली. त्यांनी लिहलेले फुले चरित्र वाचून मला सत्यशोधक चळवळीची व म. फुले यांच्या कार्याची ओळख झाली व माझ्या कार्याची दिशाच बदलून गेली. उभ्या महाराष्ट्राने त्यांचे हे ऋण मान्य केले पाहिजे.

### महात्मा फुलेंचे तिसरे चरित्र

म. जोतिबा फुले यांचे मोठे सविस्तर चरित्र त्यांना लिहायचे होते. ते म्हणत की, म. फुलेंच्या चरित्राची व कार्याची माहिती मलाच माहित आहे. त्यांचे चरित्र लिहून पूर्ण करायचे आहे. त्याप्रमाणे त्यांनी ते काम हाती घेतले. माहितीची जुळवा जुळव केली व लेखन कार्य हाती घेतले. आता त्यांचे वय झाले होते. उजवा हात लिहिताना कंप पावत असे. म्हणून लेखनविसाकडून ते चरित्र लेखन करून घेत असत. त्या चरित्राची आठदहा प्रकरणे त्यांनी लिहून घेतली. चरित्र पूर्ण करण्याचा त्यांना ध्यास लागला पण उतारवय व प्रकृती नीट साथ देत नसल्यामुळे ते लेखन पूर्ण करू शकले नाहीत. त्यांचा दमा मधून मधून उसळत असे. शेवटी मृत्युने त्यांना गाठले. व चरित्र लेखन अपूर्णच राहिले. त्यांच्या मृत्युनंतर चरित्राचे ते हस्तलिखित म. फुले समता प्रतिष्ठान, पुणे या संस्थेचे संस्थापक व संचालक श्री. बाबा आढाव यांचेकडे सुपूर्त करण्यात आले होते. (माझ्या माहितीप्रमाणे) सुरक्षिततेसाठी ते तिथे पाठविल्याचे माझ्या आठवणीत आहे.

### ज्ञानाची गंगा घरोघर पोचविली

सोळाव्या शतकात रामेश्वर भटाने विद्यापीठ इंद्रायणी नदीच्या डोहात बुडविले ते कर्मवीर भाऊराव, राजर्षी शाहू महाराज, म. जोतिबा फुले व डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख या सर्वांनी मोठ्या परिश्रमाने व अथक प्रयत्न करून बाहेर काढले व ज्ञानाची गंगा गरिबांच्या झोपडीपर्यंत पोहचवली. समाज भूषण पंढरीनाथजी पाटील यांनी सुद्धा या कामी मोलाची मदत केली. हीच त्यांच्या सफल जीवनाची पावती आहे.

**जे. एन. बोंबटकर,**
रा. पिंपळगावराजा, ता. खामगाव जि. बुलडाणा

## असे होते थोर समाज सुधाकर पंढरीनाथ पाटील

(बुलडाणा जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. एकनाथराव सोमाजी वानखडे रा. डोंगरशेवली यांनी सांगितलेली आठवण)

पाटील साहेब हे त्यांनी काढलेल्या लहान व गोर गरीब मुलांच्या वसतिगृहासाठी (त्याकाळी बोर्डिंग म्हणण्याची प्रथा होती) खेडोपाडी हिंडून सुगीचे दिवसात धान्य गोळा करायचे. मी एकदा असाच डोंगरशेवली वरून धोडप या गावाकडे पायी चाललो होतो. मागून पाटील साहेबांची बैलगाडी आली. ते धान्य गोळा करून चिखलीला बैलगाडीने चालले होते. माझेकडे त्यांचे लक्ष गेले. तो काळ सन १९५२-५३ चा असावा. मी त्यावेळी ८ वी ९ वीत असेल. मला त्यांनी जवळ बोलाविले. माझी विचारपूस केली. मी सांगितले मी डोंगरशेवली येथील महारवाड्यात राहतो व धोडपला चाललो होतो. मी मुद्दाम 'मी महार आहे' हे त्यांच्या लक्षात यावे म्हणून सांगितले. परंतु ते म्हणाले, " महार असला म्हणून काय झाले. तू पायी चालला. आम्ही तिकडेच चाललो व बैलगाडीत जागा देखील आहे." सोबतची माणसं माझ्यामुळं कां कूं करीत होती, हे पाटील साहेबांच्या लक्षात आले. त्यांनी मलाजवळ बोलावून घेतले व गाडीत बसविले. मी पुढे घोडप येथे उतरलो व ते पुढे शेलसूर मार्गे चिखलीकडे गेले. असे होते हे पंढरीनाथ पाटील थोर समाज सुधारक व खरे सत्यशोधक आणि जातिभेद न मानणारे ! त्यांचे विचारांचा पगडा माझे मनावर आजही कायम आहे. त्यांचे स्मृतीस त्रिवार अभिवादन !

**- इ. एस. वानखडे**

पंढरीनाथ पाटलांच्या धाडस व प्रचारकार्यातील जलशांचे महत्त्व जोखताना अमरावतीचे माजी खासदार ॲड. जे. एस. अकर्ते लिहतात-

"...पंढरीनाथ पाटील महात्मा फुल्यांचे श्रेष्ठतम असे निष्ठावान शिष्य होते. त्यांनी सार्वजनिक जीवनात प्रवेश केला त्यावेळी वऱ्हाडची आणि महाराष्ट्राची सामाजिक आणि राजकीय परिस्थिती विलक्षण होती. सर्वक्षेत्रात ब्राह्मण समाज डिक्टेटर होता. वीर वामनराव जोशी, गोखले, गोटे, बापूजी अणे, कानडे शास्त्री वगैरे राजकीय क्षेत्रात पूर्ण ब्राह्मणच भरले होते. म. फुलेंचे नाव घेण्याची कोणाचीही छाती नव्हती.

असहकारितावादी, मवाळ आणि राजनिष्ठ या सर्व प्रकारच्या क्षेत्रात पूर्ण ब्राह्मणच होते, त्यांचे आपसात कितीही मतभेद असले तरी म. फुले व ब्राह्मणतेर चळवळ याचा द्वेष करण्यात त्या सर्वांचे एकमत होते. वकिली, डॉक्टरी आणि प्रतिष्ठित व मोक्याच्या व्यवसायात शोधूनही ब्राह्मणांशिवाय दुसरे कोणी सापडत नव्हते.... मावळ्यांच्या बाबतीत छत्रपती शिवाजी महाराजांनी केले तेच पंढरीनाथांनी ब्राह्मणेतरांच्या बाबतीत केले. महाराजांपासून मराठ्यांपर्यंत जातिभेद पायाखाली तुडवून अभूतपूर्व जागृती उत्पन्न केली व शूर सैनिकांचे सैन्य उभे केले. प्रसिद्धीची एकूण एक साधने ब्राह्मणेतर चळवळ मारण्याकरिता क्रूरपणे उपयोग केला. पंढरीनाथांनी जलसे उभे करून जिकडे तिकडे कल्लोळ उडवून दिला. जलसे इतके प्रभावी ठरले की सारी वर्तमानपत्रे निष्प्रभ व मृतवत झालीत'' (१३८)

(डॉ. पंजाबराव देशमुख व पंढरीनाथ पाटील स्मारक समिती, स्मरणिका ता. १६-५-१९८७ पृष्ठ क्र. ३० व ३१)

**ॲड. जे. एस. अकर्ते**
माजी खासदार, अमरावती

## आठवण

श्री शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय चिखलीचे मुख्याध्यापक व डी. एड्. कॉलेजचे माजी प्राचार्य श्री. गुलाबराव खेडेकर यांनी सांगितलेली आठवण

मी एक विज्ञान शिक्षक म्हणून जनता विद्यालय अंजनी खुर्द ता. लोणार जि. बुलडाणा येथे कार्यरत होतो. १९७० च्या जून महिन्यात आमचे ज्येष्ठ बंधू श्री. श्रीराम कोंडूजी खेडेकर साहेब, प्राचार्य, श्री शिवाजी अध्यापक विद्यालय, चिखली यांनी मला चिखलीला बोलावून घेऊन खासदार पंढरीनाथ पाटलांची भेट करून दिली. पहिल्याच भेटीत मला पाटील साहेबांची बहुजन समाजाप्रतीची तळमळ जाणवली. 'तू चिखलीस आल्यास तुझे दरवर्षी २०० विद्यार्थी शिक्षक २०० खेड्यात जाऊन ज्ञानदानाचे काम करतील.' असे ते म्हणाले. त्यावेळी डी.एड्. चे चार वर्ग होते. त्यांनी मला ३ महिन्यांचे जादा वेतन देऊन चिखलीला डी.एड्. मधे गणित शिक्षकाचे काम करण्याची संधी दिली. ती माझ्यासाठी खरोखरच वरदान ठरली.

पुढे त्यांच्याशी घनिष्ठ संबंध आला. त्यामुळे एकदा मला त्यांच्यासोबत त्यांनी दिल्लीला नेले. तेथे एक दिवशी त्यांना न विचारताच मी खासदार श्री. जांबुवंतराव धोटे यांना भेटण्यासाठी त्यांच्या खोलीवर गेलो. नार्थ अव्हेनु ते सफदरजंग रोड हे अंतर फार होते. खासदार धोटेंकडे पोचताच त्यांनी पाटील साहेबांना मी तेथे आल्याबद्दल फोन करून सांगितले. पाटील साहेबांनी लगेच माझ्याशी फोन संपर्क साधून म्हणाले, ''मला सांगितले असते तर मी तुला गाडी दिली असती. इतक्या लांब तू एकटा कसा गेला ?'' असे म्हणून लगेच धोटे साहेबांना सांगितले, ''त्याला तुम्ही स्वत: येथे आणून घाला.'' परत आल्यावर पाटील साहेबांनी मला पुन: विचारले, ''तुला कोठे कोठे जायचे आहे त्याप्रमाणे मी तुला व्यवस्था करून देतो.'' त्यानंतर त्यांनी मला कुतूबमिनार, बिर्ला भवन, एन.सी.इ.आर.टी. परिसर पाहण्यासाठी एक माणूस देऊन सर्व व्यवस्था केली.

इकडे चिखलीस आम्हाला पाटील साहेबांची फार भीती वाटायची. त्यामुळे आम्ही त्यांच्याशी मोकळे बोलत नसू. परंतु तिकडे बाहेर गेल्यावर पाटील साहेब आमची अतिशय काळजी घेत. एवढेच नव्हे तर फिरण्यासाठी आवश्यक तेवढे पैसे देत. कोठे कसे जायचे व वागायचे याबाबत देखील अचूक सूचना व मार्गदर्शन देत.

मी त्यांच्या सोबत दिल्लीस असताना बऱ्याच वेळा राज्यसभेतसुद्धा जात असे. त्यांचे भाषण हिन्दीत असे. तरी सर्व सामान्यांना कळेल अशी वास्तव व प्रत्यक्ष जीवनातील उदाहरणे देऊन ते पटवून देत. शेतकऱ्यांविषयीची कळकळ व तळमळ त्यांच्या प्रत्येक वाक्यातून जाणवत असे. त्यांच्या प्रेरणेमुळेच मी मुख्याध्यापक म्हणून गेली चार वर्षे काम करीत आहे. एवढेच नव्हे तर त्यांच्या विचारांचा पाईक म्हणून या परिसरात मी सातत्याने नवनवीन उपक्रम राबवीत आहे.

**गुलाबराव खेडेकर**
चिखली

# परिशिष्ट - २
# आशीर्वाद

## महात्मा फुले यांचे आद्य चरित्रकार
## समाजभूषण पंढरीनाथ सीताराम पाटील यांचे चरित्र

अद्वितीय ! दैदिप्यमान !! अप्रतीम !!! श्री. ना. जा. दांडगे, प्राचार्य यशवंत अध्यापक विद्यालय, बुलडाणा (सेवानिवृत्त) यांच्या लेखनीने लिहलेलं म. फुलेंचे आद्य चरित्रकार - 'समाजभूषण पंढरीनाथ सीताराम पाटील यांचे चरित्र' हे पुस्तक मला अतिशय भावल, आवडलं. चरित्र लिहताना घ्यावयाची दक्षता घेताना श्री. दांडगे यांनी घेतलेल्या अपार परिश्रमाची जाणीव प्रत्येक पानावर होते.

भूतकाळात शिरतांना तत्कालीन संदर्भ लिहिताना कंसात आधुनिक संदर्भ लिहिल्यामुळे वाचकाला अचूक ज्ञान प्राप्त होते. काळसंगतीच्या क्रमाचं सातत्य जर राखलं गेलं असतं तर अजून चांगलं झालं असतं असे वाटते.

श्री. पंढरीनाथ पाटलांचं बालपण, त्यांत त्यांनी दिलेल्या असंख्य संकटांचा लढा, नवीन पिढीला एक नवीन दिशा देईल. त्यांच दलित प्रेम-प्राणिमात्रांची भूतदया व त्यांचा चढत जाणारा राजकीय आलेख, त्यातील स्थूल व सूक्ष्म पायऱ्या ह्याबद्दल लेखकाने अतिशय मेहनत घेतल्याचे जाणवले.

मोहिनीबुवांचा प्रसंग काळजात घर करून गेला. छोट्या पंढरीनाथला शूद्र म्हटल्यामुळे त्यांनी क्षत्रीय व ब्राह्मण यासाठी घातलेला वाद त्यांच्या अन्यायाविरूद्ध लढा देण्याच्या वृत्तीचा दाखला देतो.

अनेक समाज उपयोगी उपक्रमांना त्यांनी सुरूवात केली. १९२१ साली बुलडाण्यात वाचनालय काढले. १९२२ मध्ये मराठा आदि तत्सम समाजातील विद्यार्थ्यांसाठी बोर्डींग चिखली येथे काढले. नंतर त्याचे रूपांतर १९३३ मध्ये श्री शिवाजी मराठा एज्युकेशन सोसायटीत झाले. त्यांच्या राजकीय प्रवासाचे अनेक टप्पे लेखकाने काळाच्या संदर्भासहित वाचकापुढे सक्षमपणे जिवंत केलेत. त्यात श्री. पंजाबराव देशमुख, ब्रिजलाल बियाणी, आबासाहेब खेडकर, वामनराव जोशी, आदींसह देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत व स्वातंत्र्योत्तर काळातील देशाच्या

विकासाच्या वाटचालीतील श्री. पंढरीनाथांचे उल्लेखनीय योगदान लिहताना तत्कालीन प्रश्नांचे स्वरूप, संदर्भ व त्यांची अनुकूल व प्रतिकूल बाजू व त्यात पंढरीनाथ पाटील यांची सरळ व स्पष्ट भूमिका त्यातून श्री. पंढरीनाथ पाटील यांच्या व्यक्तिमत्वातले अनेक पैलूंच दर्शन वेगवेगळ्या पद्धतीने वाचकाला घडते.

पंढरीनाथ पाटलांचे सत्यशोधक समाजाचे कार्य मुख्यत: जलशांच्या माध्यमातून जनतेला प्रबोधन करणे हेच राही. त्या काळात बहुतांश वेळा त्यांचा मुक्काम त्यांच्या साहित्यासह (ढोलकी, तुण-तुणे व हार्मोनियम) आमच्याच घरी खामगावला असे, ही माझ्या लहानपणाची गोष्ट मला अजूनही आठवते. स्वत: मी देखील वडिलांसह या जलशांच्या सोबत बैलगाडीने लोणार, मेहकर तालुक्यात गेलो होतो, हे आताही आठवते. त्यावेळी आनंद स्वामी देखील आमच्या सोबत होते.

श्री. पंढरीनाथ पाटील शाळेसाठी देणग्या गोळा करण्यासाठी श्रीमंताचे लग्नात उपस्थित राहात. एका लग्नात त्यांना शाळेसाठी वर्गणी ७५/- रूपये मिळाली. मात्र त्याच लग्नात नाचण्यासाठी आलेल्या वेश्यावर वऱ्हाडी मंडळींनी ३००२- रूपये उधळले ही विसंगती वाचकांना सुन्न करते.

संसदेत दि. १४ जून १९६७ रोजी पंढरीनाथ पाटलांनी अंदाजपत्रकावर अभ्यासपूर्ण भाषण केले होते. महाराष्ट्रातील खामगाव-जालना रेल्वे मार्ग व्हावा (जो २००५ पर्यंत अजूनही झालेला नाही. राजकीय इच्छाशक्तीचा अभाव व जनतेची उदासीनता हीच प्रमुख कारणे आहेत.) दारव्हापासून पुढे पुसदपर्यंत रेल्वेमार्गाचे लांबीकरण व्हावे. महाराष्ट्रातील पाचोरा ते जामनेर हा नॅरोगेज मार्ग वाढवून जामनेर पासुन चिखलीपर्यंत व तेथून हिंगोलीपर्यंत वाढवावा त्यामुळे पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा जोडले जातील, असे त्यांनी नमूद केले होते. त्यावरून दृष्टी भविष्याविषयी, विकासाविषयी किती जागरूक होती हे स्पष्ट होते. कारण राष्ट्रीय महामार्ग व रेल्वेमार्ग हे राष्ट्रांच्या शरीरातील धमन्या व रक्त वाहिन्या आहेत हे त्यांनी जाणले होते.

राज्यसभेत २८ नोव्हेंबर १९६८ ला पंढरीनाथ पाटलांनी कापूस मालाला सरकारने योग्य भाव द्यावा यासाठी तत्कालीन व्यापारमंत्री श्री. दिनेशसिंग यांच्याशी प्रश्नोत्तरांच्या तासात माझ्यासमोर खडाजंगी केली होती. हे मला आजही जसेच्या तसे आठवते. शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या या प्रश्नावर त्यांनी संसद गाजविली होती.

इतिहासाच्या अनुभवाच्या शिदोरीवर भविष्याकडे वाटचाल करावयाची

असते. लोकोपयोगी कार्य करणाऱ्या सर्वांच्याच वाट्याला जास्तीची प्रसिद्धी मिळतेच असे नाही. पंढरीनाथ पाटील ह्यांचे देशप्रेम, समाजप्रेम त्यांनी केलेले शैक्षणिक, सामाजिक कार्य ह्याला तोड नाही. या पुस्तकाच्या निमित्त्याने या कार्यांना उजाळा देऊन पंढरीनाथ पाटलांच्या कार्य स्मृतीला प्रस्तुत लेखक श्री. दांडगे यांनी उजाळा देऊन एक 'महान' कार्य केले आहे, याबद्दल माझ्या मनात कुठलीच शंका नाही. आजच्या सामाजिक व नैतिक मूल्ये हरविलेल्या संस्कृतीत पंढरीनाथ पाटलांचे चरित्र भारत वर्षातील तरुणांसाठी एक दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरो हीच शुभेच्छा व्यक्त करून येथेच थांबतो.

**ॲड. शंकरराव बाजीराव बोबडे**

माजी खासदार

विद्यमान अध्यक्ष,

विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ, खामगाव

## परिशिष्ट - ३

*ALL INDIA LOCAL SELF GOVERNMENT CONFERENCE*

FIRST SESSION 1936

# LOCAL BODIES & THEIR RIGHTS

[Paper read at the First All India Local Self-Government Conference held at Delhi on the 28, 29 & 30th March 1936]

BY

**P. S. PATIL** Esqr.

Chairman District Council Buldana [Berar]

I need hardly mention that the spirit which inspired the inauguration of the Local Bodies had, as its goal, the expression of the will of the free people of their right of self determination, of their priliminary grounding in democracy. Roughly two decades are now passing by, since it assumed definite shape and form. Let us take a survey of this period and see how far and in what measure have these Local Bodies truly realised this spirit.

By Local Bodies we mean the District Councils, Local Bodies, Municipal Committees, Notified Areas, Village Panchayats and allied bodies. These have been working successfully inspite of the fact that the higher authorities are unnecessarily interfering in their business.

Nomination is another problem which confronts us. In its very implications the principle of nomination militates against the very ideal of democracy, since it saps the nominee of all the vestiges of a representative character. Still in view of our population so varied in composition; so divergent in creeds; so clashing in interests, the principle of nomination has to be accepted as a necessary evil.

One significant feature that has come in the wake of the Mont Ford Reforms is the general unrest and discoutent that is so rampant. The will to power after ages of subjections is so acute and the rights granted are so inadequate that unrest and discoutent must of the necesslty be so rampant. In adequate satisfaction of thirst is worst than the thirst itself. The present ailments of the Local Bodies are not a result of our inability to run them, but of a fictitions power granted under the shadow of a mailed fist. The cure is not in depriving them of some of these rights but in granting them more.

From this elucidation of the real flows in Local Bodies it would seem, that the authority for Self-Government C. P. has totally mis read the whole working of these bodies, in so far as he has thought it expedient to propound reactionary measures, which must be met with a vigorous all India agitation. A strong Committee must be formed to devise

means and ways for the protection of their rights and for the attainments of more ones.

In this connection I would strongly urge, after what experience I have had in this line, that the following further rights & powers should be granted so that the Local Bodies may rise to their full stature.

1] Compulsory primary education, control of secondary and Technical education and domestic science for girl students.

2] Maintenance and construction of the provincial P.W.D. Civil works.

3] Complete maintenance and management of all human and Veterinary Dispensaries with as much less interference as possible from the higher authorities.

4] The complete management and control over religious institutions.

5] Maintenance of the houses for the poor and the disabled.

6] The right of levying all kinds of tolls i.e. tolls on roads, rivers, ferries, bazars etc.

7] There should be direct election with universal franchise.

The powers of supervision of the minister for Local Self Government in the working of Local Bodies be definitely defined \ Similarly, the relations between the District and Taluq boards should be made more clear.

I am of openion that Government should meet all the expenses of Education, Primary, Secondary and Techanical. Moreover the general purposes grant should be increased and a sumtious grant should be given for the maintenance of the houses for the Poor and disabled.

The funds of the Local Bodies are deplorable in order to work the new reforms. The Local Bodies are completely handicapped for want of money, unless generous grants are given by Provincial Governments.

A disability which weighs heavily on the Local Bodies is the brand of inferiority writ large on their foreheads. The implicit assumption of superior airs by the most ordinary Government Servant is amazing. This prejudice casts a good deal of sand in the machinery of Local Bodies, It throwsont of harmony, their working with that of Government, Lack of sympathy in parallel institution; Lack of recognition of merits are by no means very helpful companions. This vicious circle can be ended only when the Local Bodies are granted freedom and independence, so that the vestiges of Bureaucracy may not have these opportunities for snobbery.

The labours of this great gathering in thoroughly thrashing out the problems bestting the working of the Local Bodies would be amply repaid if we could join hands in launching a country wide propaganda on sound lines. I am optimistic. I have faith and hope that the institutions can and have to be made as useful and efficient as those of western countries.

❑ ❑ ❑

## संदर्भसूची


१. सत्यप्रकाश दि. २२ आक्टोबर १९२२
२. सत्यप्रकाश तासगाव जि. सातारा दि. २९-१-१९२३, पृष्ठ क्र.२
३. **सत्यप्रकाश तासगाव जि. सातारा** दि. १ जुलै १९२३, पृष्ठ क्र. २,३
४. **दीनमित्र - दि. ७ जानेवारी १९२४**
५. मराठा समाचार दि. १८-१२-१९२४
६. दीनमित्र - ३१ डिसेंबर १९२४, पृष्ठ क्र. ७
७. विजयी मराठा, पुणे दि. १२ जानेवारी १९२५
८. सत्यप्रकाश तासगाव, सातारा दि. १-२-१९२५
९. विजयी मराठा, पुणे दि. २-११-१९२५
१०. उदय, अमरावती ता. २२ मार्च १९२६
११. विजयी मराठा, पुणे दि. ७ जून १९२६
१२. कर्मवीर दि. १४-७-१९२६
१३. मराठा समाचार, पुणे दि. १७-७-१९२६
१४. उदय, अमरावती ता. २८ सप्टेंबर १९२६
१५. ब्राम्हणेतर, वर्धा, संपादक- व्यंकटराव गोडे दि. ८ डिसेंबर १९२६
१६. 'हंटर' कोल्हापूर दिनांक ८-७-१९२७
१७. विजयी मराठा, पुणे १५-८-१९२७
१८. ब्राम्हणेतर वर्धा, २१-८-१९२७
१९. विजयी मराठा, पुणे ५-९-१९२७
२०. विजयी मराठा, पुणे १२ सप्टेंबर १९२७
२१. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर संपादित बहिष्कृत** भारत, १६ सप्टेंबर १९२७, पृष्ठ क्र. १०१(७)
२२. **विजयी मराठा, पुणे २४-१०-१९२७**
२३. विजयी मराठा, पुणे २१-११-१९२७
२४. विजयी मराठा, पुणे ९-१-१९२८
२५. विजयी मराठा, पुणे २३-१-१९२८
२६. विजयी मराठा, पुणे ३०-१-१९२८
२७. विजयी मराठा, पुणे २७-२-१९२८
२८. नवयुग, मुंबई ५ जानेवारी १९३०
२९. JUSTICE १७-१-१९३०
३०. नवयुग, मुंबई दि. २-३-१९३०
३१. राष्ट्रवीर बेळगांव दि. २४-२-१९३१
३२. राष्ट्रवीर बेळगाव दि. २५-८-१९३१
३३. महाराष्ट्र दि. २०-१२-१९३३
३४. विदर्भ दि. २८-८-१९३४

३५. महाराष्ट्र, ९ जानेवारी १९३५
३६. श्यामसुंदर, नागपूर दि. ८-१-१९३५
३७. साप्ताहिक विदर्भ दि. २७-२-१९३५
३८. मातृभूमी, अकोला दि. ७-५-१९४०
३९. राष्ट्रवीर बेळगांव दि. २५ जुलै १९४१
४०. हिंद सेवादलाची स्थापना कशासाठी ? पंढरीनाथ पाटलांनी काढलेले पत्र दि. १५-४-१९४२
४१. मातृभूमी दि. २-६-१९४२
४२. मातृभूमी दि. १६-७-१९४२
४३. बुलडाणा जेल प्रमाणपत्र दि. १७-९-१९४२ ते २-१०-१९४२
४४. नवाकाळ, मुंबई ४-१२-१९४३
४५. रा. अ. कानेटकर पासष्टी सत्कार संदर्भ, पंढरीनाथ पाटलांचे पत्रक दि. १-१-१९४५
४६. केसरी, पुणे, दि. २७-३-१९४५
४७. मातृभूमी, अकोला २५ मे १९४५
४८. महाराष्ट्र दि. १०-६-१९४५
४९. राष्ट्रवीर बेळगाव १३-७-१९४५
५०. तरूण भारत, नागपूर १८-७-१९४५
५१. सिंध मराठा दि. २९-७-१९४५
५२. मातृभूमी दि. १३-९-१९४५
५३. तरूण भारत, नागपूर दि. १-७-१९४६
५४. दै. महाराष्ट्र दि. ८-८-१९४६
५५. तरूण भारत, नागपूर ४-३-१९४७
५६. तरूण भारत, नागपूर २६-२-१९४७
५७. तरूण भारत, नागपूर २५-३-१९४७
५८. मातृभूमी दि. ३-७-१९४७
५९. शेतकरी, मलकापूर १२-७-१९४७
६०. शेतकरी, मलकापूर २६-७-१९४७
६१. शेतकरी, मलकापूर २-८-१९४७
६२. बुलेटिन, ४-८-१९४७
६३. संयुक्त महाराष्ट्र, अकोला १०-८-१९४७
६४. तरूण भारत, नागपूर १३-८-१९४७
६५. साप्ताहिक आहुती, २९-९-१९४७
६६. शेतकरी, मलकापूर ११-१०-१९४७
६७. संदेश दि. १६-१-१९४९
६८. संदेश दि. १३-२-१९४९
६९. दै. महाराष्ट्र, नागपूर ३-३-१९४९

७०. तरूण भारत, नागपूर ५-३-१९४९
७१. तरूण भारत, नागपूर ८-३-१९४९
७२. तरूण भारत, नागपूर दि. १८-३-१९४९
७३. तरूण भारत, नागपूर २६-३-१९४९
७४. महाराष्ट्र, नागपूर २६-३-१९४९
७५. तरूण महाराष्ट्र, अकोला दि. १०-५-१९५१
७६. जनसेवक, जळगांव १-६-१९५०
७७. दै. महाराष्ट्र दि. ३०-१०-१९५०
७८. तरूण भारत, नागपूर दि. १७-३-१९५१
७९. स्वतंत्र हिंदुस्थान, ३०-३-१९५१
८०. तरूण भारत, नागपूर दि. १-९-१९५१
८१. मातृभूमी, अकोला १८-१०-१९५१
८२. साप्ताहिक लोकमान्य दि. ३०-४-१९५६
८३. तरूण भारत, नागपूर दि. ५-१०-१९५६
८४. गावकरी, जळगाव दि. २७-१०-१९५६
८५. तरूण भारत, नागपूर दि. ५-४-१९५७
८६. तरूण भारत, नागपूर दि. ४-१-१९५८
८७. वृत्तपत्राचे नाव नाही, वर्ष १ ले अंक १३८ वा अकोला, सोमवार दि. २०-६-१९६०
८८. तरूण भारत, नागपूर दि. २-१२-१९६०
८९. तरूण भारत, नागपूर १८-११-१९६१
९०. टाइम्स ऑफ इंडिया, न्यु दिल्ली दि. ५-५-१९६४
९१. Patriot New Delhi दि. ५-५-१९६४
९२. The Stateman ता. २७ मे १९६४
९३. दै. मराठा बुधवार ता. २७ मे १९६४
९४. सा. यशवंत संदेश, मलकापूर दि. ८-१०-१९६६
९५. दै. शिवशक्ती, अकोला, दि. १९-६-१९६७
९६. दै. अजिंठा, औरंगाबाद, दि. २१-६-१९६७
९७. दै. मराठवाडा, औरंगाबाद दि. २२-०६-१९६७
९८. सा. यशवंत संदेश, मलकापूर दि. २४-६-१९६७
९९. लोकसत्ता, मुंबई दि. ६-६-१९६८ तृतीय डाक आवृत्ती
१००. Indian Express III Dak, Bombay दि. ६-६-१९६८
१०१. दै. मराठा, दि. १०-६-१९६८
१०२. दै. शिवशक्ती, अकोला दि. २९-११-१९६८
१०३. तरूण भारत, नागपूर दि. ३-९-१९६९
१०४. तरूण भारत, नागपूर दि. १६-९-१९७१

१०५. दै. मातृभूमी, अकोला दि. २५-९-१९७२
१०६. दै. लोकमत, दि. २२-२-१९७२
१०७. तरूण भारत, नागपूर दि. २५-९-१९७२
१०८. लोकसत्ता, मुंबई दि. २५-९-१९७२
१०९. नवशक्ती, मुंबई दि. २५-९-१९७२
११०. दै. बातमीदार, जळगाव दि. १६-३-१९७३
१११. आकाशवाणी पोर्टब्लेयर १६-३-१९७३
(मूळ हिंदी भाषणाचा मराठी अनुवाद दै. बातमीदार जळगाव)
११२. शिवशक्ती, अकोला दि. २४-३-१९७३
११३. दै. अजिंठा, औरंगाबाद दि. १६-३-१९७५
११४. शाहू छत्रपती व लोकमान्य - लेखक य. दि. फडके, पृष्ठ क्र. २९६, २९७
११५. शाहू छत्रपती व लोकमान्य - लेखक य. दि. फडके, पृष्ठ क्र. १८९
११६. पंढरीनाथ पाटील जीवन दर्शन- प्रा. हि. ए. चव्हाण, पृष्ठ क्र. १५, १६
११७. पंढरीनाथ सीताराम पाटील यांचे जीवनदर्शन - हि. ए. चव्हाण, पृष्ठ क्र. १७
११८. समाजभूषण श्री पंढरीनाथ सीताराम पाटील गौरव ग्रंथ दि. ३० मे १९६८, पृष्ठ क्र. ३
११९. समाजभूषण पंढरीनाथ पाटील गौरवग्रंथ ३०-५-१९६८, पृष्ठ क्र. ५
१२०. देवसिंग जयसिंग भोंडे यांनी मराठी बोर्डिंगसाठी काढलेले जाहीरपत्रक दि. १-७-१९३७
१२१. समाजभूषण पंढरीनाथ पाटील यांचे जीवन दर्शन, हि. ए. चव्हाण,
१० मे १९६८, पृष्ठ क्र. २१,२२
१२२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे व लेख खंड - १८ भाग-१, पृष्ठ क्र. ५७,५९
१२३. समाजभूषण पंढरीनाथ सीताराम पाटील एम. पी. गौरवग्रंथ ३०-५-१९६८, पृष्ठ क्र. २३
१२४. या. मा. काळे अल्पपरिचय लेखक - मा. प्र. काळे, खामगाव, पृष्ठ क्र. १२, १३
१२५. समाजभूषण पंढरीनाथ पाटील यांचे जीवनदर्शन हि. ए. चव्हाण, पृष्ठ क्र. ५५
१२६. या. मा. काळे यांचा अल्पपरिचय लेखक - मा. प्र. काळे, खामगाव, पृष्ठ क्र. २२
१२७. समाजभूषण श्री पंढरीनाथ पाटील एम. पी. गौरवग्रंथ, पृष्ठ क्र. ५, ६
१२८. डॉ. पंजाबराव देशमुख, पंढरीनाथ पाटील स्मारक समिती स्मरणिका १९८७, पृष्ठ क्र. ३०
१२९. श्री रामचंद्र अनंत कानिटकर जीवन चरित्र स्मृतिगंध, संपादक नागेश रामचंद्र कानिटकर पृष्ट क्र. ६७
१३०. नाशिक शिक्षण परिषद गौरव ग्रंथ पान ७ व डायरी
१३१. जगावेगळा सत्यशोधक, गुरूवर्य केशवराव विचारे, लेखक - जयंत गुजर
प्रथमा आवृत्ती, नोव्हेंबर २००४ प्रकाशक - विचारे फार्मस् प्रा. लि. इंदगाव (बदलापूर)
जिल्हा ठाणे पृष्ठ क्र. १२८-१२९
१३२. श्री. रामचंद्र अनंत कानिटकर जीवन चरित्र - स्मृतिगंध
संपादक - नागेश रामचंद्र कानिटकर पृष्ट ६७
१३३. श्री. रामचंद्र अनंत कानिटकर जीवन चरित्र - स्मृतिगंध
संपादक - नागेश रामचंद्र कानिटकर पृष्ट ८५

१३४. समाज भूषण श्री. पंढरीनाथ पाटील एम. पी. गौरव ग्रंथ, संपादक आ. अ. बाहेकर, ता. ३० मे १९६८, पृष्ठ क्र. २७/२८

१३५. महाराष्ट्र हिंदू महासभेच्या कार्याचा इतिहास, पृष्ठ क्र. ३९

१३६. या. मा. काळे अल्पपरिचय लेखक - मा. प्र. काळे, खामगाव, पृष्ठ क्र. २३

१३७. विदर्भातील सत्यशोधक चळवळीचे साहित्य पान ३३४

१३८. (डॉ. पंजाबराव देशमुख व पंढरीनाथ पाटील स्मारक समिती, स्मरणिका ता. १६-५-१९८७ पृष्ठ क्र. ३० व ३१)

❑❑❑



लेखक – ना. जा. दांडगे

तराडखेड ता. चिखली जि. बुलडाणा येथे शेतकरी कुटुंबात जन्म. गुम्मी व मासरूळ ता. चिखली येथे प्राथमिक शिक्षण. बुलडाणा येथील एडेड हायस्कुल व शासकीय बहुउद्देशीय उच्च माध्यमिक शाळेत माध्यमिक व जिजामाता महाविद्यालयात महाविद्यालयीन शिक्षण. श्री शिवाजी अध्यापक महाविद्यालय अमरावती येथे पदव्युत्तर प्रशिक्षण. श्री शिवाजी हायस्कूल बुलडाणा, जिजामाता हायस्कूल सिंदखेडराजा, श्री शिवाजी अध्यापक विद्यालय, चिखली येथे अध्यापन कार्य. बुलडाणा येथील यशवंत अध्यापक विद्यालय प्राचार्यपदी २८ वर्षे प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त. ४० वर्षांपासून बुलडाणा जिल्हा वृत्तपत्र सृष्टीत सक्रिय सहभाग. साप्ताहिक बुलडाणा पत्रिका वृत्तपत्राचे संस्थापक-संपादक.

भारत कृषक समाज, नवी दिल्ली, अखिल भारतीय सत्यशोधक समाज, औरंगाबाद/सातारा, श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, महाराष्ट्र विद्याप्रसारक मंडळ खामगाव इ. संस्थांचे आजीव सभासद. महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार, मा. बा. गांधी ट्रस्ट नागपूरचा दलित मित्र पुरस्कार व प्रेस कौन्सिल बुलडाणा द्वारा पत्रतपस्वी जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित. विदर्भ साहित्य संघ बुलडाणा, बुलडाणा जिल्हा पत्रकार संघ व अमरावती विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष व राज्यस्तरीय वृत्तपत्र पडताळणी समितीवर कार्य केले.

***